ती.प.पू. सद्गुरु श्री गोविंद अनंत केळकर

तथा

श्रीमामामहाराज केळकर यांची

अभंग गाथा

अर्थात्

अमृतवाणी

- संपादक -

दीपक चंद्रशेखर केळकर

॥ श्रीराम ॥

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८८

ती. प.पू. सद्गुरू श्रीगोविंद अनंत केळकर तथा
श्रीमामामहाराज केळकर यांची अमंगलगाथा अर्थात्

अमृतवाणी

(गोविंद गाथा)

- संकलक व संपादक -
दीपक चंद्रशेखर केळकर

- प्रकाशक -
श्री. माधव रामकृष्ण बर्वे

आवृत्ती दुसरी सांगली सन २०२१

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८८

अमृतवाणी

संकलक व संपादक
दीपक चंद्रशेखर केळकर
सांगली.

प्रकाशक :
श्री. माधव रामकृष्ण बर्वे
इचलकरंजी

प्रथम आवृत्ती इ.स.१९८१
द्वितीय आवृत्ती इ.स.२०२१
प्रकाशन दिन : प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथी
माघ शु. ९ शके १९४२,
शनिवार दि. २०.०२.२०२१

© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

अक्षर जुळणी :
पॉप्युलर एस.अँण्ड टी. इन्स्टिट्यूट, सांगली
श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे

मुद्रक :
श्रीकृष्ण मुद्रणालय, औद्योगिक वसाहत, सांगली

स्वागत मूल्य : रु.१००/-

प्रत मिळणेचे ठिकाण :
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

-: अमृतवाणी अंतरंग :-

अर्पण पत्रिका - प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी	दोन
लिखित संस्कृत काव्य	
प्रथम आवृत्तीचे आशीर्वाद :	
१. ह.भ.प. श्रीगुरुनाथ कोटणीसमहाराज, सांगली.	चार
२. प.पू.श्रीस्वामी अमलानंद, पेण.	पाच
३. गु.भ.प. श्रीमामासाहेब देशपांडे,पुणे	सात
नामनिष्ठ-मामा :-	
ह.भ.प. बापूसाहेब देशमुख, वकील, सांगली.	आठ
ह.भ.प.गो.श्री.कुलकर्णी, कोल्हापूर	सोळा
अखंड नामसंकीर्तन योगी श्रीमामामहाराज :-	
प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, सांगली.	एकोणीस
अमृतवाणी परिचय :- प्रा.डॉ.के.वा.आपटे, सांगली	अठ्ठावीस
प्रथम आवृत्तीच्या प्रकाशकाचे मनोगत :-	
श्री राम गोविंद केळकर (श्रीदासराममहाराज)	एक्केचाळीस
द्वितीय आवृत्ती संपादकीय श्री.दीपक चंद्रशेखर केळकर	पन्नास
कै.सुमती रामकृष्ण बर्वे यांचेविषयी थोडेसे	चोपन्न
द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत	पंचावन्न
श्री. माधव रामकृष्ण बर्वे	
अमृतवाणी चिंतन श्री. अनिलप्रभू राम केळकर	छप्पन्न
मनोगत - श्री. नरहर दामोदर दिवेकर	चौसष्ठ
श्रीमामामहाराजकृत श्लोक	सहासष्ठ
श्रीमामामहाराजकृत कविता	अडुसष्ठ

अर्पण - पत्रिका

प्रणम्य शिरसा नाथं पंचवक्त्रं महेश्वरम् ।
नाम पंचायतं नित्यं स्मरेत् साधनसिद्धये ।।१।।
प्रथमं गुरुलिंगच नारायणं जगत्पतिम् ।
वरां शिष्यां सदामुक्तां मोक्षलक्ष्मी द्वितीयकम् ।।२।।
तृतीयं साधुराजंच तपोमूर्ति दयानिधिम् ।
रामचंद्रं महाराजं चिन्मूर्तिंच चतुर्थकम् ।।३।।
हनूमंतं महत्सिद्धं ब्रह्ममूर्तिंच पंचमम् ।
पंचैते पंचवदनं पंचाक्षरसुरेश्वरम् ।।४।।
तस्य चिन्मया धारा दिव्य गोविन्दमानसात् ।
आगता भूतले गंगा कृष्णातीरं तपोवनम् ।।५।।
तयाऽत्र दर्शितं रूपं नामभक्तिंच संस्कृतिम् ।
परमार्थाऽमृतावाणी गाथा सर्वस्य भूषणम् ।।६।।
स्वरूपं दर्शितं येन हृत्सागर सम्भवम् ।
स्वयं संस्फुरितं चाऽत्र गाथाहि परमामृतम् ।।७।।
चैतन्य ग्रथिता गाथा चित्स्वरूपाच मनोहरा ।
पाप-ताप-हरा वाणी तारिणी भवसागरात् ।।८।।
गाथाहि त्रिवेण्योंकार - पूजापात्र समन्वितम् ।
पंचामृताभिषेकार्थं पंचवक्त्रं समर्चितम् ।।९।।
हृदि भाव स्थितो नित्यं "शिवो भूत्वा यजेत् शिवम्" ।
त्वदीय वस्तु योगेश तुभ्यमेव समर्पये ।।१०।।
पंचवक्त्र-प्रसादोऽयं साक्षात् श्रीसद्गुरोः कृपा ।
सद्भाग्येनाधुना प्राप्ता हालसिद्धप्रसादतः ।।११।।

अखंडं संततं येन कीर्तितम् नाम कीर्तनम् ।
कल्याणं साधितं चैव एकनाथो द्वितीयकः ॥१२॥
तस्या गाथा अभंगानां ग्रथिता साधुतुष्टये ।
अर्प्यते दासरामेण सिद्धपंचकमूर्तये ॥१३॥
॥ इति श्रीमद् "अमृतवाणी" - अर्पण - पत्रिका - श्रीसद्गुरू-श्रीपंचसिद्ध-सेवायां 'दासरामेण' - परम भावभक्त्या समर्पिता अस्तु ॥



।। श्री सद्गुरू समर्थ ।।

पांडुरंग रघुनाथ कोटणीस
'कैवल्य धाम' संत तात्यासाहेब
कोटणीस पथ, सांगली.
३०.०१.१९८१

प्रस्तुत गाथेत कै.ह.भ.प.मामासाहेब केळकर यांचे सर्व अभंग आहेत. यात प्रामुख्याने नामसामर्थ्य, सद्गुरूसामर्थ्य वर्णिले आहे. त्यांना हे अभंग स्फुरले आहेत याचा प्रत्यय प्रत्येक अभंगागणिक येतो. अंतःकरणातील परमार्थ विचारांचे किती भांडार ओतले गेले आहे, हे ग्रंथ वाचल्यावर अनुभवास येईल.

जगत् दृष्टीने संसारात राहून पण त्यात गुंतून न राहता, त्यात उदास व परमार्थात उल्हासाने मुख्य कर्तव्य हरिकीर्तन हे जाणून आणि हीच खरी चाकरी, हे समजून अखंड अनुसंधानी राहिले. त्याचीच ही परिपक्व स्थिती होय.

- गुरूनाथ कोटणीस



प.पू.स्वामी अमलानंद

श्री.ह.भ.प. रामभाऊ केळकर यांस, --

श्रीमत् परमहंस सद्गुरु स्वामी स्वरूपानंद माऊलींचे बालके अमलानंद याजकडून तुम्हां सर्वांचे सर्वाभीष्ट चिंतन व शुभाशीर्वाद विशेष.

ईशकृपे इकडील सर्वदूर आजतागायत क्षेमकुशल. आपले पत्र योग्य वेळी पावले. मजकूर समजला.

"सकळ भजनाचे शिरी । रामनाम दो अक्षरी ।
सदा गर्जे ज्यांची वैखरी । धन्य धन्य चराचरी तो एक ।।"

-एकनाथमहाराज

ह.भ.प. मामासाहेब केळकर हे चिमड संप्रदायामधील एक थोर अधिकारी सत्पुरुषच होते. सद्गुरु कोटणीसमहाराजांचे पश्चात नित्य कीर्तनाची परंपरा त्यांनी सांगलीत सुमारे चाळीस वर्षे चालविली. तसेच त्यांचे मागे त्यांचे सुपुत्र श्री रामराय केळकर हे चढत्या वाढत्या श्रेणीने आज तीच परंपरा चालवीत आहेत, हे प्रत्यक्ष भेटीत पाहून आम्हांस परम संतोष होत आहे.

ह.भ.प. मामासाहेब केळकर हे निष्ठावंत रामभक्त होते. साधकावस्थेत त्यांनी साडेतीन कोटी रामनामाचा जप केला होता. 'श्रीरामपाठात' त्यांनी या रामनामाचे महत्त्व अधिकारवाणीने सांगितले आहे. ज्ञानेश्वरीची त्यांनी आळंदी येथे पारायणे केली होती व त्यांना श्रीज्ञानेश्वर माऊलींनी सगुणरूपात दर्शनही दिलेले होते. यावरून त्यांचा पारमार्थिक अधिकार ध्यानी येतो. गुरुदेव रामभाऊ रानडे हे सुद्धा मामासाहेबांच्या कीर्तन श्रवणाने प्रभावित झाले होते. त्यांचा

कीर्तिसुगंध प.पू. स्वामी स्वरुपानंदांचेपर्यंत पोहोचला होता. प.पू. स्वामींना त्याचा आनंद होई. यावरूनही त्यांची श्रेष्ठता कळून येईल.

निष्काम, निर्लोभ, निर्दंभ आणि भक्तीप्रेमाने भगवंताला आवडेल असे अखंड कीर्तन करून, भक्तीसुखाच्या भाग्याचे ते धनी झालेले होते. काया, वाचा, मने चित्तवृत्ती रामनामी रंगवून, परमार्थ कसा करावयाचा तो मूर्तिमंत आदर्श होता.

त्यांनी लिहिलेल्या अभंगगाथेचे मुद्रण व प्रकाशन होत आहे. हे कळून आनंद झाला. पारमार्थिकांना या अभंगाद्वारे उत्तम मार्गदर्शन होईल व त्या अभंगांच्या श्रवण, मननाने सुख, समाधान व शांती यांचा लाभ होईल. या अभंगगाथेस व प्रकाशनास आमचे शुभचिंतनपर आशीर्वाद.

पेण,

१५ डिसेंबर, १९८०
प.पू.स्वामी स्वरुपानंद
जन्मतिथी.

श्रीस्वामी चरण सेवक
अमलानंद

योगीराज प.पू. सद्गुरू श्री. श्रीपाद दत्तात्रय तथा श्रीमामासाहेब देशपांडे महाराज

॥ श्री ॥

ती.प.पू. श्रीमामा केळकर यांच्या घरी आज आलो होतो. माझे सद्गुरु परम पूजनीय योगीराज श्रीगुळवणीमहाराज हे या ठिकाणी येत असत. त्यामुळे या मामांच्या घराबद्दल मला एक प्रकारचा आदर वाटतो. सांगलीस आलो की, मी येथे येऊन जातो.

आज आल्या वेळी श्रीमामांचे चिरंजीव श्री रामराय केळकर यांनी श्रीमामांच्या अभंगांच्या गाथेची प्रत दाखविली. श्रीमामांचे अभंग पाहून अत्यंत आनंद वाटला. अभंग अत्यंत प्रासादिक आहेत. या गाथेच्या प्रकाशनाचे काम अत्यंत सुंदर तऱ्हेने पार पडेल असा विश्वास आहे.

श्रीसद्गुरु श्रीगुळवणीमहाराज यांच्या कृपेने हे चार शब्द श्रीमामांचे चरणी समर्पण करीत आहे.

श्री प.पू.योगिराज गुळवणीमहाराज
७वी पुण्यतिथी, सांगली

श्री. द. (मामा) देशपांडे
सांगली २८.०१.१९८१



प्रथम आवृत्तीचा अभिप्राय

श्री. ग. ब. देशमुख, वकील, सांगली

॥ श्रीराम ॥

नामनिष्ठ मामा

(अभंगांतून व्यक्त झालेले)

सांगली येथे अगदी अलीकडे होऊन गेलेले ब्रह्मीभूत तीर्थरूप गोविंद अनंत केळकर तथा बापूरावजी केळकर अर्थात मामा यांच्या अभंगांची गाथा प्रकाशित होत आहे, ही परम भाग्याची गोष्ट होय. मामांचे अधिकारी सुपुत्र, गुरुभक्तिपरायण रामराय तथा दासराम यांनी ही गाथा प्रकट करून महाराष्ट्र संतवाङ्मयात अत्यंत मोलाची भर घातली आहे. शिवाय या गाथेमुळे साधकवर्गाचीही फार मोठी सोय झाली आहे.

मामांची ही रचना नमन, सद्गुरु, संसार, नरदेह, मन, उपदेश, विवेक, वैराग्य, भक्ती, नाम, साधन अशा भिन्न भिन्न अठरा वीस दृष्टिकोनांतून झाली आहे. रामपाठासह ही रचना एकूण तेरा शत आहे. मात्र एवढ्या विपुल रचनेत मामांनी एक नामच गायलं.

"सात शते श्लोक । अध्याय अठरांचे लेख ।
परी देव बोलिले एक । जे दुजे नाही ॥ज्ञा.॥"

माऊलीचे हे वचन श्रीमद्गीतेबद्दल सार्थ आहे. मात्र आपल्या या तेराशत विपुल रचनेत अक्षरार्थातही मामांनी एकच एक नाम सांगितले. मामांची ही सर्वच रचना त्या दृष्टीनं विचारार्ह आहे. तथापि वानगीदाखल - "रामवीर हृदयी जाणा । दासा आला शूरपणा । (२४५)", "सर्व शुद्धीसी कारण । ओळखावी नामखूण । (२५४)", "सर्व दोषा प्रायश्चित्त । दास म्हणे नाम सत्य । (३३२)", "तोचि ज्ञानमार्ग देवाजीचे नाम । होसी पूर्ण काम दास म्हणे।। (४५२)", "संगे येईल देवाजीचे नाम । करी पूर्ण काम साधकासी । (४१३)", "रामनाम ठेवा अमूप हे धन । साधिल्या भगवान दास म्हणे । (४२१)", "प्रपंचात तत्त्व सोने । परमार्थी नाम जाणे । (४२६)", "अखंड देही नाम पाहे (४६७)", "एक जाणे नामकळा । तेणे वीण अवकळा । (४७१)", "दास म्हणे नाम घेता । सर्व शक्ति येती हाता । (५३२)", "मर्दपणाचे लक्षण । नामनिष्ठा दास म्हणे । (५३५)", "दास म्हणे रामनाम खरी वस्तु । येर ती अवस्तु कळूनी येई । (५४२)", "गोविंद म्हणे तपनाम । सर्व देईल उत्तम । (५४८)", "जीवा नामचि कर्तव्य । कर्तव्याचे जे कर्तव्य । (५५५)", "गोविंद म्हणे पाही । शील नाम आन नाही । (५६१)", "गोविंद म्हणे श्रेष्ठाचार । नाम अंतरी साचार । (५६२)", "सर्व काही नामी आहे । दास म्हणे अनुभव पाहे । (५७५)", "वेद शास्त्रांचा कळस । रामनाम म्हणे दास । (५७८)", "डोळियाचा डोळा नामे उघडावा । विवेक धरावा दास म्हणे । (५८८)", "चित्त चैतन्य मिळणी । रामनामाची करणी । (७०६)", "नाम घेता मुक्ति हे ब्रह्मलिखित । (७२०)", "नाम तारक हा प्रचीतीचा डंका । (७२०)", "पूर्ण कळा नाम । नाही आणिकाचे काम । (७४७)", "तेरा अक्षरांचे थोरही सामर्थ्य । प्रगटे समर्थ हृदयामाजी । (७७१)", ही व अशी कित्येक अन्य अवतरणे वरील विधानाची खात्री देतील.

आपल्या या रचनेत मामांनी दिलेल्या काही व्याख्या त्या त्या शब्दांचे मौलिक अर्थ सांगून जातात. त्यातील काही - "पाप म्हणजे अनाम । दास म्हणे

मुख्य नाम ।(३३०)", "वासना राहेना अंतरी । दास म्हणे ब्रह्मचारी ।(३६)", "नवविध भक्ती खूण । दासा नामी सिद्धपण । (५२)", "मानापमान निरसन । हेचि देवाचे दर्शन । (५३८)", "देवाजीचे नाम थोर हे भजन ।(४३)", "मनाचा आवर हाच गा विवेक । अनावर देख अविवेक । (९१)", "तोचि भक्त श्रेष्ठ जो नव्हे विभक्त । (६०७)", "सर्व देवा समर्पण । प्रेम भक्तीची ती खूण ।(९)", "देवा नाम समर्पण । हेचि देवाचे पूजन । (३०)", "हेचि देवाचे पूजन । सदा राहे समाधान । (३१)", "वंदन म्हणजे नमन । मन आपुले देवार्पण । (३७)", "गोविंद म्हणे निवेदन । अखंड नामाचे स्फुरण । (४३)", "देही प्रेमाची जी खूण । भक्तीची ते ओळखण । (४७)", "कल्याणाचे ही कल्याण । रामनामी जाणे खूण । (७५४)", "योगी वियोगाचे काम । तोचि वानप्रस्थाश्रम । (८६८)", "धी माजी नाही आन । हेचि ध्यानाचे लक्षण । (६९)", "सर्व संकल्पाचा न्यास । तोचि बोलिजे संन्यास । (८७)"

अशा असून त्या सामान्यांनासुद्धा स्पष्टार्थ देतात.

मामांच्या काही काही अभंगांचे चरण अन्य संतांच्या अभंगांची आठवण देतात उदाहरणार्थ :-

"मुक्तिकांता वरोनिया । सदा चिंती हरिपाया । (३३८)" हा चरण "तुका म्हणे मुक्ती परिणीली नोवरी । आता दिवस चारी खेळीमेळी ।।" या तुकोबांच्या चरणाचा आठव देतो, तर

"बाह्यरंगा भुलू नको । अंतरंगा सोडू नको । (३७०)" या ओळी "काय भुललासी वरलिया रंगा । चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।।" या चोखोबांच्या काव्यपंक्ती स्मरणात खेचतात.

"रामनाम घेता वृथा । कोणी होईना सर्वथा । (४९२)" हा मामांचा चरण, "नाम घेता वाया गेला । ऐसा कोणी आयकिला ।" या तुकोबांच्या अभंगाची आठवण

देतो.

"करिता दधीचे मंथन । नवनीत निघे जाण । (८८२)" हा मामांचा चरण "मंथुनि नवनीता । तैसे घे अनंता ।" या ज्ञानोबांच्या चरणाच्या तोंडवळ्याचा वाटतो.

"दीपावली दीपज्योती नयनी देखिली । सद्गुरुच्या पूर्णकृपे हृदयी प्रगटली । (१)", "अनंतदीप झगझगाट होय अंबरी । पाताळी त्याच परी हृदय मंदिरी ।(२) (१०९३)" हे मामांचे पद्य तर "निर्गुणाचा संग मला आजि जाहला । पूर्व दिशे भानु जसा आंत उगवला ।।" या मुक्ताबाईंच्या पदाची हुबेहूब प्रतिकृती वाटते.

मामांच्या या रचनेत,

"कोणाचेही घ्यावे बोधाचे वचन । तेथे सान थोर मानू नये । (४६५)", "काहीही साधाया व्हावे त्याचे वेडे । देवाचिया वेडे देव जोडे । (५२५)", "चांगल्यास विघ्ने फार । विलंबाने हानी थोर । (४११)"

अशी सुभाषिते व बोधवचनेही ठिकठिकाणी विखुरली आहेत.

"कैसा पवन साधावा । स्थिर करूनी नामी लावा ।।१।। घेऊनी सोडणेचे आधी । स्थिर करूनि कुंभक साधी ।।२।। जैसा जैसा वाढे काळ । पवन विजयाचे बळ ।।३।। वाढे दासाचे अंतरी । पूर्ण होता साक्षात्कारी ।।४।।" (७८५)

या व अशाच अन्य अभंगांनी मामांनी साधकांचा साधनमार्ग अगदी उघडा करून दाखविला आहे.

उन्मनी ओवरी तेज अभ्यंतरी । चंद्रसूर्या न सरी विद्युल्लते ।। ज्योत लावोनिया ज्योती पेटविली । दासालागी आली प्रचीती ।।९६१।।; देव विटेवरी उभा । नवल तयाची ती प्रभा ।। औटपीठ स्थानी । उभा विठ्ठल दिसे नयनी ।।९६६।।; नाम अमृताचे पान । हेच संतांचे भोजन । दास सेवी अखंडित । मन झाले परमतृप्त ।।९७५।। ; नामे साधिली ही खूण । तीन तपे भगवान । दासा सहा पैल पाही । अघटित नवलाई ।।९९०।।

अशा वचनानी आपला अनुपम अनुभव प्रकट करून कृतकृत्यतेची ग्वाही दिली आहे. 'रामपाठ' हा तर मामांच्या नाममंदिराचा सुवर्ण कळस होय. प्रदीर्घ स्वतंत्र लिखाण करण्याइतका तो श्रेष्ठ आहे. मामांनी आपल्या अन्य सर्व रचनेत दिलेला अध्यात्मसंदेश या बत्तीस अभंगात प्रकट केला आहे. ज्ञानेशमाऊलींच्या असामान्य कृपाप्रसादामुळे पालटलेल्या परिस्थितीनुसार सर्व साधकांच्या कल्याणासाठी मामांच्याद्वारे प्रकट झालेला तो हरिपाठाचाच अवतार होय.

"रामपाठ करी रामपाठ करी । पुण्याची हे थोरी वर्णवेना ।।" ही ओळ तर "हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।" या हरिपाठ ध्रुपदाची पुनर्भवा मूर्तीच! रामपाठातील किती तरी वचने हरिपाठाच्या तोंडवळ्याची आहेत. अन्य काही रचना न करता केवळ रामपाठच लिहिला असता तरीही मामांच्या रचनाकार्यात काहीच न्यून राहिले नसते. इतका तो सर्वांग परिपूर्ण व सौंदर्य संपन्न आहे. रामपाठ म्हणजे नामाचा डांगोरा, नामभक्तीचा अमृतपाक, अखंड सुखाचे सदावर्त व ज्ञानेशमाऊलींच्या असीम कृपेचे सुमधुर अवीट फळ. त्याच्या रचनेची सहजता, ध्वनि-समतोल, लयबद्धता व आकर्षण-माधुर्य काही अपूर्व आहे! श्रीमद्भगवद्गीता सांगणाऱ्या भगवान श्रीकृष्णानेच जशी ज्ञानेश्वर रूपाने ज्ञानदेवी मऱ्हाटी भाषेत प्रकट केली, त्याचप्रमाणे हरिपाठ सांगणाऱ्या ज्ञानेशमाऊलीनेच मामांच्याद्वारे रामपाठ प्रकट केला. "म्हणोनि भलतेणे एथ सद्भावे नाहावे । प्रयाग माधव विश्वरूप पाहावे । येतुलेनि संसारासि द्यावे। तिळोदक ।।" (ज्ञानेश्वरी). अशा थोर पदवीचा रामपाठ आहे.

मामांच्या सर्वच रचनेची भाषा सोपी व सर्वसुलभ आहे. नाना अलंकारांनी ती नटलेली आहे. आपल्या या रचनेसाठी मामांनी वापरलेली मुद्रा द्विविध आहे. श्रीगुरुचरणी अर्थात् भगवच्चरणी असीम दास्यभाव हा मामांच्या अध्यात्मजीवनाचा मजबूत पाया होय. म्हणून कित्येक अभंगात मामांनी "दास

म्हणे'' हीच मुद्रा वापरली आहे. मामांची दास्यभक्ती इतकी प्रखर की, ''नाम उत्तम निर्विघ्न । दासा वश रघुनंदन ।।''(४१६), ''नामे एकांतात गेला । देव दासांकित झाला ।।'' (४१९) या व अशा मामांच्या कबुलीवचनानुसार मामा पूर्णतया सायुज्यरामरूप झाले. त्यांनी कांही ठिकाणी योजलेली ''गोविंद म्हणे'' ही मुद्रा त्याचाच परिणाम होय असे माझ्या अल्पमतीला वाटते.

भगवत्प्राप्तीसाठी आतापावेतो नाना मार्ग (योग) उपलब्ध झाले, पण त्यासाठी मामांनी दिलेला 'निष्ठायोग' हा अश्रुतपूर्व मार्ग होय. ''निष्ठा हेचि फळ जाणावे केवळ । जेथे तळमळ नसे लेश ।।१।। हाचि महाधर्म साधिता दुर्गम । पूर्ण सुखधाम प्राप्त तेणे ।।२।। अप्राप्य ते प्राप्य धरिता निष्ठायोग । अयोग्य ते योग्य दास म्हणे ।।३।। (५२१)''

या अभंगात प्रकट केल्याप्रमाणे मामांचा हा निष्ठायोग स्वानुभवाधिष्ठित अर्थात समर्थ योग होय. निष्ठायोग ही भल्याभोळ्यांना - साऱ्यांनाच मामांनी दिलेली अभूतपूर्व नि आचार सुलभ मौलिक अध्यात्मदेणगी होय. साऱ्यासाठी शोधलेला हा प्रकट राजपथ होय.

'रामनाम' हेच या महापुरुषाचे जीवन सर्वस्व होते. 'हरीचिया दासा हरी दाही दिशा' अशी त्यांची अखंड स्थिती होती. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्यांनी एक 'राम' पाहिला. गुरूपदिष्ट कीर्तनसेवेत अडथळा येतोसे दिसताच त्यांनी शिक्षकाच्या जागेचाही समाधानाने त्याग केला. मामा रामरूप होते, रामवेडे (Ram-intoxicated) होते. ''शेवटच्या क्षणी । जरी नाम येई वाणी ।। सर्व साधिले तयाने । भरोनिया सर्व उणे ।। सदा वाचे नाम बोल । घेता घडोनि येईल ।। नाही तरी केवी घडे । दास म्हणे जन्म पुढे ।। (५८३)''

या त्यांच्याच अभंगाप्रमाणे त्यांची स्थिती होती. म्हणून मामांचा शेवटही एक ''अभूतपूर्व चमत्कार'' होऊन राहिला. देहातील सर्व नाड्या सुटल्या

असताही कीर्तनसमयाला, "श्रीराम जयराम जयजयराम" हा सकलांना दिङ्मूढ करणारा समर्थमंत्र विकल देहाला न जुमानता प्रकट झाला. रामकृपेच्या अशा या अपूर्वाईने त्यांच्या मर्त्य देहाची इतिश्री झाली.

गुरूचरणी असीम प्रीती बाळगणाऱ्या या पुरुषोत्तमाने अडतीस वर्षे अखंड कीर्तन करून गुर्वाज्ञेचे पालन केले. मामांनी केलेला रामनाम झंकार इतका प्रबल की त्यांनी देह टाकल्यावरही त्यांच्या स्मृति-सिंहासनातून "नामरूप भगवान माझा । नामरूप भगवान ।।१।। नामरूप सद्गुरु कृपा करी । नामचि पदवी महान ।।२।। नामचि साधन नामचि कीर्तन । नामाविण नच ज्ञान ।।३।। पंथहि नामचि प्राप्तीही नामचि । दासा तेच प्रमाण ।।४।। (११९२)"

हा अभंग प्रकट झाला. मोठमोठ्या बुद्धीवाद्यांच्या बुद्धिलाही कोडं टाकणारा हा महान चमत्कार होय. हा अभंग म्हणजे मामांच्या जीवनाचे सारसर्वस्वच! 'माझी काया गेली खरे । परि मी आहे विश्वाकारे ।।' या समर्थवचनानुसार देहदृष्ट्या मामा अदृष्ट असले तरी चैतन्यस्वरूपाने मामा आहेत. निश्चित आहेत. ही गाथा त्यांची वाङ्मयमूर्तीच होय. दृढश्रद्धेने तिची जवळीक साधल्यास कोणीही, केव्हाही मामांच्या पूर्णकृपेस पात्र होऊ शकेल.

सुमारे ऐशी वर्षांपूर्वी श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराजांनी नित्य कीर्तनसेवा सुरु करून नामकैवल्याचे रोप सांगली येथे लावले. दोन तपाहून अधिक काळ त्याला खतपाणी देऊन ते त्यांनी वाढविले. परमगुरुभक्त मामांनी ही नित्यसेवा पुढे अडतीस वर्षे सतत चालू ठेवून, त्या रोपट्याचा विशाल वटवृक्ष केला. "कही एकाग्रेनि वैकुंठा जावे । ते तिही वैकुंठचि केले आघवे । ऐसे नामघोष गौरवे । धवळले विश्व ।।(ज्ञानेश्वरी)". या ज्ञानेश-वचनानुसार मामांनी या सांगलीत प्रत्यक्ष वैकुंठच वसवले. मामांचे हे विशाल अमरकार्य पाहिल्यावर ते तात्यांहूनही वाढ होत असे क्षणैक वाटल्यावाचून रहात नाही. पण त्यामुळे तात्यांच्या

श्रेष्ठत्वाला हानी न येता ते अधिक ठसठशीत होते. "येथ गुरुत्वा येतसे उणे । ऐसे झणे कोण्ही म्हणे ।। वन्हि प्रकाश दीपपणे । प्रकाशी आपला ।। तैसा देवाचिया शक्ती । पार्थु देवासीचि बहुती । परि माने इये स्तुती । गौरव असे ।। (ज्ञानेश्वरी)" या वचनानुसार तात्यांच्या सामर्थ्यामुळेच मामांचे अध्यात्मवैभव वाढ झाले. म्हणून मामांचे हे वैभव हा तात्यांचाच गौरव होय.

मामांनी एवढी अभंगरचना केली असल्याचे त्यांच्या हयातीत कोणालाच माहित नव्हते. सर्व मुलाबाळांवर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या पित्याने विपुल गुप्तधन मागे ठेवावे, त्याप्रमाणे मामांनी हे अभंग-धन आम्हा सर्वांसाठी ठेवले आहे आणि परमादरणीय दासरामांनी ते प्रकाशून "संसारायेवढे थोर ओझे । फेडिले जगाचे ।" त्यांच्या या उपकृतीबद्दल त्यांना मनःपूर्वक अखंड कृतज्ञतापूर्ण धन्यवाद. तीर्थरूप मामांच्या ऋणातून तर पार होताच येणार नाही. त्यांच्या ऋणात रहाणं हाच आपला सर्वांचा हक्क. म्हणून, "सद्गुरुबोध सार्थ केला । रामनामी जो रंगला ।।१।। श्वासोच्छ्वासी जे गुंफिले। नाम गुरुचरणी अर्पिले ।।२।। धन्य धन्य लाघव केले । रामरायासी जोडले।।३।। रामनाम मुद्रांकिता । तुज नसो सद्गुरुनाथा ।।४।।" या शब्दात त्यांना विनम्र वंदन करून ही शब्दसुमने श्रीज्ञानेशमाऊलीचरणी समर्पितो.

सांगली.
माघ शु.४ शके १९०२
श्रीगणेशजयंती
दि.८.२.१९८१.

माऊलीचरणरज,
ग. ब. देशमुख

प्रथम आवृत्तीचा अभिप्राय

ह.भ.प. श्री. गो. श्री. कुलकर्णी, कोल्हापूर

नामामृत सागरातील काही दिव्य तरंग

सागराचे तरंग आणि सागर ही पाणी स्वरूपाने अभिन्नच असतात, तसे भगवन्नाम आणि भगवंत ही एकरूपच असल्याने मामांच्या या अभंग रूपाने भगवंतच प्रकट झाला आहे. वेद जसे 'अपौरुषेय', तसेच संतवाङ्मयही अक्षर असून, ते अहंकाररहित असल्याने तेही 'अपौरुषेयच'.

ख्यातनाम चिमड संप्रदायाचा साधनप्राण ''नित्यनेम'' आणि मामांच्या साधनेचे हृदय ''नामसंकीर्तन''. श्रीज्ञानेश्वर माऊलीने एका ओवीत नामाचा गौरव असाच केला आहे.

''नामजप यज्ञु तो परम । बाधु न शके स्नानादि कर्म । नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ।।ज्ञाने.अ.१०।।''

श्रीहनुमंतसद्गुरूंच्या कृपानुग्रह दिनापासून अगदी शेवटच्या श्वासापर्यंत प.पू. मामांनी भगवन्नामाची कास धरली आणि आपले जीवन धन्य केले! म्हणूनच मामा असे अक्षर वाङ्मय करू शकले.

प.पू. मामांच्या अभंगांचे एक वैशिष्ट्य म्हणजे बोधासारख्या गंभीर विषयासही त्यांनी विनोदाची व अद्भुततेची झालर लावली आहे.

उदा. ''माया घटोत्कची व्यापार'' संसार हा 'विस्मरणाचा खेळ', प्रपंच-परमार्थ या उलट्या दिशेने जाणाऱ्या गाड्या, प्रपंचाची झापड

गेल्याशिवाय देवदर्शन नाही. 'मुख्य संध्येचे लक्षण । देह बुद्धीचे निवारण । आत्मसूर्याचे दर्शन । आत्मविद्या ।।१।।'

रामनाम कसे साठवावे या बोधाकरिता त्यांचे खालील श्लोक नित्यपाठांतरात ठेवण्यासारखे आहेत.

जिही श्वासउच्छ्वास हे रामनामी । सदा लाविले जाण कामी निकामी ।। मना
ये रिती साठवी नामसार । मना जाण रे तो जगी एक थोर ।।१।।

कसोटी नको पाहू तू दूजियाची । सदा सर्वदा कीर्तनी काळ वेची ।।
कसा टिकणे कर्म आहे कठीण । कसा टिकला तो जगी धन्य जाण ।।२।।

मना दुसऱ्याचे नको गुणदोष । तया पाहता होय तो आत्मनाश ।।
जनी निंदिता वंदिता सम मानी । जगी तोची तो धन्य हे सत्य जाणी ।।३।।

मना रे जनी काम क्रोधासी सांडी । जना रे मनी रामनामासि मांडी ।।
मना मीपणा खंडिता धन्य होय । प्रभूनाम हे मांडिता देव साह्य ।।४।।

साधनाच्या वाटचालीत साधकाचे ध्येय नेहमी 'आत्मदर्शन' हेच असते. हा विषय गंभीर आणि सहज न समजणारा असा गुह्यात गुह्य आहे. पण "हाती येता आत्मज्योती । मार्ग दिसे भगवंती" या अभंगात प.पू. मामांनी या विषयाबद्दल स्पष्ट, सोपे आणि अगदी उत्कट मार्गदर्शन केले आहे.

एका नामात सर्व काही साधेल असे प.पू.मामा आपल्या अनुभवाने साधकांना अनेक अभंगात आश्वासन देतात.

नवविधा भक्तीचे परिणाम या बाबतचा "श्रवण हरिनामी श्रवण दोष गेला" हा अभंग अपूर्वच आहे. इतक्या सोप्या भाषेत या विषयाचा बोध अन्यत्र वाचावयास मिळणे दुर्लभ.

सारांश ही अभंग सागराची गाथा संसार-सागर तरून जाण्यास श्रद्धाळू

साधकाला खात्रीचा आधार आहे. भाग्यवान भोळ्या साधकांनी सत्श्रद्धेने या नामामृत सागरातील बोधामृत आकंठ पीऊन कृतकृत्य व्हावे. वेदान्ती अगर ज्ञानी पण चोखंदळ साधकांनी यातून आत्मबोधाची रत्ने शोधून, ती अत्यंत वैभवाने आपल्या बुद्धिरूपी शक्तीमातेला समर्पण करून, जीवन धन्य करून घ्यावे.

शेवटी श्रीएकनाथांच्या शब्दात या परमार्थिक बोधाचे एक परमगुह्य लिहून प.पू.सद्गुरुस्वरूप गोर्विंद मामांचे चरणी हे अल्प निवेदन समर्पण करतो.

"सज्ञाने स्वतः तरती । अज्ञाने तया शरण येती ॥
अज्ञाना होय अपरोक्ष प्राप्ती । त्यांच्या वचनोक्ती विश्वासे ॥"

-एकनाथी भागवत

हरी ॐ तत्सत्

गो. श्री. कुलकर्णी, कोल्हापूर
सद्गुरुस्वरूप मामांचा सुहृद



।। चरित्र दर्शन ।।

१) शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी- कुलवृत्त :

श्रीगोविंद अनंत केळकर उपाख्य श्रीबापूरावजी तथा श्रीमामामहाराज यांच्या घराण्यात १० पिढ्यांतून भगवान श्रीशिवशंकराची शिवव्रतोपासना सतत चालत आली असून "श्रीज्ञानदेव तेहेत्तीशी" हा श्रीज्ञानेशांचा ग्रंथ त्यांच्या घराण्यात अखंड वाचनात आहे. श्रीमामांचे पूज्य पिताजी श्रीअंताजीपंत यांनीतर पार्थिव शिवलिंगोपासना आयुष्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत आचरली असून, 'सोमवार', 'एकादशीचे' - महाव्रत त्यांच्या घराण्यात आजतागायत अखंड चालू आहे. आचरे/रामेश्वर - सोमेश्वर हे त्यांचे कुलदैवत आहे. नवली - बांदेश्वरी ही कुलस्वामिनी असून, अशा भक्तिसंपन्न, सत्त्वशील सत्कुळात श्रीअंताजीपंत व मातोश्री राधामाई यांच्या पोटी श्रीमामांचा जन्म, फाल्गुन शुद्ध नवमी श.१८१० इ.स. १८८८ मध्ये झाला. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या वचनाप्रमाणे श्रीमामा अगदी बालपणापासूनच भक्तिप्रेमात दंग होऊन जात. भगवंताचे भजन करणे, देवाची पालखी काढणे, उत्सव साजरे करणे, कीर्तन करणे, अशा भक्तिसोहळ्याच्या खेळात ते तासन्तास रमून जात. मौजीबंधनानंतर त्यांच्या बालभक्तीला गायत्रीमंत्र-दीक्षेची जोड मिळाली. त्यांची तेजोपासना सुरू झाली प्रति नित्य प्रातःकाळी उठून स्नान, संध्या, पूजाअर्चा, वैश्वेदेव इ. आन्हिके ते करीत. सूर्योपासना आणि प्रणवोपासनेचा छंद लागून त्यांनी गायत्री-पुरश्चरण पूर्ण केले. सूर्यापासना आणि बलोपासना सुरू असताना ते बाराबाराशे सूर्यनमस्का

घातीत. दंड, बैठका, मल्लखांब, धावणे इ. व्यायाम प्रकाराने त्यांची शरीरसंपदाही बालहनुमंताप्रमाणे दणकट, पीळदार अशी बनली होती. त्यावेळच्या रीतीप्रमाणे त्यांच्या वयाच्या १४/१५ व्या वर्षीच विवाहाची बोलणी सुरू झाली. श्रीमामा हे एकुलते एक पुत्र असल्याने आपली वंशवेल लवकर वाढावी, वंशाचा दिवा लागावा, अशी अंताजीपंतांची पितृवात्सल्यसुलभ अशी तळमळ होती. पण श्रीमामांची आंतरिक अध्यात्मओढ आगळीच होती.

२) श्रीज्ञानेश्वरांचे साक्षात्कार दर्शन :-

श्रीमामा अंताजीपंतांना म्हणाले, "मी आळंदीस जाऊन लग्नासंबंधी श्रीज्ञानेश्वरमाऊलींनाच विचारतो. प्रपंच की परमार्थ यासंबंधी त्यांचा आदेश/कौल अखेरचा राहील." आणि त्याप्रमाणे खरोखरच १५ वर्षाचे श्रीमामा आळंदीस आले. आंतरिक आध्यात्मिक ओढीने आणि बलवत्तर भक्तिप्रेरणेने आळंदीस येऊन माऊलींपुढे त्यांनी धरणे धरले. ज्ञानेश्वरीची पारायणे केली. त्यावेळी 'बहुता सुकृताची जोडी' जुळून आली आणि प्रत्यक्ष बालयोगेश्वर भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराज सगुण साकाररूपाने प्रकट झाले. त्या दिव्य तेजोमय अशा श्रीचरणांवर मामांनी मस्तक टेकले. तेव्हा 'तव प्रपंच हाच परमार्थ । होईल निधरि सार्थ । जगा दाखवी तत्त्वार्थ । वदे माऊली प्रेमभरे ।।' अशी दिव्यवाणी श्रवणी आली. हा दैवाआगळा भाग्याचा क्षण असून, या दर्शन क्षणातूनच श्रीमामांचे संपूर्ण भावी जीवन प्रकाशमान झाले आहे. श्रीएकनाथमहाराजांना ज्ञानेशांनी प्रगट होऊन जसा हरिपाठ दिला, तद्वत् या साक्षात्कार क्षणीच श्रीमामांना देखील 'श्रीरामपाठाचे' स्फुरण झाले. एकनाथ अवतारात ज्ञानेशांचे चित्र काढण्याचे राहिलेले कार्य श्रीमामांनी पूर्ण केले. श्रीमामांनी त्या दिव्य साक्षात्काराचे रेखाचित्र स्वहस्ते काढले आहे. अशा त्या अवर्णनीय आनंदात आळंदीहून पुण्यात आल्यावेळी, त्यांनी महान कर्मयोगी लो. टिळकांचे दर्शन

घेतले. सांगलीस आल्यावर, प्रपंच हाच परमार्थरूप करून श्रीएकनाथांप्रमाणे जगाला भक्तीचा तत्त्वार्थ दाखविण्याचा दिव्य आदेश घरी समजला. त्याप्रमाणे श्रीमामांचा मंगल विवाह संपन्न झाला. श्री. नागेशराव फाटक यांची सुकन्या 'रंगूबाई' वधू नेमस्त होऊन 'सौ. इंदिराबाई' असे नामकरण झाले. ''इंदिरा-गोविंद'' यांची जोडी एकनाथ-गिरिजाबाई यांच्याप्रमाणे शोभली.

३) भक्तिकार्य करणे असे :-

पुढे सांगलीत प्लेगची भयंकर साथ सुरू होऊन, त्या दुर्धर व्याधीने श्रीमामांना गाठले. सर्व वैद्यकीय उपचार थकले. जांघेत गाठ उठून असह्य वेदनेने आणि तापाने अंग फणफणत होते. सर्वांनीच हात टेकले. आता इहलोकीची यात्रा संपणार की काय अशी भयाकुल अत्यवस्थ स्थिती निर्माण झाली. तेव्हा श्रीमामांनी श्रीज्ञानेश्वरमाऊलींचा फोटो उशालगत ठेवण्यास सांगितले. 'कर्ता करविता एक नारायण' असा निर्वाणीचा सर्व भार माऊलींवर सोपवून, ते पूर्ण निपचित पडले आणि त्या तापाच्या ग्लानीत कुठेतरी उंच अंतराळात गेल्याचे त्यांना जाणवले. तेथे एक तेजःपुंज अशी, भगवेवस्त्र परिधान केलेली महायोगेश्वराची अजानबाहू मूर्ती त्यांना दिसली. दंड-कमंडलू-रुद्राक्षमाला-मंडित ज्ञानेशमूर्तीच समोर उभी होती. ''तुझे इथे काय काम आहे? येवढ्यात वरती येण्याची घाई का केली ? अजून भक्तिकार्याची भरभराट दाखवावयाची आहे. चला बाबा ! भूलोकी'' असे माऊलीने आशीर्वचन सांगताच श्रीमामांनी त्यांच्या चरणी मस्तक टेकून नमस्कार केला आणि आश्चर्य म्हणजे इकडे तापाचा उतार होऊन त्यांना दरदरून घाम सुटला. त्यांची हालचाल सुरू झाली. श्रीज्ञानेशकृपेने श्रीमामांचा पुनर्जन्म झाला. पण या आजारात त्यांच्या वाणीवर परिणाम झाला. तेव्हा पुनश्च ज्ञानेश्वरीची पारायणे करण्याचा त्यांनी निश्चय केला.

४) वृत्ती रंगली पारायणी । पुनश्च आली वाणी ।। :-

श्रीमामांनी अत्यंत निष्ठेने ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे केली आणि आश्चर्य म्हणजे श्रीमामांची गेलेली अस्खलित वाणी पुनश्च परत आली. अशा रीतीने कृपाप्रसादाने लाभलेली वाणी, त्यांनी आयुष्यभर नाममयच करून टाकली. नामाशिवाय वाणीचा वापर त्यांनी अन्यत्र केलाच नाही. त्यांची वाणी हरिनामातच रंगून गेली.

५) महासाधू होईल :-

हरिनामात रंगलेले मामा नामावतारी संतश्रेष्ठ श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांच्या दर्शनासाठी एकदा बुधगाव स्टेशनवर गेले होते. तेथील प्रचंड गर्दीतून पुढे जाऊन श्रीमामांनी महाराजांना अत्यंत प्रेमभराने कडकडून मिठी मारली, तेव्हा महाराज त्यांना कुरवाळून म्हणाले; 'हा महासाधू होईल'. असाच कृपाशीर्वाद श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांनी संचारावस्थेत भंडारा साक्षी देऊन दिला होता. 'अखंड कीर्तन व नामस्मरणाने केळकरमामा संप्रदायातील अधिकारी पुरूष ठरतील' असे संचारात ते म्हणाले. पुढे निंबरगी इंचगेरी-चिमड इ. मूळपीठांची यात्रा करताना श्रीभाऊसाहेब उमदीकरमहाराजांनी देखील केळीचा प्रसाद देऊन 'भक्तिचा थाट होईल' असा कृपाशीर्वाद दिला. श्रीमामांचे जीवन अवघ्या संतकृपेने उजळत राहिले.

६) तप म्हणजे काय प्रकाशित होणे :-

अशारितीने अध्यात्म तेजाने तळपणाऱ्या जीवनाला श्रीमामांनी तपःसाधनेची प्रखर आच दिलेली होती. अशा तपाचरणाने त्यांच्या दिव्यत्वाचे रूप वाढतच गेले. तपाचे कायिक-वाचिक इ. प्रकार असले तरी सर्वांचीच साधना त्यांनी साधलेली दिसते. त्यात १) कडुनिंबाचा रस प्राशन करून रहाणे २) गोमुत्रातील भाकरी खाऊन रहाणे ३) मिताहारी किंवा निराहारी साधनेसाठी

केवळ पाच तोळे अन्न सेवन करून रहाणे ४) त्याहीपुढे केवळ पातळ ताक पिऊन दोन दोन महिने अत्यंत प्रसन्न रहाणे इ. अनेक साधना त्यांनी सहजसाध्य केल्या. श्रीज्ञानेशांनी वर्णन केल्याप्रमाणे :

"आता निर्वाळूनि कनके । गांगे भरला पीयूखे ।
तया कलशाचिया सारिखे । शुचित्व असे"

श्रीमामांचे अंतर्बाह्य जीवन पवित्र गंगोदक भरलेल्या कनक कलशाप्रमाणे शुचित्वसंपन्नतेने तपःपूत बनले होते.

७) श्रीसद्गुरूंचा कृपानुग्रह :-

श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेने श्रीमामा "चिमड" (जि.विजापूर) येथे श्रीसद्गुरूकृपानुग्रहार्थ आले. चिमड येथील सिद्धपीठाशीश श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा श्रीमामांना गुरूकृपानुग्रह लाभला. श्रीमामांच्या साधनभक्तीला आता पूर्ण धन्यता प्राप्त झाली. चिमडसंप्रदाय हा नाथसिद्ध संप्रदाय असून, भगवान सद्गुरू श्रीगरूलिंगजंगममहाराज निंबरगीकर यांनी या भक्तिसंप्रदायाची स्थापना केली. श्रीरेवणसिद्धापासून मरूळसिद्ध - काडसिद्ध - श्रीगुरुलिंगजंगममहाराज - श्रीसाधुराज - श्रीरामचंदमहाराज यरगट्टीकर - श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज व श्रीमामा अशी ही गुरूपरंपरा चालत आली आहे. सिद्धवस्तूचे साक्षात स्वरूप दर्शन घडवून, नामसाधनभक्ती सांगणे हे या संप्रदायाचे वैशिष्ट्य होय. या संप्रदायात आपल्या अखंड कीर्तनभक्तीने श्रीमामा 'चिन्मयाची ज्योत' ठरले.

गुरूकृपेनंतर तर श्रीमामांची रात्ररात्र साधना सुरू झाली. त्या जोडीला नित्याची आन्हिके, पूजापाठ, देवदर्शन, संतदर्शन, शिवाय ज्ञानेश्वरी, गुरूचरित्र, दासबोध, रामचरितमानस, तुकोबांची गाथा इ. धार्मिक पौराणिक ग्रंथांची

पारायणे चालू असत.

८) तेरा कोटी रामनाम पुरश्चरण :-

श्रीमामांनी रामनामाचे पुरश्चरण अनुष्ठान सुरू केले. रोज रात्री ९ तास याप्रमाणे ३|| कोटींचे पुरश्चरण करण्यास त्यांना ७ वर्षे लागली. अशी दोन पुरश्चरणे १४ वर्षात पूर्ण केली. आयुष्यात १३ कोटीचे संपूर्ण पुरश्चरण साधले तेव्हा त्यांना रामपंचायतनाचे साक्षात दर्शन घडले. आश्चर्य म्हणजे मिरजेच्या श्रीवेणास्वामी मठातील समर्थ रामदासस्वामींनी स्वहस्ते कोरलेली श्रीहनुमंतांची मूर्ती, प्रसाद म्हणून श्रीमामांना मिळाली. श्रीमामांच्या भेटीसाठी शेकडो संत त्यांच्या घरी येत. ईश्वरनिष्ठांची मांदियाळी गोळा होई. सांगलीतील विख्यात संत श्रीताम्हनकरमहाराजांनी तर श्रीमामा हे एकनाथांचे अवतार आहेत असे निःसंशयपणे सांगितले. आपल्या पदात ते म्हणतात, "एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।" याच अवधीत श्रीदत्तमहाक्षेत्र श्रीनृसिंहवाडी येथील विदेही सिद्ध श्रीवजीरबाबा यांनी, कृपाशीर्वादपूर्वक खारीक प्रसाद देऊन "या महान भगवद्भक्ताचे घरी अवतारी पुत्र होईल." असा आशीर्वाद दिला. सिद्धवाणी खरी ठरली. श्रीमामांना पुत्ररत्न झाले. श्रीज्ञानेश्वरांचे आशीर्वचन पूर्णत्वास गेले.

९) कीर्तनानुग्रहाचा कृपाशीर्वाद :-

अशारितीने श्रीमामांचे जीवन भक्तितेजाने सफल वाटचाल करीत होते. रामजन्मोत्सव, कृष्णाष्टमी, हनुमानजयंती इ. जयंती सोहळे, संतांच्या पुण्यतिथीचे महोत्सव चालू होते. सांगलीत श्रीतात्यासाहेबांची कीर्तनगंगा अखंडपणे २५ वर्षे भक्तीचा वर्षाव करीत होती आणि आकस्मिकपणे श्रीकोटणीसमहाराजांनी वैकुंठगमन केले. त्यांच्या महानिर्वाणानंतर आपणही

नित्यकीर्तन करावे असे श्रीमामांना वाटत होते आणि आश्चर्य म्हणजे त्याच रात्री, महानिर्वाणानंतरही भगवान श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज श्रीमामांच्या घरी प्रगट झाले. त्यांनी अखंड कीर्तनभक्ती निर्वेधपणे चालेल, असा कृपाशीर्वाद दिला. (रविवार माघ व.तृ. शके १८४५ इ.स. १९२४).

१०) अखंडनामसंकीर्तनयोगी :-

अशारितीने अखंड कीर्तनाची आज्ञा झाल्या दिवसापासून सतत ३८ वर्षे एकही दिवस खंड न पडू देता, आधि-व्याधि उपाधीवर मात करून श्रीमामांनी आपले कीर्तनानुष्ठान पूर्णत्वास नेले. 'ज्ञानाय दानाय च रक्षणाय' असे त्यांचे कीर्तन होते. सांगलीच्या कीर्तन पंढरीत ते नारद ठरले. नित्याची कीर्तनाची वेळ होताच, प्रसंगी रेल्वेच्या डब्यात, मिरज मिशन हॉस्पिटलच्या जिन्याखाली देखील त्यांनी कीर्तन केले. एवढेच काय पण मोठ्या अवघड आजारात देखील महानिर्वाणाच्या दिवशीही, त्यांनी कीर्तनव्रत आचरून सद्गुरूंची आज्ञा तंतोतंत पूर्णत्वास नेली. श्रीमामा हे कीर्तनभक्तीचा नंदादीप ठरले. अलोट गुरुभक्ती हे मामांच्या जीवनचरित्राचे सारसर्वस्व आहे. गुरूघरच्या लहानथोरांना सर्वांनाच ते सदैव वंदन करीत. इतकेच काय पण गुरूघरच्या मोलकरणीच्या चरणीदेखील ते नतमस्तक होऊन नमस्कार करीत.

११) वाङ्मयसाधना :-

भक्तिसाधनेबरोबरच श्रीमामांची वाङ्मय साधनादेखील सुरू होती. महाराष्ट्र शारदेची शब्दकुसुमांनी ते भावपूजा बांधीत होते. १) श्रीहनुमद् गुरुचरित्र बोधसार २) श्रीरामपाठ ३) अभंगांची गाथा ही त्यांची ग्रंथत्रयी म्हणजे मामांचे अध्यात्मिक भावचरित्रच होय. १) त्रयोदशाध्यायी श्रीगुरुचरित्रात ७०० ओव्या असून श्रीमद् भगवद्गीतेप्रमाणेच असणाऱ्या या ग्रंथात १३ अध्याय आहेत. हा

ग्रंथ त्यांनी अवघ्या १३ दिवसात पूर्ण केला आहे. २) त्यांचा श्रीरामपाठ हा ३२ अभंगांचा छोटेखानी ग्रंथ म्हणजे अध्यात्मसाधनेचा कौस्तुभमणी आहे. 'ज्ञानेश्वरकृपाप्रसादे रचिले । तयांचिया बोले समाधान ।।' असे स्पष्टपणे त्यांनी त्यात सांगितले आहे. गुरूकृपेचे अध्यात्मविज्ञान त्यांनी यात मांडले आहे. ३) त्यांच्या अभंगांची गाथा ही स्वानंदसुखाची सनदच आहे. ती "अमृतवाणी" या नावाने आता प्रकाशित होत असून त्यात "अंतरीचे धावे । स्वभावे बाहेरी ।।" याप्रमाणे अंतरीच्या नामरूपाचा भावकल्लोळ या अभंगवाणीतून उचंबळून आलेला दिसतो. श्रीमामांचे अवघे जीवनच नाममय झाल्याने, त्यांना 'नामविकासी कमळ' असेच म्हटले आहे. या नामकमळाचा सुगंध या अमृतवाणीत दरवळत आहे.

१२) इच्छामरणाचा निर्वाणसोहळा :-

'शूर ओळखावा रणी । साधु ओळखावा मरणी ।।' असे वचन आहे. महापुरुषांचे निर्वाणही अनुपम असते. श्रीमामांचा महानिर्वाण सोहळा असाच आगळा आहे. सोमवार माघ शु. नवमी (सरती भीष्माष्टमी) श. १८८३ दि. १२.०२.१९६२, अनेक दुर्धर व्याधींनी शरीर जर्जर झालेले. ते निपचित पडले होते. सकाळी ६ पासून नाड्या सुटल्या होत्या. डॉक्टरांनी जास्तीत जास्त दुपारी २ पर्यंत वाट पाहण्यास सांगितले होते. बाकी सर्व सामसूम असल्याने कसलीच हालचाल नव्हती. पण आश्चर्य म्हणजे नित्याच्या कीर्तनाची वेळ होऊन पाचचे टोले पडू लागताच, इच्छामरणी महायोग्याने श्रीमामांनी ताड्कन मान उचलून 'श्रीराम जयराम जयजयराम', अशा मंत्रोच्चाराने अखेरच्या दिवसाचे नित्य कीर्तन पूर्ण केले. हा मंत्रोच्चार हाच त्यांचा संदेश 'श्रीराम जयराम जय जय राम'.

१३) श्रीगोविंदायनमः :-

हे सारे अघटित, अतर्क्य होते. डॉक्टरी शास्त्रात न बसणारे हे सद्गुरूकृपेचे सामर्थ्य आहे. आमच्या शास्त्रात हे बसत नाही, हे प्रत्यक्ष डॉक्टरांनीही कबूल केले. त्याहीपुढे मग रात्री ११.५० पर्यंत हरिनामाचा घोष चालूच होता. हा क्षण म्हणजे भगवान श्रीसद्गुरू तात्यासाहेबमहाराज प्रकट झालेली वेळ होय. या नेमक्याच वेळी प्रत्यक्ष काळालाही थोपवून धरलेल्या श्रीमामांनी आपली जीवनज्योत गुरूरूपात विलीन केली. श्रीमामा स्वानंदसुख साम्राज्यपदी विराजमान झाले. शेवटचा दिस गोड झाला. श्रीगोविंदाय नमः ।

आणि त्याच्या दुसऱ्या दिवसापासून श्रीमामांचे कीर्तन पुनश्च अखंडपणे सुरूच राहिले. श्रीमामांचे परमाधिकार संपन्न सुपुत्र श्रीरामरायमहाराज तथा श्रीदासराममहाराज हे कीर्तनास उभे राहिले. या पुण्यतिथीस (गुरुवार दि.१२.०२.८१) श्रीदादांच्या कीर्तनास १९ वर्षे पूर्ण होत आहेत. एवढेच नव्हे तर श्री.दादांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री चंद्रशेखरअण्णा हे देखील कीर्तन करतात. अशारितीने अखंड हरिनामसंकीर्तन सुरूच आहे. अशा या अखंड दिव्यचैतन्य परंपरेस वंदन करून श्रीमामांच्या चरणी ही चरित्रगाथा अर्पण करीत आहे.

॥ श्रीगोविंदायनमः ॥

प्रा. दा. वि. कुलकर्णी

(सांगली)

प्रथम आवृत्ती



अमृतवाणी परिचय

श्रीगोविंद अनंत ऊर्फ श्रीबापूरावजी ऊर्फ श्रीमामामहाराज केळकर हे संत, सांगली गावात वास्तव्य करून होते. श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार आणि श्रीरामपाठ हे त्यांचे ग्रंथ पूर्वीच प्रकाशित झालेले आहेत. आता त्यांच्या पदअभंगांचा संग्रह प्रस्तुत ग्रंथात 'अमृतवाणी' या शीर्षकाने प्रसिद्ध होत आहे.

प्रेरणा आणि स्वरूप

सद्गुरू श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या साक्षात्कारात झालेल्या आज्ञेनुसार श्रीमामांनी नित्य अडतीस वर्षे आपल्या देहपातापर्यंत अखंड कीर्तन केले. वर्षानुवर्षे हा कीर्तनाचा नेम चालवीत असताना, कीर्तनातील विवरणासाठी योग्य ते पद-अभंग रचण्याची अंतःस्फूर्ती त्यांना झाली. त्यांना स्फुरलेली एकूण १३०० अभंग-पदे येथे संग्रहित आहेत. हे काव्य कीर्तनाशी संबंधित असल्याने त्याला 'कीर्तनवाणी' असेही नाव देता येईल.

इथल्या बहुतेक काव्यरचनेत दास अशी मुद्रिका आहे. अधून-मधून गोविंद ही मुद्रिका दिसते. गोविंद हे मामांचे नांव. फक्त एका हिंदी भाषेतील पदामध्ये (क्र.११५६) राधासुत अशी मुद्रिका आहे. राधा हे मामांच्या मातोश्रींचे नाव होय.

या अभंगात नमन, प्रार्थना, भजन, गौळण, कूट इत्यादी प्रकार आहेत. काही अभंगांची मांडणी प्रश्नोत्तराच्या स्वरूपात किंवा गुरूशिष्य संवादरूपात आहे. सर्वच रचना साधी, सोपी, सरळ आणि प्रासादिक आहे. पण प्रसंगानुरूप भाषा अलंकार विभूषितही आहे. प्रत्येक पद्यात यमक आहेच. खेरीज लक्षणीय

अशी यमकेसुद्धा १०७, ४४६, ४४७, ५६६ या अभंगांत आढळून येतात. अभंग क्रमांक ४८, १८९, इत्यादींमधील अनुप्रास लक्षांत घेण्यासारखा आहे. क्र. १०३० मध्ये श्लेषाचा सुंदर वापर आहे. अध्यात्मिक विषयाचे स्पष्टीकरण होण्यास आवश्यक अशी रूपके (उदा. ६०, ६१, इत्यादी) आणि दृष्टांत (उदा. २६९, ५५८ इत्यादी) हे ही येथे दिसून येतात.

श्रीमामांच्या पद्यरचनेत कधी कधी पुनरुक्ती जाणवते. त्या त्या विषयावर जोर देणे व त्याचा संस्कार किंवा ठसा ऐकणाऱ्याच्या, वाचणाऱ्याच्या मनावर उमटवणे हा हेतु उघड आहे.

या संग्रहातील काही पंक्तींनी पूर्वीच्या संतांच्या रचनेची आठवण येते. उदा. केशवाचे नाम गाय (१०८.३); आयिता आलासे घराते पुसोनि (२९१.३); ब्रह्मादिका हाता नये । तो हा कीर्तनाचे सोये । (९३४.३). कधी मराठीतील काही म्हणींची स्मृति होते, उदा. भोळा भाव सिद्धी जाय (३८०.१).

मांडणी

ज्या कालिक क्रमाने ही पद्यरचना झाली तिची नोंद नसल्याने, येथे अभंगातील मुख्य विषय लक्षात घेऊन नमन, भजन, सद्गुरु, इत्यादी शीर्षकाखाली अभंगांची वर्गवारी दिलेली आहे. तथापि, अंतःस्फूर्त काव्यात असा विषयांचा विभाग अगदी काटेकोरपणे असू शकत नाही. त्यामुळे या विभागणीत न बसलेले असे काही विषय आहेत. त्यांचा परिचय प्रथम करून देऊन, मग वर्गवारीतील पद्यांचा परिचय करून दिलेला आहे.

संकीर्ण विषयांचा परिचय

१) प्रार्थना - काही अभंग-पदातून ईश्वराची प्रार्थना आहे. उदा. ईश्वर चिंतनात मन रमू दे (१०७७) २) गौळण - (१०९५) इथे एक गौळण सांगते की, हरिविण मनी नच दुजे, ३) कूट - मायबापा जीवे मारणे (३०५), उलटे देऊळ (५५३) इत्यादी कूट अभंगात सापडतात. ४) स्वचरित्रपर - तीन अभंगात

मामांच्या जीवनातील काही घटनांचा उल्लेख आहे. त्यातील 'हनुमंत षष्ठी' (अ.क्र.१५६) या पदाशी निगडीत असणारी घटना येथे मुद्दाम नमूद करण्यासारखी आहे :- आयुष्याच्या शेवटी मामांची प्रकृती ढासळली होती. पाठीतील दोन तीन मणके झिजले होते. म्हणून मामांनी बसू नये व उभे राहू नये असा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. तरीसुद्धा मामा रोज उठून बसून कीर्तन करीत. दरवर्षी पौष वद्य १-६ मध्ये श्री गंगाधरराव दीक्षितांच्या हनुमान समाधी मंदिरात संध्याकाळी मामांचे कीर्तन असे. पण ते करणे निर्याणाच्या वर्षी मामांना शक्य नव्हते. मामा सकाळीच आपल्या घरी कीर्तन करीत. त्यांचे चिरंजीव श्रीरामराय हे समाधी मंदिरात कीर्तन करीत. मनात खूप असूनही मामांचा इलाज नव्हता. पण सद्गुरूंची सत्ता अगाध. त्यांनी श्री.गंगाधरराव दीक्षित व अन्य काही मंडळी यांना अंतःप्रेरणा केली. त्यांनी मामांना खुर्चीत बसवून अलगदपणे समाधी मंदिरात नेले. दर्शन झाल्यावर, तसेच खुर्चीत बसून मामांनी कीर्तन सुरु केले. त्या कीर्तनात 'हनुमंत षष्ठी' हा निरूपणाचा अभंग होता. हे कीर्तन फारच रंगले होते. अशी त्यांच्या चरित्रात नोंद आहे. ५) स्पष्टीकरणे - अभंगांच्या ओघात आलेली काही स्पष्टीकरणे लक्षणीय आहेत. उदा. उन्मन - विषयातुनि निघे मन । तेचि जाणावे उन्मन (८३.१), भजन - मनोवृत्ती समाधान । हेचि देवाचे भजन ।। (२३५.३;६) ६) संकीर्ण विषय - काही संकीर्ण विषयांवरील विचार बोधप्रद आहेत. उदा. गुरुशिष्य दोघेही अधिकारी असतील तर दोघांना मोठेपणा मिळतो (८७४.१) संत वचनांचा लाक्षणिक अर्थ (८७३.१). हाच महत्वाचा असतो. ७) तत्त्वज्ञान - मामांना अभिप्रेत असणारे तत्त्वज्ञान असे आहे :- जीव, जग, माया या सर्वांना मूलाधार हरि आहे. (९२१.१-३; २६५.३; ७४२.१) दृश्य चराचर हे माया आहे. (६६८.३) देव हा ब्रह्मचैतन्यरूप आहे (८१३.२;८८१.४) ब्रह्म वा विष्णु सर्वव्यापक आहे, अस्तित्वरूप आहे, सर्व पदार्थात त्याची सत्ता म्हणजे अस्तित्व आहे (१२९.२;९२३.४;७४२.२;९३१.२;९३८.२). ब्रह्म एकच असले तरी मायाजन्य भ्रमामुळे द्वैत अथवा नानात्त्व दिसू लागते (१८२.२) माया ब्रह्माला झाकून जगाचा

आभास दाखविते (१७९.१) माया जीवाला भुलविते, त्याला प्रपंचाची झापडी घालते व देवाला विसरवून टाकते (२६३.२-३) जीव हा ब्रह्मच आहे (२७७.१) माया मिथ्या आहे हे कळल्यावर, जीवाला स्वतःच्या स्वरूपाचे सत्य ज्ञान होते (६८७.२;३००.१;२६६.२) सत्यज्ञानाने जीवाला मोक्ष मिळतो (२७८.४).

वर्गीय विषयांचा परिचय

आता वर्गीकरणानुसार येणाऱ्या विषयांचा परिचय पुढे दिला आहे.

(१) नमन (१-३)- मामांच्या कीर्तनारंभीचे नमन म्हणजे 'नमो रामेश्वरा' हा अभंग. त्यात मामांची कुलदेवता व गुरुपरंपरा यांना वंदन आहे. 'रूप देखिल्या' या पदात मामांच्या राम या उपास्य देवतेचे ध्यान वर्णिलेले आहे.

(२) भजन (४-५) - मामांच्या संसार परमार्थाचे मूळ असणाऱ्या ज्ञानेश्वरांचे तसेच रामाचे भजन येथे आहे.

(३) सद्गुरु (६-१९) - परमार्थ साधण्यास साधकाला उपदेश देणारे ते सद्गुरु. सद्गुरुविना देवाची भेट नाही (६.१) सद्गुरु लाभणे ही दुर्लभ गोष्ट आहे. (२११.३) गुरूचे वचन प्रमाण मानण्यात हित आहे (३२.२) सद्गुरूची मोहिनी पडली की क्षणोक्षणी देव दिसतो (१०.२) गुरुसेवेने शिवपद प्राप्त होते (१५४.१) गुरूकृपेचे अंजन डोळ्यात पडताच दृष्टीला भगवान दिसू लागतो (१२४.२) गुरू कृपेने निजसुख मिळते, स्वरूपाचा साक्षात्कार होतो (७.२) गुरुकृपा होण्यास त्यांनी जे नित्यनाम सांगितले ते घेतले पाहिजे (६.३) अशाप्रकारे सद्गुरू फार महत्वाचे आहेत (१७) सद्गुरू महिमा हा वाचेला वर्णन करता येत नाही (१६.१)

(४) सण पर्वकाळ - (२०-१७६)- हिंदुधर्माने सांगितलेल्या सण पर्वकाळांचे अध्यात्मिक दृष्ट्या स्वरूप, कार्य, प्रयोजन, इत्यादींचे वर्णन मामांनी केले आहे. उदा. नाम अमृत सेवन । हेचि लिंबाचे प्राशन (२०.३); नवविध उपासना । हेचि नवरात्र जाणा । (७९.१); दीप ज्योति सहस्रदळी । पहाणे संतांची दिवाळी । (११६.१); पंच प्राणवृत्ती नामात रंगता । पंचमी तत्त्वता रंगाची ती ।

(१७३.३).

(५) संसार - (१७७-२०६) - संसार हा असुरी मायेचा विस्तार आहे (१७८.१) म्हणून तो फळकट आहे (१८६.१). जीव जन्ममरणाच्या चक्रव्यूहात सापडलेला आहे (१९१.१). समुद्रात लाटांमुळे लाकडे एकत्र येतात व दूर जातात, त्याप्रमाणे संसारातले संबंध असतात (१९२.३). संसारातला व्यवहार हा महत्त्वाचा नाही (२२७.५) संसारात अणुमात्रसुद्धा सुख नाही (१८७.१). 'जो नर संसारा विकला, तो नर परमार्था मुकला' (११२६.१). संसारातील तथाकथित सुख हा केवळ सुखाचा आभास आहे (९०२.१). या संसारातून सुटावयाचे असल्यास, 'नाम थोर आशा आहे' (३८४.१). नामाची सवय लागणे हाच संसार तरण्याचा उपाय आहे (७१४.१). मनात रामजप केल्याने संसार सुटतो (१९५.५). नामाच्या योगाने ईश्वर-साक्षात्कार झाला तरच दुःखरूप संसार जीवाला सुखकर होतो (१९८.५). संक्षेपाने, 'आत्मस्वरूप पडता दृष्टी । सुटती संसाराच्या गोष्टी' (९१३.१).

(६) 'नरदेह' - (२०७-२२२) - नरदेहाचा लाभ हा दुर्लभ आहे (२०७.३). कारण नरदेह मिळण्यास पाप-पुण्य समान व्हावे लागते (२१२.२). देह नाशवंत आहे (२०७.१) आणि आयष्य क्षणभंगुर आहे (१११२.२). म्हणून जोपर्यंत देह सुखरूप आहे, आपल्या स्वाधीन आहे, तोपर्यंत देवाचे स्मरण, नामाचा जप करून घेतला पाहिजे (४३८.३, २१४.१). रामनामाच्या योगानेच या नरदेहाला मोल येणार आहे (३४५.३). देवाचे नाम उच्चारणे हेच नरदेहातील मुख्य आणि खरे काम आहे (७२६.१; ५७५.३). मोक्षाला आवश्यक असणारे ज्ञानाचे रत्नभांडार नरदेहात आहे (२१६.२). ते नामस्मरणाने हस्तगत करून घ्यावयाचे आहे. मग देहात देवाची प्रचीती येते (२१९.४). नरदेहात ईश्वरी साक्षात्काराची मौज अनुभवून मुक्त व्हायचे आहे (२२२.१). अशाप्रकारे 'नरदेह महापर्व' (२०८.२) हे साधावयास हवे.

(७) मन - (२२३-२६१) संकल्प-विकल्प हेच मनाचे स्वरूप आहे. पण

त्यामुळे मन चंचल होते (२४४.३). परमार्थ साधावयाचा असल्यास, मनाला आपल्या स्वाधीन करून घेणे आवश्यक आहे. (२५७.२; ८०२.१). या मनावर जर आपण स्वार झालो म्हणजे जर मनावर नियंत्रण मिळविले, तर परमार्थाला आवश्यक असा नामोच्चार घडतो (२२७.४). नामाच्या युक्तीने, गुरूनामाने मन आपल्या स्वाधीन होते (२४०.५; २४४.३). नामाने, गुरूंनी सांगितलेल्या साधनाने मन चांगले होते (२४७.१,२५४.२; ४०९.४). गंगाजळाप्रमाणे स्वच्छ व शुद्ध झालेल्या मनामध्ये भगवान् प्रगटतो (२४९.४; २५२.१; २२९.२). मन शुद्ध होणे म्हणजेच मनाचे उन्मन होणे होय. मनाचे उन्मन झाले की भगवानाची भेट होते, स्वरूपाचा साक्षात्कार होतो (२६१.२, २५३.३). मन म्हणजे ब्रह्माचा महाल खोलणारी गुरुकिल्ली आहे (२३१.१).

(८) उपदेश - (२६२-५८३)- साधकाला परमार्थ साधण्यास आवश्यक तो उपदेश येथे आहे. संसाराची करकर थांबणारी नाही; या करकरीतच नाम जपावयाचे आहे (५७४.१). गुरूवचनावर विश्वास ठेवल्याने परमार्थाचा ठेवा सापडतो (३९८.१). भाव सोडावयाचा नाही (३७९.२). नामाने विकल्प उरत नाही (३१४.३). एक रामनाम सार, मनी धरी हा विचार (२९३.१).

संसारात आपल्याला जी स्थिती प्राप्त झाली आहे, ती बरी आहे असे मानून निरंतर नाम गावे. (३६८.१). देवच संकटांचा परिहार करतो (३६९.१). रामनामाने प्रारबधाचे बंधन उरत नाही (२९८.५).

अहंकार देवाला आवडत नाही; म्हणून अहं टाकून रामनाम घ्यावे (३०४.७; ३०६.३). वाईट टाकावे, चांगले घ्यावे (२८३.२). संतसंग धरला तर बरे होते (२८४.१). बुरा संग सोड; त्याने पापकर्म घडते (२८२.१); नामाचे विस्मरण हेच पाप आहे; नाम हे पुण्य आहे (३२९.१; ३३०.३; ३३१.४). रामनामरूपी दंडाने वासनेला आवरून धर (२८६.२); मन एकाग्र कर (२८६.३).

नाम हेच जीवाचे कर्तव्य आहे (५५५.३). देवाला शरण जावे आणि त्याच्याकडे फक्त नामाचे मागणे मागावे (३६४.१). इतर सर्व विसरून नामस्मरण

करावे हेच सर्व उपदेशाचे सार आहे (३५४.२).

(९) विवेक - (५८४-५९७) - परमार्थात विवेक, विचार हवा. अविवेक हा आंधळेपणा आहे (५८८.२). विवेकाने कल्याण होते (५९१.१). अविचाराने अहित होते तर विचाराने हित होते (५९७.१). नित्य काय व अनित्य काय यांचा विवेक करावा (५९५.१). विवेकाने तत्त्वज्ञान प्राप्त होते (५८४.२). असारात सार शोधणे म्हणजे विचार (५९७.३). रामनाम हेच विचार आहे; अन्य सर्व अविचार आहे (४७८.१). विवेकाने पूर्ण शांती मिळते (५८७.४). विवेकरूपी नदीच्या पलीकडे देवाचे दर्शन आहे (५९१.३).

(१०) वैराग्य - (५९८-६०५)- वैराग्याच्या भाग्याने सर्वेश्वर भेटतो (६०२.१). वैराग्य म्हणजे मनाने केलेला विषयाचा त्याग (६०१.२). मनाने विषयांचा त्याग झाला की देवाची कृपा दूर नाही (६००.१).

(११) भक्ती - (६०६-६५०) - संसारातील पदार्थांवर प्रेम करून यातायात चुकत नाही (६०६.१). देवावरील निःसीम निःस्वार्थ प्रीती म्हणजे भक्ती. देवाला सर्व समर्पण करणे ही प्रेमभक्ती आहे (६०९.६). भक्तीने देव कळून येतो (६४७.१). भक्ती नऊ प्रकारची आहे (तिचे विवरण ६०९-६४३ मध्ये पहावे). भक्ती ही वाटते तितकी सोपी नाही. भक्ती असिधाराव्रत आहे (६०९.५). भक्तीचा सूक्ष्म मार्ग अवघड आहे (६०९.२).

(१२) नाम - (६५१-७७१) - सर्व काही नामात आहे (५७५.६) नाम हेच सर्वांचे हित आणि कल्याण आहे (४९२.३). नाम सकाळांचे कोड पुरविते (१६०.४). नाम माणसाला पूर्णकाम करते (६२२.३). रामनाम ही कामधेनु आहे (११०.१) नामामुळे प्रपंचातील दुःख संपते; खरे सुख रामनामातच आहे (२८८.३ ; ५१५.१). नामाने सर्व काही कळून येते (४७१.३).

सर्व दोषांना नाम हेच प्रायश्चित्त आहे (६८३.१). रामनाम जप केल्याने संसार सुटतो (१९५.५). संसारसागरात रामनाम हे जड, मूढ, दुराचारी तसेच इतर

लोक या सर्वांना उद्धारक, तारक आहे (११.२,५; ३५.५; ३५.१; ४९२.२). नामाने विकार, अहंकार व माया यांचा लय होतो (१९७.३; १३८.३; ५९८.३; १७९.४).

मनामध्ये काम (इच्छा) असून नाम उच्चारीत बसल्यास काहीच फायदा नाही. म्हणून काम जाळून टाकून नाम जपावयाचे आहे. (६७१.३; १७१.१).

नाम अखंड घेतल्याने समाधिसुख प्राप्त होते (३२६.२). नामाने नारायण मिळतो (६६०.१; ६६७.४; ६५६.२). गुरुनामाने परब्रह्म हस्तगत होते (६६१.६). नाम घेतल्याने मुक्ती मिळते हे ब्रह्मलिखित आहे (७२०.१).

ज्या नामाने वरील गोष्टी साध्य होतात ते नाम जसे समजले जाते तसे नाही. ते नाम समजूनच घ्यावयास हवे आहे. हे नाम देहातील प्राणात, श्वासात आहे. (७२९.१; ७६२.४; ६२७.१). नाम हे सहज असून ते सदा स्फुरण पावत असते (७५८.२). नाम चार वाचांच्या पलीकडे आहे. (८१८.१). नामामध्ये रूप आहे (८२०.३). नाम हेच रूप आहे (४०.३). नाम हेच ब्रह्म आहे (३९१.२).

नामस्मरण कसे करावे आणि त्याने काय साधते हे मामांनी फार सुंदर रितीने ७०२ व ७२१ या अभंगांत सांगितले आहे.

(१३) साधन - (७७२-८०१) परमार्थ प्राप्त होण्यास नाम हे एकच साधन आहे (७७४.४). रामनाम हेच मोक्षाचे साधन आहे (७७८.४). देहामध्ये असणाऱ्या नामात साधनाचा प्रयत्न व्हावयास हवा (७८०.२). सहज साधन हे गुरुकृपेने कळून येते; श्वासोच्छ्वासामध्ये नामात रहाणे हे ते साधन आहे (५०१.१-२). साधनाचे उत्तम विवरण ७८३ व्या अभंगात आहे.

(१४) साधकांसाठी - (८०२-९२०) साधकांसाठी पुढील मार्गदर्शन आहे. संसारात सर्व काही देवाच्या इच्छेने घडते; म्हणून कोणत्याही गोष्टीची चिंता न करता देवाची चिंता (चिंतन) केल्याने देव भेटतो (८८९.२; २१८.४; ९००.२). साधकाने सदाचाराने चालावे (८०५.१). शुद्ध अन्न ग्रहण केल्याने शुद्ध विचार आणि आचार होतात (८८४.१). सत् नामाचा उच्चार हा श्रेष्ठाचार आहे

(८०५.४). नामात दंग झाले पाहिजे (८९१.३). निर्धाराने देवाचे नाव घ्यावे (९००.३). नामात राहून प्रपंच करावा (८९५.१). परमार्थ आचरताना आळस दूर सारावयास हवा (१०८५.१). मनातला अभिमान टाकला पाहिजे (११०२.१). साधनात मन घटवायचे आहे (१११०.१). सदा रामनामाचा व्यासंग हवा (९२०.३). नाम आनंदाचे घ्यावे (८८९.३). श्वासोच्छ्वासामध्ये नाम घ्यावे (८३६.३). सद्गुरुंनी जे करावयास सांगितले आहे (कृ) त्याचे पालन (पा) केले की गुरूकृपा होते. (८५९.३).

(१५) देव - (९२१-९४९) - देव सर्वांना आधार आहे (९२१). देव हा निराकार असून तो एकच आहे (९२३.३). चराचरात देव आहे, पण त्याचा शोध मात्र अंतरात, आपल्या देहात, करावयाचा आहे (९३१.२). देव भक्तांचे रक्षण करतो (९४१.१). नामाने देव हातात येतो (६६७.४).

(१६) अनुभव - (९५०-९८१) परमार्थात साक्षात्कार होताना साधकाला अनेक प्रकारचे अनुभव येत असतात. चार वाचांच्या पलीकडे गेल्यावर अंतरात ज्योत चमकते (९५८.१). उन्मनीच्या ओवरीत तेज दिसते (९६१.२). हे तेज अवर्णनीय आहे (९६१.३). हंसावरील प्रभु रामाचा साक्षात्कार होतो (९६९.४). औटपीठ नामक देहातील स्थानात विठ्ठलाचे दर्शन होते (९६७.३). अभंग क्रमांक ११५९ ते ११६९ मध्ये अशा अनुभवांचे वर्णन आहे.

(१७) संतपर - (९८२-१०३२) जगाला परमार्थाची सोय अथवा मार्ग दाखविण्यास संत या जगांत अवतार घेतात (९९९.१). संत हे अरूप असणाऱ्या परमात्म्याला रूपात आणतात (१०३२.१). संतांच्या घरी हरी वास करतो (१०१६.१). संतांच्या हृदयात भगवंत असतो (१०२८.३).

साधुसंतांना मरणाचे भय वाटत नाही (१००३.१). ते साधनाच्या धनाने श्रीमंत असतात (१००५.४). संत हे सतत क्षमावंत असतात (१००७.१). संतसंगतीने परमात्मा प्राप्त होतो (१०१९.२). संतांचा अधिकार थोर असतो (९९८.२). साधु संत खूष झाले तर माणसाच्या ललाटात (नशीबात) जे नाही ते

सुद्धा देतात (११७४.१).

(१८) प्रासंगिक - (१०३३-१०४०) - या अभंगांमध्ये कैवल्याचे धाम, मातृप्रेम, सत्यनारायण इत्यादी विषयांवरील विचार व्यक्त झाले आहेत.

(१९) पौराणिक - (१०४१-१०६९)- भगीरथ (१०४१), वाल्मीकी (१०४२), गजेंद्र (१०५८), ध्रुव (१०६६) इत्यादि काही प्राचीन पौराणिक कथांचा निर्देश करून त्यांचे तात्पर्य अथवा त्यातून अपेक्षित असणारा बोध येथे मांडलेला आहे. उदा. भगीरथाप्रमाणे 'प्रयत्न करावा' हे तात्पर्य सुचविले आहे.

(२०) पदे - (१०७०-११९२) या समूहात पुष्कळदा ध्रुवपद आढळत असल्याने 'पदे' हे शीर्षक वापरलेले आहे. यामध्ये आलेले विषय हे अन्य विभागांतील विषयांप्रमाणेच आहेत. उदा. गुरुला शरण जा (१०७० ध्रु). इत्यादी उपदेश आहे. जीव ब्रह्म आहे (११६५.५) हे तत्त्वज्ञान आहे. गुरुपद ही संसारातून तारून नेणारी नौका आहे. (११७२.५) असे गुरूचे महत्त्व वर्णिले आहे. संतांचा दीपावलीचा अनुभव (१०९३) मध्ये असून, अभंग क्र.११५९ हा अनुभव वर्णन करणारा आहे.

(२१) अधिक - (११९३-१२४७) - येथे आलेल्या बहुतेक अभंगांमध्ये 'अधिक' अथवा 'सर्वाधिक' या शब्दांचा वापर आहे. कोणती एक गोष्ट अधिक - (चांगली, श्रेष्ठ इत्यादी) या दोन गोष्टीत अधिक चांगली कोणती अथवा अनेकांत सर्वश्रेष्ठ गोष्ट कोणती हे या अभंगातून सांगितलेले आहे. उदा. मौन हे सर्वाधिक आहे. (१२२२.२) देवापेक्षा नाम अधिक आहे (१२०१.१); ज्ञानामध्ये अनुभवज्ञान अधिक आहे. (१२१७.१).

(२२) नित्यपाठ - (१२४८-१२६७)- या अभंगात चैत्र व श्रावण हे दोन महिने सोडून अन्य महिन्यांमध्ये कीर्तनासाठी मामा जे अभंग वापरीत त्यांचा संग्रह आहे. चैत्र महिन्यात कीर्तनासाठी रामपाठाचे अभंग वापरले जात. श्रावण महिन्यात मामा 'साधनाचा मास' (५३.३) म्हणतात.

(२३) श्रीरामपाठ - (१२६८-१२९९)- मामांच्या सकल शिकवणुकीचा गाभा श्रीरामपाठात आला असल्याने तो परमार्थदृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. 'श्रीरामपाठ म्हणजेच मामा' असे श्रीदासराममहाराज केळकरांनी म्हटले आहे. या रामपाठाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या उपन्यासात त्यातील विषयांची ओळख सविस्तर करून दिलेली आहे. तथापि रामपाठातील पुढील गोष्टींचा निर्देश मात्र आवश्यक वाटतो. मनोमाळेच्या सहाय्याने रामनामस्मरण केले की द्वैताचा लय होऊन सर्वत्र अद्वैताची- एकमेव गोविंदाची- प्रचीती येते. मनाच्या संकल्पात राम आणि विकल्पातही राम असे झाले की, मनोमाळेचा उपयोग झाला (१२८६). ज्या नामाने साक्षात्कार होतो ते नाम तत्त्वरूप आहे. इडा, पिंगला आणि सुषुम्ना यांचे ऐक्य झाले की तत्त्वरूप नाम हातात येते (१२७८). रामनाम हे गतिरूप आहे, ही गती प्रत्येक देहात आहे (१२६८.३; १२७०.४). हिलाच चरण गती म्हणतात (१२८४.३). या गतीवर लक्ष ठेवले म्हणजे जप होतो. याला 'जपोनिजप' वा अजपाजप म्हणतात. नरदेहात हाच जप करावयाचा आहे. (१२८७).

(२४) अंतिम - (१३००) या अभंगात सर्व सार आले आहे. त्यातील 'अहंकाराच्या अभावाने देव होणे' हे सकल परमार्थाला सारभूत आहे.

या अभंगांशी संबंधित अशी मामांच्या अध्यात्मिक निष्ठेची गोष्ट येथे सांगावयास हवी. माघ शुद्ध नवमी हा मामांच्या निर्याणाचा दिवस. या दिवशी ठरलेल्या क्रमानुसार हा प्रस्तुतचा 'मूळ स्वभाव गुरूनाम । श्रीराम जयराम जयजयराम।' अभंग कीर्तनासाठी होता. पण या दिवशी सकाळपासून मामांच्या नाड्या सुटलेल्या होत्या. अशा स्थितीत 'आज मामा कसे कीर्तन करणार' अशी चिंता अनेकांना होती. पण शास्त्राला न समजणारा चमत्कार त्या दिवशी मामांच्या जवळ जमलेल्या माणसांना दिसला. रोजच्या कीर्तनाची संध्याकाळची पाच ही वेळ झाली. आणि आश्चर्य ! श्रीमामांनी आत्मिक सामर्थ्याच्या जोरावर आपली मान वर उचलली व मोठ्याने गर्जून 'श्रीराम जयराम जय जय राम' हा महामंत्र उच्चरवाने उच्चारला आणि आपला नित्य कीर्तनाचा नेम पार पाडला.

नामोच्चारण वा नामस्मरण हेच खरे कीर्तन आहे. (नामचि साधन नामचि कीर्तन । (११९२.३) असे मामांनी म्हटलेले आहेच. अशाप्रकारे 'एकान्ती लोकान्ती देहान्तीही नाम । प्रचीती उत्तम स्वये दिली ।' हे वचन मामांनी संपूर्णपणे सत्य करून दाखविले.

वैशिष्ट्ये

वर दिलेल्या संक्षिप्त परिचयावरून श्रीमामांच्या अमृतवाणीची पुढील ठळक वैशिष्ट्ये लक्षात आल्याशिवाय रहात नाहीत :- (१) या ऐहिक जीवनात 'अधिक' अथवा 'समधिक' काय आहे याचा उलगडा होतो. (२) परमार्थी माणसाने जगात कसे वागावे हे स्पष्ट होते. (३) आपल्या सणपर्वकाळाचे आध्यात्मिक मर्म लक्षांत येते. (४) ज्याप्रमाणे सूर्य या केंद्राभोवती ग्रह इत्यादि भ्रमण करतात, त्याप्रमाणे नामाच्या मध्याभोवती मामांचे अभंग गुंजन करीत रहातात. त्यामुळे अध्यात्मशास्त्रात नामाला असणारे महत्त्व मनावर चांगलेच बिंबून जाते.

निष्कर्ष

या असार संसारात दुर्लभ नरदेह प्राप्त झाल्यावर, तेथे कशात काय अधिक आहे हे जाणून घेऊन, सण-पर्वकाळांचा आंतरिक अर्थ लक्षांत घेऊन संत-सद्गुरुनी साधकांसाठी केलेला उपदेश ध्यानात ठेऊन, मनामध्ये विवेक, वैराग्य व भक्ती बाणवून देवादिकांना नमन करून, त्यांचे भजन गाऊन, माणसाने नाम-साधन केले तर त्याला देवाचा अनुभव येईल आणि त्याचे अंतिम ध्येय जे मोक्षसुख ते त्याला प्रासंगिकपणाने नव्हे तर निश्चितपणाने प्राप्त होईल, असा मामांच्या अमृतवाणीचा निष्कर्ष आहे.

श्रीमामा आता लौकिक अर्थाने इथे नाहीत. तथापि त्यांनीच एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे - 'साधुसंत नाही गेले, अजरामर होऊनि ठेले (१६५.१)' ते तात्त्विक दृष्ट्या आहेतच. परंतु अगदी स्थूल दृष्टीतून जरी पाहिले तरीसुद्धा मामा आपल्या 'अमृतवाणी' च्या स्वरूपात येथे आहेतच.

साधक-मुमुक्षूंना मार्गदर्शक ठरणारी अशी मामांची कीर्तनवाणी अथवा अमृतवाणी प्रकाशित करून मामांच्या चिरंजीवांनी - श्रीदादामहाराज केळकरांनी - मामांचे भक्त व इतर परमार्थप्रेमीजन यांना उपकृत केले आहे, याबद्दल त्यांना जितके धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

येथेच आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची नोंद केली पाहिजे. मामांनी अखंड अडतीस वर्षे कीर्तन केले. तीच नेमाने कीर्तन करण्याची परंपरा मामांच्या वचनानुसारच मामांच्या परमाधिकारसंपन्न चिरंजीवांनी - श्रीदादामहाराज केळकरांनी - मामांच्या निर्याणानंतर गेली १९ वर्षे चालविली आहे. तसे करताना त्यांनाही अडचणी आल्या. पण त्या बाजूला सारून त्यांनी कीर्तनाचा ओघ चालूच ठेवला. हा त्यांचा नित्यकीर्तनाचा नेम पुढेही असाच निर्विघ्नपणे अखंड चालेल यात शंका नाही. श्रीदादामहाराजांचे ही सुमारे २००० पदे-अभंग आहेत; ते सर्वच परमार्थदृष्ट्या उत्कृष्ट आहेत. तेही लौकरच प्रसिद्ध व्हावेत अशी इच्छा व्यक्त करणे अप्रस्तुत होणार नाही.

श्रीमामांच्या अमृतवाणीचा परिचय करून देण्याचे काम माझ्याकडे देण्यात श्रीदादामहाराजांचे गुरूत्त्वच स्पष्ट होते. तेव्हा 'उगीयाचि माथा ठेवितो चरणी । हेचि भले ।'

सांगली
५.२.१९८१

के. वा. आपटे

प्रथम आवृत्ती

प्रकाशकाचे मनोगत

भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेने आमचे ती.प.पू. श्रीमामांनी जी अखंड कीर्तन सेवा आपले घरी इ.स. १९२४ पासून १९६२ पर्यंत म्हणजे आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत केली, त्याची परिणती म्हणजेच ही श्रीमामांची गाथा अर्थात् अमृतवाणी हा ग्रंथ होय.

ती.प.पू. श्रीमामांचा पिंडच मुळी कीर्तनाचा. ते लहानपणापासून कीर्तन करीतच होते. त्यांना कीर्तनाचा छंदच होता. कीर्तनप्रियाला कीर्तनप्रिय महात्मा भेटला नसता तरच आश्चर्य.

श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे आज्ञेने आमचे श्रीमामा चिमडास गेले. त्याच दिवशी त्यांना तेथील सत्पुरुष श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह झाला. श्रीमामांनी साडेतीन कोटी जपाची दोन पुरश्चरणे केली. एक संकल्प न सोडता व एक संकल्प करून. संकल्प सोडून पुरश्चरण चालू असताना श्रीमामांची सिटी हायस्कूल, सांगली मधून तासगावला बदली झाली होती. पण पुरश्चरणाचे आड नोकरी येते म्हणून स्वतः आजीव सदस्य मंडळाचे अध्यक्ष असूनही, नोकरीचे त्यागपत्र दिले व पुरश्चरण पूर्ण केले. रोज नऊ तास याप्रमाणे प्रत्येक पुरश्चरणास सात वर्षे लागली. त्यानंतर १३ कोटीचे पुरश्चरण सुरू केले होते. पण ते पूर्ण झाले की नाही हे मला ते बोलले नाहीत व तसे कधी विचारलेही गेले नाही. पण त्यांची साधनाची बैठक जबरदस्त असल्याने ते पुरश्चरण पूर्ण झाले असावे असा माझा कयास आहे. नामस्मरणावर नितांत श्रद्धा. तेच केले आणि सांगितलेही.

त्यांनी जे जन्मभर कीर्तन केले त्याचे स्वरूप, खरे फारच वेगळे होते. ती देवाशी अध्यात्म चर्चा- नव्हे नव्हे तो देवाशी एकांत होता - ते आत्मनिवेदन हेते.

काही संतांनी भजन हेच एक ईश्वरप्राप्तीचे साधन केले होते. त्याप्रमाणे नित्य कीर्तन हे एक आमचे श्रीमामांनी ईश्वरप्राप्तीचे साधन केलेले होते.

कीर्तनास आपणापुढे किती श्रोते आहेत किंवा साथीला कोण आहे अगर नाही, इकडे त्यांचे कधीच लक्ष गेलेले नाही आणि म्हणूनच त्यांचे हातून अखंड कीर्तनभक्ती घडली आणि त्याचे मूळ कारण भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांची जबरदस्त कृपा हेच होय.

'देवाकरिता कीर्तन करणारे एक बापूराव केळकर आहेत' असे उद्गार श्रीगुरुदेव रानडेसाहेब यांनी शंभरवेळा तरी श्री. दादासाहेब देशपांडे यांचेजवळ स्वानुभवाने काढल्याचे मला श्री. देशपांडे यांनी प्रत्येक भेटीत सांगितले आहे.

'मामा केळकर हे रामाची भक्ती कशी करावी ते प्रत्यक्ष आचरून दाखवीत आहेत. अरे, मामा म्हणजे रामभक्ती व रामभक्ती म्हणजे मामा' असे उद्गार पावसचे स्वामी श्रीस्वरूपानंद यांनी श्री. म. द. भट यांचेजवळ श्रीमामांचे निर्याण झाल्याचे समजल्यावर काढले. कोल्हापूर येथे श्रीअमलानंदांची व माझी भेट झाली असता, श्रीस्वामींचे जवळ आमचे श्रीमामांचा विषय निघाला तर स्वामींना अत्यंत आनंद होत असे, हे मला स्वतः श्रीस्वामी अमलानंदांनीच सांगितले.

श्रीमामांच्या या अखंड कीर्तनामुळे त्यांचेकडे अनेक संप्रदायातील साधुसंत सांगलीस आले की येत असत. स्थल संकोचास्तव मोजकेच उल्लेख करीत आहे. मुकुंराजपंथी श्रीरामानंद महाराज खटावकर, श्रीअक्कलकोट स्वामींचे शिष्य श्रीशंकरमहाराज मिरीकर, सांगलीतील श्रीनारायणमहाराज मळणगांवकर, बुधगांवचे विदेही साधु श्रीगुंडुबुवा, वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू प्रा. मामासाहेब दांडेकर तसेच श्रीदासगणू महाराज, निंबाळचे गुरुदेव रानडेसाहेब, श्रीगोंदवले संप्रदायापैकी श्रीकेतकरमहाराज, अवधूत संप्रदायापैकी श्रीपांडुरंगमहाराज

ताम्हनकर, शक्तीपातदीक्षा देणारे श्रीगुळवणीमहाराज, समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव, फलटणचे विदेही साधु डॉ. उपळेकर, वाटेगाव संप्रदायापैकी श्रीगोविंदमहाराज वाटेगांवकर, सिद्धारूढ स्वामींच्या शिष्या श्री कलावतीदेवी, आजरेकर फडाचे प्रमुख श्री. विठोबा अण्णा कगनोळीकर, सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री. लक्ष्मणमहाराज निजामपूरकर, गोजीवन श्रीचौंडेमहाराज, इत्यादि शिवाय आमच्या चिमड संप्रदायापैकी श्रीनागप्पाण्णामहाराज निंबरगीकर, श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, गु. श्रीबाबुरावजी कोटणीसमहाराज आणि मूळपीठ श्रीकाडसिद्धेश्वरमहाराज येत असत हे सांगावयास नकोच.

श्रीतात्यासाहेबमहाराज व श्रीमामांचे कृपेने आजही श्री सरस्वती बाबु, वालदासजी, श्री. डोंगरेमहाराज, श्री. म्हादबामहाराज पाटील इ. अनेक संत-सज्जन येत असतात व साहजिकच आम्हास बसल्या ठिकाणी संतदर्शनाचा लाभ होत असतो.

श्रीमामा कीर्तनाला उभे राहिले म्हणजे त्यांना अभंग स्फुरत असे व त्यावर ते कीर्तन करीत. पण त्यांनी हा अभंग आपण केला आहे असा कधी चुकूनही उच्चार केला नाही. श्रीमामांचे अभंगात शेवटी दास अशी मुद्रिकाच बहुधा असावयाची. यामुळे श्रीसमर्थांचे अभंगावरच मामा कीर्तन करतात असेच पुष्कळांना वाटत असे. काही अभंगात श्रीमामांनी 'गोविंद' अशी मुद्रिका घेतली असून एकाच हिंदी पदात 'राधासुत' अशी मुद्रिका घेतली आहे.

हे अभंग अन्य कोणाचे पाठात नसल्याने कितीतरी वेळा अभंग म्हणता म्हणता त्यात पुन्हा बदलही होत असे व तोही वहीत टिपला जाई, असेही होत असे. कीर्तनात आधारादाखल मात्र सर्व संतांचे अभंग, ओव्या, श्लोक, पदे येत असत. मूळ अभंग श्रीमामा आपला घेत असत, अशी गाथेच्या निर्मितीची मोठी मौजेची घटना आहे. द्विरुक्तीचे अभंग किंवा तेच तेच एका विचाराचे अभंग

एवढ्या ३८ वर्षांचे कालावधीत येण्याची शक्यता जास्तच. या सर्वांचा विचार करून श्रीमामांचे १३०० अभंगांची गाथा प्रसिद्ध होत आहे. आमचे श्रीमामांना तेरा आकडा हा फार प्रिय. श्रीमामांनी श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे ओवीबद्ध चरित्र लिहिले त्याचे अध्यायही तेराच आहेत. असे हे अभंग आहेत.

श्रीमामांचे ओवीबद्ध चरित्र श्रीमामांचे निःसीम भक्त परमप्रिय अण्णा दिवेकर यांनी स्वयंस्फूर्त उत्कृष्ट लिहिले असून, ते परमप्रिय स. वि. तथा नाना जोगळेकर, मुंबई यांनी प्रसिद्ध केले आहे. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कै. गु. मामासाहेब दांडेकर म्हणतात, "ह.भ.प. बापूरावर्जीनी (श्रीमामांनी) जवळ जवळ दोन हजार अभंगरचना केल्याचे कळते. जसे हे चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे, त्याप्रमाणे त्यांचे अभंग वाङ्मयही छापून प्रसिद्ध होणे अवश्य आहे. त्याच्या प्रकाशनाने परमार्थाची वाट चालू इच्छिणाऱ्या साधकांच्या साधनमार्गावर खात्रीने प्रकाश पडेल."

श्रीमामांनी खूप वाचले पण त्यातील फक्त नामच घेतले. त्यामुळे त्यांचे अभंगात नामाशिवाय दुसरा विषयच नाही. मामांनी रात्र रात्र साधन केले, ही कादंबरी नसून आमचे वाड्यातील अनेकांनी अनेक वेळा ही साक्ष त्यांचेच चर्मचक्षूंनी घेतली आहे. कितीतरी वर्षे मामा रात्री पडवीपुढील दगडावरच बसलेले असावयाचे.

गाथेची पहिली प्रत मजकडून झाली. त्यानंतर परमप्रिय अण्णा दिवेकर यांनी तिच्या दोन प्रती केल्या. मग अभंगांची निवड आणि वर्गीकरणही केले. श्रीमामांनी कोणत्या भूमिकेतून, कोणत्या दृष्टीने हे अभंग कीर्तनास घेतले याची कल्पना त्यांचे कीर्तनास रोजच पेटीवर बसत असल्याने मला होती. यामुळे वर्गीकरणात थोडा फरक करावा लागला. अण्णांची प्रकृती साथ देत नाही.

म्हणून, नाहीतर त्यांनी हे शब्द लिहिले असते. परमप्रिय अण्णांनी या गाथेचे कामही मोठेच केले आहे, यात प्रश्नच नाही.

ज्या श्रीज्ञानेश्वरमाऊलीचे कृपेने श्रीमामांचे व्यावहारिक व पारमार्थिक जीवन सुरू झाले, ज्या माऊलीचे आदेशाप्रमाणे श्रीमामांची व श्रीतात्यासाहेबमहाराजांची गाठ पडली आणि श्रीमामांनी उभे आयुष्य परमार्थात व्यतीत केले ते, जे श्रीमामांना माऊलीने लहानपणी श्रीक्षेत्र आळंदीस दर्शन दिले ते चित्र, श्रीमामा उत्तम चित्रकार असल्याने स्वहस्ते काढून आपले श्रीज्ञानेश्वरीतच ठेवलेले होते.

अनेक संतसज्जनांचे आग्रहाने आमचे घरीच श्रीसीतारामाचे देव्हाऱ्यावरच ते आता प्रतिष्ठित झाले आहे. आमचे भाग्य म्हणून आम्हाला नित्य त्रिकाळ दर्शन घडते आहे. श्रीमामांनी आपले घरीच श्रीज्ञानेश्वरमहाराजांना आणले आहे. परंतु या चित्राचा बोलबाला मामांनी चुकूनही आपल्या आयुष्यात केलेला नाही हे सर्वश्रुत आहे. हे चित्र काढून आता ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. श्रीज्ञानदास गोळे यांच्यासारख्या ज्ञानेश्वर भक्तांनी विविध प्रकारे या चित्राबद्दल आपली आत्मीयता स्वानुभवाने व्यक्त केली आहे. प्रस्तुत तो माझा विषय नाही. पण एक गोष्ट नमूद करणे अवश्य आहे.

श्रीमामांनी काढलेल्या या चित्रावरून वालचंदनगरचे श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. मधुकरपंत वैकर यांनी सुंदर चित्र तयार करून घेतले आहे. त्यांना ही स्फूर्ती नाशिकचे विद्यावाचस्पती श्रीरामबुवा गोसावी, पुण्याचे श्री. शांताराम आठवले इ. संत-सज्जनांनी या चित्राबद्दल जी आपली आत्मीयता पुस्तकातून, मासिकातून प्रगट केली आहे, त्यावरून झाली.

यामुळे या चित्राचा ब्लॉक करूनच हे चित्र आम्ही श्रीमामांचे या गाथेत

समाविष्ट केले आहे. या योगाने श्रीज्ञानेश्वरभक्तांना हे दर्शन सुलभ होणार आहे. ज्यांना या चित्राबद्दल नितांत श्रद्धा आहे, त्यांना याचा लाभ सहजच होईल. ही सेवा श्रीमाऊली गोड करून घेईल, अशी मला खात्री आहे.

या गाथेस श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर यांचे चिरंजीव श्रीगुरुसिद्धाप्पामहाराज व श्रीभाऊरावमहाराज निंबरगीकर यांचे चिरंजीव श्रीगुरूलिंगाप्पामहाराज यांचे आशीर्वाद आहेत.

श्रीगोविंदपंत घोसरवाडकर यांचे ठिकाणी श्रीरेवणसिद्धांचा संचार होत असे. लक्षावधी लोकांना त्यांच्या संचाराचा अनुभव आहे. संचारावस्थेत त्यांनी उद्‌गार काढले, "अखंड नामस्मरणाने व कीर्तनाने या संप्रदायात केळकरमामा हे अधिकारी पुरुष ठरतील" हे शब्द अक्षरशः खरे ठरले आहेत. या श्रीगोविंदपंतांचे चिरंजीव श्रीबाबूरावअण्णा व श्रीशंकरमामा शिपूरकर यांनी मजवर प्रेमाचा वर्षाव केला आहे. ते याप्रसंगी असते तर त्यांना अत्यानंद झाला असता. श्रीदेवाचे आज्ञेने श्री.मधुकरपंत शिपूरकर यांनी श्रीअप्पाचीवाडी येथे चिमडचे पंचपदीबरोबर आमचे श्रीमामांचा श्रीरामपाठ व नेम चालू केला आहे. अशीच परंपरा श्रीदत्तोपंत घोसरवाडकर यांनी चालविली आहे.

श्रीमामांचे या गाथेस संस्कृतमध्ये अर्पणपत्रिका असावी असे मला वाटले. कारण संस्कृत ही देवांची भाषा आहे. माझे परमप्रिय प्रा. दा. वि. कुलकर्णी याना अर्पणपत्रिका तयार करणेस सांगितले. त्यांनी ही अर्पणपत्रिका उत्तमच तयार केली असून या गाथेची आरती स्वयंस्फूर्त केली आहे. तसेच अगदी अल्पावधीत श्रीमामांचे अल्पचरित्र लिहून दिले, हे खरेच विशेष आहे.

भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे नातू व गु. श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचे सुपुत्र व सत्‌शिष्य परमप्रिय ह.भ.प. श्री

गुरुनाथ कोटणीस महाराज यांनी या गाथेसंबंधी चार शब्द लिहून दिले. हे शब्द म्हणजे श्रीतात्यासाहेबमहाराज यांचा आशीर्वादच आहे असे मला वाटते.

परमप्रिय प्रा. म.अ.कुलकर्णी यांनी माझे इच्छेप्रमाणे मोठ्या आत्मीयतेने श्रीस्वामी स्वरुपानंदांचे परमशिष्य श्रीस्वामी अमलानंद यांचेकडून या गाथेस आशीर्वाद लिहून पाठविला आणि तोही यथायोग्य शब्दात. या प्रेमाचे मोजमापन करता येत नाही.

योगीराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांचे श्रेष्ठ शिष्य श्रीमामासाहेब देशपांडे आमचेकडे आले असता त्यांना ही श्रीमामांची गाथा दाखविली. त्यांनी जणू काही माझे मनातील हेतू जाणून, तेथल्या तेथे या संबंधी चार शब्द लिहून दिले. हे प्रेम मला कोणत्या शब्दांत व्यक्त करता येईल!

शेटफळ संप्रदायातील श्री वासुदेवमहाराज यांचे प्रीय शिष्य श्री. गो. श्री. कुलकर्णी, एम.ए. यांनी या गाथेसंबंधी स्वयंस्फूर्त वाङ्मयसेवा केली आहे. हा आपलेपणा लक्षांत घेण्यासारखा आहे.

परमप्रिय ह.भ.प. बापूसाहेब देशमुख वकील हे प्रतिवर्षी चांगदेपासष्टी सांगून श्रीज्ञानेश्वर माऊलींची सेवा करीत असतात. श्रीमामांचे त्यांचेवर विद्यार्थी दशेपासून विशेष प्रेम असलेने, त्यांचे महत्त्व जाणून श्रीमामांचा परिचय या ग्रंथात त्यांनी करून दिला आहे. यावरून त्यांची श्रीमामांचे ठिकाणी असलेली निष्ठा व्यक्त होत आहे.

चि. केशव वामन आपटे, एम.ए., पीएच. डी., उपप्राचार्य, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यांनी जो ग्रंथ-परिचय दिला आहे, तो त्यांस या ग्रंथाचा परिचय फार पूर्वीपासूनचा आहे म्हणूनच. एरवी हे काम कोणास जमलेच नसते. त्याचा व माझा ऋणानुबंध अनेक जन्मांचा आहे. भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकर

यांचे कृपेने अध्यात्मिक दृष्टीने त्याचा उत्कर्ष होत जावा, अशी माझी इच्छा आहे.

श्रीगुरूदेव रानडे साहेब यांचे एक निष्ठावंत शिष्य गु.भ.प. बाळासाहेब केळकर व भगवान श्रीरमण महर्षी यांच्या अंतरंगातील एक शिष्य प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी यांनी या ग्रंथास शुभेच्छा अनेकवेळा व्यक्त केल्या आहेत.

या ग्रंथास ज्या जया संतसज्जनांचे साहाय्य झाले आहे. त्याला तोडच नाही. ते एक उत्कट प्रेम आहे. त्याचे स्वागत प्रेमानेच व्हावयास हवे तेच येथे केले आहे.

या ग्रंथास परमप्रिय सुरेश जोशी, श्रीमंत बाळासाहेब दांडेकर (पालघर), वसंत महेश्वर बापट, न. दा. तथा अण्णा दिवेकर, कविवर्य अण्णा कुलकर्णी, कृ.रा. शिंगाडे, बापूराव मायदेव, धनंजय भावे, प्रकाश भावे, शरद आपटे, विनायकराव छत्रे, पु.वा. जोग (माजी शिक्षणाधिकारी), बापूराव जोशी, माऊसाहेब जोशी, गोविंदराव ताम्हणकर यांचे सहाय्य झाले असून परमप्रिय चि. शिरूभाऊ सहस्रबुद्धे यांचे अनेकप्रकारे सहाय्य झाले आहे. याचे शब्दात वर्णन करणे शक्य नाही.

श्रीमामांची ही गाथा ग्रंथरूपाने साकार करण्यासाठी चि. पां.सी. गोखले, चि. यशवंत केशव आपटे, चि. शिरुभाऊ सहस्रबुद्धे, चि. चंद्रशेखर, सूर्यकांत, अनल व अनिलप्रभू यांनी फार परिश्रम घेतले आहेत. मुद्रिते तपासण्याचे अत्यंत किचकट काम चि. पां.सी. गोखले, वामनराव आणि मुकुंदराव सहस्रबुद्धे यांनी अत्यंत आपलेपणाने केले आहे. या सर्वांच्या परिश्रमाचे वर्णन शब्दात करणे शक्य नाही.

आमचेकडे नित्यनेमाने येणारे परमप्रिय श्री. रामभाऊ सहस्रबुद्धे यांचे भाचे डॉ. गोपाळराव ग. जोगळेकर, पुणे यांनी हे काम आपले मानून, उद्योगपती

श्री. बापुरावजी पारखे यांचेकडून आम्हास किफायतशीर कागद पुरवला. श्री. बापूरावजी पारखे व डॉ. जोगळेकर, यांचेबद्दल कृतज्ञता कोणत्या शब्दात व्यक्त करता येईल!

या ग्रंथाच्या छपाईचे काम अल्पावधीत व अत्यंत आपुलकीने श्री गजानन प्रिंटिंग प्रेस, (मिरज) चे चालक श्री. प्रभाकर निळकंठ महाबळ व त्यांचे मुद्रणालयातील सहकारी यांनी उत्कृष्टपणे केले आहे. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

शेवटी माझे प.पू. मातोश्री इंदिराबाई केळकर व ती. प.पू. वडील श्रीगोविंद अनंत तथा बापूरावजी केळकर (श्रीमामा) यांचे अनन्यभावाने स्मरण करून, मला जे हे मनोगत श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कृपेने स्फुरले ते भगवान श्रीसद्गुरु श्रीलिंनंबरगीकरमहाराज यांचे पवित्र चरणी समर्पण करून येथेच लेखणीस विराम देतो.

श्रीमामांच्या या गाथेबद्दल लिहावयाचे झाल्यास मला एवढेच म्हणता येईल की,

"श्रवणी पाजुनी अमृतवाणी ।
नयनी दाविती चिन्मयखाणी ।।"

(श्रीशिवराम)

सांगली

श्री गोविंद नवमी

माघ शुद्ध नवमी, शके १९०२

गुरुवार दि. १२.०२.१९८१

श्रींचा नम्र बालक,

राम गोविंद केळकर

(दासराम)

संपादकीय.....

अहो गुळा साखरे मालयाचे । हे बांधे तरी एकाचि रसाचे ।
परी स्वाद गोडियेचे । आन आन जैसे ।। ज्ञा.

गूळ, साखर, काकवी हे पदार्थ एकाच ऊसाच्या रसापासून तयार होतात परंतु प्रत्येकाचा स्वाद व गोडी ही भिन्न असते. तसे महाराष्ट्रात अनेक संतमहात्मे होऊन गेले. त्यांचे अभंगगाथेही सध्या उपलब्ध आहेत. परंतु प्रत्येक संतांच्या अभंगांची वेगवेगळी गोडी व स्वाद असतो. तसे आमच्या प.पू.श्रीमामांच्या 'अमृतवाणी' या अभंगगाथ्याचे आहे. या अभंगात श्रीमामांनी फक्त नामच सांगितले. एकनाथी भागवतात भगवान उद्धवाला बोध करतात, "ते ज्ञान हृदयी प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहु प्रगटे । आत्मबोधाचा ।।४-१८९।।" या ओवीप्रमाणे श्रीमामांच्या हृदयात सद्गुरूप्रणित ज्ञान प्रतिष्ठित झाल्यावर त्यांचे ठिकाणी शांतीचा अंकुर फुटला व त्यांचे ठिकाणी शांती प्रतिबिंबित झाली. या शांतीमुळेच 'अमृतवाणी'रूपी आत्मबोधाचा विस्तार प्रगट झाला असे म्हणण्यास काही हरकत नाही.

प.पू.श्रीमामामहाराजांचा अमृतवाणी हा ग्रंथ यापूर्वी इ.स. १९८१ साली प्रसिद्ध झाला. यात श्रीमामांचे १३०० अभंग प्रकाशित केलेले आहेत.

प.पू.श्रीमामांनी एकूण १९४० अभंगांची रचना केली. त्यापैकी १३०० अभंग हे मागे प्रकाशित झाले आहेत. श्रीमामांच्या अभंगांची प्रेसकॉपी ही दोन प्रकारे झाली आहे. एक प्रेस कॉपी करणेचे काम आमचे प.पू.श्रीदासराममहाराज यांनी केले आहे. ही प्रेस कॉपी श्रीदासराम लेखन वही क्र.२६० मध्ये आहे. या वहीच्या सुरूवातीला स्वतः श्रीमामांनी स्वहस्ताक्षरात ४० अभंग लिहिलेले आहेत व पुढे श्रीदादांनी, श्रीमामांचे अभंग लिहिले आहेत. दुसरी प्रेस कॉपी करणेचे काम श्रीमामांचे निष्ठावंत भक्त श्री. न. दा. दिवेकर सर यांनी केले. या प्रेस कॉपी केलेल्या वहीचा श्रीदासराम लेखन वही क्र.२१३ आहे. या दोन्हीही वह्यात एकूण १९४० इतके

अभंग लिहिलेले आहेत. यापैकी निवडक १३०० अभंग पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत.

पहिली आवृत्ती प्रकाशित करताना श्रीदादांनी जे द्विरूक्त अभंग आहेत ते वगळले. तसेच श्रीमामांना १३ हा अंक प्रिय असल्याने श्रीदादांनी एकूण १३०० अभंगांची अमृतवाणी प्रसिद्ध केली. काही दिवसापूर्वी श्रीदासराम लेखन वही क्र.२१३ व २६० या दोन वह्यांचे पूर्ण अवलोकन करण्यात आले. यातील १३०० अभंग सोडून जे उर्वरीत अभंग आहेत, त्याचा अभ्यास करणेत आला. हा अभ्यास करता, असे लक्षात आले की, काही अभंगातील सुरवातीचे काही चरण हे पहिल्या १३०० मधील अभंगांप्रमाणे आढळले, परंतु पुढील सर्व चरणात श्रीमामांनी विविध विषयांचे खुलासे करून त्यात लिहिले आहेत. म्हणून त्या उर्वरीत अभंगांची छाननी करून १३०० अभंग सोडून नवीन ६४० अभंग उपलब्ध झाले. अशी एकत्रित १९४० अभंगांची अमृतवाणीची दुसरी आवृत्ती प्रकाशित करत आहोत.

श्रीदादांनी अमृतवाणीच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशकाचे मनोगतात लिहिले आहे की, श्रीमामा कीर्तनाला उभे राहिले म्हणजे त्यांना अभंग स्फुरत असे व ते त्या अभंगावर कीर्तन करीत असत. परंतु त्यांनी हा अभंग आपण केला आहे याचा कधी चुकूनही उच्चार केला नाही. श्रीमामांचे बहुतांश अभंगात 'दास' ही मुद्रिका असायची. यामुळे श्रीमामा हे श्रीसमर्थांच्याच अभंगावर कीर्तन करतात असे पुष्कळांना वाटत असे. परंतु श्रीमामा हे आपण लिहिलेल्या अभंगावरच कीर्तन करायचे याचा पुरावा म्हणजे श्रीमामांनी स्वहस्ताक्षरात एकूण ३२९ कीर्तनांची टाचणे लिहिली आहेत. ही टाचणे श्रीदासराम लेखन वही क्र. २१२ व २७० यात उतरविलेली आहेत. सदरची कीर्तनांची टाचणे ही त्रोटक स्वरूपात असलेने ती प्रकाशित करणे गैरसोयीचे आहे.

आणखी एक गोष्ट मला नमूद करावीशी वाटते की, श्रीदादांच्या व श्रीअण्णांच्या कीर्तनात विषयानुरूप अनेक चरण येतात. परंतु त्या चरणांतील बहुतांश चरण हे श्रीमामांच्या अभंगातीलच आहेत हे मला या

ग्रंथाचे संपादन करतानाच समजले. कारण या पद्धतीने यापूर्वी माझ्याकडून ही अमृतवाणी वाचली गेली नाही हे मी प्रांजळपणे कबूल करतो.

श्री. न. दा. दिवेकर यांनी जी अभंगांची प्रेस कॉपी केली आहे, त्या वही क्र.२१३ मध्ये श्रीमामांच्या अभंगांबरोबरच त्यांनी श्रीमामांचे ६ श्लोक लिहिलेले आढळले. अमृतवाणीच्या पहिल्या आवृत्तीमध्ये श्री. गो.श्री.कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात या श्लोकांचा परामर्ष घेतलेला आहे. परंतु हे श्लोक पहिल्या आवृत्तीत छापलेले नाहीत. म्हणून दुसऱ्या आवृत्तीत हे ६ श्लोक समाविष्ट केले आहेत आणि श्री. गणपतराव कानिटकर यांनी लिहून ठेवलेल्या श्रीमामामहाराजांच्या आठवणींच्या वहीमध्ये श्रीमामामहाराजांनी लिहिलेली कविता मिळाली. तिचाही या दुसऱ्या आवृत्तीत समावेश करण्यात आला आहे. तसेच श्री. न. दा. दिवेकर यांनी वही क्र. २१३ मध्ये लिहिलेले अमृतवाणीवरील 'मनोगत'ही दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट केले आहे.

अमृतवाणीचा महिमा अनेक थोर व्यक्तींनी वर्णिलेला असून तो प्रथम आवृत्तीत प्रकाशित झालेला आहे. त्यामुळे परत मी या अमृतवाणीवर काहीतरी लिहिणे अयोग्य ठरेल. म्हणून प्रथम आवृत्तीतील सर्व भाग दुसऱ्या आवृत्तीतही तसाच ठेवलेला असून, फक्त या ग्रंथात ६४० ज्यादा अभंग व श्लोक समाविष्ट केले आहेत. तसेच श्रीमामामहाराजांनी स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या अभंगाची स्कॅन केलेली प्रत या द्वितीय आवृत्तीत समाविष्ट केलेली आहे, हे या ग्रंथाचे खास वैशिष्ट्य आहे.

अशी ही १९४० अभंगांची अमृतवाणी सर्व साधकांसमोर देणेचा प्रयत्न केला आहे. २०१९ साली कृष्णा नदीला महापूर आला व या महापुरात अमृतवाणीच्या ज्या काही थोड्या प्रती शिल्लक होत्या त्या सर्व कृष्णार्पण झाल्या. म्हणून ही दुसरी आवृत्ती प्रकाशित करणेत येत आहे.

अमृतवाणी हा ग्रंथ प.पू.श्रीअण्णांच्या अधिष्ठानाखाली प्रकाशित व्हायचा योग नव्हता असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. प.पू.श्रीअण्णांना 'अमृतवाणी' प्रकाशित झालेली बघून फार आनंद झाला असता. प.पू.श्रीमामांचे प.पू.श्रीअण्णांवर निरतिशय प्रेम होते. प.पू.श्रीअण्णा हे

लहानपणी प.पू.श्रीमामांच्या हातावर डोके ठेऊन झोपायचे. त्यांना प.पू.श्रीमामांचा सहवास भरपूर लाभला. परंतु सर्वकाही महाराजांच्या हातात आहे. त्यांच्या इच्छेपुढे काही चालत नाही.

पहिल्या आवृत्तीतील १३०० अभंगांमध्ये, नवीन मिळालेले ६४० अभंग, विषयानुसार समाविष्ट करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण काम माझे चुलते श्री. अनिलप्रभू (श्री. नाना काका) यांनी केले आहे. त्यांनी अमृतवाणी गाथेवर 'अमृतवाणी चिंतन' या नावाने प्रस्तावनावजा अभ्यासपूर्ण अभिप्राय लिहून दिला आहे. तसेच या अमृतवाणीच्या दुसऱ्या आवृत्तीला त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

अमृतवाणीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या संपूर्ण कामी मला आमच्या श्रीअण्णांचे कृपांकित श्री.रमेशकाका लाळे यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. आत्तापर्यंत जे ग्रंथ प्रकाशित झाले व येथून पुढे जे ग्रंथ प्रकाशित होणार आहेत, या सगळ्यामागे श्री. लाळेकाका यांचा मोठा वाटा आहे. या ग्रंथाचे डी.टी.पी.चे काम आमचे मित्र श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी कमी वेळात व बिनचुक केले आहे. तसेच पुस्तक छपाईचे काम मे. एस.बी.लिथो प्रेसचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्कृष्टपणे केले आहे. त्यांचे आभार. तसेच या ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी श्रीदासराममहाराजांचे कृपांकित श्री. माधवराव बर्वे यांनी घेतली म्हणून हा ग्रंथ साकार होत आहे. ग्रंथ प्रकाशना संदर्भात श्री. माधवराव बर्वे यांचे बरेच सहकार्य यापूर्वीही आम्हाला झालेले आहे. अशा सगळ्यांच्या सहकार्याने ही अमृतवाणीची दुसरी आवृत्ती साकार होत आहे.

अशी ही अमृतवाणीची दुसरी आवृत्ती माझे पणजोबा प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर, माझे आजोबा प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व माझे पितृदेव प.पू.श्रीअण्णा यांचे चरणी अर्पण करतो.

श्रीअण्णांचा कृपाभिलाषी,

दीपक चंद्रशेखर केळकर

माझी आई कै.सुमती रामकृष्ण बर्वे हिच्याविषयी थोडेसे...

माझी आई ती. कै. सुमती रामकृष्ण बर्वे ही प.पू.भ.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांची अनुग्रहित होती. प.पू.श्रीदासराममहाराज व सौ. सीतावहिनी तिला प्रेमाने मास्तरीणबाई म्हणत असत. तिने प.पू. श्रीदासराममहाराजांची कीर्तने साधारणपणे १८ ते २० वर्षे श्रवण केली. त्यानंतरदेखील रोज सकाळी आरतीला ती नियमीतपणे येत असे. देवाला हार करणे, काचेच्या हंड्या स्वच्छ करून लावणे इ. कामे ती कै. अंबुमावशींचे सोबत पार पाडत असे. तसेच दरवर्षीचे उत्सवाचे आधीच सौ. सीतावहिनींच्या सांगण्याप्रमाणे ती धान्य निवड, कांडण यासाठी येत असे.

प.पू.भ.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांचा अनुग्रह घेतल्यापासून ती घरचा व्याप सांभाळून, वेळात वेळ काढून नामस्मरण करीत असे व रामपाठ, पंचपदी, श्रीतुकाराममहाराजांचे १२ अभंग नियमित म्हणत असे. तिने प.पू.भ.सद्गुरू श्रीमामामहाराजांचीदेखील कीर्तने ऐकली होती.

प.पू.भ.सद्गुरू श्रीदासराममहाराजांनी देह ठेवला त्यावेळी सकाळी त्यांचे दर्शन घेण्यासाठी, तिचे वय झालेले असूनही ती इचलकरंजीहून सांगलीला बसने एकटी आली होती. त्यानंतरही अधून मधून महत्त्वाच्या प्रसंगी श्रीरामनिकेतन येथे दर्शनास येत असे. सन २०१२-१३ नंतर मात्र तिचे पाय वार्धक्याने खूपच दुखू लागले व तिला एकटीला सांगलीला दर्शनाला येणे अशक्य झाले. त्यानंतर देखील मी अधूनमधून गाडीतून तिला दर्शनासाठी घेऊन येत होतो. तिचे २५ ऑगस्ट २०१९ रोजी पहाटे देहावसान झाले. त्यानंतर प.पू.श्रीअण्णा व सौ. रोहिणीवहिनी आमचेकडे इचलकरंजीला भेटायला आले होते. प.पू.सद्गुरू श्रीअण्णांचीपण आमच्या घरास ती शेवटचीच भेट ठरली. प.पू.श्रीदादा व श्रीअण्णा यांनी आमच्या आईची निष्ठा ओळखली होती. तिच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून तिच्या स्मरणाप्रित्यर्थ मी हा ग्रंथ प्रकाशित करीत आहे.

आपला कृपाभिलाषी,

माधव रामकृष्ण बर्वे, इचलकरंजी

द्वितीय आवृत्ती

प्रकाशकाचे मनोगत

प.पू. सद्गुरू श्रीमामामहाराजांच्या 'अमृतवाणी' या पुनर्मुद्रित ग्रंथाचे प्रकाशन करताना मला अतिशय आनंद होत आहे. सदर ग्रंथाच्या प्रकाशनाची संधी मला लाभली हे मी माझे परम भाग्य समजतो.

सदर अमृतवाणीमध्ये प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराजांचे काही अभंग नव्याने समाविष्ट केले गेले आहेत. वास्तविक हा ग्रंथ प.पू.सद्गुरू श्रीअण्णांच्या उपस्थितीतच प्रकाशित व्हावयाचा होता. परंतु काही कारणाने ते लांबणीवर पडले व आता सदर ग्रंथ प्रकाशित करताना प.पू.सद्गुरू श्रीअण्णा लौकिक अर्थाने आपल्यात नाहीत याचे फार फार वाईट वाटते.

अमृतवाणीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या संपादनाचे महत्वाचे काम श्री. दीपकनाना यांनी केले आहे. या अमृतवाणीच्या दुसऱ्या आवृत्तीला श्रीअनिलप्रभू केळकर (श्री. नानाकाका) यांचेही बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. अमृतवाणीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या कामी श्रीअण्णांचे कृपांकित श्री. रमेशकाका लाळे यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. आत्तापर्यंत जे ग्रंथ प्रकाशित झाले व येथून पुढे जे ग्रंथ प्रकाशित होणार आहेत, या सगळ्यामागे श्री. लाळेकाका यांचा मोठा वाटा आहे. या ग्रंथाचे डी.टी.पी.चे काम श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी कमी वेळात व बिनचुक केले आहे. तसेच मुखपृष्ठ सजावटीचे काम श्री. सागर मोहिते यांनी फारच सुंदर केले आहे व या ग्रंथाच्या मुद्रणाचे काम मे. एस.बी. लिथो प्रिंटिंग प्रेसचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्कृष्टपणे व वेळेत करून दिलेबद्दल त्यांचे आभार. अशा सगळ्यांच्या सहकार्याने ही अमृतवाणीची दुसरी आवृत्ती साकार होत आहे.

संपूर्ण केळकर घराण्याने लहानपणापासूनच माझेवर अतोनात प्रेम केले आहे, ते मला जन्मोजन्मी विसरणे शक्य नाही. भगवान सद्गुरू श्रीदासराममहाराजांची अशीच कृपा माझेवर रहावी तसेच श्री. प्रभूनाना, श्री. अनल तात्या व प.पू.सद्गुरू श्रीअण्णांची नित्यकीर्तन परंपरा निष्ठेने चालविणारे श्री. दीपकनाना यांनी देखील मला आपला म्हणून माझ्यावर कृपा करावी अशी प्रार्थना करतो व येथेच थांबतो.

आपला कृपाभिलाषी,
माधव रामकृष्ण बर्वे, इचलकरंजी

अमृतवाणी चिंतन

श्रीगोविंद अनंत केळकर तथा श्रीमामामहाराज यांचा अवतारच मुळी हरिकीर्तनासाठी झाला होता. भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी देह ठेवल्यानंतर २७ दिवसांनी प्रत्यक्ष प्रगट होऊन माघ व.३, १९२४ या दिवशी, मध्यरात्री श्रीदासबोध पारायणाचेवेळी श्रीमामामहाराजांना अखंड कीर्तनाची आज्ञा केली. त्यांना कीर्तनानुग्रह प्राप्त झाला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे श्रीमामांनी आपले आयुष्य कीर्तनीभूत करून 'सच्चिदानंद' ही पदवी प्राप्त करून घेतली. आयुष्यातील शेवटच्या दिवशी नाड्या सुटलेल्या असतानासुद्धा, संध्याकाळी ५ या त्यांच्या कीर्तनाच्यावेळी, त्यांनी 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्यांच्या महामंत्राचा मोठ्याने उच्चार करून, सर्वजनांना निर्वाणीचा संदेश दिला. केवढे हे कीर्तनप्रेम!

एकही दिवस खंड न होता अखंड ३८ वर्षे त्यांनी कीर्तन केले. अखंडित वाचेने श्रीराम स्मरण अखंडत्वाने साधले. सतत नामामृताची गोडी चाखली व परमार्थात पूर्णता प्राप्त करून घेतली. सतत हरिकीर्तनाने ते हरिभक्तीचा कळस झाले.

नित्यकीर्तनप्रसंगी दिनविशेषानुसार अंतःस्फूर्त अभंग ते म्हणत व त्या मूळ अभंगावर अनेक संतांच्या अभंगांच्या, पदांच्या, ओव्यांच्या आधारे भक्तिपूर्ण कीर्तन करीत. कीर्तनोत्तर तो अंतःस्फूर्त अभंग वहीत नोंदला जाई. असे १८६१ अमृत अभंग त्यांचेकडून रचले गेले. त्यातून द्विरुक्ति व एकाच अर्थाचे अभंग पाहून साकारलेली निवडक १३०० अमृत अभंगांची गाथा म्हणजे ही 'अमृतवाणी' होय.

चैत्र व श्रावण हे दोन महिने सोडून उरलेल्या दहा महिन्यांसाठी त्यांनी रचलेल्या नित्यपाठाचे अभंगांचे आधारे सुनिश्चित केलेल्या विषयांचे विवरण

करणारेच हे बहुतांशी सर्व अभंग आहेत. प्रथम आवृत्तीत या निवडक १३०० अभंगांचा समावेश केला होता. उर्वरीत ५६१ अभंगात एखादा चरण तेराशे अभंगातील एखाद्या अभंगातील चरणासारखा व बाकीचे तीन चरण एकदम वेगळे असे काही अभंग व काही अभंग संपूर्णतः वेगळेच आहेत असे आढळले. म्हणून द्वितीय आवृत्तीत या सर्वच अभंगांचा समावेश करणेचे ठरले. अर्थात ते बहुतांश सारेच अभंग रोज कीर्तन करताना सुनिश्चित विषयांचे विवरण करण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरणारे आहेत. यामुळे नित्यपाठातील सर्वच विषयांची श्रीमामांना अपेक्षित नेमकी उकल होणार आहे. श्रीमामांच्या अभंगांच्या आधारे केलेले नित्यपदाचे विवरण सर्वार्थाने वेगळे होणार आहे. नेमकेपणाने विवरण करता आल्याने, श्रोत्या-वक्त्यांचे ठिकाणी कोणताही संशय राहणार नाही.

वस्तुतः हे सारे अभंग नित्यपाठातील ३०० विषयांचे आधारे वर्गीकृत व्हावयास हवे होते. तसे झाले असते तर कीर्तन करणाऱ्या वक्त्यास व सुजाण श्रोत्यास निश्चित सोयीचे झाले असते. पण आमच्याच सोयीसाठी ही अमृतवाणी विषयानुरूप नमन, भजन, सद्गुरू आदी २४ विषयांमध्ये पूर्वीप्रमाणेच वर्गीकृत केलेली आहे.

श्रीमामांची अमृतवाणी म्हणजे कृतीपाठ आहे. त्यांनी परमार्थ आचरिला व मग सांगितला. 'चाले तैसा बोले' असे त्यांचे वागणे होते. म्हणून ते वंदनीय ठरले. साधू म्हणून ओळखले जाऊ लागले. साधनाचे ठिकाणी, प्राणापानाचे ठिकाणी मनाचे मीलन झाल्याने, अद्भुत बळ प्राप्त होऊन, त्यांना दासाची पदवी प्राप्त झाली. त्यांनी पदावर बसून पदवी प्राप्त करून घेतली. तद्नंतर त्यांचेकडून जी अभंगरचना झाली आहे, त्यात त्यांनी 'दास' ही मुद्रिका वापरली आहे. पुढे नित्य सप्रेम अखंड नामस्मरणाने 'स्वये श्रीराम' झाल्यावर दासाचे वेगळेपण न राहिल्याने, सर्वत्र अद्वैत साधल्याने, त्यांनी पुढील अभंगातून 'गोर्विंद' ही मुद्रिका वापरली आहे. एकाच हिंदी पदात (अ.क्र.११५६) 'राधासुत' अशी तर एका अभंगात (अ.क्र.६६५) 'विष्णुदास' अशी मुद्रिका वापरली आहे.

श्रीमामामहाराजांनी खूप आध्यात्मिक पुस्तके वाचली. पण त्यांनी त्यातील सार असे एक नामच आत घेतले. त्यांचे अंतःकरणात नामाशिवाय दुसरा विषय नव्हता. 'आत असते तेच बाहेर प्रगट होते' या वचनाप्रमाणे त्यांचे अभंगात नामाशिवाय दुसरा विषय आलेला नाही. देह ठेवल्यानंतर सुद्धा सिंहासनातून जो अभंग श्रीदासराममहाराजांना ऐकू आला, तो असा :-

"नामरुप भगवान माझा । नामरुप भगवान ।।१।।
नामरुप सद्गुरु कृपा करी । नामचि वदवी महान।।२।।
नामचि साधन नामचि कीर्तन । नामाविण नच ज्ञान ।।३।।
पंथही नामचि प्राप्तीही नामचि । दासा तेच प्रमाण ।।४।।"

म्हणून त्यांच्या नामामृत बोलणाऱ्या १८६१ अमृत अभंगांच्या गाथेचे 'अमृतवाणी' हे नाव सार्थ ठरते.

रामनामाचे महत्व सांगणारा 'श्रीरामपाठ' (अ.क्र.१२६८-१२९९) हा तर मामामहाराजांचे अमृतवाणीचा गाभा आहे. 'श्रीरामपाठ म्हणजे मामा' असे रामपाठाचे वर्णन श्रीदासराममहाराज करतात. तर 'रामपाठाचे मोल करणे म्हणजे श्रीप्रभु रामरायाचे मोल केलेप्रमाणे होणार आहे' या शब्दात श्रीरामपाठाची महती म.स. तात्यासाहेबमहाराजांचे अधिकारी चुलत बंधू श्रीसद्गुरु गोपाळकाका कोटणीसमहाराज सांगतात. त्यातील एक श्वासापासून दोन प्रहरापर्यंत रामनामामध्ये पवन साधला असता येणारे अनुभव व्यक्त करणारे अभंग साधन करणाऱ्या साधकांसाठी मार्गदर्शक आहेत.

साधन कसे साधावे हे मामामहाराज असे सांगतात :- "साधुनिया तन मन । तेथे साधावे साधन ।। (७७४)." साधनाचे सुंदर वर्णन करणारे अमृत अभंग ते असे :-"कैसे करावे साधन । जेणे भेटे भगवान ।।१।। नित्य आणि नियमाने । करी नामाचे स्मरण ।।२।। मेरूदंड सरळ जाण । नासिकाग्री दृष्टी खूण ।।३।। अर्जुनासी भगवान । ऐसे सांगती साधन ।।४।। ऐसे साधिता साधन । दासा

अंकित भगवान ।।५।।" व "कैसा पवन साधावा । स्थिर करूनि नामी लावा ।।१।। घेऊनि सोडणेचे आधी । स्थिर करूनि कुंभक साधी ।।२।। जैसा जैसा वाढे काळ । पवन विजयाचे बळ ।।३।। वाढे दासाचे अंतरी । पूर्ण होता साक्षात्कारी ।।४।।"

साधनाने स्वरूप साक्षात्कार केव्हा होतो हे श्रीमामामहाराज असे सांगतातः- गुणातीत होता पाही । स्वरूप साक्षात्कार होई ।।(९११).

नामस्मरण कसे करावे याचे वर्णन अभंग क्र.७७२ मध्ये आलेले आहे. श्रीमामामहाराजांचे रामनाम हे आपण समजतो त्यापेक्षा वेगळे आहे. त्यांचा मूळ स्वभाव म्हणजेच गुरुनाम 'श्रीराम जयराम जयजय राम' हे होते. 'मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजय राम ।।' (१३००) त्यांची सहज कृती (निर्हेतुक श्वसन) म्हणजे त्यांचे रामनाम होते. 'सहजकृती रामनाम । नाही आणिक दुजे काम।।' (७६८). इडा आणि पिंगला सुषुम्नाकार झाल्यावर हाताला येणारे त्यांचे रामनाम होते. 'इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ।।'. (१२७८)

संतांची नावे सुद्धा अर्थपूर्ण असतात, बोलकी असतात व त्यांच्या आचरणामुळे त्यांचे नावाला अर्थ प्राप्त होत असतो. संतांच्या नावाच्या आधारे त्यांचे वर्णन करणारे अभंग मामामहाराजांनी केले आहेत ते असे :- "उरली नाही वृत्ती । म्हणून नाव त्या निवृत्ती ।।१।। मूर्तिमंत ज्ञान । ज्ञानराजा भगवान ।।२।। भक्तिमार्गीचा सोपान । म्हणून नाव त्या सोपान ।।३।। मुक्तस्थिती मुक्ताबाई । दास म्हणे नामी पाही ।।४।।" व "नामामाजी प्रगटवी देव । म्हणोनी जनी नामदेव ।।१।। जे का ज्ञानाचे ईश्वर । ईश्वर ज्ञान ज्ञानेश्वर ।।२।। एका जाणे जनार्दन एका । ब्रह्म तुकले म्हणोनी तुका ।।३।। वरी उदास नामी रस । दासा नामाचा उल्हास ।।४।।"

आपण सण, पर्वकाळ यांचेकडे काय दृष्टीने पाहतो व श्रीमामामहाराज

तेच सण काय दृष्टीने पाहतात हे मोठे पाहण्यासारखे आहे. त्यांनी सणांचा संबंधसुद्धा नामाशी जोडला आहे. उदा.

१) गुढीपाडवा :- हरीनाम ध्वज श्रवणी चढवा । होईल पाडवा अनायासे ।

२) गोकुळ अष्टमी :- अष्ट विसरावे नामी । तेचि गोकुळ अष्टमी ।।

३) नागपंचमी :- नागाची पंचमी साधियेली दासी ।

वृत्ती माझी ऐसी जव झाली ।।

४) शिमगा :- शिवाचे मनीचे गाई नाम वाचे । सणी शिमगियाचे तेचि धन्य ।।

५) भाऊबीज :- भावभक्ती बहिणी घरी । नाम अन्न सेवी जरी ।।

भाऊबीज म्हणती त्यासी । कार्तिक शुद्ध द्वितीयेसी ।।

त्यांनी कोणत्याही गोष्टीत नामच पाहिले. 'आता तनू त्यागिता । कीर्ती मागे उरावी ।।' याचा सर्वसाधारण अर्थ आपण काय घेतो 'मरावे परी कीर्तीरूपी उरावे' असाच घेतो ना? मामामहाराजांनी यातसुद्धा नामच पाहिले आहे. श्रीमामामहाराज सांगतात : 'तनू टाकूनी कीर्ती उरवी । मरण खुणा हे जाणावी । तनू सर्व भूतात्मक । कीर्ती रामनाम सम्यक ।।' (२२१). देहपातानंतरसुद्धा हरिच्या कीर्तीचे म्हणजे हरिच्या नामाचे स्मरण पाहिजे. निद्रा हे नित्य मरण आहे. याठिकाणी तनूचा त्याग - देहाचे विस्मरण झालेले असते. अशाही अवस्थेत नामाचे स्मरण शिल्लक रहावे असे मामामहाराजांचे सांगणे आहे.

श्रीमामामहाराजांचे सर्वच अभंग, पदे अत्यंत रसाळ अशी असून अंतःकरणाला भिडणारी, आपले अंतःकरणात नाम घट्ट करणारी आहेत. सर्वच रचना साधी, सोपी, प्रासादिक आहे. अमृतवाणी वाचून त्यातील पारमार्थिक संज्ञांचे अर्थ ध्यानी घेऊन, जर दासबोध, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी आदी ग्रंथांचे मनःपूर्वक वाचन केले तर त्या ग्रंथांचा एक वेगळाच योग्य अर्थ ध्यानी

आत्याशिवाय रहाणार नाही. म्हणून मामामहाराजांच्या अमृतवाणीचे 'संत वाङ्मयाची गुरुकिल्ली' या शब्दात श्रीदासराममहाराज वर्णन करीत.

आपण परमार्थामध्ये निरनिराळे शब्द अजाणतेपणी कसेही वापरत असतो, पण त्यांचे नेमके अर्थ अमृतवाणीमध्ये व्यक्त झालेले आहेत. उदा.

१) संसार :- संसरण हाची पाहता संसार । बा रे सोडणार तुझा तूची ।।

२) उन्मन :- विषयातून निघे मन । तेचि जाणावे उन्मन ।।

३) नाम :- मन देवा समर्पणे । हेचि खरे नाम जाणे ।। स्वपण नाम हे जाणोनी । राहे आपणा ओळखोनी ।।

४) मोक्षप्राप्ती : सत्यज्ञान येता हाती । मग जीवा मोक्षप्राप्ती ।। बंधन विषयांचे । नुरता मोक्षपद साचे ।।

५) सोवळा :- कामक्रोध ज्याचे मनी । ओवळा तो दिसे जनी ।। सोहं भावी जो वळला । तोचि जाहला सोवळा ।।

६) पापपुण्य :- पाप म्हणजे अनाम । दास म्हणे पुण्य नाम ।।

७) ब्रह्मचारी :- ब्रह्मचारी जो विचारी । ब्रह्मी रममाण अंतरी ।।

८) सावधान :- गोविंद म्हणे सावधान । रामनामी अनुसंधान ।।

९) दुर्बुद्धि :- स्वरूपापासून दूर बुद्धि । तीच जाणावी दुर्बुद्धि ।।

१०) विवेक :- मनाचा आवर हाच गा विवेक । अनावर देख अविवेक ।।

११) वैराग्य :- वैराग्य ते विषय त्याग । नुरे अंतरात भोग ।।

१२) कीर्तन :- वाचे गुण उच्चारण । हेचि जाणावे कीर्तन ।।

१३) भजन :- सर्वाभूती भाव हेचि ते भजन । दास म्हणे खूण नाम घेई ।।

१४) स्मरण :- कोहं भाव विस्मरण । सोहंभाव ते स्मरण ।।

१५) पूजन :- देवा नाम समर्पण । हेचि देवाचे पूजन ।।

१६) वंदन :- वंदन म्हणजे नमन । मन आपुले देवार्पण ।।

१७) दास्य :- गुरूने सांगितले करी । हेचि दास्य अवधारी ।।

१८) आत्मनिवेदन :- जाणे आपणा आपण । तेचि आत्मनिवेदन ।।

१९) ज्ञानी :- पाहे आत्म्याची चळवळ । तोचि ज्ञानीया केवळ ।।

२०) धर्म :- दासा नित्य धर्म खूण । निःसंदेह आचमन ।।

२१) योगी :- वियोग जयाचा आटोनिया गेला । तोचि योगी भला निरंजनी।।

२२) आसन :- आसन ते आसन ते । आस न ते आसन ते ।।

२३) संध्या :- नाम संदेह निरसन । संधी माझारी स्मरण । हेचि संध्या दासा लागून । पाहता त्रिधा ।।

२४) मंगळ :- गोविंद म्हणे मन गळता मंगळ । मनाची खळबळ जेथे नुरे ।।

२५) हळाहळ :- गोविंद म्हणे संसाराची हळहळ । तेचि हलाहल जीवा नुरे ।

२६) संगती :- संगती म्हणजे समगती जाणे । दाविताती खुणे संतराय ।।

२७) सावध :- सहा जिंकोनिया होणे निर्विकार । सावध प्रकार ऐसा असे ।।

२८) तप :- तप म्हणजे काय प्रकाशित होणे । अंधार दवडणे बुद्धीतील ।।

२९) खटपट :- खट पटती तरी खरी खटपट । रामनाम नीट उच्चारावे ।।

३०) जप :- जपोनी जपणे जप बोलिलासे । वाया जात असे काय देही ।।

३१) एकांत :- एक असे आत्मा ज्यात आदि अंत । तो स्वये एकांत ओळखावा ।।

३२) परमहंस :- परमहंसाचे लक्षण । सोहं हंसी ज्याचे मन ।।

श्रीमामामहाराजांनी अखंड ३८ वर्षे कीर्तन केले, पण त्याची जाणीवही त्यांचे ठिकाणी नव्हती. ते म्हणतात, "दासा हृदयी हनुमान । सदा करी तो कीर्तन ।।" महाराज कीर्तन करीत आहेत असा त्यांचा अनुभव होता. अहंभावाच्या अभावाने ते स्वभावे देवच झालेले होते. पण माझेपाशी अहंभाव नाही हा अहंभाव त्यांचे ठिकाणी नव्हता. ते म्हणतात, "गर्व नसे दासापाशी । वर्म पुसे सद्गुरुसी ।।" एवढी अभंगरचना त्यांचेकडून झाली. पण ते म्हणतात, "गोविंद म्हणे गुरुकृपेचे विज्ञान । बोलिलो संपूर्ण हनुमंतकृपे ।।" अशी निरहंकारिता कोठे पहावयास मिळेल का? "तया पाडे देही । जया मी आहे हे

सेचि नाही । निरहंकारिता पाही । तया नाव ।।" या अवस्थेत ते कडेपर्यंत होते. जे असताना ज्यांचे अस्तित्व जाणवते त्यांचे अस्तित्व त्यांचे जाण्याबरोबरच लोपते. पण जे असताना असून नसल्यासारखे असतात त्यांचे अस्तित्व पुढे शतकानुशकते जाणवत राहते. कारण ते विश्वात भरून राहिलेले असतात. ते गेलेले असत नाहीत. "तो अहंकाराते दंडुनी । सकळ कामू सांडोनी । विचरे विश्व होऊनी । विश्वाचिमाजी ।।" श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे ते स्वरूपाकार ज्ञानी आजही आपणात आहेत. त्या समर्थांच्या सामर्थ्याने हे अखंड उपासनाकार्य सुरू आहे. 'देवाचे वैभव सांभाळावे । न्यून पूर्ण पडोचि नेदावे । चढते वाढते वाढवावे । भजन देवाचे ।।' या समर्थ वचनाप्रमाणे अखंड उपासनेने चढते वाढते देवाचे वैभव वाढत आहे. श्रीदासराममहाराजांचा जन्मशताब्दी उत्सव प्रतिकूल परिस्थितीतही मोठ्या थाटात संपन्न झाला, हे त्याचेच द्योतक आहे. ती.अण्णांचे सुपुत्र चि. दीपकनी व त्यांच्या सहकार्यांनी अतोनात परिश्रम घेतले व हा नेत्रदीपक सोहळा संपन्न केला. त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. जन्मशताब्दी वर्षात श्रीदासराममहाराजांची समग्र ग्रंथसंपदा प्रकाशित करून, त्यापाठोपाठ श्रीमामामहाराजांची संपूर्ण अमृतवाणी (अभंगांची गाथा) प्रकाशात आणून त्याने मोठे औचित्य साधले आहे. मोठी समर्थ सेवा घडली आहे.

याकरिता माझे परमस्नेही ती.प.पू.बर्वे मास्तरांचे सुपुत्र श्री.माधवराव बर्वे यांचे मोठे सहकार्य लाभले आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

अशीच समर्थ सेवा, उपासना आम्हा सर्वांचे हातून अखंड घडावी अशी प्रार्थना भ.स. गुरुलिंगजंगमस्वामीमहाराज , भ. स. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भ.स. श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर, भ.स. श्रीमामामहाराज केळकर, भ.स. श्रीदासराममहाराज यांचे पवित्र चरणी या पुस्तक प्रकाशनाचे निमित्ताने करतो व येथेच थांबतो.

अनिलप्रभू रामराय केळकर

मनोगत.....

कोणताही ग्रंथ त्यात काही अपूर्वता असल्याशिवाय सज्जनांच्या मान्यतेला पोहोचत नाही. ती अपूर्वता असेल तर इतर अनेक दोष नजरेआड करून, सूज्ञ लोक त्या ग्रंथाची कदर बाळगतात. सामान्य लोकांना दासबोध फारच साधा व सोपा वाटतो. पण जाणती माणसे त्याचे महत्त्व ओळखून आहेत, म्हणून त्यांच्या घरी त्या ग्रंथाचे पूजन, वाचन व मनन होत आहे.

तेच भाग्य लाभेल अशी ही गोविंद-गाथा आहे. मुंगीला साखर खा असे सांगावे लागत नाही. तिला एकदा साखर सापडली की ती कसल्या भांड्यात आहे, किती दूर आहे याचा विचारच करीत नाही. साखरेच्या ढिगाऱ्यात सापडून ती मरून जाईल पण साखरेच्या कणाचा अभिलाष सोडणार नाही.

नामस्मरणासारखा सोपा मार्ग नाही असे सर्व साधुसंतांनी कंठरवाने सांगितले आहे ना? ज्यांचा साधुसंतांच्या शब्दावर विश्वास आहे, जे ईश्वर मानणारे आहेत, त्यांच्या हातूनसुद्धा व्हावे तसे नामस्मरण का होत नाही? हा चिंतनीय प्रश्न नव्हे का? त्याचे उत्तर फार थोडक्यात सांगता येण्यासारखे आहे. नामस्मरण हा अभ्यास आहे ही गोष्ट त्यांच्या गावीही असत नाही. घटकाभर गंमत म्हणून नामस्मरण करणे वेगळे व ती एक शक्ती आहे, तिचे एक कार्य आहे, तिचे एक फळ आहे हे सत्य कळून, समजून आणि उमजून नामस्मरण करणे ही गोष्ट वेगळी आहे. घटकाभर, केव्हातरी व लहर लागल्यास नामस्मरण करण्याचा काहीच उपयोग होत नाही, असे मला म्हणावयाचे नाही. पण शोभेसाठी हातात घड्याळ बाळगून, वरचेवर मनगट फिरवून ऐट दाखविणे हा काही घड्याळाचा खरा उपयोग नव्हे. लोक कौतुक करतात, प्रतिष्ठित समजतात हा त्यांना फायदा

होतोच. पण हातात घड्याळ बांधून गाडी चुकणे यासारखी दुसरी फजिती नाही. त्याचप्रमाणे चार लोकांनी आपल्याला नामधारक म्हणावे व आपल्या जन्ममृत्यूच्या खेपा चुकू नयेत यासारखा दुसरा अपाय नाही. हातातल्या बंदुकीचा बार उडवूनसुद्धा वाघानेच आपल्याला खाल्ले तर नेम कसला? त्या बंदुकीचा उपयोग काय ? ज्याच्या हातात बंदुक तो शूर असे काही समीकरण नाही. आपण आणि घड्याळ, शिकार आणि बंदूक यातील उपयोग करण्याचे कसब जीवाचे सार्थक करणारे आहे.

वेडेवाकडे वागण्यापेक्षा कसेही नामस्मरण करणारा बरा. त्याला फायदा होईल असे साधुसंतांनीसुद्धा म्हटले आहे. पण हातात परीस मिळाल्यावर जो त्याचा सुपारी फोडण्याकरिता उपयोग करतो, त्याची कीवच करावयास नको का? ज्याला राजा प्रसन्न झाला, त्याने त्याच्याजवळ फाटका सदरा मागायचा का? नामस्मरणाचे जे विलोभनीय फळ आहे, ते टाकून काहीतरी मिळवत बसू नये असे ज्याला मनापासून वाटते आहे, तो या गोविंद-गाथ्याची पारायणे करील, चिंतन करील, मनन करील, ध्यास घेईल. कैवल्य मंदिराचा कळस त्याच्या दृष्टीपथात येईल.

मामांनी अभंग का केले? याबाबत पंचसूत्री खालीलप्रमाणे देता येईल :-

१) नामावर लक्ष केंद्रित करणे.

२) नामाची गोडी उत्पन्न होण्यापुरते अध्यात्म निवडावे.

३) काव्यामुळे चिंतन सुलभ होते. अभंग आळवून म्हणता येतात.

४) साधनातील अडचणी समजून सांगाव्यात.

५) "पिंडी ते ब्रह्मांडी" हे दाखवावे. "ब्रह्मांडी ते पिंडी" नव्हे.

नरहर दामोदर दिवेकर

श्रीमामामहाराजकृत श्लोक

कसोटी नको पाहू तू दुजीयाची ।
सदा सर्वदा कीर्तनी काळ वेची ।।
कसा टिकणे कर्म आहे कठीण ।
कसा टिकला तो जगी धन्य जाण ।।१।।

मना दुसऱ्याचे नको गुण दोष ।
तया पाहता होय तो आत्मनाश ।।
जनी निंदिता वंदिता सम मानी ।
जगी तोचि तो धन्य हे सत्य जाणी ।।२।।

जिही श्वास उच्छ्वास हे रामनामी ।
सदा लाविले जाण कामी निकामी ।।
मना ये रिती साठवी नाम सार ।
मना जाण रे तो जगी एक थोर ।।३।।

मना रे जनी काम क्रोधासी सांडी ।
मना रे मनी रामनामास मांडी ।।
मना मीपणा सांडिता धन्य होय ।
प्रभूनाम हे मांडिता देव साह्य ।।४।।

मना साठविले जरी सर्व काही ।
अशक्यो असे त्यात काहीच नाही ।।
परी नाम ते एक अशक्य पाही ।
तया साठविता मिळे सर्व काही ।।५।।

म्हणोनि तुवा नाम हे साठवावे ।
सदा सर्वदा मानसी आठवावे ।।
मनाच्या मनालागी संतोषवावे ।
मनी जे आणि तेचि होई स्वभावे ।।६।।

श्रीराम जयराम जयजय राम ।
ऐसा काही धरोनिया नेम ।।
जो नित्य वदे सप्रेम ।
तो स्वयेचि श्रीराम होतसे ।।७।।



श्रीमामामहाराजकृत कविता

श्रीमामांनी बालपणी काही कविता केल्या होत्या. त्या कवितांपैकी खाली नमूद केलेली कविता चित्रमय जगत या मासिकात छापून आली होती. ही कविता सध्या उपलब्ध झाल्याने खाली दिली आहे.

होतो शयनी निजलो त्यावेळी स्वप्न एक मज पडले ।
मनमाता येवोनी हलवुनी लक्ष दे असे बोले ।।१।।
कां? काय असे वदता मम वदनी ठेवुनी स्वकर माता ।
तुज झोप बरी आली दुःखे वदली नको निजू आता ।।२।।
वेळ असे लज्जेची माझी लज्जा जरी न राखशील ।
तरी कोण दुजा राखो ऐसे धरू मानसी खरे बोल ।।३।।
कर्तव्य असे पहिले पुत्राचे जाण की स्वमाते ते ।
दुःख कमी करणेचे नाही रे स्वस्थ जाण निजणेचे ।।४।।
अज्ञान स्थितीमध्ये तुजसाठी सर्व दुःख सोसावे ।
झालासि सूज्ञ जरी तरी मातेने दास्य दुःख भोगावे ।।५।।
हे काय बरे वाटे सांग तुझ्या मानसी विचार करी ।
देहादीक नश्वर परी एक असे कीर्ती या जगात खरी ।।६।।
ऐकुनी वचन तियेचे धरीले मी चरण गाढ प्रेमाने ।
माफ करी अपराधा वदलो मातेसी प्रेम विद्ध मने ।।७।।
मातेने मज उठवुनी धरिले पुढती पुनः म्हणे मजसी ।
मी अंश असे भू चा त्या भूमातेसी का न तू स्मरसी ।।८।।
माता बाळपणाची परी भूमाता असेचि जन्माची ।
पोषक सर्व जगाची देई झडती तिला स्वकर्माची ।।९।।
इतक्यात स्वप्न सरले झालो जागा वळोनी जो पाहे ।
तो माता येवोनी प्रेमभरे हलवोनी या बाहे ।।१०।।

प.पू. सद्गुरु श्रीनारायणमहाराज वस्त्रद्रेकर



जया श्रीगुरु श्रीबळवंत झाले । म्हणोनी तपस्ये बळवंत धाले ।
चिमडासी शोभे परमार्थराजा । नारायणासी प्रणिपात माझा ।।

प.पू. सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस



जनी रामसेवा मनी रामसेवा । तया रामनामी जयाला विसावा ।
हनुमंत हे नाम साजे जयाला । नमस्कार साष्टांग माझा तयाला ।।

प.पू. सद्गुरु श्रीमामामहाराज केळकर



हनुमंत आदेश प्राणासमान । गोविंद नेमे करी नामकीर्तन ।
सेवा घडे सेवकबुध्दीने ही । पदांबुजी बालक राम राही ।।

प.पू. सद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर



सहज सिंहासनी राजा रघुवीर । सोऽहं भावे तया पूजा उपचार ।।

प.पू. सद्गुरु श्रीअण्णामहाराज केळकर



पिता सद्गुरु संत श्रीदासराम । ध्यानी मनी कीर्तन नित्यनेम ।
भक्तासी आधार वात्सल्यतेचा । अण्णा तुम्हांसी नमस्कार माझा ।।

प.पू. मातोश्री सौ. इंदिराबाई केळकर



नमो इंदिरामाऊली शांत मूर्ती । हनुमत्कृपे अंतरी थोर भक्ती ।
ध्यानीमनी एक गोविंद चित्ती । पदांबुजी अर्पिली प्राण ज्योती ।।

- श्रीदासराममहाराज

कै. सुमती रामकृष्ण बर्वे



-: अनुक्रमणिका :-

	विषय	अभंग क्रमांक
१)	नमन	१ ते ३
२)	भजन	४ व ५
३)	सद्गुरुपर	६ ते ३२
४)	सणपर्वकाळ	३३ ते २६८
५)	संसार	२६९ ते ३१६
६)	नरदेह	३१७ ते ३४९
७)	मन	३५० ते ४०२
८)	उपदेश	४०३ ते ९०१
९)	विवेक	९०२ ते ९२०
१०)	वैराग्य	९२१ ते ९३३
११)	भक्ती	९३४ ते १००६
१२)	नाम	१००७ ते ११९८
१३)	साधन	११९९ ते १२४९
१४)	साधकासाठी	१२५० ते १४१७
१५)	देव	१४१८ ते १४८६
१६)	अनुभव	१४८७ ते १५३९
१७)	संतपर	१५४० ते १६३२
१८)	प्रासंगिक	१६३३ ते १६४१
१९)	पौराणिक	१६४२ ते १६७३
२०)	पदे	१६७४ ते १८०८

२१)	अधिक	१८०९ ते १८८७
२२)	नित्यपाठ...	१८८८ ते १९०७
२३)	श्रीरामपाठ	१९०८ ते १९३९
२४)	शेवटी लिहिलेला अभंग	१९४०



नमन

नमन

१) रूप देखिल्या नयनी । सुख सुखा ये ज्याचेनी ॥१॥ तो हा श्रीराम सिंहासनी । सीता वामांकी जननी ॥२॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न । उभा हनुमान कर जोडून ॥३॥ बहुता पुण्ये ज्याची जोडी । हनुमंते लाविली गोडी ॥४॥ गोविंद तयाचा सेवक । पाहुनी सुखरूप देख॥५॥

२) नमो रामेश्वरा नमोजी सोमेशा । रेवणसिद्धेशा मरूळसिद्धा ॥१॥ नमो काडसिद्धा गुरुलिंगजंगमा । रघुनाथप्रिया रामराया ॥२॥ नमो हनुमंता गुरुनारायणा । मती द्या कीर्तना गोविंदा या ॥३॥

३) अगा देवराया करीतसे प्रार्थना । धाव नारायणा झडकरी ॥१॥ तुझीया सत्तेने शक्य ते अशक्य । अशक्य ते शक्य होत असे ॥२॥ हीन दीन दास येतो काकुळती । धाव गा श्रीपती पांडुरंगा ॥३॥

भजन

भजन

४) ज्ञानेश्वर माऊली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥१॥
नमन तियेचे पाऊली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥२॥
दीन जनांची साऊली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥३॥
भक्तजनास्तव धावली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥४॥
गोविंदासी पावली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥५॥

५) राम राम राम सीता राम राम राम ॥ध्रु॥
एक नाम उच्चारीता तुळण सहस्रनाम ॥१॥
रामनाम जपता सरे अंतरीचा काम ॥२॥
राममुखी राम गाता हृदयी सीताराम ॥३॥
राम म्हणता गोविंदासी वाटतसे आराम ॥४॥



सद्गुरुपर

सद्गुरुपर

६) मनी स्मरावे ऐसे काय । जेणे देवकृपा होय ॥१॥ ऐसा प्रश्न शिष्य करी । गुरू म्हणती अवधारी ॥२॥ अन्य काही करू नये । एक देवा विसरू नये ॥३॥ दास म्हणे नाम घेई । तेचि त्याचे स्मरण पाही ॥४॥

७) सद्गुरुवाचोनी नाही देवा भेटी । होवोनिया कष्टी फिरू नको॥१॥ देव कोठे आहे पाहतो कोणे ठायी । करीतसे कायी न कळे कोणा ॥२॥ गुरुकृपा होता कळेल ही मात । कृपा होय नित्य नाम घेता ॥३॥ सद्गुरुपदासी जाई बा शरण । खरे समाधान दास म्हणे ॥४॥

८) सद्गुरूवाचोनी भेटेना भगवान । तुटेना बंधन संसारीचे ॥१॥ देव जवळी असता फिटेना ती भ्रांती । प्रगटेना ज्योती अंतरीची ॥२॥ सद्गुरूंच्याकृपे दिसो येई देव । दृढ राहे भाव देवापायी ॥३॥ धन्य दिवस तोचि झाला सोनियाचा । सद्गुरुकृपेचा दास म्हणे ॥४॥

९) सद्गुरूवाचोनी गुप्त गुरूमार्ग । वर्मेवीण चांग कैसा कळे ॥१॥ वर्म जाणोनिया गुणवंत व्हावे । देवासी पहावे सूक्ष्ममार्गे ॥२॥ मग देवा तया सहज गाठीभेटी । होय उठाउठी सद्गुरूकृपे ॥३॥ नाम वर्म आहे संतांचिये हाती । दासासी प्रचीती सद्गुरूकृपे ॥४॥

१०) गुरुकृपा भाग्य थोर । भेटवील रघुवीर ॥१॥ गुरुकृपे निजसुख । स्वरूप साक्षात्कार देख ॥२॥ गुरुनामी ही प्रचीती । दास म्हणे सांगो किती॥३॥

११) गुरुकृपेवीण । कैचा भेटे भगवान ॥१॥ साधिलीया गुरुकृपा । मग देव आहे सोपा ॥२॥ गुरुकृपेचे अंजन । दासा भेटवी भगवान ॥३॥

१२) गुरुकृपा भाग्य थोर । वर्णवेना जे साचार ॥१॥ गुरुकृपेचे अंजन । भक्ता दावी भगवान ॥२॥ हरिनामी रंगविती । श्रीरंगाते भेटविती ॥३॥ योगी हनुमंत संत । दाविला परमार्थाचा पंथ ॥४॥ गुरुपदी काया गलीत । दासा अनुभवाची मात ॥५॥

१३) अक्षराचा अर्थ । जाणे सद्गुरु समर्थ ॥१॥ काय अक्षरे पन्नास । घोकोनिया वय नास ॥२॥ दोन अक्षरे कळता । सर्व विद्येचा पढियंता ॥३॥ अक्षर होवोनी राहिला । दास म्हणे तोचि भला ॥४॥

१४) अर्थ कळल्याची खूण । मुखी नाम उच्चारण ॥१॥ नाम अर्थाचाही अर्थ । घेता कळेल सर्वार्थ ॥२॥ नाम अर्थ प्रगटवी । सर्व संदेह हारवी ॥३॥ ऐसा अर्थरूप झाला । दास मान्य तो देवाला ॥४॥

१५) मोहिले अंतर मायेने सकळ । चित्ता तळमळ होय सदा ॥१॥ काही सुचेचिना देवाजीचे नाम । सदा राहे काम अंतरात ॥२॥ दास म्हणे काढी मायेची मोहिनी । आपुली घालोनी गुरुराया ॥३॥

१६) व्यर्थ मायेची मोहिनी । मोह जाता अधःपतनी ॥१॥ पडता सद्गुरु मोहिनी । देव दिसे क्षणोक्षणी ॥२॥ मन ठेवोनीया नामी । स्थिर होये पूर्णकामी ॥३॥ दास म्हणे गुरुमोहिनी । दूर नेई मोहातुनी ॥४॥

१७) जगी तारक ते काय । सांगा मज गुरुराय ॥१॥ नाम जीवासी तारक। नोहे कदापि मारक ॥२॥ अखंड आहे नाम कळा । वाचे गाई वेळोवेळा ॥३॥ नाम घेऊ नाम घेऊ । म्हणोनिया नको राहू ॥४॥ नाम भवसागरी तारक । दासा देव साह्य एक ॥५॥

१८) अविवेकाच्या गावी अवघीच व्यसने । आम्ही हरीकीर्तने धन्य झालो ॥१॥ विवेक हा श्रेष्ठ विचार हा श्रेष्ठ । ऐसे ज्ञाननिष्ठ बोलताती॥२॥ विवेक हा आत्मा पहावा सज्जनी । असे जया स्थानी पूर्णसुख ॥३॥ विवेक सागर सद्गुरू भेटले । अविवेक आटले गोविंदाचे ॥४॥

१९) गुरुपदकमली मनोभृंग । जडता श्रीरंगाचा रंग ॥१॥ रंगी मन गुंग झाले । चित्त चैतन्यी वेडावले ॥२॥ हनुमंते कृपा केली । हरिकथा प्रकट झाली ॥३॥ दास म्हणे गुरुनाम । भक्ता करी पूर्ण काम ॥४॥

२०) गुरूपदी मनोभृंग । जडता श्रीरंगाचा रंग ॥१॥ रंग राहिला अंतरी । तोचि भरला चराचरी ॥२॥ गोविंद म्हणे नाम । तेथे जीवासी आराम ॥३॥

२१) जेथे घडे चमत्कार । तेथे झडे नमस्कार ॥१॥ ऐसा जगाचा प्रकार । कोणी पुसेना अंतर ॥२॥ स्वरूपाचा साक्षात्कार । भरूनी चाललासे पूर ॥३॥ गुरू दाविती अंतर । दासा नाम चमत्कार ॥४॥

२२) श्रीराम जयराम । म्हणा जयजय राम ॥१॥ तरी होय पूर्णकाम। मना होवोनी आराम ॥२॥ रामनाम मुद्रांकित । गोविंद गुरूंचा अंकित॥३॥

२३) सद्गुरु महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥१॥ रामनाम साठवीत । त्यांचे महिमान अघटित ॥२॥ उडवोनि मनीची भ्रांत । स्वरूपी जडविती चित्त ॥३॥ गुरुनामी धरिता सोय । दास म्हणे तरणोपाय ॥४॥

२४) थोर गुरूचे महिमान । वाचे वर्णू शके कोण ॥१॥ संत सकळा आधार । संतयोगे सर्वेश्वर ॥२॥ नाही द्यावया उपमा । रामनामी जया प्रेमा ॥३॥ दास म्हणे गुरू संत । मूर्तीमंत भगवंत ॥४॥

२५) थोर सद्गुरू महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥१॥ कृपे देती निजठाव । भेटविती देव देव ॥२॥ शेषादिका ब्रह्मादिका । महिमा न कळेची देखा ॥३॥ गुरुनामी धरिता सोय । दास म्हणे तरणोपाय ॥४॥

२६) थोर सद्गुरू महिमा । वर्णवेना शेषा ब्रह्मा ॥१॥ गुरुलागी शरण जाता । जीवा शिवपद हाता ॥२॥ थोर संतांचे वैभव । नवल दाविती अनुभव ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरूनामी हे प्रचीती॥४॥

२७) सद्गुरूनामाचा महिमा । दावी देव देवोत्तमा ॥१॥ कळेना ते कळो येई । भेटेना ते भेटो येई ॥२॥ देव आहे कोणे ठायी । गुरूनामे कळो येई ॥३॥ दास म्हणे गुरूनाम । घेता होय पूर्णकाम ॥४॥

२८) पाठीराखा ज्याचा श्रीगुरू समर्थ । तयासी किमर्थ शोकचिंता॥१॥ अनन्य असता सद्गुरू भजनी । वाहे चिंता मनी साधकाची ॥२॥ जन्म मरण भय तयाचे चुकले । धरीता पाऊले सद्गुरूची ॥३॥ चिंता नाही जैसी मिळता चिंतामणी । सद्गुरू चरणी सर्व सिद्धी ॥४॥ घरी कामधेनू तया काय उणे । सद्गुरूच्या गुणे तैसे दासा ॥५॥

२९) गुरुगृही मौज भारी । दिसेना जे चराचरी ॥१॥ गुरू दाविती नवल । जे का परमार्थाची ओल ॥२॥ गुरुकृपा भाग्य थोर । गुरुकृपे साक्षात्कार ॥३॥ गुरूपदीचा आनंद । भक्ता भेटवी गोविंद ॥४॥ गुरुनामी खरी सोय । जड जीवा तरणोपाय ॥५॥ दासा हृदयी हनुमान। सदा करी तो कीर्तन ॥६॥

३०) पूर्ण केले पूर्ण केले । पूर्ण केले मनोरथ ॥१॥ घरा आले घरा आले । घरा आले हनुमंत ॥२॥ कृपा केली कृपा केली । कृपा केली आत्मबळे ॥३॥ अखंडित अखंडित । सेवा घेतली अखंडित ॥४॥ ठाव दिला ठाव दिला । आपुल्या पदी ठाव दिला ॥५॥ दासा हृदयी हनुमान । सदा करी तो कीर्तन॥६॥

३१) सद्गुरूंचे ज्ञान । जीवा उपेगा कारण ॥१॥ येर ज्ञान चित्रसेना। काय करील रक्षणा ॥२॥ गुरुज्ञान कृतीबोध । करी ब्रह्मज्ञान शोध ॥३॥ गुरूनाम गुरूज्ञान । दासा मिळे जो अनन्य ॥४॥

३२) सद्गुरू सारिखा असताना पाठीशी । काय विघ्न करी मज पुढे॥१॥ सद्गुरूकृपेचा असता पाठिंबा । काय करी ठोंबा अहंकार ॥२॥ सद्गुरूचे वारे भरले माझे अंगा । कर्तव्य या जगी काय आहे ॥३॥ दास म्हणे एक सद्गुरु असावा । नाही भय चिंता शोक तेथे ॥४॥

सण पर्वकाळ

३३) गुरुकृपेचा ध्वज बरवा । तोचि जाहला पाडवा ॥१॥ गुरुभक्तीची काठी बरी । ध्वज शोभे जियेवरी ॥२॥ नाम अमृत सेवन । हेचि लिंबाचे प्राशन ॥३॥ कृपायुक्त होता पाही । देव दिसे अंतर्बाही ॥४॥ ऐसा पाडवा साधिता । दासा देव येई हाता ॥५॥

३४) हरिनाम ध्वज श्रवणी चढवा । होईल पाडवा अनायासे ॥१॥ भावशुद्ध काठी भक्तीचे ते वस्त्र । वरी कलश पवित्र आनंदाचा ॥२॥ गुरुनामामृत लिंब हा सेवीत । दास अखंडित राम पदी ॥३॥

३५) बरवा जाहला पाडवा । नाम अंतरी चढवा ॥१॥ साधुसंग तो जोडावा । अहंभाव तो मोडावा ॥२॥ विक्रम हा गाजवावा । भजनरंग माजवावा ॥३॥ बरवा शोधोनि पहावा । दास म्हणे ओळखावा ॥४॥

३६) नरदेही सीतारामाचे भजन । ओळखावी खूण प्रतिपदी ॥१॥ नाम उच्चारावे पाऊला पाऊली । गुरुकृपे झाली प्रतिपदा ॥२॥ येथून आरंभ साक्षात्कार थोर । वर्ष तो रघुवीर वर्षारंभ ॥३॥ गुढीया तोरणे आनंदाची खूण । अमृतप्राशन दास म्हणे ॥४॥

३७) अयोध्ये माझारी आनंद भरला । राम जन्म झाला म्हणोनिया ॥१॥ रामाचा आनंद वर्णवेना कदा । आनंद मर्यादा चोहीकडे ॥२॥ रामाचा आनंद नामाचा आनंद । आनंदी आनंद अखंडित ॥३॥ रामानंद नामी लुटिता धन्य होत । काक भृशुंडी मात दास म्हणे ॥४॥

३८) रामाची नवमी जे रामनवमी । प्रकर्षती हा मी नवामाजी ॥१॥ सत्तावीसा नऊ जाता उरे शून्या । जया ते अनन्य ऐसे काय ॥२॥ आठामाजी एक तेचि ते नवमी । नसे मी तू तू मी हु तू तू हा ॥३॥ राम हरि राम राम हरि राम । जपता पूर्णकाम होय असे ॥४॥ पंधरा आणि बारा मिळूनी सत्तावीस । त्यात जाय आयुष्य म्हणती नऊ ॥५॥ ते ज्यांनी साधिले नवांकी ते आले । अठ्ठावीसी भले परमार्थी ॥६॥ नवांका परी जो असे या जगात । तयासी सतत राम दृष्टी ॥७॥ त्रेसष्ठ छत्तीस काहीही जहाले । बेरजेत आले नऊ परी ॥८॥ दास म्हणे नामी ऐसी ही प्रचिती । रामदास ख्याती होय त्यांची ॥९॥

३९) रामकृपा व्हावी जरी । हनुमान सेवा करी ॥१॥ रामनामी अर्पी प्राण । राम भेटवी आपण ॥२॥ जेणे योगे शक्ती युक्ती । अनायासे मिळे मुक्ती ॥३॥ दास म्हणे प्राण देही । वायुपुत्र शोधुनि पाही ॥४॥

४०) जीव शिवा पलीकडे । अक्षयरूप ते चोखडे ॥१॥ जीव वंध्यापुत्र पाही । शीव व्यापक सर्वाठायी ॥२॥ गोविंद म्हणे परमात्मा । तृतीयरूप निरूपमा ॥३॥

४१) अक्षयी ते भले । बुद्धी जडता चांगले ॥१॥ क्षय नाही जया पाही । अक्षयी ते नांदे देही ॥२॥ द्वैतभाव नुरे जेथे । अद्वय पदी राहे तेथे ॥३॥ हेचि अक्षयी तृतीया । दासा नामे ये प्रत्यया ॥४॥

४२) अक्षयी ते भले । बुद्धी जडता चांगले ॥१॥ तेचि अक्षयतृतीया। तिच्यामाजी ये प्रत्यया ॥२॥ नित्य एक गुरुनाम । दासा करी पूर्णकाम ॥३॥

४३) नारद तुंबर । करिती गायन सुस्वर ॥१॥ हाती घेवोनीया वीणा। सदा देत असे ताना ॥२॥ दास म्हणे नारायण । होय नामेची प्रसन्न॥३॥

४४) दशहर दशहरा । बोध घ्यावा हा अंतरा ॥१॥ दशप्राण समर्पण। हेचि गंगेचे वायन ॥२॥ गंगा असे कीर्तनात । लोक नेणती भ्रमात॥३॥ त्रिवेणीचा ओघ जेथ । दास बुडी देत तेथ ॥४॥

४५) दश अपराध हरा । हरूनी तोषवावे हरा ॥१॥ नामगंगेत मज्जन । होता भेटे भगवान ॥२॥ दशेंद्रिये नामी देणे । दशहर खूण जाणे ॥३॥ नाममहिमा वाढविला । म्हणुनी संता निंदी वहिला ॥४॥ दास म्हणे अपराध । जाता नाम उरे सिद्ध ॥५॥

४६) शुद्ध झालिया अंतर । मग भेटेल ईश्वर ॥१॥ अंतर शुद्धी अंतर स्नाने। नोहे तीर्थाचे भ्रमणे ॥२॥ नाम गंगा ह्रन्मंदीरी । बुडी देता अभ्यंतरी ॥३॥ दास अंतरी पावन । होता भेटे भगवान ॥४॥

४७) नामाचा महिमा । वाढविला नाही सीमा ॥१॥ म्हणुनी संतासी निंदणे । ऐसा अपराध जाणे ॥२॥ गोविंद म्हणे न करावा । संतपदी माथा ठेवा ॥३॥

४८) हरिहर ते अभेद । तयामध्ये नाही भेद ॥१॥ आत घेता तोचि हरी । जाता हरचि निर्धारी ॥२॥ गोविंद म्हणे याचा विसर । तोचि अपराध घोर॥३॥

४९) हरिहरा भेद दुजा अपराध । घेवोनिया बोध दूर करी ॥१॥ आत घेता हरि सोडिता तो हर । भिन्नत्व विचार आहे कोठे ॥२॥ हरिहरामाजी एकनाम ठसा । अभिन्न हा कसा तरी कळे ॥३॥ तोचि शिव विष्णु प्रसिद्ध जगात । उरली ते मात दास म्हणे ॥४॥

५०) गुरूची अवज्ञा । तिजा अपराध प्राज्ञा ॥१॥ गुरूवचन प्रमाण। तेचि खरे हीत जाण ॥२॥ गोविंद म्हणे गुरूवचन । रामनाम त्याची खूण ॥३॥

५१) सद्गुरूंची हो अवज्ञा । तीजा अपराध प्राज्ञा ॥१॥ ब्रह्मरूप गुरूदेव । ऐसा पहावा दृढभाव ॥२॥ जीवा सांगातीने सेवा । रामनामे मोक्ष जीवा ॥३॥ रामरूपी जे रंगले । रामरूपाकार झाले ॥४॥ त्यांची आज्ञा न पाळणे । अपराध दास म्हणे ॥५॥

५२) वेदशास्त्र निंदणे । चौथा अपराध जाणे ॥१॥ वेदशास्त्र नामकृती । निंदिता कैची देव प्राप्ती ॥२॥ गोविंद म्हणे नामी भाव । न धरिता सर्व वाव ॥३॥

५३) नाम वर्णन प्रशंसा । भाव मनी धरूनी ऐसा ॥१॥ कैसा पावे पैलपार । दगड बांधोनी साचार ॥२॥ गोविंद म्हणे नाम धरिता । दगड तरेल सर्वथा ॥३॥

५४) नाम सकळासी तारी । नामा ऐशी नाही थोरी ॥१॥ महिमा ऐकोनिया ऐसा । म्हणे सर्वही प्रशंसा ॥२॥ ऐसे मानियले जीवे । दोष पाचवा स्वभावे ॥३॥ नाममहिमा जाणे कोण । अनुभवी ज्ञानावीण॥४॥ गोविंद म्हणे नाम घेता । जीव तरती सर्वथा ॥५॥

५५) नामे पाप जाणे । म्हणुनी पापची करणे ॥१॥ ऐसे काही नका करू । तरीच होईल उद्धारू ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । तरीच पापाची निष्कृती॥३॥

५६) नाम घेता पाप जाते । पाप केल्या काय होते ॥१॥ बुद्ध्या आचरिता पाप । होत असे वज्रलेप ॥२॥ सहावा जाणोनिया दोष । नाम उच्चारी निर्दोष ॥३॥ गोविंद म्हणे सांगो किती । तरीच पापाची निवृत्ती ॥४॥

५७) व्रतदान नामासमान । ऐसे समदर्शीपण ॥१॥ हाचि जाणे सातवा

दोष । ओळखोनी हो निर्दोष ।।२।। गोविंद म्हणे नाम सरी । कोणा नव्हे बरोबरी।।३।।

५८) इतर साधना समान पाहे । नामसाधन हे आहे ।।१।। ऐसे मानणे हा दोष । टाकीताची हो निर्दोष ।।२।। येर साधने कष्ट देख । नाम सोपे अमोलिक ।।३।। ऐसे नाम ओळखावे । उच्चारावे जीवेभावे।।४।। सात दोष वजा जाता । दास म्हणे तीन आता ।।५।।

५९) जो का अभाविक पाही । श्रवण गोडी ज्यासी नाही ।।१।। ऐसीयासी उपदेशणे । हा तो आठवा दोष जाणे ।।२।। गोविंद म्हणे अभाविक । नका होऊ व्हा भाविक ।।३।।

६०) नाममहिमा आयकिता । प्रिती नुपजेचि चित्ता ।।१।। हाचि नववा दोष पाही । टाकुनि नामी प्रेमी राही ।।२।। गोविंद म्हणे नाम । हेचि रूप जाणे परम ।।३।।

६१) नाममहिमा आयकिता । गोडी नुपजेचि चित्ता ।।१।। मीपण प्रपंच अभिमाने । देवा नामा विसरुनी जाणे ।।२।। हा तो नववा दोष पाही । उल्लंघोनी पैल जाई ।।३।। उठाउठी नामोच्चार । होता भेटी दे ईश्वर ।।४।। दास म्हणे नऊ जाता । एक शेवटीचा आता ।।५।।

६२) संत संगती न करी । चुका तैशाचि अंतरी ।।१।। ऐसा दोष कैसा जाई । संत संगतीत राही ।।२।। गोविंद म्हणे चूक नुरे । संत संगतीत बरे ।।३।।

६३) संत संगती न करी । चुका तैशाच अंतरी ।।१।। आचरण दोषयुक्त। सावधान नाही चित्त ।।२।। तरी नामस्मरण पाही । दोषमुक्त होत नाही।।३।। जाणावा हा दशम दोष । दश टाकिता निर्दोष ।।४।। नामगंगा

हृदयांतरी । प्रगटोनी भेटे हरी ॥५॥ दश निघोनिया जाता । दशनामी समर्पिता ॥६॥ दशहर पूर्ण पाही । दास बुद्धी देव होई ॥७॥

६४) नाम अंतरात आहे । कंठी दृढ धरूनी राहे ॥१॥ देहादिक नाशीवंत । देव तगतो शाश्वत ॥२॥ कर्का ऐसे धरणे पाही । कर्क संक्रमण देही ॥३॥ बाह्य अंतरी धरीना । दासा संक्रमण जाणा ॥४॥

६५) आनंदाचे धाम ओळखोनी घ्यावे । नाम उच्चारावे तया ठायी ॥१॥ ऐशिया भजने देव येईल घरा । सोडवील फेरा संसाराचा ॥२॥ कामधामामाजी ठेवोनिया मन । करिता भजन दुरे देव ॥३॥ खरे ओळखिता खोटे कळो येई । संता शरण जाई मग कळे ॥४॥ ज्याचे नांव घेसी तो देव निजेला । पहावे तयाला दास म्हणे ॥५॥

६६) दहा इंद्रिये आणि मन । अंतर्मुख ती होऊन ॥१॥ वसती देवपदा पाशी । तेचि जाणा एकादशी ॥२॥ निजत्वासी देव येती । जग शयनी बोलती ॥३॥ देव नाही झोप घेत । दासा नामी जागवीत ॥४॥

६७) देव निजेला निजेला । कोणी ओळखीना त्याला ॥१॥ देव सदा सर्व करी । कैचा निद्रिस्त अंतरी ॥२॥ निज प्रयत्ने साधीत । माया भुलवी क्षणात ॥३॥ नामे निजत्व अभंग । दासा बरवा पांडुरंग ॥४॥

६८) पंढरी निवृत्ती ॐकाराचे स्थान । रुक्मिणी-रमण मायबाप ॥१॥ तेथे वास घडे मुक्ती सुख जोडे । नामाचे पवाडे संत गाती ॥२॥ ते सुख आगळे इंद्रिया वेगळे । झालिया निराळे नामी मिळे ॥३॥ प्रवृत्तीत वास सदा दुःख त्यास । हाचि सासुरवास दास म्हणे ॥४॥

६९) प्रवृत्ती सासर सोडिता सुटेना । जीवासी लाभेना सुख कदा॥१॥ सासरीचे सुख पाण्यावरील लोणी । जीव हा अज्ञानी कादू पाहे ॥२॥

निवृत्ती माहेर मज दावी देवा । हेचि एक जीवा आस बहू ॥३॥ सासर माहेर देहीच दाविले । दासे अनुभविले गुरूकृपे ॥४॥

७०) पंढरीची वारी । जन्ममरण निवारी ॥१॥ वारियात असे वारी । देई निजत्व ते करी ॥२॥ दास म्हणे ऐशी वारी । भगवंत अंगिकारी॥३॥

७१) वारी करिताची चुके जन्ममरण वारी । ऐशी वारी करी बा रे जाई तू पंढरी ॥१॥ पुंडलिक पाटील नामे राहे पंढरीसी । तया संगे जाता भेटे विठ्ठल मोकासी ॥२॥ पंढरीचा मोकासी हृदय निवासी । दर्शनेची चुकवील फेरी ही चौऱ्यांशी ॥३॥ ऐशी वारी साधुजनी साधियेली बरी । दास म्हणे म्हणुनी त्यांचा देव हा कैवारी ॥४॥

७२) जाई राऊळासी देव पाहण्यासी । का बा विसरलासी विठ्ठलासी ॥१॥ शोधी रे राऊळ नको लावू वेळ । पाही तू गोपाळ सर्वकाळ ॥२॥ राऊळासी जाता सुख होय चित्ता । भेटे अवचिता जगत्पिता ॥३॥ राऊळ हृदय प्रवेशाची सोय । दासाचा उपाय संतपाय ॥४॥

७३) एकादशी व्रतसार । करिता धन्य होय नर ॥१॥ खरी साधी एकादशी। जेणे भेटी श्रीहरीसी ॥२॥ दहा इंद्रिये आणि मन । नामामाजी करी लीन ॥३॥ तेथे घडे उपवास । एकादशीचा दिवस ॥४॥ उपवास घडता पाही । देव साक्षात्कार होई ॥५॥ देव अंतरी निजेला । दास म्हणे पाही त्याला ॥६॥

७४) समजता नेम व्रत एकादशी । तया ऋषिकेशी जवळीच॥१॥ नाम वर्म थोर ओळखावे सार । भजन साचार अंतरीचे ॥२॥ गुरूकृपे सर्व कळोनिया येई । चरणी शरण जाई दास म्हणे ॥३॥

७५) हरिनामी हरिदिनी । थोर साधीली संतांनी ।।१।। करिता एकादशी व्रत । देव भेटेल अनंत ।।२।। हरिदिनी उपवासी । वर्म पुसावे संतासी।।३।। बाह्याचारही साधेना । दास म्हणे नाम घे ना ।।४।।

७६) हरिनाम वाणी हेचि हरिदिनी । साधिली सज्जनी साधुसंती।।१।। सद्विचार अन्न घेती तये दिनी । आचार साधनी साधिताती।।२।। एकविध मन श्रीहरि चरणी । घडे हरिदिनी दासालागी ।।३।।

७७) दहा जाणावी इंद्रिये । एक मन त्यात स्वये ।।१।। अंतर्मुख साधनेसी । मिळणी नामी एकादशी ।।२।। हरिदिनीचा सोहळा । देव प्रगट दावी डोळा ।।३।। एकादशी उपवासी । दास म्हणे वर्म घेसी ।।४।।

७८) सर्वस्वेसी वीट । वरी उभा देव नीट ।।१।। नाम घेता अंतःकरणी । वीट कळो येई जाणी ।।२।। गोविंद म्हणे आधार । वीट जाणावी साचार ।।३।।

७९) महद्भूत ओळखिता । तेथे कैची भय चिंता ।।१।। पंचभूतांचे हृदयी । महद्भूत सर्वाठायी ।।२।। नाद बिंदू पडता गाठी । नामे महद्भूत भेटी ।।३।। महद्भूते झडपिता । सर्व सिद्धी येई हाता ।।४।। दास म्हणे अनुभव घेई । देही नीट वाटे जाई ।।५।।

८०) महद्भूत आत्मा ओळखून घ्यावा । तुटेल हा गोवा संसाराचा ।।१।। सर्वभूतामाजी वास असे ज्याचा । ओळखिता साचा कृतकृत्य ।।२।। दास म्हणे नामे महद्भूत भेटी । पडेल जै भेटी नादबिंदा ।।३।।

८१) ऐका द्वादशीची कथा । सर्वसार परमार्था ।।१।। जडता द्वादशीचा

छंद । देव भेटेल गोविंद ॥२॥ दहामाजी दोन राहे । द्वादशीचा छंद पाहे ॥३॥ दोन रामनाम सार । दासा भेटवी ईश्वर ॥४॥

८२) नाम परिपूर्ण । काही नुरवी अपूर्ण ॥१॥ पूर्णतेचा सोहळा । संती देखियेला डोळा ॥२॥ हेचि गुरूंची पौर्णिमा । गोविंद म्हणे निरुपमा ॥३॥

८३) श्रावण श्रावण । गुळातुपाचा रावण ॥१॥ ऐसे म्हणती जन लोक । वाटे तयांचे कौतुक ॥२॥ श्रावणात करणे श्रवण । हेचि परमार्थ साधन ॥३॥ अखंड नामाचे साधन । साधनमास दासा खूण ॥४॥

८४) श्रावणाचा मास योग्य श्रवणास । काय पक्कानास केला देवे॥१॥ एक हरिभक्ती बैसोनी एकांती । नाम श्रवणांती सुख होय ॥२॥ श्रवण करोनी आकळीता ध्यानी । तरीच श्रवणी सुख दासा ॥३॥

८५) भवारण्यामाजी सर्वत्र विखार । स्वरूप मंदिर तेथे नाही ॥१॥ विषयाचे विष उग्र ज्याचे फार । सर्व चराचर आकळीत ॥२॥ मोह लोभ रूप जयाचे शरीर । मंदिरासी फेर त्याचा असे ॥३॥ वासुकीचे विष असे भयंकर । शीतल शंकर रामनामे ॥४॥ गुरु मांत्रिकाचा मिळताचि मंत्र । दासासी विखार अमृताचे ॥५॥

८६) प्रथम मंडल मायेचा विस्तार । मोह सर्प घोर जागृतीसी ॥१॥ द्वितीय मंडल माया स्वप्नाकार । तेथ सर्प घोर लोभ रूप ॥२॥ तृतीय मंडल माया सूक्ष्मरूप । तेथे घोर सर्प वासुकी हा ॥३॥ तुरीय स्थान खूण अनन्य भजन । अनंत रूप जाण दिसतसे ॥४॥ गुरुनाम योगे जाता तुरीयेसी । रक्षी अनन्यासी दास म्हणे ॥५॥

८७) पाचवे मंडल माया ब्रह्माकार । दिसे शेषावर अनंत तो ॥१॥ उन्मनीच्या स्थानी दृष्टी दिसो आला । गारूड कोणाला न कळे त्याचे॥२॥ जगाचा गारूडी कृपा भक्तावर । अभिमान थार उरो नेदी ॥३॥ गुरूनामे दास गुरुपदी राही । गारूड नवलाई सद्गुरूची ॥४॥

८८) जन्म मरण झोला काय घेसी फेर । कुसुत्राचा दोर धरोनिया ॥१॥ सुखदुःख भोवळ येईल गरगरा । सोसाटे हा वारा अज्ञानाचा ॥२॥ संसाराचा झोला घेता वाटे बरे । पहाता विचारे नको वाटे ॥३॥ गुरुनाम झोला सूत्र धरिता बरे । दासालागी खरे समाधान ॥४॥

८९) संसाराचा झोला काय घेसी फेरा । कुसूत्राचा दोरा धरोनिया ॥१॥ सुखदुःख भोवळ येईल गरगरा । सोसाटे हा वारा अज्ञानाचा ॥२॥ हरिनाम झोला उन्मन मंदिरी । आनंदाची फेरी तेथे घ्यावी ॥३॥ उन्मन मंदिर देहबागे आत । दासा कळे मात गुरूकृपे ॥४॥

९०) उन्मनी माझारी नागरूप दावी । गारूडी हा पाही थोर असे ॥१॥ देवाचे गारूड कळेचिना कोणा । नेती नेती जाणा वेद बोले ॥२॥ नागाची पंचमी साधियेली दासी । वृत्ती नाही ऐसी जव झाली ॥३॥

९१) उन्मनीचे स्थानी देही । हरिनाम झोला पाही ॥१॥ देह बागे आत । शोधी उन्मनीचा प्रांत ॥२॥ तयामाजी झोके घेता । पंचमीची सार्थकता ॥३॥ दास म्हणे गुरुकृपा । चुकवी जन्ममरण खेपा ॥४॥

९२) सर्व शक्तीची जे शक्ती । प्रगटता एकचित्ती ॥१॥ तियेलागी आकळणे । तेचि मुख्य गोष्टी जाणे ॥२॥ यासी सुगम उपाय । दासा नामी तरणोपाय ॥३॥

९३) देव सागर सागर । उरो नेदी सहागर ॥१॥ स्वस्वरूपी लावी भरती । जीवपणाची ओहटी ॥२॥ उन्मन लाटांचा कल्लोळ । न संडी मर्यादा केवळ ॥३॥ दास म्हणे नाम इंदू । ओळखिता देव सिंधू ॥४॥

९४) शिवसागरा माझारी । जीव अहंभाव निर्धारी ॥१॥ नारीकेल समर्पिता । पूर्ण सुखीया तत्त्वता ॥२॥ सर्व मायेचा पसार । तया पैल रत्नाकर ॥३॥ नामे जीव शिव ऐक्य । दासा आनंद विशेख ॥४॥

९५) साताचियेवरी आठव्याचे स्थान । हेचि ओळखण आठव्याची ॥१॥ अष्टविध वेध जयाचा सुटला । वेध हा लागला आठव्याचा ॥२॥ धन्य वसुदेव धन्य ती देवकी । जगास देव की तीच दोन्ही ॥३॥ कंस अहंकार निवटाया कारण । अवतार श्रीकृष्ण दास म्हणे ॥४॥

९६) आठवी रे आठवी रे । आठ विरे हरि आठवी रे ॥१॥ पालक तो पालक तो । पालक तो जगपालक तो ॥२॥ आकाशी पाताळी । सर्व स्थळी रक्षक तो ॥३॥ संतसंगे संतसंगे । संतसंगे साधेल तो ॥४॥ स्तवितचि जा स्तवितचि जा । दास म्हणे भेटी देतो ॥४॥

९७) कृष्ण आहे आत्मदेही । मीपणाचे पैल पाही ॥१॥ सर्व जगाते पोशिता । विश्वासाने येई हाता ॥२॥ गोविंद म्हणे ते अष्टमी । अष्ट विसरावे नामी ॥३॥

९८) अष्ट विसरावे नामी । तेचि गोकुळअष्टमी ॥१॥ नवल गोकुळीची कथा । सर्व सार परमार्था ॥२॥ कर्षयति तो श्रीकृष्ण । दासा बोधाचे लक्षण ॥३॥

९९) साठवी रे साठवी रे । साठ विरे साठ विरे ॥१॥ आठवी रे आठवी रे । आठ विरे आठ विरे ॥२॥ प्रचीती ही प्रचीती ही । दास म्हणे नामी बरे ॥३॥

१००) परमार्थाचे लक्षण । आठव्याची आठवण ।।१।। आठ विसरोनी जावे । आठव्या ते आठवावे ।।२।। आठव्या ते आठविता । चाले काळावरी सत्ता ।।३।। आठवा कृष्ण अवतार । दास नामी साक्षात्कार ।।४।।

१०१) आठव्याने आठविता । आठवा तो येई हाता ।।१।। आठवा हरि तुजपाशी । शोधी घेऊनी मनासी ।।२।। आठवाने आठविता । मग चित्ता नुरे चिंता ।।३।। दासा नाम आठवण । भेटवील भगवान ।।४।।

१०२) अष्ट विसरावे नामी । तेचि गोकुळअष्टमी ।।१।। आठाचिये कुळी पाही । कृष्ण वसे सर्वाठायी ।।२।। नवल तयाचा प्रकाश । मने निघता उन्मनीस ।।३।। त्याचे नामी रिघता पायी । दास तदाकार होई ।।४।।

१०३) कृष्ण मुरलीचा ध्वनी । श्रवणी ऐकियेला कोणी ।।१।। तोचि अविनाशी मुक्त । देही कुंजवनी जात ।।२।। कु,स नाही जन्म तेथे । सदा नामघोष जेथे ।।३।। राधाकृष्णाचे दर्शन । दासा मनी समाधान ।।४।।

१०४) घुम घुम घुम घुम घुम घुम घुम घुम डेरे घुमती । नादमयी होऊनी जाता पाहे तो श्रीपती ।।१।। कृष्णमय झाली राधा राधामय कृष्ण । नादमय होऊनी पहाता कळती अभिन्न ।।२।। गोविंदाच्या स्वरे बोले दास हा गोविंद । कलाज्योती अनुभव घ्यावा आधी नाद बिंद।।३।।

१०५) स्वयमेव टाळी देही । तेचि हरतालिका पाही ।।१।। सखी आणि पार्वती । दोनी एकरूप होती ।।२।। गोविंद म्हणे टाळी । एक नाम सदाकाळी ।।३।।

१०६) हाती टाळी मुखी नाम । आणिक नाही दुजे काम ।।१।। हेचि

बुद्धीने करणे । हरितालिका व्रत जाणे ॥२॥ गोविंद म्हणे देख । अंतर्बाह्य वृत्ती एक ॥३॥

१०७) तप करिता नाना रीती । नोहे नोहे शिवप्राप्ती ॥१॥ तप आचरिले कोणे । सखी आणि पार्वतीने ॥२॥ तप प्रकाशवी बुद्धी । तप देहाचिये शुद्धी ॥३॥ हाती टाळी नाम धरी । हर तालिका तेचि बरी ॥४॥ तपाचे जे तप नाम । दासा भेटवी शिव परम ॥५॥

१०८) नाही कळला आधार । तव प्राणी निराधार ॥१॥ आधारीचा देव पाही । साधकासी साह्य होई ॥२॥ गुरुकृपे नाम घ्यावे । मूलाधार स्थानी जावे ॥३॥ मंगलमूर्तीचे दर्शन । कृपे दासा स्थिरपण ॥४॥

१०९) चतुर्दळस्थानी जाता । गणेशचतुर्थी ये हाता ॥१॥ तेचि आधारचक्र स्थान । तेथे असे गजानन ॥२॥ गोविंद म्हणे कृपा होता । विघ्न नुरेचि सर्वथा ॥३॥

११०) आधी मन घेई हाती । गजवदन प्रचीती ॥१॥ आधी मनाते साधिता । नुरे विघ्नाची ती वार्ता ॥२॥ देहामाजी मने दोन । आधी मन गजवदन ॥३॥ गुरूनामे हाती येता । नुरे बाह्य मन आता ॥४॥ तुरीय स्थानी अनुभव खूण । दासा प्रसन्न गजानन ॥५॥

१११) गणेशाची ओळखण । अक्षररूप त्याची खूण ॥१॥ गुरूकृपे कळो येई । निःशब्दाचा शब्द देही ॥२॥ अ कार उ कार म कार । उमगता पैल पार ॥३॥ दोन मातृका अंतरी । दासा नामी कळता थोरी ॥४॥

११२) हे जाणावी तेचि गणेशचतुर्थी । पहाणे गणपती चतुर्दळी ॥१॥ पार्वती कुमराचे मस्तक छेदुनी । गजानन लावुनी गज हा रक्षी ॥२॥ विघ्न निवारिता हाचि असे एक । गजानन देख सर्वकाळी ॥३॥ अद्वय

प्रकाशे सुंदर शोभला । ॐकार दावीला प्रगटची ॥४॥ चार वाणी अतीत चार देहातीत । चार अवस्थातीत अखंडित ॥५॥ निर्गुण आरंभ सगुणाचे पैल । विरळा उमगेल निजत्वात ॥६॥ तोचि मंगलमूर्ती सिद्धिविनायक । पूर्ण काम देख दासा करी ॥७॥

११३) जाई वेगेसी मंगलमूर्ती पाहणेसी । मायापटल दूर करूनी पाही नयनेसी ॥ध्रु॥ गुरुला शरण जाऊनी जाई मूलाधारेसी । मंगलस्थानी मंगलमूर्ती पाही नयनेसी ॥१॥ मार्ग बिकट परी सुलभ होतसे गुरुकृपा ऐसी । चित्त दुर्वांकुर अर्पण करीता प्रसन्नता त्यासी ॥२॥ अभयहस्ती अभय देतसे साधक वर्गासी । स्वानंदाचा मोदक देऊनी सुखवी गोर्विंदासी ॥३॥

११४) मना आकळिता मुनी । हृषिकांचा ऋषी घणी ॥१॥ हेचि ऋर्षीची पंचमी । मन बुद्धी जडवी नामी ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती। गुरुनामी हे प्रचीती ॥३॥

११५) मनशुद्धी मुनी पाही । हृषिक शुद्धी ऋषी होई ॥१॥ पंच मातृकात मन । ऋषिपंचमी उन्मन ॥२॥ ऐशा मनी देव राही । दास विघ्नहर होई ॥३॥

११६) अंत नाही ज्याला । अनंत तो पाही भला ॥१॥ येर सकळा अंत आहे । अनंत तो तगुनी राहे ॥२॥ चौदा गाठी त्याची खूण । चौदा घ्यावी ओळखून ॥३॥ दास म्हणे पाही देही । नामे अनंत ये सोई ॥४॥

११७) चौदा चक्रीचा अनंत । ओळखोनी घ्यावा सत्य ॥१॥ चौदा गाठी त्याची खूण । चौदा घ्यावी ओळखून ॥२॥ गोविंद म्हणे तो अनंत । नामे साठवा हृदयात ॥३॥

११८) साधक होवोनी । राहे ज्ञानेश्वरी पारायणी ॥१॥ थोर ज्ञानेश

महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥२॥ गेविंद म्हणे जयंती । ज्ञानेश्वरीची अपार ख्याती ॥३॥

११९) हरिनामाचे साधनी । देही प्रगटवी भवानी ॥१॥ नवविध एकपणी । उपासना आचरणी ॥२॥ गोविंद म्हणे दीपमाळ । तत्त्वखुणा ते केवळ ॥३॥

१२०) नवविध उपासना । हेचि नवरात्र जाणा ॥१॥ नवामाजी एक वृत्ती । हेचि नवरात्र पद्धती ॥२॥ गोविंद म्हणे पेरी अनेक । परी ऊस बोलिजे एक ॥३॥

१२१) भवापासोनी नेणारी । माया ब्रह्म स्वरूपधारी ॥१॥ आदिमाया ते भवानी । साक्षात्कार स्वरूपिणी ॥२॥ मारी मोह महिषासुर । भक्तालागी सुखकर ॥३॥ आदिशक्ती प्रगटता । सर्व शक्ती येती हाता ॥४॥ संत पहाती निर्गुणी । शिव भवानी रूद्राणी ॥५॥ कृपा जियेची लाभता । दास मुक्तचि तत्त्वता ॥६॥

१२२) नामे ह्रन्मंदिरी प्रगटता भली । स्थापना ते भली आदिशक्ती ॥१॥ स्वरूप ते नीज साक्षात्कार गूज । जेथे मोहबीज नुरतसे ॥२॥ मोह महिषासुर मर्दाया कारण । अवतार खूण देहामाजी ॥३॥ नवविधा भक्ती नवरात्र जाण । साधिती सज्जन दास म्हणे ॥४॥

१२३) नवल प्रभा ही भरली लोचनी । ते सुख साजणी काय सांगू ॥१॥ अष्टधा प्रकृती जेथुनी जन्मली । महालक्ष्मी देखीली मूळ माया ॥२॥ प्रतिपदी नाम प्रतिपदा भली । द्वितीया साधिली श्रवणयोगे ॥३॥ तेचि मनन होता तृतीया साधिली । चतुर्थी शोभली चित्तसाम्य ॥४॥ बुद्धीमाजी प्रभा भरता पंचमी । षष्ठी तेचि ऊर्मी

अहंतेची ॥५॥ षड्वृत्ती गेली क्षणात निमाली । प्रसन्नता आली मनामाजी ॥६॥ सात चक्री तेज भरता सप्तमी । भरता रोम रोमी अष्टमी ते ॥७॥ देहघटामाजी फुंकिता फुंकर । प्रसन्नता साचार महालक्ष्मी ॥८॥ ऐशी उपासना साधिली तत्त्वता । गुरुकृपा होता दास म्हणे ॥९॥

१२४) अनादि निर्गुण प्रकाश रूपिणी । ते कुळ स्वामिनी जगदंबा ॥१॥ तेचि विठाबाई सत्तारूपे देही । विश्वासेसी पाही गुरुकृपे ॥२॥ मायाधार ईश्वरी शुद्ध कमळी । पंचप्राण मेळी ललिता असे ॥३॥ होवोनी गोंधळी उदो शब्द धरी । महालक्ष्मी बरी प्रगट दिसे ॥४॥ नवखंडे नवमी आशा नुरे देही । दशमी पुढे पाही विजयाची ॥५॥ तोचि उत्तम दिन पवित्र दसरा । नाम कंठी धरा दास म्हणे ॥६॥

१२५) सत्तारूप सर्वांठायी । चित्शक्ती हे व्यापुनि राही ॥१॥ तिचे स्वरूप उमगता । मग कैची भय चिंता ॥२॥ गोविंद म्हणे सत्तानाम । ओळखिता पूर्ण काम ॥३॥

१२६) विषयातूनी निघे मन । तेचि जाणावे उन्मन ॥१॥ उन्मन ध्यानी अखंडता । पंचमीची खूण वार्ता ॥२॥ गोविंद म्हणे रामनाम । ललित वाङ्मय निष्काम ॥३॥

१२७) पंचप्राण पंचवृत्ती । पंचमातृकात विरती ॥१॥ हेचि ललितापंचमी । जाळीत काया लळीत नामी ॥२॥ ऐसे अनुभव गूज । दास म्हणे भेटे निज ॥३॥

१२८) सहजनाम उदो शब्द । उदय अस्त तो निःशब्द ॥१॥ कळो येई गुरुकृपे । अनुभव घेई तपे ॥२॥ गोविंद म्हणे चित्शक्ती । अखंड व्यापक सर्वांभूती ॥३॥

१२९) जैसे बीज तैसे फळ । उदो शब्द बीज मूळ ॥१॥ अबोलात कळो येई । अहंभाव जेथे नाही ॥२॥ नामामागे नाम येई । हेचि उदय खूण देही ॥३॥ गुरूकृपे हे कळेल । दास म्हणे आकळेल ॥४॥

१३०) झाला संसार गोंधळी । केवी भेटे घनसावळी ॥१॥ दृष्टी उघडोनी पाही । भव गोंधळी सुख नाही ॥२॥ आदिशक्तीचा गोंधळी । नाम गाई वेळोवेळी ॥३॥ येणे सर्व शक्ती लाही । दास म्हणे तुष्ट होई ॥४॥

१३१) निःशब्दाचे स्थानी । गोंधळाची खूण जाणी ॥१॥ हरिनामाची संबळ पाही । देवी प्रगट जेथे होई ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ॥३॥

१३२) देह घटी आत्मज्योती । सर्व शक्तींची जे शक्ती ॥१॥ विश्वासाने येई हाती । आधार जी सर्वाप्रती ॥२॥ होई तियेचा गोंधळी । राहे उदो शब्द मेळी ॥३॥ पंचमातृकात मन । ललिता पंचमी ते जाण ॥४॥ महालक्ष्मी साक्षात्कार । खंडे देही नवद्वार ॥५॥ प्रकृती सीमा उल्लंघन । दासा दसऱ्याची खूण ॥६॥

१३३) मीपणाचे लक्ष । महास्वरूप अलक्ष ॥१॥ तेथे जडवीता मन । महालक्ष्मीचे पूजन ॥२॥ गोविंद म्हणे त्रिपुरसुंदरी । असे हृदय मंदिरी॥३॥

१३४) मीपणाचे लक्ष लावी महास्थानी । ब्रह्मस्वरूपिणी तेजोराशी ॥१॥ ऐशी जगदंबा महालक्ष्मी पाही । अनुभवी होई देखणा तो ॥२॥ नाम फुंकी वारा कळसी भीतरी । उपासना बरी देवतेची ॥३॥ सौभाग्यदायिनी अखंड साधनी । जरी सोऽहं ध्वनी राहे बुद्धी ॥४॥ सगुण रूपाने तीच दावी खेळ । दासा नवल वेळ स्वानुभवी ॥५॥

१३५) मीपणाचे लक्ष लावी महास्थानी । लावण्याची खाणी तेजोराशी॥१॥ तेचि महालक्ष्मी त्रिपुरसुंदरी । हृदय मंदिरी दिसो येई

॥२॥ देह घटामाजी नामाचा फुंकर । साधन प्रकार साधी वेगी ॥३॥ दास म्हणे तोचि भक्तीमंत भला । इच्छी तसा त्याला देव होय ॥४॥

१३६) घुम घुम घुम घुम, देह घटी होतसे घुमारा । शोधोनिया अंतरी, करी रे विचारा ॥१॥ घुम घुम घुम घुम, नाम घुमते अनुभव घेई । अनुभवे अनुभव, येईल हृदयी ॥२॥ महालक्ष्मी उपासना, नाम दुजी नाही । दास म्हणे फुंकर समजोनि घेई ॥३॥

१३७) अखंड खंडेराया । दूर करी भवमाया ॥१॥ तूचि सर्वांचे अंतरी। सहा पैल चराचरी ॥२॥ गोविंद म्हणे तू अखंड । तुझे चरणी जडवी अखंड ॥३॥

१३८) नवखंड होता । खंडेनवमी ये हाता ॥१॥ नवद्वारीचे गमन । काम क्रोध अंतर्धान ॥२॥ गोविंद म्हणे मग नामी । वृत्ती राहे अंतर्यामी ॥३॥

१३९) खंडेरायाची प्रचिती । हेचि खंडेनवमी चित्ती ॥१॥ खंडेनवमीची खूण । कामक्रोध निर्दाळण ॥२॥ कामक्रोध निवारिता । दासा देवावरी सत्ता ॥३॥

१४०) जन्ममरण खंडावया । अखंड जाणे खंडेराया ॥१॥ खंडेराय तो हृदयी । अखंडित ध्यानी पाही ॥२॥ सहा जिरवीता कष्टी । खंडेराय पडे दृष्टी ॥३॥ नाम कष्ट ओळखावे । दास म्हणे सदा गावे ॥४॥

१४१) पन्नास अक्षरे ते वर्ण । दोन अक्षरे सुवर्ण ॥१॥ साठवावे घ्यावे द्यावे। माया टाकोनी स्वभावे ॥२॥ भरले असे संसारात । मनी घेता कृतकृत्य ॥३॥ दास म्हणे नाम सोने । राम दो अक्षरी नाणे ॥४॥

१४२) असती अक्षरे पन्नास । दोन अक्षरे सुरस ॥१॥ रामनाम थोर

परम । नाही आणिकाचे काम ॥२॥ तेचि अनुभवाचे ज्ञान । पुढे फिके ब्रह्मज्ञान ॥३॥ ऐसे नाम घेता पाही । दासा अशक्य काही नाही ॥४॥

१४३) 'द' कडे सरा । तोचि होतसे दसरा ॥१॥ प्रजापतीकडे । देव दानव मानव आले बरे ॥२॥ 'द' या शब्दे बोधी प्रजापती । सरता खलु दसरा ॥३॥ सुवर्ण नाम देणे घेणे । व्यवहारची हा खरा ॥४॥ दश स्वरुपी धरीता थारा । दासा तो दसरा ॥५॥

१४४) अखंडात जाता । विजयादशमी ये हाता ॥१॥ जेथे सर्वत्र विजय । कदा नोहे पराजय ॥२॥ गोविंद म्हणे 'द' कडे । सरता दसरा सापडे ॥३॥

१४५) सीमा उल्लंघन साधावा दसरा । जनांच्या आचारा सांडोनिया ॥१॥ प्रवृत्ती बडबड उल्लंघोनी सीमा । निवृत्तीच्या धामा नामी यावे ॥२॥ नाम सोने घ्यावे नाम सोने द्यावे । मुहूर्त साधावे औटामध्ये ॥३॥ दास म्हणे तरी भेटे हृषीकेशी । सुवर्णाच्या राशी इच्छामात्रे ॥४॥

१४६) हस्त नक्षत्र शोधावे । गजराजा आराधावे ॥१॥ देही गजगती गान । थोर चाले हस्तगान ॥२॥ गजराज मांडी खेळ । तरी होय तो सबळ ॥२॥ हादगा दाखवी हा दगा । दास म्हणे नामी उगा ॥३॥

१४७) सत्तावीसा नऊ जाता । बाकी शून्य येई हाता ॥१॥ ऐसे संतांचे बोलणे । मनी उमगोनी घेणे ॥२॥ तयामाजी जे नववे । देही रूप ओळखावे ॥३॥ दास म्हणे या साधनी । साक्षात्कार स्वरूपिणी ॥४॥

१४८) हस्तक्रिया देणे घेणे । त्यात रामनाम गाणे ॥१॥ ऐसा साधिता हादगा । कळे प्रपंच हा दगा ॥२॥ दास म्हणे सांगो किती । रामनामी हे प्रचीती ॥३॥

१४९) दशमाचे पैल पाहे । एकादश स्थान आहे ॥१॥ वैकुंठ बोलिजे तयासी । काळ वेळ नाही ज्यासी ॥२॥ गोविंद म्हणे गुरुकृपा । करूनी दावी मार्ग सोपा ॥३॥

१५०) चौऱ्याऐंशीचा मांडिला खेळ । रामनामा नाही वेळ ॥१॥ फासे घेवोनी मायेचे । खेळ खेळे विस्मरणाचे ॥२॥ रामनामी विन्मुख झाला । तो जाणावा झोपी गेला ॥३॥ खेळामाजी जो जागला । दास म्हणे देव झाला॥४॥

१५१) चौऱ्याऐंशीचा फेरा कशाने चुकेल । कथावा तो बोल मजलागी ॥१॥ ऐसा प्रश्न करी शिष्य सद्गुरुसी । ऐका वचनासी तयाचिया ॥२॥ कुसंग हे मूळ चौऱ्याऐंशीचे पाही । सत्संगेचि पाही उखडावे ॥३॥ परी हे तो जाण गुरुनामे घडे । देव दृष्टी पडे दास म्हणे ॥४॥

१५२) 'क' मधील जागरी । बुद्धी जडता कोजागिरी ॥१॥ जागर सदा हरिनामाचा । जीव वळता वलित साचा ॥२॥ गोविंद म्हणे खेळ नामी । कळे निजत्वाचे धामी ॥३॥

१५३) दहा आणि दोन पाही । गुरुपदी जडुनी राही ॥१॥ हेचि गुरूंची द्वादशी । कळो येई अनायासी ॥२॥ गोविंद म्हणे अनायास । रामनाम म्हणती त्यास ॥३॥

१५४) नाम गाय भक्त वत्स । तेचि जाणावे गोवत्स ॥१॥ एकादशामाजी एक । मिळविता द्वादश देख ॥२॥ तीन ताल श्रृंगावरी । गाय शोधावी अंतरी ॥३॥ इडा पिंगला सुषुम्ना । दास म्हणे ताल खुणा ॥४॥

१५५) नाम गाय नाम गाय । नाम गाय धरी पाय ॥१॥ धरी पाय धरी

पाय । धरी पाय नामी सोय ॥२॥ नामी सोय नामी सोय । नामी सोय वत्स होय ॥३॥ वत्स होय वत्स होय । दास म्हणे देव गाय ॥४॥

१५६) करिता गायीचे पालन । सर्व देव तुष्ट जाण ॥१॥ गाय घ्यावी ओळखून । संतालागी पुसे खूण ॥२॥ केशवाचे नाम गाय । केशवाचे नाम गाय ॥३॥ दास म्हणे गाय पाळी । त्याचा सखा वनमाळी ॥४॥

१५७) अहो गायीचे पूजनी । सर्व देव तृप्त जाणी ॥१॥ ऐशी गोमाता ही थोर । कळो येता रघुवीर ॥२॥ गाय गायत्री हरिनाम । उमगावे तिचे धाम ॥३॥ दास म्हणे सांगो किती । समजता थोर शक्ती ॥४॥

१५८) एक साधन साधणे । नाम घेणे नाम देणे ॥१॥ श्वासोश्वासी हे साधेल । गोवत्स ज्ञान हे जोडेल ॥२॥ गोविंद म्हणे तो आनंद । पद देई सच्चिदानंद ॥३॥

१५९) रामनाम कामधेनू । निववीत तनुमनु ॥१॥ स्वानंदाचे दुग्ध देई । जेणे तृप्ती अंतर्बाही ॥२॥ गोविंद म्हणे प्रेमपूर्ण । काही नुरवी अपूर्ण ॥३॥

१६०) रामनाम कामधेनू । महिमा तिचा काय वानू ॥१॥ भावार्थाचे मागे तृण । प्रेम भक्तीचे जीवन ॥२॥ साधनाचे शुद्ध स्थान । गुरुस्मरण गोठाण ॥३॥ उन्मनीची झूल वरी । शोभे सुंदर साजिरी ॥४॥ आत्मसुख दुग्ध धारा । पाजी दासा ते लेकरा ॥५॥

१६१) तेरा माजी धनराशी । तेचि धनत्रयोदशी ॥१॥ तेरा अक्षरे परम । श्रीराम जयराम जयजयराम ॥२॥ गोविंद म्हणे तेरा । नुरवी अंतःकरणी मेरा ॥३॥

१६२) तेरातील धनराशी । तेचि धनत्रयोदशी ॥१॥ तेरामाजी आहे धन । तेचि घ्यावे ओळखून ॥२॥ तेरा अक्षरे परम । श्रीराम जयराम जयजय राम ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरुनामी हे प्रचीती ॥४॥

१६३) माहेरीची मौज जीवासी दिवाळी । संतांचिये मेळी घडतसे ॥१॥ संतसंगे नाम वाचे जरी जडे । देव ठायी पडे अनायासे ॥२॥ अनंत तारका मुक्त दीपकळा । हा सुखसोहळा स्वर्गी नाही ॥३॥ ऐसी ही दिवाळी साधिली जयानी । धन्य तेचि जनी दास म्हणे ॥४॥

१६४) माहेरीचे सुख जीवासी दिवाळी । नामाचे कल्लोळी प्राप्त होय ॥१॥ मूळ घर हेची माहेर साजणी । माया हेरे जाणी गुरूगृही॥२॥ अहं नरकासुर माराया कारणे । गुरूपदी जाणे शरण बापा ॥३॥ नामयोगे ज्योती प्रगटे हृदयी । दीपवाळी पाही दास म्हणे ॥४॥

१६५) स्वरूपाचे सुख जीवासी दिवाळी । नामाचे कल्लोळी प्राप्त होय ॥१॥ देवाचे साम्राज्य आनंद सकळा । सुकुमार सावळा भेटी देई ॥२॥ ऐसा थोर आहे सुखाचा सोहळा । अनंत दीप डोळा दास म्हणे ॥३॥

१६६) चालिला पाडवा चालिली दिवाळी । परी वनमाळी भेटी नोहे ॥१॥ जन्ममरणाचा न तुटेची धाक । दिवाळीचे सुख कैचे जीवा ॥२॥ संतसमागमी सुखाची दिवाळी । नामाचिया मेळी प्रगटली ॥३॥ अनंत तारका पाही मुक्तदीप । प्रतिपदी स्वरूप दास म्हणे ॥४॥

१६७) जेथे दिवस ना रात । आत्मा स्वये प्रकाशत ॥१॥ तेथे स्थिर करी जीवा । हाचि दिवाळी पाडवा ॥२॥ काम क्रोध हे पाडवा । तेणे साधे हा पाडवा ॥३॥ अनंताच्या दीपज्योती । त्रैलोक्यात प्रकाशती ॥४॥ नामे गुरुकृपे पाही । दास म्हणे कळो येई ॥५॥

१६८) पाहता दिवाळीची मौज । पळे यमराजाची फौज ॥१॥ जन नाना मौजा करिती । परी न चुके पुनरावृत्ती ॥२॥ मौज गुरूगृही येता । दासा समाधान चित्ता ॥३॥

१६९) दीप ज्योती सहस्रदळी । पहाणे संतांची दिवाळी ॥१॥ चतुर्दशस्थानी पहाणे । नरक चतुर्दशी जाणे ॥२॥ गोविंद म्हणे पाही । नरदेही अनुभव घेई ॥३॥

१७०) हरिचिया दासा हरिनाम धन । करीती जतन हरिनाम ॥१॥ जन तयालागी म्हणती निर्धन । परी ते सधन सर्वांहूनी ॥२॥ हरीनाम लक्ष्मी पूजिली जयानी । तयासी रुक्मिणी सदा वानी ॥३॥ ज्या योगे वैभव लक्ष्मीसी लाभले । साधन साधिले दास म्हणे ॥४॥

१७१) अरूपाचे निर्गुणरूप । सौभाग्यलक्ष्मीचे स्वरूप ॥१॥ नामी स्वरूप साक्षात्कारी । लक्ष्मीपूजन निर्धारी ॥२॥ लक्ष स्वरूपी मिळाले । लक्ष्मीपूजन दासा भले ॥३॥

१७२) अलक्ष साधन । हेचि लक्ष्मीचे पूजन ॥१॥ अलक्ष ओळखून घ्यावे । मने त्यात मिसळावे ॥२॥ गोविंद म्हणे निरंजन । हेचि अलक्षाची खूण ॥३॥

१७३) नाम साक्षात्कार देही । सौभाग्यलक्ष्मी तेचि पाही ॥१॥ गुरूनामी देव भेटे । कृपांजने बंध तुटे ॥२॥ करी नामेची पूजन । हृदयी धरी लक्ष्मीरमण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरूनामी हे प्रचीती॥४॥

१७४) दोन ज्योती एक होता । दिवाळी पाडवा ये हाता ॥१॥ आत्मज्योत जीवनज्योत । दोन परी एक होत ॥२॥ गोविंद म्हणे कळो येई । गुरुनामी अनुभव घेई ॥३॥

१७५) षड्रिपूंची पळता फौज । पहा दिवाळीची मौज ॥१॥ प्रतिपदी रूप पाहे । नामयोगे प्रगट होये ॥२॥ कामक्रोध पाडी जेव्हा । होय दिवाळी पाडवा ॥३॥ अनंत दीपिकांच्या ज्योती । बाह्यांतरी प्रकाशती ॥४॥ गुरुगृही दिसो येई । दास म्हणे नाम घेई ॥५॥

१७६) दीपज्योती एकवटती । होय वृत्तींची निवृत्ती ॥१॥ हीच बलीप्रतिपदा । जीवा नामी मौज सदा ॥२॥ सोहंभाव दीपज्योती । अंतरी या प्रगट चित्ती ॥३॥ कायेमाजी गुरूगृही । दासा अनुभव येई ॥४॥

१७७) पाडवा पाडवा मीपण पाडवा । हरिनाम जागवा हरिनामी॥१॥ निवेदन भक्ती बळीचा पाडवा । प्रतिपदी देवा भेटी होय ॥२॥ संतकृपा दीप हृदयी तेवत । सुटते ही मात संसाराची ॥३॥ ऐशी संतजनी साधिली दिवाळी । दास नामावळी गायी सदा ॥४॥

१७८) प्रतिपदी रूप पाहे । नामयोगे प्रगट होये ॥१॥ तोचि जाणावा पाडवा । काम क्रोध हे पाडवा ॥२॥ सर्व सणामाजी जाण । पाडवा हा मुख्य जाण ॥३॥ साधुसंत समागम । दीपवाळी मनोरम ॥४॥ अनंत मुक्त दीप पाहे । दास हरिगुणी राहे ॥४॥

१७९) भावामाजी नामबीज । दोन अक्षरे सहज ॥१॥ रामनाम आकळिता । भावबीज येई हाता ॥२॥ भक्तीगृही नाम अन्न । भाव करी जै सेवन ॥३॥ बीज वर्म ओळखावे । दास म्हणे मुक्त व्हावे ॥४॥

१८०) हाचि दिवाळी पाडवा । नाम अंतरी वाढवा ॥१॥ कामक्रोध तेथे नुरे । हृदयी देवज्योत उरे ॥२॥ प्रतिपदी नाम घेणे । कृपे ऐक्य मौज पाहणे ॥३॥ ऐसा नवल महिमा पाही । देव दासांकित होई ॥४॥

१८१) भाव बीज साधी भाव बीज साधी । तुटेल उपाधी सहजेची ॥१॥ भक्ती ये यमुना भाव तोचि यम । नाम अन्न परम सेवी जरी ॥२॥ वासनेचे अन्न सेविता अधम । भावबीज नाम दास म्हणे ॥३॥

१८२) साधी यमाची द्वितीया । भाऊबीज नाम जया ॥१॥ यमुनेत स्नान करी । यमधर्मा नमस्कारी ॥२॥ भाव हाचि यम देखा । धर्म तयाचे ओळखा ॥३॥ शांती यमुना चांगली । नाम अन्न जेऊ घाली ॥४॥ जेवोनिया होता तृप्त । पाप ताप विरहीत ॥५॥ होत असे नर पाही । दास म्हणे संशय नाही ॥६॥

१८३) भाव भक्ती बहिणी घरी । नाम अन्न सेवी जरी ॥१॥ भाऊबीज म्हणती त्यासी । कार्तिक शुद्ध द्वितीयेसी ॥२॥ गोविंद म्हणे यमे यमुनेला । मोक्षदायक वर दिला ॥३॥

१८४) यमाची द्वितीया साधिता सुलभ । तयालागी लाभ सर्व साध्य॥१॥ सुकृती कार्तिक असता शुद्ध पक्ष । प्रती पदी साक्ष प्रतिपदा ॥२॥ वासना स्त्रियेचे अविचार अन्न । न करिती भक्षण द्वितीयेसी॥३॥ भक्ती भगिनीचे नामअन्न सेवी । बीज हेचि भावी दास म्हणे ॥४॥

१८५) जेणे योगे पांडवानी । वश केला मोक्षदानी ॥१॥ ऐसा काही योग धरी । देव करील चाकरी ॥२॥ गोविंद म्हणे ऐसा योग । उरवीना दुःख भोग ॥३॥

१८६) जेणे योगे पांडवांनी । वश केला मोक्षदानी ॥१॥ ऐसा काही योग धरी । देव करील चाकरी ॥२॥ नामस्मरणी चित्त दंग । नुरे वियोगाचे अंग ॥३॥ दास म्हणे ऐसा योग । पावे धरिता सत्संग ॥४॥

१८७) पंचप्राण एकमेळा । पांडव पंचमी सोहळा ॥१॥ पंच मातृकांत

ध्वनी। नाम दुमदुमे चहूकोनी ॥२॥ ऐसा पांडवांचा योग । दासा नुरेची वियोग ॥३॥

१८८) गुरुपदी मन जडता । नुरे प्रपंचाची व्यथा ॥१॥ गुरुकृपेचे अंजन । दृष्टी दाखवी भगवान ॥२॥ हरिरंगी रंगविती । श्रीरंगाते भेटविती ॥३॥ आत्म-ज्योती प्रज्वलिती । द्वैत नुरवोनि चित्ती ॥४॥ योगी हनुमंत संत । दाविला परमार्थाचा पंथ ॥५॥ गुरूपदी काया गलित । दासा लळिताची मात ॥६॥

१८९) एक हरिदिनी एक हरिदिनी । साधे तरी जनी थोर पुण्य ॥१॥ हरिनाम दिनी हरिनाम दिनी । म्हणती हरिदिनी तिजलागी ॥२॥ दहा आणि एक पदी लीन झाले । हरिचिया भले हरिदिनी ॥३॥ एकादश योगे वासना विराली । दासासी साधिली हरिदिनी ॥४॥

१९०) पंढरीची वारी । देही बाहेरी तू करी ॥१॥ दोही माजी पुण्य एक । देही साधणे अचूक ॥२॥ गोविंद म्हणे गुरूकृपे । कळो येईल अपापे ॥३॥

१९१) पंचमहाभूता जो का महद्भूत । झडपिता मात काय सांगो ॥१॥ कोणाही भूताचे तया नाही भय । विचरे आनंदमय जगामाजी ॥२॥ पंढरीचे भूत भाग्ये झडपीत । दासा अवचित आकळले ॥३॥

१९२) पंचभूता महद्भूत । काय सांगू त्याची मात ॥१॥ नाही आणिकाचे भय । सदा सर्वदा निर्भय ॥२॥ दास पंढरीसी गेला । आवचित आकळिला ॥३॥

१९३) महद्भूत आकलन । नामे कळो येई जाण ॥१॥ विष्णु व्यापक सर्वा ठाई । तोचि महद्भूत पाही ॥२॥ गोविंद म्हणे सर्व भूते । ज्याचे चरणा नमीते ॥३॥

१९४) दशेंद्रिये आणि मन । भगवच्चरणा सन्निध जाण ॥१॥ हेचि एकादशी पाही । व्रतसार असे देही ॥२॥ ऐसा उपवास प्रकार । बाह्य उपवास आचार ॥३॥ नामे एकादश लीन । दासा भेटवी भगवान ॥४॥

१९५) लागे जरी तोबा लागे जरी तोबा । म्हणती विठोबा तयालागी ॥१॥ पंढरी माझारी सुखाचा सोहळा । विठ्ठल आगळा तया ठायी ॥२॥ तयाचे लाघव न कळेचि कोणा । अंतरीच्या खुणा भक्त जाणे ॥३॥ तो एक लागता चित्ती विश्रामता । पुरवी मनोरथा दासाचिया ॥४॥

१९६) लागे जरी तोबा लागे जरी तोबा । तरीच विठोबा भेटी होई॥१॥ तरीच या जीवा खरे समाधान । होईल कल्याण अखंडित ॥२॥ तयाचिये नामे लागे तो हा तोबा । स्वानंदाचा गाभा देही असे ॥३॥ ऐसा ज्ञानतोबा लागताचि पाही । देव भेटो येई दास म्हणे ॥४॥

१९७) सम सकार तुळण । नाम तुळशीचे पान ॥१॥ वृंदा जहाली तुळसी । भगवान स्पर्शे तिसी ॥२॥ गोविंद म्हणे दामोदर । रूप तयाचे सुंदर ॥३॥

१९८) एक तुळसीचे पान । मोठे तिही लोकाहून ॥१॥ हरिनामाकार मन । हेचि तुळसीचे पान ॥२॥ याची आवड देवासी । पवित्रता तया पासी ॥३॥ तुळसीचे पान । कोणी म्हणो नये सान ॥४॥ रुक्मिणीने हे जाणले । दास म्हणे देव तुळले ॥५॥

१९९) एक तुळशीचे पान । देवा समर्पिता धन्य ॥१॥ सम सकार तुळण । नाम तुळशीचे पान ॥२॥ वृंदा जाहली तुळशी । भगवान सार्शे तिशी ॥३॥ दास म्हणे हा महिमा । कळो येईल भक्तोत्तमा ॥४॥

२००) ओळखिता हरिहर । मुक्त होती नारीनर ॥१॥ दोनी एकरूप पाही । श्वासोश्वासी वास देही ॥२॥ राम जीवासी आधार । तोचि शिवाचे अंतर ॥३॥ शिव विष्णुचे हृदयी । गोडी साखरेच्या ठायी ॥४॥ नाम चतुर्दशी गाई । वैकुंठ चतुर्दशी पाही ॥५॥ ब्रह्मगिरी मध्ये स्थान । दासा वैकुंठ दर्शन ॥६॥

२०१) वैकुंठीची चतुर्दशी । चौदा चक्री मार्गवासी ॥१॥ त्रिगुणातीत नामे पाही । चौदा चक्रे चढत येई ॥२॥ तोचि सद्गुरूंचा पुरा । इतरांचा होय चुरा ॥३॥ देही चौदा चक्रस्थान । ब्रह्म साक्षात्कार खूण ॥४॥ दासा वैकुंठ दर्शन । हरिहर ऐक्य पूर्ण ॥५॥

२०२) हरिहर अभेदासी । बोलती वैकुंठ चतुर्दशी ॥१॥ हरिहर दोन जाण । एकरूप त्यांची खूण ॥२॥ गोविंद म्हणे हरिहर । नरदेही नामसार ॥३॥

२०३) अहंकार त्रिपुर शिवे निर्दाळिला । आनंद जहाला तीन्ही लोकी ॥१॥ तीन्ही पुरामाजी वर्तत जो देही । त्याचा नाश होई शिवकृपे ॥२॥ त्रिपुर सोहळा ज्ञानदीप माळा । ज्योतीचा सोहळा नानारंगी ॥३॥ त्रिलोचन धामी आनंद आगळा । जाता तया स्थळा गुरूकृपे ॥४॥ दिव्य तेज तेथे दिव्य रूपमाला । दावितो नभाला दिव्यरूप ॥५॥ काय वानू मौज गुरूच्या कृपेची । शोभा त्रिपुरीची दावी डोळा ॥६॥ शुभ्र ते चांदणे सतरावी कळा । अक्षय लाभ भला दर्शनाचा ॥७॥ रामनामी कैचा येई पूर्णतेला । आनंद जाहला दास म्हणे ॥८॥

२०४) हेचि जाणावी त्रिपुरी । प्रगटावा त्रिपुरारी ॥१॥ नाम त्रिविध तपे पाही । शिव प्रगटे हृदयी ॥२॥ त्रिगुण हंकार त्रिपुर । नुरे देखता शंकर ॥३॥ अनंत दीपज्योती देही । देवकृपे दास पाही ॥४॥

२०५) सत्‌चिद् प्रकाश मनी । त्रिपुरी घ्यावी ओळखोनी ॥१॥ स्वर्ग मृत्यू पाताळात । त्रिपुर भरला देहात ॥२॥ गोविंद म्हणे अहंकार । नामे नुरेचि साचार ॥३॥

२०६) उमगता त्रिपुरारी । मग कळेल त्रिपुरी ॥१॥ शिवतेज झगमगाट । अनंत दीप लखलखाट ॥२॥ जेथ त्रिगुण अहंकार । विरूनी शिवचि साचार ॥३॥ आनंदाची पूर्ण सीमा । दास म्हणे ते पौर्णिमा ॥४॥

२०७) तीन पुरामाजी देही । त्रिविध अहंकार राही ॥१॥ हाचि एक त्रिपुरासूर । सत्त्व रज तम अहंकार ॥२॥ शिवहस्ते विष्णु बाणे । त्रिपुरासुर नाश होणे ॥३॥ नाम तपे होता युक्त । शिव प्रगटे देहात ॥४॥ शब्द आणि रुपातीत । शिव देही प्रकाशत ॥५॥ प्रगट अनंत सकळास । दीपोत्सव हा दासास ॥६॥

२०८) अंतररंगी मन जडता । श्रीरंगाचे सुख हाता ॥१॥ व्रत असे एकादशी । वर्म त्याचे उपवासी ॥२॥ एक तुळसीचे पान । अर्पिता तुष्टे भगवान ॥३॥ हरिहर भेटी त्यासी । वैकुंठीची चतुर्दशी ॥४॥ पूर्ण आनंद ते ठायी । ज्योत प्रगट हृदयी ॥५॥ देह अभिमान गलित । दासा खूण ते लळित ॥६॥

२०९) क्षेत्र हे आळंदी । ओतप्रोत ब्रह्मानंदी ॥१॥ ज्ञानराजा सद्गुरूराव । वसवी पुण्यभूमी ठाव ॥२॥ गोविंद म्हणे देव येती । चराचरी ऐसी ख्याती ॥३॥

२१०) ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । नाम घेताची ईश्वर ॥१॥ रेडा बोलवी वेद वाणी । चांगदेव लोटांगणी ॥२॥ गोविंद म्हणे बालपणी । समाधिस्थ झाले ज्ञानी॥३॥

२११) आले भगवान आले संतजन । नवल महिमान ज्ञानेशाचे ॥१॥ ज्ञानाई ज्ञानाई बोलताती सर्व । निवालासे गर्व सुरवरांचा ॥२॥ विठ्ठल निवृत्ती मुक्ताई सोपान । नामा संतजन आलिंगीती ॥३॥ देव बैसविती ज्ञाना धरुनी हाती । ओवाळिती आरती रुक्मिण्यादी ॥४॥ सुरवर येती विमानांची दाटी । करिती पुष्पवृष्टी ज्ञानेशासी ॥५॥ कार्तिक वद्य त्रयोदशी माध्यान्हेसी । समाधी शेजेसी स्थिर झाले ॥६॥ ज्ञानदेवालागी देवे दिला वर । दर्शने साचार मुक्ती तुझ्या ॥७॥ प्रेमपुरामाजी बुडाले सर्वही । तेथे दास पाही कैचा उरे ॥८॥

२१२) सहस्रदळी पहाणे ज्योत । देव दिवाळीची मात ॥१॥ मार्ग शीर्षाचा चोखाळी । देव दिवाळी निराळी ॥२॥ गोविंद म्हणे व्यवहारात । गुरूनामी कळे मात ॥३॥

२१३) नरदेह असामान्य । सीताराम भजन खूण ॥१॥ धरूनी जपे जरी नर । थोर देव साक्षात्कार ॥२॥ त्याचे तेज पहाता पाही । तेजोरूप होऊनी राही ॥३॥ हेचि थोरली दिवाळी । नामस्मरण सदा काळी ॥४॥ मार्गशीर्षाचा चोखाळी । दासा देव सहस्रदळी ॥५॥

२१४) नरदेह असामान्य । सीताराम भजन खूण ॥१॥ जाई देवाचे राऊळी । मार्ग पश्चिम चोखाळी ॥२॥ नरदेहाची थोरवी । दासा राम भेटे जीवी ॥३॥

२१५) नरदेह हा सामान्य । ऐसे म्हणता पाप जाण ॥१॥ नरदेहीचे आयुष्या । देव करिती प्रशंसा ॥२॥ मने यत्न करिता जाण । नर होय नारायण ॥३॥ दास म्हणे नामखूण । साधिलीया जगी धन्य ॥४॥

२१६) थोर गीतेचा महिमा । दावी देव देवोत्तमा ॥१॥ गीता गीत

देहांतरी । भगवंत प्रगट करी ।।२।। भावे वाची गीताक्षर । त्यासी भेटेल ईश्वर ।।३।। गीता तत्त्व गुरूनाम । दासा भेटवी मेघःश्याम ।।४।।

२१७) गीत अंतरी राहिले । भगवंते प्रगट केले ।।१।। गीता गीत असे गुप्त । परी ते प्रगट साक्षात ।।२।। गोविंद म्हणे सांगो किती । वेद पाचवा निश्चिती ।।३।।

२१८) गीता गीता गीता ऐसे बोलताती । गीता नोळखीती देवाजीची ।।१।। गीत गावोनिया देवा आठवावे । गीत ते बरवे देही चाले ।।२।। गीत हेचि गीता गीत हेचि गीता । ओळखी तत्त्वता गुरूकृपे ।।३।। मनाचिया ओळी गाई नाम गीत । कर्तव्याची नीत गीता बोले ।।४।। अखंडित योग सांगे कृष्ण देव । अर्जुनाचा भाव दास म्हणे ।।५।।

२१९) देवे सांगितली गीता । नित्य नवी जे सर्वथा ।।१।। श्लोक श्लोकार्थ अक्षरार्थ । उच्चारिता मुक्त नर ।।२।। पुरुषोत्तम पंचदश । वेद पाचवा सुरस ।।३।। गीता ओळखून घेई । दासा फळ नाम देही ।।४।।

२२०) रहस्याची गीता । संती बाणली तत्त्वता ।।१।। गीता दावी राजमार्ग । देव प्राप्तीचा सुयोग ।।२।। गीता गीता वाचे वदता । खरी होय सार्थकता ।।३।। त्याची पहावी प्रचीती । दास म्हणे कळे महती ।।४।।

२२१) सकळ तपाचेही तप । मुखी रामनाम जप ।।१।। येर तपे काया क्लेश। परी भेटेना देवेश ।।२।। गीतेमाजी सांगितले । दास म्हणे धेता भले ।।३।।

२२२) सकळ तपामाजी तप । रामनाम हाचि जप ।।१। हेचि करी बा शाहण्या । जगी धन्य होसी प्राण्या ।।२।। नको तनु कष्ट प्राणा । दास म्हणे नाम जाणा ।।३।।

२२३) कुळ भेटी हनुमंता । त्रयोदश ग्रंथी युक्ता ॥१॥ पीत दोरक पीत वसन। पीत गंध पीत सुमन ॥२॥ गोविंद म्हणे त्रयोदशनाम । श्रीराम जयराम जयजयराम ॥३॥

२२४) कायेमाजी मुख्य जाणा । मारुतीची उपासना ॥१॥ रामभेटी व्हावी जरी । हेचि उपासना करी ॥२॥ दास म्हणे प्राण ज्योती । देही जाणावा मारुती ॥३॥

२२५) काय धरिसी असूया । ध्यायी मना अनसूया ॥१॥ जिचे नाम उच्चारण। होण मनाचे उन्मन ॥२॥ जिचा पहाताची नेम । थरथरा कापे यम ॥३॥ जिचे पाहता साधन । स्थिर होतसे तपन ॥४॥ त्रितपात काय करी । ध्यायी मना गुरू अत्री ॥५॥ अत्रि अनसूया धन्य । दत्त जहाले नंदन ॥६॥ तीनी देव एकरूपी । दासा दर्शन स्वरूपी ॥७॥

२२६) साधिलीया गुरुसेवा । शिवपद प्राप्त जीवा ॥१॥ ऐसा सद्गुरू महिमा । झाली बोलायाची सीमा ॥२॥ सद्गुरूंचा वास देही । दास म्हणे ते विदेही ॥३॥

२२७) तपाचे जे तप । एक रामनाम देख ॥१॥ जेणे दत्तगुरू भेटी । होय जीवाची संतुष्टी ॥२॥ गोविंद म्हणे दत्तगुरू । सर्व जगासी आधारू ॥३॥

२२८) अहो हनुमंत षष्ठी । करती स्वानंदाची पुष्टी ॥१॥ षडैश्वर्य देऊन । करिती भक्तांचे रक्षण ॥२॥ गोविंदासी नेमी । आणती गंगाधर स्वामी ॥३॥

२२९) गलित काया अभिमान । हेचि लळीताची खूण ॥१॥ देवपदी नित्य रत । नामी आनंदे डोलत ॥२॥ कळेसहित कळसा जाणे ।

जाणपण सरूनी उरणे ॥३॥ सिंहासनी देवधणी । दास लोळे त्याचे चरणी ॥४॥

२३०) देहभाव लया जाता । लळीत होय गुरूभक्ता ॥१॥ जेथे नुरे अहंकार । देव प्रगटे साचार ॥२॥ गुरूसेवा अखंडित । जेथे घडेल नेमस्त ॥३॥ नाम साधे श्वासोश्वासी । घडी घडी अहर्निशी ॥४॥ दास म्हणे हे लळीत । बोलियेले साधुसंत ॥५॥

२३१) गलित काया होणे । लळीताची खूण जाणे ॥१॥ आव सहा नसे जेथे । रूप स्थिर राहे तेथे ॥२॥ गोविंद म्हणे खरी तृप्ती । इये ठायी सहज हाती ॥३॥

२३२) पाच पाचा मेळविणे । पाच पाचातुनि काढणे ॥१॥ धनमान सुखदुःखभाव । हा तो देहाचा स्वभाव ॥२॥ येता अनुभवे अनुभव । गलित मन देहभाव ॥३॥ उरे नामानुसंधान । अखंड लळिताची खूण ॥४॥ दासा जो जो देवा मागे । देव त्या दे जे जे मागे ॥५॥

२३३) तीळ घ्या गूळ घ्या गोड बोला वाचे बोलताती । तीळगुळ म्हणजे काय याची पडली भ्रांती ॥१॥ तीळ सूक्ष्म प्रेमस्थान नाम गूळ पाही । प्रेम भावे नाम घेता बोल गोड होई ॥२॥ म्हणोनिया सर्व जनी सदा सर्वदाही । गोड बोलणे बोलावे पर्व नरदेही ॥३॥ बिंदूस्वरूप ज्ञान होता मकर आन नाही । दास म्हणे ते साधिता देव साह्य होई ॥४॥

२३४) तीळ गूळ काय तो विचारोनी पाही । तीळ गूळ देवोनिया हाती काय येई ॥१॥ तीळ प्रेम नाम गोड शर्करा ही बरी । तीळगूळ हलवा देता घेता धन्य हो वैखरी ॥२॥ रामकृष्ण नाम गोड बोलणे वैखरी । संक्रांत ही दासा होय संक्रमणे खरी ॥३॥

२३५) टाकोनिया दुरूत्तर । नाम बोलावे मधुर ॥१॥ हेचि संक्रमण

पाही । खूण ओळखावी देही ॥२॥ संक्रमण घडता पाही । घननीळ भेटी देई ॥३॥ दास म्हणे नाम गोड । पुरवी सकळांचे कोड ॥४॥

२३६) देवाचा किंकर देवचि पै झाला । संक्रमणी आला म्हणोनिया ॥१॥ किंकरत्वा अंत हेचि किंकरांत । साधिताती संत साधुजन ॥२॥ संसारात मन जाते ते हलवा । साधिला हलवा भक्तजनी ॥३॥ रामचरणी वृत्ती संक्रमणा आली । नामी ते उरली दासालागी ॥४॥

२३७) कैसा देवाचा किंकर । देव ठावा नाही जर ॥१॥ सर्व ज्ञान व्यर्थ जाणी । नोळखीता देवधणी ॥२॥ कैचा मासा पाणी नेणे । कैचा भक्त धणी नेणे ॥३॥ नामे देवाचा किंकर । दास होय स्वरूपाकार ॥४॥

२३८) आत्मसूर्य उपासन । ब्रह्मकर्म वर्म खूण ॥१॥ नाम अहर्निश घ्यावे । ब्रह्मकर्म हे स्वभावे ॥२॥ संधिकाळी जपता पूर्ण । हेचि संध्या उपासन ॥३॥ अ, उ, म चे देता पाणी । नाश मंदेहा लागोनी ॥४॥ नाम त्रिपदा गायत्री । असे व्यापुनी शरीरी ॥५॥ देहरथी पिंडी सात । उल्लंघोनी ब्रह्मांडात ॥६॥ नामे जडता सप्तमस्थानी । दासा भेटे दिनमणी ॥७॥

२३९) माता हाचि देव माता हाचि देव । आणि दुजा भाव नाही मनी ॥१॥ माता हाचि गुरू माता परमेश्वरू । सर्वाहुनी थोरू एक माता ॥२॥ ऐहिकात ऐसे प्रेम नसे दुजे । एक देवराजेवीण जगी ॥३॥ मातेच्या कृपेचा थोर बडीवार । दासाचा विचार हाचि सत्य ॥४॥

२४०) साधुसंत नाही गेले । अजरामर होऊनि ठेले ॥१॥ पंचभूतांचा हा देह । साधु सर्वदा विदेह ॥२॥ थोर तयांची महती । भाविकासी भेटी देती ॥३॥ दास म्हणे देव भरला । अभाविका दुरी ठेला ॥४॥

२४१) वाईटात बरे घेई । प्राण तयामाजी ठेवी ॥१॥ पंचमातृकांचा स्वर । तोचि असे औदुंबर ॥२॥ सः अहं अहं सः । गुरूपादुका या महा ॥३॥ हेचि औदुंबर पंचमी । दासा लाधे गुरूनामी ॥४॥

२४२) पूर्णता जे कुलधर्मा । तेचि कुळधर्म पौर्णिमा ॥१॥ कुलधर्मी जे राहिले । कुलदीपक झाले भले ॥२॥ गोविंद म्हणे आचारधर्म । एक नामचि उत्तम ॥

२४३) देही संती दाविली काशी । शिवग्रामीचे रहिवासी ॥१॥ मज पूर्वेहुनी काढीले । पश्चिममार्गे चालविले ॥२॥ त्रिकुटावरी गंगास्नान । दासा नामी मुक्तपण ॥३॥

२४४) सोमवार एकादशी । शिवरात्री उपवासी ॥१॥ संतांचे हे थोर व्रत । तेज दिसे अंधारात ॥२॥ चंद्र सूर्य नसता तेज । दासा तेथे नामगूज ॥३॥

२४५) जीवी शिवाची प्रचिती । हे तो मुख्य परमार्थी ॥१॥ क्षराक्षराचा विचार । प्रकृती पुरुषाचा निर्धार ॥२॥ दासा नामी उमगे नाते । उमगता मुक्ती त्याते ॥३॥

२४६) शक्तिदाता शिवध्यायी । युक्तिदाता शिवध्यायी ॥१॥ शक्ति युक्ति जये ठायी । तोचि एक शिव पाही ॥२॥ ज्याचे करिता स्मरण । चित्ता होय समाधान ॥३॥ ज्याच्या स्वरूपाचा अंत । ब्रह्मादिका न कळत ॥४॥ नामस्मरणी जो पाही । प्रगटे दासाचे हृदयी ॥५॥

२४७) शिवशक्ति या दोघाते । ओळखिता मुक्ती त्याते ॥१॥ एकमेकांचे आतीते । त्यांचे उमगावे नाते ॥२॥ देह शक्ती आत्मा शिव । साक्ष दावी सद्गुरुराव ॥३॥ ऐसा शिव समजोनी । नामे पूजिला जयानी ॥४॥ त्यांच्या सत्त्वा नाही पार । दास म्हणे भक्त थोर ॥५॥

२४८) काशीमाजी वास होता । पाप नुरेचि सर्वथा ॥१॥ थोर पुण्य जरी जोडे । काशीमाजी देह पडे ॥२॥ सदाशिव करी बोध । नाही जन्म मरण बंध ॥३॥ काशी समजोनी घेई । गुरुनामे उमगोन येई ॥४॥ काशी कळता साचार । देव भेटे विश्वेश्वर ॥५॥ काशी आपुल्याच गेही । दास म्हणे नरदेही ॥६॥

२४९) कैचा होय भवभंग । सांगा स्वामी तो प्रसंग ॥१॥ देही गुप्त शिवलिंग । जीव पूजी त्यजुनी संग ॥२॥ तरीच भवभंग होई । गुरुनामे कळो येई ॥३॥ शिवलिंग प्रगटता । दास म्हणे थोर सत्ता ॥४॥

२५०) रामनामाचा आलट । करी मनाचा पालट ॥१॥ नाम घेणे उठाउठी । चिंतनेची जगजेठी ॥२॥ आलट रामनाम घेणे । पालट मनोन्मन होणे ॥३॥ दास म्हणे नाम कंठी । गुंग झालासे धूर्जटी ॥४॥

२५१) रामनामाचा आलट । करी मनाचा पालट ॥१॥ खरी तीर्थयात्रा पाही । सर्वाश्रेष्ठ सर्वथाही ॥२॥ आत्मा मुख्यतीर्थ देही । नामे त्याची यात्रा होई ॥३॥ जेथे संशय निवृत्ती । दासा देवाची प्रचीती ॥४॥

२५२) सीमेवरील गान । तेचि एक सीमगान ॥१॥ प्रपंचाचे सीमेवरी। एक गान उरे हरी ॥२॥ हरी नाम महाशब्द । अंतरीचा तो निःशब्द ॥३॥ दास म्हणे जाळुनी काम । पौर्णिमा ते पूर्ण काम ॥४॥

२५३) सीमेवरील गान । तेचि एक सीमगान ॥१॥ व्यवहाराची झाली सीमा । तेथे भेटी पुरुषोत्तमा ॥२॥ महाशब्द उच्चारण । दासा नामी नुरे बंधन ॥३॥

२५४) काय पाहसी तमासा चित्त अंतरी नेई । हा खेळ मायेचा दूर दूर तुज नेई ॥ध्रु॥ जे जगी आचरूनी तेचि दाविती पाही । तू पाही तमासा गगनमंडळी जाई ॥१॥ संतांनी पाहिला तोचि पाहिला नाही ।

नरजन्मा येऊनी व्यर्थ जन्म मग होई ।।२।। तो खेळ पाहता चित्त तन्मय होई । गोर्विंदा दाविती नित्य नवी नवलाई ।।३।।

२५५) जाळोनिया काम सदा जपे राम । सण हा परम उत्तमाचा ।।१।। बोलती अभद्र इच्छिताती भद्र । तया रामभद्र केवी मिळे ।।२।। शिवाचे मनीचे गाई नाम वाचे । सणी शिमगीयाचे तेचि धन्य ।।३।। शास्त्राचे अंतर दाविताती संत । लावावया नीत दास म्हणे ।।४।।

२५६) काय अंतरी तमासा । पाहता भेटी जगदीशा ।।१।।निर्गुणाचे पुरी पाही । त्रिगुणाचे पैल जाई ।।२।। शिमगानाचे शेवटी । स्वरूप अनुभव दृष्टी ।।३।। दासा सुखाचा सोहळा । गुरूपदी अवलीळा ।।४।।

२५७) शिमगा शिमगा सण हा उमगा । नाही तरी पहा गा जन्म वाया ।।ध्रु।। 'शि' शिवाचे प्रिय नाम ते । 'म' मनाच्या धरुनी नियमाते। 'गा' गाई निरंतर । अंतरी ते ।।१।। कुवासनेची होळी रचुनि । काम क्रोध हे धरुनी । ज्ञानाग्नीने दे पेटवुनी । नाम बोल ।।२।। शीम द्वैताची सीमाही । उल्लंघुनि नाम तू गाई । गुरुवचनाची ही नवलाई । दास पाही ।।३।।

२५८) अहर्निश नाम नीज । हेचि कल्पांताचे बीज ।।१।। बीज तुकाराम साधी । जेथे उरेना उपाधी ।।२।। परब्रह्म तुका आले । सदेह वैकुंठासी गेले ।।३।। संत डोळा पहाती । दास वंदितसे चित्ती ।।४।।

२५९) बीज अक्षरे दोन देख । रामनाम हे सम्यक ।।१।। बीज रुजताहे पोटी । नुरे संसाराची गोठी ।।२।। बीज धरिता मानसी । देव पाहुणे घरासी ।।३।। बीजी आनंदाचे फळ । नाम गाई वेळोवेळ ।।४।। बीज साधी तुकाराम । दासा वैभवाचे धाम ।।५।।

२६०) रंग ओळखोनी रंगात रंगावे । श्रीरंगाचे घ्यावे नाम बरे ॥१॥ मन रामी रंगले तेचि धन्य झाले । पाचव्यात आले पंचमी ते ॥२॥ पंचप्राणवृत्ती नामात रंगता । पंचमी तत्त्वता रंगाची ती ॥३॥ सद्गुरु रंगारी दाविती अंतरी । रंग तो मुरारी भावे पाहे ॥४॥ जया रंगामाजी रंगती शंकर । ओळखी चतुर दास म्हणे ॥५॥

२६१) देहामाजी असे रंग । तोचि जाणावा श्रीरंग ॥१॥ रंग असेची अंतरी । तोचि सर्वदा बाहेरी ॥२॥ गोविंद म्हणे तो श्रीरंग । तोचि बोलिजे पांडुरंग ॥३॥

२६२) रंग तो श्रीरंग । जेणे योगे सर्व रंग ॥१॥ माथा पटल रंगवी । नानाविध ठसे दावी ॥२॥ संत साधू नामी आले । दास म्हणे ते रंगले ॥३॥

२६३) सणाचा शेवट रंगाची पंचमी । रंग मिळे नामी रंगा तेथे ॥१॥ रंग तो श्रीरंग श्रीरंग तो रंग । ज्याते अंतररंग बोलताती ॥२॥ पाचा आत पाच तया आत तो मी । तेथे रंगे रामी पंचमी ते ॥३॥ ऐशा रंगामाजी जो कोणी रंगला । रंगवी सकळाला दास म्हणे ॥४॥

२६४) रंगपंचमीचा दिन । काय वानू महिमान ॥१॥ प्राण प्रणवाचा योग । नामी श्रीरंगाचा रंग ॥२॥ जया रंगाचा अनुभव । दासा दावी गुरुराव ॥३॥

२६५) धरावे ग्रहण करावे श्रवण । जेणे नारायण तुष्ट होय ॥१॥ साधन ते राहू तोचि जाणा राहू । चंद्रसूर्य देहू ग्रासीतसे ॥२॥ नरदेह हा तो पर्वकाळ थोर । साधी का साचार स्मरणमात्रे ॥३॥ दास म्हणे हे तो गुरूनामे कळे । यावीण नकळे काही केल्या ॥४॥

२६६) देवाचे दर्शन उभवोनी गुढी । कामक्रोध पाडी पाडवा तो ॥१॥ थोर पुण्ययोगे जडेल ही गोष्टी । देवा होईल भेटी सहजेची ॥२॥ भक्तीची ही काठी भाव परिपूर्ण । नाम लिंब खूण अनुभवाची ॥३॥ दास म्हणे करी अमृत सेवन । होईल सुखी जाण अखंडित ॥४॥

२६७) देही अहंकार गुप्त । सत्त्व रज तम युक्त ॥१॥ तीन पुरामाजी राही । तोचि बाह्य प्रगट पाही ॥२॥ देवा जिंकोनी राहिला । धाक वाटे सकळाला ॥३॥ दास म्हणे हा त्रिपुर । जेथे बद्ध चराचर ॥४॥

२६८) धरावे ग्रहण करावे श्रवण । जेथे साधुजन विसावले ॥१॥ पहावे दृष्टीसी प्रबोध सूर्यासी । जो स्वयंप्रकाशी अखंडित ॥२॥ राहू राहू केतू कैसा ग्रासे त्यासी । ग्रास तो तयासी कदा नाही ॥३॥ गुरूकृपे गुरूआज्ञेचे ग्रहण । धरावे ग्रहण दास म्हणे ॥४॥



संसार

२६९) फसवी माया वोडंबरी । हातखंडा ज्या प्रकारी ॥१॥ मोह माया अनिवार । देही देवा पाडी विसर ॥२॥ जुने देई नवे घेई । ऐशा व्यापारी गुंतवी ॥३॥ जुने ठेवणे मोलाचे । दवडिती ना ते देवाचे ॥४॥ जुने ठेवणे रामनाम । दासा करी पूर्ण काम ॥५॥

२७०) संसाराचा मोह अति अनिवार । कोण उपचार तोडावया ॥१॥ कैसा मी निघेन सांगा हो यातून । कोणते साधन करू सांगा ॥२॥ माया मोह रंगी रंगेवीण जाणे । नाम अंतरखुणे रूप पाही ॥३॥ दास म्हणे किती सांगो वेळोवेळा । बंधन तयाला पुन्हा नाही ॥४॥

२७१) संसाराचे वोडंबर । असुरी मायेचा विस्तार ॥१॥ वस्त्रे जैसे का शरीर । तैसा झाकी रघुवीर ॥२॥ अधिष्ठान जिला हरी । नेदी भेटवू श्रीहरी ॥३॥ सुरामाजी नाही मन । असुरी मायेचे लक्षण ॥४॥ सुरामाजी नामी जाता । दासा मोही ना सर्वथा ॥५॥

२७२) अशुद्ध मायेचा प्रकार । भास दावी जगदाकार ॥१॥ सर्व जगा भूल घाली । पंचभूताचिये खोळी ॥२॥ मायेचा हा मार थोर । घाली चौऱ्याऐंशीचा फेर ॥३॥ दास म्हणे ऐसी माया । नामी जाईल विलया ॥४॥

२७३) हरिमायेचा नवलाव । ब्रह्मादिका न कळे माव ॥१॥ घाली प्रपंच झापडी । निद्रा आळस परवडी ॥२॥ हरिनामे हरिमाया । जाय सहजी विलया ॥३॥ ऐसी नामाची महती । देव दासाचा सांगाती ॥४॥

२७४) जनाचिया मना पाडतसे भुली । जाण सदा काळी हरिमाया॥१॥ मुखी नाम गाता माया काय करी । ठेवी हात शिरी नारायण ॥२॥ आपुल्या प्रभावे विसरवी देवा । नाचविते जीवा दास म्हणे ॥३॥

२७५) काय भ्रमाचे कारण । कैसे भ्रमाचे लक्षण ॥१॥ भ्रम प्रपंच पडदा । देवा आड घाली सदा ॥२॥ एका दावी दोनपण । माया भ्रमाचे लक्षण ॥३॥ दास गुरूनाम घेता । निर्भ्रमचि देव हाता ॥४॥

२७६) विषयाचा मधुबिंदू । जीवा लोटी दुःखसिंधू ॥१॥ विषय सुख येथे गोडू । परी परिणामी कडू ॥२॥ मोह त्याचा आवरिता । देव त्याची वाहे चिंता ॥३॥ माजी सुटायाचे कोड । दासा नामाची सांगड ॥४॥

२७७) काय इंद्रियासी आत्मसुख गोडी । नोहे परवडी बहिर्मुखा ॥१॥ काय दुग्धगोडी असे गोचिडासी । संनिध वस्तीसी राहोनिया ॥२॥ मकरंद गोडी काय दर्दुरासी । असता बुडाशी कमळाच्या ॥३॥ जीवा आत्मसुख नामाच्या चिंतनी । स्वभाव करणी दास म्हणे ॥४॥

२७८) देह रोखा नाम सिका । मानेल तो धन्य देखा ॥१॥ देवाजीचे दरबारी । मानीना त्या दंड भारी ॥२॥ काळ देवाचा शिपाई । तया नेई यमालयी ॥३॥ दास म्हणे नाम धरी । रोखा सिका मान्य करी ॥४॥

२७९) फळकट तो संसार । सकळ साधनाचे सार ॥१॥ होई परमार्थी कृपण । तोचि जाणा जगी धन्य ॥२॥ श्वासोश्वास वाया नेदी । नाम घेई तयामधी ॥३॥ चित्ती ज्याच्या नाम धन । सदा ठेवी तेथे मन ॥४॥ ऐशी कृपणता बरी । दास म्हणे त्याचा हरी ॥५॥

२८०) संसाराचे गावी । सुख अणुमात्र नाही ॥१॥ अग्नी पल्लवी बांधिता । कैसे सुख येई हाता ॥२॥ विंचवाचे मेळी । कैची सुखाची आरोळी ॥३॥ ढेकणाचे बाजे पाही । कैची सुखनिद्रा येई ॥४॥ सुख वाटे व्हावे जीवा । मिळे देवाचिया गावा ॥५॥ विचाराचे वाटे जाता । दासालागी प्रसन्नता ॥६॥

२८१) संसार कावडी घेवोनिया खांदी । जीव जात मांदी कष्टी होये ॥१॥ विषय सुखजल भरलेसे ज्यात । सेवोनि अतीत कोण झाला ॥२॥ हरिनाम कावडी नामामृत जल । सेविता निर्मळ मुक्ती पावे ॥३॥ दास म्हणे ऐसा कापडी जहाला । आत्मस्वरूप त्याला मिळून जाय ॥४॥

२८२) संसार कावडी काढील कावडी । धरावी आवडी हरिनामी ॥१॥ समता कावडी रामनाम भरी । धरावी ते शिरी प्रेमभावे ॥२॥ होवोन कापडी मोक्षमार्ग जोडी । धरोनिया गोडी हरिनामी ॥३॥ ऐशी हे कावडी जन्मबंध तोडी । संतसंग जोडी दासालागी ॥४॥

२८३) जीव हा प्रवासी । मार्ग चुकला आपैसी ॥१॥ सांडेनिया नीट । आडरानी धरिली वाट ॥२॥ जग ही तो धर्मशाळा । नामधामी जाई भला ॥३॥ भक्तिमार्गीचा कापडी । दास चालला तातडी ॥४॥

२८४) जन्ममरण चक्रव्यूह । माजी सापडला जीव ॥१॥ राही घालीत वळसे । जन्म आणि मरणा ऐसे ॥२॥ मरण जन्म जन्म मरण । करिता गेले आत्मपण ॥३॥ वाट एक नरदेह । गुरूनामी धरी सोय ॥४॥ सोय धरोनि सुटले । गोविंद म्हणे नवल केले ॥५॥

२८५) जन्ममरणाचा फेर । जीव करी येरझार ॥१॥ फेर चुकाया

वळसे । घेई रामनाम सोसे ॥२॥ सहा ओस नाम घेता । नुरे जन्ममरण व्यथा ॥३॥ नवल तयाची महती । दास म्हणे सांगो किती ॥४॥

२८६) जन्ममरण चक्रव्यूह । माजी सापडला जीव ॥१॥ जन्मा अंती ये मरण । मरणातून पुनः जन्म ॥२॥ मरण जन्म जन्म मरण । करता गेले आत्मपण ॥३॥ दास म्हणे चक्रव्यूह । नामे निरसे संदेह॥४॥

२८७) जगी असे कोण मायबापावीण । माय बाप खूण ओळखावी ॥१॥ पुत्र माय बाप होती एकमेक । एकमेका देख कर्मयोगे ॥२॥ लाट येता काष्ठे एक होती जाती । तैशी आहे स्थिती संबंधाची ॥३॥ सर्व मायबापा जो का मायबाप । जाणता निष्पाप दास म्हणे ॥४॥

२८८) जन चालले स्वच्छंदी । साधुबोध नये बुद्धी ॥१॥ धर्मखूण विसरली । बाह्य प्रवृत्ती चालली ॥२॥ एक देव नोळखिती । व्यर्थ वाद वाढविती ॥३॥ दास म्हणे ऐसे जन । नाही आपणा कारण ॥४॥

२८९) संसाराचा भक्त झाला । आणा सरेना तयाला ॥१॥ नाम लक्षणाने युक्त । होई खरा हरिभक्त ॥२॥ करी देवाजीची भक्ति । देव चिंता वाहे चित्ती ॥३॥ दास म्हणे देव देणे । वर्णवेना कोटिगुणे ॥४॥

२९०) संसारात मन संसार धरिला । देव देव त्याला केवी भेटे ॥१॥ संसारात चित्त संसारी आसक्त । होता अनासक्त मुक्तचि तो ॥२॥ धरले संसारे सोडीना संसार । पाहता विचार भ्रममूल ॥३॥ संसरण हाचि पाहता संसार । बा रे सोडणार तुझा तूची ॥४॥ मनी राम जप संसार सुटला । दास म्हणे झाला धन्य तोचि ॥५॥

२९१) संसारी येऊनी तोचि कृतकृत्य । देह झिजवीत देवकाजी ॥१॥ संसारी राहूनि तोचि कृतकृत्य । कृत ते करीत अंतर्यामी ॥२॥ दास म्हणे नाम देवाजीचे कृत । सोपे अखंडित आवडी गाई ॥३॥

२९२) काय केलीयाने जन्म हा सफळ । जेणे घननीळ सखा होय ॥१॥ सांगा मज स्वामी उपाय बरवा । जेणे जीवशिवा भेटी होये ॥२॥ पापी दुराचारी ऐसाही उद्धरे । विश्वास जै धरे गुरुनामी ॥३॥ दास म्हणे करी नामाचे स्मरण । नरदेह धन्य तरीच बापा ॥४॥

२९३) संसार सुफळ होणे । रामनामाचेनि गुणे ॥१॥ संसारात राम आहे । संसार काय शोधुनी पाहे ॥२॥ गोविंद म्हणे विचारोत्पत्ती । विचार लय नामे होती ॥३॥

२९४) तोचि सांसारिक भला । जेणे संसार जाणला ॥१॥ संसरणामाजी नाम । सांसारिका हेचि काम ॥२॥ संसरण हा संसार । वाया चाले येरझार ॥३॥ येर विषय उपभोग । अन्य जन्मीचे ते अंग ॥४॥ दासा सुखाचा संसार । एक जोडल्या ईश्वर ॥५॥

२९५) संसार नगर । संसरणी नुरती गर ॥१॥ लटिका व्यवहार । जीवा संगेची संसार ॥२॥ संसरणी नामोच्चार । दासा सुफल संसार ॥३॥

२९६) संसरणी जो निराळा । ऊर्ध्वपंथी ज्याचा डोळा ॥१॥ तोचि जहाला निराळा । म्हणुनी म्हणती त्या आगळा ॥२॥ सर्वी असुनी नसे त्यात । दास म्हणे झाली मात ॥३॥

२९७) कैसे असावे संसारी । जेणे भेटेल श्रीहरी ॥१॥ रामनामी जो रंगला । तेणे संसार साधला ॥२॥ घराचारी वर्ततसे । परी चित्त नामी असे ॥३॥ राम संसारी भरला । गोविंद म्हणे मुक्त झाला ॥४॥

२९८) कैसे असावे संसारी । ऐका वर्तायाची परी ॥१॥ प्रपंचासी धरू नये । आसक्तता कामा नये ॥२॥ चित्त देवोनि श्रीहरी । नाम जपावे अंतरी ॥३॥ ऐसे असता संसारी । दास म्हणे त्याचा हरि ॥४॥

२९९) कैसे असावे संसारी । जेणे भेटी देई हरी ॥१॥ एक नाम जपता जाण । कोटी जन्माहोनी पुण्य ॥२॥ साधे संसार परमार्थ । दास म्हणे हो यथार्थ ॥३॥

३००) तीही साधिला संसार । नामस्मरणी जे सादर ॥१॥ येर जाहले संसारी । कुटुंब भार वाहुनी शिरी ॥२॥ नरदेही राम बोला । संसाराचा शेवट भला ॥३॥ दास म्हणे हे दुर्लभ । परी गुरुकृपे सुलभ ॥४॥

३०१) सहाकडे सरणे । तोचि सासर जाणणे ॥१॥ सहा ओळखणे काय । मनी विचारोनी पाहे ॥२॥ गोविंद म्हणे पैल जाणे । सहा अंतरी मुरवणे ॥३॥

३०२) दुःखाचे ते सुख कशाने होईल । परमार्थ घडेल प्रपंचात ॥१॥ सांगा मज स्वामी बरवा उपाय । खरा तरणोपाय संसारात ॥२॥ दास म्हणे नाम घेई वेळोवेळा । बोध तो आगळा आन नाही ॥३॥

३०३) जन्म दुःखाचे कारण । कैसे सुटावे यातून ॥१॥ दुःखरूप हा संसार । जेणे संगे दुःख फार ॥२॥ धरोनिया संसारासी । दुःख होतसे जीवासी ॥३॥ नामे संसार सुटता पाही । दास म्हणे सुखचि राही ॥४॥

३०४) जावोनिया दुःख शीण । व्हाया खरे सुख जाण ॥१॥ जेणे नुरे तळमळ । देव भेटे घननीळ ॥२॥ देह पंढरीसी जाई । नामामाजी रंगुनी राही ॥३॥ सोहंभाव धरुनी पाही । दास म्हणे आत जाई ॥४॥

३०५) ज्ञानी म्हणोनिया नाम नेघे वाचे । अज्ञानिया वाचे केवी येई ॥१॥ दोनीही घरीचा पाहुणा उपाशी । तैसे या जीवासी ज्ञानाज्ञाने

॥२॥ प्रपंचही गेला परमार्थ बुडाला । त्रिशंकूसा झाला अंतराळी ॥३॥ ज्ञानी अज्ञानिये काय हो करावे । दास म्हणे घ्यावे नाम भले ॥४॥

३०६) कस्तुरी म्हणता फाके परीमळ । लक्षण सबळ ओळखावे ॥१॥ तैसे ज्ञानी असे म्हणावे कोणास । लक्षण सदृश जया अंगी ॥२॥ प्रकाशावाचोनी कैसे दीपपण । जाणे ज्ञानचिन्ह गुणयोगे ॥३॥ सर्वही लक्षणे रामनामे येती । माया मोह भ्रांती नुरे तेथे ॥४॥ अक्षराचे वर्म नेणे तो अज्ञानी । त्याचे संगे हानी दास म्हणे ॥५॥

३०७) जैसे देणे तैसे घेणे । काय इतरा कारणे ॥१॥ हा तो नशीबाचा खेळ । पाहता अदृष्ट केवळ ॥२॥ काय करील परिवार । माता पिता सहोदर ॥३॥ दास म्हणे हे प्रकार । एक जाणे रघुवीर ॥४॥

३०८) जेथ क्षणैक राहणे । त्याची काळजी वाहणे ॥१॥ तोचि जाणावा अज्ञानी । गोविंद नाम नेघे वाणी ॥२॥ विश्वासला दुजावरी । नाही विचार अंतरी ॥३॥ दास म्हणे नाम ज्ञान । येर जाणावे अज्ञान ॥४॥

३०९) एक लौकिक साधू जाता । काही येत नाही हाता ॥१॥ लौकिक बहिरंग पसारा । नका देऊ अंतरी थारा ॥२॥ गोविंद म्हणे नाम घेता । नुरे लौकिक सर्वथा ॥३॥

३१०) काय लौकिकाची सेवा । नाही आवडत देवा ॥१॥ शुद्ध अंतर करून । करी नामाचे चिंतन ॥२॥ चाले चिंतन रहाटी । तरी होय देव भेटी ॥३॥ दास म्हणे अवघे जन । सांडुनि धरी देव चरण ॥४॥

३११) कृतादि युगात कलियुग जाण । कलियुगी जाण कृतादिक ॥१॥ कलियुगी रामकृष्ण उच्चारण । कृती तेचि जाण कृतयुग ॥२॥ त्रिगुणरहित हरिगुणी बोधिला । कलीत साधिला त्रेता काळ ॥३॥ नाम विस्मरण द्वैतानुसंधान। कलियुग जाण तीन्ही युगी ॥४॥ अल्प काळामध्ये

नामस्मरणे मुक्ति । कलीची विख्याती भली जाणा ॥५॥ परी जरी घडे संतांचा हा संग । तरीच हा योग दास म्हणे ॥६॥

३१२) कली म्हणजे द्वैत । मी तू पणा हाचि हेत ॥१॥ द्वैत निर्मिले अद्वैता । हे तो ठावे साधुसंता ॥२॥ जाणुनी देवाजीचा हेत । दास नामी जडवी चित्त ॥३॥

३१३) कलीयुगी तरणोपाय । कलीयुगी नाम गाय ॥१॥ काय कलीचे लक्षण । कली म्हणजे भांडण ॥२॥ कली दोषाचा पसारा । कली आवरिला वारा ॥३॥ दासा रामपदी सोय । तया नाही कली भय ॥४॥

३१४) कृतयुगामाजी कलीयुग जाणा । कलीयुगी जाणा कृतयुग ॥१॥ चारी युगे एकमेकात असती । ओळखण चित्ती धरिता बरे ॥२॥ मुखी हरिनाम कलीयुगी कृत । असेल सुकृत तरीच घडे ॥३॥ त्रेतायुगामाजी दिसे कलीयुग । होता बुद्धीहीन दास म्हणे ॥४॥

३१५) संसार बंधन कशाने सुटेल । मनासी होईल समाधान ॥१॥ संत संगतीने नाम मुखी गाता । बंधन सर्वथा उरेचिना ॥२॥ रामनामयोगे त्याचा सर्वेश्वर । सत्ता त्याची थोर दास म्हणे ॥३॥

३१६) संसार मोहाची निवृत्ती । भेटी होता रघुपती ॥१॥ देव भेटी कैसी होई । कसोनिया नाम घेई ॥२॥ संसार म्हणजे काही नाही । मोह अनिवार पाही ॥३॥ नाममय वृत्ती होता । देव वाहे दास चिंता ॥४॥

नरदेह

३१७) नाशीवंत देह लावावा कारणी । नाम उच्चारणी देवाजीच्या ॥१॥ देहाचे साधनी पापात्मा पुण्यात्मा । होता अंतरात्मा कळो येई ॥२॥ दास म्हणे ऐसा नरदेह दुर्लभ । साधिलिया लाभ देव एक ॥३॥

३१८) सर्व साधनाचे मूळ । एक नरदेह केवळ ॥१॥ नरदेही नाम घेता । सर्व साधने ती हाता ॥२॥ अन्य साधनी वाया जाय । नाम घेता धन्य होय ॥३॥ दासा एक नामे पाही । अशक्य ते काही नाही ॥४॥

३१९) नाम उच्चारणी लाविता शरीर । भेटे रघुवीर तेणे योगे ॥१॥ म्हणोनिया जनी सांडोनी प्रकार । नामचि साचार उच्चारावे ॥२॥ दास म्हणे किती सांगो वेळोवेळा । जेणे घननीळा भेटी होय ॥३॥

३२०) अन्य देही वाया जाय । नरदेही नाम गाय ॥१॥ आणिक नको करू काही । एक काम करीत राही ॥२॥ ज्यात नाही रामनाम । ते जाणावे आणिक काम ॥३॥ एक काम रामनाम । दासा भेटवी मेघश्याम ॥४॥

३२१) लावावा कारणी मनुष्याचा देह । इतर ते काय अन्य देह ॥१॥ नरदेही नाम दिला ज्ञान ठेवा । उपयोग जीवा व्हावा म्हणुनी॥२॥ नरदेहापुढे देवादिक देह । दास म्हणे पाहे गौणची ते ॥३॥

३२२) हेचि देहाची सार्थकता । रामनामी देह झिजता ॥१॥ रामनाम

सदा घेणे । हेचि देह झिजविणे ॥२॥ गोविंद म्हणे नरदेही । रामनाम सदा पाही ॥३॥

३२३) नरदेही मोठे काय । हरीनामाचा उदय ॥१॥ नरदेह महापर्व । प्राप्त जाहले अपूर्व ॥२॥ गुरुकृपा योगे जाण । पर्व साधले संपूर्ण ॥३॥ गुरुचरण सागरी । दास प्रेमे बुडी मारी ॥४॥

३२४) नरदेही घेऊनी जन्म । कोण आचरावे कर्म ॥१॥ त्याचा सांगावा विचार । काय आचार प्रकार ॥२॥ नरदेही महावाक्य । नाम घेणे हेचि शक्य ॥३॥ आता दुजे नको कर्म । दास म्हणे घ्यावे वर्म ॥४॥

३२५) नरदेही नाम साधा । हाचि ओळखावा सांधा ॥१॥ रामरस घेई घुटका । तरीच प्राण्या होईल सुटका ॥२॥ असा नरदेह काही । पुनःपुन्हा येत नाही ॥३॥ ज्याची नामावीण वाणी । फिरे चौऱ्याऐंशीची खाणी ॥४॥ दास म्हणे सांगो किती । अर्थबोध घेई चित्ती ॥५॥

३२६) नरदेही येऊनी काय । एक धरी संतपाय ॥१॥ तरी नाही भवभय । लागे रामनाम सोय ॥२॥ ऐसा सत्संग महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥३॥ दास म्हणे त्याचा देव । थोर तयाचे वैभव ॥४॥

३२७) नरदेही असे बाग । जे का अपूर्व आणि चांग ॥१॥ जियेमाजी नाम फळ । मिळे जे का सुफळ ॥२॥ गोविंद म्हणे भरली जाई । येणे ज्यात भरूनी राही ॥३॥

३२८) देणे घेणे जव आहे । तोवरी हा देह राहे ॥१॥ देणे घेणेचा हा बंध । तोवरी जनाचा संबंध ॥२॥ नाना संबंधाचे योगे । देणे घेणे करिती वेगे ॥३॥ देणे घेणे जाणता पाही । दासा भवबंध नाही ॥४॥

३२९) इहलोकी नरदेह । हा तो दुर्लभची पाहे ।।१।। नरदेहीचे भजन । हे तो दुर्लभची जाण ।।२।। नरदेही गुरूप्राप्ती । हे तो दुर्लभ निश्चिती ।।३।। दासा गुरुनामी प्रीती । दावी दुर्लभ प्रचीती ।।४।।

३३०) नरदेह दुर्लभ नाम हे दुर्लभ । पाय हे दुर्लभ विठोबाचे ।।१।। सकळामाजी सोपे नाम घेई वाचे । पाय त्या देवाचे जोडतील ।।२।। शांतचित्ते मुखी उच्चारिता हरि । कैवारी श्रीहरि होतसे ।।३।। एका जनार्दनी त्रिविध सुलभ । सर्वत्र दुर्लभ असोनिया ।।४।। आपुले अभंगी नाथ हे बोलती । कृपेची संगती दास म्हणे ।।५।।

३३१) रामनाम गुणे नरदेहा मोल । साधन बहुमोल सर्वाहुनी ।।१।। सम पापपुण्य नरदेह प्राप्ती । आयुष्य महती नरदेही ।।२।। रामनाम गुणी रामरूप मन । नामाचे स्मरण सदा चाले ।।३।। दोन त्यागावया तिजा अंगीकारी । चौथा येता करी तिजा टाकी ।।४।। सर्व कामामाजी मुख्य हेची काम । दास म्हणे नाम मुखी गावे ।।५।।

३३२) अंतरात्म दर्शने आत्मरूप होई । दुर्लभता पाही नरदेही ।।१।। नरदेह सांग नरदेह सांग । हरिकृपा सांग साधुनी घेई ।।२।। दास म्हणे प्राप्त नोहे वेळोवेळा । साधनी घे चाळा रामनामी ।।३।।

३३३) नरदेही करावे देवाचे दर्शन । धर्म संरक्षण उमगावे ।।१।। हरिमुखी गाता थोर पुण्य होता । आचार सर्वथा ऐसा करी ।।२।। स्नान संध्या जप तप होम हवन । सदाचारी मन ओळखावे ।।३।। अतीतासी दान गुर्वाज्ञा पालन । मायबाप सेवन निरभिमान ।।४।। भूतांचे पालन कंटक निर्दळण । घ्यावे ओळखून दास म्हणे ।।५।।

३३४) जव देह आहे आपुल्या स्वाधीन । करी रे स्मरण देवाजीचे ।।१।। मग वृद्धपणी घडेना सर्वथा । देवाजीची कथा मनी आल्या ।।२।। नामयोगे देह शोभतो सुंदर । पवित्र परिकर गोविंद म्हणे ।।३।।

३३५) देह नामी साह्य होये । देह पवित्र तो आहे ॥१॥ देह नामी साह्य होता । साधनाची सुलभता ॥२॥ रामनामयुक्त अन्न । देह पवित्र कारण ॥३॥ दास म्हणे सांगो काई । याचा अनुभव घेई ॥४॥

३३६) काळ युक्ती युक्ती करीतसे ग्रास । लवपळ त्यास दम नाही ॥१॥ नरदेही ज्ञान हे रत्न भांडार । लुटती साचार सहाजण ॥२॥ नाम हे रक्षिता काळावरी सत्ता । मग तया चिंता केवी उरे ॥३॥ दास म्हणे गाई नामाचे प्रबंध । होऊ नको धुंद मायायोगे ॥४॥

३३७) शिखरातील धन । घ्यावे मर्म ओळखून ॥१॥ त्यासी धका न लाविता । आहे घेणेचे तत्त्वता ॥२॥ नरदेह हे शिखर । रामनाम धनसार ॥३॥ साधुजनांचें वचन । असे जनाहोनी भिन्न ॥४॥ मोठे घारिष्ट धरावे । वर्म ओळखोनी घ्यावे ॥५॥ लक्षणेने ओळखिता । दास मुक्तची तत्त्वता ॥६॥

३३८) जैसे शिखरातील धन । तैसे रामनाम पूर्ण ॥१॥ बरवे साधन साधेना । सिद्धकृपे प्राप्त मना ॥२॥ दश लक्ष देवोनिया । शिखर नेले कळसा या ॥३॥ शिखर न पाडिता जाण । घ्यावी वेळा ती साधोन ॥४॥ एक लक्ष गुप्त ठेवा । दासे उमगोन घ्यावा ॥५॥

३३९) अवचिता पुण्ये जन्म प्राप्त झाला । नाही ध्यानी आला अवचिता ॥१॥ मस्करीत सर्वकाळ गमाविला । काळ साधियेला तोचि धन्य ॥२॥ धन्य तोचि प्राणी नामी रंगे वाणी । नामाचे चिंतनी काळ साधे ॥३॥ चिंता सोडोनीया चिंतन करावे । दासा घडे भावे गुरूकृपे ॥४॥

३४०) नरदेही होई जागा । रामनामी राही उगा ॥१॥ जागेपणाचे लक्षण । देही रामनाम खूण ॥२॥ तेथे ठेवोनिया मन । तयामाजी होई लीन ॥३॥ दास म्हणे सांगो किती । देही देवाची प्रचीती ॥४॥

३४१) परमार्थ आहे गुप्त । पाही शोधोनी देहात ॥१॥ देहामाजी परमार्थ । देहामाजी देव सत्य ॥२॥ देहयोगे सर्व घडे । देहामाजी देव जोडे ॥३॥ देह साधनी लाविता । मोक्षपद येई हाता ॥४॥ देहा आत सर्व काही । दास म्हणे नाम गायी ॥५॥

३४२) अर्धोदय पर्वकाळ । नरदेहीची सुवेळ ॥१॥ अर्ध अंतरी लपाले । तेचि उदयासी आले ॥२॥ ज्ञान उन्मनीसी आले । नामयोगे स्नान झाले ॥३॥ रामनामी याच देही । दासा अनुभव येई ॥४॥

३४३) तनू टाकुनी कीर्ती उरवी । मरण खुणा हे जाणावी ॥१॥ तनू सर्व भूतात्मक । कीर्ती रामनाम सम्यक ॥२॥ गोविंद म्हणे ते मरण । ज्यात नाही उणेपण ॥३॥

३४४) नरदेही गुरूगेही । मौज पाहुनि मुक्त होई ॥१॥ रंग आनंद भरला । थोर गुरूंचा मामला ॥२॥ येर घरातील मौज । पळवीना यम फौज ॥३॥ दास म्हणे याची कळ । गुरुनामी कळो येईल ॥४॥

३४५) दिला नरदेह उत्तम कृतार्थ । व्हावया निश्चिंत पूर्ण जगी ॥१॥ तोचि बापमाय पंढरीचा राय । मनी त्याचे पाय सर्वकाळ॥२॥ मग तरी नाही काळाचेही भय । बोलावे ते होय सहजेची ॥३॥ देवाचिया पदी राहतो कृतज्ञ । तो एक सर्वज्ञ दास म्हणे ॥४॥

३४६) देहाची ती शुद्धी । कैशी पावे सांगा बुद्धी ॥१॥ सेविलीया शुद्ध अन्न । शुद्ध देह परमाण ॥२॥ नामामाजी देह झिजे । देहशुद्धी तै पाविजे ॥३॥ रामनामयुक्त अन्न । करी देहासी पावन ॥४॥ देह झालीया पावन । दासा भेटे भगवान ॥५॥

३४७) अधोगती आणि गती । पापपुण्याची प्रचिती ॥१॥ पापपुण्य समानता । नरदेह येई हाता ॥२॥ पापपुण्याचे क्षालन । करिती हिशेब

सज्जन ॥३॥ निर्विकार नामी मन । दासा हिशेबाची खूण ॥४॥

३४८) अनंत जन्मीचे शेवट । नरदेह हा चोखट ॥१॥ पापपुण्याची समता । नरदेह आला हाता ॥२॥ नामी पापपुण्यातीत । दास म्हणे होती मुक्त ॥३॥

३४९) नरदेह शेवटीचा । तेथे शेवट आयुष्याचा ॥१॥ क्षण सर्वात मोलाचा । जीवालागी शिवत्त्वाचा ॥२॥ नाममय ते शरीर । करी नामाचा उच्चार ॥३॥ ऐसी रोकडी प्रचिती । जन्मांतरीचे संशय जाती ॥४॥ दास म्हणे हा शेवट । दावितांती संत स्पष्ट ॥५॥



मन

३५०) अति वाईटाचे भले । कोण करील चांगले ॥१॥ मन काढी विषयातुनी । ऐशी कोणती करणी ॥२॥ अजित नाम उच्चारण । करी सकळा पावन ॥३॥ दास म्हणे गुरुवीण । कळो येईना ही खूण ॥४॥

३५१) जैशी लावावी आवडी । तैशी मना लागे गोडी ॥१॥ करावे ते वाटे बरे । बरवे शोधावे विचारे ॥२॥ चांगले ते लागे कडू । वाईट ते लागे गोडू ॥३॥ दास म्हणे नको काही । आवडीने नाम घेई ॥४॥

३५२) काय मना तुज वाटतसे गोडी । संसाराचे आमीष तोडी ॥१॥ जे जे घडते ते ते पाही । सर्व काही तुज हितकर होई?॥२॥ स्त्री आदिक झाली सकल ही काही । गोड बोलतील वाट तू पाही ॥३॥ अज्ञान तुझे समजुनी घेई । आपुले मनीचे कोण सोडील पाही ॥४॥ लाथा स्वजनांच्या गोड मानुनी । देवचरण का देणी सोडुनी ॥५॥ निर्लज्ज होऊनी संसारी पडसी । देवा नमिता लाज तू धरिसी ॥६॥ गाढवही बरा तुजहुनी पाही । मानव म्हणविता लाज नाही ॥७॥ शहाणपण तुझे कोठे गेले । शहाणा म्हणविसी निर्लज्ज बोले ॥८॥ लाथा खाता तोंडचि फुटले । भूषण मानिसी मोठ्या डौले ॥९॥ नाक कापले तरी शुभ म्हणसी । भोके आहेत हे दाखविसी ॥१०॥ हाडे कातडे रक्तमांस पाही । यांचे शरीर हे सुंदर कायी ॥११॥लोचट होऊनि फिरफिर पाही । लाथा खाया लाजचि नाही ॥१२॥ देवपणी तू लोचट होई । तुज ढकलीना

खचितची पाही ॥१३॥ लंपट विषयी होसी रिकामा । का रे न स्मरसी हृदयीच्या रामा ॥१४॥ कोण तुझे रे वाहसी काळजी । काय म्हणूनी करीसी जी जी ॥१५॥ जी जी करी तू हरिपदकमळी । जी जी न करिता व्यर्थ भागती ॥१६॥ सर्व समजते उमजत नाही । ज्ञान सर्वही व्यर्थचि होई ॥१७॥ आयुष्य चालले मरशील पाही । यमराजाचा नव्हसी जावई ॥१८॥ उरले आयुष्य नाम तू घेई । संसारी रमता नीच तू पाही ॥१९॥ देव मज दीना हात तू देई । हात देऊनी तुझा करी पाही ॥२०॥ पतीत गोविंद पावन पाही । आपुला केला हाके लवलाही ॥२१॥

(श्रीदासराम ले.व.क्र. २१३ पा.नं.१२-१३ नुसार वरील अभंग हा श्रीमामामहाराजांनी फाल्गुन शु.२ शके १८५८ म्हणजे सन १९३६ रोजी केला आहे.)

३५३) आशा व्याघ्री मारिता पाही । सर्व सिद्धी हाता येई ॥१॥ आशा मारणे कठीण । रामनामी देई मन ॥२॥ मनामध्ये राहे आस । रामनामे हो निरास ॥३॥ दास म्हणे तो निरास । चराचर त्यासी वश ॥४॥

३५४) आशात्याग तो हा सोज्वळ मारग । शुभेच्छा षष्टांग नैराश्यता ॥१॥ आशा धरोनिया कोणा होय सुख । आशा व्याघ्री मुख पाहो नये ॥२॥ भोगाशेचा तंतू राहता अंतरी । ज्ञान त्या पामरा काय करी ॥३॥ दास म्हणे ऐशी अनुभव दृष्टी । रामनाम गोष्टी उमगता ॥४॥

३५५) मन नामी न देणे । हीच निंदा ओळखणे ॥१॥ निंदा न धरी अंतरी । जेणे भेटेल श्रीहरी ॥२॥ गोविंद म्हणे निंदक गुरू । संत मानिताती थोरू ॥३॥

३५६) हरिनामाचा व्यवहार । जाणे तोचि धन्य थोर ॥१॥ काय घोकिले अनंत । कायेमाजी तो अनंत ॥२॥ व्यवहार ज्ञानविण । सर्व

जाणावे अज्ञान ।।३।। मनावरी होता स्वार । साधे नामाचा व्यवहार ।।४।। संसारीचा व्यवहार । गोविंद म्हणे नव्हे सार ।।४।।

३५७) आल्या अतिथीसी द्यावे अन्नदान । वेदांचे वचन ऐसे असे ।।१।। अन्नदान करी अन्नदान करी । नाही दुजी सरी अन्नदाना ।।२।। परी ते करावे मनेचि उत्तम । दान हे सकाम बरे नव्हे ।।३।। सुविचार अन्न अतीता अर्पावे । अंतरी धरावे दास म्हणे ।।४।।

३५८) मन नामी जडता पाहे । मनामाजी सर्व आहे ।।१।। करी मनाचे शोधन । माजी प्रगटे भगवान।।२।। मन ठेवोनि बाहेरी । साधने ती नानापरी ।।३।। साधती ना म्हणे दास । उन्मनीत पूर्णत्वास ।।४।।

३५९) देव पहाण्याची खूण । दृष्टी करी सावधान ।।१।। दहा सहा जंव नाही । दृष्टी सावधान पाही ।।२।। त्रिगुणांच्या पैल होणे । हेचि सावधान जाणे ।।३।। दास म्हणे नाम खूण । दृष्टी करी सावधान ।।४।।

३६०) मन ही तो गुरुकिल्ली । नेई ब्रह्माचे महाली ।।१।। मनेवीण काही झाले । ऐसे नाही कळो आले ।।२।। इंद्रियभूती मन वेताळ । गुरुनामी धरी ताळ ।।३।। जरी मन हाता येई । दासा देव साह्य होई ।।४।।

३६१) फिरली गुरूकिल्ली । आता हो दुसरी नाही वल्ली ।।१।। शास्त्र पुराण धर्म । सद्गान वदे कृष्ण बोली ।।२।। सुलभ उत्तम सकळ । सार ते रामनाम बोली ।।३।। गुरुने सोपी वाट दाविली । दासे आक्रमिली।।४।।

३६२) मन मोही सर्व काही । साक्षात्कार निजदेही ।।१।। गुरूकृपे सर्व घडे । देव देव भेटी जोडे ।।२।। गुरूकृपा गुरूनाम । दास होय पूर्णकाम ।।३।।

३६३) मने केले मने केले । तेचि साधन साधिले ।।१।। मनोमय पूजा ।

आवडे ती गरूडध्वजा ॥२॥ काय मनावीण साहे । पूजनादिक पसारे ॥३॥ उत्तम हे हरिनाम । दास म्हणे पूर्ण काम ॥४॥

३६४) मन देव मन देव । अनुकूल करी सर्व ॥१॥ वेळ नाही नाम घ्याया । ऐसे बोलती कासया ॥२॥ मनी नाही ऐसे म्हणा । खूण कळली साधुजना ॥३॥ एकाग्र हे होता मन । कळे अंतरीची खूण ॥४॥ मने नामाचे चिंतन । सर्व सिद्धी वश जाण ॥५॥ उन्मनीत जपता नाम । देव अंगे करी काम ॥६॥ दास म्हणे ऐसे मन । सदा राखावे प्रसन्न ॥७॥

३६५) मनाचे हे भांडे करूनी मोकळे । साठवी आगळे रामनाम ॥१॥ चित्त पेटी रिती करूनि लवलाही । साठवावे पाही रामनाम ॥२॥ सायासे जोडावे रामनाम भाग्य । होशील तू योग्य त्रिभुवनी ॥३॥ सकारात जावे सायास बरवे । बुद्धीमाजी घ्यावे दास म्हणे ॥४॥

३६६) मनोभावाने भजन । जरी व्हावा भगवान ॥१॥ मनोभाव नाही जरी । भजन ते काय करी ॥२॥ मनोवृत्ती समाधान । हेचि देवाचे भजन ॥३॥ मनामाजी नाम घेता । दास म्हणे भाव हाता ॥४॥

३६७) म्हणविती दास । मनी संसाराची आस ॥१॥ तया कैचा भेटे देव । मनी जयाच्या अभाव ॥२॥ भाविकांचेसाठी देव । करी अद्भूत लाघव ॥३॥ दासाचे ते सगुण ध्यान । मुखी हरिनाम गान ॥४॥

३६८) नामी धरोनि विश्वास । टिकवावा रात्रंदिस ॥१॥ नामी विश्वास टिकविणे । हेचि मुख्य कार्य जाणे ॥२॥ गुरूदेव यांचे वचन । येथे विश्वासावे मन ॥३॥ दास म्हणे विश्वासता । सायुज्यता येई हाता ॥४॥

३६९) हेचि जाणावे नमन । मन करावे अधीन ॥१॥ मना अधीन जो

झाला । सर्व दुःखे प्राप्त त्याला ॥२॥ गोविंद म्हणे मन । नामी करावे उन्मन ॥३॥

३७०) जेणे मन येई हाती । ऐशी काही करी युक्ती ॥१॥ मन बाहेर विस्तारे । लौकिकांत वाटे बरे ॥२॥ देहामाजी नाम युक्ती । गुरुकृपे येई हाती ॥३॥ युक्ती असे नामी जाण । जेणे निवे दास मन ॥४॥

३७१) आधी मन हाती घेई । एक त्याची खूण देही ॥१॥ चित्ती मन प्रवेशता । नाम साधनी सर्वथा ॥२॥ चित्त मन एक होता । आधी मन येई हाता ॥३॥ आधी मनाची अनुभूती । दासा तोचि गणपती ॥४॥

३७२) ब्रह्म शोधाया कारणे । काय उपाय तो कोणे ॥१॥ खं ब्रह्मेति व्यजानात् । ऐसे बोलिला वेदांत ॥२॥ आधि मन हाती घेई । गुरूकृपे कळो येई ॥३॥ मन झालिया आधीन । मग भेटे भगवान ॥४॥ कैसे मन हाती येई । दास गुरुनाम घेई ॥५॥

३७३) मनाते जिंकिता तोचि सदा सुखी । अधीरता दुःखी विस्मरणाने ॥१॥ मनाते जिंकिता प्रगटे स्मरण । स्मरण देवखूण उगमाची ॥२॥ देव प्राप्त झाल्या कैचे उरे दुःख । अवघेची सुख अंतर्बाह्य ॥३॥ मना ते साधाया गुरुनाम साधी । दास म्हणे उपाधी मनी नाही ॥४॥

३७४) मन साधिलीया साधेल भगवान । करणे ते आन कासयासी ॥१॥ मन नामी येता मन हे साधले । मना ते जिंकिले जग जिंकी ॥२॥ तोचि खरा मुक्त नाही ज्या बंधन । करी सोडवण सकळांची ॥३॥ तेचि तीर्थयात्रा सर्व काही जाण । जेणे नारायण वश होय ॥४॥ मन नामी जडे तो करी उपाव । अंतरीचा भाव दास बोले ॥५॥

३७५) जया वाटे मुक्त व्हावे । तेणे मनास जपावे ॥१॥ होऊ नये मनाधीन । करी मनासी अधीन ॥२॥ मनाचिया उठाऊठी । नाम

उच्चारावे कंठी ॥३॥ मन जपावे अंतरी । मन वसे ज्या विवरी ॥४॥ ऐसे मन जपता पाही । दासा भय नसे काही ॥५॥

३७६) साधिलीया मनोजय । तरी साधका विजय ॥१॥ जेणे मनासी जिंकिले । तेणे सर्वांसी जिंकिले ॥२॥ मन हे तो चंचळ जाण । नाम युक्ती ये आधीन ॥३॥ जो का मनाधीन झाला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥४॥ दासा मन हे अधीन । अशक्य ते शक्य जाण ॥५॥

३७७) साधिलिया मनोजय । नव्हे कोठे पराजय ॥१॥ गती संथ जरी । दृष्टी होय निर्विकारी ॥२॥ दृष्टी संथ मन स्थिर । दासा नामी विजय थोर ॥३॥

३७८) तेचि एक वीर भले । ज्यानी मनासी जिंकिले ॥१॥ तेचि एक वीर जनी । मिताहारी जे भोजनी ॥२॥ पूर्ण शांती ज्यांचे मनी । तेचि एक वीरमणी ॥३॥ आवड ज्याते समरांगणी । तेचि बाह्यशूर गणी ॥४॥ वृत्ति स्थिर नामस्मरणी । तेचि वीर शिरोमणी ॥५॥ रामवीर हृदयी जाणा । दासा आला शूरपणा ॥६॥

३७९) मन ठेवावे एकांती । नामस्मरणी देवप्राप्ती ॥१॥ काय जगतील रीती । नाही सुखाची प्रचीती ॥२॥ एकांतीचा मार्ग पाही । गुरू दावितातो देही ॥३॥ मनाचेनि असे जाणे । दास म्हणे ओळखणे ॥४॥

३८०) मन होय चांग साधिता साधन । कैसे ते साधन कष्टेवीण ॥१॥ सुख सेवोनिया कोण सुखी झाला । विचारी मनाला आपुलीया ॥२॥ कष्टामाजी सुख घ्यावी ओळखण । प्रचीती प्रमाण दास म्हणे ॥३॥

३८१) मन करुनी चांग जी जी घडे सेवा । आवडे ती देवा अशास्त्रीही ॥१॥ जयाचिये मनी नसेचि विकल्प । नामाचा संकल्प प्रेम मनी ॥२॥ चांग नाम मुखी सुमन चांगले । त्याचे देणे भले दास म्हणे ॥३॥

३८२) रामरूपी मनोवृत्ती । जडता संकल्प निवृत्ती ॥१॥ रामरूपी रिघता मन । प्रसन्नता शुद्धी खूण ॥२॥ मन झालिया निष्पाप । तेचि कैवल्याचे रोप ॥३॥ गंगाजळासम मन । होता दासा भगवान ॥४॥

३८३) आत्मतीर्थी बुडी देता । शुद्ध मन येई हाता ॥१॥ मन मोही आत्मस्नान । कळे बोलण्याची खूण ॥२॥ मन मोही ऐसे काही । आत्म्यावीण नसे पाही ॥३॥ आत्मतीर्थ आत्मनाम । दास म्हणे पूर्ण काम ॥४॥

३८४) मनाचिये शुद्धी होईजे त्रिशुद्धी । नसता मन शुद्धी वाऊगेची ॥१॥ प्राण नाही तरी काय ते शरीर । किंवा सरोवर जळेवीण ॥२॥ मन शुद्ध होता तेथे सर्व आहे । देव सांगताहे उद्धवासी ॥३॥ संकल्पे विकल्पे मनासी अशुद्धी । ग्रहण होता शुद्धी गुरुवाक्य ॥४॥ मनाचिया मार्गे जपता हरिनाम । मन होय राम दास म्हणे ॥५॥

३८५) मन जरी का प्रसन्न । येई सामर्थ्य दिसोन ॥१॥ मनाचे जे शुद्धरूप । निःसंकल्प निर्विकल्प ॥२॥ नाममय जो संकल्प । दासा सामर्थ्य अमूप ॥३॥

३८६) मन अनन्य होता पाही । मनामाजी सर्व काही ॥१॥ अनन्य भजने अनन्य । मन करावे प्रसन्न ॥२॥ नित्य भजने शुद्ध मन । होता भेटवी भगवान ॥३॥ नित्य भजन रामनाम । दासा भेटवी पूर्णकाम॥४॥

३८७) मानसाची शुद्धी होता । देव भेटेल तत्त्वता ॥१॥ रामनामी रिघता मन । अभेदता शुद्धी जाण ॥२॥ निवृत्तीच्या सुखी पाही । मन उन्मन ते होई ॥३॥ संकल्प विकल्प निरास । नामी कसे म्हणे दास॥४॥

३८८) मना आकळिता मुनी । हृषिकांचा ऋषी धनी ॥१॥ मन शुद्धी मुनी पाही । हृषिक शुद्धी ऋषी पाही ॥२॥ पाच मातृकात मन ।

नामे होतसे उन्मन ॥३॥ ऐशा मनी देव राही । दास विघ्नहर होई ॥४॥

३८९) मन करोनी निर्मळ । पाही देव एक वेळ ॥१॥ देव आहे पंढरीत । नामावीण नाही मात ॥२॥ उन्मन हे मन झाले । स्वरूप साक्षात्कारा आले ॥३॥ सर्व सोडोनि लिगाड । घेई रामनाम गोड ॥४॥ संकल्प विकल्प लिगाड । दास म्हणे थोर गूढ ॥५॥

३९०) शुद्ध ऐसे चांग मन । देव प्राप्तीसी कारण ॥१॥ नामे शुद्ध अंतरंग । नामे मन होय चांग ॥२॥ सर्व शुद्धीसी कारण । ओळखावी नाम खूण ॥३॥ काम संकल्प अशुद्ध । नाम संकल्प तो शुद्ध ॥४॥ मनामाजी सर्व आहे । दास म्हणे वर्म पाहे ॥५॥

३९१) दाता पदवी विशेख । देवा द्यावे मन एक ॥१॥ मन देणे हे कठीण । देता जीवासी भूषण ॥२॥ करवी नामाचे स्मरण । हेचि दात्याचे लक्षण ॥३॥ दाता कर्ण बोलती पाही । दास म्हणजे समजुनि घेई ॥४॥

३९२) मन देवा समर्पणे । हेचि खरे नाम जाणे ॥१॥ मन देवा देता चांग । त्याचा होय पांडुरंग ॥२॥ गोविंद म्हणे मनी नाम । त्यावीण नको दुजे काम ॥३॥

३९३) पुष्प देवा समर्पिता । देव भेटे अवचिता ॥१॥ परी पुष्पाची ते खूण । मनी घ्यावी ओळखण ॥२॥ गजेंद्राचे पुष्पाकारणे । देवे केलेसे धावणे ॥३॥ चित्त पुष्प समर्पण । दास म्हणे हे साधन ॥४॥.

३९४) देव शोधाया कारण । यासी उपाय तो कोण ॥१॥ मन करावे आधीन । होऊ नये मनाधीन ॥२॥ मन मुंडावे अंतरी । मग भेटी होय हरी ॥३॥ दास म्हणे नाम घेता । मन अधीन सर्वथा ॥४॥

३९५) आनंदाचे धाम । जेथे जाता पूर्णकाम ॥१॥ असे आपुल्या शरीरी । मने प्रवेश तू करी ॥२॥ नाम घेता निजध्यासे । मन भीतरी प्रवेशे ॥३॥ गुरुकृपे दासा राम । तेचि आनंदाचे धाम ॥४॥

३९६) कोण मना फिरवी । पाहता मनचि जगा फिरवी ॥१॥ मन फिरे जरी नामस्मरणी । बैसे नाम जीवी ॥२॥ मन फिरेना तरी मग वदनी । नाम कसे वसवी ॥३॥ सर्वही केले मनी न आले । दासा व्यर्थ होई ॥४॥

३९७) आठामाजी पाहू जाता । मग देव येई हाता ॥१॥ दोन देवाजीचे नाम । साधू दाविताती वर्म ॥२॥ मने आंत प्रवेशावे । लाभ होईल स्वभावे ॥३॥ दास म्हणे असो कैसा । शुची होय रवी जैसा ॥४॥

३९८) एकचित्त होता चित्तशुद्धी आहे । चित्तशुद्धी पाहे बोध ठसा ॥१॥ बोध ठसलिया साधन कसोटी । मग देव भेटी होत आहे ॥२॥ दास म्हणे ब्रह्मवेत्त्याचे लक्षण । नामाचे स्मरण जेथ उरे ॥३॥

३९९) अकरावे समर्पण । मन झाले परिपूर्ण ॥१॥ होता मनाचे उन्मन । भेटी देई भगवान ॥२॥ मन उन्मन होता पाही । मनामाजी सर्व काही ॥३॥ जेथे देवाची वसती । उणे काय दासाप्रती ॥४॥

४००) चित्त चैतन्याचा अंश । अंशे मिळे चैतन्यास ॥१॥ चित्त चैतन्य मीलन । तेचि एकचित्त पूर्ण ॥२॥ नामी होता एकचित्त । दास निजधामी रमत ॥३॥

४०१) स्वयंभू स्वरूप । संकल्पे ना निर्विकल्प ॥१॥ नामी मन निर्विकार । निरहंकारी साक्षात्कार ॥२॥ आत्मरूप स्वस्वरूप । दास होतसे तद्रुप ॥३॥

४०२) मना नुरे मनपण । तेचि बोलती उन्मन ॥१॥ शब्द जाहला कुंठीत । नाम चालिले सतत ॥२॥ अंतर्बाह्य दिसे राम । दासा लोचनी भरला नेम ॥३॥



उपदेश

४०३) माया हेरणे माहेर । माया पैल तो ईश्वर ॥१॥ देहामाजी शोधुनी पाही । देहापासोनी विदेही ॥२॥ गोविंद म्हणे कळूनी येई । गुरुकृपे शोधुनी पाही ॥३॥

४०४) मायेचा हा गुप्त मारा । विषयसुखा मानवी सारा ॥१॥ सुखस्थान जवापाडे । पाहो नेदी वाडेकोडे ॥२॥ जीवालागी नानापरी । फिरवी बहुविध प्रकारी ॥३॥ दास म्हणे ऐशी माया । सहजनामे जाई विलया ॥४॥

४०५) ऐका मायेची करणी । पैल जाता सुखी प्राणी ॥१॥ माया जीवासी भुलवी । देवदेवा विसरवी ॥२॥ घाली प्रपंच झापडी । नामी लागो नेदी गोडी ॥३॥ दास म्हणे नाम घेता । माया नुरेची तत्त्वता॥४॥

४०६) अन्य प्रयत्न करोनी । केवी मिळे चक्रपाणी ॥१॥ माया तुटता तुटेना । देव भेटता भेटेना ॥२॥ येर प्रयत्न करोनी । जगी धन्य नव्हे कोणी ॥३॥ एक नाममय होता । दासा देव हो रक्षिता ॥४॥

४०७) मायाजाळ अनिवार । ईश्वराचा जो विसर ॥१॥ थोर मायेचा हा मार । बाह्य दिसेना साचार ॥२॥ मायाजाळ निरसन । घेता गुरुनाम खूण ॥३॥ माया टाकोनी राहता । दासा कौतुकाची वार्ता ॥४॥

४०८) काही नाही तेथे जाणे । जीवपणा आणी उणे ॥१॥ हेचि मायेचे लक्षण । ब्रह्म त्याचे अधिष्ठान ॥२॥ नामब्रह्म नामब्रह्म । दासा मायातीत वर्म ॥३॥

४०९) माया गुंतवी संसारी । करू नये ते करी ॥१॥ काही करी रे स्मरण । जेणे जोडे नारायण ॥२॥ रामरंगी जो रंगला । तोचि एक जगी भला ॥३॥ गुरू गुंगविती हरिनामी । दास म्हणे गुरूनामी ॥४॥

४१०) सांगा माया केवी तरे । माया ओळखीता नुरे ॥१॥ एक देवाची ती माया । एक राक्षसांची माया ॥२॥ मायेलागी जे भुलले । तेची जगी नागविले ॥३॥ गोविंद म्हणे माया हरी । हरिनामी मन जरी ॥४॥

४११) मायेची दैवते आराधिती देख । मायेचा दंडक चुकेचिना ॥१॥ मायेचा दंडक जन्ममरण फेर । चुकेना साचार काही केल्या ॥२॥ जयाचे आधारे मायेसी आधार । शक्ती सर्वेश्वर ओळखावा ॥३॥ सर्वेश्वर जवळी असे हृदयात । नामे हस्तगत दास म्हणे ॥४॥

४१२) अज्ञान कुग्रामी जीवासी । येईल दुःख प्रचीतीसी ॥१॥ अज्ञान माया काय पाही । मायामय जग नवलाई ॥२॥ संतमार्ग दाविती देही । देवाचिया गावी जाई ॥३॥ गोविंद म्हणे तेथे राही । दुःखलेश त्यासी नाही ॥४॥

४१३) माया ब्रह्म यांचे नाते । शोधू जाता मन रिते ॥१॥ सरला संकल्प विकल्प । एक भरले निर्विकल्प ॥२॥ ब्रह्मरूप असे सत्य । मायाभास दिसे नित्य ॥३॥ नाते शोधीले अद्वैत । तेथे कैचे द्वैताद्वैत ॥४॥ दासा दासपण नुरे । नाते गुरूपदी विरे ॥५॥

४१४) सत्य ज्ञान येता हाती । मग जीवा मोक्षप्राप्ती ॥१॥ आपणाते

ओळखावे । सत्यज्ञान ते जाणावे ॥२॥ सत्यज्ञान मार्ग खूण । रामनामाचे भजन ॥३॥ ऐसे ज्ञान हाती येता । देव वाहे दास चिंता ॥४॥

४१५) सत्य ज्ञानाचे लक्षण । ओळखून घ्यावे जाण ॥१॥ आप आपणा जाणणे । ज्ञानलक्षण हे जाणे ॥२॥ आप आपणा नेणता । ज्ञानसत्ता न ये हाता ॥३॥ दास म्हणे नामावीण । प्रगटेना सत्य ज्ञान॥४॥

४१६) शाश्वताची भक्ती । पद शाश्वत दे हाती ॥१॥ शाश्वतात मन राही । अशाश्वती काम नाही ॥२॥ जाई गुरूसी शरण । भक्ती येई समजून ॥३॥ नित्य तगे ते शाश्वत । येर सर्व अशाश्वत ॥४॥ शाश्वतात नाम घेता । दासा देही देव हाता ॥५॥

४१७) लटक लावी ते लटिके । एक नाम अंतरी निके ॥१॥ गुरुचरणी जडुनी राही । मग तुज कळो येई ॥२॥ गोविंद म्हणे ऐसे लटिके । खरे तयापुढे फिके ॥३॥

४१८) चित्रीची ती सेना । काय येईल रक्षणा ॥१॥ कल्पित स्वप्नी धन । काय करील सधन ॥२॥ तैसे हजार बोलणे । नये उपयोगी जाणे ॥३॥ दास म्हणे नाम घेई । काळ त्याची आज्ञा वाही ॥४॥

४१९) सत्य कळो येता पाही । सत्यस्थानामाजी जाई ॥१॥ सत्यनाम देवाजीचे । येर सर्व असत्य साचे ॥२॥ गोविंद म्हणे सत्यासत्य । कळो येता खरे हित ॥३॥

४२०) सत्य ओळखोनी घ्यावे । सत्य बोलणे बोलावे ॥१॥ कायेमाजी बोल असे । पाहे शोधुनी गवसे ॥२॥ सत्य बोलणे अधिक । सत्य देहामाजी देख ॥३॥ नाम देवाजीचे सत्य । येर सर्वही असत्य ॥४॥ सत्य खूण अबोलणी । दासांकित चक्रपाणी ॥५॥

४२१) एक सत्य तो अनन्य । नामावीण नाही अन्य ॥१॥ जयाचिया मनी पाही । एक नाम सदा राही ॥२॥ सदा भावाचे चिंतन । नुरे भाव तन मन ॥३॥ दास म्हणे जो अनन्य । त्याचा होय भगवान ॥४॥

४२२) खरी खोटी गोष्टी कोणीच पाहीना । तेणे फळ मना पहाता नये ॥१॥ पारखोनी घ्यावे पदरी बांधावे । ते कर्म स्वभावे उत्तमची ॥२॥ मृगजळापाठी करी धावाधाव । काय त्याचा जीव तृप्ती पावे ॥३॥ हरीनाम मुखी उत्तम भजन । जेणे नारायण तुष्ट होय ॥४॥ उत्तम भजने उत्तमाची प्राप्ती । उत्तम ते गती गोविंद म्हणे ॥५॥

४२३) जाणता तो भला । खरे खोटे कळे ज्याला ॥१॥ खरे खोटे कळता पाही । स्वये आत्मरूप होई ॥२॥ गोविंद म्हणे हो सर्वथा । त्याचे चरणी माझा माथा ॥३॥

४२४) वेदशास्त्रादींचा करिता अभ्यास । न कळता त्यास सर्व शीण ॥१॥ अर्थेवीण पाठ करिता भागला । कंठ शोष केला वाउगाची ॥२॥ अर्थावीण खोटे नेई दुःख वाटे । सत्य अर्थी भेटे भगवान ॥३॥ नाम अर्थार्थाने कळेल सर्वार्थ । ना तरी अनर्थ दास म्हणे ॥४॥

४२५) वेदशास्त्र पुराणानी । ख्याती केली त्रिभुवनी ॥१॥ इत्यर्थ हा नाम घ्यावे । वेद बोलती स्वभावे ॥२॥ त्यांचे वचनी अविश्वास । चौथा बोलिजे हा दोष ॥३॥ दास म्हणे अपराध । जाता उरे नाम सिद्ध ॥४॥

४२६) नाम वेदांत बाणता । नुरे शब्दजाल वार्ता ॥१॥ निःशब्दाची कृती नाम । खरा वेदांत परम ॥२॥ वेदे कथिला विचार । नाम वेदांताचे सार ॥३॥ ऐसा वेदांत बाणता । दास म्हणे देव वार्ता ॥४॥

४२७) संकटाचे वेळी । कोण सोडवील बळी ॥१॥ याचा करावा

विचार । सर्वजण नारीनर ॥२॥ संकटाचे वेळी । कोण आपणाजवळी ॥३॥ याचा मनी घ्यावा शोध । चित्ती हाची घ्यावा बोध ॥४॥ बंधुमित्र बहू भले । कोण उपेगासी आले ॥५॥ हा तो जगाचा सायास । थोरे भक्षावे लहानास ॥६॥ सर्व जगासी भक्षिता । तोचि जगासी रक्षिता ॥७॥ जरी बुद्धी भाव धरी । तरीच दासाचा श्रीहरी ॥८॥

४२८) कोळसा घाशीता । शुभ्र नव्हेचि तत्त्वता ॥१॥ मृगजळाचेनि पुरे । कोण वाही सांगा बरे ॥२॥ मंथोनिया पाणी । नवनीत कोण आणी ॥३॥ रामनाम भाव देही । गुरूवीण कळे कायी ॥४॥ न धरिता अंतरभाव । दास म्हणे कैचा देव ॥५॥

४२९) तेचि ब्रह्म तू आहेसी । ओळखावे तत्त्वमसि ॥१॥ खूण ओळखावी कैसी । महावाक्य तत्त्वमसि ॥२॥ मूळ स्वरूपी वळता । तत्त्वमसि येई हाता ॥३॥ जना धन तत्त्वमसि । दासा नाम तत्त्वमसि॥४॥

४३०) पुण्य पावन ज्ञानमार्ग । आक्रमिता तो श्रीरंग ॥१॥ एक ज्ञान नसता पाही । एक अज्ञानची राही ॥२॥ ज्ञानयोगे मोक्षप्राप्ती । जीवा नाही यातायाती ॥३॥ ज्ञानमार्ग कळो येई । दास म्हणे नाम घेई ॥४॥

४३१) ज्ञानमार्गे जाता जाण । तया नाही श्रम शीण ॥१॥ अल्पसाधनाने सिद्धी । नको आणीक उपाधी ॥२॥ परी ज्ञानीयांचा संग । घडे तरी हा प्रसंग ॥३॥ ज्ञाने मोक्ष अधिकार । दासा भेटे रघुवीर ॥४॥

४३२) वृत्ती संथ करी उपाधी निवारी । जाता गंगाद्वारी सुख मना ॥१॥ गंगा स्नान करी गंगापान करी । दर्शने उद्धरी चराचर ॥२॥ सकळा शरीरी ज्ञानगंगा वाहे । दास म्हणे पाहे अनुभवे ॥३॥

४३३) जाणता तो जाणता तो । जाणता तो जाणता तो ॥१॥ सर्व काही सर्व काही । सर्व काही जाणता तो ॥२॥ सर्व ठायी सर्व ठायी ।

सर्व ठायी जाणता तो ॥३॥ तोचि हृदयी तोचि हृदयी । दास म्हणे जाणता तो ॥४॥

४३४) जाणत्याचा संग धरा । उतराल पैल तीरा ॥१॥ भवनदी महाथोर । काय करील पोहणार ॥२॥ आंधळ्या पाठी आंधळे । पडतील एक वेळे ॥३॥ जाणत्याची युक्ती बरी । सदा घ्यावी गा अंतरी ॥४॥ जाणत्याचा बोध बरा । दास म्हणे मनी धरा ॥५॥

४३५) संग धरी जाणत्याचा । धरू नको अजाणत्याचा ॥१॥ ज्यात आहे नुकसान । जाई संतासी शरण ॥२॥ सांगती रामनाम खूण । ऐक रामनाम गान ॥३॥ जरी होसी तू जाणता । देव भेटेल तत्त्वता ॥४॥ नामखूण ही जाणता । दास मुक्तची तत्त्वता ॥५॥

४३६) एक एकासी सवाई । जगामाजी नवलाई ॥१॥ एक म्हणती आपणा श्रेष्ठ । दुजा सवाई वरीष्ठ ॥२॥ चांगल्यात वाईटात । दोनी माजी हीच मात ॥३॥ नको वाईट सवाई । गाई संतांची सवाई ॥४॥ देव सर्वा देख । दासा त्याचे नामी सुख ॥५॥

४३७) बुरा संग नको धरू । पाप कर्माचा आचारू ॥१॥ नाम देवाजीचे घ्यावे । आणि काही न करावे ॥२॥ गोविंद म्हणे हे कळेल । गुरूपदी ठेवी भाळ ॥३॥

४३८) वैरी कोण तुझा । तू पाही । चांगल्याचे वैर करवितो । दुष्ट संग पाही ॥१॥ आप आपणा पुरते पाही । दुजियाचे नच घेई । डोळा पापी संग तयाचा । सोडुनिया देई ॥२॥ कान दुष्ट हे निंदा वचनी । संगती बरी नाही । दास म्हणे रे नामस्मरणे । मित्र सकळ पाही ॥३॥

४३९) भले तेचि काय रे भले तेचि काय रे । महावाक्याचे चिंतन भले तेचि पाहे रे ॥१॥ बरे तेचि काय रे बरे तेचि काय रे । सोहं अर्थी

रिघता मन बरे तेचि पाहे रे ॥२॥ चांगले ते काय दासा चांगले ते काय रे । महावाक्य बीजनाम चांगले ते पाहे रे ॥३॥

४४०) कुसंगाने अधोगती । कुसंग न धरावा चित्ती ॥१॥ नामालागी विन्मुखता । अधोगती ते सर्वथा ॥२॥ दास म्हणे कायी सांगो । टाकी वाईट प्रसंगो ॥३॥

४४१) भला संग भले करी । भले ओळखा अंतरी ॥१॥ भले चांगले ते घेणे । भले नसे ते टाकणे ॥२॥ गोविंद म्हणे नाम भले । भले जाणावे चांगले ॥३॥

४४२) गुणी अवगुणी या संगती योगे । रामनाम मनी धरी तू चांगे ॥१॥ दुर्गुणसंगे गुणी अवगुणी या । सद्गुणसंगे अवगुणी गुणी या ॥२॥ दुर्गुण दुर्जन सद्गुण सज्जन । पाही विचारुन अंतरी हे मन ॥३॥ नाम संगती दास हो सुखिया । अनाम संगती जग हो दुखिया ॥४॥

४४३) जैसा संग तैसे फळ । हे तो जाणावे केवळ ॥१॥ चांगल्याचा संग धरी । वाईटाचा त्याग करी ॥२॥ संतसंग हितकारी । कुसंग चौऱ्याऐंशीची फेरी ॥३॥ दास म्हणे संतसंगे । नामे तैसे होई अंगे ॥४॥

४४४) गुणी अवगुणी या संगती योगे । रामनाम तू मनी धरी चांगे ॥१॥ सोहं कोहं गुण अवगुण ते । संगा ऐसे होईल मन ते ॥२॥ संत संगती सज्जन व्हावे । असत्संगती असत् स्वभावे ॥३॥ दास म्हणे हे मनी धरावे । ना तरी प्राण्या व्यर्थ मरावे ॥४॥

४४५) जया जैसी संगती तया तैसी गती । विचारोनी चित्ती धरिता बरे ॥१॥ चांगले येईल चांगल्याच्या संगे । वाईटाच्या संगे वाईटची ॥२॥ मनोरूपी शुक कामे बिघडला । नामे उद्धरला संतसंगे ॥३॥ दास म्हणे एक हरिनाम चांगले । दावी रूप भले देवाजीचे ॥४॥

४४६) सुसंगती बरी साधावी सज्जनी । साधिल्या दुर्जनी कल्याणची ॥१॥ परिसासी घण हळू स्पर्शो गेला । किंवा घाव केला सोने करी ॥२॥ जरी कोणी राहे चांगल्या संगती । मिळेल पंगती चांगल्याची ॥३॥ सत्संगाचा वारा तोही करी लाभ । सत्संग दुर्लभ दास म्हणे ॥४॥

४४७) संत मनी घेती तेचि मनी घेई । संतसंग पाही धरिता बरे ॥१॥ संत मनी घेती श्रीरामाचे नाव । घेई धरूनी भाव तरिच बरे ॥२॥ ऐसे सत्संगाचे थोर महिमान । दास म्हणे वचन विसरू नका ॥३॥

४४८) गुण पालटेना गुण पालटेना । मन हे जडेना रामपायी ॥१॥ हंसरूप होता मुक्ताफळ तोंडी । कामा नव्हे जोडी काही केल्या ॥२॥ गंगेचेनि संगे पालटे ओहोळ । सत्संग निर्मळ अंतर करी ॥३॥ त्रिगुण दुर्गुण सत्संगे पालटे । नामे बंध तुटे दास म्हणे ॥४॥

४४९) जगामध्ये कैसे वागावे ते सांगा । धरी संतसंगा अखंडित ॥१॥ दुर्जनाचा संग टाळाया कारण । करावे चिंतन जैसे तैसे ॥२॥ अंतरप्रमाण एक भगवान । सद्गुरुवचन अभ्यासावे ॥३॥ बाह्य व्यवहार जैशा तैशा परी । करी वरी वरी दास म्हणे ॥४॥

४५०) वासनेसी करू नको तू एकांत । बैसोनि निवांत नाम गाई ॥१॥ वासना आवरी रामनाम दंडे । जन्ममरण खंडे तरीच बापा ॥२॥ आशेचा निरास घालावे आसन । एकाग्र हे मन करी बापा ॥३॥ दास म्हणे ज्याचे असेल सुकृत । तयासी हे हीत कळो येई ॥४॥

४५१) वासनेचा उपशम । होता भेटे मेघश्याम ॥१॥ काय टाकोनी वरी वरी । तिचे बीज नष्ट करी ॥२॥ संतसंग घडता पाही । तिचे बीज नष्ट होई ॥३॥ रामनामी जडे मन । दास म्हणे घ्यावी खूण ॥४॥

४५२) प्रपंच हे खरे दुःख । नाम विस्मरण देख ॥१॥ पहा संसार करोनी । कोण सुखी झाला प्राणी ॥२॥ दास म्हणे नाम घेता । नुरे प्रपंचदुःख वार्ता ॥३॥

४५३) कैसा प्रपंच सांडावा । कैसा परमार्थ जोडावा ॥१॥ याचे आईका लक्षण । मन एकाग्र करून ॥२॥ प्रपंचात परमार्थ । कोण याचा घ्यावा अर्थ ॥३॥ नाम परमार्थी जडता पाही । दासा प्रपंच नुरे काही ॥४॥

४५४) प्रपंच परमार्थ गाडी । वेगे चालिल्या तातडी ॥१॥ एक जाई पूर्व भागे । एक पश्चिमेच्या मार्गे ॥२॥ कसे करू काय करू । प्रपंच-गाडीचा उच्चारू ॥३॥ दुजी नाम उच्चारण । देव साह्य तिची खूण ॥४॥ पुनर्जन्म मुक्तपण । दास म्हणे फळे जाण ॥५॥

४५५) प्रपंच झापडी निवारिता दुरी । भेटेल श्रीहरी स्वभावेची ॥१॥ मेघ दूर होता सूर्यबिंब आहे । तैसा देव पाहे हृदयस्थ ॥२॥ आयिता आलासे घरात पुसोनी । जाणेल तो कोणी तोचि धन्य ॥३॥ दासा गुरुनामे झापड नुरेल । सर्वत्र दिसेल रामरूप ॥४॥

४५६) प्रपंच लक्षणी पुरता । तेणे नोहे सार्थकता ॥१॥ बाणे परमार्थ अंतरी । तेणे सार्थकता खरी ॥२॥ नाम परमार्थ लक्षण । दास म्हणे तेचि खूण ॥३॥

४५७) एक रामनाम सार । मनी धरी हा विचार ॥१॥ चुके चौऱ्याऐशीचा फेर । नको दुसरा विचार ॥२॥ करिता संसाराचे काम । मनी आठवावा राम ॥३॥ नामी धरिता नित्य नेम । धन्य संसारी उत्तम ॥४॥ रामकृपे रामनाम । दासा लाधले उत्तम ॥४॥

४५८) बरवा संसार तू करी । धन्य होई जे संसारी ॥१॥ बरवा परमार्थ तू करी । तरी परमार्थाची थोरी ॥२॥ नातरी हे नाही ते नाही । ऐशी गत बारे होई ॥३॥ दासा हे व्हावे ते व्हावे । दासे नामची गावे भावे ॥३॥

४५९) बरवा संसार म्हणताती जनी । बरवे काही कोणी न पाहती ॥१॥ बरवे ते काय बरवे ते कायी । जेणेयोगे पाही बरवे होय ॥२॥ बरे पाहु जाता दृष्टीस दिसेना । विचारोनी मना शोधी बरे ॥३॥ बरवा तो राम आपुला म्हणावा । हृदयी शोधावा दास म्हणे ॥४॥

४६०) प्रारब्ध चुकेना चुकावे इच्छिले । हरीनाम भले साठवावे ॥१॥ संतजन योगे प्रारब्धाचा नाश । धरावी ती कास सद्गुरूंची ॥२॥ प्रारब्ध देहास देह प्रारब्धास । हरीनामी आस दासालागी ॥३॥

४६१) कळे ऐसे नाम कोणी न शोधिती । प्रारब्धाची गती शोधिताती ॥१॥ कळोनिया काय चुकविता नये । ऐसे बळ आहे प्रारब्धाचे ॥२॥ आपणची सवे घेवोनिया आला । सुखदुःख त्याला तैसे मिळे ॥३॥ प्रारब्ध संबंध असे या शरीरी । नामे भेटे हरी दास म्हणे ॥४॥

४६२) होणार ते होयेना का । जाणार ते जायेना का ॥१॥ भवितव्य चुकत नाही । होणे तैशी बुद्धी होई ॥२॥ भवितव्य मरण जाणा । जन लोक नेणे खुणा ॥३॥ दास म्हणे सांगो कायी । गुरूची अतीत नवाई॥४॥

४६३) काय करूनी इच्छा प्रारब्धाचा योग । सुखदुःख भोग त्याचे हाती ॥१॥ म्हणोनीया घेई अवीट ते नाम । जेणे पूर्णकाम होसी स्वये ॥२॥ अशक्य ते शक्य घडवी प्रारब्ध । कायेसी संबंध असे ज्याचा ॥३॥ नाही शक्ती युक्ती चालत प्रारब्धी । न चलेचि बुद्धी काही तेथे ॥४॥ रामनाम मुखी साधिल्या प्रयत्न । प्रारब्ध बंधन दासा नये॥५॥

४६४) काय करणे उचित । याची सांगावी प्रचीत ॥१॥ करणे ते एक परी । वाचे उच्चार श्रीहरी ॥२॥ बोलणे ते आन नाही । एक नामचि अंतर्बाही ॥३॥ दास म्हणे नाम मोठे । नामी देवचि प्रगटे ॥४॥

४६५) तोचि ज्ञानी भला । षड्विकार नाही ज्याला ॥१॥ तोचि ज्ञानी भला । अहंकार ज्याचा गेला ॥२॥ तोचि ज्ञानी भला । दास गुणापरता झाला ॥३॥

४६६) कोरडेची ब्रह्मज्ञान । देह जैसा प्राणावीण ॥१॥ रसाळ ते ब्रह्मज्ञान । गुरुकृपे ओळखण ॥२॥ नाम वदे ज्याची वाचा । तोचि ब्रह्मज्ञानी साचा ॥३॥ नाम वाणीत रंगले । तेचि ब्रह्मज्ञान भले ॥४॥ काय तळे नाही पाणी । दास म्हणे सदा आणी ॥५॥

४६७) खरे ब्रह्मज्ञान येईल कैसे हाती । विचारुनी चित्ती पाहता बरे ॥१॥ येर सर्व ज्ञाने शब्दाची असती । उपेगा न येती मोक्षालागी ॥२॥ खऱ्या शब्दज्ञाने स्वये ब्रह्म झाला । वंदिती तयाला देवादिक ॥३॥ दास म्हणे गुरुनामे येईल हाती । पहावी प्रचीती गुरुकृपे ॥४॥

४६८) जाणे लाभ आणि हानी । तोचि एक खरा ज्ञानी ॥१॥ लाभ सापडे देहात । पाही शोधोनीया आत ॥२॥ लाभ रामनामी आहे । तयावीण हानी पाहे ॥३॥ दास म्हणे खरा ज्ञानी । देव दाखवी नयनी ॥४॥

४६९) तोची ज्ञानी जाण भला । वैराग्याने जो शोभला ॥१॥ तोची ज्ञानी जाण भला । सर्वाभूती दया ज्याला ॥२॥ तोची ज्ञानी जाण भला। ब्रह्मानंदी जो विराला ॥३॥ तोची ज्ञानी जाण भला । विज्ञानाने जो शोभला ॥४॥ तोची ज्ञानी जाण भला । रामनामी जो रंगला ॥५॥ तोची ज्ञानी जाण भला । दास वंदितो तयाला ॥६॥

४७०) तोची ज्ञानी जाण भला । शम जयाने साधीला ।।१।। तोची ज्ञानी जाण भला । दम जयाने साधीला ।।२।। तोची ज्ञानी जाण भला । उपरम अंगी आला ।।३।। तोची ज्ञानी जाण भला । तितीक्षाही प्राप्त ज्याला ।।४।। तोची ज्ञानी जाण भला । श्रद्धा बाणली जयाला ।।५।। तोची ज्ञानी जाण भला । दास समाधानी आला ।।६।।

४७१) मी कोण हे उमगता । सत्य ज्ञान येई हाता ।।१।। आपणासी नोळखिले । सर्व ज्ञान व्यर्थ झाले ।।२।। वाढवोनी अभिमान । केले आपणा बंधन ।।३।। दास म्हणे नामी सरता । कळे मीपणाची वार्ता।।४।।

४७२) गुरूज्ञानाचा महिमा । वर्णवेना शेषा ब्रह्मा ।।१।। गुरुज्ञाने झाले थोर । त्यांचे सामर्थ्य अपार ।।२।। गुरुज्ञाने सर्व अर्थ । कळे ऐसे हे समर्थ ।।३।। गुरूज्ञानमार्ग थोर । जाता भेटवी ईश्वर ।।४।। जे का नामाचे विज्ञान । दास म्हणे गुरूज्ञान ।।५।।

४७३) एक मी रे जरी जिरे । तयालागी देव उरे ।।१।। मीपण देणे ज्या कठीण । तया कैचा भगवान ।।२।। मीपण देता उठाऊठी । चित्त नाम घेऊनि उठी ।।३।। दास म्हणे मीपण दिले । देवे तयासी रक्षिले ।।४।।

४७४) पवित्र ते सहा बळी । सकार आपुले जवळी ।।१।। कदा नोहे हे ओवळे । तेचि जाणावे सोवळे ।।२।। गोविंद म्हणे नामबळे । अहं टाकावे ओवळे ।।३।।

४७५) निःसंदेह पवित्र स्थान । तेथे वसे भगवान ।।१।। उदय ही त्याची खूण । मनी उमगावी जाण ।।२।। आन करू नको काही । दास म्हणे नाम घेई ।।३।।

४७६) पवित्रतेमाजी देव साक्षात्कार । अपवित्रा साचार होत नसे।।१।।

अंतर बाहेर पवित्रता थोर । नामाचा विचार साधी वेगी ॥२॥ पवित्र देहामाजी पवित्र आत्मा प्रगट । दास म्हणे स्पष्ट खूण पाही ॥३॥

४७७) नाही श्रेष्ठपण मिळत ते हाटी । बैसता कपाटी रानी वनी ॥१॥ मीपण त्यागाने साही टाकी घाये । तोचि श्रेष्ठ होये देवा ऐसा ॥२॥ मीपण सरता उरे गुरुनाम । दास म्हणे काम थोर त्याचे ॥३॥

४७८) जगी चढ वरचढे । त्याच्या प्रसंगाचे धडे ॥१॥ जगालागी देती बोध । धरी मनी तो सुबोध ॥२॥ जगी नाही कोणी चढ । कोणी नाही वरचढ ॥३॥ रावणाची काय दशा । वरचढ हे अवदशा ॥४॥ सर्वांवर देव चढ । तेथे कोणाचा तो पाड ॥५॥ याचा करिता विचार । मग कैचा अहंकार ॥६॥ अहं नावडेचि देवा । दास म्हणे बहु गोवा ॥७॥

४७९) ओळखिता मायबाप । मग कैचे उरे पाप ॥१॥ एकमेका मायबाप । नाना जन्मीचे अमूप ॥२॥ हे तो कळे सिद्धजना । जे का प्राप्त ब्रह्मज्ञाना ॥३॥ जगताचा मातापिता । दास म्हणे नामे हाता॥४॥

४८०) मायबापा जीवे मारी । धन्य तो एक संसारी ॥१॥ ऐशा बोलण्याचा अर्थ । जाणेल जो तो कृतार्थ ॥२॥ याचा अर्थ नायकता । दुःख भोगील तत्त्वता ॥३॥ दास म्हणे अहं ममता । नामे नुरेचि तत्त्वता ॥४॥

४८१) संत उपदेश कोटी फत्तरासी । येरा मानवासी काय पाड ॥१॥ टाकिले न घ्यावे गुण तयापाशी । भाव मनुष्यासी तैसा नाही ॥२॥ अहं ते टाकावे रामनाम घ्यावे । हृदयी धरावे रामरूप ॥३॥ गुरूबोध ऐसा ठसे जरी मनी । धन्य तेचि प्राणी दास म्हणे ॥४॥

४८२) रामनाम जुना ठेवा । हाती येईल मानवा ॥१॥ तरी तया काय

उणे । देव साह्य सर्व गुणे ॥२॥ गुरुपदी धरुनी सोय । मीपण विरहीत होय ॥३॥ दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ॥४॥

४८३) देहबुद्धी विरहित । ऐसे कोणा बोलीजेत ॥१॥ देह मी हा भाव नुरे । अहं ब्रह्मवृत्ती उरे ॥२॥ अहं ब्रह्मवृत्ती माजी । मी तू पणा उरेना जी ॥३॥ देहबुद्धीयुक्त कर्म । खरे नोहे हेचि वर्म ॥३॥ दास म्हणे उरे नाम । देव भक्तांचा संगम ॥४॥

४८४) त्याग म्हणावा तो कोण । न उरवी अहंपण ॥१॥ बाह्य त्याग करूनी काय । नको तेचि अंतरी राहे ॥२॥ गोर्विंद म्हणे गुरुनामी । अहंपण नुरवी नेमी ॥३॥

४८५) सत्याचा संकल्प । नुरवी सर्वही विकल्प ॥१॥ सत्य ओळखोनी घ्यावे । सत्य सामर्थ्ये जाणावे ॥२॥ गोर्विंद म्हणे सत्य नाम । नाही आणिकाचे काम ॥३॥

४८६) काय म्हणते कल्पना । काय म्हणते वासना ॥१॥ चल बाहेरी तू मना । सोड अंतरीच्या खुणा ॥२॥ दास म्हणे नाम घेई । तरीच हे कळो येई ॥३॥

४८७) कल्पना करोनी । कोणा मिळे चक्रपाणी ॥१॥ कल्पनेचा हा पसारा । क्षणामाजी होय चुरा ॥२॥ बा रे कल्पना सुसरी । जीवा ओढी भवसागरी ॥३॥ दासा गुरुनामे जाणा । होय निर्मूळ कल्पना ॥४॥

४८८) सांडावे ते ऐसे काय । मांडावे ते ऐसे काय ॥१॥ अनाम असत्य सांडावे । सत्य नाम ते मांडावे ॥२॥ ऐशी सांडणी मांडणी । ओळखून घ्यावी मनी ॥३॥ ऐशी मांडणी मांडता । दासा देव येई हाता ॥४॥

४८९) सांडोनी कल्पना धरावी भावना । तरीच पावना राम ।

भेटी ॥१॥ विकल्प नसावा संदेह निरसावा । एकांत सेवावा प्रेमभावे ॥२॥ मग एकाग्र मन नामानुसंधान । करावे चिंतन देवाजीचे ॥३॥ होता मन उन्मन प्रगटेल ध्यान । अनुभवी खूण दास म्हणे ॥४॥

४९०) सांडोनी कल्पना धरावी भावना । तरीच पावना रामा भेटी ॥१॥ समजोनी घेई समजोनी घेई । समजोनी घेई निरंजन ॥२॥ निरंजन प्राप्ती निरंजन नामी । सद्गुरूंचे धामी दास म्हणे ॥३॥

४९१) एका विकल्पाने बा रे । जग बुडविले सारे ॥१॥ ऐसा विकल्प पातकी । आपआपणा घातकी ॥२॥ गोविंद म्हणे नाम घेई । विकल्प मग नुरे काही ॥३॥

४९२) जग बुडविले सारे । एका विकल्पाने बा रे ॥१॥ पाहता विकल्प पातकी । असे आपणा घातकी ॥२॥ गोविंद म्हणे हा विकल्प । गुरुनामी निर्विकल्प ॥३॥

४९३) नाश करी हा विकल्प । न सरेची जाता कल्प ॥१॥ रामनामाचा संकल्प । होता आटेल विकल्प ॥२॥ विकल्पाचा नाश होता । दास मुक्तची तत्त्वता ॥३॥

४९४) विकल्पी तो सदा दुःखी । निर्विकल्पी सदा सुखी ॥१॥ म्हणोनि विकल्प टाकणे । निर्विकल्प नाम घेणे ॥२॥ विचार धरणे सोडणे । विकल्पी तो दास म्हणे ॥३॥

४९५) विकल्प टाकी विकल्प टाकी । सदा रामनाम घोकी ॥१॥ निर्विकल्प होणे शुद्ध । चित्त विकल्पे अशुद्ध ॥२॥ जैसे बीज तैसे फळ । हाती येईल केवळ ॥३॥ नाम बीज हृदयी पेरी । विकल्प कुंदा दूर करी ॥४॥ ऐसा विकल्प टाकीता । दास काय नोहे करता ॥५॥

४९६) तीनी पैल जाणे । तीन काय ओळखणे ॥१॥ सत्त्व रज तम तीन । पैल निर्गुणाची खूण ॥२॥ गोविंद म्हणे वर्म जाणे । तीनीत असोनी नसणे ॥३॥

४९७) देही रजोगुण परवडी । सदा संसाराची गोडी ॥१॥ विषयसुखी जडे मन । न करी नामाचे स्मरण ॥२॥ दुःखा नाव विषयसुख । रजे कळेना विषेख ॥३॥ प्रपंचास जो जुंपला । देव तया दुरी झाला ॥४॥ दासा गुरुनामी पाही । नुरे रजोगुण देही ॥५॥

४९८) तमोगुण जै शरीरी । देव भेटेना श्रीहरी ॥१॥ आळस निद्रा त्याचा मित्रू । रामनामाचा जो शत्रू ॥२॥ रामनामी येता पाही । गुण नुरविती देही ॥३॥ तमो अन्नाचे सेवन । त्याने वाढे तमोगुण ॥४॥ दास म्हणे नाम घेता । नुरे तमोगुण वार्ता ॥५॥

४९९) ऐका शुद्ध सत्वगुण । काय देही त्याची खूण ॥१॥ प्रगटता स्थिर होई । सदा नाम मुखी राही ॥२॥ परमार्थ अहर्निशी । अखंडित निश्चयेसी ॥३॥ नामी अखंडित ध्यानी । सगुण स्वरूप दासा मनी ॥४॥

५००) ऐका ऐका हो सज्जन । करा सत्वाचे पालन ॥१॥ सत्वगुण अंगी येता । तोचि परमार्थी पुरता ॥२॥ सत्वगुण कला श्रेष्ठ । जगामाजी तो वरिष्ठ ॥३॥ दास सत्वाचा आथिला । रामनामे सरता केला ॥४॥

५०१) अहंपण टाकी बा रे । लागो नेदी त्याचे वारे ॥१॥ अहंपण नाशक रे । सर्व शक्ती ग्रास करे ॥२॥ अहंपण त्रिप्रकारे । सत्त्व रज आणि तम रे ॥३॥ नासताती हे स्मरणे रे । देही अनुभव पाहणे रे ॥४॥ शंकर हृदयी प्रगटे रे । तरी दासा अहंपण नुरे रे ॥५॥

५०२) फेर चुकाया वळसे । घेई रामनाम सोसे ॥१॥ सोस जडला

नामाचा । तोचि मानव दैवाचा ॥२॥ सहा ओळखले जरी । सोस बोलिजेल तरी ॥३॥ दास सोसे नाम घेई । देव त्यासी साह्य होई ॥४॥

५०३) जाणे सहज सोवळे । कशा म्हणती ओवळे ॥१॥ काम क्रोध ज्याचे मनी । ओवळा तो दिसे जनी ॥२॥ सोहंभावी जो वळला । तोचि जाहला सोवळा ॥३॥ ऐशी आहे शास्त्रवाणी । दास म्हणे घ्यावी मनी ॥४॥

५०४) मीपण सरता मोहनाश । देव भेटे अविनाश ॥१॥ एक मीपणात पाही । सर्व द्वैत भरूनी राही ॥२॥ गोविंद म्हणे सांगू काई । गुरुनामी अनुभव घेई ॥३॥

५०५) मीपण माया निरसन । सर्व ज्ञाना श्रेष्ठ जाण ॥१॥ आत्मज्ञान होता जाण । होय देवाचे दर्शन ॥२॥ गुरुनाम त्याची खूण । नाही नाही त्या समान ॥३॥ मीपण माया निरसता । आपण कोण येई हाता ॥४॥ दास म्हणे ओळखण । मुखी नामाचे स्मरण ॥५॥

५०६) ऐशी खटपट करी । चुके जन्ममरण फेरी ॥१॥ खट पटलेची नाही । खटपट लटकी पाही ॥२॥ काम क्रोध लोभ खट । नामी पटता खटपट ॥३॥ खटपट रामनाम । दास म्हणे सर्वोत्तम ॥४॥

५०७) खट पटलेची नाही । खटपट करूनी काई ॥१॥ खट पटता खटपट । येर वाऊगी लटपट ॥२॥ गोविंद म्हणे नाम घेता । खट पटती तत्त्वता ॥३॥

५०८) खट इंद्रिये पटती । ऐशी करी खटपट ती ॥१॥ खट षड्रिपु पटती । ऐशी करी खटपट ती ॥२॥ खट जेणेयोगे पटती । ऐशी करी खटपट ती ॥३॥ मुख्य नामी खटपट । येर सर्व लटपट ॥४॥ दासा खटपट थोर । मुखी नामाचा गजर ॥५॥

५०९) खटाटोप काही करु नको काही । मुखी नाम गाई बैसोनिया ॥१॥ देही नामचिंतने चित्त हो अभिन्न । भेटे भगवान सहजेचि ॥२॥ यात जीवा कष्ट आणि दुःख नाही । सुगम असे पाही सकळासी ॥३॥ खटा आटोपता आटोपत नाही । खटाटोप पाही दास म्हणे ॥४॥

५१०) खुणेवीण खटपट । तो हा वाऊगा बोभाट ॥१॥ अंतरी नाही दृढभाव । वरी वरी करी देव ॥२॥ खूण देहाचे भीतरी । काय पहातोसी बाहेरी ॥३॥ नामेवीण खूण नाही । दास म्हणे नाम घेई ॥४॥

५११) नामावीण खटपट । हे तो जाण वृथा कष्ट ॥१॥ जैसे तक्र घुसळण । किंवा भुसाचे कांडण ॥२॥ देहभावा विरहित नाम । दासा समर्थ भेटवी राम ॥३॥

५१२) सोवळा तो भला । जेणे जाळिले कामाला ॥१॥ सोवळा तो भला । जेणे टाकिले क्रोधाला ॥२॥ देही कामक्रोध मांग । कैसे सोवळे हे अंग ॥३॥ चित्त शुद्ध हे सोवळे । दास रामनामी वळे ॥४॥

५१३) पण योगे नाम नयेचि मुखास । परंतु पणास वश आहे ॥१॥ उभयता योगे मानवाचा नाश । होत असे खास कोण पाहे ॥२॥ षड्रिपुंचा पण तोच जाणा पण । गोड नामस्मरण करू नेदी ॥३॥ पर न तू बोध मायेचा परंतु । दाखविना प्रांतु स्मरणाचा ॥४॥ मायायोगे पण परंतूचा वास । मायेचा निरास गोड नामे ॥५॥ दास म्हणे नाम साधन साधित । करणी अघटित धन्य त्यांची ॥६॥

५१४) अंतरीची तळमळ । केवी होईल शीतळ ॥१॥ काय करावा उपाय । सांगा मला गुरुराय ॥२॥ काम क्रोध जिचे मूळ । भक्ति बळेचि निर्मूळ ॥३॥ दास म्हणे समाधान । नाम संकीर्तन खूण ॥४॥

५१५) नित्य हरिकथे सर्व पाप मोडे । परी जाणे घडे तरीच होय ॥१॥ अखंड हरिनामी समाधीसुख जोडे । साधन आतुडे तरीच होय ॥२॥ अखंड पारायणी आत्मज्ञान उघडे । जरी पठण घडे तरीच होय ॥३॥ जरी मन जडे श्रीहरीचे पायी । तरीच हे सोयी दास म्हणे ॥४॥

५१६) कोण्या गुणे होय पापाचे क्षालन । आणि भगवान सहज सुलभ ॥१॥ हरिगुण कथा करिता श्रवण । पाप लेश जाण नुरतसे ॥२॥ दास म्हणे कथा रामाची दुर्लभ । साधिता सुलभ सर्व होय ॥३॥

५१७) नित्य हरिकथा नित्य नामावळी । ऐकता वेल्हाळी सुख पावे॥१॥ बुद्धी नेम धरी बुद्धी नेम धरी । तरीच संसारी धन्य होय ॥२॥ सर्व नेमामाजी नेम मुकुटमणी । रामनाम वदनी दास म्हणे ॥३॥

५१८) रामनाम सकळा सार । जाण अनंत अपार ॥१॥ रामनाम सकळा सोपे । पापे जाताती अपापे ॥२॥ गोविंद म्हणे रामनाम । सकळा करी पूर्ण काम ॥३॥

५१९) पाप म्हणजे काय ते मज कळेना । पुण्य नव्हे जाणा तेचि पाप ॥१॥ पापरूप सर्व एक नामावीण । अनुकूल जाण देव करा ॥२॥ करी धरील देव येवोनी आपण । गोविंद म्हणे खूण पाप जाता ॥३॥

५२०) पाप अभिमान पाप अहंकार । संशय हा थोर पाप असे ॥१॥ साधनी आळस हेच थोर पाप । परपीडा पाप घोर असे ॥२॥ संतनिंदा हा तो पापाचा कळस । बोध हा मनास घेई बापा ॥३॥ बोध घेवोनिया मन आवरावे । पाप घालवावे रामनामी ॥४॥ संसारात चित्त न निघे बाहेर । पाप हेचि थोर जाण बापा ॥५॥ संतनिंदा पाप कैसे घालवावे । संता शरण जावे दास म्हणे ॥६॥

५२१) पुण्य म्हणजे काय ते मज कळेना । पाप नव्हे जाणा तेचि

पुण्य ॥१॥ विवेक वैराग्य शांती दया बोध । अंतरी गोविंद महापुण्य॥२॥ कर धरील देव येवोन आपण । दास म्हणे पुण्यकर्म राम ॥३॥

५२२) वर्म ओळखावे कर्म आचरावे । तरी फळ घ्यावे जाण सत्य ॥१॥ सत्य तेचि घ्यावे वृथा का भ्रमावे । तक्र घुसळावे कासयासी ॥२॥ कासया शिणावे भूस उपणावे । वर्म ओळखावे निज देही ॥३॥ निजदेही राम ओळखिता वर्म । दास म्हणे कर्म पूर्ण होय ॥४॥

५२३) वर्म जाणे तो विरळा । त्याची वेगळीच कळा ॥१॥ नये समजोन काही । देव देव दावी देही ॥२॥ वर्मावीण केले कर्म । कर्म नव्हे ते अकर्म ॥३॥ नाम वर्म साधी खूण । दासा कळले संपूर्ण ॥४॥

५२४) नाम विस्मरण पाप । जवळी ठेवू नये साप ॥१॥ पाप कशाने जाईल । देव कशाने येईल ॥२॥ गोविंद म्हणे नामाविण । अन्य उपाय नाही जाण ॥३॥

५२५) आडमार्गी जे गमन । पाप तया नावे जाण ॥१॥ आडमार्ग ते अनित । जे का नामविरहित ॥२॥ दास स्वरूपी जागता । मग नुरे पापवार्ता ॥३॥

५२६) पापाचे लक्षण । मनी घ्यावे उमगोन ॥१॥ पुण्य चांगले म्हणिजे । पाप वाईट ओळखिजे ॥२॥ पाप म्हणजे अनाम । दास म्हणे पुण्य नाम ॥३॥

५२७) पुण्य म्हणजे काय ते मज सांगणे । एकाग्र श्रवण करी बापा॥१॥ पुण्ये स्वर्गगती पापे अधोगती । पाहोनि जगती ओळखावे ॥२॥ सर्वाभूती दया परउपकार । मुखी रघुवीर थोर पुण्य ॥३॥ प्राणस्पंदी रामनाम उच्चारण । पुण्याचे ते पुण्य दास म्हणे ॥४॥

५२८) पुण्य म्हणजे काय ते मज सांगणे । पाप नव्हे जाण तेचि पुण्य ॥१॥ तेचि जाणा पाप संदेहात मन । निःसंदेह जाण तेचि पुण्य ॥२॥ परउपकार नामसंकीर्तन । तेचि खरे पुण्य दास म्हणे ॥३॥

५२९) थोर पुण्य काय मजला सांगणे । एकाग्र श्रवण करी बापा ॥१॥ नाना पुण्ययोगे नाना पुण्यगती । भगवंताची प्राप्ती थोर पुण्ये ॥२॥ पुण्ये सुखस्थिति पापे अधोगती । पाहोनी जगती ओळखावे ॥३॥ थोर पुण्य सदा मुखी नामोच्चार । सकळांचे सार दास म्हणे ॥४॥

५३०) म्हणती प्रायश्चित्त घ्यावे । म्हणती प्रायश्चित्त द्यावे ॥१॥ खरी प्रायश्चित्त गोष्टी । कोणी जाणती ना सृष्टी ॥२॥ एक दोष आचरित । एका प्रायश्चित्त होत ॥३॥ दोष राहिले अंतरी । प्रायश्चित्त वरी वरी॥४॥ सर्व दोषा प्रायश्चित्त । दास म्हणे नाम सत्य ॥५॥

५३१) नाम सांग नाम सांग । कर्मधर्माहूनी चांग ॥१॥ नाम पूर्ण नाम पूर्ण । येर सर्वही अपूर्ण ॥२॥ विश्वासता तयाठायी । रामनाम फळदायी ॥३॥ सर्व दोषा प्रायश्चित्त । दास म्हणे नाम सत्य ॥४॥

५३२) प्रायश्चित्ते ती अनेक । द्रव्य दाने करिती लोक ॥१॥ प्रायश्चित्त ते घडेना । दोष आतील झडेना ॥२॥ एक दोष आचरित । एका प्रायश्चित्त होत ॥३॥ परी सर्वात विशेख । नाम प्रायश्चित्त देख ॥४॥ नाम दोषी या पुनीत । दास म्हणे करी मुक्त ॥५॥

५३३) प्रायश्चित्त घडे । नाम येता वाडे कोडे ॥१॥ नाही आणिकांचे काम । मुखी एक घेता नाम ॥२॥ पाप अंतरी वसत । नाम घेता दग्ध होत ॥३॥ दास म्हणे जाणे वर्म । तया नाही पुनर्जन्म ॥३॥

५३४) तोच जाणा ब्रह्मचारी । मार्ग ब्रह्माचा जो धरी ॥१॥ सुखदुःख

राम पाहे । ब्रह्मरूप होऊनि राहे ॥२॥ तोचि उच्चारी अक्षर । दास म्हणे निरंतर ॥३॥

५३५) ऐका ब्रह्मचारी धर्म । जेणे चुके जन्मकर्म ॥१॥ नोहे बाईलेच्या त्यागे । नाम जपावे बा उगे ॥२॥ वर्मे आश्रम पालन । करिता भेटे भगवान ॥३॥ वासना राहेना अंतरी । दास म्हणे ब्रह्मचारी ॥४॥

५३६) ब्रह्मचारी जो विचारी । ब्रह्मी रममाण अंतरी ॥१॥ अक्षर नाम सदा घोकी । सर्व आत्मत्त्वे विलोकी ॥२॥ गोविंद म्हणे बाईलत्यागे । ब्रह्मचर्य ते वाऊगे ॥३॥

५३७) गृह आपुले जाणावे । तया ठायी स्थिर व्हावे ॥१॥ मुक्तिकांता वरोनिया । सदा चित्ती हरिपाया ॥२॥ भक्तिभाव कन्या पुत्र । सदा चालणे पवित्र ॥३॥ गृहस्थाश्रम धन्य पाही । देव दासांकित होई ॥४॥

५३८) लोकाघरी जाऊनी बैसे । देव दिसेना आपैसे ॥१॥ घर आपुले चुकला । देव भेटेना तयाला ॥२॥ लोकाघरी करिता सेवा । देव भेटेना मानवा ॥३॥ सेवा घरची चुकला । देव भेटेना तयाला ॥४॥ देव घरात राहिला । तीर्थक्षेत्री पाहू गेला ॥५॥ दास म्हणे गलबला । व्यर्थ नामी विसरला ॥६॥

५३९) घरामध्ये जो राहे । गृहस्थ जाण तो स्वभावे ॥१॥ घर ओळखोनी घ्यावे । षट्कर्म आचरावे ॥२॥ गोविंद म्हणे नामस्मरणी । जगी धन्य तोचि प्राणी ॥३॥

५४०) कैसे करावे चिंतन । सांगा स्वामी मज खूण ॥१॥ शोधोनिया आत्मघर । तेथे चिंतावा रघुवीर ॥२॥ ऐसे चिंतन करिता । देव रक्षी त्या सर्वथा ॥३॥ दासा नाम आत्मघर । नाही आणिक विचार ॥४॥

५४१) आपुले ते धाम । जाणा देवाजीचे नाम ॥१॥ आत्मनामी देवभक्ती । रामनामी वसे प्रीती ॥२॥ दास म्हणे आत्मधामी । नाही उणे पूर्णकामी ॥३॥

५४२) आपुलिये घरी । जीवा भेटे देवहरी ॥१॥ फिरे अन्य गृहांतरी । तळमळ नोहे दुरी ॥२॥ घर आपुले शोधावे । मग समाधान पावे ॥३॥ जाण आपुले ते घर । नाम देवाचे सादर ॥४॥ दास आत्मगृही जाता । सर्व सिद्धी येती हाता ॥५॥

५४३) वनी जाऊनी बैसला । दिशा वनाची चुकला ॥१॥ वन जाणेना सुंदर । जेथे भेटे रघुवीर ॥२॥ वृक्ष दाटले अपार । नाम फळाने सुंदर ॥३॥ ऐसे वन असे देही । दास म्हणे शोधुनि पाही ॥४॥

५४४) वनी जाऊनी बैसला । दिशा वनाची चुकला ॥१॥ तप नव्हे काया क्लेश । तेणे भेटेना सर्वेश ॥२॥ तपस्थान खूण देख । नाम मुखी ये अपाप ॥३॥ नामतपे जो निष्काम । जया भेटे मेघशाम ॥४॥ क्रोध स्पर्शेना जयाला । दास म्हणे तपी भला ॥५॥

५४५) आहे देववन देहाचे माझारी । औटपीठावरी भ्रमरगुंफा ॥१॥ जाशील तरी जाई देववनामाजी । आडरानामाजी नको शिरू ॥२॥ तया स्थाना जाता भोगी निजसुख । आत्मवस्तु देख हाता येई ॥३॥ जाशील तरी जाई ब्रह्मारण्यामाजी । संतसभेमाजी दास म्हणे ॥४॥

५४६) ते वन सुंदर रम्य मनोहर । शुकसनकादिक रमती निरंतर ॥१॥ दास म्हणे प्रभूनाम निरंतर । ते वन सुंदर रम्य मनोहर ॥२॥

५४७) वानप्रस्थाचे लक्षण । वनी करी आत्मस्थान ॥१॥ वानप्रस्थ तोचि जाणा । संयोगात वियोग खुणा ॥२॥ गोविंद म्हणे नाम गान । अंतर्बाह्य आचरण ॥३॥

५४८) ऐका संन्यास आश्रम । जेथे नुरे काम्य कर्म ॥१॥ होऊनी संकल्पाचा न्यासी । नाम जपे अहर्निशी ॥२॥ निष्काम काम रामनाम । सेवी आनंदाचे धाम ॥३॥ विकल्प नाही जयापाशी । दास म्हणे तो संन्यासी ॥४॥

५४९) संन्याशाचे गुणे भगव्यासी मोल । काय रंगा मोल आहे तेथे ॥१॥ ब्रह्मज्ञान योगे ब्राह्मणाशी मोल । गुणावीण फोल सर्व होते ॥२॥ रामनाम गुणे नरदेहा मोल । संतांचा हा बोल मौल्यवान ॥३॥ तीन गुणा पैल असे हरिगुण । उत्तम लक्षण दास म्हणे ॥४॥

५५०) तोचि जाणावा बांधला । कामक्रोधे गुंडाळला ॥१॥ तोचि जाणावा बांधला । अहंभाव युक्त झाला ॥२॥ तोचि जाणावा बांधला । मी माझे हे न सुटे ज्याला ॥३॥ दास म्हणे तो बांधला । नेणे आपण बद्ध झाला ॥४॥

५५१) बद्धाचे लक्षण । नेणे बांधलो आपण ॥१॥ आशा जीवासी बंधन । तोडू शके नारायण ॥२॥ संकल्पाने जो बांधला । कैचा म्हणावा मोकळा ॥३॥ जनममरण बद्धपण । नाम चुकवी दास म्हणे ॥४॥

५५२) ममता धरिता बांधला । जरी दिसतो मोकळा ॥१॥ मन करावया निपट । नाम धरावे चोखट ॥२॥ आशा मधाचे हे बोट । संसाराचे मूळपीठ ॥३॥ आशा म्हणावी आसक्ति । नैराश्यता अनासक्ति ॥४॥ दास नामे मुक्त झाला । जरी दिसतो बांधला ॥५॥

५५३) तोडावया बंध आशा । धरी अंतरी नैराश्या ॥१॥ वैराग्य ते बोलिजे कायी । आशा ज्यात उरत नाही ॥२॥ नाम निर्गत करी आशा । दासा दाखवी नैराश्या ॥३॥

५५४) ऐका मुमुक्षु लक्षण । मोक्ष इच्छा धरिता जाण ॥१॥ जैशी

इच्छा तैसे फळ । मोक्ष साधणे दुर्मिळ ॥२॥ इहा मुत्र भोग वारी । तगे त्याची इच्छा धरी ॥३॥ तीन साधने साधिता । मुमुक्षुत्त्व येई हाता ॥३॥ दासा नामे मोक्ष धाम । तेणे होय पूर्ण काम ॥४॥

५५५) तीन साधने साधिता । मुमुक्षुत्व येई हाता ॥१॥ धरी राघवाची इच्छा । तीच जाणावी मोक्षेच्छा ॥२॥ दुजी नाही अभिलाषा । सदा मानसी सर्वेषा ॥३॥ दास नामी धरी हेत । पूर्ण करी तो अनंत ॥४॥

५५६) ऐका साधकाची दशा । जेणे भेटी होय ईशा ॥१॥ करूनी नामाचे मंथन । हृदयी प्रगटवी नारायण ॥२॥ नियम शुद्ध आचरण । राहे देही उदासीन ॥३॥ दास म्हणे त्याची ख्याती । देव वाढवी श्रीपति ॥४॥

५५७) ऐका सिद्धाची ती मात । बोलवेना ते बोलत ॥१॥ अखंड साधनी स्थिरला । सिद्ध जाणावा तो भला ॥२॥ आत्मस्वरूपासी पाही । आत्मरूप होऊनि राही ॥३॥ नवविध भक्तिखूण । दासा नामी सिद्धपण ॥४॥

५५८) बुद्धी स्थिर करी नामी । मग सुखे राहे धामी ॥१॥ बुद्धी पालटते फार । धरी नामाचा आधार । स्थितप्रज्ञ दशा पाही । गुरूकृपे प्राप्त होई ॥३॥ दास म्हणे वारंवार । बुद्धी नामी करी स्थिर ॥४॥

५५९) सांगा म्हणती जन उपदेश गोष्टी । जेणे नव्हे कष्टी संसारात ॥१॥ खरा उपदेश नामाचे स्मरण । आणि विस्मरण इतरांचे ॥२॥ देवावीण मन अन्य सर्वाठायी । हिंडे दिशा दाही सारिखेची ॥३॥ उपदेश काय असे तो बाहेरी । पाहती ना अंतरी कोणी एक ॥४॥ आवरोनि मन करावे चिंतन । नवल महिमान दास म्हणे ॥५॥

५६०) देव व्हावा तरी या गोष्टी अंतरी । धरोनी विचारी साठवाना ॥१॥ धरावा तो भाव विश्वास सदैव । जेणे देवदेव कृपा करी ॥२॥ त्या क्षमा शांती धरोनिया प्रीती । मुक्तीवरील भक्ति ओळखावी ॥३॥ विवेक वैराग्य बोध उमगावा । चित्त शुद्ध ठेवा दास म्हणे ॥४॥

५६१) सर्व दुर्लभात दुर्लभ ते कायी । विचारोनी घेई मनामाजी ॥१॥ नरदेह जाण प्रथम दुर्लभ । द्वितीय दुर्लभ साधुसंग ॥२॥ देवाजीचे नाम तृतीय दुर्लभ । दुर्लभा दुर्लभ देवपाय ॥३॥ देवपाय मनी देव पाहे जनी । देव त्याचा ऋणी दास म्हणे ॥४॥

५६२) खरे अनन्याचे ज्ञान । होता रक्षी भगवान ॥१॥ देवावीण अन्य नाही । अनन्यत्त्वे तेची पाही ॥२॥ एकविध भाव होता । अनन्यत्त्व येई हाता ॥३॥ एकविध तत्त्व नाम । दास जेणे पूर्ण काम ॥४॥

५६३) ऐसा धरावा विचार । जेणे भेटेल ईश्वर ॥१॥ कसे करू काय करू । या विचारे नको भरू ॥२॥ अन्य विचारी राहता । समाधान न ये हाता ॥३॥ दास भावे नाम धरी । देव तयाचा श्रीहरी ॥४॥

५६४) कोण करावा विचार । जेणे चुके जन्मांतर ॥१॥ जेणे मिळेल सद्गती । चित्ता समाधान शांती ॥२॥ सार ओळखोनी घ्यावे । सार विचारी रहावे ॥३॥ सार विचार रामनाम । दासा हृदयी मेघश्याम ॥४॥

५६५) ऐशा विचारी राहणे । अविचार नुरे जेणे ॥१॥ शुभेच्छेचे पाचवे काम । वर्म जाणावे परम ॥२॥ चित्त विचारी जडता । शुभ तेचि येई हाता ॥३॥ जाणे विचार हा सार । ज्ञाने नामे दास पार ॥४॥

५६६) ऐका अविचार फळ । दुःख आणि तळमळ ॥१॥ सत् आचार

विचार । अ सदाचा अविचार ॥२॥ अविचाराचे लक्षण । रामनामी विन्मुखपण ॥३॥ विचार काशीपुरी जाता । दासा नामे सर्व सत्ता ॥४॥

५६७) आपुला आपण करीता विचार । दुजाचे साचार काम नाही ॥१॥ सार विचारावे बरे पारखावे । कळेल स्वभावे कळे तेचि ॥२॥ रूप राघोबाचे तगतसे साचे । साधनी नामाचे दास म्हणे ॥३॥

५६८) प्रेममंदिरात । चित्त चैतन्यी मिळत ॥१॥ देव भेटेल परम । मना होय उपरम ॥२॥ गोविंद म्हणे तोचि श्रेष्ठ । नाही त्याहूनी वरिष्ठ॥३॥

५६९) कोण गाव ओळखावा । देव तेथे दिसे बरवा ॥१॥ तेथे जावोनी पहाता । खरे सुख येई हाता ॥२॥ गोविंद म्हणे हे कळेल । गुरूकृपे आकळेल ॥३॥

५७०) एकापासोन एकोणीस । गावी नाही सुखलेश ॥१॥ विसावीया गावी जाता । विसावा तो येई हाता ॥२॥ गुरुकृपे नामी जाता । देव दासाचा रक्षिता ॥३॥

५७१) सकळांचा अन्नदाता । एक देवची तत्त्वता ॥१॥ सर्व जग हे बालक । देव तयाचा पालक ॥२॥ म्हणेनिया नाम गाई । रक्षील तो सर्वथाही ॥३॥ दास म्हणे सांगो कायी । अनुभव दुजा नाही ॥४॥

५७२) सत्य अनुभव पाही । नाम विज्ञान तू घेई ॥१॥ वरी काटेरी फणस । आत गरा तो सुरस ॥२॥ वरी देह तो निरस । आत गोड नामरस ॥३॥ नामी देव दिसे पाही । दास म्हणे नको काही ॥४॥

५७३) जन्म मरण फेरी कैसेनी चुकेल । देव आकळेल कोण्या गुणे ॥१॥ सांगा मज होरा तुम्ही संतजन । भविष्य कथन करा बरे ॥२॥ सोडा वासनेसी कर न करेसी । खोडावे मनासी साधनाने ॥३॥ अखंडित नाम देवाजीचे गावे । दास म्हणे पावे देवपद ॥४॥

५७४) देवालागी शरण जावे । नाम मागणे मागावे ॥१॥ अन्य मागणे मागता । देवकृपा न ये हाता ॥२॥ देवकृपा झाल्यावरी । दास धन्य चराचरी ॥३॥

५७५) अनुभवे अनुभव । घेता कळो येई देव ॥१॥ अनुभव रामनामी । मन होईल निष्कामी ॥२॥ गोविंद म्हणे दोनी सम । होता साधेल हे काम ॥३॥

५७६) प्रसाद व्हावा तरी । मुखी उच्चारावा हरी ॥१॥ प्रसाद तोचि जाणा । देही दिसती देवखुणा ॥२॥ गोविंद म्हणे गुरूपायी । साधनाने कळो येई ॥३॥

५७७) नाम विश्वासाचे फळ । भाग्य लाभेल सकळ ॥१॥ एके ठायी लावी चित्त । देई इंद्रिया उचित ॥२॥ आवडीने भावे गाई । देव त्याची चिंता वाही ॥३॥ दास म्हणे सांगो किती । पाहे संतांची प्रचीती ॥४॥

५७८) प्राप्तस्थिती तीच बरी । नाम गावे निरंतरी ॥१॥ देव देईल स्वभावे । आनंदाने स्वीकारावे ॥२॥ काय पाहसी वरूते । पाही आपुल्या खालते ॥३॥ ज्याचे योगे नाम धरी । दास तीच स्थिती बरी ॥४॥

५७९) संकटाचा परिहार । एक करील ईश्वर ॥१॥ नाही आणिकाची सत्ता । देव सर्व काही कर्ता ॥२॥ त्याचे नाम सदा घेई । तयालागी शरण जाई ॥३॥ सर्व भक्तजना पाही । दास म्हणे अनुभव येई ॥४॥

५८०) बाह्यरंगा भुलू नको । अंतरंग सोडू नको ॥१॥ बाह्यरंग माया भुली । अंतरंग नाम बोली ॥२॥ अंतरंगामाजी जाता । श्रीरंग तो येई हाता ॥३॥ दास म्हणे नाम धरी । देव तयाचा श्रीहरी ॥४॥

५८१) बाह्य करू जाता शोध । नोहे मार्गाचा तो बोध ॥१॥ शोध बाहेरी चालिला । मार्ग अंतरी राहिला ॥२॥ देहामाजी शोध घेई । मग

देव हाता येई ॥३॥ संतसंगे मने पाही । दासा नामे गती होई ॥४॥

५८२) देव आहे देव आहे । आस्तिक्य भाव ज्यासी आहे ॥१॥ देव नाही देव नाही । आस्तिक्य भाव ज्यासी नाही ॥२॥ एका आहे एका नाही । भावनेचा खेळ पाही ॥३॥ नाही जवळी ना दूर । दासा हृदयी सर्वेश्वर ॥४॥

५८३) रिकामा होवोनी नाम स्वये गाता । मग देव हाता येई स्वये ॥१॥ रिकामाची राही रिकामाची राही । मनी काम नाही रामयोगे ॥२॥ म्हणसी रिकामा धरोनिया कामा । तरी तुझ्या नामा देव नाही ॥३॥ जया जया वेळी होशील रिकामा । दास म्हणे नामा घेई वेगी ॥४॥

५८४) देवपण येता । नुरे वाईटाची वार्ता ॥१॥ वाईट तितुके असूर । चांगले ते जाणा सूर ॥२॥ गोविंद म्हणे घेई सूर । म्हणजे जाईल असूर ॥३॥

५८५) देव प्रगटचि आहे । कसल्यावीण न दिसे पाहे ॥१॥ प्रगट असोनि दिसेना । आपले अज्ञान हे जाणा ॥२॥ नाम कसता सानुरागे । देव प्रगट दिसे अंगे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । पहावी अनुभव प्रचीती ॥४॥

५८६) आत असे तरी प्रगटे बाहेरी । काय ते कस्तुरी सांगो लागे ॥१॥ तैसे जन्मांतरी भक्ती ज्या अंतरी । शोधिती ते हरि स्वभावेची ॥२॥ मुळीचा स्वभाव कैसा सुटे पाही । सूत्र नाम गाई अखंडित ॥३॥ सोहंभाव आत प्रगटल्या देही । कल्याण तो पाही दास म्हणे ॥४॥

५८७) देवाचे मंदिरी । नामघोष प्रहर चारी ॥१॥ मंदिर म्हणजे मन धीर । धरूनी राहे जेथे स्थिर ॥२॥ गोविंद म्हणे धीर काय । नामाविण न धरी सोय ॥३॥

५८८) शब्दाने सांगता देव न ये हाता । स्मरण हे चित्ता धरिता बरे ॥१॥ स्मरण हाचि देव ओळखावे वर्म । अलंकार हेम जयापरी ॥२॥ दास म्हणे राम यावा वाटे हाती । विस्मरण हे चित्ती न धरी कदा ॥२॥

५८९) शब्द परमार्थी बोलती । न कळे परमार्थाची रीती ॥१॥ हिरियास मोठेपण । जाण हिरियाचे लक्षणी ॥२॥ मुख्य परमार्थाची रीती । श्वासोश्वासी नाम घेती ॥३॥ हाचि उत्तम उपाय । दासा नामी तरणोपाय ॥४॥

५९०) शब्दज्ञान होता ज्ञान हाती आले । ऐसे नाही झाले काही केल्या ॥१॥ ज्ञानमार्ग धरी ज्ञानमार्ग धरी । नाम हे उच्चारी क्रियायोगे ॥२॥ ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे । खूण विसरणे अज्ञान ते ॥३॥ ऐशिया ज्ञानाचे बळ ते अमित । दिसे अघटित दास म्हणे॥४॥

५९१) खरा राम रामनामामाजी आहे । आन नाही पाहे कशामाजी ॥१॥ म्हणोनिया जनी घ्यावे रामनाम । भेटेल श्रीराम जेणे योगे ॥२॥ दास म्हणे नाम घेई वेळोवेळा । परमार्थ वेगळा उरला नाही ॥३॥

५९२) धरी एके ठायी भाव । देव भेटेल माधव ॥१॥ एक ठाय तोच आहे । एक चित्त जेथ होय ॥२॥ कोणी वंदा कोणी निंदा । नामी भाव धरणे धंदा ॥३॥ गुरुवचन एक ठाय । दास म्हणे तरणोपाय ॥४॥

५९३) भाव धरी तरी देव । काय धरोनी अभाव ॥१॥ अभाविक होऊ नको । भाव कदा सोडू नको ॥२॥ गोविंद म्हणे सांगो काई । भाव देव दोन नाही ॥३॥

५९४) भोळा भाव सिद्धी जाय । तेथे तर्क ना संशय ॥१॥ सांगितले तेचि करी । जेणे योगे भेटे हरी ॥२॥ काय संती सांगितले । नामावीण

नाही भले ॥३॥ भकाराची ओळ पाहे । दास म्हणे नाम गाये ॥४॥

५९५) भोळा भाव सिद्धी जाये । न लगे आणिक उपाय ॥१॥ नको विद्या ज्ञान फार । नाम साराचेही सार ॥२॥ एक एकविध भाव । एक जाणे दृढभाव ॥३॥ भोळा भक्त प्रीय थोर । दास म्हणे प्रेम फार ॥४॥

५९६) भोळ्या भावे पावे देव । भोळा भाव कोण ठाव ॥१॥ भ ची ओळ भोळा भाव । ओळ देही दावी ठाव ॥२॥ गोविंद म्हणे भले । कळो येईल उगले ॥३॥

५९७) भोळ्या भक्ताचे लक्षण । एक भाव हीच खूण ॥१॥ भाव धरोनिया मने । अखंडित नाम घेणे ॥२॥ दास म्हणे आन नाही । त्याचा होई शेषशायी ॥३॥

५९८) चित्ती खरा भाव नसे आचरण । म्हणे नारायण केवी भेटे ॥१॥ खोटे करोनिया कोणा सापडला । खरे नाम बोला तरीच मिळे ॥२॥ भाव तोचि देव बोलियेला भाव । याचा अनुभव उमगावा ॥३॥ देही खरे काय तोचि खरा भाव । येर खोटे वाव दास म्हणे ॥४॥

५९९) आपुला देव व्हावा जरी । निष्ठावंत भाव धरी ॥१॥ इंद्रियांचे नियमन । होता कळे निष्ठाखूण ॥२॥ निष्ठा नामाचे भजन । प्रणवाचे उच्चारण ॥३॥ गुरुकृपे कळो येई । दास म्हणे समजुनी घेई ॥४॥

६००) सद्भाव पाऊली स्मरण मारगी । जाई धामी वेगी श्रीहरीच्या ॥१॥ असद्भाव पद सर्वथा वर्जावे । नाम नित्य गावे सद्भावाने ॥२॥ संसार तरण्या नाम थोर आशा । त्यावीण निराशा सर्व काही ॥३॥ सोपा मार्ग भवसागरावरोनी । दास म्हणे जनी उल्लंघाया ॥४॥

६०१) एक भावे देव पाही । देव येता सर्व काही ॥१॥ थोर भावाचे हे देणे । जाण सर्वात्मकपणे ॥२॥ गोविंद म्हणे एक भाव । ज्यात नामाचा असे ठाव ॥३॥

६०२) ऐसा भावाचा प्रभाव । भाव धरिता भेटे देव ॥१॥ आत भाव नाही मनी । तया कैसा चक्रपाणी ॥२॥ पुण्ययोगे प्रगटे भाव । पापयोगे तो अभाव ॥३॥ पाप सहज हाती येई । दास म्हणे नाम घेई ॥४॥

६०३) एक धरिता दृढ भाव । त्याचा होय पंढरीराव ॥१॥ काय आणिक साधने । शरीर ते प्राणावीणे ॥२॥ दृढ भावाचे लक्षण । भावामध्ये नाम घेणे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । भावामाजी हे प्रचीती ॥४॥

६०४) जरी असे दृढभाव । तरी सिद्धी होय सर्व ॥१॥ भाव तारी भाव मारी । जैसा भाव तैसा हरि ॥२॥ एक भाव असे पुरा । तेथे कायसा पसारा ॥३॥ दास नामी भाव धरी । त्यासी भेटतो श्रीहरी ॥४॥

६०५) एके ठायी ठेवी भाव । तारी तुज गुरुदेव ॥१॥ अनेकासी धरू जाता । काही एक न ये हाता ॥२॥ एकामाजी सर्व भले । ऐसे प्रचीतीस आले ॥३॥ नाम घेता प्रगटे देव । ज्याचा अंतरात भाव ॥४॥ तयालागी नाही भय । दास म्हणे नामी सोय ॥५॥

६०६) एके ठायी धरी भाव । देव भेटेल माधव ॥१॥ एक ठाय तोच पाहे । एकचित्त तेथे होये ॥२॥ कोणी निंदा कोणी वंदा । नामी भाव धरणे धंदा ॥३॥ गुरुवचन एक ठाय । दास म्हणे तरणोपाय ॥४॥

६०७) ऐका भावाभाव फळ । चित्त करोनि निर्मळ ॥१॥ नसता देव प्रगट होई । ऐसे भावफळ पाही ॥२॥ अभावाचे फळ पाही । असता देव नाही होई ॥३॥ नामे अभावाचा नाश । भाव धरी म्हणे दास ॥४॥

६०८) ऐका भावाचा प्रभाव । भावापाशी वसे देव ॥१॥ होता जयाचा अभाव । लोपताती सर्व भाव ॥२॥ भाव तोचि जाणे देव । दासा नामी स्वयमेव ॥३॥

६०९) आपुलाचि भाव आपणासी तारी । वचन अवधारी तयासीच ॥१॥ आपुलाचि भाव आपणासी मारी । वचन नावधारी म्हणोनिया ॥२॥ वचनी विश्वास तोचि तारक भाव । अविश्वास नाव अभावाचे ॥३॥ दास म्हणे देही आहे भावकळा । माजी नामकळा गाई प्रेमे ॥४॥

६१०) आपुलाची भाव आपणासी तारी । आपणासी मारी अभाव तो ॥१॥ म्हणोनिया भावे नाम वाचे गावे । जेणे मना होये समाधान ॥२॥ महादोषी परी नामे उद्धरती । ऐसी आहे ख्याती दास म्हणे ॥३॥

६११) आपणास कोण तारी । आपणास कोण मारी ॥१॥ आपुला भाव आपणा तारी । आपुला भाव आपणा मारी ॥२॥ जरी राहील सद्भाव । भाव तोचि होईल देव ॥३॥ अभाव अधःपतन गिरकी । सद्भाव गुरुपदी फिरकी ॥४॥ नामे जाऊनी कुभाव । दासालागी भेटे देव ॥५॥

६१२) कोण आपणा तारक । कोण आपणा मारक ॥१॥ आपुला भाव आपणा तारी । आपुला भाव आपणा मारी ॥२॥ देही आहे तारक भाव । तेचि देवाजीचे नाव ॥३। रामनामी जडता बुद्धी । दासा पावे सकळ सिद्धी ॥४॥

६१३) सकळा तारक ते काय । सांगा सुलभ उपाय ॥१॥ नाम जीवासी तारक । नोहे कदापी मारक ॥२॥ ऐसी आहे नामकळा । परी घेई वेळोवेळा ॥३॥ नाम घेऊ नाम घेऊ । म्हणोनिया नको राहू ॥४॥ दास वाहे आण भाक । दासा रक्षी देव एक ॥५॥

६१४) कोणी का असेना नाम मुखी गाता । ब्रह्मज्ञान हाता येई स्वये ॥१॥ नाम ब्रह्म पाहे नाम ब्रह्म पाहे । नाम छंदी राहे ब्रह्मज्ञानी॥२॥ जीव भाव नामी ब्रह्मभाव जेव्हा । दास म्हणे तेव्हा ब्रह्मी वळे ॥३॥

६१५) अभावाने कार्य हानी । भाव विरहीत नाही कोणी ॥१॥ हे तो अज्ञाना कळेना । अभाविक म्हणे आपणा ॥२॥ नामविरहीत भावहीन । गोविंद म्हणे जाणे खूण ॥३॥

६१६) अभाविका उपदेश । पालथी घागर पाण्यास ॥१॥ काय येईल सांग कामा । सदा अंतरी रिकामा ॥२॥ गोविंद म्हणे अभाविक । नका होऊ व्हा भावीक ॥३॥

६१७) होऊनी सद्गुरूची लेक । घ्यावे परमेश्वरी सुख ॥१॥ बुद्धी धरी भाव एक । तरी सद्गुरूची लेक ॥२॥ भावामाजी नाम आहे । नामी देव प्रगट आहे ॥३॥ दास म्हणे धन्य कन्या । नामे होत जी अनन्या ॥४॥

६१८) काय बोल घ्यावा मनी । जेणे भेटे चक्रपाणी ॥१॥ कायेमाजी नाम बोल । काय भक्तीने कळेल ॥२॥ काया अयोध्या नगर । जेथे राजा रघुवीर ॥३॥ दास म्हणे सीता सती । रामराजा केला पती ॥४॥

६१९) संत बोलणे यथार्थ । मनी घेती ते कृतार्थ ॥१॥ जगा दाविती भावार्थ। रामनाम हेचि सत्य ॥२॥ गोविंद म्हणे हाचि बोध । निज देही करी शोध ॥३॥

६२०) मानी संतांचे वचन । तया नाही दुःख शीण ॥१॥ ऐसा वचनाचा महिमा । सहज बोलायाची सीमा ॥२॥ धरिताची होय क्षेम । दासा गुरुवचन नेम ॥३॥

६२१) एक विश्वास ज्या नाही । सर्वज्ञान व्यर्थ पाही ॥१॥ प्राण नसता

शरीर । तैसा जाणा तो प्रकार ॥२॥ गुरुवचनी विश्वास । हो का दुर्गुणाची रास ॥३॥ तरी तारेल विश्वास । धरी मनी म्हणे दास ॥४॥

६२२) गुरुवचनी विश्वास । परमार्थाचा ठेवा त्यास ॥१॥ अविश्वासी तो पातकी । देव त्यासी कैसा देखी ॥२॥ गोविंद म्हणे नाम घेई । विश्वासता मुक्ति पाही ॥३॥

६२३) ऐका अविश्वास । जो का संशय उदास ॥१॥ नेई अज्ञानाच्या गावा । लपवोनी ज्ञान जीवा ॥२॥ अविश्वासीयाचे संगे । होय अविश्वासी अंगे ॥३॥ दास म्हणे एकांतास । करावा तो विचारास ॥४॥

६२४) गुरुवचनी विश्वास । धरिता मुक्ती अनयासे ॥१॥ एक विश्वास ज्या नाही । वेदशास्त्र करील कायी ॥२॥ विश्वासता भय काये । विश्वासता देव लाहे ॥३॥ दास वचन नाम पाही । आचरिता दोष नाही ॥४॥

६२५) गुरुपदी जाण्या होई तू रिकामा । अंतरीच्या कामा टाकोनिया ॥१॥ नाम अनुग्रह तरीच फळ जाणा । अनुभव खुणा गुप्त असे ॥२॥ कामाअंती क्रोध, षड्रिपूंचा शोध । साक्षात्कार बोध कैचा तेथे ॥३॥ दास गुरुपदी रिकामाच गेला । आपणा ऐसा केला दास म्हणे ॥४॥

६२६) गुरुपदी सर्व सुख । उरो नेदी काही दुःख ॥१॥ सर्व सुखी तोचि झाला । नाम अंतरी जयाला ॥२॥ गोविंद म्हणे तोचि धन्य । गुरुपदी जो अनन्य ॥३॥

६२७) गुरुपद सेवा । तारक जी सर्व जीवा ॥१॥ गुरुपद गती थोर । सर्व जीवासी आधार ॥२॥ गोविंद म्हणे पाय धरी । काही नसावे अंतरी ॥३॥

६२८) गुरुमार्गे जाता खटाटोप नाही । सूक्ष्म जो का पाही

नामरूप ॥१॥ योग याग विधी उगी खटपट । गुरूमार्ग चोखट गुरूकृपे ॥२॥ तोचि ज्ञानमार्ग देवाजीचे नाम । होसी पूर्णकाम दास म्हणे ॥३॥

६२९) गुरुवाक्याचे सेवन । काया वाचा मने जाण ॥१॥ भेद नये कोणेपरी। त्यासी भेटेल श्रीहरी ॥२॥ अंतरबाह्य सेवी श्वासी । श्रद्धा बोलिजे तयासी ॥३॥ श्रद्धेचे हे ऐसे बळ । दासा भेटवी गोपाळ ॥४॥

६३०) गुरुवाक्य मनी धरी । तोचि धन्य चराचरी ॥१॥ गुरुवचन पाळिता । महावाक्य देती हाता ॥२॥ रामनाम खरे इष्ट । दास म्हणे घे वरिष्ठ ॥३॥

६३१) पढिक ते ज्ञान बहु साठविले । कृतीवीण ठेले निरुपयोगी ॥१॥ जळो जळो त्याचे ज्ञानाचे भांडार । ज्यामध्ये सुंदर नाम नाही ॥२॥ आप आपणाते होत असे शत्रु । नामे होय मित्रु कृतिमय ॥३॥ दास म्हणे नाम ज्ञानयज्ञ बरा । चुकवील फेरा चौऱ्यांशीचा ॥४॥

६३२) ज्ञान अज्ञान न ये कामी । चित्त ठेवी हरिनामी ॥१॥ जरी आहे चित्त साह्य । तरी कार्य सिद्धी होय ॥२॥ तत्चित्तता प्राप्त होता । तुटे बंधन सर्वथा ॥३॥ तो गे तोचि राम पाही । दासपदी लीन होई ॥४॥

६३३) शिष्या करिती उपदेश । जैसा अधिकार त्यास ॥१॥ हे तो पदवीचे देणे । ज्याचे तयाने भोगणे ॥२॥ धरी कृत्रिम पदवी । करोनिया काय दावी ॥३॥ जया वैराग्य अंतरी । गुरुकृपे साक्षात्कारी ॥४॥ तत्काळची होय पाही । दास म्हणे नाम घेई ॥५॥

६३४) शाश्वतात नाम घेता । शाश्वत पद येई हाता ॥१॥ सुखदुःखादि जाईल । बाल्य तारुण्य जाईल ॥२॥ अशाश्वत साठविता । सवे काय येई हाता ॥३॥ दास म्हणे नाम संगे । अखंडित राही उगे ॥४॥

६३५) सोडू नये ऐसे काय । धरू नये ऐसे काय ॥१॥ कीर्तनास सोडू नये । प्रपंचास धरू नये ॥२॥ धरावे ते ऐसे काय । संत दाविताती सोय ॥३॥ धरिता नामसंकीर्तन । दास म्हणे नुरे विघ्न ॥४॥

६३६) सोड अंतरीचे कुढे । चांग संग धरी पुढे ॥१॥ तेणे हित होय बापा । गोविंदनामे चुकती खेपा ॥२॥ दुष्ट अंतरी राहिला । नाश करितो आपुला ॥३॥ नाम जागृती राहिले । दास म्हणे ते चांगले ॥४॥

६३७) सोडी संसाराचा सोस । रामनामी धरी आस ॥१॥ नाही संसार सुखाचा । मार्ग धरी स्वसुखाचा ॥२॥ करी सद्व्यय आयुष्याचा । वेची रामनामी वाचा ॥३॥ दास करितो विनंती । घ्यावी साधुजनी चित्ती ॥४॥

६३८) सोडू नये ऐसे काय । धरू नये ऐसे काय ॥१॥ कीर्तनासी सोडू नये । प्रपंचास धरू नये ॥२॥ बोलू नये ऐसे काय । बोलावे ते ऐसे काय ॥३॥ नामावीण बोलू नये । सदा रामनाम गाये ॥४॥ नामसंकीर्तनी जडता । दासा काळावरी सत्ता ॥५॥

६३९) ज्याची चांग असे दृष्टी । तया चांग दिसे सृष्टी ॥१॥ जेथे दृष्टी निर्विकार । तेथे भेटे रघुवीर ॥२॥ दृष्टी चांग होण्या जाण । मन करावे सुमन ॥३॥ मन चांग होण्या जाण । दास म्हणे नाम खूण ॥४॥

६४०) कोणी काय करू नये । मनी धरा काही सोये ॥१॥ मन ज्याचे घरी राहे । त्याने देवा जाऊ नये ॥२॥ मन जरी विषयांत । काय करोनि एकांत ॥३॥ दिले ज्याचे मनी राहे । त्याने दान देऊ नये ॥४॥ ज्यासी नाही धर्म भय । त्याने कर्म करू नये ॥५॥ मन प्रपंचात राहे । त्याने वना जाऊ नये ॥६॥ दास मनी नाम गात । त्याने फिरू नये जनात ॥७॥

६४१) मनी चांगला विचार । येता करी जो साचार ॥१॥ तोचि सर्व काही साधी । नाही तरी सर्व बाधी ॥२॥ चांगल्यास विघ्ने फार । विलंबाने हानी थोर ॥३॥ दास नामेचि कृतार्थ । सर्व पुरती मनोरथ॥४॥

६४२) काळ कैसा करितो ग्रास । बोध घ्यावा हा मनास ॥१॥ युक्ति युक्ति ग्रास करी । नेदी कळोच अंतरी ॥२॥ काळ सार्थक करणे । काळ आज्ञांकित जेणे ॥३॥ काळ सार्थकता नाम कंठी । दासा सोडवी जगजेठी ॥४॥

६४३) काळ कैसा घाली घाला । न कळे काहीच कोणाला ॥१॥ जैसा झोपेचा मामला । तैसा काळ घाली घाला ॥२॥ काळ संतांचा अंकित । संत रामनामांकित ॥३॥ जाणे राम सोडविता । दास मुक्तचि तत्त्वता ॥४॥

६४४) आपुलिया संगे येईल ते काय । शोधोनिया पाहे मनामाजी ॥१॥ संगे येई कर्म चांगले वाईट । परी ते शेवट दाखवीना ॥२॥ चांगलिया कर्मे म्हणती चांगला । म्हणती वाईटाला वाईटची ॥३॥ परी ते म्हणणे सोडवीना कोणा । म्हणणार कोणा कामा नये ॥४॥ संगे येईल एक देवाजीचे नाम । करी पूर्ण काम साधकासी ॥५॥ ऐश्वर्यादि सर्व येथील येथेचि । गत हे शेवटची दास म्हणे ॥६॥

६४५) चांगलिया वेळे वाईट चांगले । वाईटाचे वेळे चांग हीन ॥१॥ ऐसा थोर आहे काळाचा मामला । सोडोनि तयाला स्वस्थ राही ।२॥ दोन्ही नको धरू नामचि आधारू । धरोनि निर्धारू सदा जपे ॥३॥ देवाचिये घरी काळाचे उदरी । न कळे काय परी दास म्हणे ॥४॥

६४६) चांगले साधाया पडताती कष्ट । वाईट ते नष्ट सहजी घडे ॥१॥ म्हणोनिया दृढ करोनिया मन । आघात सहन करी वेगी ॥२॥ एक मनी

धरी नामाचे स्मरण । साधाया कारण चांगल्याचे ॥३॥ साहुनि टाकी घाव पाषाण तो देव । पहावा अनुभव दास म्हणे ॥४॥

६४७) कैचा संकटाचा नाश । ऐका त्याचे उपायास ॥१॥ नामे वश केला हरी । संकट त्या काय करी ॥२॥ दिनमणी हाता येता । नुरे अंधाराची वार्ता ॥३॥ नाम उत्तम निर्विघ्न । दासा वश रघुनंदन ॥४॥

६४८) स्नानाचा हा हेतु करावे निर्मळ । जव अंतरी मळ शुद्ध नव्हे ॥१॥ तरी काय स्नान साधिले म्हणावे । अंतर करावे शुद्ध आधी ॥२॥ शुद्धता मनाची हेचि स्नान मुख्य । नाम जपता देख तरीच होय ॥३॥ आंत नाही शुद्धी कैची नामी बुद्धी । मायिक उपाधी तुटेचिना ॥४॥ दास म्हणे तोडावया भवबंध । नामाचे प्रबंध गंगा ओघ ॥५॥

६४९) स्नान करोनी निर्मळ । बैसे आसनी निश्चळ ॥१॥ रामनामी अनुसंधान । संध्या बरवी करावी ॥२॥ प्राणायाम तो साधावा । जेणे सुख होय जीवा ॥३॥ नाका कानासी लावावा । हात वृथा काशासी ॥४॥ बोध घेऊनी मनासी । कर्मे करिता निश्चयेसी ॥५॥ दास म्हणे परीयेसी । होई कर्म सुफळ ॥६॥

६५०) नाही आपुली भावना । काय करोनिया स्नाना ॥१॥ नाही भावनेचे बळ । करोनी सर्व निर्फळ ॥२॥ बरी वाईट भावना । तैसे त्याचे फळ जाणा ॥३॥ नामी देव ही भावना । दास म्हणे धरी मना ॥४॥

६५१) बीज अंतरी रुजले । तैसे फळ हाती आले ॥१॥ भक्ती घरी नाम अन्न । भाव सेविता प्रसन्न ॥२॥ तरी भाऊबीज होई । चुके जन्ममरण पाही ॥३॥ बीज वर्म ओळखावे । दास म्हणे मुक्त व्हावे ॥४॥

६५२) स्नान करोनिया भला । सोवळा तो कोण झाला ॥१॥ अंतर्बाह्य निर्मळ मन । सोवळेपणाचे लक्षण ॥२॥ ऐशी बुद्धी हाती येता । मग भेटी भगवंता ॥३॥ देही कामक्रोध मांग । तव ओवळे हे अंग ॥४॥ याचा करावा विचार । नामें शुद्ध हे अंतर ॥५॥ सकारात जो वळला । दास सोवळा तो भला ॥६॥

६५३) एकांतीचे स्थानी । एकांतीचे सुख जाणी ॥१॥ जीव शिव एक होत । जये ठायी तो एकांत ॥२॥ एकामाजी अंत होई । एकांत तो पाही देही ॥३॥ नामे एकांतात गेला । देव दासांकित झाला ॥४॥

६५४) एकांत बाणे तरी हरी । जाणे एकांताची परी ॥१॥ ज्या एकात होय अंत । तोची जाणावा एकांत ॥२॥ गोविंद म्हणे तेथ खूण । रामनाम सदा जाण ॥३॥

६५५) आपुला ठेवा नाही देवापाशी । असेल तयासी देत आहे ॥१॥ साठल्या वाचोनी काय देई हाता । म्हणे देवनाथा देई मज ॥२॥ पूर्वी केले नाही आता करुनी घेई । मग शेषशायी देई त्याते ॥३॥ रामनाम ठेवा अमूप हे धन । साधी तया भगवान दास म्हणे ॥४॥

६५६) उद्योगाचे घरी । रिद्धीसिद्धी पाणी भरी ॥१॥ करी उद्योग नामाचा । तोचि मानव दैवाचा ॥२॥ करिता संसार उद्योग । होय देवाचा वियोग ॥३॥ सत्यमार्गी सरळ जाये । आळस कदा नच राहे ॥४॥ आळस हा नव्हे बरा । दास सांगतो विचारा ॥५॥

६५७) ऐशी प्रयत्नाची दिशा । जेणे भेटी जगदीशा ॥१॥ नाम कसणे उठाउठी । ऐशी प्रयत्नाची गोठी ॥२॥ यत्न नको नरकाचा । परी असो उद्धाराचा ॥३॥ यत्न अंतरी साधिता । दासा हाती सर्व सत्ता ॥४॥

६५८) उद्योगाचे घरी । रिद्धी सिद्धी पाणी भरी ॥१॥ स्वर्ग करी नरकाचा । ऐसा महिमा उद्योगाचा ॥२॥ करिता संसार उद्योग । होय देवाचा वियोग ॥३॥ दासा गोडी उद्योगाची । हरिनामी वय वेची ॥४॥

६५९) इतमाम ज्याचा त्याला । काय असे भलत्याला ॥१॥ आपणचि मेळवावे । मग सौख्याने भोगावे ॥२॥ आधी कष्ट मग फळ । हे तो जाणावे केवळ ॥३॥ चणे खावे लोखंडाचे । तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥४॥ आधी घ्यावे गुरुज्ञान । मग वैभव ते जाण ॥५॥ हे तो संतचि जाणती । दास चरणाची माती ॥६॥

६६०) चणे खावे लोखंडाचे । तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥१॥ कष्टेवीण कैसे फळ । कष्ट नाही ते निर्फळ ॥२॥ जीवा सांसारिक कष्ट । परी भेटेना वरिष्ठ ॥३॥ रामनाम खरे कष्ट । दासा भेटे सर्वश्रेष्ठ ॥४॥

६६१) सर्वा अतिशय दोष । देवनाम हे निर्दोष ॥१॥ सर्वकाळ घेता पाही । अतिशय तेथे नाही ॥२॥ म्हणोनिया नाम घ्यावे । जन्म सार्थक करावे ॥३॥ रामनाम सुमंगल । करी दासाचे मंगल ॥४॥

६६२) पतितांनी पावन व्हावे । पतीत पावनाचे नावे ॥१॥ धरी पावनाचा पंथ । वृत्ती करोनिया संथ ॥२॥ येर साधने पतीत । न दाविती पावन पंथ ॥३॥ नाम पवित्र पावन । करी पतीत उद्धरण ॥४॥ आधी असोनी पावन । विस्मरणे पतीतपण ॥५॥ नाम सर्वांगी बिंबले । दास म्हणे परीक्षिले ॥६॥

६६३) काही तरी धरी नेम । तेणे धन्य होय जन्म ॥१॥ तरी नेम तो कोणता । धरी विचारोनि चित्ता ॥२॥ तरी तारोनी नेणारा । रामनामी नेम धरा ॥३॥ गोविंद म्हणे ऐसा नेम । तया काही न दुर्गम ॥४॥

६६४) पावनाच्या संगे पावनचि होसी । विचारे मानसी संतसंगे ॥१॥ पावन ते काय पावन ते काय । पावन ते काय जगामाजी ॥२॥ जगाचे पावन त्रैलोक्य पावन । नाम पवन पावन देहामाजी ॥३॥ जयाचेनि योगे सर्वांग पावन । दास म्हणे खूण गुरूकृपे ॥४॥

६६५) मस्करीत जन्म गेला । कधी ध्यासी रे विठ्ठला ॥१॥ काय पाहिला आधार । नाम न घेसी सादर ॥२॥ काय बळ तुझ्यापाशी । म्हणुनि देवा विसरलासी ॥३॥ घरा लागलासे अग्न । कैसा विषयी तू निमग्न ॥४॥ काही धावाधाव करी । दास म्हणे नाम तारी ॥५॥

६६६) तत्त्व जाणे रे सुजाणा । तोचि माने साधुजना ॥१॥ काय जळाचे मंथन । नये नवनीत जाण ॥२॥ काय भूस बडवून । हातामाजी न ये कण ॥३॥ प्रपंचात तत्त्व सोने । परमार्थी नाम जाणे ॥४॥ ब्रह्मांडात पंचतत्त्वे । आचारात नीतीतत्त्वे ॥५॥ काय स्वप्नीचे वैभव। वृथा मनाचे लाघव ॥६॥ तत्त्व आहे तत्त्वातीत । गुरूकृपे ओळखीत ॥७॥ दासे सांगितली खूण । मनी घ्यावी ओळखण ॥८॥

६६७) काय भुसाचे कांडण । काय तक्र घुसळण ॥१॥ काय मृगजळाचे पाणी । उपयोगा आणी कोणी ॥२॥ कसी राम एक ठायी । उच्चारिता कष्ट नाही ॥३॥ सत्य रामनामावीण । जे जे करिसी तो तो शीण ॥४॥ सदा रामनाम गाई । देव दासा अंकित होई ॥५॥

६६८) नामी विश्वास ज्या नाही । तेणे साधियेले कायी ॥१॥ याचा विचार पाहता । अति दुःख वाटे चित्ता ॥२॥ भुसामाजी कैची कणी । पाण्यामाजी कैचे लोणी ॥३। दास म्हणे विश्वासता । गुरूनामे देव हाता ॥४॥

६६९) वर्म बोलो जाता बोलताचि नये । उमगोनि लाहे गुरूकृपे ॥१॥

साखरेत गोडी जाणावे हे वर्म । देही देवनाम तैशापरी ॥२॥ देवनाम खूण दो अक्षरे राम । समाधी विश्राम दास म्हणे ॥३॥

६७०) जयाचिये सत्ते वेदासी बोलणे । सूर्यासी चालणे नभोमार्गी ॥१॥ जयाचेनि अग्नी दाह करू जाणे । वायुसी खेळणे देहामाजी ॥२॥ जयाचिये सत्ते मृत्यू जीवा नेत । जीव सुखे जात तयामागे ॥३॥ तया विसरोनी जीवा पडे भुली । म्हणे मीच केली सर्व गोष्टी ॥४॥ भूली जावोनिया सुखरूप व्हाया । दास म्हणे वाया नामाविण ॥५॥

६७१) कर्ता करविता एक देव जाण । लीला महिमान वर्णवेना ॥१॥ शरण जाता भले अनन्य चांगले । धरावी पाऊले चित्ती दृढ ॥२॥ कर्ता तोचि जाणी तया ते वाखाणी । रक्षील निर्वाणी चिंतिताची ॥३॥ ऐसा साधुजन सांगताती बोध । दासासी आनंद त्यांच्या गुणे ॥४॥

६७२) कोणा भविष्य कळेना । कळोनिया व्यर्थ जाणा ॥१॥ भविष्याची रेखा । कोण चुकवील देखा ॥२॥ म्हणोनिया स्वस्थ राही । रामनाम मुखी घेई ॥३॥ आले देवाजीच्या मना । तेथे कोणाचे चालेना ॥४॥ पडे झाडाचे ते पान । सर्व जयाचे सत्तेने ॥५॥ दास म्हणे उगा राही । गुरुलागी शरण जाई ॥६॥

६७३) ऐसे धरावे की ब्रीद । जेणे भेटेल गोविंद ॥१॥ ब्रीद ज्याचे जगदानी । त्यासी आठवावे मनी ॥२॥ त्याचे करोनिया दास्य । घ्यावे तयाचे नामास ॥३॥ सत्य हेचि ब्रीद जाण । दासा भेटे भगवान ॥४॥

६७४) कशामध्ये काही नाही । सावध तो कैसा होई ॥१॥ कसा भरोनि घेतला । सावध तो एक भला ॥२॥ कशावीण जे कापडी । निजरूपी त्या झापडी ॥३॥ ऐशी सावधान गोष्टी । दास जेणे नोहे कष्टी ॥४॥

६७५) कैसे वागावे जनात । आहे अवघड रीत ।।१।। साधुजनांचा हा बोध । अनुभव तो विशद ।।२।। सारासार विचारणा । योगे ठेवी अनुसंधाना ।।३।। गोविंद म्हणे सावधान । रामनामी अनुसंधान ।।४।।

६७६) भले बुरे कर्म जीवाचे सांगाती । भले कर्म अंती सोडवील ।।१।। म्हणोनिया जनी धरावा आदर । भले कर्म थोर रामनाम ।।२।। इहलोकी ठाणे दो दिसांची वस्ती । करू नये मस्ती हरिनामी ।।३।। हरिनामी जिव्हा लागता स्मरणी । भेटे मोक्षदानी दास म्हणे ।।४।।

६७७) भले बुरे कर्म जीवाचे सांगाती । परलोक गती प्राप्त जेव्हा ।।१।। म्हणोनिया जनी करावे सत्कर्म । सर्वही अकर्म टाकोनिया ।।२।। जन्माचा सांगाती ओळखोनी घेई । त्याचे नाम पाही भले कर्म ।।३।। ऐसे भले कर्म आचरीत राही । सोडवील पाही जन्ममृत्यू ।।४।। दास म्हणे काळ त्याची आज्ञा वाही । अशक्य त्या नाही जगामाजी ।।५।।

६७८) काय केला बोध इंद्रिया मनासी । सांगोनी जनासी काय काज ।।१।। मनी उमगावे अंतरी स्मरावे । तरीच पावावे समाधान ।।२।। बोध हरिनाम केलासे सुगम । याविण उत्तम काय आहे ।।३।। मनामाजी घेई धरुनिया राही । बोधरूप होई दास म्हणे ।।४।।

६७९) जाणत्याचा पंथ धरा । भेटी होईल ईश्वरा ।।१।। अजाणत्याचा संग । करी मनोरथ भंग ।।२।। जाणत्याच्या मागे जावे । जाणवे ना ते जाणावे ।।३।। जाणत्याचा बोल घ्यावा । बोलवेना तो मानवा ।।४।। बोलवेना असे कायी । दास म्हणे नाम घेई ।।५।।

६८०) मृत्युलोकीची वसती । नाही आनंदाची प्राप्ती ।।१।। काळ

हिंडे बरोबरी । व्यर्थ माझे माझे करी ॥२॥ काळ ग्रासावया टपत । देहातीत साधुसंत ॥३॥ रामपदी जडता मन । दासा ब्रह्मानंद पूर्ण ॥४॥

६८१) जपोनिया जपता नाम । भक्ता भेटवी मेघश्याम ॥१॥ जप ओळखोन घेई । जपा ऐसे तत्त्व नाही ॥२॥ ऐशी गुरूनाम थोरी । दासा देता होय हरी ॥३॥

६८२) नित्यामाजी जपे राम । जप साधावा परम ॥१॥ चुकली जयाची करणी । राम जपला नाही ज्यांनी ॥२॥ नाही दवडीला राम । मिळे तयासी आराम ॥३॥ दास म्हणे सांगो किती । थोर तयांची महती ॥४॥

६८३) नाम केव्हा तू घेणार । काय ऐसाचि राहणार ॥१॥ थोर आयुष्य मोलाचे । दवडणार काय साचे ॥२॥ जव देह सुखरूप । तव करी नाम जप ॥३॥ दास म्हणे सांगो किती । देव रक्षी भक्ताप्रती ॥४॥

६८४) आज करू उद्या करू । आयुष्य काय रे आज्ञाधारू ॥१॥ म्हणसी बसेल बस्तान । मग करू नामगान ॥२॥ हे तो बोलणेचि फोल । त्वरित रामनाम बोल ॥३॥ मग नुरे अंतरी काम । दासा भेटवी मेघश्याम ॥४॥

६८५) सदा राहे सावधान । म्हणो नये थोर सान ॥१॥ चूक तेचि चूक जाण । नव्हे उपेक्षा कारण ॥२॥ उपेक्षिता थोर हानी । सुधारता लाभ जाणी ॥३॥ नामावीण दासवाणी । चुकीचीही चूक जाणी ॥४॥

६८६) स्वल्प नाम काय करी । ऐशी शंका तू न धरी ॥१॥ एक तुळसीचे पान । त्यासी म्हणो नये सान ॥२॥ सूर्यबिंब दिसे सान । प्रकाशवी त्रिभुवन ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामाविण नाही गती ॥४॥

६८७) होता वाणीची ती शुद्धी । नुरे अज्ञान कुबुद्धी ॥१॥ नाही अक्षरांचे काम । सदा जपे रामनाम ॥२॥ बळे अथवा स्वभावे । वाचे नाम उच्चारावे ॥३॥ दास म्हणे शुद्धी होता । बोले तैसे हो सर्वथा ॥४॥

६८८) वाणीची ती शुद्धी । कैशी सांगा त्याची बुद्धी ॥१॥ पवित्र ते नाम । वाचा वदे नित्यनेम ॥२॥ शुद्धी तयाचे वाणीसी । देव बोले उद्धवासी ॥३॥ दास बोले नामवाणी । जेणे शुद्ध चारी वाणी ॥४॥

६८९) जीवपण म्हणजे काये । विचार करोनिया पाहे ॥१॥ रामकृष्ण वाचा पाही । हेचि जीवपण देही ॥२॥ गोविंद म्हणे गुरूनामी । कळो येई निजधामी ॥३॥

६९०) ऐसा मुक्तीचा उपाव । जेणे नुरे जीवभाव ॥१॥ नरजन्मी युक्ती मिळे । नामे श्वासाचेनी मेळे ॥२॥ जन्मासवे सुखदुःख । नामी नुरेचि विशेख ॥३॥ नामी होय जो सन्मुख । त्याचा देव होय एक ॥४॥

६९१) मागत्याची कळा । साधुसंताची वेगळा ॥१॥ काय मागणे मागावे । जनालागी नाही ठावे ॥२॥ उभा पंढरीचा राणा । चारी मुक्ति दासी जाणा ॥३॥ सर्व सिद्धी ज्याचे पायी । तो हा विठ्ठल बापमायी ॥४॥ मागा नाम मुखी सदा । दास विनवितो पदा ॥५॥

६९२) प्रसन्न सर्वेश्वर झाला । काय रे मागसी तयाला ॥१॥ मागणे माग मुखी नाम । तरी तू होसी पूर्णकाम ॥२॥ धन सुत स्त्री पशू हा गोवा । मागोनी होसील पस्तावा ॥३॥ प्रभू हा जगताचा नाथ । दास हा नामी सनाथ ॥४॥

६९३) वांझेची संतती । काय उपयोगा येती ॥१॥ मृगजळाचे ते

पाणी । काय साठविले कोणी ॥२॥ काय भुसाचे कांडण । काय तक्र घुसळण ॥३॥ दास म्हणे नामाविण । व्यर्थ वेदांताचा शीण ॥४॥

६९४) वांझेची संतती । काय उपयोगा येती ॥१॥ काय मृगजळाचे पाणी । आहे साठविले कोणी ॥२॥ तैसे ज्ञान बोलोनिया । हाती येईल कासया ॥३॥ कृतीमाजी ज्ञान आले । ज्ञान नाम त्या शोभले ॥४॥ नाम वेदांत बाणता । दासा मौनचि तत्त्वता ॥५॥

६९५) स्वरूपापासोन दूर बुद्धी । तीच जाणावी दुर्बुद्धी ॥१॥ बुद्धी नामी जडता पाहे । स्वरूपांत स्थिर होये ॥२॥ गोविंद म्हणे यावाचून । कांही करू नको अन्य ॥३॥

६९६) आत्महितासी जाणणे । जाणुनी साधने साधणे ॥१॥ इतिकर्तव्य जीवाचे । नरदेही जाण साचे ॥२॥ आत्महित नुमगती । तेणे प्राणी कष्टी होती ॥३॥ इतिकर्तव्य रामनाम । दास म्हणे पूर्णकाम ॥४॥

६९७) आत्महितालागी पूर्ण । एक सद्बुद्धी कारण ॥१॥ दुर्बुद्धी ते धरू नका । भेटी होईना अनंता ॥२॥ आत्म्यापासुनी दूरबुद्धी । तेचि जाणावी दुर्बुद्धी ॥३॥ गुरुनामे निरसन । दासा देवपदी गमन ॥४॥

६९८) अतिशय नको काही । देवासंनिध तू जाई ॥१॥ अतिशय नको काही । शुद्ध मने स्थिर होई ॥२॥ अतिशय नको काही । सोपे नाम सदा घेई ॥३॥ दास म्हणे नाम घेई । नामी अतिशय नाही ॥४॥

६९९) चूक समजोन घेई । कळो येता मुक्त पाही ॥१॥ चूक येईल कळोनी। राही नामाचे साधनी ॥२॥ गोविंद म्हणे जे अचूक । तेचि घेई बिनचूक ॥३॥

७००) जरी चूक असे सान । करी तिचे निरसन ॥१॥ नाम नुच्चारणे

कंठी । चूक काय ही धाकुटी ॥२॥ अल्पचूक बहु हानी । ऐसे बोलताती ज्ञानी ॥३॥ रामनाम बिनचूक । दास म्हणे घे अचूक ॥४॥

७०१) श्रद्धा ते काय श्रद्धा ते काय । अश्रद्धा जी नोहे तेचि श्रद्धा॥१॥ श्रद्धेने जे केले तेचि खरे केले । येर सर्व गेले पाहता वाया ॥२॥ देव एक आहे देव एक आहे । श्रद्धा जरी राहे तरी देव ॥३॥ तीर्थी धोंडा पाणी तीर्थी धोंडा पाणी । श्रद्धेची करणी देव दावी ॥४॥ गुरू वेद वचनी धरिता विश्वास । श्रद्धा म्हणे दास तेचि असे ॥५॥

७०२) श्रद्धा धरोनिया अल्प जरी देई । देव तेचि देई खऱ्या मने ॥१॥ खरोखरी देव तयाने तुष्टला । अनुभव बोलिला ग्रंथांतरी ॥२॥ श्रद्धा जीवी धरी अश्रद्धा न धरी । मग तुज हरि उपेक्षीना ॥३॥ जाणे श्रद्धाबीज देई पुण्यफळ । नाम हे रसाळ दास म्हणे ॥४॥

७०३) कसे, मग राम पाही । कसल्यावीण राम नाही ॥१॥ राम हंसावरी आहे । कसोनिया देही पाहे ॥२॥ केल्यावीण नाही काम । कसणे जाणावे निष्काम ॥३॥ कसणे एक रामनाम । दासा नाही दुजे काम ॥४॥

७०४) कसा सांगितला नेम । राहे कसोनी परम ॥१॥ करी कसोनी नेमाला । नेम साधनी तो आला ॥२॥ करी मनाची ती माला । मग बोलावे नामाला ॥३॥ नित्य अबोल जाणावे । दासे नेमनिष्ठ व्हावे ॥४॥

७०५) कसलीयावीण । कैसे पावे देवपण ॥१॥ कसोनिया कसता पाही । देवपण हाता येई ॥२॥ थोर संतांचा इतमाम । स्वये झाले परब्रह्म ॥३॥ दासा कसल्याची गोष्टी । नाम घ्यावे उठाउठी ॥४॥

७०६) काय पाहसी कसोटी । रामनाम सदा घोटी ॥१॥ जो जो

रामनाम घोटी । तो तो माया न शिरे पोटी ॥२॥ दुसऱ्याचे गुणदोष । पाहे त्याचा होय नाश ॥३॥ दुसऱ्याची न करी निंदा । आपुली केल्या न करी खेदा ॥४॥ दास म्हणे करी कायी । एक नाम सदा घेई ॥५॥

७०७) करणे रामनाम गान । रामाविण सर्व शीण ॥१॥ ऐसे कळले जयाला । त्याचा जन्म सुफल झाला ॥२॥ हरिभक्त हरिगुणी । बोले तैशीच करणी ॥३॥ यमाजीचा सासुरवास । दास म्हणे नाही त्यास ॥४॥

७०८) निजत्वे राहणे । निज दृष्टीने पाहणे ॥१॥ धरोनिया कळवळा । पाहे निजत्वाची कळा ॥२॥ गोविंद म्हणे निज । ज्यात साधे आत्मकाज ॥३॥

७०९) निजगूज ओळखावे । तेचि बरवे जाणावे ॥१॥ निजत्वात सर्व काही । तयावीण काही नाही ॥२॥ गोविंद म्हणे निजनामी । कळो येई अंतर्यामी ॥३॥

७१०) निजत्वाची खूण । घ्यावी अंतरी जाणून ॥१॥ निजत्व ते नामरूप । जे का चालीले अपाप ॥२॥ गोविंद म्हणे सांगो कायी । थोर त्याची नवलाई ॥३॥

७११) निज मुळालागी जावे । निजरूप ओळखावे ॥१॥ मुळालागी सोडू नको । विस्तारासी धरू नको ॥२॥ ऊर्ध्वपंथे जाता देही । निजरूप हाता येई ॥३॥ निजमूळ रामनाम । दास म्हणे त्याचा राम ॥४॥

७१२) रामनामाची कावडी । प्रेमे धरावी आवडी ॥१॥ रामनामाची समता । हेचि कावड सर्वथा ॥२॥ गोविंद म्हणे नामजल । ऐशी कावडी अमोल ॥३॥

७१३) उल्लंघिता लाज । मग भेटे केशवराज ॥१॥ हरिनामी लाज भीड । नको व्यवहारी गोड ॥२॥ लाज तेचि दोन पाही । नुरे उन्मनीत काही ॥३॥ नामे उन्मनीचा प्रांत । दासा मनी सीताकांत ॥४॥

७१४) दिसे त्याचा शोध कायी । दिसेना ते शोधुनि पाही ॥१॥ शोधी जाता येत नाही । तयामाजी शोध घेई ॥२॥ शोधवेना ते शोधावे । शोध तयासी म्हणावे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । निजनामी हे प्रचीती ॥४॥

७१५) देव व्हावा तरी नाम हे उच्चारा । विश्वास हा धरा तया ठायी ॥१॥ स्वर्ग व्हावा तरी यज्ञयाग करा । कर्मे-ती आचरा जैसी तैशी ॥२॥ नरक व्हावा तरी नाम न उच्चारा । अविश्वास धरा तया ठायी ॥३॥ दास म्हणे योग्यायोग्य हे विचारा । हरिनामी सरा तरीच बरे ॥४॥

७१६) रामरस घेई घुटका । तरीच प्राण्या होईल सुटका ॥१॥ कानावाटे घेई ग्रास । मुखी उच्चारी सुरस ॥२॥ करोनिया अमृतपान । कोणा चुकले मरण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरुकृपे ही प्रचीती ॥४॥

७१७) ऐसा संतांचा निरोप । रामरस हा अमूप ॥१॥ घेता घुटका नुरे दुःख । देव भेटे जगदीश ॥२॥ उलटोनी आत पाही । गुरुपदी कळो येई ॥३॥ दृढबुद्धी जडता पाहे । दासा गुरुकृपे लाहे ॥४॥

७१८) रामरस घेई घुटका । तरीच प्राण्या होईल सुटका ॥१॥ रामरस अंतरात । पाही शोधोनि देहात ॥२॥ अमृत चुकवेना मरण । येणे चुके जन्ममरण ॥३॥ दास म्हणे नामावीण । जाणा अवघाची शीण ॥४॥

७१९) अखंडित समाधान । हेचि मुख्य साध्य खूण ॥१॥ जेणे नुरे

तळमळ । तृप्त इंद्रिये सकळ ॥३॥ नामी असे समाधान । अखंडीत ओळखण ॥३॥ दास म्हणे संतापायी । तया देव प्राप्ती होई ॥३॥

७२०) अखंडित समाधान । कैशी त्याची ओळखण ॥१॥ अखंडात प्रवेशता । अखंड समाधान हाता ॥२॥ समचरणी सदा चित्त । अखंड समाधान तेथ ॥३॥ श्वास गतीमाजी मन । चित्तैकाग्र समाधान ॥४॥ दास म्हणे नाम एक । ऐसे असे अलौकिक ॥५॥

७२१) देवाजीचे मन धरी । बोले मने राम हरी ॥१॥ इतराते आर्जविता । काय फळ येई हाता ॥२॥ संत मनी जे धरिती । तेचि बरे धरिता चित्ती ॥३॥ दास म्हणे एक नाम । देव भेटवी मेघश्याम ॥४॥

७२२) कोणाचेही घ्यावे बोधाचे वचन । तेथे थोर सान म्हणू नये ॥१॥ गारी गडदरा पडे हिरकण । घेती विचक्षण उचलोनी ॥२॥ बोध परिसता लाभ येई घरा । अबोधाचा वारा लागो नेदी ॥३॥ बोधवच नरा रामनाम पाही । दास म्हणे घेई वारंवार ॥४॥

७२३) कोणत्या गोष्टीसी कशाचे कारण । सुखासी कारण असंगता ॥१॥ देव व्हावा तरी भावचि कारण । मोक्षासी कारण ज्ञान जाणा ॥३॥ गुरूकृपेलागी सेवेचे कारण । सद्गती कारणे संतसंग ॥३॥ दास म्हणे नाम सकळा कारण । नाम घेता जाण सर्व काही ॥४॥

७२४) साधणे ते साधी पाही । जे का अखंडित देही ॥१॥ अखंड देही काय आहे । अखंड देही नाम पाहे ॥२॥ गोविंद म्हणे ज्यात खंड । नाही जाण ते अखंड ॥३॥

७२५) सर्व साधू जाता काहीच साधेना । एकामाजी जाणा सर्व काही ॥१॥ एक नाम साधावया सवघड । साधिल्या अवघड काही नाही ॥२॥ सुवर्णात सर्व साधतसे अर्थ । साधणे किमर्थ अन्य

वस्तु ॥३॥ दास म्हणे देव नाम ते अंतरी । तेथ चराचरी काय उणे॥४॥

७२६) स्वपण म्हणजे जीवपण । जीवपण मिथ्या जाण ॥१॥ स्वपण नाम समजुनि घेई । तेचि सत्य असे पाही ॥२॥ गोविंद म्हणे ते स्वपण । नाम विरहित नाही आन ॥३॥

७२७) संतशाळेमाजी जाई । सत्य ज्ञान हाती येई ॥१॥ सत्यज्ञान रामनाम । नाही आणिकांचे काम ॥२॥ गोविंद म्हणे सकळा श्रेष्ठ । सर्वामाजी जे वरिष्ठ ॥३॥

७२८) शिकवण देती संत । ज्या नामाचा नाही अंत ॥१॥ संतशाळे जाता जाण । ज्ञान होतसे विज्ञान ॥२॥ भावे नाम घेता पोटी । अज्ञानाही देव भेटी ॥३॥ संत दयावंत थोर । कृपा करिती भक्तावर ॥४॥ नामे जातसे अविद्या । दास म्हणे ऐशी विद्या ॥५॥

७२९) स्वरूपाचा लोटे पूर । ऐसा कलेचा प्रकार ॥१॥ एक जाणे नाम कळा । तेणेवीण अवकळा ॥२॥ नाम घेता सर्व कळे । रूप देवाचे आकळे ॥३॥ दास म्हणे ऐसे नाम । घ्यावे धरोनिया प्रेम ॥४॥

७३०) सत्य बोल अंतरात । त्यास नाम म्हणतात ॥१॥ प्रेमभावे उच्चारावे । त्यात रममाण व्हावे ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । त्याची पहावी प्रचीती ॥३॥

७३१) हरिनामाची कावडी । प्रेमे धरावी आवडी ॥१॥ रामनामाची समता । हेचि कावड सर्वथा ॥२॥ गोविंद म्हणे नामजल । ऐसी कावडी अमोल ॥३॥

७३२) हरिनामाची कावडी । खांदी घेई जे आवडी ॥१॥ कापडी तो एक भला । गुरूमार्गी जो चालला ॥२॥ थोर त्याचे

महिमान । देव भेटे त्या आपण ॥३॥ घेता संसार कावडी । होय घेत्याची वावडी ॥४॥ देवधामाचा आनंद । दास भोगी परमानंद ॥५॥

७३३) हरिनामाची नौबद । श्रवण करिता गोविंद ॥१॥ प्रगटेल अंतर्यामी । प्रीती जडेल हरिनामी ॥२॥ गोविंद म्हणे रामकृष्ण । अभेद एकरूप जाण॥३॥

७३४) आहे स्थिती तीच बरी । नाम गावे निरंतरी ॥१॥ श्रवण करिता निजभावे । ब्रह्मानंद सुख पावे ॥२॥ काय पाहसी वरूते । पाही आपुल्या खालते ॥३॥ ज्याच्या योगे नाम धरी । दासा तीच स्थिती बरी ॥४॥

७३५) कोणत्या गोष्टीसी कोणते कारण । पहा विचारोन संतसंगे ॥१॥ बरे व्हावे तरी नीति पंथे जावे । वाईट स्वभावे अनीतीने ॥२॥ लाभ व्हावा तरी यत्नचि कारण । एका आळसाने सर्व हानी ॥३॥ मोक्ष प्राप्ती आणि देवाचे दर्शन । नामचि कारण दास म्हणे ॥४॥

७३६) हाचि जीवा खरा लाभ । होता भेटी पद्मनाभ ॥१॥ दुर्बुद्धी ते टाकोनिया। नाम घेई रे चांगया ॥२॥ हातोहाती मिळे लाभ । नरदेही जो सुलभ ॥३॥ दासा लाभ येई घरा । नामसंकीर्तनी बरा ॥४॥

७३७) रामनामाचा विचार । येर सर्व अविचार ॥१॥ विषय अंतरी राहिले । त्याचे काय हीत झाले ॥२॥ गोविंद म्हणे एक धरी । आत बाहेरी सद्विचारी॥३॥

७३८) संताचे वचन काही का असेना । मनी घेता जाणा हित होय ॥१॥ म्हणोनिया जनी धरावा सत्संग । रामनामयोगे देव भेटे ॥२॥ देव स्वये भेटे वचन प्रमाण । दास म्हणे जाण नुरे दुःख ॥३॥

७३९) एका जगाचिया पोटी । साधु असाधुच्या गोष्टी ॥१॥ साधु गोष्टी घेता हित । असाधु ते अनहित ॥२॥ साधु गोष्टी रामनाम । नाही आणिकांचे काम ॥३॥ संत भगवंत लीला । दास म्हणे गोष्टी भल्या ॥४॥

७४०) नाम मुखी गाता स्वहित करणी । साधिली सज्जनी सत्य सत्य ॥१॥ हित रामनामी रामनाम वाणी । साधिली करणी साधुजनी ॥२॥ साधुजनी हित साधिले निर्वाणी । दास त्याचे चरणी लीन झाला ॥३॥

७४१) स्वहिताचे लक्षण । आत्माराम जडे मन ॥१॥ आत्माराम एकचि पाही । दंभ द्वैत जेथे नाही ॥२॥ गोविंद म्हणे आत्माराम । सकळा करी पूर्णकाम ॥३॥

७४२) अज्ञान कुबुद्धी काय येईल कामी । धरी बुद्धी नामी तेचि हित ॥१॥ सद्‌बुद्धी धरिता होईल कार्यसिद्धी । आणिक उपाधी नये कामा ॥२॥ दास गुरुपदी झालासे अंकित । रामनाम उचित बोध केला ॥३॥

७४३) साधी स्वहित करणी । दंभ अभिमान टाकोनी ॥१॥ करणी नेणे मातापिता । नामी ठावी साधुसंता ॥२॥ काय आणिक करणी । जेणे चौऱ्याऐंशीच्या खाणी ॥३॥ दास म्हणे सांगो किती । तेथे देवाची वसती ॥४॥

७४४) वेदविहीत हित भले । दो अक्षरी साठविले ॥१॥ नाना संग्रह जे केले। हीत काय ते साधिले ॥२॥ रामनामी खरे हीत । होय प्राप्त ते शाश्वत ॥३॥ प्रपंचाची चिंता केली । दास म्हणे वाया गेली ॥४॥

७४५) सर्व जीवा तरणोपाय । एक नामचि उपाय ॥१॥ नामावाचोनि नाही गती । वेदशास्त्र बोलताती ॥२॥ अन्य साधन वाया जाय । नाम साधणे हा उपाय ॥३॥ दास म्हणे सांगो किती । याची प्रत्यक्ष प्रचीती ॥४॥

७४६) हित कशामध्ये आहे । मनी विचारोनि पाहे ॥१॥ हित साधावे आपुले । साधुजनी जे साधिले ॥२॥ अहितासी मानी हित । हीच संसाराची रीत ॥३॥ रामनाम साठवित । दास म्हणे खरे हित ॥४॥

७४७) ऐका स्वहित करणी । अनुभव घ्यावा मनी ॥१॥ कायी संत आचरती । कायी संत ते बोलती ॥२॥ कायी संत मनी घेती । कायी संत ते पूजिती ॥३॥ कायी संतांचा तो धर्म । कायी संतांचे ते वर्म ॥४॥ कैसे संत घेती नाम । कैसे संतांचे ते काम ॥५॥ तोचि बोध मनी घ्यावा । दास म्हणे अनुभव पहावा ॥६॥

७४८) अनहित कशामाजी । रामनाम बोलेना जी ॥१॥ अनहितासी कारण । आप आपणचि जाण ॥२॥ नेघे संत जे बोलिले । येथे कोणाचे काय गेले ॥३॥ दास म्हणे नामवाणी । बोले तया चक्रपाणी ॥४॥

७४९) खरे हित ते आपुले । दो अक्षरी साठविले ॥१॥ दोन अक्षरे ती राम । साठविता पूर्णकाम ॥२॥ नाना संग्रह ते केले । हित काय ते साधले ॥३॥ नाना विद्या संपादिली । दास म्हणे व्यर्थ झाली ॥४॥

७५०) दुधातील लोणी पाही । तैसा सदाचार घेई ॥१॥ हित जवळी दुरी केले । अहित जवळी घेतले ॥२॥ एक लौकीक आचार । एक जाणा शास्त्राचार ॥३॥ एक अशास्त्र आचार । नाम एक हिताचार ॥४॥ हित साधी नरदेही । दास म्हणे धन्य होई ॥५॥

७५१) हित आपुले कवण । बरे घ्यावे ओळखून ।।१।। शाश्वतात आत्महित । अशाश्वती नाही सत्य ।।२।। शाश्वताची खूण पाही । आत्मगती चाले देही ।।३।। तयामाजी नाम गाई । दास म्हणे धन्य होई ।।४।।

७५२) हित जाणे जो आपुले । त्याचे जिणे धन्य झाले ।।१।। हित कायी हित कायी । अंतर्यामी शोधी पाही ।।२।। हित नामाचे चिंतन । नाम श्वासोश्वासी जाण ।।३।। ऐशा साधनी जो राहे । दास म्हणे हित पाहे ।।४।।

७५३) हित ओळखिता येणे । हेचि खरे हित जाणे ।।१।। पुत्र दारा धान्य वित्त । संपादिता नोहे हित ।।२।। हित रामनामी आहे । तेथ जागता जो राहे ।।३।। जाणोनिया घेता नित्य । दास म्हणे खरे हित।।४।।

७५४) हितालागी भरी कसा । काय त्यावीण प्रवाशा ।।१।। कशामध्ये काही नाही । तरी होवोनिया कायी ।।२।। कशामाजी साठवाया। नको दूर जाऊ वाया ।।३।। नाम अंतरी सुंदर । दास म्हणे धन थोर ।।४।।

७५५) जाणावे ते कैसे कोठे कवणेपरी । काही सोय धरी विवेकाची ।।१।। आपुल्या स्वहिता आपण जागावे । हित ओळखावे साधुसंगे ।।२।। भजन पूजन कीर्तनी जगावे । रामनाम गावे आनंदाने ।।३।। संसारी जागता जागणे ते नव्हे । दास म्हणे पाहे विचारोनी ।।४।।

७५६) बहु जन्माची सवय । मना तेचि बरे होय ।।१।। सवयीचा ऐसा गुण । सोडवेना गुणागुण ।।२।। सवय ती भजनाची । खरी जाण स्वहिताची ।।३।। गोड नाम वाटे कडू । कडू वाद वाटे गोडू ।।४।। दास म्हणे सवय बरी । संतसंगे संत करी ।।५।।

७५७) जगी वागावे ते कैसे । असाधुसी साधु जैसे ॥१॥ बाळा नीत लावावयासी । माता क्रोध दावी जैसी ॥२॥ तैसा जगामाजी वर्ते । रामनामी तू प्रवर्ते ॥३॥ दास म्हणे तरीच भले । व्हावे वाईटा चांगले ॥४॥

७५८) जगी वागावे ते कैसे । असंतासी संत जैसे ॥१॥ देव दर्शनी जो आड । त्याची धरू नये भीड ॥२॥ सूत्र धरोनिया राही । दास म्हणे नाम घेई ॥३॥

७५९) जन्मा येवोनिया करावे ते केले । तेचि धन्य झाले जगामाजी ॥१॥ नाही तरी वृथा भूमिभार झाला । सेवेवीण गेला वायाचि तो ॥२॥ साधुसंती जन्म सार्थक पै केले । जगासी दाविले साधन मार्ग ॥३॥ जन्माचे सार्थक रामनाम कंठी । दास म्हणे भेटी देवाची ते ॥४॥

७६०) कोण जगी वाया गेला । कोणी कार्यार्थ साधिला ॥१॥ देवकाजी जो झिजला । तोचि जगी धन्य झाला ॥२॥ वेदशास्त्र बंधनाला । नेणे तोचि वाया गेला ॥३॥ गुरुनामी जो रंगला । तेणे कार्यार्थ साधिला ॥४॥ ऐसा संकेत हा बरा । दास म्हणे जीवी धरा ॥५॥

७६१) जन्मा येवोनिया काय हो करावे । रूप ओळखावे देवाजीचे ॥१॥ नाही तरी प्राणी व्यर्थ जन्मा आला । आला तैसा गेला निघोनिया ॥२॥ नरदेही जाई गुरुसी शरण । नामे होसी धन्य दास म्हणे ॥३॥

७६२) जन्मा येवोनिया काय साधियेले । साधावे ते गेले हातीचे बापा ॥१॥ सदा मुखी नाम हेचि जन्म कर्म । ओळखावे वर्म तरीच बरे ॥२॥ नरजन्मी अन्य साधू नये काम । दास म्हणे राम तरीच मिळे ॥३॥

७६३) जन्मा येवोनिया काय हो करावे । शिकविती स्वभावे साधुसंत ॥१॥ नाही तरी काय आला आणि गेला । नामी जो कसला तोचि धन्य ॥२॥ दास म्हणे जाई जाणत्याचेपाशी । नाही तरी सोशी गर्भवास ॥३॥

७६४) जन्मा आलीयाचे काम । वाचे घ्यावे रामनाम ॥१॥ गुरुलागी शरण जावे । नाम उमगोन घ्यावे ॥२॥ नरदेही बहू थोरी । न घालवी अनाचारी ॥३॥ थोर नामाचा महिमा । दासा वर्णवेना सीमा ॥४॥

७६५) जन्मा येवोनिया काय हो करावे । रूपा ते पहावे देवाजीच्या ॥१॥ देवाजीचे दास होवोनी रहावे । नामा ते स्मरावे तयाचिया ॥२॥ गुरुपदी शरण रिघोनिया भावे । साक्षात्कारी व्हावे दास म्हणे ॥३॥

७६६) आपुले आपण करावे स्वहित । दुजियाची मात बोलो नये ॥१॥ दुजियाच्या गोष्टी न येतील कामा । उगीच रिकामा फिरू नको ॥२॥ करी हरिभक्ती अंती येईल कामा । सोडवील यमा पासोनिया ॥३॥ आपुले आपण आपणा उद्धरावे । दास म्हणे गावे नाम सोपे ॥४॥

७६७) आपुले कल्याण कशाने होईल । घेता संतबोल मनामाजी ॥१॥ संतांचे वचन काही का असेना । मनी घेता जाणा हित होय ॥२॥ संतांचे बोलणे रामनाम पाही । आन नसे काही दास म्हणे ॥३॥

७६८) आपुले ते बरे कशाने होईल । बरे करू जाता बरे होय ॥१॥ भिंत पाडू जाता कैसेनी पडेल । नाव का तरेल छिद्रयोगे ॥२॥ सूत्राने खेचिता पतंग उडेल । पाषाण बुडवील तरत्यासी ॥३॥ लिंब खाऊ जाता गोड का लागेल । काजळ करील स्वच्छ कायी ॥४॥ वाईट सोडता चांगले

घडेल । बरे ते होईल रामनामी ॥५॥ नामभक्तीयोगे दासाचे कल्याण । जाय अकल्याण देशोधडी ॥६॥

७६९) आपुले ते बरे कशाने होईल । भविष्याचा बोल पुसताती ॥१॥ होऱ्याचे वचन कळलेसे कोणा । साधुसंताविना जगामाजी ॥२॥ बरे ऐसे काय नाम श्रीरंगाचे । पाय देवाजीचे बरे जाण ॥३॥ आपुले साधेना दुजा काय सांगी । प्राप्त गोष्टी अंगी असोनिया ॥४॥ बरे होय ऐसे सांगती वचन । संतांचे वचन दास म्हणे ॥५॥

७७०) रामनाम घेता वृथा । कोणी होईना सर्वथा ॥१॥ जडमूढ दुराचार । नामे सकळांचा उद्धार ॥२॥ नाम सकळांचे कल्याण । सकळांचे हित जाण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचिती ॥४॥

७७१) आशीर्वाद संता जाती । कारण चित्ती ईश्वर ॥१॥ ज्यांच्या मनी परोपकार । सदा थोर जागृत ॥२॥ गोविंद म्हणे आशीर्वाद । तोचि जाणावा गोविंद ॥३॥

७७२) आशीर्वाद भला । संतकृपेचा चांगला ॥१॥ संतचरणरज माथा । लागलीया देव हाता ॥२॥ दास म्हणे आशीर्वाद । अखंड स्मरवी गोविंद ॥३॥

७७३) आशीर्वाद सज्जनांचा । नाही फुकट जायाचा ॥१॥ म्हणोनिया त्यांना शरण जावे । त्यांचे आशीर्वाद घ्यावे ॥२॥ गोविंद म्हणे चांगल्यापाशी । आशीर्वाद जाती वस्तीसी ॥३॥

७७४) आशीर्वाद भला । संतजनांचा मिळाला ॥१॥ मग नुरे दैन्य दुःख । चुके प्रारब्धाची रेख ॥२॥ अज्ञानासी होय ज्ञान । ज्ञानी पावेल विज्ञान ॥३॥ नामे सुलभ दासासी । घेता येई प्रत्ययासी ॥४॥

७७५) सद्भक्तीची वाट समजोनी घेई । देव भेटी होई जेणे योगे ॥१॥

मायेची ही असे बहुविध वाट । न सरे बिकट काही केल्या ॥२॥ भोळिया भक्तासी सहज सुलभ । दास म्हणे लाभ गुरुनामे ॥३॥

७७६) उलटोनिया मार्गी येई । अनुभवे खूण पाही ॥१॥ अनुभवेवीण साचा । अनुभव जगताचा ॥२॥ उलटीच खूण पाही । जगतात दिसत नाही ॥३॥ उलट खूण नामी येता । दासा कळेल सर्वथा ॥३॥

७७७) उलटा मार्ग उलटा मंत्र । उलट प्रवाह उलटे तंत्र ॥१॥ उलटे देऊळ उलटी दृष्टी । उलट अनुभवाची गोठी ॥२॥ जाणे नामी ऐशा खुणा । दास म्हणे योगीराणा ॥३॥

७७८) चालिलासे मरणाकडे । मूर्खा कळेना हे कोडे ॥१॥ डोळे उघडोनी पाही । देवपदी लीन होई ॥२॥ ऐसे अवघड कोडे । नाम नुरवी साकडे ॥३॥ देही दाविती देवपंथ । दास म्हणे गुरूनाथ ॥४॥

७७९) आलिया देवासी वाट चुकलासी । म्हणोनी आलासी संसारासी ॥१॥ संसारी दुःखाने करिती रूदन । चुकले भजन राघवाचे ॥२॥ राघवाची भक्ती नेणता विपत्ती । तुज अधोगती जन्म झाला ॥३॥ जन्म झाला परी वेळी सोय धरी । सत्वर संसारी मोकळीक ॥४॥ मोकळीक होय भक्तिपंथे जाता । कळ हे तत्त्वता दास म्हणे ॥५॥

७८०) मोक्षधामाची ती वाट । आहे जवळीच नीट ॥१॥ परी ती उमगेना जाण । जव राहे अहंपण ॥२॥ जाई गुरुसी शरण । मग कळे ऊर्ध्व खूण ॥३॥ हे तो सर्व नामे घडे । दासा देव तो आतुडे ॥४॥

७८१) मार्ग असती अनंत । संतमार्गी चाले पंथ ॥१॥ सोपा सूक्ष्म जवळीचा। शीण हरवी जीवाचा ॥२॥ ऐसा मार्ग समजता । भेटी होईल अनंता ॥३॥ दास म्हणे गुरू देती । नाम घेता हे प्रचीती ॥४॥

७८२) मार्ग आहेत अनंत । देव भेटी होय ज्यात ॥१॥ तोचि साधणे आक्रमणे । नरजन्मी हेच करणे ॥२॥ गोविंद म्हणे गुरुपदी । दृढ धरूनी राहे बुद्धी ॥३॥

७८३) भवरोगाचे लक्षण । विषयात फिरे मन ॥१॥ त्रिविध तापाने पोळला । जीवपण भूल डोळा ॥२॥ तोंडा अज्ञान अरूची । ज्ञान अन्ना न ये रुची ॥३॥ माझे स्त्री पुत्रादि धन । ऐसा बडबडे जाण ॥४॥ कैसे यातुनी सुटावे । गुरूवैद्या शरण जावे ॥५॥ रामनाम मात्रा देती । भवरोग निवारती ॥६॥ पथ्य सांगती बरवे । सदा साधनी असावे ॥७॥ सर्व चुकवी अपाय । दास म्हणे हा उपाय ॥८॥

७८४) कैसे म्हणजे कसुनी राही । नामसाधनी धन्य होई ॥१॥ सुवर्ण रामनाम । नाही आणिकाचे काम ॥२॥ देही (क) सोऽहं सहा(सा) । कसा उमगोनी पहा ॥३॥ गोविंद म्हणे सुवर्णाचा । कसा भरूनि ठेवी साचा ॥४॥

७८५) कसा ओळखोनी घेई । नाम साठवी त्यात पाही ॥१॥ करी नामाचे साधन । ज्यात आहे तोचि जाण ॥२॥ गोविंद म्हणे आकळोनी । मना राही रे मिळोनी ॥३॥

७८६) कशामध्ये काही नाही । एक रामनाम घेई ॥१॥ कशामध्ये साठविता । मग देव येई हाता ॥२॥ कसा ओळखोन घेई । आत्माराम असे देही ॥३॥ संतनामी कसता भावे । दास म्हणे देव झाले ॥४॥

७८७) ऐका सहज साधन । गुरूकृपे घेई खूण ॥१॥ नको खटाटोप पाही । श्वासोच्छ्वासी नामी राही ॥२॥ आसन मुद्रादि बंधन । न लगे चित्त देई पूर्ण ॥३॥ नामी ठेवोनि आराम । दास म्हणे साधी राम ॥४॥

७८८) ऐशी बोली केली मात । जेथे जगाचा न चले हात ॥१॥

अबोलणे ते बोलावे । मात तयासी म्हणावे ॥२॥ साधुजनांची ही मात । मनी वागवावी नित्य ॥३॥ रामनामाचे बोलणे । दास म्हणे अबोलणे ॥४॥

७८९) चारी वाचे पैल जावे । नाम उरवोनी नुरवावे ॥१॥ मौन जप आहे ऐसा । गुरूकृपे साधी कैसा ॥२॥ दास म्हणे ऐसे मौन । जगी आचरिता धन्य ॥३॥

७९०) अबोलपणाचे बोलणे । गुरूकृपे खूण जाणे ॥१॥ मूकपणे नाम घेणे । तेचि सत्य अबोलणे ॥२॥ बोल अबोल बोलणे । दासा गुरूनाम जाणे ॥३॥

७९१) अबोलाचा बोल । बोल बोलोनी अबोल ॥१॥ तोचि बोल नाम बोल । चैतन्याचा ध्वनी खोल ॥२॥ दास म्हणे तोचि बोल । जयापुढे सर्व फोल ॥३॥

७९२) अबोल बोलाची उत्तरे । पाहता न रुचती बरे ॥१॥ एक बोल वाईटाचा । मनी त्वरित रुजे साचा ॥२॥ ऐसा मनाचा स्वभाव । टाकी, धरुनी नाम भाव ॥३॥ दास म्हणे नाम घेई । येर बोल अनाठायी ॥४॥

७९३) निंदक तो नको वाटे । जैसे वाटताती काटे ॥१॥ परी संता उपकारी । निंदक वाटे सर्वापरी ॥२॥ गोविंद म्हणे हे पटेल । ज्यासी सद्गुरू असेल ॥३॥

७९४) रामनामी जडुनी निंदा स्तुती सम । मानी, भक्त परम देवाप्रिय ॥१॥ स्तुति नायकावी निंदा आयकावी । तरीच पदवी प्राप्त होय ॥२॥ स्तुती आयकिता मनी उठे गर्व । तेणे पुण्य सर्व नाश होय ॥३॥ निंदा आयकिता पाप जळे सर्व । निंदा पुण्यपर्व ओळखावे ॥४॥ मान अपमान मनेचि सांडिता । दास नामी जडता देव जोडे ॥५॥

७९५) परतंत्रामाजी दुःख । स्वतंत्रात आहे सुख ॥१॥ शरीर परतंत्र पाही । स्वतंत्र तू उमगून घेई ॥२॥ मने सांडून कल्पना । दास देही नामस्मरणा ॥३॥

७९६) खरे सुखस्थानी जाता । मना सुख येई हाता ॥१॥ पारतंत्र्यामाजी दुःख । स्वतंत्र ते आहे सुख ॥२॥ दास म्हणे मिळवाया । झिजवावी लागे काया ॥३॥

७९७) खरे सुख खरे दुःख । ओळखावे पुण्य पाप ॥१॥ गती अथवा अधोगती । स्वस्थ बसणे काय स्थिती ॥२॥ दास म्हणे नाम खरे । तेचि उमगता बरे ॥३॥

७९८) अंतरी राम तुझ्यापाशी । सुखस्थान ते जीवासी ॥१॥ तुझा तूच चुकलासी । पश्चिमपंथे भेटी त्यासी ॥२॥ भेटी होय याच देही । सुखरूप सर्वदाही ॥३॥ बोधी वसिष्ठ रामाला । दास म्हणे सुखी झाला ॥४॥

७९९) खरे सुख रामनामी । नाही इंद्रियांच्या कामी ॥१॥ इंद्रिये बहिर्मुख जाण । तयामाजी सर्व शीण ॥२॥ गोविंद म्हणे गुरूनामी । कळो येई अंतर्यामी ॥३॥

८००) सुखी कोण सुखी कोण । बरवे पहावे शोधून ॥१॥ सुख नाही आले हाता । सुखी कैचा सांगा आता ॥२॥ सुख शोधे दिशा दाही । सुखस्थान राम देही ॥३॥ त्याचे नामी सूख आहे । दास म्हणे नाम गाये ॥४॥

८०१) सुखी कोण दुःखी कोण । बरवे पहावे शोधून ॥१॥ सुख नाही आले हाता । सुखी कैचा सांगा आता ॥२॥ मना अधीन तो

दुःखी । मन शांत सदा सुखी ॥३॥ हरिनामी सुखी राहे । दास म्हणे मने गाये ॥४॥

८०२) आपुल्यावरोनी जग ओळखिती । तयांची प्रचीती खरी नव्हे ॥१॥ सकळांचा आत्मा एक ओळखिती । संतांची प्रचीती ऐशी असे ॥२॥ आपण सुखी तो जग वाटे सुखी । आपण दुःखी तो जग दुःखी ॥३॥ ज्याचे त्याचे योगे ज्याचे त्याचे ज्ञान । दासाचे विज्ञान कथन हे ॥४॥

८०३) आपणावरोनी जग ओळखावे । अंतरी शिरावे जगाचिया ॥१॥ आपुलीच स्थिती सुखाची जो असे । जग सुखी असे मानताती ॥२॥ आपुलीच स्थिती दुःखाची जो असे । जग दुःखी असे मानताती ॥३॥ बाह्यदृष्टी येथे काही नये कामा । निवारीना भ्रमापासोनिया ॥४॥ सुखदुःखातीत स्वरूपी जडता । दासासी तत्त्वता देव भेटे ॥५॥

८०४) गुरुसुख गुरुनामी । नाही विषयांचे कामी ॥१॥ विषय टाकुनि पाहता । गुरूसुख येई हाता ॥२॥ गोविंद म्हणे सार्थकता । चरणी चित्त जडवीता ॥३॥

८०५) सुखस्थान राम देही । सूक्ष्मदृष्टी शोधुनि पाही ॥१॥ रामयोगे आरामता । जेणे वीण सर्व वृथा ॥२॥ तया सुखे सुखी होई । सुखाचे जे सुख पाही ॥३॥ सुखस्थान सूक्ष्म आहे । दास म्हणे नामी लाहे ॥४॥

८०६) गृह पुत्र धन दारा । हाचि दुःखाचा पसारा ॥१॥ सुखस्थानाते पहाता । जीवा सुख येई हाता ॥२॥ सोडविती दुःखातुनी । दासा संत ते निर्वाणी ॥३॥

८०७) लक्ष लावोनिया पाही । राम सुख नरदेही ॥१॥ राम रामी

साठविता । रामसुख येई हाता ॥२॥ सर्व सुखे येती हाता । राम लुटलीया फुका ॥३॥ ऐशा सुखी जाता पाही । दास म्हणे काही नाही॥४॥

८०८) सुखस्थानामाजी जाता । खरे सुख येई हाता ॥१॥ सुखस्थान शोधुनी भले । सुख शोधाया लागले ॥२॥ सुखस्थान राम देही । रामनाम अनुभव घेई ॥३॥ गुरूकृपे देव देख । तरीच दास म्हणे सुख ॥४॥

८०९) सुखधामामाजी जाता । मग नुरे दुःख वार्ता ॥१॥ कामधामी नाही सुख । सुखस्थान सूक्ष्म देख ॥२॥ राम सुखधाम देही । नामे प्रवेशे त्या ठायी ॥३॥ ऐशा सुखधामी जाता । दासा देवकृपा हाता ॥४॥

८१०) बा रे सुखधाम पाही । देवावीण दुजे नाही ॥१॥ देव असोनी देहात । त्यासी शोधीती जगात ॥२॥ मनोमार्गे गती पाही । संतसंगतीने जाई ॥३॥ नामी आत्माराम राहे । दास म्हणे घेऊनी पाहे ॥४॥

८११) निष्ठा हेचि फळ जाणावे केवळ । जेथे तळमळ नसे लेश ॥१॥ हाचि महाधर्म साधिता दुर्गम । पूर्ण सुखधाम प्राप्त तेणे ॥२॥ अप्राप्य ते प्राप्य धरिता निष्ठायोग । अयोग्य ते योग्य दास म्हणे ॥३॥

८१२) बुडावीण भांडे काय येईल कामा । तळहाती रोमा उगवे केवी ॥१॥ तैसे काय निष्ठेवीण वाया गेले । नामी अनुसरले निष्ठावंत ॥२॥ गुरुकृपेवीण कैसी निष्ठा कळे । दास म्हणे वळे गुरूपदी ॥३॥

८१३) दृढ विश्वास नामाचा । तोचि दैववान साचा ॥१॥ सत्य निश्चयाचे बळ । देव दर्शन सफळ ॥२॥ नामी मन दृढ राहे । सत्य निश्चय तो पाहे ॥३॥ तया शक्य सर्व काही । दास म्हणे सोय पाही॥४॥

८१४) दृढ विश्वासाचे फळ । देव भेटे घननीळ ॥१॥ अविश्वास

कामा नये । विश्वासाने मुक्ती लाहे ॥२॥ विश्वासाने तो ईश्वर । विश्वासाने पैलपार ॥३॥ मूळ शक्तीचा 'लो' लागला । दास नामी विश्वासला ॥४॥

८१५) दृढबुद्धी विश्वासाने । काय प्राप्त नोहे जाणे ॥१॥ विश्वासाने तो ईश्वर । विश्वासाने पैलपार ॥२॥ गुरूवचनी विश्वास । राहे टिकवोनी त्यास ॥३॥ नाम कारण विश्वास । दास म्हणे देव त्यास ॥४॥

८१६) अल्प निश्चयाचा प्राणी । एक नाम नेघे वाणी ॥१॥ सर्व करी थोडे थोडे । काहीच साधीना बापुडे ॥२॥ आज करू उद्या करू । एक धरीना निर्धारू ॥३॥ निश्चयाचे जडता बळ । दास म्हणे तेचि फळ ॥४॥

८१७) अल्प निश्चयाचा प्राणी । ओळखीना देव धणी ॥१॥ तोचि एक अन्नदाता । त्याचे चरणी ठेवी माथा ॥२॥ करीसी रे त्याची सेवा । काय वानिसी मानवा ॥३॥ नवल तयाची करणी । दासा रक्षी आपुलेपणी ॥४॥

८१८) लज्जाविरहीत पाही । द्वैत भाव जेथे नाही ॥१॥ काय सांगावी नवलाई । राम त्याचे अंकित होई ॥२॥ गोविंद म्हणे नामी जडता । कळो येई हे अवस्था ॥३॥

८१९) काहीही साधाया व्हावे त्याचे वेडे । देवाचिया वेडे देव जोडे ॥१॥ नामस्मरणाचे साधुसंता वेड । आणिकांचे कोड नाही मनी ॥२॥ संतांचे सांगाती होई बा तू वेडा । दास म्हणे पुढा देव ठाके ॥३॥

८२०) करी तरी काय एक नोहे सांगा । दृढ पांडुरंगा मनी धरा ॥१॥ सांडोनी आळस संसारी उदास । एक धरी आस रामनामी ॥२॥ जरी मन वेडे होईल कार्यासी । तरीच हरिसी भेटी होय ॥२॥ भेटीचे ते सुख बोलताचि नये । रामनामी पाहे गोविंद म्हणे ॥३॥

८२१) ऐसा काही धरी छंद । जेणे भेटेल गोविंद ॥१॥ छंद धरू नको नाना । बहु छंदी जग जाणा ॥२॥ छंद कीर्तनाचा धरी । देव भेट देई हरी ॥३॥ जेथे हरीचे कीर्तन । गुरुदेव तेथे खूण ॥४॥ दास म्हणे तेथे जाई नाम संकीर्तन होई ॥५॥

८२२) साधु गृही येता देती नामछंद । आनंदाचा कंद दाविताती ॥१॥ साधुसमागम साधणे दुर्लभ । जेणे पद्मनाभ वसे तेथे ॥२॥ तेथे वसोनिया करी पूर्णकाम । दास म्हणे राम आरामाचा ॥३॥

८२३) शब्द जाणावा अनन्य । मिथ्या सर्व शब्दज्ञान ॥१॥ नाम घेता उठाउठी । कळे अनन्याची गोठी ॥२॥ अनन्यता हाती येता । देव त्याची वाहे चिंता ॥३॥ दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ॥४॥

८२४) अनन्याची ओळखण । घेता बरे समाधान ॥१॥ हे तो सज्जनांचे योगे । साधी मीपण वियोगे ॥२॥ अन्यपण जेथे नुरे । अनन्यत्व पाही खरे ॥३॥ एक शब्द हा अनन्य । कळता पावे भगवान ॥४॥ योग क्षेम त्याचा पाही । दास म्हणे देव वाही ॥५॥

८२५) पढल्याचा अर्थ घे ना । त्याचे अज्ञान सरेना ॥१॥ अनुभव ज्या लाभला । त्यासी पूर्ण लाभ झाला ॥२॥ गुरुवचनी विश्वासेना । त्याचा संसार सुटेना ॥३॥ पुढे पाऊल पडेना । त्याचे अंतर तुटेना ॥४॥ दास म्हणे अनन्य झाला । त्याचा योगक्षेम भला ॥५॥

८२६) अंतर्शक्ति साधोनिया । आत्मा साठवी हृदया ॥१॥ मंत्र शक्ती ब्राह्मणासी । शस्त्र अस्त्र क्षत्रियासी ॥२॥ वैश्यालागी धन शक्ती । शूद्रालागी देहशक्ति ॥३॥ स्त्रिया पातिव्रत्य शक्ति । जगी सुखेचि नांदती ॥४॥ शक्तिहीनांचे बोलणे । काय उपयोगी जाणे ॥५॥ दास म्हणे नाम घेता । सर्व शक्ति येती हाता ॥६॥

८२७) भय बाधीना स्वभावे । रामनाम मुखी गावे ।।१।। चित्त ब्रह्मानंदी जडता । सहज पावे निर्भयता ।।२।। अग्निभय, चोरभय । दृष्टभय, जलभय ।।३।। भूतभय, पापभय । क्रूर प्राणियांचे भय ।।४।। शत्रूभय सर्वभय । अंतकाळ श्रेष्ठभय ।।५।। नामस्मरणे ऐसे भय । दास म्हणे दूर होय ।।६।।

८२८) निर्भय ते काय निर्भय ते काय । अद्वयपद निर्भय आहे ।।१।। अद्वय ते काय अद्वय ते काय । रामपद अद्वय आहे ।।२।। रामपद कैसे रामपद कैसे । दास म्हणे नामी वसे ।।३।।

८२९) निर्भयाचे स्थान । जाणा हरीचे चरण ।।१।। हरिनामे हरिरूपी । भय उरेना स्वरूपी ।।२।। निर्भय गुरुपद आहे । दासा निर्भय करिताहे ।।३।।

८३०) एक अभयाचे स्थान । जाण देवाचे चरण ।।१।। जेथे नुरे दुजेपण । आपरूप ब्रह्मखूण ।।२।। नामे चरणाची प्राप्ती । नामेवीण नाही गती ।।३।। दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ।।४।।

८३१) मर्दपणाचे लक्षण । नाश करणे अज्ञान ।।१।। मर्दपणाचे लक्षण । सत्यकार्यी निर्भयपण ।।२।। मर्दपणाचे लक्षण । नव्हे आपसात भांडण ।।३।। मर्दपणाचे लक्षण । पडे शत्रूवरी तुटोन ।।४।। मर्दपणाचे लक्षण । नामनिष्ठा दास म्हणे ।।५।।

८३२) येणे जाणे गतीमाजी । मन देऊनी सदा राजी ।।१।। हेचि दयेचे लक्षण । कंटकाचे निर्दळण ।।२।। गोर्विंद म्हणे कंटक पाही । आळस उद्वेगादि देही ।।३।।

८३३) दृष्टीने पाहणे माया । क्षमारूप ते सदया ।।१।। सहज नाम

सहजेची । जरुरी नाही आणिकाची ॥२॥ गोविंद म्हणे ऐसी क्षमा । धरणे अखंडित नामा ॥३॥

८३४) मानापमान निरसन । हेचि देवाचे दर्शन ॥१॥ वृत्तीमाजी मान नुरे । तैसा अपमानही नुरे ॥२॥ गोविंद म्हणे शांती । तेथे देवाची वसती ॥३॥

८३५) सांगा रहावे ते कैसे । जेणे रीती शांती वसे ॥१॥ आपणाकडे नेघे काही । देव ठेविल तैसे राही ॥२॥ भोग वाईट चांगले । समान तू मानी भले ॥३॥ स्वस्थानात स्थिर होई । दास म्हणे नाम घेई ॥४॥

८३६) सहा नम्र होती जेथे । शांति उमगावी तेथे ॥१॥ खरे सुख शांतिमाजी । रामनामाचेनि काजी ॥२॥ गोविंद म्हणे अंतरात । कळो येईल ही मात ॥३॥

८३७) अढळ शांतीचे लक्षण । अक्षयसुखी राहे मन ॥१॥ अढळ शांति हाता येई । परब्रह्मरूप पही ॥२॥ अक्षयसुख रामनामी । नाही विषयाचे कामी ॥३॥ राम आहे अंतर्यामी । अक्षयसुख त्याचे धामी ॥४॥ चित्त चैतन्यी मिळाले । दास म्हणे ऐक्य झाले ॥५॥

८३८) खरी खोटी वस्तु उमगोनी घ्यावी । तरीच पावावी निजशांती ॥१॥ निजशांती माजी असे सर्व सुख । तयावीण दुःख सर्व काही ॥२॥ खरे आणि खोटे असे काय देही । विचारेचि पाही तरीच बरे ॥३॥ दास म्हणे रामनाम खरी वस्तु । येर ती अवस्तु कळुनि येई ॥४॥

८३९) खरे खोटे उमगता । महत् सुख येई हाता ॥१॥ सुखाचेही सुख पाहता । जे का नयेचि बोलता ॥२॥ येर सुखे नाशीवंत । महत् सुख हे शाश्वत ॥३॥ रामनाम सकळा खरे । दास उच्चारिता बरे ॥४॥

८४०) खरे खोटे शोधुनी घेई । खरे तेचि मनी पाही ॥१॥ खरे देवाजीचे नाम । अविनाश जे उत्तम ॥२॥ खरे साठविता पाही । मनी आणी तैसे होई ॥३॥ येर सर्व खोटे पाही । दास उमगोन घेई ॥४॥

८४१) तारणे मारणे देवाचिया हाती । शरण भगवंती जाता भले ॥१॥ म्हणोनिया जनी करावे भजन । जेणे भगवान भेटे स्वये ॥२॥ देवाजीचे नाम थोर हे भजन । जेणे भगवान भेटे स्वये ॥३॥ दास म्हणे देव रक्षी त्यास स्वये । इतर ते काये तयापुढे ॥४॥

८४२) हरिभजनाची कळा । संत दावितातो डोळा ॥१॥ एक पोटाचे भजन । एक द्रव्याचे भजन ॥२॥ एक तालाचे भजन । एक लोकांचे भजन ॥३॥ देवाजीची प्रेमखूण । तेची संतांचे भजन ॥४॥ हरी भजन वाडेकोडे । करिता नुरेची साकडे ॥५॥ भजनाचा सुख सोहळा । पंढरीत दिसे डोळा ॥६॥ भजनाची रंग घाई । काळा धडक भरवी पाही ॥७॥ गुरुभजनी आवडी। दासा सदा परवडी ॥८॥

८४३) खरे उपेगी भजन । उफराटी त्याची खूण ॥१॥ जया पुढे सर्व ज्ञान । व्यर्थ बोलती विचक्षण ॥२॥ दास म्हणे भजनी गेले । देव तयासी भेटले ॥३॥

८४४) जेणे नुरे अन्यपण । ऐसे सांगावे भजन ॥१॥ अन्यपण दूर होता । मग देव येई हाता ॥२॥ गुरूनामी अन्य नुरे । अनन्य भजन ते बरे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ॥४॥

८४५) अनन्य भजनाची खूण । सांगा स्वामी विवरून ॥१॥ अनन्य भजन येई हाता । देव त्याची वाहे चिंता ॥२॥ गुरूनामी अन्य नुरे । दास म्हणे तेचि खरे ॥३॥

८४६) सवय ही भजनाची । बहु बरी उत्तमाची ॥१॥ सदा राहे

समाधान । हेचि देवाचे भजन ॥२॥ ऐसी बोलती तुकाराम । नाम साधन परम ॥३॥ सवय जडे गुरूपायी । दास म्हणे नाम सोयी ॥४॥

८४७) घेई भजन लक्षण । सत्य मिथ्य ओळखण ॥१॥ देही भकाराची खूण । तेथे स्थिर करी मन ॥२॥ तयामाजी नाम घेता । सत्य भजन तत्त्वता ॥३॥ तेणे देव साह्य होत । कळीकाळ आज्ञांकित ॥४॥ दास म्हणे राग सुटे । गुरुकृपे भजन भेटे ॥५॥

८४८) काय तप कायेमाजी । जेथे जाता मन राजी ॥१॥ हेचि जाणा खरे तप । देव भेटवी अपाप ॥२॥ गोविंद म्हणे तप नाम । सर्व देईल उत्तम ॥३॥

८४९) तपेवीण मिळे काय । तप भेटवी गुरूदेव ॥१॥ गुरूनाम खरे तप । देव भेटेल अपाप ॥२॥ तप ओळखोन घेई । दासा त्याविण काही नाही ॥३॥

८५०) तप तीर्थ व्रत धर्म । भेटवीना मेघश्याम ॥१॥ प्रेमसूत्र वेगळेची । करी सार्थकता देहाची ॥२॥ शरण संतालागी जावे । प्रेमसूत्र ओळखावे ॥३॥ सूत्र नाम क्रिया वर्म । दासा भेटवी मेघश्यामा ॥४॥

८५१) तामसाची तपे । हीच मूर्तिमंत पापे ॥१॥ तप समजोनि घेणे । देव कैचा तपाविणे ॥२॥ खरे तपाचे लक्षण । बुद्धी प्रकाशाची खूण ॥३॥ राम नाम तप होता । दास म्हणे देव हाता ॥४॥

८५२) काय चालतोसी पुढे । उलट उलट मुळाकडे ॥१॥ उलटता आत्मखूण । प्राप्त होतसे संपूर्ण ॥२॥ उलटणे केवी घडे । गुरूकृपे सर्व जोडे ॥३॥ गुरूपदी राहता लीन । दास म्हणे उलटे मन ॥४॥

८५३) काया नगरीत देव विराजत । पाहिलीया चित्त समाधान ॥१॥

काया नगरात कैसे जावे आत । गुरुकृपे मात कळो येई ॥२॥ काय नगरीची अपूर्व रचना । अयोध्या पंढरी खुणा दावितातो ॥३॥ रामनामयोगे जे का पूर्ण धाले । दास म्हणे गेले तया ठाया ॥४॥

८५४) काय सुलभ उपाव । जेणे भेटे सद्गुरुराव ॥१॥ ऐसा प्रश्न शिष्य करी । गुरु सांगती अवधारी ॥२॥ एकभावे गावे गीत । शुद्ध करोनिया चित्त ॥३॥ भावगीत रामनाम । दासांकित रघुत्तम ॥४॥

८५५) उलट्या देऊळी देव असे ठेला । पाहता तयाला माया नसे ॥१॥ उलटोनि पाही उलटोनि पाही । दर्शन तू घेई त्या देवाचे ॥२॥ दास म्हणे अखंड नाम योगे कसे । सद्गुरूसी पुसे सत्य मिथ्या ॥३॥

८५६) उलटे देऊळ । पाही आत उलटून ॥१॥ आधी कळस मग पाया । कळेसहीत प्राप्ती व्हाया ॥२॥ गोविंद म्हणे गुरूला शरण । जाई येईल कळून ॥३॥

८५७) उलट्या देऊळी असे जो बैसला । पहाता तयाला दर्शनते ॥१॥ येर बाह्य जगी पाहती देवाला । संसार मोह घाला सुटेचिना ॥२॥ नामाच्या साधने प्रवेशे देऊळी । दास तये वेळी देव होय ॥३॥

८५८) उलट्या देऊळी असे जो लपाला । नामे शोधी त्याला संन्निधची ॥१॥ देवाते शोधिता देऊळ उरेना । देवालय जाणा ओळखावे ॥२॥ साक्षात्कारी संत सांगती ही मात । कसता देहात दास म्हणे ॥३॥

८५९) आधी कळस मग पाया । देऊळ ते कवण्या ठाया ॥१॥ जगी पाहता असेना । कायेमाजी दिसे जाणा ॥२॥ देवालयी प्रवेशोन । स्वरूपासी पाही मन ॥३॥ पाहता ते रूप जाणा । दासा देऊळ उरेना ॥४॥

८६०) मागे वळोन पाहणे । प्रचीत हे ओळखणे ॥१॥ ठाव उमगला नाही । कैची प्रचीत ये पाही ॥२॥ दासा अनुभव खूण । प्रचीतीचे समाधान ॥३॥

८६१) कोणी पाहे वा न पाहे । तपनमार्ग क्रमिताहे ॥१॥ तैसे कर्तव्य पालन । करिता जीवा श्रेष्ठपण ॥२॥ जीवा नामचि कर्तव्य । कर्तव्याचे जे कर्तव्य ॥३॥ जैसे ज्याचे आचरण । तैसे त्याचे फळ जाण ॥४॥ दासम्हणे नामी आला । त्याची अघटित लीला ॥५॥

८६२) जगा न दावावे ऐसे आहे नीत । कर्तव्याची रीत ऐशी असे ॥१॥ करणे जरूर ते कर्तव्य जाणावे । हरीनाम घ्यावे अखंडित ॥२॥ दास म्हणे ऐसे कर्तव्य पाळिता । मग भेटी अनंता सहजे होय ॥३॥

८६३) कर्तव्याचे आचरण । हेचि मुख्य तप जाण ॥१॥ प्राप्तकर्मी राहटता । नाम घेणे कर्तव्यता ॥२॥ ऐसे तप जरी घडे । सर्व सिद्धी तया जोडे ॥३॥ न लगे वनामाजी जाणे । अन्नत्यागही करणे ॥४॥ न लगे कायेसी दंडन । न लगे आणिक साधन ॥५॥ कर्मामाजी नैष्कर्म्यता । प्राप्त होय अवचिता ॥६॥ ऐसे सुलभ साधन । दास म्हणे करिता धन्य ॥७॥

८६४) कथा आयकणे विधान । मनी घ्यावी ओळखण ॥१॥ पुत्र चुकला सापडता । जेवी माता ऐके वार्ता ॥२॥ मेघनाद तो अंबरी । जेवी आयके मयूरी ॥३॥ दुजियांचे दोषगुण । जेवी आयके दुर्जन ॥४॥ रामकथेच्या नगरी । दासा देव रक्षण करी ॥५॥

८६५) नेमनिष्ठा तेचि खरी । नाम बाह्य अभ्यंतरी ॥१॥ न चुके आणि अक्षय टिके । ऐसे नामचि एक निके ॥२॥ गोविंद म्हणे नाम नेम । धरी करील पूर्ण काम ॥३॥

८६६) एक धरिता निश्चय । अशक्य ते असे काय ॥१॥ म्हणोनिया आपुले मनी । धरा निश्चय करणी ॥२॥ नित्य नाम तो निश्चय । दासा येर अनिश्चय ॥३॥

८६७) बरवा देव हरिनामी । प्रगट करी अंतर्यामी ॥१॥ बरवा देवाचा आचार । ज्यास म्हणती सदाचार ॥२॥ गोविंद म्हणे सदाचारी । सदा नाम करी फेरी ॥३॥

८६८) शील परीपूर्ण । सर्व सद्गुण एकीकरण ॥१॥ नाम देही असे पूर्ण । गुरूकृपे कळे खूण ॥२॥ गोविंद म्हणे पाही । शील नाम आन नाही ॥३॥

८६९) सदाचार सकळा श्रेष्ठ । ऐसे वेद सांगती स्पष्ट ॥१॥ शास्त्रे पुराणे सर्वही । सांगताती हेचि पाही ॥२॥ गोविंद म्हणे श्रेष्ठाचार । नाम अंतरी साचार ॥३॥

८७०) नित्य नियमाचे करी आचरण । घडे तरी जाण सुख देई ॥१॥ मग हरिनामी नियमी जो झाला । श्रीहरी तयाला भेटी देई ॥२॥ नियम साधोंनि नियमित व्हावे । वर्म नोळखावे नियमाचे ॥३॥ ऐसा थोर आहे नियम महिमा । गोविंद म्हणे सीमा नाही त्याला ॥४॥

८७१) नियम खूण अभ्यासिता । नुरे वियोगाची वार्ता ॥१॥ वियोग अंतरीचा गेला । तोचि जाणा योगी भला ॥२॥ नियमीतपणे जाण । असे नियमाची खूण ॥३॥ नाम नियमीत खूण । दासा भेटवी भगवान ॥४॥

८७२) अखंड जे अखंडित । सेवा चाललीसे आत ॥१॥ त्यात मिसळोनि राही । आणिक करू नको काही ॥२॥ गोविंद म्हणे जे करणे । तेचि अखंडित जाणे ॥३॥

८७३) खंड नव्हे जे अखंड । देही चालिले उदंड ॥१॥ अखंडात प्रवेशता । जीवा सहज अखंडता ॥२॥ नामी अखंड जे मन । दासा अखंड समाधान ॥३॥

८७४) परमेश्वर ओतप्रोत । त्याचे महिमान अखंडित ॥१॥ म्हणोनि त्याला जावा भजत । त्याची सेवा अखंडित ॥२॥ याला खंड पडो नेदी। रामकृष्ण आठवा आधी ॥३॥ दास म्हणे अहो देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥४॥

८७५) मुख्य चुकताती सेवा । व्यर्थ कष्ट घेती जीवा ॥१॥ म्हणती कष्टलो कष्टलो । मरे तरी मी सुटलो ॥२॥ कोण मरोनि सुटला । करिता विचार चांगला ॥३॥ सेवेवीण मुशाहिरा । कैसा मिळेल पामरा ॥४॥ नाही सांगितले केले । मग ते वेतन कुठले ॥५॥ सेवा साधिता अंतरी । देव दासाचा कैवारी ॥६॥

८७६) कष्टी झाला प्राणी सेवा न करोनी । संसार कहाणी वाढविली ॥१॥ वाढविली आशा मानवा निराशा । सेवेवीण कैशा द्रव्य राशी ॥२॥ राशीचिया धना रामधणी जरी । कृपा करी तरी प्राप्त होती ॥३॥ प्राप्त होती सेवा करिता रामाची । नेणोनी जीवाची हानी करी ॥४॥ हानी करी व्यर्थ प्राण हे टाकोनी । प्राणार्पण करणी दासापाशी ॥५॥

८७७) दुराशेचा मधुबिंदू । जीवा लोटी दुःखसिंधू ॥१॥ माजी सुटाया कारण । वाचे गाई नारायण ॥२॥ होय आशेचे नैराश्य । करी रामनाम दास्य ॥३॥ आशा तोडी जे यथार्थ दासा सुख ते समर्थ ॥४॥

८७८) आश्चर्याची गोष्ट जगात कोणती । ऐकावी प्रचीती साधुजनी ॥१॥ सर्वत्र असोनी दृष्टीस दिसेना । आश्चर्य हे जाणा थोर आहे ॥२॥ जयाच्या दर्शने द्वैत सर्व जाय । आश्चर्य हे पाहे खूण बापा ॥३॥ आपुली शाश्वती मानिताती जीव । जगात आश्चर्य दास म्हणे ॥४॥

८७९) काय देतील देणार । दाता एक सर्वेश्वर ॥१॥ ज्यासी वर्णी भगवान । ऐसा दाता एक कर्ण ॥२॥ बहुतानी बहु दिले । नाही कर्णासी तुळीले ॥३॥ कर्ण कोण ते ओळखा । जेणे देव होय सखा ॥४॥ कर्ण जेणे ओळखिला । तोचि जगी धन्य झाला ॥५॥ थोर तयाचा महिमा । दास म्हणे निरुपमा ॥६॥

८८०) ऐशी पोटाची तो कथा । पोट सोडीना सर्वथा ॥१॥ निवारिता निवारेना । सन्निध ते सदा जाणा ॥२॥ त्याची आहुती कठीण । रहावेना तयावीण ॥३॥ थोर थोर ते भगाले । पोटापुढे दीन झाले ॥४॥ पोट आधी तृप्त होता । मग दासा देव कथा ॥५॥

८८१) काळ चांगला राहिना । काळ वाईट राहिना ॥१॥ चांगल्यात गुंतू नको । वाईटाची खंती नको ॥२॥ ज्ञानी जाणताती खुणा । बोलताती रामराणा ॥३॥ नवग्रहापाठी पाय । त्याची शिरे गृध्र खाय ॥४॥ येथील येथे राहे शेखी । दास नामी सदासुखी ॥५॥

८८२) युक्तीविना काही नाही । ऐसे बोलती सर्वही ॥१॥ युक्ति लाविता हरीनामी । तरीच वय खरे कामी ॥२॥ युक्ति संसारात केली । परी सर्व वाया गेली ॥३॥ युक्ति पाही युक्ति पाही । बुद्धीमंता सवे राही ॥४॥ दास म्हणे हेचि युक्ति । मनी हरिचरणी प्रीती ॥५॥

८८३) काही युक्ती साधू जाता । अशक्य ते येई हाता ॥१॥ ऐसा आहे अनुभव । अशक्या अशक्य माधव ॥२॥ देही थोर नामयुक्ती । साधिलीया देव हाती ॥३॥ वाहे शिरी भक्तभार । दासा दावी चमत्कार ॥४॥

८८४) टाकी घाये देवपण । करी आघात सहन ॥१॥ करिता आघात सहन । वाचे येई नारायण ॥२॥ गोविंद म्हणे नाम कष्ट । जीवा वाटताती स्पष्ट ॥३॥

८८५) घाव सोशिलीया जीवी । मग हिऱ्याची पदवी ॥१॥ नाही कृती कर्तव्यता । कैची येईल पात्रता ॥२॥ नामी देह झिजविणे । भक्त पदवी पावणे ॥३॥ अंगी शांती वसे पूर्ण । दास म्हणे बाह्य खूण ॥४॥

८८६) सदा चाले करकर । आत जपे नाम सार ॥१॥ थांबेल हा गलबला । मग घेईन नामाला ॥२॥ ऐशी वेळ पाहता पाही । आयुष्य हे निघुनी जाई ॥३॥ नामी सारिला संसार । दास म्हणे तेचि थोर ॥४॥

८८७) सर्व चाले गलबला । घेई अंतरीच्या बोला ॥१॥ येर देही नाम नाही। नदरेही हाता येई ॥२॥ नरदेही मुख्य काम । मना जपे रामनाम ॥३॥ नाम सकळाचे सार । सर्व सिद्धींचे भांडार ॥४॥ कर कर सदा पाही । त्यात रामनाम गाई ॥५॥ सर्व काही नामी आहे । दास म्हणे अनुभव पाहे ॥६॥

८८८) देह गोकुळा भीतरी । नाद न माये गगनोदरी ॥१॥ झडती नौबदा चौघडे । नाम गाती वाडे कोडे ॥२॥ गोकुळात हृषीकेशी । आनंद होय सकळासी ॥३॥ देवे गोकुळ चोरिता । दासा देवासी ऐक्यता ॥४॥

८८९) पाषाणासी मोठेपण । टाकी करिता सहन ॥१॥ पाषाणाचा होय देव । ऐसा आहे अनुभव ॥२॥ करिता आघात सहन । नराचा तो नारायण ॥३॥ नाम मोठे उमगता । दासा मोठेपण हाता ॥४॥

८९०) आपुला राम आपुल्यापाशी । परी जागा चुकली कैशी ॥१॥ काय वरी वरा पाहसी । शोधी अंतरी कायेसी ॥२॥ ज्याच्या योगे हा आराम । तोचि बरा शोधी राम ॥३॥ ज्याचे स्वरूप पाहता । मन पावे तटस्थता ॥४॥ राम भेटे अवचिता । गुरूकृपे नाम घेता ॥५॥ वेदशास्त्रांचा कळस । रामनाम म्हणे दास ॥६॥

८९१) मायेचा बाजार व्यर्थ गलबला । देता घेता झाला जीव कष्टी ॥१॥ तया ठायी देव काय येईल हाता । विचारोनी चित्ता राही बरे ॥२॥ नामाचा बाजार नामघोष पाही । देता घेता होई विठ्ठलाची ॥३॥ दास म्हणे देही पंढरी जे गेले । अनुभव दाविले जगालागी ॥४॥

८९२) जात्यावरील जे गीत । देवा अति आवडत ॥१॥ जात्यावरील ते गान । न तुळे कशाचे समान ॥२॥ जाते उमगोन घेई । कळे बोलण्याची सोई ॥३॥ नामे दासा हे कळेल । भगवान आकळेल ॥४॥

८९३) जाते फिरवोनी रामनाम गाई । तया नरा नाही शीण काही ॥१॥ अहो बुद्धिबाई आता करा काई । जाते काय पाही विचारोनी ॥२॥ जात्यावरील गीत आवडते देवा । जनी लागी ठेवा सापडला ॥३॥ नित्य नियमित करावे हे काम । दास म्हणे नाम एक गावे ॥४॥

८९४) नाम का न मुखा नये । कळो येईना स्वभावे ॥१॥ मज सांगावा उपाय । जेणे नाम मुखी राहे ॥२॥ कुतर्क सांडोनिया भावे । गुरुपदी शरण जावे ॥३॥ गुरू दाविती नामसोय । दासा जेणे तरणोपाय ॥४॥

८९५) मुखी हरिनाम हेचि कृपादान । ऐसे संतजन बोलताती ॥१॥ मुखी हरिनाम सदा सर्वकाळ । शेवटीची वेळ तरी साधे ॥२॥ अंती मुखी नाम गति हे परम । साधनी सुगम गोविंद म्हणे ॥३॥

८९६) मुखी हरिनाम हेचि खरे तप । शिव करी जप ज्या नामाचा ॥१॥ येर सर्व तपे तपोनी भागला । काम हा राहिला अंतरीच ॥२॥ नामाचे स्मरणे पूर्ण समाधाने । ब्रह्मर्षी तो जाणे सर्वा श्रेष्ठ ॥३॥ देही तपस्थानी तपाचे साधन । नामब्रह्म खूण दास म्हणे ॥४॥

८९७) शेवटच्या क्षणी । जरी नाम येई वाणी ॥१॥ सर्व साधिले तयाने । भरोनिया सर्व ऊणे ॥२॥ सदा वाचे नाम बोल । घेता घडोनी येईल ॥३॥ नाही तरी केवी घडे । दास म्हणे जन्म पुढे ॥४॥

८९८) संतजनांचा आचार । तोची एक सदाचार ॥१॥ सदामाजी जो आचार । बोलीयेला सदाचार ॥२॥ दासा चाले जो आचार । दासा नाम सदाचार ॥३॥

८९९) जीवनात एक क्षण । नोहे चलन वलन ॥१॥ वेदशास्त्री केला शोध । संतजना आत्मबोध ॥२॥ तेची बोलती अध्यात्म । दासा आत्मा सहजनाम ॥३॥

९००) जे का असे अभ्यंतरी । तेचि प्रगट चराचरी ॥१॥ बाहेरून पहाती आत । त्याना न कळे ही मात ॥२॥ नामी पहाती देहात । दासा देव या जगात ॥३॥

विवेक

९०१) सोने पारखावे सोनाराचे दृष्टी । वैद्याचिये दृष्टी रोग पाही ॥१॥ तत्त्वज्ञान पाही विवेकाचे दृष्टी । आत्मा आत्मदृष्टी पाहता बरे ॥२॥ दास म्हणे थोर विचाराची दृष्टी । सुटेल ते गोष्टी संसाराची ॥३॥

९०२) कैसे देहाचे सार्थक । घडे निश्चयाने एक ॥१॥ याचा सांगणे विवेक । सुलभ साधनाने देख ॥२॥ कर्म धर्म उणे पाही । नामामाजी उणे नाही ॥३॥ दास म्हणे नाम घेता । संतसंगे सार्थकता ॥४॥

९०३) जो तो आपुल्या कर्माचा । पंथ वेगळा सर्वांचा ॥१॥ त्रिविध कर्मगती नेई । तेथे तेथे प्राणी जाई ॥२॥ कर्मयोगे एके ठायी । सुखी दुःखी अन्य होई ॥३॥ नामी विवेके रहावे । दास म्हणे मुक्त व्हावे ॥४॥

९०४) काळ कोण्या वेळे कैसा पालटेल । कळो न येईल काही केल्या ॥१॥ म्हणोनिया राही नामाचे स्मरणी । विवेक साधनी खरे सुख ॥२॥ विवेकाचे पैल देवाची वसती । ऐसे बोलताती साधुसंत ॥३॥ विवेकाचे फल पूर्ण शांति अंगी । दास म्हणे रंगी नामाचिये ॥४॥

९०५) देखल्याची गोष्टी आंधळ्यासी नये । कारण प्रत्ययो असेचिना ॥१॥ होई बा देखणा होई बा देखणा । अविवेक खुणा अंधत्वाच्या ॥२॥ डोळियाचा डोळा नामे उघडावा । विवेक धरावा दास म्हणे ॥३॥

१०६) वेगी व्हावे सावधान । सावधपणाचे लक्षण ॥१॥ वेग अंतरी पाहिला । सावधान नामी झाला ॥२॥ गुरूकृपेचे कळणे । गुरूकृपे कळोनि घेणे ॥३॥ दास म्हणे सावध झाला । मोक्षमार्गी तोचि भला ॥४॥

१०७) विस्मरणे चुकी भली । पश्चात्तापे दूर झाली ॥१॥ जीवाशिवाचे विस्मरण । चुकी हेचि थोर जाण ॥२॥ गुरूकृपे ओळखावी । आपुली आपण भेटी घ्यावी ॥३॥ चुके चौऱ्यांशीचा फेरा । पाहे विचारोनि नरा ॥४॥ अंतरी स्मरण । पश्चात्तापाचे लक्षण ॥५॥ बोध होता मनी घ्यावा । दास म्हणे विवरावा ॥६॥

१०८) विवेक धरिता होईल कल्याण । अविवेक जाण दुःखमूळ ॥१॥ मनाचा आवर हाच गा विवेक । अनावर देख अविवेक ॥२॥ विवेक नदीच्या पैलपार जाण । देवाचे दर्शन दास म्हणे ॥३॥

१०९) ऐका परम कल्याण । मनी धरुनी उपरम ॥१॥ विवेकाने वैराग्याने । कसोनिया नाम घेणे ॥२॥ मनोभावे नाम घेता । मग देव येईल हाता ॥३॥ हेचि परम कल्याण । दास म्हणे नामगान ॥४॥

११०) आशा दुःखासी कारण । सांडी विवेक धरून ॥१॥ दावी विषयाची गोडी । निघे तेथोनी तातडी ॥२॥ तरीच प्राण्या होशील सुखी । चांग उपाय हा देखी ॥३॥ विवेक नित्यामाजी मन । दास म्हणे नाम जाण ॥४॥

१११) जव काळ आहे बरा । कोणी स्मरेना ईश्वरा ॥१॥ काळ पालटेल केव्हा । कळो नये रे मानवा ॥२॥ विवेक नदीपार जाई । विवेकाने नाम घेई ॥३॥ सागरात जैशी नाव । तैसा काळामाजी जीव ॥४॥ विवेक नदी उगमता । दासा देव साह्यकर्ता ॥५॥

९१२) सुखामाजी सुखी दुःखामाजी दुःखी । जन्ममरण शेखी चुकेचिना ॥१॥ सुखदुःख क्षणिक विषयभोग त्याग । त्यांत पांडुरंग केवी रंगे ॥२॥ नित्य विवेकाने दोन्ही विरहित होई । मुखी नाम गाई आनंदाने ॥३॥ तरीच होय नरदेह सफलता । बोध घ्यावा चित्ता दास म्हणे ॥४॥

९१३) विवेक धरावा अंतरी । अनित्य टाकोनी बाहेरी ॥१॥ विवेक जाणावा तो नित्य । येर सर्वही अनित्य ॥२॥ गोविंद म्हणे नाम नित्य । सत्य आणिक ते मित ॥३॥

९१४) विवेक जाणणे चतुर्थ साधन । अविवेक जाण धरू नये॥१॥ विवेक नदीसी बैसोनिया जाणे । सांगड धरणे करी नाम ॥२॥ जाणे नित्यामाजी राहणे विवेक । अविवेक दुःख अनित्यात ॥३॥ दास म्हणे ज्ञाने कळेल ही गोष्टी । नामे जीव कष्टी उद्धरेल ॥४॥

९१५) नित्यानित्य विवेकाने । बुद्धी प्रकाशित करणे ॥१॥ ऐसे घडले जयाला । जगी तोचि धन्य झाला ॥२॥ गोविंद म्हणे सांगू किती । नामी तयाची प्रचीती ॥३॥

९१६) भाव अभाव विचार । जाणे विश्वास प्रकार ॥१॥ नित्यानित्य विवेकाने । विकल्प टाकोनिया मने ॥२॥ तये ठायीची प्रचीती । दासा हृदयी आत्मज्योती ॥३॥

९१७) विचारेची काशी विचारेची गया । होतसे प्राणिया अनायासे ॥१॥ विचारे पालट होतसे मनाचा । विचारेची वाचा जडे नामी ॥२॥ म्हणोनि विचार करणे सादर । सारासार विचार बोलिजे ज्या ॥३॥ विचार पाऊली चालिताचि भले । सुख ते आगळे दास म्हणे ॥४॥

११८) विचारेची होय हित । अविचारे अनहित ॥१॥ विचारात राहे मन । तोचि काशीवासी जाण ॥२॥ सार असारी शोधणे । विचार या नाव जाणे ॥३॥ गुरुनामी अनुभव जाण । हेचि काशीक्षेत्र खूण ॥४॥ नाम राहे जयापाशी । जेथे राहे तेथे काशी ॥५॥ सकळा सुलभ विचार । दास म्हणे नाम थोर ॥६॥

११९) विचार धरिता होईल कल्याण । अविचारे जाण दुःख प्राप्ती ॥१॥ विचारोनि बोले विचारेचि चाले । ऐसे धन्य झाले साधुसंत ॥२॥ रामनाम तो हा उत्तम विचार । बोलती साचार तत्त्वनिष्ठ ॥३॥ ऐशा विचारणी देवभेटी होय । सर्व ज्ञान लाहे दास म्हणे ॥४॥

१२०) विचार धरिता होईल कल्याण । अविचारे जाण दुःख प्राप्ती ॥१॥ विचारोनि बोले विचारेचि चाले । काशीक्षेत्र भले विचार हा ॥२॥ रामनाम तो हा उत्तम विचार । संगती साचार साधुजन ॥३॥ दास म्हणे ऐशा विचारी जो गेला । अशक्य तयाला काही नाही ॥४॥



वैराग्य

९२१) त्यागेवीण कैचा देव येईल हाता । अहंकारापरता होई वेगी ॥१॥ बीज नष्ट करी बीज नष्ट करी । अहंकारा उरी उरो नेदी ॥२॥ रामनाम म्हणता जाय अहंकार । गुरूकृपे थोर दास म्हणे ॥३॥

९२२) त्यागे अहंतेच्या थोर । साधुसंत झाले थोर ॥१॥ जगा दाविती प्रकार । रामनाम चमत्कार ॥२॥ कारण जगाने वळावे । रामरूप अनुभवावे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । थोर संतांची महती ॥४॥

९२३) विषय त्यागेवीण कैसा देव हाती । विचारोनी चित्ती पाही बरे ॥१॥ विषयांत राहोनी विषयांचा त्याग । घडे केवी सांग कळेचि ना ॥२॥ विधी माजी नाही चित्त जरी पाही । विषयत्याग होई सहजेची ॥३॥ दास म्हणे नाम विधी उमगता । मग देव हाता येत असे ॥४॥

९२४) त्यागाचेनी योगे देहीच विदेही । सुखी दुःखी पाही सम सदा ॥१॥ त्याग कैसा होई समजोनी घेई । मनी केले नाही तोची त्याग ॥२॥ त्यागाचे लक्षण नाम साठवण । दास म्हणे खूण ऐशी असे ॥३॥

९२५) मने जरी घडे विषयाचा त्याग । देवकृपा मग दूर नाही ॥१॥ विधीने सेवन करोनिया राहे । विषयत्याग पाहे सहजची ॥२॥ दास म्हणे जरी देवकृपा होय । नुरे त्या विषय नामावीण ॥३॥

९२६) एक विधी पाही एक विधी होई । एक देव घेई ओळखोनी ॥१॥ एकचि चालवी एकचि बोलवी । एकचि हालवी सकळ काही ॥२॥ अनेकी पाहता काय हाती येई । नाशीवंत पाही आदिअंती ॥३॥ तयाचे जे नाम तोचि विधी पाही । जेणे मुक्त होई दास म्हणे ॥४॥

९२७) वैराग्याची कास । नामस्मरणाची आस ॥१॥ वैराग्य ते विषयत्याग। नुरे अंतरात भोग ॥२॥ गोविंद म्हणे साधन । दृढ वैराग्याची खूण ॥३॥

९२८) करी एषणांचा त्याग । धन्य तोचि महाभाग ॥१॥ जे का अंतरात राही । अति सूक्ष्मरूपे पाही ॥२॥ जेणे साधका बंधन । प्राप्त नोहे भगवान ॥३॥ सत्नामे नुरे देही । दास म्हणे समजून घेई ॥४॥

९२९) वैराग्याचे भाग्य थोर । जेणे भेटे सर्वेश्वर ॥१॥ प्रपंचात दैव भाग्य । परमार्थी ते वैराग्य ॥२॥ विगत झाला आहे राग । इहामुत्र फळ भोग ॥३॥ दास म्हणे सांगो किती । दासा नामी हे प्रचीती ॥४॥

९३०) स्थिर वैराग्याचे भाग्य । आकळेल संतसंगे ॥१॥ स्थिर भाग्याची थोरी । मापी नाम ते वैखरी ॥२॥ गोविंद म्हणे आकळेल । गुरुनामी स्थिरावेल ॥३॥

९३१) वैराग्याचे खरे भाग्य । साठविती ते सभाग्य ॥१॥ नस्देही साठविता । भेटी होय भगवंता ॥२॥ येर भाग्य अशाश्वत । भेटवीना भगवंत ॥३॥ नामे येईल हातासी । दास म्हणे निश्चयेसी ॥४॥

९३२) सत्य वैराग्य बाणता । रामरस येई हाता ॥१॥ ऐसे वैराग्य सामर्थ्य । जेणे संत भाग्यवंत ॥२॥ इहामुत्र फल भोग । विराग, नामी अनुराग ॥३॥ गुरूकृपे अधिकारी । दास म्हणे चरण धरी ॥३॥

९३३) विदेहीच्या सुखा । सुखाचेही सुख लेखा ॥१॥ विदेहीचे सुखस्थान । परमात्मा परिपूर्ण ॥२॥ त्याच अंगे तेचि व्हावे । दासा सुख ते स्वभावे ॥३॥



भक्ती

९३४) करिता जनावरी प्रीती । न चुकेचि यातायाती ॥१॥ प्रीती धरी हरिपायी । तोचि धन्य जगत्रयी ॥२॥ प्रीती हरिची अखंड । हरिपदीची अखंड ॥३॥ जग करीतची प्रीती । आपुल्याचसाठी होती ॥४॥ देवप्रीतीची लक्षणे । मीठ सागरी मिळणे ॥५॥ बाह्य प्रीती काय कामा । दास म्हणे घेई नामा ॥६॥

९३५) भक्त अनन्य तो झाला । तोचि अधिक देवाला ॥१॥ पाण्यालागी मीन जसा । देवालागी भक्त तसा ॥२॥ त्याचा चालवी संसार । त्याचे प्रेम हे अपार ॥३॥ अनन्य ते समजूनी घेई । दास म्हणे धन्य होई ॥४॥

९३६) भक्त व्हावे ऐसे वाटे । नामस्मरण करी नेटे ॥१॥ नामपाठ घडघडाट । भक्त महिमा अचाट ॥२॥ पाहो ऐसे व्हावे वाटे । ऐको ऐसे व्हावे वाटे ॥३॥ एकाहोन एक थोर । काय वर्णु मी पामर ॥४॥ शूर व्हावे तरी शक्ती । भक्त व्हावे तरी भक्ती ॥५॥ परी पाहिजे अंतर । व्हावयासी तदाकार ॥६॥ तदाकार कोठे व्हावे । रामस्वरूपी मिळावे ॥७॥ तदाकार होण्या युक्ती । दास म्हणे नामभक्ती ॥८॥

९३७) भक्तांचा स्वधर्म । निष्ठेपाशी सर्वोत्तम ॥१॥ देव भक्तांचा अभिमानी । भक्तपद थोर जाणी ॥२॥ भक्त सदा नाम गाती । म्हणुनी तयांची महती ॥३॥ देव वाढवित स्वये । दास म्हणे भय वाहे ॥४॥

९३८) भक्ती बहुरंगी जाणा । करिता देव हा भेटेना ॥१॥ भक्ती पोचेना देवासी । कैचा भेटे ऋषिकेशी ॥२॥ नामभक्ती देवा पावे । दास म्हणे तेचि घ्यावे ॥३॥

९३९) भार कैसा तो घालावा । तोचि बोध मनी घ्यावा ॥१॥ नावेमाजी जो बैसला । नाव सर्वस्व तयाला ॥२॥ जळामाजी जळचर। नेणे त्यावीण विचार ॥३॥ काय माथा घ्यावा भार । भार नव्हे तो जोजार ॥४॥ ऐसा भार जो घालीत । दास संसारीच मुक्त ॥५॥

९४०) हरिभक्तीचे साधन । नोहे विश्वासा वाचून ॥१॥ हरिभक्ती परमार्थ । नाम रक्षण हे सार्थ ॥२॥ असो सज्ञानी अज्ञानी । विश्वास हा मुख्य जाणी ॥३॥ दास म्हणे मनी धरी । पूर्ण होता भेटे हरि ॥४॥

९४१) तोचि भक्त श्रेष्ठ जो नव्हे विभक्त । शुभाशुभ अर्पित हरिपायी ॥१॥ शुभांत विस्मृति ऐशी नव्हे भक्ति । अशुभी घालिती भार देवा ॥२॥ नामी ज्याचे चित्त सदा अनुरक्त । तया स्वये पूजित भगवान ॥३॥ ऐसा जगी थोर भक्तांचा महिमा । दासा न कळे सीमा वर्णनाची ॥४॥

९४२) काळा हाती सोडवित । ऐसा कोण रे समर्थ ॥१॥ करु जाणे देव भक्त । अन्य कोणा नाही शक्त ॥२॥ ऐसा भक्तांचा महिमा । बोलायाची झाली सीमा ॥३॥ दास म्हणे भक्त जाण । ओळखिता प्रेम खूण ॥४॥

९४३) हरिनामाचा आचार । तोचि ज्ञानी भक्त थोर ॥१॥ वर्मे हरिभक्ती करी । देव राहे त्याचे घरी ॥२॥ घाली देवावरी भाव । नामस्मरणी सादर ॥३॥ दास म्हणे ज्ञानी भक्त । देव स्वरूपची सत्य॥४॥

९४४) आत्मसूर्य उपासना । मनी घेता सुख जाणा ॥१॥ राहे सविता

अंतरी । नवल तेजाची त्या थोरी ॥२॥ उपासना हे गायत्री । नाम वदे वेदवक्त्री ॥३॥ संधिकाळी जे साधणे । दास म्हणे वर्म जाणे ॥४॥

९४५) तोल भक्तीचा चुकता । भक्त पावतो आघाता ॥१॥ सूक्ष्ममार्ग तो भक्तीचा । आहे अवघड साचा ॥२॥ ताले तोल सांभाळित । रामनाम ध्वनी ज्यात ॥३॥ विस्मरणे तोल गेला । ज्याचेमुळे बैसे झोला ॥४॥ भक्ती असिधाराव्रत । भक्त नेमे आचरित ॥५॥ सर्व देवा समर्पण । प्रेमभक्तीची ती खूण ॥६॥ भक्ती जाणे नवविध । दास म्हणे तोचि सिद्ध ॥७॥

९४६) अन्य वाटे जाता पाही । हातामाजी शीण येई ॥१॥ जाणे नामभक्ती वाटे । जेणेयोगे देव भेटी ॥२॥ भक्तीवाट ती देहात । सुलभ सोपी ना बोभाट ॥३॥ दास म्हणे सांगो कायी । गुरुकृपे अनुभव घेई ॥४॥

९४७) ऐका श्रवणाची मात । श्रवण भेटवी भगवंत ॥१॥ कायी करावे श्रवण । अखंडित नामगान ॥२॥ श्रवण करिता नामगान । दासा शक्य सर्व जाण ॥३॥

९४८) नाम करावे श्रवण । सर्वकाळ सकळा जाण ॥१॥ सर्व काही आयकावे । नाम ऐकी तया बरवे ॥२॥ गोविंद म्हणे आणि काही । करू नको अन्य पाही ॥३॥

९४९) श्रवण हरिनामी श्रवणदोष गेला । कीर्तन तो गेला वाचा दोष ॥१॥ स्मरणात मन चित्त शुद्ध जाण । पद सेवनाने बुद्धी शुद्ध ॥२॥ अर्चनात घडे इंद्रिय निवृत्ती । विरे अहंवृत्ती नमनांत ॥३॥ दास्यत्वात देहभाव तो आटला । सख्य अभेदाला प्रगट करी ॥४॥ रामरूप झाला निवेदनी भला । बोल हा खुंटला दास म्हणे ॥५॥

९५०) हरिकथा सर्वश्रेष्ठ । जीवा मार्ग दावी स्पष्ट ॥१॥ तोचि मार्ग धरूनी राही । अन्य करू नको काही ॥२॥ गोविंद म्हणे सत्य । नाही त्याहूनी उचीत ॥३॥

९५१) वाचे गुण उच्चारण । हेचि जाणावे कीर्तन ॥१॥ चौथा गुण नामखूण । ज्यात कळो येई जाण ॥२॥ गोविंद म्हणे गुणानुवाद । सदा सर्वदा आनंद ॥३॥

९५२) कीर्तनाची गोडी । देवा आतून आवडी ॥१॥ भक्त गाती जपे स्थानी। देव वसे तये स्थानी ॥२॥ गोविंद म्हणे कीर्तन । सोडू नये कधी जाण ॥३॥

९५३) असा काही धरी छंद । देव भेटेल गोविंद ॥१॥ छंद नको धरू नाना । बहु छंदी जग जाणा ॥२॥ छंद कीर्तनाचा धरी । देवभेट देई हरि ॥३॥ जेथे हरिचे कीर्तन । गुरुदेव तेथे खूण ॥४॥ दास म्हणे तेथे जाई । नामसंकीर्तन होई ॥५॥

९५४) अखंड कीर्तनी प्रीती जरी । कीर्तनभक्ती तेचि बरी ॥१॥ कीर्तनरंगी होई दंग । जेथे नाचतो श्रीरंग ॥२॥ अहो कीर्तन ते काय । जगी जेणे धन्य होय ॥३॥ ऐसे कीर्तन हे चांग । दासा करी भवभंग ॥४॥

९५५) कीर्तन ते महातप । जाळीतसे महापाप ॥१॥ गोड हरिगुण लीला । सदा बोलतसे बोला ॥२॥ कीर्तनाने चित्तशुद्धी । कीर्तनाने दृढबुद्धी ॥३॥ दास हरिचे कीर्तनी । बोले रामनाम वाणी ॥४॥

९५६) अंतरात अंतरखूण । पाही अंतरी जावोन ॥१॥ कीर्तनात जडता मन । कळो येई अंतर्खुण ॥२॥ गोविंद म्हणे निर्विकार । होता कळेल प्रकार ॥३॥

९५७) गुरुकृपा नित्य नामाचे कीर्तन । स्वरूपसुखी जाण मने असे ॥१॥ या तीन लक्षणी योगी संतराज । अखंड साम्राज्य चालविती ॥२॥ दास म्हणे त्यांचे पायी शरण जाता । आपलेपण हाता आपण देती ॥३॥

९५८) जाता संतांच्या कीर्तना । होय ब्रह्मानंद मना ॥१॥ तेथे स्वयेची आपण । प्रेमे नाचे नारायण ॥२॥ मग कैचा वर्णू थाट । पीतप्रभा लखलखाट ॥३॥ वास सुटला कस्तुरीचा । रंग भरला कीर्तनाचा ॥४॥ गोड रामनाम रस । संत वाटीती जनास ॥५॥ ऐसा घेताचि प्रसाद । जीवा होय परमानंद ॥६॥ दास म्हणे जाता शरण । होय देवाचे दर्शन ॥७॥

९५९) कीर्तनभक्तीचे लक्षण । हरिगुणी नामगान ॥१॥ हरिगुणी कीर्तनरंग । देव भेटतो श्रीरंग ॥२॥ अखंड कीर्तनी जो गेला । दास म्हणे धन्य झाला ॥३॥

९६०) हरिकथा गंगाजळ । स्नाने मोक्षचि केवळ ॥१॥ कथा जीवासी भूषण । कथा भेटवी भगवान ॥२॥ आकार उकार मकार । तीन्ही ताली नामोच्चार ॥३॥ ऐशी कथा थोर पाही । देव दासा साह्य होई ॥४॥

९६१) रामकथामृत करिती सेवन । नुरे त्या बंधन संसारीचे ॥१॥ श्रवणेचि घेणे रस अंतरात । जेणे सीताकांत भेटी देई ॥२॥ कथामृत गोडी लागता सहज । अमृताचे काज नसे तेथे ॥३॥ दास म्हणे गुरुपदी हो सोहळा । रस लाधे त्याला रामनामी ॥४॥

९६२) रामकथामृत जे नर सेविती । धन्य ते सुकृती जगामाजी ॥१॥ तयांच्या सुकृता नाही पारावार । आणिक आचार काय तेथे ॥२॥ काळ

त्यांचा असे आज्ञांकित पाही । रामनाम जिही दृढ केले ॥३॥ ऐशी रामकथा सकळा उद्धरिणी । ऐकावी श्रवणी दास म्हणे ॥४॥

९६३) हेचि भजन लक्षण । सदामध्ये समाधान ॥१॥ सदा नाम असे देही । आणिक करू नको काही ॥२॥ गोविंद म्हणे नाम । घेता करी पूर्ण काम ॥३॥

९६४) अनन्य भक्तीचे लक्षण । करी अनन्य भजन ॥१॥ अन्यपण नुरे काही । नाममय चित्त होई ॥२॥ साधी अनन्य भजन । तयापुढे तुच्छ आन ॥३॥ अनन्याते ओळखिता । दासा देव येई हाता ॥४॥

९६५) अंतरीचे भजन देई समाधान । जडोनिया मन नाम घेई ॥१॥ ऐसे एक जरी साधेल भजन । व्यर्थ सर्व ज्ञान तयापुढे ॥२॥ दास म्हणे करी नामाचे भजन । व्यर्थ सर्व ज्ञान तयापुढे ॥३॥

९६६) भक्ती केली परी देवा ती न पावे । अभक्तीच्या नावे भक्ती करी ॥१॥ चुकलिसे दिशा हे तया कारण । घेई ओळखून गुरूकृपे ॥२॥ मूर्ती पाहोनिया नमस्कार करी । जीवमात्रा मारी निर्दयता ॥३॥ सर्वाभूती भाव हेचि ते भजन । दास म्हणे खूण नाम घेई ॥४॥

९६७) स्मरण देव भेटे स्मरणी । नको राहू विस्मरणी ॥१॥ कोऽहं भाव विस्मरण । सोऽहं भाव ते स्मरण ॥२॥ गोविंद म्हणे रामनाम । सोऽहं भावाचे ते काम ॥३॥

९६८) स्मरण भक्तीचे लक्षण । जेथे नुरे विस्मरण ॥१॥ स्मरणरूप देव हरि । अखंड नामे स्मरण करी ॥२॥ विस्मरण योगे जीव । दुःख भोगिती मानव ॥३॥ नामस्मरण सकळा सार । दासा सामर्थ्य अपार ॥४॥

९६९) श्वासामाजी आहे नाम । स्मरण करणे हेचि काम ॥१॥ अंतरात धीर धरी । आणिक काही तू न करी ॥२॥ गोविंद म्हणे विष्णु पाही । स्मरणे व्यापक सर्वा ठायी ॥३॥

९७०) देव टाकितो पाऊले । जेणे योगे देह चाले ॥१॥ बालरूप धरूनी पाही । हळू हळू चाले देही ॥२॥ पाऊले ती मनी धरी । पादसेवन भक्ती खरी ॥३॥ विटेवरी दासा खूण । बरवी घेता उमगोन॥४॥

९७१) चौथे भक्तीचे लक्षण । करणे पायाचे सेवन ॥१॥ तया पाऊलासी जाण । सर्वजण करी नमन ॥२॥ गुरुदेवांची पाऊले । बरवी उमगता भले ॥३॥ पाऊलाने गमन करी । तयामाजी नाम धरी ॥४॥ हेचि पायाचे सेवन । विटेवरी त्याची खूण ॥५॥ देहामाजी अनुभव । दास म्हणे त्याचा देव ॥६॥

९७२) ऐका अर्चनाची भक्ती । हरिपायी धरणे प्रीती ॥१॥ मन देवोनि केशवा । जीवभाव समर्पावा ॥२॥ जो का मुख्य आहे देही । त्यात नामस्मरणी राही ॥३॥ पूजा असे चतुर्विध । त्यात कोणतीही साध ॥४॥ दास म्हणे हे अर्चन । घडता भेटे नारायण ॥५॥

९७३) देवा नाम समर्पण । हेचि देवाचे पूजन ॥१॥ पूजा असे चतुर्विध । कोणतीही त्यात साध ॥२॥ गोविंद म्हणे सर्व सोने । त्यात नाही जास्त उणे ॥३॥

९७४) हेचि देवाचे पूजन । सदा राहे समाधान ॥१॥ अखंड नामाचा उच्चार । हेचि देवासी उपचार ॥२॥ प्रेमभावाचा नैवेद्य । अर्पिताती साधुराय ॥३॥ साधुजनी साधियेली । दास म्हणे पूजा भली ॥४॥

९७५) मन नामी वळे तेचि महापूजा । असे अधोक्षजा प्रिय बहू ॥१॥ कायेमाजी असे इयेचे साधन । काय पूजा जाण बोलताती ॥२॥ चित्त परीक्षक चित्ताचे देऊळी । मन तेथे वळी तरीच घडे ॥३॥ बाह्यामाजी येता अंतरीची जोड । देव पुरवी कोड दास म्हणे ॥४॥

९७६) मनोमय पूजा मनेचि चालिली । मने ओळखिली सकळांची

॥१॥ काही उपचार नसताचि जाणा । मनेचि कल्पना सर्व करी ॥२॥ प्रीती पडिभारे मने समर्पिता । देव होय भोक्ता मानसीचा ॥३॥ ऐशी पूजा मने साधिलीया धन्य । दास म्हणे अन्य काय काज ॥४॥

९७७) मानसाचे उपचार । मने कल्पून साचार ॥१॥ देवा भावे समर्पिता । करी सत्यचि तत्त्वता । ॥२॥ आधी मन हाती घ्यावे । मग पूजन करावे ॥३॥ दासा मन हाती येई । रामनाम घोट घेई ॥३॥

९७८) शुद्ध मानसाची पूजा । जे का प्रिय अधोक्षजा ॥१॥ मानसाचे उपचार । मने कल्पिता साचार ॥२॥ मने घडे जो आचार । तोचि बोलिजे साचार ॥३॥ नामे मन शुद्ध होई । देव दासांकित पाही ॥४॥

९७९) सहज पूजनी नुरे दुजेपण । देव भक्त जाण एकरूप ॥१॥ तये ठायी कैचा साधन प्रकार । कैचे उपचार समर्पण ॥२॥ गंगेचा या ओघ सागरी मिळाला । स्वये समर्पिला तैशापरी ॥३॥ नामरूप सदा अंतरी बाहेरी । भेटी स्वये हरी दास म्हणे ॥४॥

९८०) वंदन म्हणजे नमन । मन आपुले देवार्पण ॥१॥ संकल्प विकल्प नामी सरले । वंदन तयासी साधले ॥२॥ गोविंद म्हणे नमस्कार । थोर तयाचा बडिवार ॥३॥

९८१) ऐका वंदनाची भक्ती । अपराध नुरवी श्रीपती ॥१॥ ऐसे नमन चांगले । मन जेणे राम झाले ॥२॥ मन केले देवाधीन । भक्ती बोलीजे नमन ॥३॥ मन जडता गुरुपायी । कळे नमनाची सोई ॥४॥ नमन मन नामाचार । दास म्हणे नमस्कार ॥५॥

९८२) गुरुनी सांगितले ते करी । तेचि दास्य अवधारी ॥१॥ दास्य भक्तीचे लक्षण । गुरूकृपे ओळखण ॥२॥ दास्य अखंड जाणावे । अखंडात नाम घ्यावे ॥३॥ हेचि दासाची करणी । यजमान देव धणी

॥४॥ काया वाचा मनोभावे । दास्य देवाचे करावे ॥५॥ दास सदा आज्ञांकित । गुरूदेव त्या रक्षित ॥६॥

९८३) दास्य भक्तीचे लक्षण । गुरुकृपे ओळखण ॥१॥ दास्य अखंड जाणावे । अखंडात नाम घ्यावे ॥२॥ हेची दासाची करणी । यजमान देवधणी ॥३॥ काया वाचा मनोभावे । दास्य देवाचे करावे ॥४॥ दास सदा आज्ञांकित । गुरुदेव त्या रक्षित ॥५॥

९८४) जीवा थोर हे भूषण । गुरुदेव दास्य जाण ॥१॥ काय आणिक भूषणे । देव भेटी नोहे जेणे ॥२॥ देह शोभे नामे जाणे । तैसा नोहे चंदनाने ॥३॥ ऐशा भूषणी जो भला । दासा उणे नाही त्याला॥४॥

९८५) गुरुनी सांगितले करी । हेचि दास्य अवधारी ॥१॥ गुरु सांगताती काम । तेचि ओळखावे नाम ॥२॥ गोविंद म्हणे होई दास । करी नामाचे सायास ॥३॥

९८६) सख्य देवाशी करावे । प्रेमप्रीतीने बांधावे ॥१॥ ऐशी आहे सख्यभक्ती । सदा कृष्ण नाम चित्ती ॥२॥ देवा आवडी नामाची । दास वर्ततो तैसाची ॥३॥

९८७) कोण जीवाचा सांगाती । सोडवील जीवाप्रती ॥१॥ स्त्रीपुत्रादी मातापिता । संगे कोण करिती चिंता ॥२॥ देवा ओळखोन घेई । गुरुलागी शरण जाई ॥३॥ दास म्हणे देव सखा । नाम घेता राहो नका ॥४॥

९८८) सख्य भक्तीचे लक्षण । प्रेम हीच त्याची खूण ॥१॥ गुरूदेवा ज्याचे प्रेम । तैसे वर्तावे सप्रेम ॥२॥ धरूनी प्रेमखूण दोरी । नाम जपावे अंतरी ॥३॥ राहता प्रेमाचे अंतरी । देव दासा साह्य करी ॥४॥

९८९) देव भक्तीजन्य सख्य । तेचि जाणा खरे सुख ॥१॥ खरे सुख नुरवी दुःख । पाहो जाता अलौकिक ॥२॥ गोविंद म्हणे देवभक्त । जेथ उरेना विभक्त ॥३॥

९९०) नवमी करिता नवही आटले । तेज ते दाटले वर्णवेना ॥१॥ आठवीचे सुख आठविता भले । नवमीत गेले मन माझे ॥२॥ नवभक्तीमाजी नवमी कळस । निवेदन तीस बोलताती ॥३॥ स्वानुभव सुखी स्थिरावले मन । उन्मनीची खूण दास म्हणे ॥४॥

९९१) जाणे आपणा आपण । तेचि आत्मनिवेदन ॥१॥ आपणा आपण जाणता । निवेदन होय स्वतः ॥२॥ गोविंद म्हणे निवेदन । अखंड नामाचे स्फुरण ॥३॥

९९२) देवालागी निवेदन । हेचि आत्मनिवेदन ॥१॥ देव सर्व दुःख वारी । सुखरूप जीवा करी ॥२॥ गोविंद म्हणे निवेदन । नाममय जे जीवन ॥३॥

९९३) भक्ती आत्मनिवेदन । ही तो अंतरीची खूण ॥१॥ गुरूकृपे कळो येई । आपणासी आपुले ठायी ॥२॥ जाणोनिया अनुभव खुणे । आत्मनिवेदन बाणे ॥३॥ जाणे तयाचा प्रकार । अंतर्बाह्य नामोच्चार ॥४॥ देव त्यांचा पुरवी अर्थ । दास म्हणे ते समर्थ ॥५॥

९९४) मुख्य समाधान आत्मनिवेदन । निर्गुणी अनन्य होता बरे ॥१॥ होता बरे वस्तुरूपची केवळ । दृश्य तळमळ जेथे नाही ॥२॥ जेथे नाही चिंता होणाराची आता । तोचि तो तत्त्वता दास म्हणे ॥३॥

९९५) तेचि धन्य जाणा मार्ग आक्रमण । करूनी भक्ती जाण देवपदी ॥१॥ श्रवण पाडवा साधला जयानी । गुढी उभावोनी रामनामी ॥२॥ कीर्तन स्मरण पदांचे सेवन । अर्चन वंदन दास्य सख्य ॥३॥ आत्मनिवेदनी साधिली नवमी । दास अर्पी उर्मी रामपदी ॥४॥

९९६) थोर भक्तीचे महिमान । मुक्त स्थानावरील खूण ॥१॥ थोर भक्ती ज्यांनी केली । सर्व भाग्ये त्या लाधली ॥२॥ ज्यांनी जोडीले शाश्वत । देव तयाचा अंकित ॥३॥ शाश्वत देवाजीचे नाम । दासा करी पूर्ण काम ॥४॥

९९७) करी भक्तीचे शोधन । तेणे होय समाधान ॥१॥ तामसादी राजसादी । सात्विकादी भक्ती आदी ॥२॥ संतावाचोनिया जाण । न कळे भक्तीचे महिमान ॥३॥ मुक्तस्थानावरील भक्ती । दासा निर्गुण प्रचीती ॥४॥

९९८) थोर भक्तीचे लक्षण । मुक्तस्थानी नामखूण ॥१॥ विषय त्यागामाजी घडे । येर साधन नावडे ॥२॥ थोर गळे जै अहंता । थोर भक्ती येई हाता ॥३॥ ऐशी भक्ती करिता पाही । दासा देव साह्य होई ॥४॥

९९९) करिता मुक्तीवरील भक्ती । हरिहर भेटो येती ॥१॥ वैकुंठीचा स्वामी । ओळखिता धन्य तुम्ही ॥२॥ देवापाशी समसरी । नाही उंच नीज परी ॥३॥ दास म्हणे ब्रह्मगिरी । वरी वैकुंठ नगरी ॥४॥

१०००) भक्तीची ओल असेल हृदयी । नाम रुजे पाही गुरूकृपे ॥१॥ काही तरी काय करूनी खटपट । वृक्ष घनदाट केवी फळे ॥२॥ प्रेम पाणलोट चालला बाहेरी । अंतर तोवरी कोरडेची ॥३॥ दास म्हणे फळे रसाळ नामाची । आवडी तयाची घरी मनी ॥४॥

१००१) देव भक्तीने आकळिला । नलगे फार काही त्याला ॥१॥ भक्ती म्हणजे ते काय । मनी विचारोनि पाहे ॥२॥ देही प्रेमाची जी खूण । भक्तीची ते ओळखण ॥३॥ गुरुपदी व्हावे लीन । दासा भक्तीचे लक्षण ॥४॥

१००२) निर्गुणाची भक्ती निर्गुणाच्या संगे । निर्गुणचि अंगे होत असे

॥१॥ तेथीचा नवलाव वर्णवेना वाचे । धन्य ते भाग्याचे साधुजन ॥२॥साधुजना शरण जाता होय भले । निर्गुणी चांगले दास म्हणे ॥३॥

१००३) थोर भक्ती नाही भेद । होणे देवासी अभेद ॥१॥ चित्त उलटोनि चैतन्यी । स्थिर झाले अखंडपणी ॥२॥ गोविंद म्हणे भार । सर्व ज्यांचा देवावर ॥३॥

१००४) येता भक्तीचा जिव्हाळा । भेटी होय घननीळा ॥१॥ भक्ती चालीली वरीवरी । राहे जिव्हाळा अंतरी ॥२॥ दासा जिव्हाळा आत्म्यावरी । आत्मवाचे बोले तरी ॥३॥

१००५) बाह्य भक्ती देव न कळे । गुरुभक्तीने आकळे ॥१॥ वाचे उच्चारावे नाम । गुरुभक्ती ते परम ॥२॥ दास म्हणे भक्त ज्ञानी । नवल तयाची करणी ॥३॥

१००६) भक्त ऐसे धीरोदात्त । नसे अधीर ज्यांचे चित्त ॥१॥ एक धीरचि कारण । साह्य होय नारायण ॥२॥ दास नामी धरी धीर । तेणे लौकीक प्रकार ॥३॥



नाम

१००७) कैसे आयुष्याचे चीज । होईल हे सांगा मज ॥१॥ एक क्षण मागू जाता । त्रैलोक्यीही नये हाता ॥२॥ वय जातसे फुकट । नाम साठविणे चोखट ॥३॥ एक नाम साठविता । दास म्हणे सर्व हाता ॥४॥

१००८) काय साठवावे काय साठवावे । नाम साठवावे हृदयात ॥१॥ रामनाम सत्य रामनाम सत्य । मनी धरी नित्य रामनाम ॥२॥ दास सांगे कानी राम धरी मनी । गुरुपदी जाणी प्राप्त होय ॥३॥

१००९) तरीच आपुले ते देहे । रामनामी झिजता पाहे ॥१॥ तरीच आपुले ते वय । रामनामी खर्च होय ॥२॥ पुत्रादिक ती आपुली । जरी नामी साह्य झाली ॥३॥ ऐसे आपुले साधिता । दास देवचि तत्त्वता ॥४॥

१०१०) वेगी होऊनी सावधान । उच्चारावे रामकृष्ण ॥१॥ वेग आवेग तो पाहे । वेगामध्ये नाम आहे ॥२॥ काय पाही सावधान । दहा सहा ते अवन ॥३॥ ऐसा सावधान भला । दास म्हणे देव त्याला ॥४॥

१०११) कामक्रोध पैलपार । ज्ञानमार्गाचा विस्तार ॥१॥ कामक्रोधा पैल व्हावे । मग ज्ञान ओळखावे ॥२॥ दास म्हणे नाम घेती । तया ज्ञानमार्ग प्राप्ती ॥३॥

१०१२) ज्ञाने नामयुक्ती साधिली जयानी । तया चक्रपाणी भेटी होय ॥१॥ शक्ति न चलता तेथे चले युक्ती । बळाने श्रीपती केवी पावे ॥२॥ नामयोगी युक्ति सांगतील पाही । दासा भेटी होई जेणे योगे ॥३॥

१०१३) धरी रे धरी तू सज्जन युक्ती । मग मिळे तुज दुर्लभ मुक्ती ॥१॥ कार्य साधनी युक्ती नसता । व्यर्थचि जाईल सर्व शक्ती ॥२॥ वायुचिया प्रगटे भक्ती । जाणा अंतरी हेचि युक्ती ॥३॥ सद्गुरूचरणी जडता प्रीती । दासा नाहीच उरली युक्ती ॥४॥

१०१४) नामावीण ज्ञान कल्पनेची सृष्टी । तयाने जगजेठी केवी पावे ॥१॥ सद्गुरूवचनी धरावे श्रद्धेस । भेटे जगदीश नाम घेता ॥२॥ कुमारी खेळात घालिती भोजन । तेणे समाधान केवी होय ॥३॥ दास म्हणे नाम हेचि ज्ञान जाणा । दाखवील खुणा देवाजीच्या ॥४॥

१०१५) कशाचेनि योगे काय हो पावन । याची ओळखण सांगा स्वामी ॥१॥ गंगेचेनि योगे ओहोळ पावन । अखंड धार खूण त्याची असे ॥२॥ नारायण योगे अश्वत्थ पावन । देव अधिष्ठान खूण असे ॥३॥ रामनाम योगे मन हे पावन । स्मरण हे खूण त्याची असे ॥४॥ पावनाच्या संगे सर्वांग पावन । साक्षात्कार खूण दास म्हणे ॥५॥

१०१६) अपावन होये ज्या संगे पावन । अखंड नारायण हृदयस्थ ॥१॥ संग करी त्याचा संग धरी त्याचा । अपवित्र वाचा कामा नये ॥२॥ कामा नये काही हरिनामावाचून । नाम हे पावन दास म्हणे ॥३॥

१०१७) रामनाम शुभशकुन । येर सर्व अपशकुन ॥१॥ नाम आत नी बाहेर। शुभ सर्वदा साचार ॥२॥ गोविंद म्हणे संतवचन । शुभशकुनाची खूण ॥३॥

१०१८) रामनाम गाता गान । तेणे जोडे नारायण ॥१॥ एक

रामनामावीण । काय सुस्वर गायन ॥२॥ संजीवनी राग गाता । प्रेते उठती तत्त्वता ॥३॥ परी चुकेना मरण । दास म्हणे नामाविण ॥४॥

१०१९) तुझे नाम गाये मी वेळोवेळा रे । तुझे पायी ठेवीन मम भाळा रे ॥१॥ तुझे नाम गाये मी उठाउठी रे । पाश तोडोनी बंधना करी तुटी रे ॥२॥ तुझे नाम गाये मी सर्वकाळी रे । दास म्हणे कृपादृष्टी न्याहाळी रे ॥३॥

१०२०) कैसा होऊनी गाफील । नायकसी नाम बोल ॥१॥ काय सुख पाहोनिया । दंग झालासी प्राणीया ॥२॥ खरे सुख कायी आहे । अनुभव नामी पाहे ॥३॥ काळ बैसलासे उशा । युक्ती करी वय नाशा ॥४॥ नाम देती अखंडित । दास गुरूचा अंकित ॥५॥

१०२१) खरे नाणे खरे नाणे । रामनाम रूप जीणे ॥१॥ रामनाम खणखणाट । हाणी काळासी चपेट ॥२॥ एक म्हणती संन्यास । परी अंतरी राहे आस ॥३॥ एक म्हणताती कर्म । न सुटे बंधनाचे वर्म ॥४॥ एक म्हणताती योग । रामनाम हा सुयोग ॥५॥ खरे नाणे गुरुनाम । हाता येई परब्रह्म ॥६॥ काय खोटे कामा येई । जवळ असता व्यर्थ होई ॥७॥ गुरूकृपे हे जाणणे । दास म्हणे व्यर्थ होणे ॥८॥

१०२२) खरे नाणे नरदेही । रामनाम ध्वनी पाही ॥१॥ तेचि जाणावे शाश्वत। येरे सर्व अशाश्वत ॥२॥ गोविंद म्हणे हे कळेल । गुरुनामी आकळेल ॥३॥

१०२३) राम जीवीचा विसावा । एकोणिसा पैल गावा ॥१॥ राम जीवीचे कल्याण । सर्व जगाचे जीवन ॥२॥ नवमीत प्रवेशता । मग राम येई हाता ॥३॥ दास म्हणे रामनामी । कृतकृत्य तुम्ही आम्ही ॥४॥

१०२४) रामरूप पाहूनी दृष्टी । साठविता धन्य सृष्टी ॥१॥ रामदर्शन महिमा । रामरूपी जडे प्रेमा ॥२॥ राम सर्वत्र भरला । सगुण निर्गुण एकला ॥३॥ रूप रामाचे साजिरे । रूप रामाचे गोजिरे ॥४॥ आत्मारामाचे दर्शन । दासा रामनाम खूण ॥५॥

१०२५) राम जगी प्रगट आहे । सूक्ष्मदृष्टी धरुनी पाहे ॥१॥ सूक्ष्मदृष्टी ज्ञानदृष्टी । देव दिसता नोहे कष्टी ॥२॥ सूक्ष्मदृष्टीचे लक्षण । न दावी जे देवावीण ॥३॥ गुरूनामी येता जाणे । दासा सूक्ष्मदृष्टी बाणे ॥४॥

१०२६) रामनामाचे महिमान । वाचे वर्णू शके कोण ॥१॥ सर्व नामामाजी असे । पाहे तया देव दिसे ॥२॥ शिव हळहळे तापला । तोही नामे शीतळ झाला ॥३॥ राम म्हणजे जाण तीन । इडा पिंगला सुषुम्न ॥४॥ दास म्हणे गजानन । पावे अग्रपूजा मान ॥५॥

१०२७) रामनाम खरे नाणे । सकळा उपेगा कारणे ॥१॥ मूळ स्थानामाजी जाई । नाणे ओळखून घेई ॥२॥ नामावीण सर्व काही । मुलाम्याचे नाणे पाही ॥३॥ खरे नाणे प्राप्त होता । दासालागी देव हाता ॥४॥

१०२८) रामनामी योग तो योगी विख्यात । वियोगाची मात नाही जेथे ॥१॥ काय योगीयांचे ते योग साधन । नामाचे चिंतन नाही चित्ती ॥२॥ तिन्ही गुणातीत नामगुण पाही । तिथे स्थिर राही तोचि भला ॥३॥ ऐसे देव कथिले योगाचे लक्षण । दास म्हणे खूण भागवती ॥४॥

१०२९) राम नाही ओळखिला । रामसेवेसी चुकला ॥१॥ रामसेवा रामसेवा । गुरूवीण नकळे जीवा ॥२॥ राम बैसला अंतरी । काय पाहसी बाहेरी ॥३॥ श्वासोश्वासी नाम धरी । दास म्हणे सेवा खरी ॥४॥

१०३०) रामनाम सान । काय तयाचे कारण ॥१॥ ऐसे बोलती ते व्यर्थ । नाही कळले सामर्थ्य ॥२॥ एक तुळसीचे पान । काय म्हणावे लहान ॥३॥ रामनाम देवा देई । रामनामी सुखी राही ॥४॥ नाम सकळाहोन थोर । दास म्हणे दो अक्षर ॥५॥

१०३१) रामनाम सुधारस । सेविलीया भ्रमनिरास ॥१॥ नुरे भ्रम भ्रांती काही । बुद्धी जडे हरिपायी ॥२॥ गोड सेवनी पुरे कोड । काय आणिकाची चाड ॥३॥ दास म्हणे जरी सेवन । काळ आज्ञांकित जाण॥४॥

१०३२) रामनाम कोठे साठविले संती । जयाने महती प्राप्त होय ॥१॥ रामनाम आहे गगनाहोनी वाड । तयाचा पवाड कोण जाणे ॥२॥ संतांची लेकुरे रामनामे थोर । ब्रह्म ज्ञानेश्वर जयापुढे ॥३॥ शरण जावोनी स्थान ओळखावे । नाम साठवावे दास म्हणे ॥४॥

१०३३) रामनामापुढे बंड । काय चालीले प्रचंड ॥१॥ टाकिताची अहंपण । करी माया निर्मूलन ॥२॥ मनी भाव असो द्यावा । भजे भक्तीभावे देवा ॥३॥ शिवे बोधिला नारद । नायकिता पावे खेद ॥४॥ वचन धरिता मानसी । दास टिके आघातासी ॥५॥

१०३४) रामी विसरता प्राणी । जाणत्याही झाली हानी ॥१॥ जरी देवाचा विसर । सर्व उरले असार ॥२॥ स्मरण ते कैशा रीती । नामी प्रगट हे चित्ती ॥३॥ दासा गुरुनामे पाही । बाधक ते काही नाही ॥४॥

१०३५) खरे काय कळो येता । खोटे कळेल सर्वथा ॥१॥ एक कळता पाही। दुजे सहज कळो येई ॥२॥ दासा नाम हे गोमटे । तयावीण सर्व खोटे ॥३॥

१०३६) सार ओळखिता असार उरेना । देव भेटी जाणा अधिकारी ॥१॥ म्हणोनिया जनी सार ओळखावे । असार टाकावे जे

का निंद्य ॥२॥ साराचेही सार देवाजीचे नाम । आणिकाचे काम नाही दासा ॥३॥

१०३७) घरोघरी लोक करिती भोजन । संतांचे भोजन करिता नये ॥१॥ भोजन करीता पुष्ट होय देह । ब्रह्मरूप काय कैसी होय ॥२॥ धारणा होतसे प्राणापान जेथे । भोजन निरूते नामामृत ॥३॥ संतांचे भोजन जो नर सेविला । तोचि धन्य झाला दास म्हणे ॥४॥

१०३८) जो तो म्हणवी परमार्थी । परमार्थी आणि स्वार्थी ॥१॥ हेचि परमार्थाची खूण । नामस्मरणी जो विलीन ॥२॥ ऐशा साधनी जो रमला । विष्णुदास म्हणे भला ॥३॥

१०३९) परमार्थाचे लक्षण । नाम देवाजीचे जाण ॥१॥ परमार्थ तऱ्हा कोटी । नये उपेगा शेवटी ॥२॥ चित्रीची ती सेना । प्राणावीण व्यर्थ जाणा ॥३॥ दासा गुरू कळेवीण । नोहे नाम आकलन ॥४॥

१०४०) जैसे दधीमाजी लोणी । तैशी ग्रंथी अर्थवाणी ॥१॥ घेई अंतरी समजून । तरी अनर्थ निरसन ॥२॥ अर्थवाणी खूण भजन । नाम साधावे साधन ॥३॥ जेणे ज्योतीचे दर्शन । दास म्हणे समाधान ॥४॥

१०४१) जैशी वेळ तैसा होई । दुःख शोक करूनी कायी ॥१॥ सुख दुःख हे प्राक्तन । प्रारब्धाचा भोग जाण ॥२॥ एक नामचि उपाय । द्वंद्वातोनि सुटण्या जीव ॥३॥ नामे देव येई हाता । दासालागी नुरे चिंता ॥४॥

१०४२) माया अंधेर नगर । राहू नये क्षणभर ॥१॥ तेथे जीवा वाटे सुख । परी मानावे ते दुःख ॥२॥ माया दृश्य चराचर । चित्त काढावे सत्वर ॥३॥ नामघोष अभ्यंतरी । विठुरायाची नगरी ॥४॥ तेथे घेती जे नामास । देव रक्षी म्हणे दास ॥५॥

१०४३) माया अंधेर नगरी । राहू नये क्षणभरी ॥१॥ तयालागी करिता वास । नाश होईलचि खास ॥२॥ पुण्यनगरी माझारी । जरी राहे क्षणभरी ॥३॥ तरी त्याच्या पुण्यापार । नये वर्णिता साचार ॥४॥ पुण्य नामाचे स्मरण । माया तेचि विस्मरण ॥५॥ संतनामी धरिता सोय । दास म्हणे तो उपाय ॥६॥

१०४४) अनेक दैवते अनेक ते मंत्र । परी त्याचे तंत्र फार असे ॥१॥ इतुके साधिता फळ देती अल्प । क्षोभणे अमूप शेखी त्यांचे ॥२॥ तात्काळ दाविती चमत्कार थोर । करिता विचार निरुपयोगी ॥३॥ काय तेणे योगे आपुले कल्याण । रामरूप होणे रामनामे ॥४॥ रामनामे काळ दीन होय जेथे । मा क्षुद्र दैवते कोण तेथे ॥५॥ दास म्हणे ऐसा नामाचा बडिवार । जेणे सर्वेश्वर वश होय ॥६॥

१०४५) नाम आदरे घोकावे । नाम आदरे शिकावे ॥१॥ कैसे घ्यावे कैसे घ्यावे । सद्गुरूंचे शाळे जावे ॥२॥ लहान मोठा अधिकार । नाम सर्वामाजी थोर ॥३॥ नाम सर्वांगी बिंबले । दास म्हणे परीक्षिले ॥४॥

१०४६) काय घ्यावे कायी घ्यावे । श्रीरामाचे नाम घ्यावे ॥१॥ नाम धन नाम मान । नाम हेचि समाधान ॥२॥ नाम सर्वासी तारक । महा दोषासी हारक ॥३॥ दास म्हणे रघुवीर । जाणे दासाचे अंतर ॥४॥

१०४७) नाम घेशील ज्यावेळी । होई रिकामा त्यावेळी ॥१॥ रिकामपणाचे लक्षण । कामाविरहीत क्षण ॥२॥ आतमाजी राहे काम । काय उच्चारोनी नाम ॥३॥ दास रिकामा तो झाला । गोविंद तयाचा अंकिला ॥४॥

१०४८) नामधारक नाम जाणे । आणिक काही प्रकार नेणे ॥१॥ करोनि नाममय जीवित । रामनामी जडवी चित्त ॥२॥ गोविंद म्हणे अनेक । त्यात पाही नाम एक ॥३॥

१०४९) नाम गूज नाम गूज । पूर्ण करी जपता काज ॥१॥ नाम तारक तारक । नव्हे जीवासी मारक ॥२॥ नामधारक तो झाला । तोचि जगी धन्य भला ॥३॥ एक कोटी जपता बुद्धी । एक एक स्थान शुद्धी ॥४॥ श्वासोश्वासी असे नाम । दासा हृदयी प्रगटे राम ॥५॥

१०५०) अखंडित नाम मनी । नामधारक तो जनी ॥१॥ नामधारक हो का भलता । त्याची आवडी देवचित्ता ॥२॥ नाम बिंबले शरीरी । शरीर नामचि उच्चारी ॥३॥ सहस्र संख्या देखी । मित्र वर्षे नाम घोकी ॥४॥ नामधारक पदवी गाढी । दास म्हणे त्या रोकडी ॥५॥

१०५१) नामधारक तो भला । नाम एक देव त्याला ॥१॥ भरले अंतरी अनेक । नुरताचि उरे एक ॥२॥ रामनाम मुद्रांकित । नामधारक तो सत्य ॥३॥ गुरू वचनाचे सोयी । दास म्हणे अनुभव घेई ॥३॥

१०५२) करी नामाची घोटणी । देव दिसे चहुकोनी ॥१॥ ऐसा संतांचा अनुभव । घोटणीचा हा प्रभाव ॥२॥ नाम उच्चारावे कंठी । सर्वकाळ उठाउठी ॥३॥ ऐशी घोटणी साधिता । दासा देव येई हाता॥४॥

१०५३) बुद्धी रामनामी घोटी । अन्य विचार ना पोटी ॥१॥ नाम घोटणी घोटिता । देवराय साठविता ॥२॥ घोटणीचा वीट येता । देवराय नये हाता ॥३॥ दास म्हणे रामनामी । आम्हा बुद्धी आली कामी ॥४॥

१०५४) राही चित्त समाधाने । तरी सर्व होय सोने ॥१॥ सोने सुवर्ण हरिनाम। एक उच्चारावे नाम ॥२॥ गोविंद म्हणे पुनःपुन्हा । गुरुनाम उच्चारा ना ॥३॥

१०५५) जैशी धरावी भावना । तैसे त्याचे फळ जाणा ॥१॥ कडू

वृंदावन पेरी । गोड फळे केवी करी ॥२॥ जैसे बीज तैसे फळ । बीज पेरावे निर्मळ ॥३॥ बीज नाम शुद्ध भाव । दासा भेटे देव देव ॥४॥

१०५६) जैशी मनुष्याची दृष्टी । तैशी त्यास दिसे सृष्टी ॥१॥ हा तो दृष्टीचाच दोष । साधु करिती निर्दोष ॥२॥ देती डोळियाचा डोळा । दावितांती घननीळा ॥३॥ सृष्टी रामरूप आहे । दासा नामी अनुभव लाहे ॥४॥

१०५७) अफाट हे जग हिशेबाची कळा । त्यावीण वेगळा कोण उरे ॥१॥ कणाकणावरी कोरीयेले नाम । त्या देवाचे नाम घेता बरे ॥२॥ मानव हिशेब कामा नये काही । संतांचा तो पाही घेता बरे ॥३॥ संतांचा हिशेब नामस्मरणाचा । दास म्हणे वाचा घेता खरे ॥४॥

१०५८) पुण्य नामाचे स्मरण । जेथे नाही विस्मरण ॥१॥ विस्मरण नुरे जेथे । स्मरण ओळखावे तेथे ॥२॥ गोविंद म्हणे ऐसी ख्याती । सदा स्मरण राहे चित्ती ॥३॥

१०५९) नाम पुण्य नाम सुख । नामे पावे उत्तम लोक ॥१॥ नाम अचूक साधन । नामे जोडे नारायण ॥२॥ नाम जयानी साधिले । सर्व लाभ हाती आले ॥३॥ नामे आपण तरती । सकळासी उद्धरती ॥४॥ साधे अचूक साधन । दास म्हणे तोचि धन्य ॥५॥

१०६०) सकळामाजी सोपे । जेणे नुरतील पापे ॥१॥ ऐसे कोणते साधन । जेणे भेटे नारायण ॥२॥ सकळामाजी नाम सोपे । वाचे गाईजे अपापे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । सोपी नामाची प्रचीती ॥४॥

१०६१) वाचे नाम थोर पुण्य । गुरूकृपा थोर पुण्य ॥१॥ नाही दोहीसी उपमा । झाली बोलण्याची सीमा ॥२॥ दोन्ही जोडिता सभाग्ये । दासा घरी सर्व भाग्ये ॥३॥

१०६२) सर्व दोषा प्रायश्चित्त । एक नामचि उचित ॥१॥ दोष आहेत अनंत । नामपुण्या नाही अंत ॥२॥ गोविंद म्हणे नाम घ्यावे । कळो येईल स्वभावे ॥३॥

१०६३) प्रमाण हरिचे नामाला । वेद कथोनिया गेला ॥१॥ समाधान भोजनी बरे । चित्त विरता साधन उरे ॥२॥ शक्ति वाया दवडिता । लाभ कैचा येईल हाता ॥३॥ परी हे घडाया दुर्घट । वेद बोले नेम नीट ॥४॥ मित्र संख्या ते सहस्र । नित्य जपे जो पवित्र ॥५॥ तप लोटिता तपाला । नामधारक तो भला ॥६॥ चित्त देऊनी नाम घ्यावे । वेद बोलीले स्वभावे ॥७॥ ऐसे घडताचि जाण । दास होय सुखसंपन्न ॥८॥

१०६४) नाम घेता अंतर्बुद्धी । देही होय स्थान शुद्धी ॥१॥ एक कोटी जपता पूर्ण । एक होय शुद्ध स्थान ॥२॥ बारा स्थाने शुद्ध होता । रामरूप येई हाता ॥३॥ नाम पावन पावन । पवित्र ते सर्वाहून ॥४॥ ऐसे नाम जपता पाही । हाडी मासी उमटत देही ॥५॥ दास म्हणे नामी कळा । एक नामाचा सोहळा ॥६॥

१०६५) तपे असती बहुविध देख । एक एकाहुनी विशेष ॥१॥ सर्व श्रेष्ठ तप पाही । नाम भेटवी शेषशायी ॥२॥ ऐसे कळले जयाला । तोचि एक तपी भला ॥३॥ नको करू आटाआटी । नाम घेई उठाउठी ॥४॥ दास म्हणे नाम घेत । देव तया ये शोधीत ॥५॥

१०६६) सर्व तपाचे जे तप । मधुर रामनाम जप ॥१॥ वाया शिणसी तू कायी । अन्य यत्ने देव नाही ॥२॥ तप अज्ञान निरसन । बुद्धी प्रकाशे तप जाण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । थोर तपाची महती ॥४॥

१०६७) सर्वामाजी थोर तप । करी रामनाम जप ॥१॥ काय आणिक

सायास । नोहे अंतरी प्रकाश ॥२॥ खरे तपावीण काही । देव प्राप्त होत नाही ॥३॥ गुरुकृपे सर्व होई । दास म्हणे शरण जाई ॥४॥

१०६८) हेचि थोर तप जाणावेचि सत्य । रामनामांकित वाणी सदा ॥१॥ काय त्या उरले वेगळे आणिक । रामनाम एक मनी ज्यांच्या ॥२॥ साधुसंत यांनी आचरिले जाण । देवालागी मान्य हेचि असे ॥३॥ ऐसे तप जरी आचरील नर । आणिक प्रकार टाकोनिया ॥४॥ रामनाम ज्यांनी साठविले चित्ती । तपाची ते ख्याती दास म्हणे ॥५॥

१०६९) स्वप्न तेचि मिथ्याभूत । स्वपण तयामध्ये सत्य ॥१॥ मिथ्या माया ऐसे कळता । स्वपण नाम येई हाता ॥२॥ गोविंद म्हणे नाम । तेचि जाणावे परम ॥३॥

१०७०) स्वपण नाम कळे जरी । तोचि स्वप्न सत्य करी ॥१॥ स्वपण नाम हे जाणोनी । राहे आपणा ओळखोनी ॥२॥ गोविंद म्हणे ऐसे ज्ञान । तेचि उचित नको आन ॥३॥

१०७१) सत्य सुख सत्य नामामाजी आहे । संसारीचे पाहे मिथ्या माया ॥१॥ एक सत्य आत्मा आहे अंतर्यामी । जाता त्याचे धामी खरे सुख ॥२॥ दास म्हणे ऐशा सुखामाजी गेला । तयाचे हाकेला देव पावे ॥३॥

१०७२) संजीवनी मती । समत्वाची स्थिर गती ॥१॥ समत्त्व धारणा। जीवनाची खूण जाणा ॥२॥ गोविंद म्हणे नाम । जीवनाचे पूर्ण काम॥३॥

१०७३) गती बोलिजे सद्गती । रामनामाची प्रचीती ॥१॥ सद्गती सत्संगती। ओळखोन घ्यावे चित्ती ॥२॥ सत् नाम देवाजीचे । म्हणे दास हृदयीचे ॥३॥

१०७४) आत्मरूपी चित्त जडता । चित्तशुद्धी येई हाता ।।१।। चित्तशुद्धी द्वैत नुरे । एक तत्त्व तेचि उरे ।।२।। गोविंद म्हणे नाम । एक तत्त्वचि परम ।।३।।

१०७५) नित्य सुखाचे लक्षण । नित्यामाजी जडे मन ।।१।। अनित्यात कैसे सुख । अनित्य अनाम ते दुःख ।।२।। दास म्हणे नाम मुखी । तोचि एक सदा सुखी ।।३।।

१०७६) नित्य देवासी मागावे । काय तेचि मनी घ्यावे ।।१।। मागणे मागी मुखी नाम । तरी होसी पूर्णकाम ।।२।। धन सुत हा प्रपंच गोवा । मागुनी होईल पस्तावा ।।३।। पुरवी मनीचा तो अर्थ । दास गुरूनामी कृतार्थ ।।४।।

१०७७) नामी धरिता विश्वास । देव मार्ग दावी त्यास ।।१।। विश्वासा नेतो ईश्वर । विश्वासाने पैलपार ।।२।। नामी विश्वास ज्या आहे । आन काही नको आहे ।।३।। ऐसा विश्वास प्रभाव । दास म्हणे अनुभव ।।४।।

१०७८) जप विश्वासात आहे । विश्वास काय ते तू पाहे ।।१।। जो का विज्ञानाचा श्वास । तोचि जाणावा विश्वास ।।२।। गोविंद म्हणे नामी राही । याविण विश्वास दुजा नाही ।।३।।

१०७९) विश्वासता गुरुनामी । देव भेटे अंतर्यामी ।।१।। गुरुनाम सकळा थोर। तोचि राखावा आचार ।।२।। गोविंद म्हणे पाही । संतसंगतीत राही ।।३।।

१०८०) नाम घेता स्वये राम । पाही विश्वासाचे काम ।।१।। म्हणोनिया विश्वासेसी । नाम जपावे मानसी ।।२।। दास म्हणे पहावे । अनुभवोनी अनुभवावे ।।३।।

१०८१) बुद्धी नामी जडूनी राहे । सर्वाधिक लाभ पाहे ।।१।। येर लाभ

ते बापुडे । न चुके जन्ममरण कोडे ॥२॥ विकल्परहित विश्वासाने । दृढ बुद्धी नाम घेणे ॥३॥ ऐसा लाभ हाती येता । देव वाही दास चिंता॥४॥

१०८२) का बा करिसी गैरसोय । नामस्मरणी धरी सोय ॥१॥ वय चालीलेसे पाही । पुन्हा न ये सावध राही ॥२॥ सोय सापडेल बरी । गुरुपदी प्रेम धरी ॥३॥ दासा गैरसोय पाही । नामाविण सर्व काही ॥४॥

१०८३) नामस्मरणरूपी राम । करितो स्मरणाचे काम ॥१॥ तयामाजी मने जाता । स्मरण भक्ती येई हाता ॥२॥ देही अखंडित आहे । सर्वकाळ चालताहे ॥३॥ तेचि नामाचे स्मरण । ज्यात रूप प्रगटे खूण ॥४॥ दास म्हणे सांगो किती । थोर तयाची महती ॥५॥

१०८४) वेध नामाचे स्मरण । ज्यात नोहे विस्मरण ॥१॥ नामरूपा मेळ पडणे । हीच वेध खूण जाणे ॥२॥ गोविंद म्हणे कळो येई । गुरूनामी अनुभव घेई ॥३॥

१०८५) वेध लागला अंतरी । आत्मा दिसे आतवरी ॥१॥ हेचि साधन कुसरी । नाममय तो शरीरी ॥२॥ गोविंद म्हणे राम नाम । जेणे जोडे आत्माराम ॥३॥

१०८६) नामस्मरणाचे विस्मरण । केवी दूर होय जाण ॥१॥ ऐसा प्रश्न शिष्य करी । गुरू म्हणती अवधारी ॥२॥ स्मरणदेव अखंड देही । अखंडात कळो येई ॥३॥ संतचरणरज स्पर्शे । विस्मरणा स्मरण ग्रासे ॥४॥ दास म्हणे स्मरण सोपे । नामी सामर्थ्य अपापे ॥५॥

१०८७) नामस्मरणाचा घडा । विचार पाहता उघडा ॥१॥ एकचित्ते नाम घेई । मनी घेता बोध होई ॥२॥ घालोनिया आसन मांडी । मनीचे विचार तू सांडी ॥३॥ मेरूदंड खडा करी । दृष्टी नासिकाग्री धरी ॥४॥

काय जाते काय येते । अंतरी विचारी तू चित्ते ॥५॥ हस्त जोडुनी बसावे । मस्तकाते नमवावे ॥६॥ श्वासोच्छ्वासी येई जाई । तेथे सदा नाम घेई ॥७॥ ऐसे नाम घेता भले । दास म्हणे घे उगले ॥८॥

१०८८) एकविध नामी राही । आणिकाचे काम नाही ॥१॥ नाम विधान अखंड । जयामाजी नाही खंड ॥२॥ गोविंद म्हणे जे प्रमाण । कदा नोहे अप्रमाण ॥३॥

१०८९) होई एकविध भक्त । देव तुज करी मुक्त ॥१॥ अनेकास पाचारिता । कोणी एक नये हाता ॥२॥ थोर एकाची थोरवी । जन्ममरण हरवी ॥३॥ त्याचा भक्त एकविध । दास म्हणे नामे सिद्ध ॥४॥

१०९०) नामाचे लेखन नामाचे वाचन । नाम उच्चारण देवाजीचे ॥१॥ नाम हेचि जप नाम हेचि तप । जेणे सुटे काप कळीकाळा ॥२॥ नामची चिंतन नामची कीर्तन । नामची श्रवण देणे घेणे ॥३॥ नाम चमत्कार नाम साक्षात्कार । नामची व्यवहार दास म्हणे ॥४॥

१०९१) नामाचा व्यापार । हाचि खरा व्यवहार ॥१॥ व्यवहार देणे घेणे । हेचि उपयोगी होणे ॥२॥ गोविंद म्हणे नाम घेती । नाम देती धन्य होती ॥३॥

१०९२) बत्तीरूप प्रगटता । चित्त चैतन्यी स्थिरता ॥१। चित्त चैतन्य मिळणी । रामनामाची करणी ॥२॥ गोविंद म्हणे जे अखंड । जयामाजी नाही खंड ॥३॥

१०९३) शिवनाम घेता । होय शीतळ तत्त्वता ॥१॥ शिव कळला नाही कोणा । इंद्र ब्रह्मादिका जाणा ॥२॥ कळे म्हणे त्या न कळे । न कळे म्हणताचि आकळे ॥३॥ हृदयीच शिव आहे । दास गुरूकृपे पाहे ॥४॥

१०९४) नाम भेषज भेषज । भव नाशिते सहज ॥१॥ नाम अनळ अनळ । जाळी पातकांचे मूळ ॥२॥ नाम जीवन जीवन । ताप शमविते तीन ॥३॥ गोविंदासी नाम गोड । ज्ञानेश्वर पुरविती कोड ॥३॥

१०९५) नाम अमृत संजीवनी । चुकवी चौऱ्याऐंशीच्या खाणी ॥१॥ त्रिविधताप मुक्त जीव । सेविलीया होय शिव ॥२॥ भवरोग निवारण । करिती गुरूवैद्य जाण ॥३॥ ऐशी मात्रा बहुगुणी । दास म्हणे नामवाणी ॥४॥

१०९६) नेम व्रत एकादशी । आचरिता हृषीकेशी ॥१॥ वसे जवळी अंतरी । तो हा सर्व चराचरी ॥२॥ त्याच्या नामे उपासिता । दासा देवावरी सत्ता ॥३॥

१०९७) निर्गुण भोजन । संती साधियेले जाण ॥१॥ क्षुधा तृषा विरहीत । दाविती नवलाची मात ॥२॥ गोविंद म्हणे नाम अन्न । तेचि संतांचे कीर्तन ॥३॥

१०९८) नाही आणिक कारण । एक नामचि प्रमाण ॥१॥ तेचि जाणोनिया घेणे । कर्तव्य जीवाचे साधणे ॥२॥ गोविंद म्हणे साधू येई । ऐसे एकचि नाम नाही ॥३॥

१०९९) नामाचे ते बळ सकळा वरिष्ठ । टळताती अरिष्ट सकळही ॥१॥ एक शरीरबळ एक द्रव्यबळ । एक बुद्धीबळ आचरण ॥२॥ एक मनुष्यबळ एक तपोबळ । एक योगबळ सर्वसत्ता ॥३॥ सकळा माझारी हरिनाम इष्ट । संसारात तुष्ट दास म्हणे ॥४॥

११००) नाम वर्म हाती घ्यावे । तरी संता शरण जावे ॥१॥ संत दयेचे सागर । पैल नेती भवसागर ॥२॥ वर्म नाही हाता आले । तेणे सर्व गमावले ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामी देवाची प्रचीती ॥४॥

११०१) नामाची हातोटी जे नर साधिती । नाही यातायाती जन्म तया ॥१॥ काय त्या कोरड्या बोलोनिया गोष्टी । तया नाही भेटी देवासवे ॥२॥ नाम हाती आले मुखी उमटले । हातवटीचे भले लक्षण हे ॥३॥ गुरुचिये कृपे नाम हातवटी । साधावी हे गोष्टी दास म्हणे ॥४॥

११०२) नाम ज्याच्या हाती आले । त्याचे कल्याणचि झाले ॥१॥ नाम आगळे आगळे । कल्पतरूहोनी भले ॥२॥ जैसी इच्छा तैसे फळ । नाम शुभची केवळ ॥३॥ अनिष्टासी नाही थार । दास घेतो निरंतर ॥४॥

११०३) नामाची सवय । हाचि जीवा तरणोपाय ॥१॥ सवय लाविता लागेल। बोल रामनामे बोल ॥२॥ गोविंद म्हणे सदा घेई । रममाण त्यात होई ॥३॥

११०४) नामाचा प्रयत्न पाही । एकावीण दुजा नाही ॥१॥ संकल्प विकल्पात नाम । हेचि चाले सदा काम ॥२॥ गोविंद म्हणे प्रवृत्ति । नुरे तैशीच निवृत्ति ॥३॥

११०५) नाम सोहळा परिपूर्ण । जेथे नसेचि अपूर्ण ॥१॥ सोहळा गुरूकृपे पाही । सदा रंग भरूनी राही ॥२॥ गोविंद म्हणे अंतरी । दिसे तैसाचि बाहेरी ॥३॥

११०६) नाम विन्मुखता थट्टा । सर्व वाऊगाची चेष्टा ॥१॥ सर्व सांडोनिया पाही । रामनामी उगला राही ॥२॥ गोविंद म्हणे एक कृत्य । सर्वांपासोनि अलिप्त ॥३॥

११०७) नाम राम या दोहोत । नाम हेचि थोर सत्य ॥१॥ नाम सहज आकळे । देव प्रयत्ने नाकळे ॥२॥ देव करीना जे काही । नाम करीता हे पाही ॥३॥ नामामाजी देव आहे । दास म्हणे अनुभव पाहे ॥४॥

११०८) नामधन साठविता । मग देव येई हाता ॥१॥ येर धनाचिया कोटी । करवीना देव भेटी ॥२॥ येर धन कुबेराचे । नामधन ते स्वतःचे ॥३॥ येई सांगाते शेवटी । दास म्हणे बांधा गाठी ॥४॥

११०९) करू नको मगरूरी । धनशक्ती नव्हे खरी ॥१॥ देह जाईल जाईल । होऊ नको तू गाफील ॥२॥ संतचरणरज महिमा । जाणुनी वंदी नित्यनेमा ॥३॥ तरी होईल कल्याण । दास म्हणे नामगान ॥४॥

१११०) नामधन साठविले । साधुसंत थोर भले ॥१॥ काय त्याचे भाग्य वानू । देव देव त्या प्रसन्नू ॥२॥ नाम घेता अंतःकरणी । साठे संतांची करणी ॥३॥ ऐसे नाम साठविले । दास म्हणे देव झाले ॥४॥

१११११) नाम घेता मुक्ती हे ब्रह्मलिखित । मुक्ती ये शोधित तयालागी ॥१॥ नाम अविनाश ज्याच्या मुखी राही । अविनाश तोही होत असे ॥२॥ ऐसे थोर आहे नामाचे सामर्थ्य । इतर किमर्थ तयाहोनी ॥३॥ नाम तारक हा प्रचीतीचा डंका । धरू नको शंका दास म्हणे ॥४॥

१११२) ऐसा नाम अभिप्राव । त्याचा महिमा अपूर्व ॥१॥ नाम टाकिती जे जन । तया कैसे उद्धरण ॥२॥ एक नाम घेत नाही । तेणे काही केले नाही ॥३॥ ऐसा दिसे अभिप्राव । दास म्हणे नामी सर्व ॥४॥

१११३) नाम घेता काय होते । पाप अंतरीचे जाते ॥१॥ पाप केल्या काय होई । देव तया भेटी देई ॥१॥ देव भेटी झाल्यावरी चारी मुक्ती त्या कामारी ॥३॥ गोर्विंद म्हणे नाम सोपे । सदा घ्यावे अनुतापे ॥४॥

१११४) नाम घेता काय होते । जन्मांतरीचे दुःख जाते ॥१॥ सर्व सुकृताचे फळ । नाम फुकाचे केवळ ॥२॥ नाम उच्चारिता कंठी । आकळेल जगजेठी ॥३॥ नामे देव भेटी होई । दास म्हणे चिंता नाही॥४॥

१११५) नाम घेता होते कायी । याची मय सांगा सोयी ॥१॥ नामासमान आन नाही । नामे वाया जात नाही ॥२॥ नामे पाप होय दूरी । बुद्धी नामी दृढ करी ॥३॥ दास म्हणे नाम घेई । अशक्य त्या काही नाही ॥४॥

१११६) नाम घेणे तप होय । कष्ट करोनिया काय ॥१॥ जे का सुखाचे फुकाचे । काम नाही आणिकाचे ॥२॥ गोविंद म्हणे तरी । देव येईल त्याचे घरी ॥३॥

१११७) नाम खरे ज्ञान । तयावीण नाही आन ॥१॥ कळो येईल ते केव्हा । गुरूकृपा होईल तेव्हा ॥२॥ गोविंद म्हणे नुरे । एक ज्ञान नाम उरे ॥३॥

१११८) नर नारायण स्तुती । गाता प्रकाश ते चित्ती ॥१॥ त्याचा पाहता प्रकाश । होय मायेचा निरास ॥२॥ खरा दाता तोचि पाही । येर त्याचे अंशवाही ॥३॥ सदा नामगुण गाती । दास म्हणे हेचि स्तुती ॥४॥

१११९) नरदेही खरे काम । उच्चारावे गोड नाम ॥१॥ रामनामी बहू थोरी । दुःखियासी सुखी करी ॥२॥ येर खटकर्म केले । नाही उपयोगा आले ॥३॥ नरदेही सीता सती । दास म्हणे नामी रती ॥४॥

११२०) नको अतिशय काही । एकचित्ते नाम घेई ॥१॥ सदा तपतो तपन । कोण जाणे त्याचे गुण ॥२॥ देव असोनी जवळी । कोण तयाते न्याहाळी ॥३॥ रामनामी नाही अती । दासा रामनामी गती ॥४॥

११२१) दोन अक्षरांचे थोर हो सामर्थ्य । प्रगटे परमार्थ हृदयामाजी ॥१॥ एकांती बैसोनी अंतरी जपावे । तेणे हेलकावे निजवस्तु ॥२॥

दोन अक्षरे ती रामनाम जाणी । स्वये शूलपाणी जपतसे ॥३॥ ऐसे रामनाम सकळा थोर पाही । देव साह्य होई दास म्हणे ॥४॥

११२२) देहामाजी आहे नाम । मन जडता खरे काम ॥१॥ नाम तेचि आहे राम । राम तोचि आहे नाम ॥२॥ गोविंद म्हणे जडवीणे । दोनी एकरूप होणे ॥३॥

११२३) देवाजीचे नाम । हाच ज्याचा इतमाम ॥१॥ ब्रह्मादिका जो न मिळे । भक्ता सहजी आकळे ॥२॥ तयालागी काय उणे । देव साह्य कोटिगुणे ॥३॥ थोर सीतेचा इतमाम । दास म्हणे पती राम ॥४॥

११२४) सातत्याने नाम घेती । त्यांची बुद्धी तेचि सती ॥१॥ ऐसी जे का पतिव्रता । पाळी पतीचिये व्रता ॥२॥ गोविंद म्हणे पती राम । व्रत त्याचे रामनाम ॥३॥

११२५) देव आपुला तो लाभ । येर सर्वही अलाभ ॥१॥ नाम घेई वेळोवेळा। देव भेटे अवलीळा ॥२॥ येर लाभा विटे मने । दास म्हणे नामगुणे ॥३॥

११२६) लाभ आणि हानी याचे स्वरूप पाहता । लाभ एक हाता देव जरी ॥१॥ नाही तरी काय संपादोनी लाभ । हाता पद्मनाभ नये जरी ॥२॥ दास म्हणे लाभ मानी लाभ ज्यासी । नामे हृषीकेशी जप करी ॥३॥

११२७) दुराशा म्हणजे दूर आशा । देखू नेदी परमेशा ॥१॥ नाम न घेणे ते दूर । नाम घेणे जवळ साचार ॥२॥ गोविंद म्हणे नाम सार । त्यांत मिसळावे अंतर ॥३॥

११२८) लोक कर्म आचरिती । खरे कर्म नोळखिती ॥१॥ यथासांग

कर्म पाही । घडो येई मुक्त देही ॥२॥ गोविंद म्हणे नामी कळे । गुरूकृपेने आकळे ॥३॥

११२९) ऐसे कर्म आचरावे । देव भेटीजे स्वभावे ॥१॥ जेणे कर्माने बंधन । न तुटे ते कर्म कोण ॥२॥ कर्म नामचि सफळ । येर कर्म ते विफळ ॥३॥ वेदशास्त्राचे मथीत । रामनाम कर्म उक्त ॥४॥ कर्म ज्ञानी आचरित । कर्म टाकणे विपरीत ॥५॥ कर्म धर्म वर्म एक । दासा गुरूनाम देख ॥६॥

११३०) भाग्य मिळे वैराग्यात । तेचि साठविती संत ॥१॥ जे का असे अविनाश । रामनामी मिळे खास ॥२॥ गोविंद म्हणे सदा देही । रामनामी कळो येई ॥३॥

११३१) लक्ष्मी आहे रे चंचळ । न करी तळमळ । अंतरी ध्यायी तू दयाळ । राम सर्वकाळ ॥१॥ कमळाचे पानी जलबिंदू । लक्ष्मीचा संबंधू । ऐसा घेई रे बोधू । अंतरी अगाधू ॥२॥ लक्ष्मी येताना जाताना । मध्ये असताना । देईल दुःखची तुज जाणा । जाण रे सुजाणा ॥३॥ जाणा सौभाग्य लक्ष्मीचे । देणे भगवंताचे । दासे जाणोनिया साचे । पद धरीले देवाचे ॥४॥

११३२) पारमार्थिक भाग्य खूण । ऐका तयाचे लक्षण ॥१॥ ऐहिकाचे भाग्यी दुःख । पारमार्थिकी सदा सुख ॥२॥ रामनामी जे रंगले । त्यांचे भाग्य उदया आले ॥३॥ हृदयीचा परमेश्वर । प्रगट दासाचे समोर ॥४॥

११३३) भाग्यपुरुष जे का होती । ऐका आचरण रीती ॥१॥ सदा करी हेचि काम । मुखी देवाजीचे नाम ॥२॥ येर भाग्य अशाश्वत । नामभाग्य हे शाश्वत ॥३॥ दास म्हणे अवधारी । देव त्याचा सहाकारी॥४॥

११३४) येर बोलणे बोलोनी । दूर झाला चक्रपाणी ॥१॥ बोल वाऊगे बोलता । देव कैचा येई हाता ॥२॥ दुजे बोलणे सांडती । नाम बोलणे बोलती ॥३॥ नाम बोलणे हे मौन । दासा येर सर्व गौण ॥४॥

११३५) येर बोलण्याचे सुख । तया कैचा जगदीश ॥१॥ येर बोलणे संपेना । तया जगदीश आकळेना ॥२॥ म्हणोनिया हरि म्हणा । पार नाही तया पुण्या ॥३॥ दास म्हणे हा विवेक । धरोनिया बोल एक ॥४॥

११३६) सर्व बोलणे बोलोनी । कोणा मिळे चक्रपाणी ॥१॥ साक्षी हृदयी गोविंद । नाम आवडे त्या गोविंद ॥२॥ गोविंद नामाते भोजनी । उच्चारती साधुमुनी ॥३॥ दास म्हणे नाम थोर । ब्रह्मादिका न कळे पार ॥४॥

११३७) यज्ञादिक कर्मे साधणे दुस्तर । वर्म राहे दूर तयामाजी ॥१॥ तैसे नोहे काम देवाजीचे पाही । घडे सर्व काही सहज नामे ॥२॥ नाम भक्तालागी देव भेटी देई । संसारी सोडवी दास म्हणे ॥३॥

११३८) नाम जपे त्यासी कोटी यज्ञफळ । काय तो कोल्हाळ वाऊगाची ॥१॥ सांग यज्ञकर्म घडणे दुस्तर । जवळी रघुवीर कोण पाहे ॥२॥ मधुर नामाचा जप करी सत्य । दास म्हणे नित्य देव तेथे ॥३॥

११३९) मंत्र तंत्र विधी बहु अवघड । नाम सवघड सर्वाहोनी ॥१॥ नाम जपे त्यासी कोटी यज्ञफळ । वृथा कर्मफळ वाढविले ॥२॥ यज्ञपुरुषासी चुकले सकळ । यज्ञ विधानकळ कळली नाही ॥३॥ सर्व यज्ञामाजी जपयज्ञ श्रेष्ठ । बोलीला वरिष्ठ गिरीधारी ॥४॥ यज्ञपुरुषासी नाम समर्पण । यज्ञकर्म जाण दासा भले ॥५॥

११४०) ध्वनी श्रवणाचे जाते । असे फिरते बहू ते ॥१॥ ओव्या

गाऊया आनंदे । प्रेमभावे नाम सादे ।।२।। गोर्विंद म्हणे आवडत । देवा जात्यावरील गीत ।।३।।

११४१) खरे स्वसुखाचे स्थान । हृदयी नामी रममाण ।।१।। राम खरे सुखस्थान। जेथे नुरे दुःख खूण ।।२।। सुखाचीही सुखगोष्टी । तो हा राम असे पोटी ।।३।। ऐसे सुख नामी लाहे । दास म्हणे अनुभव पाहे ।।४।।

११४२) हरिनामी धरी प्रेमा । थोर नामाचा महिमा ।।१।। सर्व गोष्टीचे महिमान । नामापुढे दिसे गौण ।।२।। नामे सर्वकाही जोडे । मुख्य परमात्मा आतुडे ।।३।। दास म्हणे नामी आला । तोचि त्रैलोक्यात भला ।।४।।

११४३) सर्व थोराहून थोर । हरिनामी जे सादर ।।१।। मुखी हरिनाम गाती । तेचि थोर त्रिजगती ।।२।। गुरुराये थोर ख्याती । दासा कथिली प्रचीती ।।३।।

११४४) सर्व जीवासी आधार । एक देवचि साचार ।।१।। आत बाहेरी सत्तारूप। त्याची करणी अमूप ।।२।। गोविंद म्हणे सांगू किती । गुरूनामी हे प्रचीती।।३।।

११४५) गडबड मुखी काय घेसी नाम । जव न सरे काम संसाराचे ।।१।। कामाची आवडी टाकोनी बाहेरी । रामनाम धरी सदाशिव ।।२।। इतर जनांचा काय येथे पाड । धरावी ही चाड रामनामी ।।३।। आत गडबड बाह्य गडबड । कोण हे लिगाड दूर करी ।।४।। जाता गुरुपंथी होवोनी परमार्थी । दास म्हणे गुंती निखळेल ।।५।।

११४६) संत मागती मागणी । नाम घ्यावे निशिदिनी ।।१।। नाम घ्यावे उठाउठी । हेचि द्यावी आम्हा गोठी ।।२।। आन देऊ नका गोष्टी । नाम उच्चारावे कंठी ।।३।। दास म्हणे काय उणे । देव करी परिपूर्ण ।।४।।

११४७) जन्म सुविचार नाम । नाम हेचि ज्यात काम ॥१॥ नाम आणि पूर्णकाम । हाचि जेथीचा संगम ॥२॥ गोविंद म्हणे सम गमनी । हेचि जन्म खूण जाणी ॥३॥

११४८) जगी दुर्लभ ते काय । एक देवाजीचे पाय ॥१॥ साधुसंग नाम लाभ । नरा घडणे दुर्लभ ॥२॥ सदा नाम घेता पाही । पाय प्रगटती देही ॥३॥ दास म्हणे देवपाय । हेचि संतांचे वैभव ॥४॥

११४९) विश्रांतीची स्थिती । नामी जडता ये हाती ॥१॥ एकोणीसा पैल जाता । मग विसाव्याची कथा ॥२॥ गोविंद म्हणे रामनाम । हेचि विसाव्याचे काम ॥३॥

११५०) पूर्ण कळा नाम । नाही आणिकाचे काम ॥१॥ नाही नामांत अपूर्ण । सदा सर्वकाळ पूर्ण ॥२॥ गोविंद म्हणे गुरूकृपे । कळो येईल अपापे ॥३॥

११५१) ऐसे करी तू भजन । जेणे होये समाधान ॥१॥ एकाग्रते घेई नाम । तरी भेटो येई राम ॥२॥ ऐसे सुलभ साधन । उपयोगी आहे जाण ॥३॥ व्यर्थ आहे नामावीण । दासा नामाचे भजन ॥४॥

११५२) ऐसा सुलभ उपाय । भेटे देवदेव ॥१॥ जयामाजी कष्ट नाही । देव स्वये भेट देई ॥२॥ दुःखालागी करी सुख । विश्रांतीचा ठाव एक ॥३॥ एक नामचि उपाव । येर तयाविण वाव ॥४॥ दास म्हणे सांगो किती । नामे सुलभ प्रचीती ॥५॥

११५३) ऐक्य भावे जरी नाम सदा घोकी । नाम मग ये की स्वानंदाचे ॥१॥ ऐक्याचा तो भाव दाखवी प्रभाव । जीव होय शिव तयापुढे ॥२॥ आम नाही होता नाम येई हाता । दासासी तत्त्वता गुरुकृपे ॥३॥

११५४) एक वेळ नाम घेई । अनेकांचे काय नाही ॥१॥ एकवेळ नरदेह । नाम घेई निःसंदेह ॥२॥ वेळ श्वासोश्वासी देही । संत साधितातो पाही ॥३॥ एकवेळ नाम घेता । दासा सर्व फळ हाता ॥४॥

११५५) एक तत्त्व मनी धरी । आणिक कांही तू न करी ॥१॥ एक नामावीण पाही । सर्व व्यर्थ होय सर्व काही ॥२॥ एक तत्त्वी रमता सुख । हेचि तत्त्वमसि देख ॥३॥ दास म्हणे नामी रमले । गुरुकृपे मुक्त झाले ॥४॥

११५६) एक एक शिष्या सेवा अवघड । घेऊनी कवाड उघडिले ॥१॥ एक एक शिष्या सेवा सवघड । करूनि घबाड मिळविले ॥२॥ अंतरीची सेवा नामाचे घबाड । गुरूनामी चाड सहज दिली ॥३॥ नामघोषे चाड गुरुसेवा अंतरी । भेटेल श्रीहरी दास म्हणे ॥४॥

११५७) जीवा कल्याणाचा मार्ग । रामनाम एक चांग ॥१॥ वीट धरू नको त्याचा । अखंडित बोले वाचा ॥२॥ अन्य साधनी कल्याण । जीवा साधणे कठीण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामी देवाची प्रचीती ॥४॥

११५८) आपुले कल्याणाची गोष्टी । जेणे भेटी जगजेठी ॥१॥ सांडोनिया अभिमान । करी रघुवीर-चिंतन ॥२॥ कल्याणाचेही कल्याण। रामनामी जाणे खूण ॥३॥ ऐशा कल्याणेचि पाही । दास कल्याणरूप होई ॥४॥

११५९) आत्मवस्तु शोधुनि पाही । आत्म्यावीण सुख नाही ॥१॥ पाहे आत्म्याची चळवळ । तोचि ज्ञानिया केवळ ॥२॥ चळवळ नाम घोष । श्रवण करिता जाती दोष ॥३॥ तुझी तुजपाशी आहे । दासा गुरूकृपे लाहे ॥४॥

११६०) आपुले आपण आत्मसुख भोगी । बोलणी वाऊगी काय कामा ॥१॥ गुरुनामयोगे आत्मसुख गोडी । जीवा पैलथडी

प्राप्त होय ।।२।। येर सर्व सुखे असती नाशीवंत । आत्मसुख शाश्वत दास म्हणे ।।३।।

११६१) आपुले आपण आत्मसुख भोगी । बोलणी वाऊगी टाकोनिया ।।१।। बोलसील तरी बोल रामनाम । जे का सुखधाम सकळासी ।।२।। येर सर्व भोग असती बाहेरी । आत्मभोग हरि हृदयस्थ ।।३।। ब्रह्मरूप नाम उच्चारोनी वेगी । स्वात्मसुख भोगी दास हृदयी ।।४।।

११६२) आत असे तरी प्रगटे बाहेरी । नाम ते वैखरी केवी वदे ।।१।। आत नाम नाही मुखी कैसे येई । संता शरण जाई म्हणजे बरे ।।२।। संतकृपे नाम प्रगटे अंतरी । अखंड बाहेरी वाचा वदे ।।३।। दास म्हणे नामे पालटे स्वभाव । भेटे देवदेव गुरूकृपे ।।४।।

११६३) असती उपाय अनेक । देव भेटवी ना एक ।।१।। सांगा जेणे देव भेटी । भवबंधा होय तुटी ।।२।। सर्वामाजी अधिक सुलभ । देव भेटवी पद्मनाभ ।।३।। ऐसा एकचि उपाय । दासा नामी तरणोपाय ।।४।।

११६४) अलिप्त तो रामनामी । सापडेना कोणे कामी ।।१।। सदा चाले सहजनाम । नाही आणिकाचे काम ।।२।। गोविंद म्हणे बरवे करी । नाही आणिका प्रकारी ।।३।।

११६५) अभिरुची धरूनी राहे । मने देवरूप पाहे ।।१।। तरी मनीचा दोष जाणा । सरुनी भेटे देवराणा ।।२।। जडता विषयाची अभिरुची । मन केवी होय शुची ।।३।। नामी अभिरुची जडण्या पाही । दास म्हणे नाम घेई ।।४।।

११६६) अबोलाची मात । असे नरदेहा आत ।।१।। गुरुनाम रामनाम । ज्यात अबोलाचे काम ।।२।। गोविंद म्हणे रामनाम । करी साधका निष्काम ।।३।।

११६७) अनन्य होवोनि मुखी नाम गाता । योगक्षेम चिंता देव वाहे ॥१॥ ऐसे नरदेही नामाचे सामर्थ्य । दवडिसी व्यर्थ कासयासी ॥२॥ अन्य खटपट करू नको काही । दास म्हणे घेई उमगोनी ॥३॥

११६८) अन्न देणार देव देख । नाम अन्न हे विशेख ॥१॥ अन्न सेविता न चुके मर । नाम अन्न सेविता अमर ॥२॥ प्राण अन्ने योगक्षेम । चालवितो मेघश्याम ॥३॥ प्राणामाजी असे नाम । दासा नामान्न परम ॥४॥

११६९) अचूक साधन । एक गुरुनाम जाण ॥१॥ गुरुनामी सर्व आहे । मनी विचारोनी पाहे ॥२॥ गोविंद म्हणे ते अचूक । तयामाजी नाही चूक ॥३॥

११७०) अखंडात सर्व काही । अखंड शोधोनिया पाही ॥१॥ अखंड नाम देवाजीचे । काम नाही आणिकांचे ॥२॥ गोविंद म्हणे ते अखंड । ज्यात कदा नोहे खंड ॥३॥

११७१) कृपणाचे चित्त ठेव्यापाशी राही । तैसे नाम घेई परमार्थी ॥१॥ नाम कसे घ्यावे याची अंतरकळा । साधिता घननीळा भेटी होय ॥२॥ श्वासोश्वासालागी होई तू कृपण । रामनामावीण जावो नेदी ॥३॥ परमार्थी चित्त संसारी उदार । स्वये परमेश्वर दास म्हणे ॥४॥

११७२) कृपणाचे चित्त ठेव्यापाशी राही । तैसे नाम घेई गुरुकृपे ॥१॥ रामनामालागी होई तू कृपण । परमार्थी धन्य तरीच बापा ॥२॥ सर्व समर्पण उदार संसारी । रक्षी तया हरि दास म्हणे ॥३॥

११७३) कृतकृत्य रामनाम । नाही आणिकाचे काम ॥१॥ स्वयमेव जे केलेले। तेचि करणे जाण भले ॥२॥ गोविंद म्हणे नामकृत । येर सर्वही अकृत ॥३॥

११७४) काय अनित्य नको चित्ती । नित्यामाजी लाभ प्राप्ती ।।१।। नित्य नामाचे चिंतन । चित्ता लावणे ही खूण ।।२।। सर्व अवस्थे साचार । नित्यामाजी नाही फेर ।।३।। दास म्हणे नाम घेता । देव त्यासी साह्यकर्ता ।।४।।

११७५) कळ कळे निर्गुणात । सहजकृती असे ज्यात ।।१।। सहजकृती रामनाम । नाही आणिक दुजे काम ।।२।। गोविंद म्हणे निजदेही । पाहे शोधोनि हृदयी ।।३।।

११७६) तेचि जन्म सफलता । नामस्मरणी ठेवी चित्ता ।।१।। नामस्मरण अंतरी । सदा तैसेचि बाहेरी ।।२।। गोविंद म्हणे सांगो कायी । जन्मसफलता दुजी नाही ।।३।।

११७७) चांगलिया वाटे । असती विघ्नांचे सराटे ।।१।। दूर सारोनि तयासी । देव बोले जो उल्हासी ।।२।। आणि नाही दुजे काम । सदा जपे रामनाम ।।३।। त्याने मारिता हाकेसी । देव उभा तयापाशी ।।४।। देव करी त्याचे काम । दास म्हणे तो निष्काम ।।५।।

११७८) अहो ओळखिता काटा । जाई देवाचिये वाटा ।।१।। काटा मार्गामाजी विघ्न । जाणता हो निवारण ।।२।। काटा थोर अनिवार । पाहू जाता नाही सार ।।३।। गुरुनामे कळो येई । दास म्हणे अनुभव घेई ।।४।।

११७९) नामसिद्धी नाम सिद्धी । स्थिर करी हरिबुद्धी ।।१।। दुष्कृताचा नाश करी । सुकृताचा साठा करी ।।२।। येर सिद्धी करिती विघ्न । नामसिद्धी ती निर्विघ्न ।।३।। सर्व सिद्धी मोहकारी । नामसिद्धी मोह वारी ।।४।। सिद्धी करिता आसक्त । नामसिद्धी अनासक्त ।।५।। नामसिद्धी जो लाधला । गोविंद म्हणे तोचि भला ।।६।।

११८०) तेरा अक्षराचे थोर हो सामर्थ्य । प्रगटे समर्थ हृदयामाजी ॥१॥ श्रीराम जयराम जयजयराम । अक्षरे परम हृदयी घेई ॥२॥ ऐशा रामनामी रंगोनिया गेला । गोविंद म्हणे उणे नाही त्याला ॥३॥

११८१) सकळामाजी मोठे काय । कळता सफळता होय ॥१॥ आकाशात चराचर । नाम आकाशाहूनी थोर ॥२॥ नामामाजी ब्रह्म ईश । जैसा वटबीजी वृक्ष ॥३॥ दास म्हणे सकळा मोठे । रामनाम हे गोमटे ॥४॥

११८२) सकळामाजी गोड । आणि पुरवी जीवीचे कोड ॥१॥ ऐसे जगी नाम आहे । त्याची गोडी घेऊनी पाहे ॥२॥ श्वासोश्वासी घेऊनी नाम । काळ साधावा उत्तम ॥३॥ ऐसा काळ साधिता पाही । दास भाग्यवंत होई ॥४॥

११८३) अति सुलभ साधन । नाम देवाजीचे जाण ॥१॥ थोर नामाचे सामर्थ्य । तयापुढे सर्व व्यर्थ ॥२॥ परी सत्संगतीविना । नाम येई ना वदना ॥३॥ नाम जयानी साठविले । दास म्हणे अघटित केले ॥४॥

११८४) थोर नामाचे सामर्थ्य । खरा घडवी परमार्थ ॥१॥ परमार्थ तऱ्हा कोटी । नये उपेगा शेवटी ॥२॥ कशामाजी काही नाही । सर्व सार नाम पाही ॥३॥ दासे गुरुनाम घ्यावे । खरे परमार्थी व्हावे ॥४॥

११८५) नामी रूपाची धारणा । हेचि एक मौनखुणा ॥१॥ वाचा आणि मन । तया पैल हे तो मौन ॥२॥ अवाङ्मय सहजनाम । दासा मौन ते उत्तम ॥३॥

११८६) एकामाजी ज्यांचे चित्त । तेचि साधू एकचित्त ॥१॥ नाम एक देव एक । चित्त एक परिक्षक ॥२॥ दासा एक विषय होत । नामी नाम ऐक्य होत ॥३॥

११८७) नामनिष्ठे निष्ठावंत । होय देवाजीचा भक्त ॥१॥ नामी प्रेम उपजे निष्ठा । सर्वा मान्य तो वरिष्ठा ॥२॥ निष्ठा घडवी नामनेम । दासा मनी त्याचे प्रेम ॥३॥

११८८) जीवनात नामगती । अखील विश्वा जे प्रगती ॥१॥ ऊर्ध्वगामी गती नाम । अधोगामी ते अनाम ॥२॥ दासा नामी ब्रह्मस्थिती । वाचा नामी सदा चित्ती ॥३॥

११८९) नाम शाश्वत शाश्वत । येर सर्व अशाश्वत ॥१॥ सहज आणि स्वयंसिद्ध । नाम शाश्वत प्रसिद्ध ॥२॥ नामी पहाता पृथःकरण । दासा जीवन संपूर्ण ॥३॥

११९०) सारासार विचाराने । विचारांची आंदोलने ॥१॥ पृथकत्वाने सारासार । नाम दावी जे साचार ॥२॥ साराचेही पहाता सार । दास म्हणे नाम थोर ॥३॥

११९१) गुरूंचे जे गुरूनाम । बोलती त्या गुरूनाम ॥१॥ गुरू म्हणजे सर्वश्रेष्ठ । नसे ज्याहोनी वरिष्ठ ॥२॥ हृदयी प्राणासी आराम । दासा जेणे ते गुरूनाम ॥३॥

११९२) जवापाडे सुखस्थान । दुःख पर्वत दारुण ॥१॥ जीवनाचे प्रवाहात । जेथे स्थिर होय चित्त ॥२॥ तेथे सुख कोंदाटले । दासा नामी उमगले ॥३॥

११९३) गुरूनामी खरी सोय । नाही तरी गैरसोय ॥१॥ हेचि एक सोयीस्कर । जीवा तेणेचि उद्धार ॥२॥ दास वंदी देव पाय । काय आणिक उपाय ॥३॥

११९४) समजे तरी उमगेना । तर्क उठताती नाना ॥१॥ काय करावे ते ज्ञान । जेथे सरेना अज्ञान ॥२॥ नामावीण समाधान । नोहे उमजल्यावीण ॥३॥ नाम कृतीचा उमज । दासा दावी निज तेज ॥४॥

११९५) सदा चाले देही वाचा । तेचि सत्य सदा वाचा ॥१॥ सदा वाचे सदा नाम । नाही आणिकाचे काम ॥२॥ सदा वाचे नाम स्थिर । दासा मुखी तो गजर ॥३॥

११९६) नामामाजी रुप प्रगटे । ऐसे नाम सर्वा मोठे ॥१॥ नामी भेटतसे देव । येथे कायसा संदेह ॥२॥ दास म्हणे ऐसे नाम । नाही त्याहोनी उत्तम ॥३॥

११९७) हरिनाम सकळा तारी । पाषाणाची नाही परी ॥१॥ ऐसा झाला वरद वर । नल नीलासी साचार ॥२॥ गोविंद म्हणे सांगू किती । थोर त्यांची जाणा कृती ॥३॥

११९८) सद्गुरूकृपे धन्य होई । होईल सार्थक नाम गाई ॥१॥ नामज्ञाने वाया गेला । ऐसा कोण तू पाहिला ॥२॥ नाम गाई नाम गाई । नाम सतत तू गाई ॥३॥ श्रीज्ञानेश्वर कृपाप्रसादे । दास मुक्तचि होये ॥४॥



साधन

११९९) देही आचरणी पापात्मा पुण्यात्मा । नाम घे उत्तमा तरीच बरे ॥१॥ पापात्माही तरी होतसे पुण्यात्मा । ऐसा हा महिमा साधनाचा ॥२॥ दास म्हणे पाप अज्ञाने पसरे । गुरुज्ञाने नुरे सर्वदाही ॥३॥

१२००) यत्न कैसा तो करावा । जेणे भेटी हो राघवा ॥१॥ अज्ञानाची गाढ नीज । यत्न करीना सहज ॥२॥ देहामाजी कैचा यत्न । रामनाम हा प्रयत्न ॥३॥ सहज यत्न रामनाम । दासा करी पूर्णकाम ॥४॥

१२०१) थोडक्यात फार । काय साधन प्रकार ॥१॥ देही अखंडित सेवा । आवडते गुरूदेवा ॥२॥ यत्न कैसा तो करावा । त्याचा उमज तो घ्यावा ॥३॥ देही अखंडित नाम । दास म्हणे पूर्णकाम ॥४॥

१२०२) आधी कष्ट मग फळ । कष्ट नव्हे ते निर्फळ ॥१॥ कष्ट करिता नाम आले । नाम देवाचे चांगले ॥२॥ साधनी अनुकूल होणे । दास म्हणे कष्ट जाणे ॥३॥

१२०३) देव दिसेल नयनी । ऐसा प्रयत्न न करी कोणी ॥१॥ कोणी साधिलीया यत्न । त्यासी भेटे भगवान ॥२॥ साधुनिया तन मन । तेथे साधावे साधन ॥३॥ कोणी एकचि साधन । दास म्हणे नाम जाण ॥४॥

१२०४) नाना साधने साधिता । देवराय न ये हाता ॥१॥ सोपा

उपाय तो कोण । जेणे भेटे भगवान ॥२॥ नाम घेता उठाउठी । भेटी होय जगजेठी ॥३॥ सोपा उपाय हा पाही । दासा देव साह्य होई ॥४॥

१२०५) द्वैत बोलाची सांडणी । ऐक्य बोलाची मांडणी ॥१॥ करिता मना समाधान । भेटे राजीव नयन ॥२॥ द्वैत योगे वाढे द्वैत । एक नामेचि अद्वैत ॥३॥ दास म्हणे जेथे दोन । न घडे नामाचे साधन ॥४॥

१२०६) ऐका प्रारब्धाचा खेळ । सूत्र चालले प्रबळ ॥१॥ मनी बहु वागविले । जैसे सूत्री तैसे झाले ॥२॥ नाही काडीचा अधिकार । त्यात करावया फेर ॥३॥ नाम यत्न जया हाती । काय प्रारब्ध महती ॥४॥ ऐशा प्रयत्नेचि पाही । दास नामी स्थिर होई ॥५॥

१२०७) भक्ती प्रेमसूत्र ओळखावे तंत्र । ज्यात नाममंत्र घोष असे ॥१॥ मुखी नाम गाता देव येई हाता । मूकपण साधिता मुखी नाम ॥२॥ हरिमुखी हरिनामाचा उच्चार । साधन हे थोर आन नसे ॥३॥ ऐसा थोर आहे नामाचा महिमा । ज्यास नाही सीमा दास म्हणे ॥४॥

१२०८) मोक्ष व्हावा तरी मोक्ष इच्छा धरा । विषय हे सारा मनातुनी ॥१॥ जाण मोक्ष ठेवा नाही देवापाशी । आपण सायासी साध्य करी ॥२॥ मोक्ष मिळविणे नाही अवघड । बुद्धी करी धड रामनामी ॥३॥ रामनाम खरे मोक्षाचे साधन । नुरवी बंधन दास म्हणे ॥४॥

१२०९) मुख्य काम सदा चाले । ज्यात स्वये देव डोले ॥१॥ तेचि रामनाम अखंड । करी भवभय खंड ॥२॥ गोविंद म्हणे जे साधणे । साधनी कृतकृत्य होणे ॥३॥

१२१०) कामामध्ये मुख्य काम । सदा मुखी हरीनाम ॥१॥ नाम घेता वाया गेला । ऐसा नाही आयकिला ॥२॥ सात जन्मात सुकृत । घडता मुखी नाम येत ॥३॥ अखंड नामाचे स्मरण । दासा तेथ समाधान ॥४॥

१२११) हरिनाम साधनी देहाची जरूरी । देह नाही तरी साधन कैसे ॥१॥ देहाचे अंतरी रामनाम असे । साधनी या कसे तरीच बरे ॥२॥ दास म्हणे ऐसे साधन हे थोर । संतांचा विचार दुजा नसे ॥३॥

१२१२) रामनाम गमाविता । मग काय येईल हाता ॥१॥ रामनामा ऐसा यत्न। नाही आणिक प्रयत्न ॥२॥ प्रयत्न तो ऐसा व्हावा । नुरे बंधनाचा गोवा ॥३॥ दास म्हणे नाम बुंद । न गमावी होऊनी धुंद ॥४॥

१२१३) साधनीच्या सुखा । जेणे संपादिले देखा ॥१॥ तया येरी चाड नाही । विषयांच्या सुखी पाही ॥२॥ ज्याच्या अंती दुःख होई । अनुभव ऐसा पाही ॥३॥ भोगी साधनाचे सुख । देव तयासी सन्मुख ॥४॥ रक्षीतसे दिशा दाही । दास म्हणे नाम घेई ॥५॥

१२१४) कैसे करावे साधन । जेणे भेटे भगवान ॥१॥ नित्य आणि नियमाने । करी नामाचे स्मरण ॥२॥ मेरूदंड सरळ जाण । नासिकाग्री दृष्टी खूण ॥३॥ अर्जुनासी भगवान । ऐसे सांगती साधन ॥४॥ ऐसे साधिता साधन । दासा अंकित भगवान ॥५॥

१२१५) आत्मतीर्थ सकळा श्रेष्ठ । वेद बोलताती स्पष्ट ॥१॥ नाही नाही त्या समान । नुरवी पातकाची खूण ॥२॥ गोविंद म्हणे सांगो कायी । नाम साधनी कळो येई ॥३॥

१२१६) कैसा पवन साधावा । स्थिर करूनि नामी लावा ॥१॥ घेऊनि सोडणेचे आधी । स्थिर करूनि कुंभक साधी ॥२॥ जैसा जैसा वाढे काळ । पवन विजयाचे बळ ॥३॥ वाढे दासाचे अंतरी । पूर्ण होता साक्षात्कारी ॥४॥

१२१७) अकर्मात साधी कर्म । मीपण रहिताचे वर्म ॥१॥ अहंपण

ज्यात नुरे। तेचि कर्म ज्यात खरे ॥२॥ ऐशारिती कर्म होत । फळ देई अगणित ॥३॥ गुरुनामी हे साधेल । दासा अपूर्व नवल ॥

१२१८) आकाशापैल जाता खूण । कळो येई सत्य जाण ॥१॥ नाम साधनी साधुनी घेई । आकाशाचे पैल जाई ॥२॥ गोविंद म्हणे नाम । सकळा करी पूर्ण काम ॥३॥

१२१९) जातीचे ते खरे जाण । येर सर्व अप्रमाण ॥१॥ काय करील दुजीयाचे । दिले घेतले तरी काचे ॥२॥ अंतरीची जी आवडी । तीच साधन परवडी ॥३॥ जातीचे ते एक प्रमाण । दासा नामचि प्रमाण ॥४॥

१२२०) आकाश सकळा पदार्थी वर्तत । परी ते अलिप्त सर्वामाजी ॥१॥ जळात असोनी जळासी अलिप्त । कमळ वर्तत जळी जैसे ॥२॥ तैसे देवभक्त असती अलिप्त । जगात वर्तत जगरूढी ॥३॥ अलिप्त साधन देहा नसे लिप्त । नामस्मरण गुप्त देही चाले ॥४॥ अवघियाचे वर्म जाणोनिया घ्यावे । साधन बरवे दास म्हणे ॥५॥

१२२१) अहो साधनीच्या सुखा । अंतपार नाही देखा ॥१॥ जे का अखंडीत पाही । जयालागी खंड नाही ॥२॥ तयामाजी मने राही । अखंड ते समजुनी घेई ॥३॥ तरीच सुख हे कळेल । दासा देव आकळेल ॥४॥

१२२२) काय साधन साधावे । जेणे खरे सुख पावे ॥१॥ तगेना ती सोडी माया । नामे धरी रघुराया ॥२॥ अन्न परिमळे सुख । कैचे जीवा असता भूक ॥३॥ कायेमाजी खरे पाही । कशामध्ये काही नाही ॥४॥ काय साधन गुरुनाम । जेणे दास पूर्णकाम ॥५॥

१२२३) अहोरात्र कृती मन । सदा आवडी धरून ॥१॥ श्वास अहोरात्र

चाले। रामनाम त्यात बोले ।।२।। गोविंद म्हणे बोल । ज्यास बोलिजे अबोल ।।३।।

१२२४) अहो अभ्यास जो करी । तोचि तरे भवसागरी ।।१।। अभ्यास हा शांतपणे । नामरंगी हो रंगणे ।।२।। देहेंद्रिये तदाकार । ऐसे साधन तू कर ।।३।। ऐसा करिता अभ्यास । दासा देव भेटी खास ।।४।।

१२२५) ब्रह्मानंद पीक कशाने पिकेल । रामनाम बोल करी कष्ट ।।१।। देह मळ्यामाजी करीना कष्ट । तयालागी स्पष्ट नाश आहे ।।२।। बारा सोळा योगे करीना सेवा । रामरस जीवा केवी मिळे ।।३।। देहदुःखलागी सुख हे मानून । करावे साधन दास म्हणे ।।४।।

१२२६) बहुता यत्ने गुरुकृपा । बहुता यत्न देही सोपा ।।१।। बहुत बाह्य यत्न पाही । करिता गुरुकृपा नाही ।।२।। देही अंतरात मन । नामी ऐक्य हा प्रयत्न ।।३।। दासा नामचि प्रयत्न । जेणे भेटी भगवान ।।४।।

१२२७) नेमामाजी असे हित । नेम नित्य सत्य मित ।।१।। नेम म्हणजे साधन । नामाविण नाही आन ।।२।। गोविंद म्हणे जे अनियमित । न असेचि जया आत ।।३।।

१२२८) नाही कृतीचे साधन । कैशी साक्षात्कार खूण ।।१।। कात चुना एक होता । लाल रंगाची सत्यता ।।२।। काळे पांढरे मिळता । दिसे पारवे तत्त्वता ।।३।। मनोराज्याची कल्पना । केवी फलदायी जाणा ।।४।। दास म्हणे नामकृती । देही देवाची प्रचीती ।।५।।

१२२९) स्वस्वरूपी स्थिर होणे । स्वस्थ बैसणे बोलणे ।।१।। नामे स्वरूपी स्थिर झाला । देव भेटेल तयाला ।।२।। दास म्हणे सांगो किती । साधनाची पूर्ण स्थिती ।।३।।

१२३०) करी साधन अभ्यास । सांडेनिया अनभ्यास ।।१।। अभ्यास

ज्या नाही । तया प्राप्त नोहे काही ।।२।। अभ्यासाचा ज्या कंटाळा । तोचि पापाचा पुतळा ।।३।। अभ्यासाने पाही । दास म्हणे नाम घेई ।।४।।

१२३१) कैसा आळस निरास । जेणे केला सर्वनाश ।।१।। नरदेह वाया गेले । करणीचे कार्य ठेले ।।२।। केले काही नाही केले । जाणा आळशी ते झाले ।।३।। गुरुनामे आळस नाश । दासा भेटे जगदीश ।।४।।

१२३२) नाम अभ्यास हा थोर । भेटवी जसे ईश्वर ।।१।। अभ्यासाने सर्व काही । अशक्य होत असे नाही ।।२।। नाम वेळोवेळी घेणे । अभ्यास हा श्रेष्ठ जाणे ।।३।। ऐसा अभ्यास साधिती । दास म्हणे थोर होती ।।४।।

१२३३) राम राम म्हणता रामभेटी होये । वर्म बोलिले हे ग्रंथांतरी ।।१।। तरी सर्व जना का न भेटी होय । याचे वर्म काय सांगा मज ।।३।। नाही काळवेळ स्थळाचे बंधन । मुखी नारायण हरी गावा ।।३।। परी एक व्हावा इंद्रियासी नेम । वर्माचे हे वर्म दास म्हणे ।।४।।

१२३४) सकळ साधनाचे वर्म । मुखी रामाचे ते नाम ।।१।। शुद्ध करोनिया मन । अखंड साधणे साधन ।।२।। वर्म ज्याचे हाती आले । सर्व कार्य सिद्ध झाले ।।३।। म्हणोनिया राम म्हणा । दास सांगे भाविक जना ।।४।।

१२३५) राम हृदयी प्रगटे । सांगा साधन गोमटे ।।१।। राम रामात साठवी । राम प्रगटे हृदयी ।।२।। सकारात एक नाम । बोलिजे ज्या नाम राम ।।३।। दुजा हकारांत पाही । प्राण राम बोलती देही ।।४।। तिजा जाणे आत्माराम । गुरुकृपे खूण परम ।।५।। एक दोनीत ठेविता दासा नाम येई हाता ।।६।।

१२३६) रामनामी शांती हे थोर पदवी । मन हे जडवी रामनामी

॥१॥ थोर साधनाने ऐशी ही पदवी । जो कोणी मिळवी तोचि धन्य ॥२॥ सर्वही आघात सहन करीत । रामनाम गात आनंदाने ॥३॥ परम दुर्लभ शांती हेचि सुख । जेथे लेश दुःख नुरतसे ॥४॥ शांती तेथे देव हा तो अनुभव । शांती स्वयमेव देव धरी ॥५॥ राग हा अनर्थ बुडवी परमार्थ । तेथे कोण स्वार्थ दास म्हणे ॥६॥

१२३७) सहजात सर्व काही । नाम अंतरी दृढ होई ॥१॥ सहज नव्हे ते मुद्दाम । चाले आप आप काम ॥२॥ गोविंद म्हणे सहज नाम । प्रयत्नावीण जो प्रयत्न ॥३॥

१२३८) साधनाचा हर्ष । थोर तयाचा उत्कर्ष ॥१॥ साधन काय ओळखावे । मनी उमगोन घ्यावे ॥२॥ गोविंद म्हणे जे साधन । रामकृष्णहरी जाण ॥३॥

१२३९) घोष करी हरिनामाचा । तोचि मानव दैवाचा ॥१॥ वैष्णवजन करिती घोष । भगवंता होय हर्ष ॥२॥ साधनाचा हर्ष । दास म्हणे तो प्रकर्ष ॥३॥

१२४०) तृतीय भूमिका असंसर्ग जाणा । प्रथम साधना आयकावे ॥१॥ विषयाचे द्वाड असे रान आड । यातूनी पैलाड नीट जावे ॥२॥ अविषय परमात्मा करणे त्याचे ध्यान । चिंतन साधन दुसरे असे ॥३॥ निश्चयात्मिका वृत्ती तिसरे साधन । सुनिश्चय जाण ढळो नये ॥४॥ चवथे साधन भोगामाजी त्याग । आनंदाचा भोग विस्मयाचा ॥५॥ दृष्टी निर्मलता ज्ञानदृष्टी जाण । उमगणे खूण पाचवे हे ॥६॥ सोडोनी बोलणे बोलावे जे मौने । सहावे साधन उमगावे ॥७॥ पूर्ण शांती जडता असंसर्ग पूर्ण । सातवे साधन दास म्हणे ॥८॥

१२४१) द्वितीय भूमिका शुद्ध विचारणा । त्रिशुद्धी ते जाणा प्रगट होय

॥१॥ प्रथम साधन देहाची ती शुद्धी । शुद्धान्नेची साधी साधका रे ॥२॥ द्वितीय साधन वाणीशुद्धी जाण । नामउच्चारण योगे साधे ॥३॥ तिसरे साधन शुद्ध अंतःकरण । धर्म कर्म जाण ओळखावे ॥४॥ काम क्रोध घाट लंघणे बिकट । साधन सुभट पाचवे हे ॥५॥ ऐशा रीती मार्ग आक्रमिता पाही । गुरुपदी जाई दास म्हणे ॥६॥

१२४२) द्वितीय भूमिका विचारणा पाहे । मनी उमगावे सुविचारे ॥१॥ संतवचन अर्थ मानसी धारणा । तनुमाजी खुणा पाहो लागे ॥२॥ गुरूपदी राहे षष्ठम साधन । सप्तम साधन ज्ञान दासा ॥३॥

१२४३) पहिली शुभेच्छा प्रथम साधन । निर्लेप राहणे पापातुनी ॥१॥ पाप दूर करी पाप दूर करी । धरोनी अंतरी ज्ञान नाम ॥२॥ पाप म्हणजे काय समजोनी घ्यावे । बोलती स्वभावे पाप पाप ॥३॥ ज्ञानयोगे पाप नुरता अंतरी । मोक्षमार्ग धरी दास म्हणे ॥४॥

१२४४) पहिली शुभेच्छा द्वितीय साधन । पुण्यकर्मी जाण असो मन ॥१॥ सत्यकर्म साह्य पुण्य आचरण । भक्त जाणे खूण भाग्यवंत ॥२॥ चांगले ऐकावे चांगले बोलावे । चांगले करावे ओळखून ॥३॥ प्राण स्पंदनात नाम उच्चारण । पुण्यकर्म जाण दास म्हणे ॥४॥

१२४५) पाप म्हणजे काय ते मज सांगिजे । भ्रम दूर कीजे अंतरीचा ॥१॥ पाप अभिमान पाप अहंकार । संशय हा थोर पाप असे ॥२॥ साधनी आळस हेचि जाणा पाप । परपीडा देख पाप पाही ॥३॥ संसारात मन न निघे बाहेर । पाप द्वेषाचार जाण बापा ॥४॥ बोध घेवोनिया दासे पालटावे । पाप घालवावे नामपुण्ये ॥५॥

१२४६) साधी साधनाचे बळ । देव भेटे घननीळ ॥१॥ येर बळ काय कामा । काम करोनी रिकामा ॥२॥ चतुष्टये मुक्त होई । सदा मुखी नाम घेई ॥३॥ दास बळिवंत देख । काळ वाही त्याचा धाक ॥४॥

१२४७) दोनी डोळ्यांची मिळणी । होत असे जया स्थानी ॥१॥ तोचि डोळियाचा डोळा । जो का दावी घननीळा ॥२॥ शून्याचाही शेवट होत । दासा नामी लखलखीत ॥३॥

१२४८) तिनी अवस्थांचा साक्षी । सदा जागृत विशेखी ॥१॥ तेथे जागृत तो जागा । जागता तो तेचि जागा ॥२॥ दास तेथेचि जागला । नामे अंधार तो गेला ॥३॥

१२४९) साध्य ते साधन । तेथे काय दुःख शीण ॥१॥ साधन ते साध्य । तेचि आमुचे आराध्य ॥२॥ दास म्हणे नाम । संता संतोष परम ॥३॥



साधकासाठी

१२५०) मन आधीन येईल । तरी परमार्थ साधेल ॥१॥ जैसा जैसा साधे पवन । तो तो साक्षात्कार खूण ॥२॥ मन पवनाची गाठी । पडता शांती सौख्य पोटी ॥३॥ दास म्हणे नाम घेता । मन पवन ऐक्यता॥४॥

१२५१) व्हावा सर्वत्र विजय । युक्ती साधी मनोजय ॥१॥ जेणे मनास जिंकिले । तेणे सर्वास जिंकिले ॥२॥ मन चंचळ हे जाण । गुरुकृपे ये आधीन ॥३॥ मना अधीन जो झाला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥४॥ मन झाले हो अधीन । सर्व कार्यसिद्धी जाण ॥५॥ मन अधीन जै होई । दासा देव प्रगटे देही ॥६॥

१२५२) थोर मंगल भजन । जयामध्ये सर्व ज्ञान ॥१॥ मन गळोनि राहिले । मंगल त्या बोलियेले ॥२॥ मंगल भजन रामनाम । साधिलीया पूर्ण काम ॥३॥ राम बोलिजेती तीन । दास म्हणे घे उमगोन ॥४॥

१२५३) सदाचार वाट भली । कळते उमगता चाली ॥१॥ संतामाजी मने जाणे । सदाचाराचे वागणे ॥२॥ मायिकांत वर्ते मन । असदाचाराचे लक्षण ॥२॥ संत नामाचा उच्चार । दासा हाचि श्रेष्ठाचार ॥४॥

१२५४) व्हाया खरे समाधान । एकचित्त करी जाण ॥१॥ चित्त हातात आलिया । देव भेटे लवलाह्या ॥२॥ चित्त कैसे हाती येई । सदा नाम मुखी गाई ॥३॥ दास म्हणे विषय ध्यास । सुटता समाधान त्यास ॥४॥

१२५५) गुरुचरणी जडता चित्त । काय तयापुढे वित्त ॥१॥ येर सर्वही अभाग्य । गुरू देती ते सभाग्य ॥२॥ चित्त काय चरण काय । हे तो समजोनी पाहे ॥३॥ हे तो सर्व घडे नामी । दासा येर काय कामी ॥४॥

१२५६) परमार्थी एकचित्त । झाले पाहिजे उचित ॥१॥ एकचित्ताचे लक्षण । एकविध चित्त पूर्ण ॥२॥ एका ठायी चित्त जाता । एकचित्त येई हाता ॥३॥ एक नाम एक देव । दासा भेटे स्वयमेव ॥४॥

१२५७) चित्तशुद्धी हाती येता । प्राप्त होय निर्भयता ॥१॥ दैवी गुणाचे लक्षण । निर्भयता प्रथम खूण ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । शुद्धसत्त्वाची महती ॥३॥

१२५८) चित्त नामाचे चिंतने । देवपदी समर्पणे ॥१॥ सकळा थोर चित्तदान । दान देणे हे कठीण ॥२॥ चित्तदान कैसे द्यावे । चित्त चैतन्यी विरवावे ॥३॥ दास म्हणे ते विदेह । काही नुरविती संदेह ॥४॥

१२५९) चित्त चैतन्य एक होता । खरे समाधान हाता ॥१॥ चित्त चैतन्य अभेद । तयामाजी नाही भेद ॥२॥ गोविंद म्हणे एक धरी । करी नामाची चाकरी ॥३॥

१३६०) देवप्राप्तीसी कारण । चित्त एकाग्र ही खूण ॥१॥ देव स्वरूपा माझारी । चित्त होतसे एकाग्री ॥२॥ चित्त काढिता विषयातुनी । देवाकडे ओढ मनी ॥३॥ चित्ती जो का नाम धरी । देव दासाचा कैवारी ॥४॥

१२६१) साक्षीचा उपदेश । मनी घेईल तयास ॥१॥ काही नुरेल साकडे । सर्व दूर करी कोडे ॥२॥ गोविंद म्हणे बुद्धी करवी । जगा अनुभव दावी ॥३॥

१२६२) कोण्या अंगे ब्रह्म व्हावे । कोणा कळेना स्वभावे ॥१॥ ब्रह्म

जाणावे चैतन्य । चित्त त्याचा अंश खूण ॥२॥ चित्त चैतन्यी मिळता । ब्रह्मरूप स्वभावता ॥३॥ दास म्हणे जाणे अंग । गुरुनामावीण व्यंग ॥४॥

१२६३) तोचि जाहला मोकळा । झाला संकल्पा वेगळा ॥१॥ विकल्प जया पाशी नाही । मोकळा तो जगी पाही ॥२॥ दास मोकळा जो झाला । देव भेटतो तयाला ॥३॥

१२६४) मोकळा होवोनी घेता दर्शनासी । मग देव तुजसी भेटे स्वये॥१॥ तरीच विश्रांती पावसील बापा । चुकतील खेपा चौऱ्याऐंशीच्या॥२॥ व्यर्थ खटाटोप सोडावी उपाधी । खटपट साधी हरिनामी ॥३॥ नाम मुखी घेता होशील मोकळा । बोल वेळोवेळा दास म्हणे ॥४॥

१२६५) मोकळा होवोनी जाई देवापाशी । होईल तयासी भेटी मग॥१॥ आशेची पडशी बळकट खांद्यासी । ठेवावी बाजूसी काढूनिया ॥२॥ व्यर्थ खटपट सोडावी उपाधी । खटपट साधी हरिनामी ॥३॥ हरिनाम ध्वनी रंगलीया मन । मोकळा तो जाण दास म्हणे ॥४॥

१२६६) तोचि जाहला रिकामा । सांडी अंतरीच्या कामा ॥१॥ रिकामपणाचे लक्षण । वाया जावो नेदी क्षण ॥२॥ रामनामाचा उच्चार । रिकामपणाचा विचार ॥३॥ दास नामी अनुसरला । गुरुकृपे रिकामा झाला ॥४॥

१२६७) सत्त्वगुण प्रगटता । नाम मुखी ये अवचिता ॥१॥ देव भेटवी ऐशी थोरी । परी प्रगटेना अंतरी ॥२॥ करी सत्वान्न सेवन । सत्त्वगुण प्रगटे खूण ॥३॥ मी तो ज्ञानी ऐशा योगे । होये बंधन वाऊगे ॥४॥ दास म्हणे सत्त्वगुणी । त्यासी साह्य चक्रपाणी ॥५॥

१२६८) सात्विकाचे काम मुखी हरिनाम । बोलियेला नेम वेदशास्त्री ॥१॥ नको राजसादी नको तामसादी । भेदाची उपाधी तेथे वाढे ॥२॥ यज्ञयागादिकी अविधीचे भय । नाम हे निर्भय दास म्हणे ॥३॥

१२६९) सात्विकाचे तप मुखी हरिनाम । जेणे मेघश्याम भेटी होय॥१॥ काय तामसादी काय राजसादी । वाऊगी उपाधी नामेवीण ॥२॥ ऐशा तपयोगे जो कोणी तापला । तपी तोचि भला दास म्हणे ॥३॥

१२७०) हरिनाम सदाचार । साधिलीया रघुवीर ॥१॥ काळ कैसा घालवावा । याचा जीवा पडे गोवा ॥२॥ देही नामगत पाही । छंद गोविंदाचा राही ॥३॥ तेचि गत उमगता । दास म्हणे देव हाता ॥४॥

१२७१) हरिनामी धरी धीर । देव भेटेल तो थोर ॥१॥ काय देव आहे सोपा । करी रामनाम खेपा ॥२॥ संसाराची तळमळ नको । करी शांत मन ॥३॥ दास म्हणे धीर । तोचि जाणावा गंभीर ॥४॥

१२७२) चारी वाचे पैल नाम । नरदेही मुख्य काम ॥१॥ ऐसे साधन साधणे । चार काय ओळखणे ॥२॥ गोविंद म्हणे परेहून । परते घर त्याचे स्थान ॥३॥

१२७३) दशेंद्रिये एकमेळी । नामी हृदयकमळी ॥१॥ कमलमुखी नाम घेता । विषय नुरेचि सर्वथा ॥२॥ गोविंद म्हणे एकमेळ । सहजेचि सर्वकाळ ॥३॥

१२७४) मुखी म्हणसी राम राम । कैसा आहे मेघःशाम ॥१॥ याची घेई ओळखण । जाई गुरुसी शरण ॥२॥ नामामाजी रूप आहे । रूपामाजी नाम आहे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरूनामी हे प्रचीती ॥४॥

१२७५) सोस जडला नामाचा । तोचि मानव दैवाचा ॥१॥ सहा ओस तोचि सोस । नामेवीण नाही आस ॥२॥ गोविंद म्हणे विठ्ठल देही । भरूनि राहे सर्वाठायी ॥३॥

१२७६) हरिनाम मंजुळ गान । सर्व गाण्यात प्रधान ॥१॥ हेचि गाणे अखंडित । येर गायन खंडित ॥२॥ नामी सहा स्वर खूण । सर्व रागांचे ते स्थान ॥३॥ नामोच्चार हा सुस्वर । दास म्हणे ते मधुर ॥४॥

१२७७) बीज नाम बीज नाम । धरी अंतरी सप्रेम ॥१॥ पेरी सद्बुद्धी भूमीत । गुरुकृपा धारामृत ॥२॥ वाढे गगन भरून । नामवल्ली साक्ष खूण ॥३॥ स्वानंद सुखाचे फळ । दास म्हणे जे निर्मळ ॥४॥

१२७८) वायू मन एक होता । माला चाले अखंडता ॥१॥ नरदेही हे साधणे । साधुनी कृतकृत्य होणे ॥२॥ गोविंद म्हणे रामनामी । कळ जाणे अंतर्यामी ॥३॥

१२७९) सदा सर्वकाळ धरिता जपमाळ । येवोनि गोपाळ भेटी देई ॥१॥ धरितांती माळा प्रकार अनंत । माळ घेती संत मनाची ती ॥२॥ नाम मनी येता मनाचे सुमन । घेई ओळखोनी संतकृपे ॥३॥ ऐशी माळ घेता भेटतो श्रीहरी । आणिक प्रकारी शीण असे ॥४॥ श्रम शीण दासा उरलाचि नाही । दासालागी देही गुरूकृती ॥५॥

१२८०) रामकृष्ण माळ धरी का अढळ । जपता गोपाळ भेटे स्वये ॥१॥ ॐकाराचे सूत्र आत असे बरे । ओळखिता खरे समाधान ॥२॥ सर्व माळेमाजी माळ ही साजिरी । मनासी अंतरी ठेवीतसे ॥३॥ ऐसे नाम घेता दुर्लभ ते काय । सदा नाम जाय दास म्हणे ॥४॥

१२८१) पुण्य म्हणजे काय पाहे । अंतर प्रकाशत जाये ॥१॥ चाले प्राणाचे स्पंदन । त्यात जपे नाम खूण ॥२॥ ऐसे पुण्य हाती येता । देव वाहे दास चिंता ॥३॥

१२८२) न घडती ऐशी पुण्याची पर्वणी । साधावी सज्जनी सर्वकाळी ॥१॥ हिरे साठविणे ऐसाची प्रकार । तैसाची प्रकार पुण्यामाजी ॥२॥ प्राणस्पंदी रामनाम उच्चारण । न घडे ऐसे पुण्य ओळखावे ॥३॥ दास म्हणे ऐसा पुण्याचा मामला । साधील तयाला देव भेट ॥४॥

१२८३) प्राणाचे स्पंदन । चाले जोवरी जीवन ॥१॥ प्राण स्पंदनी अनुहत । नामी रमती साधुसंत ॥२॥ व्यवहारकळा पूर्ण । दासा हेचि कृपादान ॥३॥

१२८४) प्राण स्पंदनात राम । हनुमान सेवा परम ॥१॥ सेवा रामनामी कसे । हृदयी राम प्रगट दिसे ॥२॥ वायुपुत्र हनुमान । दास म्हणे देही प्राण ॥३॥

१२८५) मोह न धरी धनाचा । धन ठेवा हा मदाचा ॥१॥ धनयोगे सुख झाले । ऐसे नाही आयकिले ॥२॥ रामनाम हेचि धन । नेई मद उतरून ॥३॥ रामपदी होत लीन । दास म्हणे तोचि धन्य ॥४॥

१२८६) उमगणे तेचि पाही । जे का कृतीमाजी येई ॥१॥ कृतीमाजी काय येते । यात शोधोनी पहावे ते ॥२॥ गोविंद म्हणे अंतरकृती । ज्यात नामाची वसती ॥३॥

१२८७) परमार्थ अंतरखूण । साधिलीया भगवान ॥१॥ होय मनाचे उन्मन । ऐसे खुणेचे महिमान ॥२॥ गुरुचरणाच्या तळी । मीपणाचा द्यावा बळी ॥३॥ तरी खूण आकळेल । दास म्हणे नाम बोल ॥४॥

१२८८) मुळी गर्व कामा नये । बहु होताती अपाये ॥१॥ गर्व नावडे देवासी । गर्व नावडे संतासी ॥२॥ गर्व गंगेलागी होत । नामे होय गर्व हत ॥३॥ गर्व नसे दासापाशी । वर्म पुसे सद्गुरुपाशी ॥४॥

१२८९) उपदेश म्हणजे कायी । देव देशी मन येई ॥१॥ उपदेश नव्हे देता रूका । उपदेश नव्हे घेता फुका ॥२॥ अहंतेच्या त्यागे देही । सकारात नाम राही ॥३॥ गुरुमुखी उच्चारण । दासा उपदेश खूण ॥४॥

१२९०) बरे वाईट कारण । जाणे आपणा आपण ॥१॥ बरे शोधोनिया घेता । बरे होईल सर्वथा ॥२॥ सोहं सूत्र सोडोनिया । कोहं सूत्री रमे वाया ॥३॥ बरे देवाजीचे नाम । दासा भेटे मेघश्याम ॥४॥

१२९१) कायेमाजी आहे कोण । तोचि पहावा शोधून ॥१॥ तेथे जावोनिया पाही । नामध्वनी ऐकू येई ॥२॥ गोविंद म्हणे सहज । साधुनि घेई आत्मकाज ॥३॥

१२९२) काय करणे शोध काय करणे शोध । होय गुरुबोध तरीच कळे ॥१॥ बाह्य शोधू जाता सापडेना काही । अंतर्यामी राही खरा शोध ॥२॥ एकांती बैसावे नामेचि शोधावे । दासासी स्वभावे कळो येई ॥३॥

१२९३) कैसा यत्न करिता पाही । देवराज भेटी देई ॥१॥ त्याचे सांगावे लक्षण । जेणे होय समाधान ॥२॥ कसणेचा यत्न करी । श्वासोश्वासी नाम धरी ॥३॥ कसणे ओळखून घेई । दास साक्षात्कारी होई ॥४॥

१२९४) काय तप करी काय तप करी । भेटेना श्रीहरी काही केल्या ॥१॥ कायी तप करी कायी तप करी । भेटेल श्रीहरी येता जाता ॥२॥ शिष्य सद्गुरुसी तपस्थान पुसे । नाम जेथे वसे तेचि पाही ॥३॥ तपस्थानामाजी चित्त स्थिर करी । प्रकाशस्थान अंतरी राम असे ॥४॥ प्रेमे नाम घेता दुजे तप नाही। देव वश पाही दास म्हणे ॥५॥

१२९५) खरे तपाचे लक्षण । मनी दृढशांती जाण ॥१॥ येर तपाची

साधने । वृथा कष्टतम जाणे ॥२॥ खऱ्या तपे शांती येई । मग देव हाता येई ॥३॥ दृढशांती मुखी नाम । दास म्हणे नुरवी काम ॥४॥

१२९६) एक तप आचरिता इंद्रियासी । सामर्थ्य तयासी प्राप्त होय ॥१॥ केल्यावीण काही कार्य होत नाही । अनुभव काही ऐसा असे ॥२॥ मन आवरिता मनीचे ते कळे । वाचेचेनि बळे वाचासिद्धी ॥३॥ डोळ्याचेनि नेमे पाहे नेत्रसिद्धी । कर्णी कर्ण सिद्धी श्रवणनेमे ॥४॥ एक तप वाचे सहज घेता नाम । दासा भेट राम सहजेचि ॥५॥

१२९७) तपस्थानाचा महिमा । जेणे भेटी देवोत्तमा ॥१॥ तपस्थान ओळखावे । जेथे तपची स्वभावे ॥२॥ देही प्रकाशाचे स्थळ । तपस्थान ते केवळ ॥३॥ देव नाम स्वतःसिद्ध । तप बोलीजे अगाध ॥४॥ दास म्हणे हे प्रचीत । वैभव त्या अखंडित ॥५॥

१२९८) देव पाहण्याच्या खुणा । साधक हो तुम्ही जाणा ॥१॥ उघड डोळा तो न दिसे । सूक्ष्मदृष्टी पहावे कैसे ॥२॥ सावधान दृष्टी करी । देव दिसे देहांतरी ॥३॥ दास म्हणे नाम खूण । करी दृष्टी सावधान ॥४॥

१२९९) आशा सोडिता सुटेना । देव भेटता भेटेना ॥१॥ घेतो अहं टाकितो सः । साधनी आलटापालट पहा ॥२॥ सोहं सोहं वृत्ती होता । जाय गळोनी अहंता ॥३॥ अहंतेच्या त्यागी भक्त । आशेपासोनी निर्मुक्त ॥४॥ साधतसे नित्य नामी । दास म्हणे तोचि नामी ॥५॥

१३००) दृढभाव निकाभाव । शुद्धनिष्ठा प्रेमभाव ॥१॥ सोहंभाव सर्वभाव । सर्वाधिक भोळाभाव ॥२॥ भाव तेथे वसे देव । दासा नामी अनुभव ॥३॥

१३०१) हंससुख सकळा थोर । दुःख उरेना साचार ॥१॥ हंस कळो येता पाही । हंस सुख नामी येई ॥२॥ गोविंद म्हणे सोहं हंस । तेथे जडवी मानस ॥३॥

१३०२) जीव शिव पक्षी । परमात्मा त्यांचा साक्षी ॥१॥ हंस गतीने चालती । उमगावी त्यांची गती ॥२॥ गोविंद म्हणे आत्मा । एक जीव शिव समा ॥३॥

१३०३) देहामाजी जीवपक्षी । पाहे शिवस्वरूपासी ॥१॥ तरी येईल निजठाया । मीपण जावोनि विलया ॥२॥ शिवपक्षी हृदयी डोले । सोहं ऐसा शब्द बोले ॥३॥ नामे जीव शिवा भेटी । दासा भेटे जगजेठी ॥४॥

१३०४) जाणे परमहंस कळा । जी का अंतरी सकळा ॥१॥ बाणे सहजाचे वर्म । नुरे याति कुळ धर्म ॥२॥ अखंड नामी स्थिर झाला । दिनरात कैची त्याला ॥३॥ सहस्रदळी हंसरूपी । दास म्हणे तो स्वरूपी ॥४॥

१३०५) परमहंसाचे लक्षण । सोहं हंसी ज्याचे मन ॥१॥ सहज वर्म ओळखोनी । मना साधिली उन्मनी ॥२॥ गोविंद म्हणे याती कुळ । धर्म जाहले निर्मूळ ॥३॥

१३०६) प्रेम आत्म्याची ती गती । पाहे अंतर प्रचीती ॥१॥ प्रेम अंतरी हेलावे । रूप त्यामाजी सामावे ॥२॥ प्रेमकळा ओळखिता। अनायासे देव हाता ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामी पहावी प्रचीती ॥४॥

१३०७) पंथ विठ्ठलाचा । दावी विठ्ठल हृदयीचा ॥१॥ पंथ आहेत अनेक । दाविती ना विठ्ठल एक ॥२॥ गोविंद म्हणे नामे कळे । नाम विरहिता नाकळे ॥३॥

१३०८) सकळामाजी सुलभ पंथ । देवासंन्निध जो जात ॥१॥ तया पंथे जनी जावे । व्यर्थ कासया शिणावे ॥२॥ जेणे पंथे संत जाती । तया नुरे काळ भीती ॥३॥ दास म्हणे ते अभय । भक्ता करिती निर्भय ॥४॥

१३०९) मार्ग आक्रमण्या थोर । मूळ पाहिजे निर्धार ॥१॥ ऊर्ध्व आकाशा माझारी । ब्रह्मचक्री ब्रह्मगिरी ॥२॥ मनी नामाचा विचार । सत्य सत्य तो निर्धार ॥३॥ सूक्ष्म मार्गे शिखरी जाता । साक्षात्कार येई हाता ॥४॥ दासा गुरूप्रेमे पाही । निर्धार हा टिकूनी राही ॥५॥

१३१०) सर्वामूळ कायी आहे । हेचि शोधोनिया पाहे ॥१॥ काय चालते कशाने । जे का दिसेना कायेविणे ॥२॥ एकरंगी बहुरंग । तैसा जाणावा श्रीरंग ॥३॥ गुरूकृपे हे पाहणे । बिंदूरूप खूण बाणे ॥४॥ मूळ आधारी जे गेले । दास म्हणे सुखी झाले ॥५॥

१३११) सूक्ष्मदृष्टी पाही सूक्ष्मदृष्टी पाही । मग देव देही दिसे बापा ॥१॥ नाही तरी देह हाडा नि मासाचा । तेथे देव कैचा दिसो येई ॥२॥ गुरुकृपे होई दृष्टीचा देखणा । मग देवराणा प्रगटचि ॥३॥ जीव शिव ऐक्य प्रचीत पाहणे । सावधानपणे दास म्हणे ॥४॥

१३१२) परमात्मा बिंदुरूप । होई पाहोनि निष्पाप ॥१॥ सर्व बिंदूमाजी आहे। नामी उमगोन पाहे ॥२॥ गोविंद म्हणे कळेल । गुरुनामी आकळेल ॥३॥

१३१३) घडे मीपणाचा त्याग । गुरुपदी सदा योग ॥१॥ हेची गुरूप्रतिपदा । उणे काय त्या आनंदा ॥२॥ दास म्हणे तो आनंद । नामी नुरे मी तू भेद ॥३॥

१३१४) गुरूपदी मन । जडता होतसे उन्मन ॥१॥ उन्मनत्वी देवभेटी । होय पापा तापा तुटी ॥२॥ गोविंद म्हणे उन्मन । गुरुकृपेची ही खूण ॥३॥

१३१५) गुरुपदी जडवी मन । तोचि एक जगी धन्य ॥१॥ गुरुकृपेचे

अंजन । दृष्टी दावी भगवान ।।२।। गुरूसेवा गुरुमुख । उरो नेदी भवदुःख ।।३।। गुर्वानंद भाग्य पाही । आकळिता गलित देही ।।४।। उरे अबोलाची मात । गुरुछंदी सदा चित्त ।।५।। निंदक त्या सदा कामा । जो का सत्संगे रिकामा ।।६।। दास म्हणे अलिप्त भले । जन्म मरण साधीले ।।७।।

१३१६) गुरुपदी जडे छंद । देव भेटवी गोविंद ।।१।। छ न देणे हाचि छंद । जेणे उरेचिना भेद ।।२।। गोविंद म्हणे ते अभेद । जेथे नाही भेदाभेद ।।३।।

१३१७) जेणे भेटेल गोविंद । असा काही धरी छंद ।।१।। छंद असती बहुविध । परी सहा नव्हती मंद ।।२।। छंद एकविध धरी । अनायासे भेटे हरि ।।३।। ऐसे छंदाचे लक्षण । अप्राप्तही प्राप्त जाण ।।४।। दासा एक छंद उरे । गुरुनाम मनी स्मरे ।।५।।

१३१८) गुरुपदी लीन होता । अंतरमार्ग येई हाता ।।१।। अंतरमार्गीची ही खूण । ऊर्ध्व आकाशी गमन ।।२।। प्राणापान ऊर्ध्व वाहता । गिरीस्थान येई हाता ।।३।। गिरीमार्ग सूक्ष्म देही । गुरुनामे दासा सोई ।।४।।

१३१९) गुरु आज्ञा करिती जैशी । आचरणी ठेवी तैशी ।।१।। देव तयासी म्हणावे । नलगे तयासी शोधावे ।।२।। गोविंद म्हणे नाम एक । नामे गुरु शिष्य एक ।।३।।

१३२०) थोर सर्वा गुरूआज्ञा । कळो येई जाण प्राज्ञा ।।१।। आज्ञा प्रमाण ओळखावी । ओळखोनी उमगावी ।।२।। गोविंद म्हणे मनी घ्यावे । कळो येईल स्वभावे ।।३।।

१३२१) गुरू आज्ञा साचार । ज्यात सहा आणि चार ।।१।। सहा

जाणावी संपत्ती । साधन चतुष्टय स्थिती ॥२॥ गोविंद म्हणे गुरूनाम । तयावीण नसे काम ॥३॥

१३२२) गुरूआज्ञेचे आचरणी । देह सुखरूप जाणी ॥१॥ झाड सुखाचे वाढले । ब्रह्मांडासी सुखी केले ॥२॥ गोविंद म्हणे सर्वांतरी । नामे सुख चराचरी ॥३॥

१३२३) सांगा स्वामी गुरुकिल्ली । जाण्या ब्रह्माचे महाली ॥१॥ ऐसा प्रश्न शिष्य करी । गुरु सांगती अवधारी ॥२॥ गुरूकृपा युक्त व्हावे । गुरूकिल्ली हे स्वभावे ॥३॥ मग दासा नाम आत । बाहेरही खूण जात॥४॥

१३२४) गुरुकृपा गुरुकिल्ली । नेई ब्रह्माचे महाली ॥१॥ गुरुकृपा झाल्यावरी । ब्रह्मरूप सृष्टी सारी ॥२॥ पाहे ब्रह्मीचा सोहळा । देही आपुलिया डोळा ॥३॥ गुरुकिल्लीचीही किल्ली । दास म्हणे नाम बोली ॥४॥

१३२५) गुरुकृपेवीण । कैचा होई सावधान ॥१॥ गुरुकृपे साक्षात्कार । गुरुकृपे पैलपार ॥२॥ पडता कृपेचे अंजन । डोळा दिसे भगवान ॥३॥ 'कृ' करणे 'पा' पालन । नाही नामावीण जाण ॥४॥ दास म्हणे दासपण । देव आकळता जाण ॥५॥

१३२६) सद्गुरूंची कृपा । होता साक्षात्कार सोपा ॥१॥ देव आकळत नाही । अनायासे हाता येई ॥२॥ "कृ" करणे "पा" पालन । करिता कृपा होय जाण ॥३॥ करणे गुरुनाम पाही । दास म्हणे आन नाही॥४॥

१३२७) गुरुकृपे साक्षात्कार । देव देवाचा साचार ॥१॥ बहुता यत्ने पाही । गुरुकृपा साधुनी घेई ॥२॥ एक नाम घेता सहज । दासा दोहीपक्षी राज्य ॥३॥

१३२८) गुरुदेवकृपे माया निरसन । कृपेचे साधन नाम एक ॥१॥ माया निरसन जाहलियावरी । आनंद वोवरी स्थान पावे ॥२॥ दास म्हणे जेथे अखंड प्रकाश । तेथे जगदीश कृपा करी ॥३॥

१३२९) गुरुदेवयोगे हरि । स्मरता माया निर्विकारी ॥१॥ उपकारी हे देखणे । स्वरूप साक्षात्कार घेणे ॥२॥ रामरुपाचा अनुभव । दासा नामी स्वयमेव ॥३॥

१३३०) गुरुदेवकृपे माया नुरे देही । राम अंतर्बाही व्यापीतसे ॥१॥ म्हणोनी स्मरण सदा हरिपाय । आनंदाची सोय हरिनाम ॥२॥ दास म्हणे नाम आनंदाचे धाम । घेता मेघश्याम साक्षात्कार ॥३॥

१३३१) गुरुकृपे रामा पाहोनिया दृष्टी । साठविता पोटी खरे भाग्य ॥१॥ हंस ओळखिता राम दिसो येई । देहामाजी पाही शोधोनिया ॥२॥ गती ओळखिता हंस कळो येई । अघटित नवलाई पाखराची ॥३॥ गतीमाजी जाता मीपण नुरवी । नामचि उरवी दास म्हणे ॥४॥

१३३२) गुरुकृपेचे अंजन । गुरुकृपे देती जाण ॥१॥ अंजनाने देव भेटी । जन्म मरणाची तुटी ॥२॥ गोविंद म्हणे हे कळेल । गुरूकृपे आकळेल ॥३॥

१३३३) गुरुकृपे काय होते । तेचि ऐकावे निरुते ॥१॥ कृपांजने एक हरि । दिसे सबाह्य अंतरी ॥२॥ कृपांजन रामनाम । दास म्हणे पूर्णकाम ॥३॥

१३३४) जगामाजी देव हरि । गुरुकृपा प्रगट करी ॥१॥ सोय राम म्हणता पाही । राम कोणा कळला नाही ॥२॥ देहामाजी

देवखूण । गुरुकृपे घे ओळखण ॥३॥ गुरुनामी ही प्रचीती । दास म्हणे सांगो किती ॥४॥

१३३५) गुरुसेवा अवघड । साधिलीया सवघड ॥२॥ आम्हा नको अवघड । मिळो म्हणती सवघड ॥२॥ सवघड अंतर सेवा । केवी मिळो येई जीवा ॥३॥ दास म्हणे नाम घेता । नको अवघड चिंता ॥४॥

१३३६) गुरुकृपे रामसेवा । साधिलीया भेटी जीवा ॥१॥ अखंडात रामसेवा। राम रामात सेवावा ॥२॥ रामसेवा दास म्हणे । रामनाम खूण जाणे ॥३॥

१३३७) गुरुसेवा अखंडित । सर्व सेवा घडती ज्यात ॥१॥ जयामाजी नाही खंड । म्हणूनी बोलती अखंड ॥२॥ गोविंद म्हणे गुरुसेवा । बहु आवडते देवा ॥३॥

१३३८) गुरुसेवेचे सामर्थ्य । सर्व पुरवी मनोरथ ॥१॥ गुरुसेवा अखंडित । सर्व सेवा घडती ज्यात ॥२॥ तीन्ही देव लोटांगणी ॥ येती तयाचे चरणी ॥३॥ आत्मगतीमाजी जाई । दास म्हणे नाम घेई ॥४॥

१३३९) गुरुसेवेचे सामर्थ्य । कळे देवाजीची मात ॥१॥ गुरुसेवा देही जाण । कृपांजने भगवान ॥२॥ गुरुसेवा गुरुनाम । नाही आणिकाचे काम ॥३॥ दास म्हणे सांगो किती । गुरुसेवे देव प्राप्ती ॥४॥

१३४०) योगी वियोगाचे काम । तोचि वानप्रस्थाश्रम ॥१॥ वियोग काम रामनाम । साहोनिया विषय सम ॥२॥ पिंडस्थानातून पाही । ब्रह्मांडस्थानी वनी जाई ॥३॥ सदा तेथे नाम घोष । दासा भेटे जगदीश ॥४॥

१३४१) योगामाजी असे क्षेम । तोची एक योगक्षेम ॥१॥ संत बोलताती योग । जेथे नुरेचि वियोग ॥२॥ वियोगाचा जो वियोग । दासा तोची नामयोग ॥३॥

१३४२) 'धी' माजी नाही आन । हेचि ध्यानाचे लक्षण ॥१॥ विषयाकार बुद्धी राही । ध्यान लक्षण ते नाही ॥२॥ देवरूपी जडुनी जाता । बुद्धीलागी ध्यान हाता ॥३॥ तेचि ध्यान नुरवी मन । दासा नामी समाधान ॥४॥

१३४३) निरंजनी ध्यान लावुनीया राही । मग तुज नाही भवभय ॥१॥ निरंजन ध्याता सर्व फळ हाता । दंभ धर्म वार्ता काय काज ॥२॥ समजोनी घेई समजोनी घेई । समजोनी घेई निरंजन ॥३॥ निरंजनप्राप्ती निरंजनधामी । सद्गुरूंचे धामी दास म्हणे ॥४॥

१३४४) धारणात् इति धर्म । त्याचे ओळखावे वर्म ॥१॥ धर्म कर्म आचरणी । राहता स्वधर्माचरणी ॥२॥ कर्म अंतरी वळता । कळो येईल अवचिता ॥३॥ दासा नित्य धर्मखूण । निःसंदेह आचमन ॥४॥

१३४५) धारणात् इति धर्म । स्वधर्माचे हेचि वर्म ॥१॥ धर्म पांडवांनी केला । समजुनी घ्यावे या बोला ॥२॥ गोविंद म्हणे समजता । मग उमज येई हाता ॥३॥

१३४६) धर्म कर्म आचरण । सांग आचरिता धन्य ॥१॥ हे तो तयासी घडेना । देव तया आकळेना ॥२॥ धर्म राहिला अंतरी । कर्म करिती बाहेरी ॥३॥ धर्म कर्म यथासांग । दास म्हणे नामी चांग ॥४॥

१३४७) परिमित निद्रा घेता ओळखण । मितामाजी लीन मितनिद्रा॥१॥ ऐशी निद्रा घेता वियोग तुटेल । अज्ञान खुंटेल तरी योगी ॥२॥ अज्ञानाची

निद्रा घेती परिमित । तीस परिमित म्हणती ना ॥३॥ बाह्य साधनात उद्योगाची प्रीती । अंतरीची प्रचीती दास म्हणे ॥४॥

१३४८) मित ते बोलणे हेची परिमित । संतांचीही मात बोलण्याची॥१॥ सोहंहंस याचा करिता विचार । अंतरी उच्चार अखंडित ॥२॥ अखंड उच्चार नाम परिमित । येर अपरिमित बोलणे ते ॥३॥ योगीराज सदा बोलती परिमित । वियोगाची मात तेथे नाही ॥४॥ ब्रह्मसाधनात उद्योगाची प्रीती । अंतरी प्रचीती दास म्हणे ॥५॥

१३४९) संतांचे भोजन परिमित पूर्ण । मिताची ती खूण योगीजनी ॥१॥ वियोग जयांचा आटोनिया गेला । तोचि योगी भला निरंजनी ॥२॥ त्रास जेथे नाही तेचि परिमित । आयासरहित काम आहे ॥३॥ श्वासोश्वासामाजी नामाचे सेवन । परिमित भोजन दास म्हणे ॥४॥

१३५०) संतवचनाचा लाक्षणिक अर्थ । घेता पावे पंथ परमार्थाचा ॥१॥ लाक्षणिक अर्थ न कळता गूढ । व्यवहारीही मूढ होत असे ॥२॥ मूढाचिया संगे पदरी अज्ञान । भेटे भगवान संतसंगे ॥३॥ संतवचनाचा लाक्षणिक अर्थ । नाम घेता हित दास म्हणे ॥४॥

१३५१) संतांचे वचन काही का असेना । मनी घेता जाणा हित होय ॥१॥ संत हे दुर्लभ वचन हे दुर्लभ । संगही दुर्लभ त्यांचा असे ॥२॥ संतांचे वचनी ठेविता विश्वास । भेटवी जगदीश तयालागी ॥३॥ संतांचे वचन रामनाम खूण । होईल कल्याण दास म्हणे ॥४॥

१३५२) दोन्ही व्हावे अधिकारी । मग गुरुशिष्य थोरी ॥१॥ शिष्य नसे अधिकारी । गुरु तेथे काय करी ॥२॥ गुरु नसे अधिकारी । शिष्य तेथे काय करी ॥३॥ नाम प्रज्ञाच कारण । नामे गुरुशिष्यपण ॥४॥ काय लौकिकाचे काज । देवासाठी सोडी लाज ॥५॥ दास म्हणे अवघे जन । सांडुनी धरी देवचरण ॥६॥

१३५३) परमार्था अधिकारी । एक विश्वासी निर्धारी ।।१।। देह सुंदर सुभूषण । काय नसता चैतन्य ।।२।। गुरूवचन प्रमाण । विश्वासी तो एक जाण ।।३।। नाम परमार्थ लक्षण । दासा भेटवी भगवान ।।४।।

१३५४) परमार्था अधिकारी । एक विश्वासी निर्धारी ।।१।। हिरा शोधु इच्छिताहे । जन्मभरी खणताहे ।।२।। अढळ विश्वास हा भला । बिघडता वाया गेला ।।३।। दासा नाम सवघड । टिकविणे अवघड ।।४।।

१३५५) खरा पंडित तो भला । जाणे व्यवहार कळा ।।१।। व्यवहार देणे घेणे । शास्त्र विचार जाणणे ।।२।। जाणे देही हा विचार । सोहं सूत्र व्यवहार ।।३।। त्यात नाम कळा आहे । दासा गुरुकृपे लाहे ।।४।।

१३५६) जरी जाहला पंडित । नेणे देवाजीची मात ।।१।। येर ज्ञान मिथ्या बोली । न कळे त्यासी देव खोली ।।२।। सर्व शास्त्र पढिन्नला । नेणे व्यवहार कळा ।।३।। हरिनाम जपे नित्य । दास म्हणे तो पंडित ।।४।।

१३५७) काय व्यवहार कळा । नेणे शिकोनी सकळा ।।१।। काय म्हणावे पंडित । वृथा जयाचे पांडित्य ।।२।। व्यवहार कळावा । हेतू ज्ञानाचा उमगावा ।।३।। नाम हेचि ज्ञान सार । जाणे नामाचा व्यवहार ।।४।। ज्ञानीयांचा मकुटमणी । दास म्हणे तोचि जाणी ।।५।।

१३५८) ब्रह्मज्ञान दिशा समजोन घेई । व्यर्थ दिशा दाही भ्रमू नको ।।१।। एक दिशे जाता कळे ब्रह्मज्ञान । जेणे अभिमान नुरे देही ।।२।। एक दिशा काही घेई उमगोन । रामनामी मन आत्म्यामाजी ।।३।। अखंडित नामघोष तिची खूण । पहावी शोधून दास म्हणे ।।४।।

१३५९) बंधन विषयाचे । नुरता मोक्षपद साचे ।।१।। मोक्ष सर्वदा स्वतंत्र । ज्यात नसे परतंत्र ।।२।। गोविंद म्हणे अनुग्रह । मोक्ष असे तयासह ।।३।।

१३६०) बोलासरिसी करणी । न दिसेच त्रिभुवनी ॥१॥ उपदेश देती घेती । कोणी न पाहती प्रचीती ॥२॥ अहंभाव सोडोनिया । शुद्ध भाव धरोनिया ॥३॥ शरण जाता सद्गुरुपायी । नामे दासा सुख होई ॥४॥

१३६१) बोध अंतरी न ठसे । काय कारण त्या असे ॥१॥ दगड अंतरी कठीण । आत शिरेना जीवन ॥२॥ चित्त अशुद्ध जे होई । बोध प्रवेशेना पाही ॥३॥ नामे चित्त शुद्ध होता । दासा देव साह्यकर्ता ॥४॥

१३६२) बोध का मनी ठसेना । का हे मन पालटेना ॥१॥ चित्तशुद्धी जव नाही । बोध ठसेना कदाही ॥२॥ चित्तशुद्ध कैसे होई । नित्य कर्माआजी राही ॥३॥ नित्यकर्म रामनाम । दासा भेटी आत्माराम ॥४॥

१३६३) बोध मनी घेई बोध मनी घेई । चित्त शुद्ध नाही कैचा बोध ॥१॥ चित्तशुद्धीवीण बोध वाया गेला । म्हणोनिया आला दुःखभोग ॥२॥ बोधामाजी येता बोध हाता आला । नाही तरी गेला दुरी बोध ॥३॥ चित्तशुद्धी होता बोधाची प्रचीती । दास म्हणे प्रीती नाम घ्यावे ॥४॥

१३६४) बाहेरून आत जाता । मग देवाजीची वार्ता ॥१॥ बाह्य जगासी जाणावे । आत देहात शिरावे ॥२॥ चित्त चैतन्यी रिघता । संकर्षण येई हाता ॥३॥ देव चैतन्यरूप पाही । दासा नामे अनुभव येई ॥४॥

१३६५) बाहेर देव नाही । तो देव आत पाही ॥१॥ जया देवाचे दर्शने । सर्व तुटती बंधने ॥२॥ करिता दधीचे मंथन । नवनीत निघे जाण ॥३॥ तैसा देव हाती येई । दास म्हणे नामी पाही ॥४॥

१३६६) बाहेर देव नाही । तो देव आत पाही ॥१॥ देहात पंढरीत । देव भेटे भगवंत ॥२॥ नामे प्रवेशतो देही । गुरू दावितांती सोयी ॥३॥ दास म्हणे नाम घेता । देव त्याची वाहे चिंता ॥४॥

१३६७) आत्मदीप ज्योती पेटल्यावाचोन । देवाचे दर्शन कदा नोहे ॥१॥ संतकृपा होता आत्मदीप पेटे । भगवंत भेटे तयालागी ॥२॥ रामनामे संतकृपा साधकासी । होये अनायासी दास म्हणे ॥३॥

१३६८) शुद्धान्न सेविता शुद्धची विचार । शुद्धची आचार होत असे ॥१॥ विचार आचार शुद्ध होत जाता । देही नाम कथा कळो लागे ॥२॥ नामयोगे चित्त जडता चैतन्यी । नीलबिंदू झणी दिसो लागे ॥३॥ रूप आकळिता सर्व काही कळे । मन रामी मिळे दास म्हणे ॥४॥

१३६९) शुद्ध राखिता आचार । साह्य होय सर्वेश्वर ॥१॥ म्हणोनि सेवावे शुद्धान्न । दृढ साधाया साधन ॥२॥ शुद्ध नसावे विरुद्ध । आचरिता ते प्रसिद्ध ॥३॥ दळणात कांडणात । नाम गाता शुद्ध होत ॥४॥ नामे सर्व शुद्धाचार । दास म्हणे हो साचार ॥५॥

१३७०) ब्रह्मगिरीस्थानी जाता । देहभाव विलय हाता ॥१॥ ब्रह्मगिरी स्थान देही । पश्चिमपंथे तेथे जाई ॥२॥ गोविंद म्हणे ते कळेल । गुरुनामी आकळेल ॥३॥

१३७१) साक्षात्काराहोनी चमत्कार थोर । जगाचा प्रकार ऐसा असे ॥१॥ बहिर्मुख जग पाहे बाह्यदृष्टी । अंतरीची गोष्टी केवी कळे ॥२॥ चमत्कार तेथे झडे नमस्कार । हृदयी सर्वेश्वर कोण पुसे ॥३॥ दास म्हणे ऐसा जगदंड चालिला । नामी जो रिघाला तोचि धन्य ॥४॥

१३७२) सर्व संकल्पाचा न्यास । तोचि बोलिजे संन्यास ॥१॥ सर्व

संकल्प जाता पाही । नारायण नाम राही ॥२॥ गोविंद म्हणे ते निर्गुण । जेथे नुरे दुजेपण ॥३॥

१३७३) सर्व कल्पना टाकोनी । नाम घेता चक्रपाणी ॥१॥ मिळे कल्पना मिळणी । जैसे घुसळणे पाणी ॥२॥ घोर कल्पना सुसरी । ओढी भवाचे सागरी ॥३॥ नाम घेता उठाउठी । देव तारी जगजेठी ॥४॥ वसुदेव देवकीसी । दासा नामे ऋषिकेशी ॥५॥

१३७४) तरीच परमार्थाची गोष्टी । आत्मगृही जाता दृष्टी ॥१॥ आत्मगृह मनोहर । जेथे वसे सर्वेश्वर ॥२॥ जेथुनि नाही परतणे । अखंडित नाम पूर्ण ॥३॥ दास म्हणे गुरुनामे । आत्मगृही रामी रमे ॥३॥

१३७५) सुख दुःखी समाधान । हेचि देवाचे भजन ॥१॥ अवघी देवाचीच इच्छा । काय करणे तेथे पृच्छा ॥२॥ विवेकाने आनंदाने । परमेश नाम घेणे ॥३॥ ऐसे भजन साधिता । दासा काळावरी सत्ता॥४॥

१३७६) कोठे गेले प्रेम कोठे गेला नेम । तयावीण राम कैचा पावे ॥१॥ कोठे गेला बोध कोठे गेला शोध । कशात सावध झाला तुम्ही ॥२॥ दासा नुरे काम मनी जपे राम । मोक्षमार्ग सुगम जेणे योगे ॥३॥

१३७७) रामनामी होता गुंग । तया हृदयी श्रीरंग ॥१॥ प्रगटोनि दावी रूप । एकाग्रता बीज देख ॥२॥ संसारात गुंग मन । तैसा नामी हो उन्मन ॥३॥ कोणी नामी मिळता पाही । दासा राम सकळा ठायी ॥४॥

१३७८) हाती येता आत्मज्योती । मार्ग दिसे भगवंती ॥१॥ आत्मज्योती गवसेना । अज्ञान तम निरसेना ॥२॥ आत्मज्योतीच्या प्रकाशे । देहामाजी देव दिसे ॥३॥ गुरुनामे कळो येई । दास म्हणे समजुनी घेई ॥४॥

१३७९) सूत्र ज्याने ओळखिले । त्याचे बंधन तुटले ।।१।। मण्यामाजी जैसा दोरा । तैसा सूत्राचा पसारा ।।२।। हरिनामाचे हे सूत्र । सदा देही अखंडित ।।३।। विश्वपटी हेचि जाणे । पाही सूत्राचे दृष्टीने ।।४।। वस्त्रदृष्टी पाहो जाता । सूत्र लाभले तत्त्वता ।।५।। वस्त्र नामे ती अनेक । परी सूत्र रूप एक ।।६।। ऐसा सूत्राचा महिमा । दासे कथिला उत्तमा ।।७।।

१३८०) निर्गुणीचे खरे सुख । तीन गुणा पैल देख ।।१।। गुणातीत नाम उरे । निर्गुणीचे सुख खरे ।।२।। गोविंद म्हणे काही । नामाविण दुजे नाही ।।३।।

१३८१) लहान थोर सर्वजण । ज्ञानी भक्त एकपण ।।१।। धरून दुजेपण नुरवू । नामी एकरूप होऊ ।।२।। गोविंद म्हणे दुजेपणा । नुरता वानू नारायणा ।।३।।

१३८२) निर्गुणीच्या सुखा । अंत पार नाही देखा ।।१।। तीन गुणापैल पाही । निर्गुणाचे गुणी राही ।।२।। अखंड नाम त्याची खूण । त्यासी बोलीजे निर्गुण ।।३।। निर्गुणाचे संगी जाता । दासा निर्गुण सुख हाता।।४।।

१३८३) नामी राहोनी प्रपंच करणे । असंगाची खूण जाणे ।।१।। कमलपत्र पाण्या आत । परी पाण्यासी अलिप्त ।।२।। गोविंद म्हणे जाणी । ऐसी संतांची रहाणी ।।३।।

१३८४) नाम शर्करा सेवन । करी पिपीलिका आपण ।।१।। करिता कळे नामगोडी । म्हणुनी होतसे तातडी ।।२।। जेथे शर्करेचा वास । तेथे मुंगीचा प्रवेश ।।३।। मुखातील नुरे वाणी । दास विरे नामस्मरणी ।।३।।

१३८५) परंपरागत अर्थ । शब्दातून अनुभव देत ।।१।। अर्थ पोटी

साठवीत । त्याची जगी धन्य मात ॥२॥ शब्द आहे तो निराळा । अर्थ तयात वेगळा ॥३॥ नाम अर्थी तरणोपाय । दास म्हणे सत्य सोय ॥४॥

१३८६) समदर्शी जो झाला । पंडित तो एक भला ॥१॥ आत एक बाहेर एक । कैचा समदृष्टी देख ॥२॥ परी त्याचा अर्थ कोण । न पाहीच विलोकून ॥३॥ समदृष्टी जन रीती । सर्व आणिती एके पंक्ती ॥४॥ भेद जव नाही गेला । समदृष्टी कैशी त्याला ॥५॥ भेद असे हा संसार । अभेद हरिनाम सार ॥६॥ समदृष्टीचे लक्षण । देव बोलिला आपण ॥७॥ संसार ही विषमदृष्टी । हरिनाम समदृष्टी ॥८॥ समरूप आत्मा एक । दासा तयाचे कौतुक ॥९॥

१३८७) समदर्शी जो जाहला । तोचि पाहील देवाला ॥१॥ चर्मदृष्टी तो न दिसे । जवळीच सदा असे ॥२॥ समदृष्टी पाहू जाता । मग देव येई हाता ॥३॥ सुरवरा पूज्य झाला । दास म्हणे तोचि भला ॥४॥

१३८८) तुझा राम तुजपाशी । नाही सीता शोक त्यासी ॥१॥ काय पहासी महीवरी । तोचि हिंडे सर्वांतरी ॥२॥ ज्ञानदृष्टीने पाहता । देव भेटे अवचिता ॥३॥ सीतारामाचे भजन । करिता दासा होय ज्ञान ॥४॥

१३८९) तुझा देव तुझ्यापाशी । पाही आपुल्या घरासी ॥१॥ हृदय मंदिरात वास । सोहंभावे नटला ईश ॥२॥ का बा व्यर्थ भुलतोसी । बाह्याचारी श्रमतोसी ॥३॥ त्याचा ठाव धरुनी राही । दास म्हणे नामी पाही ॥४॥

१३९०) आहे आपणाचपाशी । काय बोल दुसऱ्याशी ॥१॥ चिंता देवाची करिता । देव भेटेल तत्त्वता ॥२॥ एक आपुला निर्धार । भेटवील सर्वेश्वर ॥३॥ गुरु भेटती समर्थ । निर्धाराचा हाच अर्थ ॥४॥ देव गुरु

जेथ येती । काय अन्याची महती ॥५॥ नाम देवाजीचे जाण । दासा निर्धाराची खूण ॥६॥

१३९१) शुद्ध सत्त्वगुणी निश्चयाचे काम । सहजाचे नाम तेथे पाही ॥१॥ ते नाम सहज चाले या निर्गुणी । गुणाची करणी नुरे जेथे ॥२॥ हरिगुणसंगे निर्गुणाचा संग । तयाचा श्रीरंग उणे नाही ॥३॥ दास म्हणे येथे निर्गुण गुणप्राप्ती । गुरुकृपे हाती येत असे ॥४॥

१३९२) खरे सुख रामनामामाजी आहे । संसारीचे पाहे सुखाभास ॥१॥ विचार करता कळोनिया येई । जे का असे पाही अंतर्यामी ॥२॥ सुखरूप आत्मा पाहता खरा सुखी । जो का अविनाशी स्वतःसिद्ध ॥३॥ दास म्हणे तया सुखामाजी गेला । तयाच्या हाकेला देव पावे ॥४॥

१३९३) खरे सुख रामपायी । न मिळे अन्यत्र उपायी ॥१॥ राम असे अविनाश । म्हणुनि सुखा नाही नाश ॥२॥ ऐसे सुख हाता येता । दास म्हणे कैची चिंता ॥३॥

१३९४) देव भक्ती करी काही मागायासी । निरिच्छ मनासी होता नये ॥१॥ निरिच्छ जो झाला तोचि जगी भला । बंधन तयाला नाही कोठे ॥२॥ निरिच्छ होण्याला नाम पारायणे । हरिगुणे दास म्हणे ॥३॥

१३९५) देव नामाचा भुकेला । आणि काही नको त्याला ॥१॥ जैशा जैशा स्वरे पाही । येईल तैसे नाम घेई ॥२॥ करिता नामाचे कीर्तन । देव तयासी प्रसन्न ॥३॥ नाम घेता उठाउठी । दासा भेटी जगजेठी ॥४॥

१३९६) साधकाचे हित सद्गुरू जाणत । साधक पाहिजे साधनात ॥१॥

मग सद्गुरु हे नित्य सान्निध्यात । अंतरदृष्टीने सांभाळीत ॥२॥ सद्गुरुमाऊली कुरवाळी कृपेने । दासाच्या वैभवा काय उणे ॥३॥

१३९७) गुर्वानंद पूर्णानंद । सहजनामी लागे छंद ॥१॥ सहजात मन येणे । हेचि आनंदाची खूण ॥२॥ गोविंद म्हणे तो आनंद । गुरुकृपे नुरे द्वंद्व ॥३॥

१३९८) अखंडित समाधान । तेथे भेटे भगवान ॥१॥ अखंडात प्रवेशता । समाधान येई हाता ॥२॥ देही असे जे अखंड । न मिळे शोधिता त्रिखंड ॥३॥ अखंड राम अखंड नाम । दासा करी पूर्णकाम ॥३॥

१३९९) एकटा जो झाला । तोच पाहील देवाला ॥१॥ गेले नाही जे मीपण । प्राप्त नोहे एकपण ॥२॥ गुरुनामे अहं नुरे । जीव शिवपण विरे ॥३॥ मीपण ते काही नाही । दास म्हणे उमज घेई ॥४॥

१४००) प्रपंच उपाधी । भक्तालागी नुरे कधी ॥१॥ कारण नाम अंतरात । तेचि बाह्य मुखी गात ॥२॥ गोविंद म्हणे सहजसमाधी । तेचि असे निरूपाधी ॥३॥

१४०१) गुणातीत परमेश्वरू । तयामाजी मने विरू ॥१॥ हेचि ध्यानाचे लक्षण । बोलियेले संतजन ॥२॥ तेथे जो जो स्थिरपणा । तया बोलिजे धारणा ॥३॥ बुद्धीमाजी ध्यान उरे । दास म्हणे ध्यान पुरे ॥४॥

१४०२) गुणातीत होता पाही । स्वरूप साक्षात्कार होई ॥१॥ त्रिगुणात जग वर्ते । मन तव न निवर्ते ॥२॥ मन निवर्तता पाही । अभेद नामी स्थिर होई ॥३॥ अभेद नामी मधुर गोडी । दासा करवी देव जोडी ॥४॥

१४०३) पुण्य आचरणी होतसे पुण्यात्मा । मग अंतरात्मा कळो

येई ।।१।। आत्मस्वरूपास पाहील जो प्राणी । तोच खरा ज्ञानी जगामाजी ।।२।। दास म्हणे हाती आहे नरदेह । तोवरी उपाव नाम घेई ।।३।।

१४०४) आत्मस्वरूप पडता दृष्टी । सुटती संसाराच्या गोष्टी ।।१।। पाहू जाता दिसत नाही । सावध होवोनिया पाही ।।२।। नामवेगी जडता मन । तोचि खरा सावधान ।।३।। दास म्हणे सांगो किती । याची पहावी प्रचीती ।।४।।

१४०५) सावध तो एक भला । हरिनामी जागे आला ।।१।। सावध नाम ऐके पाही । येर असावध देही ।।२।। पडता मायेची झापडी । दृष्टी नव्हे ती उघडी ।।३।। कैसे नामात जागावे । तेचि उमगोन घ्यावे ।।४।। निज निजा ओळखावे । दास म्हणे सावध व्हावे ।।५।।

१४०६) आत्मस्वरूपाची गोडी । नुरवी प्रपंच परवडी ।।१।। आत्मस्वरूप वर्णवेना । काय करावे वर्णना ।।२।। गोविंद म्हणे ते अलक्ष । जेथे उरेचिना लक्ष ।।३।।

१४०७) सावधान सावधान । सहा दहाचे अवन ।।१।। सहा षड्रिपु दहा इंद्रिये । नामी नुरता जये विजये ।।२।। गोविंद म्हणे तोचि भला । ओळखावा सावध झाला ।।३।।

१४०८) सावधान होऊनी वेगी । स्वरूपसुख उपभोगी ।।१।। तोचि जगामाजी भला । पाही देव स्वरूपाला ।।२।। नामे स्वरूप आकळे । गुरूकृपायोगे बळे ।।३।। दास म्हणे त्याचा हरि । भक्तजनांचा कैवारी।।४।।

१४०९) छालिक्याचे गान । मना करीतसे उन्मन ।।१।। मंजुळ ते मंजुळ ते। नामस्मरण चढते ।।२।। तार लागली अखंड । सर्व बुडाले पाखंड ।।३।। देही देवाचे गायन । गुरुकृपे ओळखण ।।४।। दास प्रेमे नाचे गाये । गाणियात मिळुनी जाये ।।५।।

१४१०) सहज समाधी । त्यात उरेना उपाधी ।।१।। सदा अनुसंधान

नामाचे । काम नाही आणिकांचे ॥२॥ गोविंद म्हणे सर्वश्रेष्ठ । वेद सांगताती स्पष्ट ॥३॥

१४११) देवा मनी आले । तेचि जगी खरे झाले ॥१॥ येर मानवाची आशा । व्यर्थ मनीची मनीषा ॥२॥ भक्त त्यासी शरण जाती । त्याचे नाम मुखी गाती ॥३॥ गुरुदेवा मनी येता । दासा भेटे देव स्वतः ॥४॥

१४१२) जेणे योगे सर्वज्ञान । त्याचे ज्ञान तेचि ज्ञान ॥१॥ संत बोलती त्या ज्ञानी । नकळे ज्या हे ते अज्ञानी ॥२॥ नामी उमजे आत्मपण । दासालागी ऐसे ज्ञान ॥३॥

१४१३) शेवट साधणे हे गोष्ट उत्तम । करील पूर्णकाम रामनाम ॥१॥ अनंत जन्माचा नरदेह शेवट । रामनामे स्पष्ट सुलभ होय ॥२॥ सदा रामनाम व्यासंग हा देखी । रामनाम शेखी मुखामाजी ॥३॥ दास म्हणे आहे थोडकीच कळा । साधे तो विरळा भाग्यवंत ॥४॥

१४१४) जागृती साधन । तेचि देवाचे पूजन ॥१॥ अभ्यंतरी ते बाहेरी । मूर्तीपूजा बरवी करी ॥२॥ सर्वाठायी आत्मप्रतिमा । दास पूजनी साधी नेमा ॥३॥

१४१५) मनोमय पूजा । आवडे ती केशीराजा ॥१॥ भक्तांची ही जाणुनी आर्ती । खरे करुनी देई शक्ती ॥२॥ संती दाविली प्रचित । दासा नामी होय मात ॥३॥

१४१६) धारणा ते ध्यान । जेथे मनाचे उन्मन ॥१॥ दृष्टीमाजी लंपट मन । तारक बिंदू उमटे पूर्ण ॥२॥ नामी जीवन समर्पण । दास होय ते पूजन ॥३॥

१४१७) सहजेचि सहजपूजा । बहु आवडे गरुडध्वजा ॥१॥ सकार हकार उमटती । जेथे तेचि सहजस्थिती ॥२॥ सोहंभावे नामोच्चार । दासा पूजा उपचार ॥३॥

देव

१४१८) कोण आधार जीवासी । कोण आधार पृथ्वीसी ।।१।। कोण आधार ब्रह्मांडासी । कोण आधार सकळासी ।।२।। बिंब जैसे प्रतिबिंबासी । मूळ आधार हरि सर्वांसी ।।३।। त्याचे नाम स्मरता बरे । दासा काही भय नुरे ।।४।।

१४१९) पृथ्वी धरी धराधर । देव तयासी आधार ।।१।। देव देवासी आधार । देव मनासी आधार ।।२।। देव प्राण्यासी आधार । सकळाधार जगदोद्धार ।।२।। देव साधका आधार । दास म्हणे नामी थोर ।।३।।

१४२०) देव पूर्णत्त्वे जाणता । भेद पावे अभेदता ।।१।। पडली मायेची झापडी । देव देव करिती वेडी ।।२।। देव अनेकत्त्व नाही । निराकारे एक पाही ।।३।। देव भरला सर्वाठायी । कळता दासांकित होई ।।४।।

१४२१) देव संतोषती जीवा । ऐशी काही करी सेवा ।।१।। अतिशय नको काही । मुखी रामनाम गाई ।।२।। अतिशय सर्वाठायी । नामी अतिशय नाही ।।३।। दास म्हणे गुरूसेवा । संत संतोषती जीवा ।।४।।

१४२२) जैसे द्यावे तैसे घ्यावे । हे तो न्याय्यचि स्वभावे ।।१।। देवा नाम दिले नाही । तरी देव भेटे कायी ।।२।। हा तो अनादीचा न्याय । करी साधन उपाय ।।३।। द्यावे ऐशी बुद्धी नाही । दास म्हणे त्यासी कायी ।।४।।

१४२३) एक चुळका जीवन । प्रेमभावे देता जाण ॥१॥ देव तयाचा अंकिला । देव भावाचा भुकेला ॥२॥ प्रेम असे जया ठायी । त्याच भावे देवा देई ॥३॥ प्रेम बोलता नये बोली । दास बोले नामबोली ॥४॥

१४२४) निर्मळभावे दे देवाला एक लोटाभर पाणी । भावा देव भुकेला जाणी ॥१॥ शुद्धमनाने अर्पण करिता घेईल देव करानी । एक मनाने दिधले नसता देऊनी काय ढिगानी ॥२॥ अज्ञान विस्मृती जाण मला ते देशील मज टाकोनी । शुद्ध नामी शुद्ध मनार्पणी दासा देव निदानी ॥३॥

१४२५) काय न करी सांगा देव । नवल तयाचे लाघव ॥१॥ जो का सकळाहुनी थोर । त्याची सत्ता अपरंपार ॥२॥ इंद्रादिक ते किंकर । त्याच्या सत्तेचे चाकर ॥३॥ जीव जन्माचा सांगाती । नामस्मरणी त्याची प्राप्ती ॥४॥ त्याचे मनी येता पाही । दासा अशक्य काही नाही ॥५॥

१४२६) थोर देवाची करणी । वर्णवेना सदा वाणी ॥१॥ जो जो पाहील मानव । काही उरेना संदेह ॥२॥ म्हणोनिया शरण जावे । आदराने नाम घ्यावे ॥३॥ मनी येता करी भक्त । राहे तयाचे अंकित ॥४॥ दास म्हणे सांगो किती । वेद पुराणे गर्जती ॥५॥

१४२७) विश्वासाचा देव आपुला करावा । भेटी देव देवा सहजेची ॥१॥ देवाचे वास्तव्य देवाचे शेजारी । अविश्वास अंतरी ठेवो नये ॥२॥ विज्ञान प्रकाशे विज्ञानाचा श्वास । गुरुनामी खास कळो येई ॥३॥ दास म्हणे वेद खूण उमगणे । वेदाचे बोलणे मौन असे ॥४॥

१४२८) आपुला विश्वास बैसेना कैसाही । देव कोणा पाही दूर ठेला ॥१॥ देव जडोनिया राहिला अंगासी । देवाच्या सत्तेसी पाहती ना

॥२॥ विश्वासे करिता नामसंकीर्तन । स्वये भगवान भेटी देई ॥३॥ विज्ञानाचा श्वास धरिता विश्वास । अज्ञान निरास दास म्हणे ॥४॥

१४२९) काया ही पंढरी । घ्यावी जाणोनी अंतरी ॥१॥ तया देव जवळी आहे । सर्वाठायी भरूनी राहे ॥२॥ गोविंद म्हणे नामकृती । देई आणोनी प्रचीती ॥३॥

१४३०) मोहनाचा मोहन तो बा पाही । स्वानंदे विटे उभा जो राही ॥१॥ लागला जयासी तया काय उणे । त्यांचे भाग्य दुणे वाढतसे ॥२॥ उडतसे तो बा तोबे उडवीती । तो बा विसरती मनी नाही ॥३॥ मनी नाही स्वप्नी कैसा जागरणी । जो नामस्मरणी ठाई पडे ॥४॥ पंढरी जावोनी चरण धरीता । तो बा अवचिता दासा लागे ॥५॥

१४३१) देव आहे कोणे ठायी । पाही शोधोनिया देही ॥१॥ देहामाजी कोणस्थान । तेथे असे चित्तपण ॥२॥ तया ठायामाजी जाई । गुरुनामे कळे सोई ॥३॥ सद्गुरूंची कृपा होता । दासा देव अवचिता ॥४॥

१४३२) काय देव आहे वनात बैसला । पाहता तयाला दिसेचिना ॥१॥ काय देव आहे जनात बैसला । पाहता तयाला दिसेचिना ॥२॥ काय देव आहे मनात बैसला । पाहता तयाला दिसेचिना ॥३॥ दास म्हणे देव भावात बैसला । शोधिता तयाला संन्निधची ॥४॥

१४३३) तो देव पहाया संतांचे सायास । करीता नवस तो न दिसे ॥१॥ सद्गुरुवाचोनी कैचा कळे देव । काय असे देव पाषाणात ॥२॥ पाषाण फुटला काय फुटे देव । काय असे देव धातूमूर्ती ॥३॥ धातू आटविता देव का आटला । मग ब्रह्मांडाला कोण पाळी ॥४॥ गुरूचीया कृपे कळो येई देव । प्रचीती अनुभव दास म्हणे ॥५॥

१४३४) देव शोधायाचे स्थान । आधी घेई ओळखून ॥१॥ देव असे चराचरी। परी सापडे अंतरी ॥२॥ दास म्हणे सांगो किती । देही देवाची प्रचीती ॥३॥

१४३५) देव असे प्रकाशित । त्यासी नाही उदय अस्त ॥१॥ कोणस्थानी त्यासी पाही । तयालागी कळो येई ॥२॥ गोविंद म्हणे कोण । दोन रेषा मिळती खूण ॥३॥

१४३६) देवाजीचे पाय पाहीन मी केव्हा । हीच आस मना लागलीसे ॥१॥ लागलीसे आशा परी न दिसती । काय करू कृती मज न कळे ॥२॥ न कळता कैसे भेटतील पाय । या लागी उपाय कैसा कळे ॥३॥ अक्षयीची ज्योती पेटली ज्या स्थानी । पाही हृदय भुवनी दास म्हणे ॥३॥

१४३७) देवा हाक मारिती पाही । त्याचा गाव समजत नाही ॥१॥ जेथे वास करिती संत । रामनाम मुद्रांकित ॥२॥ तया गावामाजी जाता । मग देव येई हाता ॥३॥ नामे हाक देता पाही । दासा देव भेटी देई ॥४॥

१४३८) देव देव जो दिसेना । तव संसार सुटेना ॥१॥ काय पाहसी बाहेरी । देव राहिला अंतरी ॥२॥ गुरुकृपे नाम घेई । देव दाखविती देही ॥३॥ दास म्हणे सांगो किती । थोर तयाची महती ॥४॥

१४३९) देव कोठे आहे राहतो कोणे ठायी । त्याची सत्ता घेई उमगोनी ॥१॥ देव कळे ऐसा सांगती उपाय । रामनाम सोय सर्वश्रेष्ठ ॥२॥ दास म्हणे गुरुकृपे नाम घेता । नुरे भववार्ता सर्वथाही ॥३॥

१४४०) देव भेटीचे ठिकाण । सांगा स्वामी त्याची खूण ॥१॥ देव देहाचे भीतरी । पाहे हृदयमंदिरी ॥२॥ नामे प्रवेशता ठायी । खूण

उमगोन येई ।।३।। ऐसे देवा आळविता । देव दासाते रक्षिता ।।४।।

१४४१) देव कोठे आहे पाहतो कोणे ठायी । करीतसे कायी सांगा मज ।।१।। जयाच्या चिंतने तरताती दोषी । जळताती राशी पातकांच्या ।।२।। ऐसा प्रश्न करी शिष्य सद्गुरूसी । कैसा ऋषीकेशी कळो येई ।।३।। गुरुकृपे नाम दासा कळो येई । तयाची नवलाई अघटित ।।४।।

१४४२) देव हृदयी साठविता । मग काय नये हाता ।।१।। सर्व काही साठविले । जेणे देवा साठविले ।।२।। साठविणे हे कठीण । साठ विरविणे खूण ।।३।। देव साठविती संत । दास म्हणे भाग्यवंत ।।४।।

१४४३) देवाची ते खूण पाही । देव जवळीच देही ।।१।। देव नाही आला गेला । सदा सर्वत्र संचला ।।२।। मदे तयाचा विसर । न्याय कंठ चापीकर ।।३।। हंसारूढ सर्वदाही । दास नामे कळो येई ।।४।।

१४४४) देव भेटीसी अधिकारी । एक विश्वासी निर्धारी ।।१।। विकल्प सोस संसाराचा । टाकूनी देई निश्चयाचा ।।२।। विश्वासाने नाम घेई । देव तयाचाची होई ।।३।। दास म्हणे सांगो किती । अशक्य जे तया हाती ।।४।।

१४४५) देव भेटणे नाही सुलभ । उपाय चालेना दुर्लभ ।।१।। संतकृपे सुलभ पाही । उपाय साधोनिया घेई ।।२।। ऐसा अनुभव आपुला । संतजनी सांगितला ।।३।। नाम सुलभ उपाय । दासा अशक्य उरवी काय ।।४।।

१४४६) देव कैसा प्रगट होई । याची आयकावी सोई ।।१।। कशामध्ये काही नाही । कसोनिया नाम घेई ।।२।। कसणे ते कायी पाही ।

नाम पुनःपुन्हा घेई ॥३॥ पुनःपुन्हा तेचि कायी । दास म्हणे त्यात राही ॥४॥

१४४७) देव पाहण्याची गोष्टी । अनुभवे कळे दृष्टी ॥१॥ उघड डोळा तो न दिसे । ज्ञानदृष्टी पहावे कैसे ॥२॥ सावधान दृष्टी करी । देव दिसे नेत्रांतरी ॥३॥ दास म्हणे नामखूण । दृष्टी करी सावधान ॥४॥

१४४८) देव देव आकळेना । देवादिका सर्व जना ॥१॥ बळे करोनिया पाही । देव हाता येत नाही ॥२॥ ब्रह्मादिका हाता नये । तो हा कीर्तनाचे सोये ॥३॥ दास म्हणे थोर युक्ती । नामे देव येई हाती ॥४॥

१४४९) कळलियावीण जाणा । देव कोणा तो कळेना ॥१॥ संतालागी पुसुनी पाही । देव कोणा कळो येई ॥२॥ विषयादी अभिमान । देव दाविती ना कोण ॥३॥ पश्चात्तापे नामे पाही । दासा देव कळो येई ॥४॥

१४५०) देव खरा खोटा म्हणवेना कोणा । देव खरा कोणा सापडला ॥१॥ आपणासारिखा बोलता चालता । सकळा साक्ष देता आपुलीच ॥२॥ ऐसे असोनिया का न नयनी दिसे । ते मज आपैसे सांग बापा ॥३॥ देवा उचलिता फिरविता ठेविता । काही न बोलता ऐसा कैसा ॥४॥ दिसेना तो नाही उपयोगी काही । सांग मनी पाही विचारोनी ॥५॥ खरा देव खऱ्या साधनी पहावा । देहीच शोधावा दास म्हणे ॥६॥

१४५१) इच्छा असोनिया मनी । देव भेटेना साजणी ॥१॥ काय तयाचे कारण । सांगा स्वामी मजलागून ॥२॥ सदा विषय सेवणे । निर्विषयी देव बाणे ॥३॥ मूळ स्वभाव जीवाचा । पालटता देव त्याचा ॥४॥ ऐका पालटाची खूण । जीवी नाम दास म्हणे ॥५॥

१४५२) देव कैसेनी भेटेल । जन्म मरण चुकेल ॥१॥ ऐसा कोणता

उपाय । सांगा स्वामी तरणोपाय ।।२।। संतसंगे नाम घेई । संतसमागमी राही ।।३।। दास म्हणे नको काही । संतसंग समजुनी घेई ।।४।।

१४५३) आपुले आपण स्वात्मसुख भोगी । उरे सेवेलागी नुरोनिया ।।१।। तरीच हा देव भेटे आपणासी । प्रपंचसुखासी सोडिलिया ।।२।। देवाचिये ऐसे देवाचिये मनी । आलीया कहाणी स्वसुखाची ।।३।। देवा मनी येता नवल करी देव । भक्तीचे लाघव दास म्हणे ।।४।।

१४५४) आणिकाचे नाही काम । देव भेटे मेघश्याम ।।१।। समर्पिता तन मन । देवपदी तो अनन्य ।।२।। अनन्य ते सत्य देही । दास म्हणे नाम पाही ।।३।।

१४५५) देव भेटे ऐसा सांगतो उपाय । बोले ज्ञानदेव मुक्ताईसी ।।१।। एका नामावीण व्यर्थ खटपट । वाऊगा बोभाट सर्व काही ।।२।। संता ऐसे नाम सुखे सेवी जरी । येईल श्रीहरि जाण घरी ।।३।। म्हणोनिया घ्यावे संतांचे ते नाम । संत पूर्णकाम जेणे गुणे ।।४।। सुखाचे फुकाचे सकळाचे सार । कलीत साचार दास म्हणे ।।५।।

१४५६) देव भेटे जोपर्यंत । श्रद्धा ठेवी तू निश्चिंत ।।१।। देव आला देव आला । अहंपणे दुरी ठेला ।।२।। देवपूजा तू करी ते । अहंपणे ते दुरी ते ।।३।। होते होते काय होते । दास म्हणे निष्फळ ते ।।४।।

१४५७) प्रेमभावे घेसी नाम । तरी मिळे मेघश्याम ।।१।। अन्य कर्मे केली काही । नोहे देव भेटी पाही ।।२।। अन्य कर्मे अवघड । रामनाम सवघड ।।३।। रामनाम आहे सोपे । दास म्हणे उगी जपे ।।४।।

१४५८) देव कळा ती आकळ । तेथे क्रमी काही वेळ ।।१।। देव कळा असे देही । तेथे मने स्थिर राही ।।२।। देव कळा ती कळेना । ब्रह्मादिका आकळेना ।।३।। देव कळेमाजी जाता । दास देवची तत्त्वता ।।४।।

१४५९) देव हाचि सूत्रधार । सर्व जगासी आधार ॥१॥ सर्व जगासी चाळता । सर्वाठायी त्याची सत्ता ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । थोर तयाची महती ॥३॥

१४६०) आधार तू देवा सकळा जीवांचा । रक्षिता सर्वांचा नारायण ॥१॥ आधारी आधार सहस्रदळावर । ॐकार निर्धार तूचि देवा ॥२॥ पृथ्वीवरी राहे तूचि चराचर । तियेसी आधार शेषमाथा ॥३॥ शेषातळीवरी तूचि रमावर । दासासी आधार कूर्मदृष्टी ॥४॥

१४६१) जेथे पाहू तेथे देवाच्या प्रतिमा । खरा देव आम्हा केवी भेटे ॥१॥ खरा देव भेटे देहात देऊळी । रामनाम मेळी आत जावे ॥२॥ आत गेल्यावरी भेटेल अंतरी । जो का सर्वांतरी व्यापोनिया ॥३॥ आधी तो कळस मग पाया जाणी । खूण त्या संतांनी सांगितली ॥४॥ दास म्हणे हे तो गुरूकृपे घडे । चमत्कार गाढे दाविताती ॥५॥

१४६२) देऊळी जाऊनी देवासी पाहणे । या नाव दर्शन बोलताती ॥१॥ जयाचे दर्शने चित्त सुखी जडे । मानामान उडे अंतरीचा ॥२॥ दर्शन स्पर्शन ईक्षण भाषण । दर्शनाची खूण संतामाजी ॥३॥ दास म्हणे नामे पूर्ण समाधान । ते खरे दर्शन देवाजीचे ॥४॥

१४६३) भक्तांचा रक्षिता । एक देव जगत्पिता ॥१॥ तया पदी शरण जावे । त्याचे मुखी नाम घ्यावे ॥२॥ राहे जडोनी अंतरी । माय बाप चराचरी ॥३॥ दास म्हणे नाम घेता । दासा नुरे भय चिंता ॥४॥

१४६४) प्राणीमात्रा अन्नदाता । एक देवची तत्त्वता ॥१॥ पोशी सर्व जगतासी । काय अव्हेरी भक्तासी ॥२॥ सदा त्याचे नाम गायी । मीपण हे व्यर्थ पाही ॥३॥ थोर तयाचे सामर्थ्य । दास म्हणे अंकित होय ॥४॥

१४६५) प्रेम देवाचे निष्काम । तोचि एक सर्वोत्तम ।।१।। प्रेमसूत्र योगे हरि । भव त्यागे हृदयी धरी ।।२।। भक्तोत्तमाचे लक्षण । ऊर्ध्वगती नाम गान ।।३।। दास म्हणे भक्त ज्ञानी । देव त्याचा अभिमानी ।।४।।

१४६६) प्रेमे हरिभक्ती करी । तोचि धन्य या संसारी ।।१।। भक्ती उमगोनी घेणे । नामावीण भक्ती नेणे ।।२।। नामावीण भक्ती आहे । म्हणती ते व्यर्थ पाहे ।।३।। करिती संसार अनंत । परी धन्य साधुसंत ।।४।। दास म्हणे मनी धरी । त्यासी रक्षितो श्रीहरी ।।५।।

१४६७) देव भक्तांचा कैवारी । देव होय सहाकारी ।।१।। परी नामी फिरे मन । तरी साधेल ही खूण ।।२।। भक्ता घरी हीन काम । देव करी सप्रेम ।।३।। सोडी संसार फुगडी । दास म्हणे देव गडी ।।४।।

१४६८) धरी पावनाचा देव । जेणे नुरे भवभय ।।१।। देव पावन पावन । देवा करी तो पावन ।।२।। जगी पावन हे संत । दाविती पावनाचा पंथ ।।३।। देव पावन हृदयी । पावता प्रवेश त्या ठायी ।।४।। नाम पावन पावन । दास म्हणे घे जाणून ।।५।।

१४६९) अपावना देव करितो पावन । तो देव पावन मनी धरी ।।१।। अपावना संगे होई अपावन । तो देव पावन कैसे करी ।।२।। देव विटाळेल म्हणती केवळ । वर्मावीण खेळ चाललासे ।।३।। आकाशासी लेप अग्नीसी विटाळ । बोलणे हे फोल दास म्हणे ।।४।।

१४७०) अपावना संगे होई अपावन । त्या कैसे पावन म्हणो येई ।।१।। पावनाचा देव अखंड पावन । त्याची ओळखण जीवशिवी ।।२।। नाम अखंडित सर्वदा पावन । त्याचेनी पावन देवा भेटी ।।३।। पावनाचा संग पावनचि करी । गोविंद म्हणे जरी संतसंग ।।४।।

१४७१) देव सत्ता कोण जाणे । अगाध तयाचे करणे ॥१॥ सत्ता जाणती साधुसंत । त्यासी भेटे भगवंत ॥२॥ सत्तारूपे वर्ते जनी । ओळखी तो धन्य प्राणी ॥३॥ नामसत्ता कळो येई । दास म्हणे नाम गाई ॥४॥

१४७२) देवाचियेकृपे लाधेल सद्‌गती । सद्‌गतीची स्थिती अवधारा ॥१॥ सद्‌गतीकारणे शोधिताती ग्रंथ । देवाचा तो प्रांत सापडेना ॥२॥ सद्‌गतीकारणे हिंडताती तीर्थे । तो देव समर्थ आढळेना ॥३॥ सद्‌गतीकारणे कष्टविती काया । परी देवराया भेटतीना ॥४॥ नाम मुखी गाता सहज सद्‌गती । व्यर्थ आन गती दास म्हणे ॥५॥

१४७३) मुक्यासी वाचा देतो कोण । मग तो बोले हरिगुणगान ॥१॥ बहिऱ्यालागी देतो कान । मग तो ऐके हरिगुणगान ॥२॥ पांगुळ चढवी ब्रह्मगिरी । ऐशी हरिची नवल परी ॥३॥ अंधा डोळस देव करी । मग तो डोळा रूप धरी ॥४॥ मना उन्मनी दाविता । दासा तोचि नाचविता॥५॥

१४७४) नवल तुझे शेषशायी । काय सांगू नवलाई ॥१॥ म्हणसी मायेचे नाटक । परी त्यात तूच एक ॥२॥ नाटकी तू बहु बरा । ऐसे आलेसे विचारा ॥३॥ नाव मायेचे सांगसी । तूच सर्व करविसी ॥४॥ तुझ्या मनीचा विचार । तूज जाणसी साचार ॥५॥ काही असो देवा । मज भेटे गा केशवा ॥६॥ दास विनविती चरणी । अकळ तुझी ही करणी ॥६॥

१४७५) दोनीमाजी जीवा । होय अंतर विसावा ॥१॥ दोन अक्षरे सत्य काय । मनी विचारोनी पाहे ॥२॥ शतकोटी रामायणी । दोन घेतली शिवानी ॥३॥ दास म्हणे नित्य पाहे । जपेल तो न करी काये॥४॥

१४७६) देवालयामाजी देव हा लपाला । वर्म जाणे त्याला सुलभची ।।१।। देवाते पूजिता देऊळ उरेना । खाली कळस जाणा वर पाया ।।२।। देवालयी देव पाहता स्वयमेव । होवोनी सावेव भेट देई ।।३।। गुरुनामी जडता देऊळी प्रवेश । जेथे भेटे ईश दास म्हणे ।।४।।

१४७७) देवाचिया द्वारी । प्रवेशाची कोण परी ।।१।। काय साधनाने देव । भेटी होय स्वयमेव ।।२।। गुरु वेद बंध पाळी । रामनामी मन वळी ।।३।। करू नको संग्रहासी । दास म्हणे देव त्यासी ।।४।।

१४७८) अरूपाचे रूप पहाणे अधिक । बरवा तो एक पांडुरंग ।।१।। जे रूप पाहता पाहणे सरेना । मन हे उरेना देहभाव ।।२।। देवाचिया द्वारी जावोनिया पाहे । पाहे तया आहे जवळीच ।।३।। ते रूप पाहण्या धरी नाम कास । पुरवील आस दास म्हणे ।।४।।

१४७९) देव सकळा विसावा । एकोणीसा पैल गावा ।।१।। देही विसाव्याचे स्थान । धरी देवाचे चरण ।।२।। नको हिंडू दिशा दाही । विसाव्यात सुखी होई ।।३।। दास म्हणे जवळी आहे । गुरुनामे शोधुनी पाहे ।।४।।

१४८०) देवाजीची कृपा मज निरोपावी । कैशी ओळखावी स्वानुभवी ।।१।। भाग्य ज्याच्या वाटे आलेसे अपार । देवकृपा थोर बोलताती ।।२।। स्वरूप सद्गुणी जाया जोडी वर । देवकृपा थोर बोलताती।।३।। कन्या आणि पुत्र सद्गुणी चतुर । देवकृपा थोर बोलताती ।।४।। भगिनी बंधुजन अनुकूल साचार । देवकृपा थोर बोलताती ।।५।। काया अनुपम निरोगी सुंदर । देवकृपा थोर बोलताती ।।६।। अवचित सुखाचे मरण येईल जर । देवकृपा थोर बोलताती ।।७।। उत्तम वक्तृत्व विद्वान चतुर । देवकृपा थोर बोलताती ।।८।। परी नवल देवकृपा ही जाणावी । वाचे सदा घेई रामनाम ।।९।। दया क्षमा शांती सदा सर्वदाही । देवकृपा पाही हेचि असे ।।१०।। अखंड रामनामी समाधी जो सेवी ।

देवकृपा बरवी थोर असे ॥११॥ संतसमागमी अखंडित राही । देवकृपा बरवी थोर असे ॥१२॥ कीर्तनरंगणी चित्त जो नाचवी । देवकृपा बरवी थोर असे ॥१३॥ मन बुद्धी ज्याची आत्मअनुभवी । देवकृपा बरवी थोर असे ॥१४॥ स्थूल सूक्ष्म भेद शास्त्रातील काही । वर्णियेले पाही दास म्हणे ॥१५॥

१४८१) देही देवालयी देव हा लपाला । नामे शोधी त्याला सन्निधचि ॥१॥ देवा ते पहाता देवचि उरेना । देवालागी जाणा ओळखावे ॥२॥ दास म्हणे देही शोधिती ना कोणी । नामाची करणी जेथ चाले ॥३॥

१४८२) सर्व कार्यकर्ता देव । थोर तयाचा प्रभाव ॥१॥ देव सर्व काही करी । देव तारी देव मारी ॥२॥ तयालागी शरण जाता । त्याचे मुखी नाम घेता ॥३॥ दास म्हणे गिरीधारी । भक्ता रक्षितो निर्धारी॥४॥

१४८३) सर्व देवाहोनी थोर कोण आहे । देव भरलाहे सर्व देही ॥१॥ सर्वाहुनी थोर देव देवेश्वर । सद्गुरू साचार दावितातो ॥२॥ जयाचे आधारे होय अविनाशी । जीव हा विनाशी असोनिया ॥३॥ जयावीण होय सर्वही असार । तोचि देव थोर दास म्हणे ॥४॥

१४८४) देव राहे जो अंतरी । त्याची कृपा हृदयांतरी ॥१॥ कृतीचे पालन । देवकृपेचे लक्षण ॥२॥ कृती नाम स्वयमेव । दासा दावी नवलाव ॥३॥

१४८५) जेथ कृष्णार्जुन जोडी । सत्ता विजयाची रोकडी ॥१॥ सदा सर्वदा श्रीकृष्ण । परी पाहिजे अर्जुन ॥२॥ नामी राहता अर्जवून । दासा विजय दे भगवान ॥३॥

१४८६) जो का देवांचाही देव । तोचि थोर देव देव ॥१॥ जो का वायूचा प्रकाश । जीवनाचा जो उल्हास ॥२॥ नामी होतसे प्रगट । सुख दासा ते निघोट ॥३॥

अनुभव

१४८७) सर्व करोनिया संपले करणे । अनुभव खूण हाता नये ।।१।। सर्व पाहोनिया संपले पाहणे । अनुभव खूण हाता नये ।।२।। सर्व बोलोनिया संपले बोलणे । अनुभव खूण हाता नये ।।३।। सर्व फिरोनिया संपले फिरणे । अनुभव खूण हाता नये ।।४।। सर्व संपाता येई ।।५।।

१४८८) नित्यामाजी जाता नेम । नेमनिष्ठा आत्माराम ।।१।। नेम अनित्यात जाता । जन्म दुःख येई हाता ।।२।। बोलणे सांडोनी । दासा नाम अंतःकरणी ।।३।।

१४८९) नामी नेम धरा नामी नेम धरा । होईल आसरा देवाजीचा ।।१।। नित्याचा नियम नित्याचा नियम । धरा नित्यनेम हरिनामी ।।२।। नाम हेचि व्रत नाम हेचि व्रत । यावीण सुपंथ नाही दुजा ।।३।। सकळ नियम सर्व तीर्थव्रती । काय आले चित्ती सांगा मज ।।४।। नामी नेम येता देवाची प्रचीती । दास म्हणे चित्ती तोचि धरा ।।५।।

१४९०) नित्य नेम नाही ठावा । काय बोलणे उद्धवा ।।१।। वेदशास्त्रांचा आचार । सर्व प्रकार विचार ।।२।। नित्य नामी धरी नेम । तोचि एक भक्तोत्तम ।।३।। ऐसे गोविंद बोलिला । दासा बोध दाखविला ।।४।।

१४९१) नित्य नाम घेता होय पूर्णकाम । वरिष्ठ हा नेम सर्वाहुनी॥१॥ म्हणोनिया जनी नेम हा धरावा । आणिकांचा गोवा दुःखमूळ ॥२॥ सकळा जीवासी सुलभ हा बरा । पाही चमत्कारा दास म्हणे ॥३॥

१४९२) नित्यामाजी नेम धरोनिया राही । जेणे शेषशायी भेटे स्वये॥१॥ नित्यामाजी नेम नामघोष करा । पोचेल ईश्वरा लागोनिया ॥२॥ अनित्याचा नेम करोनिया कायी । जेणे शेषशायी भेटी नोहे ॥३॥ सर्व काही घडे आमुच्या नेमात । तप तीर्थ व्रत दास म्हणे ॥४॥

१४९३) सोस जडला नामाचा । ओस झाली काया वाचा ॥१॥ लागे स्वरूपाचे ध्यान । मन जाहले उन्मन ॥२॥ मीपण निमाले । रूप अंतरी भरले ॥३॥ मायातीत माये आत । गोविंद म्हणे कैची मात ॥४॥

१४९४) सुख काय होता पाही । काय पण नुरे देही ॥१॥ काय आत्मा एकरूप । आत्मा काय तेच रूप ॥२॥ गोविंद म्हणे स्वयमेव । याचा घ्यावा अनुभव ॥३॥

१४९५) अंतर रंग रहातो जेथे । अंतरंग स्थान तेथे ॥१॥ अंतर नुरवी अंतर । रंगे रंगवी साचार ॥२॥ गोविंद म्हणे अंतरंग । काही नुरेचि वरपंग ॥३॥

१४९६) आत प्रवेशता मन । ऐशी अनुभवाची खूण ॥१॥ जेथे दिवस ना राती । अखंडित स्वयंज्योती ॥२॥ तेथे आनंदी आनंद । राम भेटे परमानंद ॥३॥ प्राण स्पंदनात राम । दास म्हणे नाही काम ॥४॥

१४९७) उन्मनीची ज्योत पेटल्यावाचून । देवाचे दर्शन केवी होय ॥१॥ ज्योतीचा प्रकाश भरला अंतरी । मग दिसे हरि सर्वाठायी ॥२॥ गुरुनाम मुखे प्रगटेल ज्योत । भेटे भगवंत दास म्हणे ॥३॥

१४९८) उन्मनीची ज्योत पेटल्यावाचोनी । मना चक्रपाणी आकळेना ॥१॥ ज्योतीचा प्रकाश भरता अंतरी । मग दिसे हरि सर्वाठायी ॥२॥ नामाच्या घर्षणे ज्योतीचा प्रकाश । भेटे स्वयंप्रकाश दास म्हणे ॥३॥

१४९९) ज्योत उजळावी मग भेटी घ्यावी । ऐशी आहे सोई देवाजीची ॥१॥ दीपावाचोनिया वाटे कैसे जावे । ज्योत प्रगट होये सद्गुरुकृपे ॥२॥ करिता गमन दशम भुवनी । वास चक्रपाणी तेथे असे ॥३॥ देवाजीचे पाय पाहता सर्व बरे । दास म्हणे खरे हेचि आहे ॥४॥

१५००) जीवी होते आठवण उल्लेख स्मरण । नाभीपाशी अंतःकरण परेचे लक्षण ॥१॥ ध्वनी नाभीस्वरे होती घोराची प्रचीती । देत नुखळिता हुंकारती ते वाचा पश्यंती ॥२॥ शुद्ध नादाची जे सीमा स्वराची महिमा । होती मातृका निःसीमा ते वाचा मध्यमा ॥३॥ देखा गुंडाळा कुसरी मातृकाची परी । नाद गुंडावे अंतरी ते वाचा वैखरी ॥४॥ दास म्हणे या जाणाव्या चारी वाचा ओळखाव्या । विद्या अंतरी धराव्या पाठचि कराव्या ॥५॥

१५०१) चारी वाचे पैल निके । ज्योत अंतरी चमके ॥१॥ तेथ नामची जपणे । मौनाची ही खूण जाणे ॥२॥ दास म्हणे तो अबोल । तेथ दुजा नुरे बोल ॥३॥

१५०२) दीप अंतरी प्रगटे । नाम घेता देव भेटे ॥१॥ चंद्र सूर्य विरहित । तेज अंतरी फाकत ॥२॥ गोविंद म्हणे अग्नी । कैसा उरे तया स्थानी ॥३॥

१५०३) ज्याच्या प्रकाशे हा दिनमणी प्रकाशे । स्वयं प्रकाशित देहीच वसे ॥१॥ तो मी पाहिलासे नयनाच्या नयने । ज्याच्या विरहित सर्वही उणे ॥२॥ ज्याच्या प्रकाशाने शशिबिंब विलसे । ज्याच्या प्रकाशाने

विद्युत भासे ॥३॥ दासाचे हे मन गुंगोनिया गेले । रामनामी ठेले स्वयंप्रकाशी ॥४॥

१५०४) अमल देवोनी तेज दाखविले । नवल पाहिले प्रकाशाचे ॥१॥ उन्मनी ओवरी तेज अभ्यंतरी । चंद्र सूर्या न सरी विद्युल्लते ॥२॥ ते तेज आगळे वाचे न वर्णवे । अनुभवी पहावे गुरुकृपे ॥३॥ ज्योत लावोनिया ज्योती पेटविली । दासालागी आली प्रचीती हे ॥४॥

१५०५) देही देखिले नवल । आत्मपक्षी सोऽहं बोल ॥१॥ पक्षी पंचरंगी आहे । पाहता रंगोनिया जाये ॥२॥ पक्षी राजस सुकुमार । चंचू नुरवी अहंकार ॥३॥ चंद्र सूर्य गती मेळे । दास म्हणे पंख निळे ॥४॥

१५०६) चित्प्रकाश प्रकाशता । नुरे द्वैतभाव वार्ता ॥१॥ द्वैतभाव नुरता पाही । रामनाम वाचे येई ॥२॥ गोविंद म्हणे अनुभव । पाही घेवोनिया स्वयमेव ॥३॥

१५०७) ते रूप पाही ते रूप पाही । जे रूप पाहता मनोन्मन होई ॥१॥ ते रूप पाही ते रूप पाही । सगुणात निर्गुणात एकरूप राही ॥२॥ ते रूप पाही ते रूप पाही । दास म्हणे पुन्हा जन्ममरण नाही ॥३॥

१५०८) देही स्वरूप साक्षात्कार । शुद्ध मायेचा प्रकार ॥१॥ जाणे सगुण गुण माया । तीन देव लागती पाया ॥२॥ शुद्ध माया स्फुरवी राम । गुरुकृपे घेता नाम ॥३॥ दास म्हणे माया परा । प्रकट दावित ईश्वरा ॥४॥

१५०९) स्वरूपाचे सुख पाही । स्वरूप सुखामाजी राही ॥१॥ योगी होऊनी भोगी सुख । वियोगाने सर्व दुःख ॥२॥ स्वरूप भरले दाही दिशा । नामे बुद्धिमाजी ठसा ॥३॥ गुरुनामी जवळ पाही । दासा अनुभव हृदयी ॥४॥

१५१०) देव विटेवरी उभा । नवल तयाची ती प्रभा ॥१॥ देह पंढरीसी जाती । वीट समजोनी घेती ॥२॥ औटपीठ स्थानी । उभा विठ्ठल दिसे नयनी ॥३॥ नामे सकळाचा वीट । दासालागी जे अवीट ॥४॥

१५११) वैकुंठी अधीश । विष्णू बोलती जयास ॥१॥ ब्रह्मगिरीचे पाठारी । मध्यशृंगीचे नगरी ॥२॥ तया नाम हे वैकुंठ । संतजना मूळपीठ ॥३॥ ऊर्ध्वपंथी जाता भले । देही दासासी लाभले ॥४॥

१५१२) सद्गुरूराजे काय केले । काय करणे दाखविले ॥१॥ राम साठवावा कैसा । दाखविला हो आरसा ॥२॥ सद्गुरूकृपा योगे पाही । वाट दाखविली देही ॥३॥ म्हणती हंसावरी राम । पाहता दासासी आराम ॥४॥

१५१३) मनी राम आठविता । मग कैची भयचिंता ॥१॥ चित्ती धरिता सीताकांत । जीव होय भयातीत ॥२॥ जगामाजी भयाभय । रामपद ते निर्भय ॥३॥ दास जाहला अद्वय । सर्व जग राममय ॥३॥

१५१४) निर्गुणाचे पैल जाण । हरि बोलिता हरिगुण ॥१॥ हरिमुखे हरि बोले । हरिगुणी प्रवेशले ॥२॥ निर्गुणीचा जो का गुण । तोचि बोलीजे हरिगुण ॥३॥ दास म्हणे हरिगुण । साक्षात्कार निर्गुण सगुण॥४॥

१५१५) साता समुद्रामाझारी । क्षीर समुद्राची थोरी ॥१॥ जेथ वास भगवंताचा । शेषशायी केशवाचा ॥२॥ तयारूपी जडता दृष्टी । जीव पुन्हा नोहे कष्टी ॥३॥ रत्नाकरी बुडी देता । दासा नामे देव हाता ॥४॥

१५१६) पर्वत शिखरी असे माझे धन । गुरुदेव चरण अविनाश ॥१॥ धन चिरकाल असे हे शाश्वत । कदा न संपत देता घेता ॥२॥ चोरालागी नये लुटिता हे धन । गुरुकृपे खूण दासालागी ॥३॥

१५१७) ब्रह्मगिरी मार्ग गहन । सूक्ष्माहूनि सूक्ष्म जाण ॥१॥ जेथे अखंड स्मरण । विस्मरणावीण पूर्ण ॥२॥ सूक्ष्म साधनमार्गे जाता । शिखरस्थान येई हाता ॥३॥ तेथे दास साक्षात्कारी । मन उन्मनी माझारी ॥४॥

१५१८) संतांचे भोजन । त्याची घ्यावी ओळखण ॥१॥ नाम अमृताचे पान । हेच संतांचे भोजन ॥२॥ दास सेवी अखंडित । मन झाले परमतृप्त ॥३॥

१५१९) लटकिया नामी लटकोनी गेला । लटिके बोलिला तोचि जाणा ॥१॥ संसार व्यवहार खरेपणे केला । नामी लटकला तोचि धन्य ॥२॥ ऐसा जो लटिका बोलेल लटिके । येर कोण टिके तया ठाया ॥३॥ लटिक्या लटिक्या संवाद हा झाला । दास म्हणे केला प्रगट तो ॥४॥

१५२०) जरी बोलो ये लटिके । कळे सर्व हे लटिके ॥१॥ ऐसा संतांचा सिद्धांत । प्रगट नाही पहावा गुप्त ॥२॥ लटिके जाणोनी बोलेना । देव तया आकळेना ॥३॥ लटक लागोनिया राही । लटिका बोल नाम देही ॥४॥ दास म्हणे बोलू जाता । लटिका देव येई हाता ॥५॥

१५२१) लटिके बोलिता अधिक तो भला । संत सज्जनाला मान्य होय ॥१॥ ऐशा बोलण्याचा करावा विचार । तरीच परमार्थ कळो येई ॥२॥ न कळता बोल जगा अधोगती । संता ऊर्ध्वगती प्राप्त होय ॥३॥ ते नाम लटिके कळले सर्वांना । दास म्हणे त्यांना नमन असो ॥४॥

१५२२) खरा त्यागाचा प्रकार । ऐका होवोनि सादर ॥१॥ त्याग करिती बहुत । परी न मिळे भगवंत ॥२॥ नाही अंतर त्यागाचे । बाह्य त्याग ना कामाचे ॥३॥ सोऽहं मधील अहंकार । त्याग त्याचा तो साचार ॥४॥ नामे ऐसा होई त्याग । दासा भेटतो श्रीरंग ॥५॥

१५२३) जरी घडे खरा त्याग । देव भेटेल श्रीरंग ॥१॥ त्याग म्हणजे अनासक्ती । वर्म ओळखावे युक्ती ॥२॥ त्यागावे ते न त्यागीले । अन्य मार्गे कष्टी झाले ॥३॥ गुरुवचन प्रमाण । नाम घेणे त्याग खूण ॥४॥ जेणे नुरे अहंकार । दास म्हणे निर्विकार ॥५॥

१५२४) माया निर्विकार नुरे । ब्रह्मामाजी ब्रह्म विरे ॥१॥ गुरूदेव कृपाधारे । निर्गुण साक्षात्कार उरे ॥२॥ नामे निर्गुणाचा संग । नामे होय ब्रह्म अंग ॥३॥ जेथे बोल काही नुरे । दासा आनंदची उरे ॥४॥

१५२५) सम विषमा पैल आधी । जे का राहे ते समाधी ॥१॥ जेथे काही करणे नलगे । स्वयमेव उगे चांगे ॥२॥ चित्त पाहणीवरी येता । दास होये योगी स्वतः ॥३॥

१५२६) आत्माराम ध्यान कैसे । कर्म धर्म जे प्रकाशे ॥१॥ ऐसे ज्याचे कर्माचरण । तेथे नाचे भगवान ॥२॥ गोविंद म्हणे चित्तशुद्धी । सहज लागली समाधी ॥३॥

१५२७) अनुभव डोळसाचा । अंधालागी येई कैचा ॥१॥ देव जाणे तो डोळस । येर सर्व अंध खास ॥२॥ भक्त पाहती देवास । कैचा दिसे अभक्तास ॥३॥ दासा नामचि अनुभव । जीवे घेता होई शिव ॥४॥

१५२८) अनुभव हा संतांचा । अनुभवे साधी सत्वा ॥१॥ कैचा स्वरूप अनुभव । सांगा साधणे गुरूदेव ॥२॥ ज्याला साधली निवृत्ती । तरीच मुक्तपणे हाती ॥३॥ नामी कसता अनुभव । दासालागी स्वयमेव ॥४॥

१५२९) साक्षात्कार साधण्या जय । साधी पवन विजय ॥१॥ अनुभवे खूण पाही । अनुभवे अनुभव घेई ॥२॥ घडीने घडी साधावी ।

चुकवोनी त्रिगुणांची गोवी ॥३॥ पवन विजय हळू हळू । दास म्हणे क्रमी वेळू ॥४॥

१५३०) शब्दरुपातीत शिव । संती दाविला अनुभव ॥१॥ लवण सागरी विरणे । जीव शिवरूप होणे ॥२॥ शिव बोलीजे कल्याण । दासालागी नामगान ॥३॥

१५३१) आपणची देव । ऐसा परमार्थी अनुभव ॥१॥ उपाधीचे निरसन । आपण ते आत्मज्ञान ॥२॥ आत्मज्ञान नाम ज्ञान । दासाचे ते समाधान ॥३॥

१५३२) खुणेवीण जो का कष्टी । तया कैची आत्मभेटी ॥१॥ जव न कळे आपुली नाडी । कैची प्रचिती रोकडी ॥२॥ साधुजना वर्म ठावे । नामी दासा जे सामावे ॥३॥

१५३३) वि चा ठोबा तो विठोबा । तुकाराम म्हणती उभा ॥१॥ विज्ञानाचे जे श्वसन । जेथ नुरे ज्ञानाज्ञान ॥२॥ दग्ध होत अहंकार । दासा नामी साक्षात्कार ॥३॥

१५३४) संत पहाती तमासा । जेणे भेटी जगदीशा ॥१॥ हंस सदा खेळे खेळ । जीवशिवा एक स्थळ ॥२॥ रवी शशीचा संगम । दासा नामी मनोरम ॥३॥

१५३५) स्वस्थ होवोनी पहाणे । हेचि स्वरूप पहाणे ॥१॥ स्वस्वरूपी जडता डोळा । नीज तेजाचा उमाळा ॥२॥ पहाणेची दृश्यमान । पहाणे आपणा आपण ॥३॥ चित्त चैतन्याची मिठी । दासा नामी घडे दिठी ॥४॥

१५३६) पश्चात भागी आत्मतपन । सदा असे प्रकाशमान ॥१॥ बुद्धी अंतर्मुख होता । प्रकाशाने ये पूर्णता ॥२॥ बाह्य कवाडे झाकीत ।

अंतरदृष्टी विकसीत ।।३।। नामे उघडिता डोळा । दासा संदेह निरसिला ।।४।।

१५३७) सर्वामाजी असे काळ । तोचि म्हणती सर्वकाळ ।।१।। संत साधनी सर्वकाळ । जेथे नाही काळ वेळ ।।२।। जेथ दिवस ना रात । दास नामी अखंडित ।।३।।

१५३८) स्वस्वरूपी आपण येता । उरे आपणचि स्वतः ।।१।। जो का होता आरंभाला । तोचि उरला शेवटाला ।।२।। मध्ये भ्रांती झाली गेली । दासा नामी खूण आली ।।३।।

१५३९) आपणचि होय देव । गुरुनामी हा अनुभव ।।१।। गुरूकृपेचा नवलाव । नकळे नकळे हे लाघव ।।२।। वेदशास्त्र अपार मती । वानीताती गुरूची महती ।।३।। त्याही मौन झाले प्राप्त । दास म्हणे ऐसी मात ।।४।।



संतपर

१५४०) परमहंस करूणाकर । आचार्य जे जगदोद्धार ॥१॥ माया मिथ्या ब्रह्म सत्य । जगा दाविती प्रचीत ॥२॥ दास घाली दंडवत । नामे शंकर साक्षात्॥३॥

१५४१) उरली नाही वृत्ती । म्हणून बोलती निवृत्ती ॥१॥ मूर्तिमंत ज्ञान । ज्ञानराजा भगवान ॥२॥ भक्तीमार्गीचा सोपान । म्हणून नाव त्या सोपान ॥३॥ मुक्तस्थिती मुक्ताबाई । दास म्हणे नामी पाही ॥४॥

१५४२) साधक लक्षण । मनी घ्यावे उमगोन ॥१॥ दशा साधक बाणता । खरे ज्ञान येई हाता ॥२॥ गोविंद म्हणे ज्ञान । ज्ञानदेव चरणी खूण ॥३॥

१५४३) देव दिसेना नयनी । कैचा माया मोह स्थानी ॥१॥ करी साधनाचा यत्न । तरी साधेल प्रयत्न ॥२॥ नामापाशी प्रगटे ज्ञान । ज्ञानदेवाचे दर्शन ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामी येतसे प्रचीती ॥४॥

१५४४) नामामाजी प्रगटवी देव । म्हणोनी जनी नामदेव ॥१॥ जे का ज्ञानाचे ईश्वर । ईश्वर ज्ञान ज्ञानेश्वर ॥२॥ एका जाणे जनार्दन एका । ब्रह्म तुकले म्हणोनी तुका ॥३॥ वरी उदास नामी रस । दासा नामाचा उल्हास ॥४॥

१५४५) लाविता हातास । खडे होताती परीस ।।१।। ऐसा साधुंचा महिमा । परिसती रामनामा ।।२।। रामनाम परिसणे । परीसाचा परीस जाणे ।।३।। रामकथा परिसता । दासा नामी निष्कामता ।।४।।

१५४६) सावता तो माळी । वश केला वनमाळी ।।१।। जयामागे भक्ती सेना । धन्य ऐसा भक्त सेना ।।२।। गोरा तो कुंभार । केला वंशाचा उद्धार ।।३।। नरहरी सोनार । करी नामाचा व्यवहार ।।४।। धन्य चोखामेळा । हाडे बोलती विठ्ठला ।।५।। सब्जा तुळशीचे शरीर । दास म्हणे ऐसे कबीर ।।६।।

१५४७) रामनाम थोर भाग्य । येर सर्व ते अभाग्य ।।१।। देह मळ्याचे माझारी । रामनाम पीक करी ।।२।। सावत्याने मळा केला । दास म्हणे धन्य झाला ।।३।।

१५४८) थोर नरसी मेहता । रासक्रीडा बाणली चित्ता ।।१।। धन्य भानुदास । सदा भानूचा प्रकाश ।।२।। तैसे तुलसीदास । तुलसी रामायण सुरस ।।३।। सुरामाजी राहे दास । दासा नामाचा हव्यास ।।४।।

१५४९) एका भावे एका । ज्यांचा देव झाला सखा ।।१।। धन्य एकनाथ । जगा बोधी भागवत ।।२।। तीन तपे भगवान । सेवा करिती जे आपण ।।३।। काय नामाचा महिमा । दास म्हणे झाली सीमा ।।४।।

१५५०) भाव धरूनि नाम घेई । देव त्याचे घरी राही ।।१।। ज्याचेवीण सर्व अभाव । तोचि देहामाजी भाव ।।२।। त्यात नामची तत्त्वता । भाव धरिता येई हाता ।।३।। नाथे साधिली ही खूण । तीन तपे भगवान ।।४।। दासा सहा पैल पाही । अघटित नवलाई ।।५।।

१५५१) समर्थ हे संत जगती विख्यात । दावियेली मात अघटित ।।१।। अघटित मात शोधोनिया पाही । स्फुरतसे देही सर्वकाळ ।।२।।

चारी वाचा मूळ शक्ती हे जाणावी । अंतरी धरावी धारणेसी ॥३॥ अखंडित बोली नामाची बोलावी । समर्थ पदवी दास म्हणे ॥४॥

१५५२) हळू हळू अभ्यासाने । नाम साधी नित्य यत्ने ॥१॥ मना लावी हळू गोडी । नको करू फार ओढी ॥२॥ अभ्यासाने अवघड । तेही होई सवघड ॥३॥ दासे नामी कर्म गती । जाता देव भारे घेती ॥४॥

१५५३) चतुर्विध पुरुषार्थ । संपादणे हा इत्यर्थ ॥१॥ संती दावियेला मार्ग । आचरिता घडती सांग ॥२॥ येर मार्ग अवघड । स्वल्प नामे सवघड ॥३॥ होती दासा पुरुषार्थ । गुरूदेवकृपे सत्य ॥४॥

१५५४) चारी पुरुषार्थ तरी । घरी ओळखिल्या हरि ॥१॥ सोहंस्मरणा भीतरी । प्रगटे स्वतःसिद्ध हरि ॥२॥ हरिरंगी जो रंगला । गोविंद म्हणे हरि झाला ॥३॥

१५५५) ब्रह्मस्वरूप चैतन्य । ते हे सद्गुरू ब्रह्मचैतन्य ॥१॥ ज्यांचे रूप पडता दृष्टी । ज्यांचे नाम घेता ओठी ॥२॥ गोविंद म्हणे होती मुक्त । गुरूनामी हे प्रचीत ॥३॥

१५५६) श्रीब्रह्मचैतन्य । नाम जयांचे जीवन ॥१॥ राम कर्ता बाणली खूण । हेचि ज्यांचे तत्त्वज्ञान ॥२॥ नाम त्यांचा चमत्कार । दास म्हणे नमस्कार ॥३॥

१५५७) कोणी लोकमान्य कोणी देवमान्य । कोणी राजमान्य होऊनी गेले ॥१॥ याचे सूत्र पाहता आहे जिव्हेपाशी । कर्मशुद्ध तैशी उपासना ॥२॥ उपासने ज्ञान ज्ञाने समाधान । मोक्षाचे साधन दास म्हणे ॥३॥

१५५८) ऐसा कोणी घेईल चरखा । सदा नाम घेईन मुखा ॥१॥

त्याचे नोहे अकल्याण । स्वये साह्य भगवान ।।२।। देव साह्य झाल्यावरी । काळ तया काय करी ।।३।। पावे आपुलीया पदा । दासा जेथे सुख सदा ।।४।।

१५५९) दैवी संपत्तीचा नरू । त्यासी साह्य सर्वेश्वरू ।।१।। धन्य धन्य तेचि जन । जिही जोडिले हे धन ।।२।। देवनामी जडे चित्त । तेचि जगी खरे वित्त ।।३।। म्हणुनी नाम कारण आहे । दास म्हणे शोधुनी पाहे ।।४।।

१५६०) ऐसे संता संत जन । पाहता तयाचे लक्षण ।।१।। संती सदा नामखूण । काय वर्णू त्यांचे गुण ।।२।। संत परगुण कणू । करिती पर्वता समानू ।।३।। परगुणांचा गौरव । आपुलाचि ऐसा जीव ।।४।। ऐसा संतांचा महिमा । बोलायाची झाली सीमा ।।४।। असंताची ऐशी जाती । नाम नये त्याचे चित्ती ।।५।। परनिंदा परद्वेष । यात जयांना संतोष ।।६।। परगुणांचे वर्णन । ज्यांचे मुखी नये जाण ।।७।। चांगल्याचा तेजोभंग । करण्यात सदा दंग ।।८।। हेचि जयाना कवतुक । दोष पाहणे अचूक ।।९।। जगी संता संत जन । दास संतासी शरण ।।१०।।

१५६१) कैसा पालटे दुर्गुण । सांगा अनुभव खूण ।।१।। मने अमने कैशापरी । संतसंग घडे जरी ।।२।। संत सकळा सारिखे । करिती आपणासारिखे ।।३।। तरी होईल कल्याण । दासा नामी जडे मन ।।४।।

१५६२) जगाचे बोलणे नाही उपयोगी । जन्ममरण अंगी सुटतीना ।।१।। संतांचे बोलणे रामनाम वाचा । अधिकार त्यांचा थोर असे ।।२।। शब्द ब्रह्म उदधी मंथोनिया त्यांनी । रामनाम लोणी काढियेले ।।३।। संतांचे बोलणे बोलवेना जना । गुरुकृपे खुणा दास म्हणे ।।४।।

१५६३) संतांचे वचन सकळासी मान्य । ओळखिती सज्जन साधुसंत ॥१॥ संतांचे कवित्व प्रासादिक तत्त्व । तयाचे महत्व देव जाणे ॥२॥ संतांचे वचन देव देवा मान्य । वाहे अभिमान देव त्यांचा ॥३॥ संत बोधिताती सर्वामाजी एक । दासा प्रासादिक कवित्व ते ॥४॥

१५६४) संतांचे मुखीचे काहीही वचन । वेदाज्ञेप्रमाण मनी घेई ॥१॥ हित तयामाजी असे मागेपुढे । राहे वाडेकोडे तयापाशी ॥२॥ रामनामे होय संतांची संगती । वचनाची प्राप्ती तेणेयोगे ॥३॥ संतांचे वचन रामनाम खूण । जेणे जन्ममरण दासा नुरे ॥४॥

१५६५) संत बोलणे विपरीत । वाटे परी ते यथार्थ ॥१॥ त्यांच्या विचाराचा बोल । अविचारे घेता फोल ॥२॥ सुपरीत विपरीत । तेथे कल्याणाचा हेत ॥३॥ नामे यथार्थ प्रचीती । गोविंद म्हणे धरी चित्ती॥४॥

१५६६) सत्य बोलणे अद्वैत । साधु बोलताती नित्य ॥१॥ मिथ्या भाषणाचा लोभ । सत्य लोपले स्वयंभ ॥२॥ एकवार मिथ्या बोली । रथ टेकिला भूतळी ॥३॥ आमुची होईल कैसी गत । गोविंद गुरूचा अंकित॥४॥

१५६७) जगा दावावया सोय । अवतरती संतराय ॥१॥ संत सद्गुरू दयाळ । दाखविती अंतरमाळ ॥२॥ नामे संत हे समर्थ । काळ त्यांचा आज्ञांकीत ॥३॥ ऐशी माळ जपता बरी । दास म्हणे तोचि हरि ॥४॥

१५६८) नाम साठविता पोटी । ब्रह्मानंदसुख कोटी ॥१॥ ऐसा संतांचा अनुभव । नेणे बहिर्मुख जीव ॥२॥ साठविणे हे कठिण । बुद्धी जव मायाधीन ॥३॥ बुद्धीमाजी साठविता । देव दासाचा सर्वथा ॥४॥

१५६९) सर्वाहून थोर खूण । नाम साठविले जेणे ॥१॥ नव्हे थोर हा

परीस । संत थोर त्यापरीस ।।२।। आकाशासी नाही अंत । तयाहोन थोर संत ।।३।। त्रिविध जग हे आगळे । संत त्याहोन वेगळे ।।४।। दासे नाम साठविता । चाले काळावरी सत्ता ।।५।।

१५७०) आत्मदीप ज्योती पाहिली जयानी । धन्य तेचि जनी जगामाजी ।।१।। नवल प्रकाश वर्णवेना त्याचा । जेथे चारी वाचा कुंठित होती ।।२।। दास म्हणे नामे येई प्रत्ययाला । अघटित लीला दाविती ते ।।३।।

१५७१) आत्मदीप ज्योती पाहिली जयानी । धन्य तेचि प्राणी जगामाजी ।।१।। दीप प्रकाशता रवि चंद्र लोपे । जळोनी जाती पापे अंधःकार ।।२।। अंधार अज्ञान लोपोनिया जाता । दास नामी स्वतः ज्योतीरूप ।।३।।

१५७२) निरूपणी रूप प्रगटे । देव हृदयात भेटे ।।२।। ऐसा महिमा भक्तजन। अनुभवताती जाण ।।२।। गोविंद म्हणे देव भक्त । एकरूप होती तेथ ।।३।।

१५७३) मरणाची भीती नसे साधुजना । काळ नम्र जाणा तयालागी ।।१।। मरणाची भीती असे अज्ञजना । जया विवंचना संसाराची ।।२।। ब्रह्मांडीचा राम जयासी भेटला । आराम तयाला काय उणे ।।३।। मरणाचे दुःख अज्ञजना भासे । साधु सुखी असे दास म्हणे ।।४।।

१५७४) संतसंग तो उपयोगी । पहा आचरोनी वेगी ।।१।। संत समगतीमाजी। रहातात तेथे काजी ।।२।। गोविंद म्हणे सदा नाम । गुरूकृपे कळे काम ।।३।।

१५७५) संतापाशी बसू जाता । संतपद येई हाता ।।१।। संतपद हे अधिक । तया नाश नाही देख ।।२।। रामनामे सत्संगती । संतसंगे पदप्राप्ती ।।३।। दास म्हणे हे घडेल । असता सुकृताची ओल ।।४।।

१५७६) संग धरी रे धरी जाणत्याचा । नको धरू तू अजाणत्याचा।।१।। घुसळण पाण्याचे काय देईल लोणी । दधी मंथन करी त्यालागोनी ।।२।। जाणत्याचे संगी हाती येईल हित । अजाणत्यासंगे होईल अनहित ।।३।। भूस बडविता धान्यकण नाही । दास म्हणे हा बोध मनी घेई ।।४।।

१५७७) सज्जना दुर्जना कैशी संगसरी । दोघांचिया परी भिन्नाभिन्न ।।१।। सज्जन साधिती सकळाचे हित । दुर्जन अहित साधिताती ।।२।। बहुपुण्ययोगे सज्जनांची गाठी । तेणे होय भेटी देवासवे ।।३।। रामनामे होती दुर्जन सज्जन । नवल महिमान दास म्हणे ।।४।।

१५७८) कृपणपणाने धनसाठा होई । धन्य नवलाई कृपणाची ।।१।। नाम साठवावे तयाचिये परी । तरीच श्रीहरी सखा होय ।।२।। श्वास दवडाया कृपण जो झाला । साठवी धनाला साधनाच्या ।।३।। साधनाच्या धने संत हे श्रीमंत । दासाची संपत नाम एक ।।४।।

१५७९) लोभ सोडी लोभ सोडी । सद्गुरुकृपे लाभ जोडी ।।१।। लोभ सोडिता सुटेना । खुण जाणता जाणेना ।।२।। लोभ कैसा तो सोडावा । संतप्रसाद जोडावा ।।३।। ऐशा साधनी जे गेले । दास म्हणे धन्य झाले ।।४।।

१५८०) हा लोभ सोडी मना । संसारीचा हा लोभ सोडी मना ।।ध्रु।। लोभ धरी तू सत्संगाचा । लोभ धरी तू हरीनामाचा ।।१।। लोभ धरी तू एकांताचा । लोभ सोडी मना संसारीचा ।।२।। लोभ धरी तू सत्श्रवणाचा । लोभ धरी तू गुरूवचनाचा ।।३।। गोविंद म्हणे तू गोविंदाचा । लोभ सोडी मना संसारीचा ।।४।।

१५८१) क्षमावंत हा तो संतांचा विशेष । जेणे जगदीश वश होय ।।१।। क्षमाशस्त्रे संत दुर्जना दंडिती । नाम वाढविती देवाजीचे ।।२।।

अपकारीयासी करिती उपकार । क्षमेचा प्रकार ऐसा असे ।।३।। दास म्हणे नामी क्षमा जे धरिती । तयांचे अंकिती देव असे ।।४।।

१५८२) देवपण जेथे असे । तया ठायी काय दिसे ।।१।। दैवी संपत्तीने युक्त । सदा सर्वदा जे मुक्त ।।२।। गोविंद म्हणे नमन । तयाप्रती सदा जाण ।।३।।

१५८३) ब्रह्मज्ञानी तो ब्रह्मर्षी । ब्रह्मामाजी वसे हर्षी ।।१।। सर्वामाजी ब्रह्म खेळे । ऐशा अनुभवी मिळे ।।२।। षड्रिपूचे निर्दळण । हेचि ब्रह्मर्षीची खूण ।।३।। नामे सहा निर्दळण । दासा खरे ब्रह्मज्ञान ।।४।।

१५८४) ब्रह्मज्ञान्याचे लक्षण । जाणे अनुभवी खूण ।।१।। आहे थोडकीच कळा । परी जाणे तो विरळा ।।२।। अहंपणे ब्रह्मज्ञान । बोलो जाता नये जाण ।।३।। रामनामी कळे खूण । दास म्हणे ओळखण ।।४।।

१५८५) ब्रह्मज्ञान्याचे महिमान । वाचे वर्णवेना जाण ।।१।। कर्तुम अकर्तुम अन्यथा । तीन्ही शक्ती त्यांचे हाता ।।२।। जैसा देहामाजी प्राण । तैसे ज्ञानी ब्रह्मज्ञान ।।३।। रामनामी ब्रह्मज्ञान । दासा नामाचे पठण ।।४।।

१५८६) ब्रह्मस्वरूप जाणणे । हेचि ब्रह्मज्ञान जाणे ।।१।। ऐसे खरे ब्रह्मज्ञान । कळे धरिता संतजन ।।२।। आन करू नको काही । दुजे ब्रह्मज्ञान नाही ।।३।। दास म्हणे नाम घेता । स्वये ब्रह्म येई हाता ।।४।।

१५८७) ब्रह्मज्ञानेवीण कैसे ब्रह्मज्ञान । चालीले साधन उफराटे ।।१।। ब्रह्मखुणेमाजी सर्व ब्रह्मज्ञान । गुरूकृपे जाण खूण देही ।।२।। खूण रामनाम ओळखिता बरे । दास म्हणे खरे समाधान ।।३।।

१५८८) योगी जाणा तोचि पाही । अद्वयस्वरुपी जो राही ।।१।।

योगायोग जेथे नाही । वियोग उरेना कदाही ॥२॥ गोविंद म्हणे कळो येई । नामी जडता गुरूपायी ॥४॥

१५८९) योगी जनांचे लक्षण । विषय नैराश्यता खूण ॥१॥ वियोगाची नेणे वार्ता । योगी जाणा तो सर्वथा ॥२॥ चित्त चैतन्यी सामावे । योगी बोलिजे त्या नावे ॥३॥ नामी अनुभव खूण । दास म्हणे योगी पूर्ण ॥४॥

१५९०) धैर्य धरोनिया धरिता सुपंथ । तयासी अनंत प्रतिपाळी ॥१॥ धीर तोचि जाण नामचि कारण । नामे धीरवान साधुसंत ॥२॥ धर्मे नीतिपंथ धैर्ये आक्रमिला । काय उणे त्याला सांगा जो जी ॥३॥ अपाय तयासी होईल उपाय । धरा देव पाय दास म्हणे ॥४॥

१५९१) संतांचिया पंथे जाता भय नाही । निर्भय तो पाही होत असे ॥१॥ संतांचा तो पंथ रामकृष्णहरि । मुकुंद मुरारी वासुदेव ॥२॥ दास म्हणे रामनामी सुखी होई । पंथराज देही श्रेष्ठ असे ॥३॥

१५९२) थोरपणाचे लक्षण । नाम घ्यावे ओळखून ॥१॥ थोर देवा ओळखिता । थोर भक्ती येई हाता ॥२॥ थोर सदाचार घेता । थोर अहंता टाकिता ॥३॥ दास म्हणे तोचि थोर । ज्याचे मुखी रघुवीर ॥४॥

१५९३) थोर संतांचे उपकार । वर्णवेना अपरंपार ॥१॥ वचन ग्रंथादि आधार । जागविती निरंतर ॥२॥ ऐसे दयाळ जगती पाही । त्यांचे ऐसे कोणी नाही ॥३॥ सदा साधिती साधन । सुलभ मोक्षाचा सोपान ॥४॥ जगा दावूनिया नाम । दासा दाविती पुरुषोत्तम ॥५॥

१५९४) संतापायी सर्व सुख । तयावीण सर्व दुःख ॥१॥ संतचरण

ओळखावे । त्यांचे चरणी लीन व्हावे ॥२॥ गोविंद म्हणे चरणगती । तेथे नामाची प्रचीती ॥३॥

१५९५) संतांचिया घरी । सदा वास करी हरि ॥१॥ म्हणोनिया तेथे जावे । घर उमगोन घ्यावे ॥२॥ जेथे नाम निरंतर । घोष चालला सुंदर ॥३॥ दास म्हणे तेथे जाता । नुरे भय शोक चिंता ॥४॥

१५९६) ओळखावे संतघर । जीवा विश्रांती मंदिर ॥१॥ तया घरासी जो गेला । तोचि जगी धन्य झाला ॥२॥ तेथे भेटे रघुवीर । सदा नामाचा गजर ॥३॥ दास म्हणे सांगो किती । खरी जीवासी विश्रांती ॥४॥

१५९७) संत शब्द मनी घेता । रक्षिताती भयभीता ॥१॥ थोर संतांचा प्रभाव । सहज बोलणे उपाव ॥२॥ तयालागी शरण जाता । त्यांचे चरणी लागता ॥३॥ जेणे नाम ठसे चित्ती । दास म्हणे देव प्राप्ती ॥४॥

१५९८) संतांचे बोलणे नाम जरी घेसी । मुक्ती अनायासी प्राप्त होय ॥१॥ सहज बोलणे काही बोलियेले । मनी घेता भले होय त्याचे ॥२॥ जागवोनी जगा करिती उपकार । जगाचे अपकार सोसोनिया ॥३॥ साधु समागम वचन दुर्लभ । साधी तया लाभ दास म्हणे ॥४॥

१५९९) संत झाले वाणी । त्यांची रामनाम वाणी ॥१॥ त्यांनी घातले दुकान । मिळे रामनाम वाण ॥२॥ त्यांची कृपा होता जाण । कळो येईल दुकान ॥३॥ पेठ संतांची चांगली । नाम मिळे भाव मोली ॥४॥ दास म्हणे ऐसा वाणी । त्यासी साह्य चक्रपाणी ॥५॥

१६००) हिंडता दुकानी । न मिळे रामनाम वाणी ॥१॥ शोधी संतांचे दुकान । त्यासी घेई उमगोन ॥२॥ संत वाणी उदार थोर । नाम देती भावावर ॥३॥ दास ऐसे नाम घेत । देव तयाचा अंकित ॥४॥

१६०१)साधु शब्द मनी घेता । साधु करील सर्वथा ॥१॥ थोर साधुंचा महिमा । साधुसंगे परमात्मा ॥२॥ सहा धुवोनिया साधु । समागम दुर्लभ बोधू ॥३॥ साधु संतांचा हा बाणा । दास म्हणे नाम जाणा ॥४॥

१६०२) जरी व्हावी देवप्राप्ती । तरी धरी सत्संगती ॥१॥ हेचि पहिले साधन । जेणे नामी जडे मन ॥१॥ साधु शब्द कानी घेता । साधु करील सर्वथा ॥२॥ सत्संगती घडता जाण । दास म्हणे ते कल्याण ॥३॥

१६०३) संतशब्द कानी घेता । देव देव येई हाता ॥१॥ सत्संगती घेता नाम । देव देव करी नाम ॥२॥ देव देवावीण पाही । काहीसुद्धा होत नाही ॥३॥ देव देव हाती येता । दासा सर्वावरी सत्ता ॥४॥

१६०४) साधुजन गोष्टी जगाचे वेगळी । घेता मनोमेळी खरे हित ॥१॥ सांसारिक जना संसाराच्या गोष्टी । सांसारिका कष्टी करिताती ॥२॥ सहा धुवोनिया अंतरी राहिले । बोल त्यांचे झाले मोलाचे ते ॥३॥ साधुजन गोष्टी बोलती विठ्ठल । जेणे घननीळ दासा भेटे ॥४॥

१६०५) ऐका जन गुजगोष्टी । नायकिता व्हाल कष्टी ॥१॥ गुजाचेही गूज देख । रामनाम गोष्टी एक ॥२॥ गूज बरवे ओळखावे । गोष्टी कळेल स्वभावे ॥३॥ दास म्हणे सांगो किती । नामी देवाची प्रचीती ॥४॥

१६०६) अशक्य ते शक्य साधुजनालागी । दिसतसे जगी चमत्कार ॥१॥ देव नव्हे देता तोचि नव्हे साधू । सामर्थ्य अगाधू नामी असे ॥२॥ साधुसंग धरी साधुसंग धरी । प्रारब्धाची उरी उरेचिना ॥३॥ संतांचे पदासी वेगी जा शरण । ऐसे महिमान दास म्हणे ॥४॥

१६०७) अशक्य ते काय साधुजना पाही । साठविले तीही रामनाम ॥१॥ अशक्य ते शक्य केले ज्यांनी नाम । तेचि पूर्णकाम साधुजनी

॥२॥ सहा दोष ज्यांनी काढोनी टाकीले । तेचि साधु भले निर्विकार ॥३॥ दास म्हणे मनोभावे सेवा करी । होतील कैवारी देवभक्त ॥४॥

१६०८) ऐका साधुजन गोष्टी । घेता जीव नोहे कष्टी ॥१॥ सहा देवोनी राहिले । सहा उल्लंघोनी गेले ॥२॥ नाम घ्यावे उठाउठी । नाम उच्चारावे कंठी ॥३॥ दास म्हणे घेता गोष्ट । देव पुरवी मनीचे इष्ट ॥४॥

१६०९) संतांचे वचनी थोर असे हित । अधिक सर्वात तुळणेना ॥१॥ आपणा सारिखे करिती तात्काळ । ऐसे आहे फळ वचनाचे ॥२॥ देवाजीचे नाम संतांचे वचन । दासा चित्ती खूण अंतरीची ॥३॥ दास म्हणे वचनी अनुसरता प्राणी । जन्म मरण कहाणी उरेचिना ॥४॥

१६१०) सर्वामाजी थोर कोण । नाम साठविले ज्याने ॥१॥ नव्हे थोर हा परीस । संत थोर त्या परीस ॥२॥ आकाशास नाही अंत । तयाहोनी थोर संत ॥३॥ त्रिविधजन हे आगळे । संत त्याहोन वेगळे ॥४॥ दासे नाम साठविता । काळावरी चाले सत्ता ॥५॥

१६११) सदा देव रामनामी । मिळे संतांचे संगमी ॥१॥ देव संत एकरूप । रामनामात तद्रुप ॥२॥ गोविंद म्हणे सदानंद । रामकृष्ण हरि गोविंद ॥३॥

१६१२) संत नामे भाग्यवंत । होता भेटे भगवंत ॥१॥ अभाविका लागी पाही । देवभेटी होत नाही ॥२॥ खरे भाग्याचे लक्षण । वैराग्य ही त्याची खूण ॥३॥ दास म्हणे सांगो किती । त्याचा होय जगत्पती॥४॥

१६१३)सत्संगतीचे महिमान । वर्णू शके ऐसा कोण ॥१॥ देव प्राप्तीसी साधन । प्रथम सत्संगती खूण ॥२॥ सत्संगतीचा महिमा । वर्णवेना शेषा बह्मा ॥३॥ सत्संगती योगे नाम । नामयोगे दासा राम॥४॥

१६१४) संतकृपेचा महिमा । दाविताती रघुत्तमा ॥१॥ संतकृपा योगे पाही । हरिनामी सुख देही ॥२॥ म्हणोनिया संतापायी । लीन होऊनीया राही ॥३॥ दास म्हणे संत योगी । दासा नुरविती वियोगी॥४॥

१६१५) सत्संगतीचे महिमान । वाचे वर्णू शके कोण ॥१॥ अहो नारदादी संती । बाणलीसे ही प्रचीती ॥२॥ संत वर्म योगे जाण । घडे नामाचे स्मरण ॥३॥ जेणे भेटे नारायण । दास म्हणे थोर पुण्य ॥४॥

१६१६) जाणे संतांचा महिमा । असे बहुत दुर्गमा ॥१॥ जगी संत आणि जन । परी संतांचे महिमान ॥२॥ येई दिसोनिया पाही । कारण शोधोनिया घेई ॥३॥ महिमा एक रामनाम । दासा करी पूर्णकाम ॥४॥

१६१७) धरणे संतसमागम । शुभेच्छेचे तिजे काम ॥१॥ संतसमागमे पाही । शुभ इच्छा सतत राही ॥२॥ समत्वाचा जो आगम । संतसंगे जाणे सुगम ॥३॥ ज्ञानबोध समागम । दास म्हणे तत्त्वनाम ॥४॥

१६१८) सत्संगती एक क्षण । घडता पालटती गुण ॥१॥ ऐशी संगती धरावी । जेणे देवा भेटी व्हावी ॥२॥ साधु विचार ये मनी । साधु करील तत्क्षणी ॥३॥ काय आणिक साधने । नामे देव भेटी जेणे ॥४॥ दास म्हणे संतसंग । नाम प्रगटवी अंतरंग ॥५॥

१६१९) संतसंगतीने पालटती गुण । वर्तनाची खूण त्यांचे योगे ॥१॥ प्रपंच परमार्थ चालविती दोन्ही । वर्मा ते जाणुनी वर्तताती ॥२॥ संतसंगतीने पालटती गुण । धरावा सद्गुण तेचि बरे ॥३॥ बरे होय दासा सद्गुरूंचे कृपे । हरिनाम सोपे मुखी आले ॥४॥

१६२०) मायेपासून फिरवीत । मायातीत साधुसंत ॥१॥ त्यांची उलटीच कळा । देव दाखविती डोळा ॥२॥ अवघा मायेचा हा खेळ ।

माया जाणे तो निर्मळ ।।३।। दावोनिया अनुभव सुख । निवारिती माया दुःख ।।३।। दासे माया ओळखिता । रामरूप आले हाता ।।५।।

१६२१) मायेतून सोडवीत । नाम देवाजीचे सत्य ।।१।। मायेलागी ओळखिता । माया नुरेची सर्वथा ।।२।। येर मायीक साधने । माया केवी उल्लंघणे ।।३।। नामे ब्रह्मस्थिती उरे । दास म्हणे माया नुरे ।।४।।

१६२२) वैष्णवांचे अंतरात । एक विष्णु असे सत्य ।।१।। एकाविण नाही काम । एक काम रामनाम ।।२।। गोविंद म्हणे नरदेही । त्यावीण अनुभव नाही ।।३।।

१६२३) वैकुंठीचे स्थानी । वैष्णव ते विष्णुध्यानी ।।१।। थोर तयांचे महात्म्य । बोलती ते होते सत्य ।।२।। गोविंद म्हणे सांगो काई । गुरू दाविती नवलाई ।।३।।

१६२४) प्रारब्धाची रेषा वाईटाने मोठी । संतसंगे खोटी होत असे ।।१।। म्हणावोनी जनी धरावा विश्वास । करावा रहिवास संतसंगे ।।२।। संतसंगे दोष होतसे निर्दोष । करा नामघोष दास म्हणे ।।३।।

१६२५) पापपुण्य विरहित । गाव संतांचा निश्चित ।।१।। जये गावी रहाती संत । नामकृती चाले नित्य ।।२।। गोविंद म्हणे ऐसे संत । ज्यांचे हृदयी भगवंत ।।३।।

१६२६) हरिनाम युक्ती साधिली जयानी । तयांचिया मनी देव असे ।।१।। तयांचा हा संग जनासी तारक । म्हणोनिया एक तोचि खरा ।।२।। हरिनाम मुखी हे मुख्य कारण । उत्तम साधन संत जनी ।।३।। संत चिंतामणी संत कल्पतरू । परिस साचारू गोविंद म्हणे ।।४।।

१६२७) तोचि जाणावा विश्वासी । जेणे सोडिले विश्वासी ।।१।। तोचि जाणावा विश्वासी । जेणे जोडिले विश्वासी ।।२।। तोचि जाणा

विश्वासी । गुरुवचनी विश्वासी ॥३॥ तोचि जाणावा विश्वासी । राहे विज्ञानाचे श्वासी ॥४॥ तोचि जाणावा विश्वासी । नाम घेई श्वासोच्छ्वासी ॥५॥ हरिभक्त तो विश्वासी । दास वंदितो तयासी ॥६॥

१६२८) तोची जाणावा विश्वासी । संतवचनी श्रद्धा ज्यासी ॥१॥ गुरुवेदांत वच विश्वासी । श्रद्धा बोलती तयासी ॥२॥ हरिभक्त तो विश्वासी । दास वंदितो तयासी ॥३॥

१६२९) टाकोनिया अविश्वास । धरिता अंतर विश्वास ॥१॥ भेटवील रघुवीरा । म्हणोनिया जपुनी धरा ॥२॥ विज्ञान नाम जो विश्वास । रामनामाचा जो श्वास ॥३॥ गुरुकृपे जडता त्यास । दासा नुरे अविश्वास ॥४॥

१६३०) संत चितारी चांगले । चित्र देवाचे काढले ॥१॥ नामरुपाचे वेगळा । चित्ती दाविताती डोळा ॥२॥ चित्रामाजी खरा देव । नवल तयाचे लाघव ॥३॥ अनुपम्य मनोहरू । रूप तयाचे अगोचरू ॥४॥ रंग कागदा वेगळा । दास बुद्धीसी जवळा ॥५॥

१६३१) संत चित्रकार भले । अरूपासी रूप केले ॥१॥ बहुरूप बहुकळा । रूप कर्ता आकळेना ॥२॥ नानारूपे चराचर । व्यापोनिया अगोचर ॥३॥ चित्रकार तोचि भला । हृदयी देव रेखाटिला ॥४॥ संतकृपे अदृश्यासी । दास म्हणे रेखाटसी ॥५॥

१६३२) संतांचीये भेटी । कळो येई बरी गोष्टी ॥१॥ बरवा तो पांडुरंग । मूर्ती सावळी सुरंग ॥२॥ एक नाम त्याची गोष्टी । दासालागी आवड मोठी ॥३॥



प्रासंगिक

१६३३) सर्व प्रेमामाजी थोर मातृप्रेम । इतरांचे प्रेम न तुळे तेथे ।।१।। ऐसे थोरपण आले कासयाने । मातेच्या रूपाने देव वसे ।।२।। संन्यासी झालिया फिटे सर्व ऋण । परी मातृऋण फिटेचि ना ।।३।। जिच्या आशीर्वादे होतसे कल्याण । हरिगुणगान दास म्हणे ।।४।।

श्रीदासराम लेखन वही क्र.२६० नुसार या वहीमध्ये श्रीदादांनी खालील अभंगाचे वर "श्रीमामांचे आत्मचरित्र" असे नमूद केले आहे

१६३४) मज सर्वांनी ठकविले । सरळ वागता वैरी झाले ।।१।। आता तुम्हावीण देवा । कोण सुख माझ्या जीवा ।।२।। किती लावता उशीर । माझा अंत का पाहणार ।।३।। भेटी देऊनि राघवा । मज अंतरी वागवा ।।४।। काही सज्जन भेटले । तेणे मना सुख झाले ।।५।। करूणा ऐकोन सीतारमण । देती गोविंदा आलिंगन ।।६।।

१६३५) अहो कैवल्याचे धाम । आत वसे रामनाम ।।१।। भोवती बगीचा सुंदर । पंचरंगी जाई थोर ।।२।। कैवल्याचे रोप द्वारी । वेल गेला गगनावरी ।।३।। कळे कैवल्याचे धाम । दास म्हणे घेता नाम ।।४।।

१६३६) मायबाप सकळांचा । तोबा लागता कळे साचा ।।१।। तोबा लागे कैसा पाही । सदा नामस्मरणी राही ।।२।। गोविंद म्हणे गुरूकृपे । तोबा लागला अपापे ।।३।।

१६३७) मोक्षधामातील मंदिर । सुवर्ण कळस मनोहर ॥१॥ आधी पहावा कळस । जरी जावा तो आळस ॥२॥ कळेसहित कळस जाणे । कळस होऊन पाहणे ॥३॥ दास म्हणे नाम घेई । कळस उमगोन येई ॥४॥

१६३८) सद्गुरूंचे मोक्षधामी । हनुमान ऊर्ध्वगामी ॥१॥ ही तो साधकाची वाट । हनुमान दावी नीट ॥२॥ साधनाशी जडुनी राहणे । साधनाची खूण जाणे ॥३॥ दास म्हणे नाम घेती । तया साधका प्रचीती ॥४॥

१६३९) सत्य वाचे नारायण । तोचि सत्यनारायण ॥१॥ तया मन समर्पण । हेचि तयाचे पूजन ॥२॥ दास म्हणे "ना" "तू" "ना " "मी" । कळो येईल गुरुनामी ॥३॥

१६४०) सत्य वाचे नारायण । तोचि सत्यनारायण ॥१॥ त्यासी नाम समर्पणे । हेचि त्याची पूजा जाणे ॥२॥ अंतर्बाह्य आचरिता । दासा एकचि फळ हाता ॥३॥

१६४१) आधी मन शुद्ध करी । कैवल्याचे रोप द्वारी ॥१॥ आधी मन शुद्ध होते । अशुद्धता पाप खोटे ॥२॥ पतिव्रते जैसा पाही । देव मनी शुद्धता ही ॥३॥ एकविध नाम घेई । दासांकित शेषशायी ॥४॥

पौराणिक

१६४२) प्रयत्न करिता काय एक नोहे । भगीरथे पाहे काय केले ।।१।। आकाशीची गंगा भूतला आणिली । जेणे ख्याती केली तीही लोकी ।।२।। गंगा ज्ञानरूपे सकळा अंतरी । दाविली चतुरा संतजनी ।।३।। तीच रामनामे प्रगट जाहली । ओळखिता भली दास म्हणे ।।४।।

१६४३) उफराट्या नामे वाल्मिकी तरला । नेणती ज्ञानाला तयाचिया ।।१।। राम राम म्हणता देवभेटी देता । मरा मरा म्हणता केवी भेटे ।।२।। ऐशा बोलण्याचे वर्म तो कळेना । ज्ञानियाच्या खुणा ज्ञानी जाणे ।।३।। उफराटे म्हणजे अंतर्मुख होणे । तेथे नाम घेणे दास म्हणे ।।४।।

१६४४) राम झणाणिला राम झणाणिला । तो हा रांजण हरिश्चंद्रे भरिला ।।१।। नवल गे माये नवलाव केला । सद्गुरुराये रांजण दाविला ।।२।। राम झणाणिला राम झणाणिला । तो हा रांजण विठ्ठले भरिला ।।३।। राम झणाणिला राम झणाणिला । तो रांजण श्रीकृष्णे भरिला ।।४।। राम झणाणिला राम झणाणिला । गोविंद म्हणे रांजण भरोनि चालिला ।।५।।

१६४५) साधकासी साह्यकारी । बलभीम उपकारी ।।१।। रामनामे ऐशी सत्ता । प्राप्त होय हनुमंता ।।२।। केला स्वामीसी उपकार । तेथे

काय ते इतर ॥३॥ दास म्हणे शरण जाता । नुरे संसाराची वार्ता ॥४॥

१६४६) नळ नीळा ऋषीश्वर । दगड तरतील देती वर ॥१॥ हरिनाम सकळा तारी । पाषाणाची नाही परी ॥२॥ हनुमंताचे उपकार । झाला जड जीवा हा वर ॥३॥ गोविंद म्हणे सांगो किती । थोर त्याची जाणा कृती ॥४॥

१६४७) गोकुळी आनंद नंद यशोदेसी । गोप गोपिकांसी होत असे ॥१॥ आनंदाचे धाम आले त्यांचे घरी । उच्चारोनि हरिनाम गाती ॥२॥ सकळही वाद्ये वाजताती घोषे । दास म्हणे हरूषे मन तेथे ॥३॥

१६४८) देवालागी ठकविता । स्वये ठके आपण स्वतः ॥१॥ महाबळी महादैत्य । आला भविष्य सांगत ॥२॥ भक्त होय जरी ठक । देव होय महाठक ॥३॥ भक्ता भविष्य हरिनाम । दासा भेटवी पूर्णकाम ॥४॥

१६४९) पूत नोहे ऐशी बुद्धी । तेचि पूतना कुबुद्धी ॥१॥ मने धरिता सद्‌बुद्धी । देव भेटे तया आधी ॥२॥ जैशी बुद्धी तैसे फळ । बुद्धी धरावी सोज्वळ ॥३॥ बुद्धी सोज्वळ नाम घेता । दासा देव येई हाता ॥४॥

१६५०) भावामाजी नाम घेता । देव करील मुक्तता ॥१॥ बिकट मायेचा हा गाव । उमग कैचा धरणे भाव ॥२॥ माया शकट ज्ञान ग्रासी । कृष्ण निर्दाळी शकटासी ॥३॥ भक्ती हेचि दासा प्रेम । प्रेम नामी मेघश्याम ॥४॥

१६५१) भक्तीमंत होण्या नको शब्दजाल । एक्या भावे बोल रामकृष्ण ॥१॥ येवोनी अंतरी स्वयेची गोपाळ । करील निर्मूळ अहंतेचे ॥२॥ येणेचि गोपिका भाग्यवंत झाल्या । देव वश केला दास म्हणे ॥३॥

१६५२) ब्रह्मा इंद्रादिक झाले शरणागत । श्रीकृष्ण अनंत सर्वव्यापी ।।१।। सद्भावे सुलभ कृष्ण गोपिकासी । ध्याने योगियासी प्राप्त नोहे ।।२।। त्या कृष्णरूपासी अभिन्न विश्वासी । दास म्हणे त्यास कृष्ण भेटी ।।३।।

१६५३) देव भावाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ।।१।। पत्र पुष्प फल तोय । भावे देता प्रिय होय ।।२।। भावविहीन बहुत । देवा नाही आवडत ।।३।। सुदाम्याचे मूठ पोहे । गोविंद म्हणे देव धावे ।।४।।

१६५४) नामयोगे सुदाम्याने । वश केला कृष्ण जाणे ।।१।। नाम साठविले त्याने । तयाविण काही नेणे ।।२।। गोविंद म्हणे पाही । भावे देव आपुला होई ।।३।।

१६५५) कर्माची तो गती बहुत कठीण । सूत्रधार कोण याचा असे ।।१।। कैसे फिरवितो सूत्र कवणे परी । न कळे अंतरी विचारी पा ।।२।। पांडवा फिरविले राज्य हिरावोनी । परी त्यांचे मनी कृष्णनाथ ।।३।। सूत्राचा लाघवी नामसूत्र जरी । फिरविता अंतरी दास धन्य ।।४।।

१६५६) भक्ती देवा कैची पावे । ओळखण हे स्वभावे ।।१।। भूतमात्री देव पाही । हेचि भक्ती थोर आहे ।।२।। ऐसे बोलिले भगवान । अर्जुनासी दिली खूण ।।३।। वात तेलालागी मिळे । तरी ज्योत ती प्रज्वळे ।।४।। डोळा उघडूनी पाही । दास म्हणे अंतर्बाही ।।५।।

१६५७) संकटाचे वेळी । देव भक्ताते सांभाळी ।।१।। देवावरी ज्यांचा भार । धन्य तयांचा संसार ।।२।। त्यांनी जगा दूर केले । एक देवासी जोडिले ।।३।। भीष्मे पण केला खरा । कृष्णे रक्षिले पंडुकुमरा ।।४।। मुखी नाम सदा चांग । दास म्हणे भक्तीयोग ।।५।।

१६५८) परीक्षिती राजा योगी कैसा झाला । देह स्थिर केला सप्तदिन ॥१॥ निर्गुणाचेयोगे शुक योगी देख । शुकाचेनि संगे परीक्षिती ॥२॥ निर्गुणाचा संग निर्गुण करील । सुख हे देईल निर्गुणचि ॥३॥ गुणात्मसुख तोचिवरी गोड । निर्गुणी आवड जव नाही ॥४॥ निर्गुण योगात तीहीचे साधन । देव सांगे खूण दास म्हणे ॥५॥

१६५९) देवा पुष्प समर्पिता । देव भेटे अवचिता ॥१॥ परी पुष्पाची ते खूण । मनी घ्यावी ओळखण ॥२॥ गजेंद्राचे पुष्पाकारणे । देवे केलेसे धावणे ॥३॥ चित्त पुष्प समर्पण । दास म्हणे हे साधन ॥४॥

१६६०) वर्म जाणोनिया आश्रम पालन । करी तरी जाण फल पावे ॥१॥ बाहेर पसारा वाढवोनी सारा । अंतर विचारा वर्तो नेणे ॥२॥ अक्षराचा जप करणे सतत । ब्रह्मचर्यव्रत थोर असे ॥३॥ द्वारकेत देवे दाविला महिमा । दास म्हणे सीमा वर्णवेना ॥४॥

१६६१) वर्म ओळखिता पाही । सत्यज्ञान हाता येई ॥१॥ वर्म जयांचे चुकले । प्राणी आडराना गेले ॥२॥ दास म्हणे सांगो किती । वर्म नाम गा प्रचीती ॥३॥

१६६२) शत अश्वमेध यज्ञ । घडता अकळ ब्रह्मज्ञान ॥१॥ जाय समूळ अभिमान । तरी दिशा ये समजोन ॥२॥ शुकाचार्या बोधिती व्यास । दास नामी पूर्णत्वास ॥३॥

१६६३) कोणी तो असो की नाम मुखी गाता । ब्रह्म त्याचे हाता नाचे स्वये ॥१॥ तोची ब्रह्मज्ञानी सदा समाधानी । अखंड कीर्तनी चित्त त्याचे ॥२॥ तपाचे भोजन नामामृतपान । अमरालागून दुर्लभ जे ॥३॥

एक ब्रह्मज्ञानी करिता भोजन । त्रैलोक्य भोजन फळ येई ।।४।। दास म्हणे ऐसा संतांचा महिमा । सांगितला धर्मा कृष्णदेवे ।।५।।

१६६४) व्यासालागी बोध नारदांनी केला । शुकासी वोळला जनक तो ।।१।। वर्म हे पाहता एक निरभिमान । जेणे भगवान तुष्ट होय ।।२।। दास म्हणे नामी होय पूर्णकाम । अहंतेचे नाम नुरे तेथे ।।३।।

१६६५) पाप म्हणजे काय ते मज सांगिजे । भ्रम दूर कीजे अंतरीचा ।।१।। ऐसा प्रश्न करी उद्धव देवासी । देव उद्धवासी सांगताती ।।२।। पाप अभिमान पाप अहंकार । संशय हा थोर पाप असे ।।३।। साधनी आळस हेचि थोर पाप । परपीडा पाप थोर असे ।।४।। संतनिंदा हा तो पापाचा कळस । हा बोध मनास घेई बापा ।।५।। बोध घेवोनिया मन आवरावे । पाप घालवावे रामनामे ।।६।। संसारात चित्त न निघे बाहेर । पाप हेचि थोर जाण बापा ।।७।। संतनिंदा पाप कैसे घालवावे । संता शरण जावे दास म्हणे ।।८।।

१६६६) काळ कैसा घालवावा । उद्धव प्रश्न करी देवा ।।१।। उपाव तो मला सांगा । काही माधवा श्रीरंगा ।।२।। देव सांगती साचार । शास्त्रविहित आचार ।।३।। काळ चालिला स्वभावे । साधी धन्यता तो पावे ।।४।। ऐसा जो का सदाचारी । एक त्याचा मी कैवारी ।।५।। एकांतीचे निजनाम । हाचि आचार उत्तम ।।६।। ऐसा दासा बोध केला । उद्धवजी सुखी झाला ।।७।।

१६६७) काया शुद्ध कैसी करावी ते सांगा । विनवी श्रीरंगा उद्धव तो ।।१।। शुद्ध आचरणी काया जो वर्तवी । पवित्र जाणावी काया त्याची ।।२।। विटाळाचा गोळा देह हा ओवळा । होईल सोवळा

कोण्या गुणे ॥३॥ जगाच्या कल्याणा झिजविती देह । पवित्र ते काय ऐसे असे ॥४॥ तेवी नामामाजी काया करी स्थिर । पवित्र साचार गोविंद म्हणे ॥५॥

१६६८) तो मी वासुदेव देही । मज शोधोनिया पाही ॥१॥ मज एकासी नेणता । सर्व ज्ञान होय वृथा ॥२॥ एका मानिती अनेक । सकळा ठायी मीच देख ॥३॥ वर्मेवीण केवी कळे । होती डोळस आंधळे ॥४॥ वासुदेव ओळखिला । दास म्हणे ध्रुव भला ॥५॥

१६६९) सर्वस्वाचे दान । भक्ता मागे भगवान ॥१॥ जेणे दिधले तयाला । तोचि भक्त जगी झाला ॥२॥ दान देणे हे कठीण । नामी येईल उमगोन ॥३॥ दास म्हणे बळी धन्य । द्वारपाळ भगवान ॥४॥

१६७०) सत्व राखाया कारण । धीर केलासे जतन ॥१॥ चांगुणाचे सत्त्व गाढे । शिव ठेला उभा पुढे ॥२॥ श्रीयाळ नृपती धन्य । झाले शिवाचे दर्शन ॥३॥ चिलया बाळ धन्य झाला । दास वंदितो तयाला ॥४॥

१६७१) ऐसा कलीचा प्रभाव । गुप्त राहताती देव ॥१॥ नाही देवाचा आठव । एक पोटाचा उपाव ॥२॥ कली म्हणजे भांडण । हेचि त्याची मुख्य खूण ॥३॥ नाही धर्माचा विचार । मना येई तो आचार ॥४॥ विष्णूलागी करिती प्रश्न । काय कलीत तारण ॥५॥ बाह्यरंगाची आवड । अंतरंगी नाही चाड ॥६॥ ऐसे पाहोनिया जन । नारदांचे सचिंत मन ॥७॥ नासा विधीने सेवन । सांगताती भगवान ॥८॥ नारदासी तो आनंद । दासा होय आत्मबोध॥९॥

१६७२) देवाजीचे दरबारी । प्रवेशाची कोण परी ॥१॥ वेडा होवोनिया

जावे । शहाणपणे धोका पावे ।।२।। नारद स्त्री मागो गेला । स्नान करी देऊ तुला ।।२।। ऐसे बोलती भगवान । डोळा घातले अंजन ।।३।। नारद नदीये बुडी मारी । नारदाची केली नारी ।।४।। पतीचा संसार करी । साठ पुत्र प्रसवे नारी ।।५।। शेखी कन्यका सुरेख । कपिलाषष्ठी नाम देख ।।६।। देव तेधवा धावला । नारदासी मुक्त केला ।।७।। देव नारादांचा वर । कपिलाषष्ठी पर्व थोर ।।८।। पर्व साधिले जयाने । देव म्हणे तो मी होणे ।।९।। नारद झाला नारायण । थोर कलीयुगी कीर्तन ।।१०।। साठा होवोनी वेगळा । भोगी पर्वीचा सोहळा ।।११।। मग देवा भेटू गेला । दासा देव आलिंगीला ।।१२।।

१६७३) सतीलागे शाप दिला महेश्वरे । कोकिळ तू त्वरे होसी आता।।१।। तोहि नरतनू गाता रामनाम । शिवासी परम तोष होय ।।२।। पार्वती होता शिव अंगिकारी । रामनाम थोरी ऐशी असे ।।३।। पंचम आलापी दासा नामगोडी । कोकिळा आवडी तया ठायी ।।४।।



पदे

१६७४) जा जा जा मनुजा गुरूला शरण जा ।।ध्रु.।। या संसारी सुख हे नाही । एक सुख गुरुपद रजा । धन सुत दारा दुःखाकारण । या सर्वा मनी देई रजा ।।१।। मोहे भ्रमसी फशी तू पडसी । बऱ्या वाटती बहु गमजा । बऱ्या वाटती खऱ्या नव्हे त्या । एक सुख गुरुपदी उमजा ।।२।। गुरूनामी तू रंगूनी अवघा । माया ममता करी वजा । वजा करीता सजा नसेची । दास सांगतो निजगुजा ।।३।।

१६७५) काही तरी बोध मनी घेई ।।ध्रु.।। ना तरी गत ही पाणी पालथ्या घडयावरी होई ।।१।। खडकी वर्षले आगीत पेरिले उपयोगा नाही ।।२।। श्रवण करोनी कृती न होता व्यर्थ तेचि होई ।।३।। सोनाराने फुंक फुंकुनी मोकळी नळी राही ।।४।। अन्न वाढले गळी न उतरले जेवण ते नाही ।।५।। बहुत वाचले काही न ठरले दासपण ते नाही ।।६।।

१६७६) बोध मनी हा पटवा हो । गुरुबोध मनी हा पटवा हो ।।ध्रु.।। नाम हरिचे घटवा हो । गुरुबोध मनी हा पटवा हो ।।१।। नाम वदे जरी प्रगटे श्रीहरी । नित्य तयासी आठवा हो ।।२।। अंतर भरले होई मोकळे । तरी देवाच्या गोष्टी हो ।।३।। येतील वदनी येतील श्रवणी । ना तरी प्राणी कष्टी हो ।।४।। बोध प्रदाता हो का भलता । बोध हाचि खलु ठेवा हो ।।५।। दास म्हणे मग नुरेचि धोका । जीव शिव भेटी हरिखा हो ।।६।।

१६७७) अर्थ मनी घेई बा रे ।।ध्रु.।। एक चरण तरी यथार्थ कळता धन्य

खरा होई ॥१॥ एक नाम जरी यथार्थ कळता सर्व कळो येई ॥२॥ एका विरहित अगणित अर्थ कळोनिया कायी ॥३॥ दासा हृदयी नामी अर्थ सहज प्रगट होई ॥४॥

१६७८) बा रे अर्थ मनी घेई ॥ध्रु॥ सद्गुरूंनी जे वाक्य कथिले । तोचि बोध होई ॥१॥ श्रवणचि नाही अर्थ तयाचा । कसा मनी येई ॥२॥ श्रवण मनन निजध्यासन जरी का । हेचि धरी सोई ॥३॥ कोण बोलतो काय बोलतो । ओळखुनी राही ॥४॥ सद्गुरुकृपे दासा सोपा । अर्थबोध देही ॥५॥

१६७९) हृदयी वसे रघुवीर प्राण्या ॥ध्रु.॥ त्याग नको करू घरदाराचा । हृदयी शोधीत फिर ॥१॥ असल्या स्थितितची नाम वदे जरी । नाही कशाचि फिकीर ॥२॥ दास म्हणे रे सत्संगतीची । मानू नको तू जिकीर ॥३॥

१६८०) त्या देवाचे स्मरण करी रे ॥ध्रु॥ माते उदरी रक्षित प्रेमे । अमृत सिंचुनी नित्य नेमे ॥१॥ गर्भी सोहंभावे ज्याते । स्मरसी आता काय विसरसी त्याते ॥२॥ तोचि बालपणी तोच तरूणपणी । तोच वृद्धपणी मनी धरी रे ॥३॥ तोचि चालक दासा पालक । खूणगाठ ही हृदयी धरी रे ॥४॥

१६८१) त्या देवाचे स्तवन करी रे । दाता एकचि तो सकळा रे ॥१॥ देणे देवाचे हे सारे । अद्भूत करणी त्याची बा रे ॥२॥ आवर्जुनी या धनासी तू रे । मुद्दल नाम गमविसी का रे ॥३॥ प्रभुपदकमला अर्जविता रे । दासा सहजची कृतार्थता रे ॥४॥

१६८२) हेचि मला हरि दे । दे रे ॥ध्रु.॥ तव चरणाची नित्यही सेवा । अखंडित घडू दे ॥१॥ तव पदकमली स्थिर मन माझे । चिंतनात रमू

दे ॥२॥ आणिक काही दास न मागे । इच्छा मनी नसू दे ॥३॥

१६८३) कष्टत जाई स्वये बा रे ॥ध्रु॥ आत्म्याचा हा धर्म समजुनी । आचरीत जा प्रेमे ॥१॥ भक्तजनांनी साधन करूनी । कष्टविला देहे ॥२॥ इष्ट साधण्या कष्ट लागती । दास कथिता हे ॥३॥

१६८४) सांगितले करी रे मनुजा साधन ॥ध्रु.॥ श्रवणी पेरिले अंतरी आले । बीज तेचि धरी रे ॥१॥ महावाक्य जे गुरूंनी दिधले । चिंतनी विवरी रे ॥२॥ अखंड स्मरणी नामसाधनी । काया कष्टवी रे ॥३॥ तेचि येईल तुजसी उपाया । अन्य अपायची रे ॥४॥ दासा साधनी जन्म सफलता । भाव ओल जरी रे ॥५॥

१६८५) जाणत्यासी जो शरण जाईना । सौख्य तोवरी नाही रे मना ॥१॥ अजाणता घडे व्यर्थ बापुडे । जाण त्यास ते ज्ञान रोकडे ॥२॥ काय तामसा काय राजसा । सात्विकासवे सौख्य तापसा ॥३॥ जाणता असे हृदयी तो वसे । त्यासी विसरसी जाण तू कसे ॥४॥ जाणपण ते स्मरण जाणी गा । विस्मरण ते नेणपण गा ॥५॥ जाण ते गुरू जाण त्या सवे । दास राहतो पूर्ण वैभवे ॥६॥

१६८६) साधी साधी साधी साधी गुरूनाम साधी । गुरुनाम साधिलीया तुटेल उपाधी ॥१॥ गुरूनाम गुरूपाशी गुरुपदी जाई । गुरुपदी जावे कैसे मनी लीन होई ॥२॥ मनी लीन होवोनिया मुखी नाम गाई । मुखी नाम घेता दासा गुरुकृपा होई ॥३॥

१६८७) साधी साधी साधी साधी गुरूनाम साधी । दृढ विश्वास धरिता तुटेल उपाधी ॥१॥ सोडोनिया द्यावी कुमती धरावी सुमती । साधन साधोनिया नेटे हटवी दुर्मती ॥२॥ अभिमान तो सांडावा नामपाठ घ्यावा । दास म्हणे ऐक जीवा बोध हा ठसावा ॥३॥

१६८८) साधी तू निजकाज । हळु हळु ।।ध्रु.।। रामनाम तू गाई मुखाने । धरू नको मनी लाज ।।१।। कल्पनेची धावाधाव ही । काय तयाचे काज ।।२।। संसाराचा बंध पावसी । रामनामी नाराज ।।३।। दासाचे मनी नामचि गायन । देती जे गुरुराज ।।४।।

१६८९) नियमखूण अभ्यासिता आत्मयोग पाही । वियोगाची वार्ता जेथ नुरे सर्वथाही ।।१।। होई आत्मयोगी बा, तू होई आत्मयोगी । मग आत्मसुख प्राप्त होय तुजलागी ।।२।। देही नियमखूण नाम संत बोलताती । दास म्हणे अघटित दाविती प्रचीती ।।३।।

१६९०) जरी मीपण जाई तरी सुख सहजचि पाही । ते मीपण जाण्या नवल पक्षीरूप पाही ।।१।। या मीपण विरहित जे जे साधन होई । त्या पुण्यालागी गणन न करता येई ।।२।। ते रूप हरिचे नांदतसे निजदेही । जे द्वासुपर्णा यांत कथी श्रुती पाही ।।३।। हा बोध सुखाचा जीव पक्षी मनी घेई । तरी मीपण नासे दास मुक्तचि होई ।।४।।

१६९१) आळस सोड आळस सोड । आळसाचि तू संगत सोड ।।१।। नव्हे सखा नव्हे सखा । आयुष्य फुका नेईल तो ।।२।। आळस फार आळस फार । दुःख अपार देईल की ।।३।। आळस रे आळस रे । साधनाचा किळस रे ।।४।। आळस करा आळस करा । आळस करा वासनेचा ।।५।। तरीच जाणा तरीच जाणा । गोविंद म्हणे रामराणा।।६।।

१६९२) कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप पाही । हळद पिऊनिया कोण गौर वर्ण होई ।।१।। नयनाच्या नयनात भरोनिया राही । शामसुंदर मनोहर रामरूप पाही ।।२।। मी तू पणा अनिवार जयेठायी नाही । चैतन्यात चित्तवृत्ती विरोनिया जाई ।।३।। श्रवणाच्या श्रवणात रामनाम

घेई । वदनाच्या वदनात अखंडित गाई ॥४॥ मनाच्याही मनामाजी साठवोनी राही । दास म्हणे गुरुकृपे अनुभवी होई ॥५॥

१६९३) कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप पाही । कसोनिया निजमने ब्रह्मरूप होई ॥१॥ श्वासोच्छ्वास या देहात चालताती पाही । तयामाजी नाम घेता कसणे ते होई ॥२॥ ऐसा कसोनि राहिला तया उणे नाही । दास म्हणे तया राम दिसे अंतर्बाही ॥३॥

१६९४) कसे कसे कसे कसे ब्रह्मरूप होती । जसे जसे जसे जसे मने नाम घेती ॥१॥ तसे तसे तसे तसे अनुभव पावती । नसे नसे नसे नसे कल्पना जया ती ॥२॥ ठसे ठसे ठसे ठसे एक नाम चित्ती । असे असे दास म्हणे संत ब्रह्ममूर्ती ॥३॥

१६९५) जो तो आपुल्या ठायीच थोर ॥ध्रु.॥ करी सदा जो निजकर्तव्या । नाही जगाचा घोर । स्वकर्म ज्याने आपुले केले । ध्रुव लहान तो पोर ॥१॥ पोर तयासी कुणी म्हणावे । मुनी म्हणती ज्या थोर । ऐशी पदवी ज्या पोराची । अढळ जगी शिरजोर ॥२॥ प्रल्हादाने देव जोडिला । करुनी भक्तीचा जोर । काळ तयासी भिऊन पळाला । होऊनिया कमजोर ॥३॥ साधुजनानी कर्तव्याची । नाही सोडिली कोर । दास म्हणे ते देवचि झाले । जो हलवी जगाचा दोर ॥४॥

१६९६) जो तो आपुल्या ठायीच थोर ॥ध्रु॥ सदा पाळी जो निज कर्तव्या । नाही कशाचा घोर ॥१॥ रामनाम हे थोर वदता । सान होतसे थोर ॥२॥ काळ तयासी लीन होतसे । सर्व जगा शिरजोर ॥३॥ कर्तव्याचे पालन करिता । न सोडी नाम कोर ॥४॥ दास विनवितो सकल जनासी । हो का लहान थोर ॥५॥

१६९७) जेथील तेथे ज्याचे त्यास ॥ध्रु.॥ एका सरिसे एक दाविता ।

न मिळे मेळ तयास । आतुनी आले तेचि झाले । पूर्वीचा अभ्यास ॥१॥ पूर्वीचा गुण कदा सुटेना । वाटे गोडची त्यास । एकाची गते नसे दुजासी । चढवुनी त्या ठायास ॥२॥ सत्संगतीचे ठाव साधिता । दासा भजनी आस । अखंड कीर्तन नामसाधन । विश्रांती ही मनास ॥३॥

१६९८) अरे देव तू अरे देव तू । अरे देव तू अरे देव तू । तुझा तूचि तू तुझा तूचि तू । तुझा तूचि तू तुझा तूचि तू ॥ध्रु॥ विचारेचि तू शोधी तुज तू । सद्गुरूची कृपा होता तुझा तूचि तू ॥१॥ स्थूळाहूनी तू सूक्ष्माहूनी तू । कारणाचे पलीकडे तुझा तूचि तू ॥२॥ कोशातीत तू पंचकोशातीत तू । तीन्ही अवस्थांचा साक्षी तुझा तूचि तू ॥३॥ अरे ब्रह्म तू अरे ब्रह्म तू । गोविंद म्हणे गुरूकृपे तुझा तूचि तू ॥३॥

१६९९) श्यामधवल कृष्णनीळ मेळवी भवी रे ॥ध्रु॥ मकर पर्वकाळ आला । गुरुचरण पाहु चला । रामनामी वृत्ती हलवा । बोलावे ते गोड रे ॥१॥ विषयाचा काटा जरी । भुलू नको तयावरी । आत बैसलासे हरि । शोध त्याचा घेई रे ॥२॥ गुरुचरणी मन वळवी । निजबोधे तीळ मिळवी । जन्ममरण हे चुकवी । यमयातना रे ॥३॥ हरिकथेत सर्वकाळ । वाटतील तीळगूळ । नित्य घेती लहान थोर । दासा नाम गोड रे ॥४॥

१७००) दीपावली दीपज्योती नयनी देखिली । सद्गुरुच्या पूर्णकृपे हृदयी प्रगटली ॥१॥ अनंत दीप झगझगाट होय अंबरी । पाताळी त्याच परी हृदयमंदिरी ॥२॥ तेलवाती पात्राविण तेज कुसरी । चंद्र सूर्य विद्युताग्नि न पवे सरी ॥३॥ स्वयंप्रकाश झगझगाट होय अंबरी । पाहुनिया समाधान दास अंतरी ॥४॥

१७०१) वृंदावनीची शोभा तू पाही । देव दयाघन कसे जया ठायी ॥१॥ वृंदावनी या देव रमला । कैसे जाऊनी पाहसी त्याला ॥२॥

यमुनेपैल वृंदावन । यमुना फुगली चारी कोन ॥३॥ नामाची सांगड घालुनी जाण । गोविंद देखे तो भगवान ॥४॥

१७०२) गौळणी म्हणती सूरदासासासी । आलो साक्ष वदण्यासी ॥ध्रु॥ सूरदास म्हणती तयासी । सांगता काय हो मजसी ॥१॥ मी शुभ्र रंग वस्त्राची । बहु प्रीत मला कृष्णाची ॥२॥ मी रक्त वस्त्र हे ल्याले । अनुरक्त कृष्णपदी झाले ॥३॥ पोपटी वस्त्र हे माझे । हरिवीण मनी नच दुजे ॥४॥ वसने मज असती पिवळी । मम चित्त हरिपदा जवळी ॥५॥ कृष्ण वस्त्र लेऊनि आले । मी कृष्ण मनाने झाले ॥६॥ बहु मैत्री आम्हा राधेची । सांगतो शपथ कृष्णाची ॥७॥ सूरदास म्हणती तयासी । कृष्णची हवा साक्षीसी ॥८॥ वासना हेचि मम चित्ती । गोविंद प्रेम प्रचीती ॥९॥

१७०३) नवे नवे नवे नवे नवे नित्य नवे । आदिअंत पहाता थकले देवादि मानवे ॥१॥ नवे नवे नवे नवे नवे रूप साचे । नवे कदा ओसरेना कीर्तनी रंगाचे ॥२॥ अखंड अक्षय अनादी जे पूर्णपणे । दास म्हणे गुरूकृपे नाम खूण बाणे ॥३॥

१७०४) अखंड कीर्तनी बुद्धी जरी । त्याच्या पापा नाही उरी ॥१॥ अखंड कीर्तनी चित्त जरी । त्याच्या संन्निध सदा हरि ॥२॥ अखंड कीर्तनी मन जरी । उन्मनीचा रंग तरी ॥३॥ अखंड कीर्तनी अहं नुरी । दासा सोऽहं तेचि तरी ॥४॥

१७०५) हा लोभ सोडी तू साचा । गृह दारा धन सुत यांचा ॥१॥ लोभ धरी सत्संगाचा । लोभ धरी हरिनामाचा ॥२॥ लोभ धरी एकांताचा। लोभ धरी मनन सुखाचा ॥३॥ लोभ धरी गुरुवचनाचा । दासासी गुरुकृपेचा ॥४॥

१७०६) अरे मना मोह सोड हृद्वैरी ॥ध्रु॥ मोह धनाचा अतिशय वाईट । स्त्रीपुत्रांचा मानी तू वीट । मधुर रामनाम हे अवीट । केवी अमृतकारी ॥१॥ मोह धरोनी सज्जनसंगी । रंगुनी जावे रामरंगी । ऐशा रंगे अंतर रंगी । करी प्रभुची वारी ॥२॥ दास बोलिला जे ही बोली । साधक सज्जनी घेता भली । प्रपंचाची घालमेली । भवभय देव निवारी॥३॥

१७०७) बा रे मोह मुळी तोडी । मग तुज सहज देव जोडी ॥१॥ मोहाचे मूळ समूळ तुटता । मूळ नामी गोडी ॥२॥ समूळ मुळाचे छेदन करुनी । साधन सुख जोडी ॥३॥ दासा तेचि मूळ सापडे । सुटती भवकोडी ॥४॥

१७०८) सोस सोडी मना सोडी मना । का करिसी वल्गना ॥ध्रु॥ वेगी सावध हो हरिभजना । देईल शांती मना ॥१॥ ठेवा संन्निधची हा असता । का फिरसी वणवणा ॥२॥ धनादिकांचा लोभ फुका । का करिसी कल्पना ॥३॥ अंतरी मानवल्या सद्गुरूच्या । गोविंदासी खुणा ॥४॥

१७०९) सोडी मना अभिमान । बा रे गाई रामनिधान ॥१॥ अभिमानाविण अल्प साधिता । होते मेरू समान ॥२॥ गिरिसम असता अभिमानाने । होते काही न जाण ॥३॥ देवाजीचे दर्शन होता । नुरेचि हा अभिमान ॥४॥

१७१०) सहज बोधे फिरवी । मन हे सहज बोधे फिरवी ॥ध्रु॥ सद्गुरूनी जे अक्षर दिधले । तेचि सदा गिरवी ॥१॥ काय कशाला आणिक साधन । गुरुपदी मन जडवी ॥२॥ गुरुचरणीचा मार्ग सुखाचा । दुःख सर्व हरवी ॥३॥ सद्गुरुबोधे आनंद भरला । दास तेथ मिरवी॥४॥

१७११) तू धरी वासना इष्ट हरी भजनाची । धरू नको वासना दुष्ट

पुनर्जन्माची ॥१॥ काय धरिसी वासना दारा धन सुत यांची । तू धरी वासना सदा संतसंगाची ॥२॥ काय धरिसी वासना अहितकारी दुजियासी । तू धरी वासना हितकर जी सकळासी ॥३॥ ही दुष्ट वासना नाश करी प्राण्यासी । हे गूज सांगतो गोविंद सर्वांसी ॥४॥

१७१२) सहज मन नेई, बोधी । सहज मन नेई ॥१॥ बोधामाजी मन हे रिघता । ज्योत प्रगटे देही ॥२॥ सकार हकारी बोध भरला । तो मी पाही ॥३॥ तो मी बोधी तन्मय होता । नाम दुजे नाही ॥४॥ दास म्हणे अनुभव नाही । अनुभवोनि पाही ॥५॥

१७१३) काय पाहसी कसोटी तू दुजियाची बा रे । आधी तू आपुले स्वहित कर्म आचरी रे ॥१॥ का पहात बससी दोष दुजाचे सारे । बा काय फायदा त्यात तुझा आहे रे ॥२॥ तू विचार करूनी दोष आपुले सोडी । मग खचित कळे तुज रामरसाची गोडी ॥३॥ ही गोष्ट साधण्या संतसमागम जोडी । गोविंदा नुरली जन्ममरण परवडी ॥४॥

१७१४) काळ जाई काळ जाई । काळ जाई काळ जाई ॥१॥ सुख जाई सुख जाई । सुख जाई सुख जाई ॥२॥ दुःख जाई दुःख जाई । दुःख जाई दुःख जाई ॥३॥ रथ नेई रथी जैसा । काळ तैसा जीव नेई ॥४॥ शाश्वतात नाम घेता । दास ब्रह्मरूप होई ॥५॥

१७१५) कैसा हा खेळ कैसा हा खेळ । उमगता एकसरा भेटेल गोपाळ ॥१॥ चौऱ्याऐंशीचा फेरा चौऱ्याऐंशीचा फेरा । नरकद्वार ओलांडिता भेटी रघुवीरा ॥२॥ चौऱ्याऐंशीचा खेळ नामी जडवी वेळ । ऐसे जाणताची दासा भेटे घननीळ ॥३॥

१७१६) काय धनहीनासी देव सोडितो पाही । काय धनवानासी देव

जोडतो पाही ॥१॥ हा देव असे सर्वांना समचि देही । जा शरण तयासी मनुजा तू लवलाही ॥२॥ काय देव जोडण्या द्रव्य उपेगा येई । तरी देव भोजना विदूर घरी का जाई ॥३॥ धनहीन जगाचा देव सुदामा पाही । परी देव तयाचे पोहे मागुनि घेई ॥४॥ हा देव कुणाचा प्रश्न मनासी घेई । भाविका भेटतो दास म्हणे नवलाई ॥५॥

१७१७) साधनी मन घटवी । बा रे साधनी मन घटवी । साधन कोठे कसे करावे । चित्ताला पटवी ॥१॥ मनोवृत्तीचा निरोध करूनी । नाम सदा आठवी ॥२॥ श्वासोच्छ्वासी नाम साधुनी । काळाला हटवी ॥३॥ साधनी घटता ते बळ अद्भुत । दासाची पदवी ॥४॥

१७१८) समजत जा रे समजत जा रे । भ्रांति त्यजुनि सारी । निर्भयपद हे सुंदर आहे । चिंता शोक निवारी ॥१॥ अनुभव नाही प्रत्यय नाही तेथे काहीच नाही । बडबड बडबड व्यर्थचि करणे केवी रिपू साही ॥२॥ अर्थाविण ते भूस त्यजावे धान्यचि हाती घ्यावे । कोणी हो का आप परावे सार शोधुनी घ्यावे ॥३॥ दास म्हणे रे गुणगुण अंतरी हे तो अघटित आहे । पहा पहा हे पहा पहा तरी तद्रुप होऊनि राहे ॥४॥

१७१९) नाही नाही नाही नाही दुजी वेळ नाही । शुभकार्य मनी घेता त्वरित करीत जाई ॥१॥ आयुष्याचा नेम नाही क्षणभंगुर पाही । साधेल तो साधी घटिका हरिनाम घेई ॥२॥ आज करू उद्या करू म्हणणे हे काई । करिसी ते पदरी पडे बोल व्यर्थ होई ॥३॥ खंड नाही रामनामी अखंडित देही । गोविंदासी सहज घडे काळ वेळ नाही ॥४॥

१७२०) देव आपुला सखा सखा । अहं अविद्या फुका फुका ॥१॥ अहं अविद्या कारण । जीवा जन्ममरण ॥२॥ अहं अविद्या मायबाप । दुःखा कारण ते पाप ॥३॥ स्त्री तो जाणा कल्पना । दास म्हणे ती वल्गना ॥४॥

१७२१) मनी धरिजे राम । त्यावीण कैसे सुख विश्राम ॥१॥ मनात नाही तेचि नाही । आहे होईल काम ॥२॥ अंतर्भाव असे सुखकारी । त्याविण पोकळ नाम ॥३॥ रामनामी हा लाभ सुखाचा । दासाचे सुखधाम ॥४॥

१७२२) मना सेवी तू सुखकंद ॥ध्रु॥ नवइंद्रिये निवृत्त होती । होऊ नको तू धुंद ॥१॥ मनीचे अफाट विचार सांडी । रामनाम घे बुंद ॥२॥ आनंदाच्या कंदसेवनी । दास अंतरी तुंद ॥३॥

१७२३) मना तू सुख हे घेसी सदा ॥ध्रु॥ सद्गुरुवचना पाळिसी नेमे । चढसील ब्रह्मपदा ॥१॥ सर्व इंद्रिया प्राण श्रेष्ठ हा । अर्पिसी गुरुपदा ॥२॥ जरी मना तू नायकिसी हे । पडसील नरकी सदा ॥३२॥ रामनाम ही दोन अक्षरे । निवारिती आपदा ॥४॥ अंतरीचे गूज दास सांगतो । हीच खरी संपदा ॥५॥

१७२४) मन हे मोठे आहे धूर्त ॥ध्रु॥ सोटा बसता येईल वळणी जैसे रेशीम सूत ॥१॥ सर्व सिद्धि ते देईल आणुनि जरी का होईल पूत ॥२॥ मोक्ष साधनी मनुजा करिते प्रत्यक्षचि अवधूत ॥३॥ सोटा गुरूचा मनास बसता नामचि अनस्यूत ॥॥४॥ आणिल दासाचिये वदनी मन हे देवदूत ॥५॥

१७२५) आसन ते आस न ते । अधिकचि ते आसन ते ॥ध्रु॥ जये ठायी बसू जाता । ब्रह्मचित्ती स्थिर होते ॥१॥ मृग व्याघ्र दर्भ वस्त्र । बहू पाही प्रकाराते ॥२॥ योग शास्त्री वज्र पद्म । साधीताती आसनाते ॥३॥ गुरुकृपे नाम घेता । दास म्हणे कळो येते ॥४॥

१७२६) आसन ते आसन ते । आस न ते आसन ते ॥१॥ आस जरी

आस जरी । काय करी आसन ते ॥२॥ आस नुरे आस नुरे । आस नुरे आसन ते ॥३॥ न ढळे जे न ढळे जे । न ढळे जे आसन ते ॥४॥ जया ठायी मन स्थिर ते । दास म्हणे आसन ते ॥५॥

१७२७) पर्वकाळ साधावया जळी बुडी मारी । पर्व गेले निघोनिया काही न पदरी ॥१॥ यमपर्व दिसे डोळा कोणती तयारी । धर्म कर्म साधू जाता वर्म राहे दुरी ॥२॥ अनुक्रमे वर्षामध्ये पर्वे येती जाती । नरजन्मी साधुजनी साधियेली युक्ती ॥३॥ तयामाजी पर्वकाळ गुरूआज्ञा मनी । संक्रमण नामी होता दास धन्य जनी ॥४॥

१७२८) अर्धोदय पर्वकाळ आजि पातला ॥ध्रु॥ मन विशाल रूपी भरे । श्रवणामधी नाम स्थिरे । अबोलात बोल सरे । अर्ध प्रगटला ॥१॥ नामामधी रूप भरे । प्रवृत्ती निवृत्ती जिरे । देवरूपी भक्त नुरे । अर्ध भासला ॥२॥ गुरुपदी शिष्य विरे । गुरुनामी शिष्य मुरे । धणीपदी दास नुरे । अर्ध राहिला ॥३॥

१७२९) ही साधील त्याला संध्या । साधुवृंदा ॥धृ॥ संध्या नित्याचे साधन । घ्यावी वर्म ओळखण । तरीच चुके जन्म मरण । थोरविद्या ॥१॥ सूत्र निर्गुण अंतरात । नित्य नवे अखंडित । संधी साधुनी जपत । मंत्रविद्या ॥२॥ मुख्य संध्येचे लक्षण । मंत्रे देहाचे निवारण । आत्मसूर्याचे दर्शन । आत्मविद्या ॥३॥ संध्या पुरुषाला दिधली । ही तो असे मिथ्या बोली । मंत्र तेथे संध्या आली । गुप्तविद्या ॥४॥ नामे संदेह निरसन । संधी माझारी स्मरण । हेचि संध्या दासा लागून । पहाता त्रिधा ॥५॥

१७३०) विसरत जा संसार बा रे ॥ध्रु॥ हरिस्मरण विस्मरण नसावे । वेदाचे जे सार ॥१॥ देवालागी विसरुनि का तू । चौऱ्याऐंशी फिरणार ॥२॥ दास म्हणे रे तन्मय होऊनी । नाही का सुटणार ॥३॥

१७३१) जातील रे जातील रे । जातील रे दिन जातील रे ॥१॥ सुखाचे सुखाचे जातील रे दिन सुखाचे । दुःखाचे दुःखाचे जातील रे दिन दुःखाचे ॥२॥ कधी सुखी कधी दुःखी । मुखी हरिनाम तरीच बरे ॥३॥ दास म्हणे दास म्हणे । हरिनामे धन्य जिणे ॥४॥

१७३२) प्रेमभरे माथा घेती प्रपंचाची गोणी । जाई दूर ओझे घेता हरिनाम कोणी ॥१॥ सोस नोहे बरा बा रे सोस नोहे बरा । का बा व्यर्थ करितोसी आयुष्य मातेरा ॥२॥ नाम वदनी घेता उडे संसाराची गोणी । लाभ हातालागी येता दूर होय हानी ॥३॥ संतावीण जगती या सोडवीना कोणी । दास म्हणे भले तेची श्रवणी संतवाणी ॥४॥

१७३३) जो नर संसारा विकला । तो नर परमार्था मुकला ॥ध्रु॥ असुरी माया जनासी फसवी । तेणे तो फसला ॥१॥ मायिक माया नश्वर काया । धरुनी तो बसला ॥२॥ दास म्हणे रे जवळीचा देव । नाही ओळखिला ॥३॥

१७३४) होऊनी लेक । देखिले ईश्वरी सुख ॥ध्रु॥ सासर सोडुनी गुरुगृही गेले । निज ठायी मन स्थिरावले । आपुले आपण शोधिले । सरले दुःख ॥१॥ नामस्मरणे अंतरी गेले । श्वासोच्छ्वासी नाम साधिले । गुरुराये मग लाड पुरविले । हरली भूक ॥२॥ सद्गुरु लेक सांगते सकळा । एकचि लेई आपुले डोळा । दास म्हणे तू भोगी सोहळा । अंतरी देख ॥३॥

१७३५) रामपदी धरी प्रीत रे । राजारामी प्रीत रे । जगासी दाविती नीत हेचि । साधुजनांची रीत रे ॥ध्रु॥ वाचे गाई गीत रे । काळ तयासी भीत रे । देवालागी आपला करिता । होय तयाचे हीत रे ॥१॥ स्त्री पुत्र अंकित रे । जोवरी आहे शीत रे । प्रीतीची ही रीत पाहता । मन होय

चकीत रे ॥२॥ नामी स्थिर चित्त रे । विजय प्रेम हे स्थित रे । रामभक्ती प्रेमे करिता । गोर्विंद थक्कित रे ॥३॥

१७३६) तू पाही विसावा अंतरी शोधुनि बा रे । जो प्राप्त झालिया दुःख जाई विलया रे ॥१॥ तू संतपदासी लीन जरी का होसी । तरी नामी विसावा येई सहज हातासी ॥२॥ तू एकापासुनी एकोणीस हे टाकी । मग दासा नामी सहज विसावा हा की ॥३॥

१७३७) कोण मी कैचा कोठुनी येई । या गोष्टीचा शोध तू घेई ॥ध्रु॥ कोण न कळता कळुनी कायी । सर्वही कळणे व्यर्थचि होई ॥१॥ दास म्हणे मनी नामचि घेई । सार विचारे अनुभव पाही ॥२॥

१७३८) पंडित तो पंडित तो । हित जाणे पंडित तो ॥१॥ अक्षर ते ओळखिता । क्षर उरेचिना चित्ता ॥२॥ अक्षराचे मंदिरात । सदा राहे तो निवांत ॥३॥ ऐसा एक जरी पाही । जगा उद्धरिता होई ॥४॥ हित रामनामी आहे । दास म्हणे देही पाहे ॥५॥

१७३९) पंडित तो भला । नामे जाहला आगळा ॥१॥ नामज्ञाने हीत । वेद शास्त्राचे मथीत । अशाश्वती ये शाश्वत । दासा गुरूनामी प्रचीत ॥३॥

१७४०) आपण आपुला विश्वास धरी तू । आपण आपुला विश्वास ॥ध्रु॥ काय दुजाचे येतील कामा । आपणा श्वासोच्छ्वास ॥१॥ आपुले घोडे आपुले हाती । धरी स्वार हो खास ॥२॥ लगान दुसऱ्या हाती देता । होईल त्याचा नाश ॥३॥ नेत्र दुजाचा दृष्टी न देई । आपुलिया नेत्रास ॥४॥ काय दुजाचे येतील कामा । पद ते चालायास ॥५॥ आत्मा आपणचि ऐसे जाणुनी । समजुनी घेई त्यास ॥६॥ येईल कामा दास म्हणे करी । दुजियाचाची निरास ॥७॥

१७४१) अंतरी होसी धीट रे तू । अंतरी होसी धीट ॥ध्रु॥ तरी मग सकळही कार्य साधुनी । पहासी चरण सम नीट ॥१॥ नामस्मरणी वीट कशासी । रामनाम मूळपीठ ॥२॥ अंतरमार्गी प्रवेश करुनी । हरिभजनी ही अवीट ॥३॥ दास म्हणे गुरुमार्गी नामी या । टळते सर्व अरिष्ट ॥४॥

१७४२) अभय ऐसे काय जगी विचारोनि पाही । देवपद ते निर्भय राही तया ठायी ॥१॥ संतसंगे मनोमार्गे आकळे श्रीपती । तयाचिया नामे होसी निर्भय तू चित्ती ॥२॥ दावियेली ही प्रचीती प्रल्हादादी संती । सदा मुखी नाम गाता दासा ब्रह्मस्थिती ॥३॥

१७४३) द्वैतामाजी भीती । ते तो नाही की अद्वैती ॥१॥ अद्वैत जे नाम हरि । द्वैत नाम नेई दुरी ॥२॥ दास होता नाममय । सदा अंतरी निर्भय ॥३॥

१७४४) जा नित्य नवे जे तेचि समजुनी घेई । ज्या धारण करिता वृत्ती ब्रह्ममय होई ॥१॥ जे आदी मध्ये अंती तगते पाही । ते सूत्र जाणता सर्व ब्रह्ममय होई ॥२॥ तेच जो पवित्र अंतरी शोधुनी पाही । बा दास म्हणे ते नामी हातासी येई ॥३॥

१७४५) जे सत्य अंतरी तेच पटवुनी घेई । जे वाचे लागी वदण्या लाजची येई ॥१॥ तू बोल बोलसी सत्य म्हणुनी जो पाही । तो बोलू जाता सत्य निराळे राही ॥२॥ घे अनुभव याचा अंतर शोधुनि पाही । तो बोल बोलण्या तुझी गरज मुळी नाही ॥६॥ ते सहज देवची आपण बोलतो पाही । ते सत्य नाम तू ओळखूनी स्थिर होई ॥४॥ ते सत्य गुरुकृपे ओळखिता लवलाही । मग दासालागी असत्य उरले नाही ॥५॥

१७४६) एक नाम धरी रे नेमी ॥ध्रु॥ बहुत धरोनी सांग न घडता ।

साधन व्यर्थ तरी रे ॥१॥ नेमाविण ते भोजन करणे । शास्त्र म्हणे नव्हे रे ॥२॥ काही न करुनि नामी नेम धरी । दासा उद्धरी रे ॥३॥

१७४७) अधिक मधुर ते काय रे । रामनाम रस पाहे रे ॥ध्रु॥ अवीट तसेचि मुक्तीदायक । अमृतसेवनी वीट रे ॥१॥ नामगोडी ही कशी चाखावी । करणी उमजुनी घेई रे ॥२॥ आप दुजाचे मरण चुकवी जे । दास नाम ते गाय रे ॥३॥

१७४८) काय पाहसी तमासा नाम अंतरी घेई । ज्या नामसाधनी रूप अनुभवा येई ॥ध्रु॥ जे रूप पाहता मन हे तल्लीन होई । जे नित्य निरंतर हृदयमंदिरी राही ॥१॥ जो ईश पाहता धन्य जन्म हा होई । ज्या ठायी निशिदिनी झडती अनुहत घाई ॥२॥ नवनाद सप्तसुर घोष एकचि देही । दासासी गुरुकृपे सहजी दिसे नवलाई ॥३॥

१७४९) तो विश्वासी तो विश्वासी तो विश्वासी । रामनाम ज्याचे श्वासी तो विश्वासी ॥१॥ विश्वासासी जतन करी तो विश्वासी । काय तयासी कारण या विश्वासी ॥२॥ संकल्प विकल्प अपार ज्याचे श्वासी । तो एक अविश्वासी दिसे पापराशी ॥३॥ गुरुवचन धरी तोची एक विश्वासी । येर पाहता दास म्हणे अविश्वासी ॥४॥

१७५०) घेई जे हरिनाम कलीयुगी ॥ध्रु॥ नको जगाकडे पाहता राहू । स्वरूपी घे विश्राम ॥१॥ बोल जगाचे नच ऐकावे । मनी धरी दृढ राम ॥२॥ स्वहित तुझे तो यातची आहे । रामजपे आराम ॥३॥ संत साधु श्रीमंतची या जगी । देती तारक नाम ॥४॥ कलीमल हारक निजसुखकारक । दासा प्रभुचे नाम ॥५॥

१७५१) सत्यचि रे सत्यचि रे । नाम हरिचे सत्यचि रे ॥१॥ संतांचे संतांचे । सदा सर्वदा अंतरीचे ॥२॥ सत्यचि ते मधुरचि ते । नाम हरिचे

एकचि ते ॥३॥ सत्य गुणे सत्य गुणे । देवपणा तो सत्य गुणे ॥४॥ दास म्हणे दास म्हणे । सर्व काही हरिनाम गुणे ॥५॥

१७५२) श्रवण करी श्रवण करी । श्रवण करी श्रवण करी ॥१॥ हरिनाम शिवनाम । रामनाम स्मरण जरी ॥२॥ सदाकाळ सदाकाळ । सदाकाळ जे अंतरी ॥३॥ परा पश्यंती मध्यमा । वैखरीये जे उच्चारी ॥४॥ योग्य काळ दोन तीन । दास म्हणे पाच धरी ॥५॥

१७५३) या देवाचे स्मरण करी रे । दाता एकची तो सकळा रे ॥१॥ देणे देवाचे हे सारे । अद्‌भुत करणी त्याची बा रे ॥२॥ आर्जवुनी या धनासी तू रे । मुद्दल नाम गमाविसी का रे ॥३॥ प्रभूपदकमळा आर्जविता रे । दासा सहजची कृतार्थता रे ॥४॥

१७५४) देवाची करणी । न कळे देवाची करणी ॥ध्रु॥ अघटित घटना न कळे ज्याची । पाहता दिसे नयनी ॥१॥ कैसे झाले कोठुनि आले । जग हे कोण धणी ॥२॥ दयावंत तो भक्तालागी । नेई सुखसदनी ॥३॥ न कळे म्हणुनी दास सदा तो । लीन हरिचरणी ॥४॥

१७५५) देव भेटे देव बोले तरी तोही कच्चा । गुरुकृपे ज्ञान होता संत म्हणती पक्का ॥१॥ देवाजीच मूळरूप गुरूवीण कैचे । कळे तुज सांग बापा साधनी तू कसे ॥२॥ मूळरूपी मिळता मन देवभक्तपण । दासपण नुरे तेथे हेची पूर्णपण ॥३॥

१७५६) देव भेटे कसा कसा । साधनी मन लाऊनी बसा ॥१॥ कंठी नामस्मरणी असा । सद्‌गुरूलागी पुसा पुसा ॥२॥ प्रपंच पाठी वसा वसा । दास म्हणे त्या रुसा रुसा ॥३॥

१७५७) देव करील कृपा तयावरी ॥ध्रु॥ मंत्र मुखाने सतत गाई जो । राम राम सोपा ॥१॥ सोपा मंत्र सहजची गाऊनी । भरेल जो मापा ॥२॥ माप साधुनी दास म्हणे जो । चुकवी जन्मखेपा ॥३॥

१७५८) गुरुगूज नसावे ओठी । साठवी पोटी ।।ध्रु।। साठविणे हे अवघड गोष्टी । न साठविता प्राणी कष्टी । त्यासी स्वरूप कईचे दृष्टी । नाम गोष्टी ।।१।। अन्नलेप लाविताची पोटी । आतील भूक शमेना मोठी । हे तो अनुभवाची गोष्टी । जीवा मोठी ।।२।। गुरूचे वचन मोलवान । श्रवणातून मनी घेऊन । अखंड त्याचे करी चिंतन । धरुनी कंठी ।।३।। पोटी धरिले सदाशिवे । पाया लागती सर्व जीवे । दासा सद्गुरुचा अनुभव । भाग्य लुटी ।।४।।

१७५९) मंगलधामी नेऊनी शिष्या लाविती गुरु गोडी । ऐसे स्वामी जगी धन्य ते येर काय जोडी ।।१।। बहुतचि गुरू बहुतचि शिष्य साधन परवडी । धामचि ठावे नसता सर्वही पाहता लबाडी ।।२।। मंगलधामी गुरूगोडी ही अमृत माऊली । श्वसने प्रणवनाम ओढी समता साऊली ।।३।। दास म्हणे गुरुगोडी संत हे घेती ओळखून । कष्टातील ती काय करावी व्यर्थचि पासवण ।।४।।

१७६०) जानवे नित्य जे तेचि समजुनी घेई । जे उमजुनी येता ब्रह्मरूपता देही ।।१।। जे त्रिगुण व्यापुनी त्रिगुण विरहित राही । त्यावीण या जगी काही तगतचि नाही ।।२।। या त्रिवेणी संगमी सूत्र रामरूप पाही । ज्या मिळणी होता ब्रह्म गाठीसी येई ।।३।। खूणगाठ लाभता नामचि अंतरी राही । हा संधिकाळचि दासा निःसंदेही ।।४।।

१७६१) जगात मोठे काय रे । विचारोनी पाहे रे । रामनाम सकळा मोठे । तेचि वाचे गाय रे ।।१।। गाता गाता पाहे रे । ब्रह्मरूपचि होय रे । आदी नाही अंत ज्यासी । न कळे अपरंपार रे ।।२।। चिद्शक्ती तू पाहे रे । चिदानंद आहे रे । अलक्ष लक्षुनी अबोलण्यात । दास म्हणे तू राहे रे ।।३।।

१७६२) पाही पाही मनुजा पाही विचारोनी पाही । देव असे सदा न्यायी कदा न अन्यायी ॥१॥ जो जे करिती तो ते भोगी हेचि सत्य पाही । देव सकळाचा देखणा पाहे सर्वा ठायी ॥२॥ देवा घरी सदा घोष अनुहात घाई । नामस्मरण देतो कैचे गोविंदासी पाही ॥३॥

१७६३) रामनामी मन फिरवी फिरवी जे । दाही दिवशी मिरवी मिरवी जे ॥१॥ हेचि बिघडते या नरदेही । रामनामी मन फिरत जे नाही ॥२॥ भज रे भज रे रघुवीर पाही । त्याचे चरणी ठेऊनी डोई ॥३॥ दास म्हणे हे साधित पाही । काही तयाला अवघड नाही ॥४॥

१७६४) रामनाम गोडी घेता इतराची ती काय चहा । अंतरदृष्टी करूनि बा रे विचारोनि या मनी पहा ॥१॥ रामनाम हा गोड लाभची वाटतसे जीवा । चहाताची परि कोणी नाही मथुरेचा मेवा ॥२॥ माल बहुतची बरवा पहाता गुरुपदी नित्य नवा । भक्तीभाव हा अर्पुनिया पदी दास म्हणे घ्यावा ॥३॥

१७६५) रामनामकी तार सुनो भाई । रामनामकी तार ॥ध्रु॥ तार सुनाकर रूप रामका । प्रगटत अपरंपार ॥१॥ नाद उठा जब अनुहातका । वृत्ती बिन दरकार ॥२॥ राधासुतकी बात सुनाकर । सहज तरो संसार ॥३॥

१७६६) घोटी घोटी घोटी घोटी रामनाम घोटी । रामनामावीण दुजे धरू नको कंठी ॥१॥ जैसा दगड घोटिता दावी बिंबसृष्टी । बुद्धी रामनामी घोटिता रामरूप दृष्टी ॥२॥ जैशी मात्रा घोटू जाता मोला चढे पाही । रामनाम घेता नरे राम प्रगट होई ॥३॥ नाम घोटणी साधाया संता शरण जाई । दास म्हणे नाम घेता काय होत नाही ॥४॥

१७६७) तू नाम समजुनी घेई । गतानुगतिक न होई ॥१॥ अंधापाठी चाले आंधळा । तैसे जग हे होई ॥२॥ यत्ने प्रयत्न समजुनी घेई । डोळे उघडुनी पाही ॥३॥ दास म्हणे रे गुरुकृपेने । नामी देव तू पाही ॥४॥

१७६८) कधी साधनी रमसी पहाया । प्रभुची ज्योत झमकते ॥ध्रु॥ हृदयमंदिराचे आत । अरुणप्रभा पसरे शांत । चंद्रसूर्य असंख्यात । लोपती जिथे ॥१॥ कोटि विद्युल्लता नभा । दाविताती बहुत शोभा । परी फाकती ना प्रभा । जेथीच्या तिथे ॥२॥ असंख्यात तारे गळती । पृष्पवृष्टी ऐसे गमती । अग्निचीही हरली दीप्ती । पहाता तिथे ॥३॥ आनंदाच्या आनंदात । चित्तबुद्धी विरुनी जात । अंतर्बाह्य प्रगटे ज्योत । काहीना तिथे ॥४॥ नवल तेज प्रकाशले । पहाण्या मनपण नुरले । गोविंदाचे जीवपण सरले । नाम गाजते ॥५॥

१७६९) ते रूप पाही बरे । मनुजा ते रूप पाही बरे ॥ध्रु॥ ज्या रूपाचे दर्शन होता । जगदाभास नुरे । सर्व ईषणा तृप्त होऊनी । मन आनंदी विरे ॥१॥ वरवर पाहुनी काय पाहसी । पस्तावाची उरे । हरिरूप पाहुनी मुखी वानिता । हृदयी राम भरे ॥२॥ तेज लखलखीत भोवती । मध्ये बिंदु सुनील सरे । त्यामध्ये श्रीराम विराजीत । निरखुनी पाही बरे ॥३॥ हनुमंतांच्या कृपाकटाक्षे। दिसले स्वरूप खरे । गोविंद म्हणे अंतरी जाऊनी । उन्मनीत विवरे ॥४॥

१७७०) ते रूप साजणी पहावे गे । अनंतलीला दावुनी जगती एकरूपी जे वहिले गे ॥१॥ नाना घटी आकार निराळे एकरुप आकाश जसे । रामकृष्णादी अवतार धरी ते विटे उभे जे बहुत युगे ॥२॥ नानापरीचे अलंकार जरी सुवर्ण त्यामधी एकची रे । देव देवता अनंत असती देवपणा तो एकची रे ॥३॥ मोठा माझा देव मी मोठा अभिमान हा सांडी बरे । स्मरण करिता दासा हृदयी त्या देवाचे रूप भरे ॥४॥

१७७१) वीज झमकली झमकली । सद्गुरूंची किल्ली ॥१॥ अहो तेज प्रकाशले । अंतरबाहेर प्रगटले ॥२॥ चित्ताचे चांदणे । पाहता मन हे चाकाटणे ॥३॥ रंग भरला दोही डोळा । दास म्हणे गुरुची लीला॥४॥

१७७२) तेज दृष्टी भरले । अंतरी स्वरूपी समरसले ॥१॥ उन्मनीमाजी शोधू जाता । अनुभवा आले ॥२॥ जीवशिवाचे स्वरूप एकचि । ऐक्यी अनुभविले ॥३॥ स्वरूप सोहळा पाहुनि मन हे । आनंदित झाले ॥४॥ गुरुकृपेची बत्ती लागता । दासा आकळले ॥५॥

१७७३) तेज दाटले स्वरूपाचे । नयनी समरसले । उन्मनीमाजी शोधू जाता । अनुभवा आले ॥१॥ जीवशिवाचे स्वरूप एके । ऐक्यी समरसले । स्वरूप सोहळा पाहुनी मन हे । आनंदित झाले ॥२॥ गोविंद म्हणे गुरुपदी जडता । कृपावंत झाले । गुरुकृपेची बत्ती लागता । हृदयी आकळले ॥३॥

१७७४) सर्वाठायी भरला ऐसा देव नयनी पाही । ज्याचे स्वरूप गुरुकृपे अनुभवा येई ॥ध्रु॥ ऐसा शिव हा पाहता जीवपणा नाही । गेले उरले एकचि चिन्मयची पाही ॥१॥ पाहता पाहणे सरूनि सांगे स्वरूप नवाई । शंकर हृदयी भरून उरला दासा राम देही ॥२॥

१७७५) आपला आपण शिव होई ॥ध्रु॥ मी जीवपणा टाकुनि पाहता । शिव तूचि पाही ॥१॥ गुरुपद कमळी शरण रिघता । साक्षातचि देही ॥२॥ दास म्हणे गुरुनामी जडता । अनुभव हा पाही ॥३॥

१७७६) अरे शिव तू, अरे शिव तू, अरे शिव तू, अरे शिव तू ॥१॥ विचारेचि तू शोधी तुज तू, सद्गुरुची कृपा होता तुझा तूचि तू ॥२॥ स्थूलाहुनी तू सूक्ष्माहूनी तू, कारणाच्या पलीकडे तुझा तूचि तू ॥३॥ कोशातीत तू, पंच कोशातीत तू, तीन्ही अवस्थांचा साक्षी तुझा तूचि तू ॥४॥ अरे ब्रह्म तू अरे ब्रह्म तू दास म्हणे गुरूकृपे तुझा तूचि तू ॥५॥

१७७७) शिव भोळा चिंतित जाई । तुझे तयासी न लगे काही ॥१॥ एक मनाचे बिल्वपत्र हे । अर्पण करी जे नेमे पाही ॥२॥ फूल पानही पाणी तयाचे । भक्तियोगे प्रियची होई ॥३॥ नामस्मरणे प्रसन्न होई । अखंड निशिदिनी ते तू घेई ॥४॥ अल्पसाधने प्रसन्न देही । दास म्हणे रे हृदयी पाही ॥५॥

१७७८) तोचि गजानन रे ॥ध्रु॥ जो ब्रह्मांडी तो हा पिंडी । सोऽहंभावी की रे ॥१॥ नामस्मरणे त्यासी स्मरता । देह प्रचीती सरे ॥२॥ चतुर्थ स्थानी अनुभव ज्याचा । मी पण नामी नुरे ॥३॥ दास म्हणे जो समजुनी येई । गुरुप्रसादवरे ॥४॥

१७७९) काळ सम नसे कदा सदा सर्वदाही । पंढरीचा देव सखा करोनिया घेई ॥१॥ कोण वेळ येईल कैसी भरवसा नाही । संकटीचा देव सखा नाम त्याचे गाई ॥२॥ देह पंढरीत आत्मा विठ्ठल हा पाही । तयालागी शरण जाता जन्म मरण नाही ॥३॥ भला बुरा काळ सारा स्मरणात जाई । तोचि धन्य म्हणे दास लीन त्याचे पायी ॥४॥

१७८०) कशामध्ये काय रे । विचारोनी पाहे रे । कशामाजी नाम नसता । सावधपण ते कैसे रे ॥१॥ कसा कशासाठी रे । साठविण्यासाठी रे । आठविले नाही तरी । साठवेल कोठे रे ॥२॥ कसोनिया वाचे रे । गुरुनाम ते साचे रे । दासे श्वासोच्छ्वासी घेता । सावधपण साच रे ॥३॥

१७८१) साठ विरे साठवी रे । आठ विरे हरि आठवी रे ॥१॥ कीर्ति साठवी हरि भजनाची । जोडी जोड तू सत्संगाची ॥२॥ कीर्ति साठवी हरिभक्तीची । दास म्हणे रे गुरुकृपेची ॥३॥

१७८२) सर्वसुखा सुख ठेवा गुरुपदी विसावा । शरण जाई गुरुपायी बंध हा तुटावा ॥१॥ सर्व सुख आत्म्यामाजी त्याचा शोध घ्यावा ।

गुरूकृपे नामस्मरणी विश्राम हा जीवा ।।२।। माया अनिवार परी काय तिचा केवा । गुरूनामे माया नासे दासासी विसावा ।।३।।

१७८३) गुरूपदी भाव धरी मनुजा ।।ध्रु।। अभाव धरिता गुरुचरणासी । साधसी काय तरी ।।१।। गुरुसेवेचा अगाध महिमा । वर्णन कोण करी ।।२।। ब्रह्मादिक इंद्रादिक वंदिती । गुरुभक्तास शिरी ।।३।। आत्मसुखचि हे गुरुपदी लाभे । वचनी प्रेम धरी ।।४।। गुरुपदतारक नौका कलियुगी । दासालागी बरी ।।५।।

१७८४) संत मुखातील बोल तू घेई । मोक्ष घरी मग चालत येई ।।१।। संत बोलणे सहजचि पाही । तरी त्यांचे वच मानुनी राही ।।२।। नाम बोलणे बोलती देही । देव शोधिता ही नवलाई ।।३।। भाव ठेऊनी त्यांचे पायी । दास अंतरी लीनची होई ।।४।।

१७८५) देती देती साधु देती नसोनि लल्लाटी । देवा मागू जाता न मिळे नसता लल्लाटी ।।१।। म्हणोनिया सेवा जनी करिता संतांची । सहज कृपा होता इच्छा पुरेल मनाची ।।२।। सदा नाम मुखी गाता आवडे संतासी । निवारिती संचित क्रियमाण प्रारब्धासी ।।३।। गोविंद म्हणे दावियेले संत सामर्थ्यासी । तो हा देव भक्ताधीन साक्ष सकळासी ।।४।।

१७८६) झाला झाला झाला झाला कृतकृत्य झाला । तोचि जगी धन्य झाला स्मरे जो नामाला ।।१।। केला केला केला केला संसार हा केला । रामनाम वदनी नसता जगी व्यर्थ गेला ।।२।। राम राम राम राम शुक मिषे म्हणता । कुंटिणी ती धन्य झाली जगती सर्वथा ।।३।। ऐसा आहे थोर महिमा देवाचे नावाचा । म्हणोनिया दास सदा नाम घेई वाचा ।।४।।

१७८७) साधक योगी । तो ब्रह्मसुखाला भोगी ।।ध्रु।। सहास धरूनी सहास मारी । वाचे रामनाम उच्चारी । यावरी सर्वही भाषण वारी । जो न

वियोगी ॥१॥ बसणे उठणे देवपदासी । भोजन निद्रा परिमित ज्यासी । सर्वही भोगालागी उदासी । होऊनी त्यागी ॥२॥ ऐशा लक्षणी जो भला। देव तयाचा अंकित झाला । दास नमितसे त्या चरणाला । सत्वर वेगी॥३॥

१७८८) साधक तो साधक तो । साधक तो साधक तो ॥१॥ गुरुबोधी मन बोधी । सदा राहे चित्त शुद्धी ॥२॥ सदाचारी मौनधारी । मिताहारी सुविचारी ॥३॥ धरी नामीच उपाधी । दास म्हणे निरूपाधी ॥४॥

१७८९) दुर्जन सज्जन संगतीयोगे । हेचि धरी तू मनी दृढ चांगे ॥ध्रु॥ सज्जन संगे सज्जन होये । दुर्जनसंगे दुर्जन होये ॥१॥ माती कस्तुरी कस्तुरीसंगे । पाणी रंगीत त्या त्या रंगे ॥२॥ साधुसंगती दास फिरे रे । गुरुकृपेचे सुटता वारे ॥३॥

१७९०) तू अर्पी शुभाशुभ दोन्ही हरिचे पायी । तरी जन्म मरण मग जाण सर्वथा नाही ॥ध्रु॥ शुभ अशुभ पाहता दोन्ही अशुभची होई । जैशी का बेडी लोह कांचनी पाही ॥१॥ जो शुभ अर्पितो अशुभ तयाचे घेई । तरी अशुभ अर्पिता देव कधी नच घेई ॥२॥ या कर्माकर्मे बंध जीवासी पाही । ते दास समर्पी देव तयाचा होई ॥३॥

१७९१) शुभ तेचि काय रे । नाम एक होय रे । तयावीण सर्व काही । अशुभ ते पाहे रे ॥१॥ रामनाम शुभ रे । देह तो अशुभ रे । दोन्ही समर्पिता देवा । देव तुष्ट होय रे ॥२। कर्मफळ अशुभ रे । कर्मातीत शुभ रे । दोन्ही समर्पिता देवा। दास मुक्त होय रे ॥३॥

१७९२) शुभनाम शुभनाम । करी दासासी निष्काम ॥१॥ नाम भले नाम भले । क्रोधादिका करी भले ॥२॥ नाम चांग नाम चांग । करी दासासी निःसंग ॥३॥

१७९३) शुभामाजी मने राही । ज्ञान जागृतीने पाही ॥१॥ शुभ इच्छेचे

गणन । हेचि सातवे साधन ॥२॥ आत्मा देही आहे । वर्णू जाता वर्णो नये ॥३॥ दास म्हणे सांगो किती । ज्ञानमार्गे ही प्रचीती ॥४॥

१७९४) बा रे आळस सांडी तू ॥ध्रु॥ करिसी उद्योगा संसारी । आळस येतो साधनावरी । यातुनी बरवे समजुनी अंतरी । आळस सांडी तू ॥१॥ आळस हेचि पाप हो का । पाप जावया स्मरण करी का । नामे पावसी पुण्यश्लोका । आळस सांडी तू ॥२॥ आळस जाण्या सुलभ उपाय । दासा सांगती सद्गुरुराय । नामोच्चारणी धरी तू सोय । आळस सांडी तू ॥३॥

१७९५) आळस सांडी तू बा रे आळस सांडी तू । नामसाधनी प्रेम धरी तू ॥१॥ करीसी उद्योगा संसारी । आळस येतो साधनावरी । यातुनी बरवे समजुनी अंतरी । आळस सांडी तू ॥२॥ आळस हेचि पाप हो का । पाप जावया स्मरण करी का । नामे पावसी पुण्यश्लोका । आळस सांडी तू ॥३॥ आळस जाण्या सुलभ उपाय । दासा सांगती सद्गुरूराव । नामोच्चारणी धरी तू सोय । आळस सांडी तू ॥४॥

१७९६) बा फसवु नको तू या श्रीरंगा । रंग तयाचा समजुनी घे । रंगी रंगता काय उणे मग । तुझा तुला तू समजुनी घे ॥ध्रु॥ ज्याने केले ज्याने दिधले । त्याते विसरूनिया कैसे । चालेल तुझे या जगामधी । त्याचे चरणा धरूनी बसे ॥१॥ नामस्मरणे त्यासी स्मरता । रामरंगी मन हे रंगे । गोविंदाचे भवभय भंगे । त्यासी कथिले श्रीरंगे ॥२॥

१७९७) पढतमूर्ख संग मला देऊ नको देवा । सुख न होय जया संगे दुःख होय जीवा ॥१॥ उपाय जो करील तोचि अपाय हो जीवा । काय सुख तयामधे जाण जीवभावा ॥२॥ संग जसा ज्यास घडे तीच स्थिती त्याला । उंच मध्य नीच दशा येई की तयाला ॥३॥

पढत ज्ञान कृतीमय होता तोचि योगी राणा । दास म्हणे हीच खूण ओळखावी मना ।४।।

१७९८) निर्गुणाचा संग रे । मन होय दंग रे । ब्रह्मानंदी जडोनि जाता । मग कैचा वरपंग रे ।।१।। वळोनी पाही धीट रे । तसाच जाई नीट रे । निर्गुणरूपी दृष्टी जडता । मग मायेचा वीट रे ।।२।। ज्यासी आशापाश रे । बोध तयासी कशास रे । संतालागी शरण जाता । अज्ञानाचा नाश रे ।।३।। दासाचा कैपक्ष रे । घेतो अंतरसाक्ष रे । नामस्मरणी वृत्ती विरता । निर्गुणचि प्रत्यक्ष रे ।।४।।

१७९९) बाप्पा ज्ञानिया रे । येई येई जीव जीवना योगिया रे ।।ध्रु।। दूर करोनी विषय प्रीती । मना दावी तव स्वरूप दीप्ती । हे साधुनी इंद्रिय निवृत्ती । दे जया रे ।।१।। सगुण निर्गुण रूप प्रचीती । ब्रह्माची साकारची मूर्ती । तव चैतन्य स्थिरता चित्ती । विजयी रे ।।२।। संत सज्जना तूचि माऊली । गोविंदा करी कृपा साऊली । मम मस्तक हे जडवी पाऊली । तुझिया रे ।।३।।

१८००) ज्ञानिया रे । बाप्पा ज्ञानिया रे ।।ध्रु।। मायबाप तू सकळ जनांचा । शिकविसी आत्महिता रे ।।१।। अज्ञपणे ही दर्शन घेता । देशी सायुज्यता रे ।।२।। नाम घेता सर्व ब्रह्मही । दाविसी अनुभव कथा रे ।।३।। गोविंदाचे भवभय हरुनी । नेसी आपण स्वतः रे ।।४।।

१८०१) गारुडी रे गारुडी रे । गारुडी रे हरि गारुडी रे ।।१।। खेळ करी खेळ करी । मी पण धरिता दूर करी ।।२।। मायेने मायेने । भुलवी जग हे मायेने ।।३।। भक्तासी भक्तासी । कवतुक दावी भक्तासी ।।४।। दास म्हणे नामबळे । पाही तयासी देव कळे ।।५।।

१८०२) गुंगवी रे गुंगवी रे । गुंगवी रे मन गुंगवी रे ।।१।। हरिनामी बरे

हरिनामी बरे । हरिनामी बरे मन लावी की रे ॥२॥ सुखधामी सुखधामी । सुखधामी जाई त्वरे ॥३॥ मूळ घरी माहेरी । जाशी तरी सौख्य खरे ॥४॥ संसारी सासू घरी । दास म्हणे सुख नाही खरे ॥५॥

१८०३) छंदे छंदे साधू जाता काय होत नाही । द्वादशीचा छंद लागे अंबरीषा पाही ॥१॥ हरिगुणे वश होतो पहा शेषशायी । म्हणोनिया छंद घरी हरिनाम ग्वाही ॥२॥ छंदाची ती वाट मोठी बिकटची पाही । छंद लागला सुटेना हरिनाम ग्वाही ॥३॥ छ न तरी छंद लागे हीच खूण देही । गुरुकृपे कळे दासा हरिनाम ग्वाही ॥४॥

१८०४) भीमे बकालागी जैसे तैसे संकटाला । मान नको साधका रे साधी साधनाला ॥१॥ होई बळिवंत बा रे होई बळिवंत । चतुष्टये साधका रे विघ्ना होय अंत ॥२॥ रामनाम थोर शक्ती साधिली जयानी । दास म्हणे काळ वागे तयाचे वचनी ॥३॥

१८०५) शेवट गोड तरी । अंती वाणी वदेल हरि ॥ध्रु॥ सुकृत सरता येईल वदनी । केवी राम हरि ॥१॥ जन्मभरी ज्या संग जयाचा । तेचि मन विवरी ॥२॥ संसाराचे चिंतन करिता । कोण बरे उद्धरी ॥३॥ दास गुरूचा नामी अखंडित । जडता सोय बरी ॥४॥

१८०६) शेवट गोड तरी । वदनी राम वदेल जरी ॥१॥ बहु अभ्यासे बहु प्रयत्ने । साधे हेचि जरी ॥२॥ तरी मग भेटी देईल हरी । सर्व शेवट एकचि रामनाम वाणी ॥३॥ साराचेही सार असे हे । दासाचे स्वमनी ॥४॥

१८०७) स्मरण घडवी या नाव स्मारक । संतांचे स्मारक नाम मुखी ॥१॥ आणिक स्मारके उलथोनी पडती । नाम ते निश्चिती हालेचि ना ॥२॥ नाम मुखी सदा थोर ते स्मारक । वंदू आम्ही एक दास म्हणे ॥३॥

सिंहासनातून ऐकू आलेला अभंग

१८०८) नामरूप भगवान । माझा नामरूप भगवान ॥१॥ नामरूप सद्गुरु कृपा करी । नामची वदवी महान् ॥२॥ नामची साधन नामची कीर्तन । नामावीण नच ज्ञान ॥३॥ पंथही नामची प्राप्तीही नामची । दासा तेच प्रमाण ॥४॥



अधिक

१८०९) सर्व देहामाजी अधिक नरदेह । मुक्तीचे ते गेह प्राण्यालागी ॥१॥ म्हणोनी नरदेही करावे भजन । जेणे नारायण तुष्ट होय ॥२॥ चौऱ्याऐंशीचा फेरा फिरोनिया आला । नामेवीण गेला जाण वाया ॥३॥ दास म्हणे किती सांगो वेळोवेळा । नामे घननीळा वश करी ॥४॥

१८१०) देह असती अनेक । नरदेह सर्वाधिक ॥१॥ नरदेही बसूनि पाही । देवा समाधान होई ॥२॥ गोविंद म्हणे हा लाधला । उपयोग करी भला ॥३॥

१८११) नरदेहीचे हे वय । अमोलिक धरी सोय ॥१॥ सोय धरणे रामनाम । न करणे आणिक काम ॥२॥ गोविंद म्हणे या वेगळी । सोय न धरी निराळी॥३॥

१८१२) वय मानवदेहाचे । अधिक सर्वात मोलाचे ॥१॥ जाते ते जतन करा । उतराल पैलतीरा ॥३॥ श्वासोच्छ्वासी रामनाम । वय कारणी उत्तम ॥३॥ दासा म्हणे सांगो किती । देही देवाची प्रचीती॥४॥

१८१३) जीव शिव मन पवन । अखंड रेषा करी दोन ॥१॥ मध्यबिंदू रामनाम । चारी कोन होय सम ॥२॥ नरदेही होय देख । दासा नरदेह सर्वाधिक ॥३॥

१८१४) अहो मानवदेही । अधिक ते वय पाही ॥१॥ जाते ते जतन

करा । उतराल पैलतीरा ॥२॥ सर्व देही अनुहत । रामनाम न मिळे त्यात ॥३॥ नरदेही राम मिळे । दासाचरणी मुक्ती लोळे ॥४॥

१८१५) साठवणे हे अधिक । त्यात नाम सर्वाधिक ॥१॥ काय साठवोनी सोने । जेवी भूमीत पाषाण ॥२॥ गोविंद म्हणे रामा आत । राम साठवी तू नित्य ॥३॥

१८१६) ज्यामाजी साठते अधिक ते पात्र । न साठे अपात्र बोलियेले ॥१॥ नाम साठविता बहुत चांगले । अधिक ते भले सर्वाहोनी ॥२॥ अनाम साठता अधिक वाईट । त्याचा धरिता वीट हित होय ॥३॥ नाम साठविता देव कृपा करी । संकटात तारी दास म्हणे ॥४॥

१८१७) नाम साठविणे अधिक । येर सर्व विनाशक ॥१॥ नाम साठविले ज्यांनी । तेचि जगी धन्य प्राणी ॥२॥ काही करणे अधिक । न करणे सर्वाधिक ॥३॥ काही न करणे ते केले । तेचि दासा थोर भले ॥४॥

१८१८) साठविणे हे अधिक । नाम त्याहून अधिक ॥१॥ काय साठवोनि सोने । जेवी भूमीत पाषाण ॥२॥ अहंपण साठविता । देव कैचा येई हाता ॥३॥ कुंभ पालथा घालिता । जळ साठेना तत्त्वता ॥४॥ परीस साठविला तरी । नाम परीस घे करी ॥५॥ तरीच देव येई हाता । दास म्हणे येर वृथा ॥६॥

१८१९) साठविणे हे विशेख । नाम त्यात सर्वाधिक ॥१॥ काय साठवोनि सोने । जेवी भूमीत पाषाण ॥२॥ नाम साठविता पाही । अंतकाळी ते सोडवी ॥३॥ देव दासांकित होई । अशक्य त्या काही नाही ॥४॥

१८२०) साठवावे ऐसे काय । गुरु दावितांती सोय ॥१॥ देवपाय

आठवावे । त्याचे नाम साठवावे ॥२॥ रामनाम साठविता । अशक्याची नुरे वार्ता ॥३॥ ऐसा सद्गुरू महिमा । दासा वर्णवेना सीमा ॥४॥

१८२१) आपुला विशेष अधिक । जाणावा तो देव एक ॥१॥ आदि अंती असे पाही । मध्ये तोचि वसे देही ॥२॥ काय करावी आपुली । उपयोगा जी न आली ॥३॥ दास म्हणे नाम घेता । देव आपुला सर्वथा ॥४॥

१८२२) अहो देवाहोनी देख । देवनाम हे अधिक ॥१॥ नाम घेता देव येई । धरू जाता दूर जाई ॥२॥ देवे तारीयेला कोण । नाम तारी सर्व जन ॥३॥ दास नामी कृतकृत्य । अशक्य त्या शक्य होत ॥४॥

१८२३) सर्व जग मायाधीन । मायातीत देव जाण ॥१॥ सदा मने देव पायी । अधिक जो देवा पाही ॥२॥ माया घालिता मोहन । देवाकडे पाहे कोण ॥३॥ देव आधारे नाचवी । जेणे माया ही पदवी ॥४॥ नामे माया निरसन । दास साधिता साधन ॥५॥

१८२४) भाव धरणे अधिक । एकाहून थोर एक ॥१॥ एकभाव दृढभाव । एक निष्ठावंत भाव ॥२॥ गोविंद म्हणे सर्वाधिक । भोळा भावचि सम्यक ॥३॥

१८२५) पाहू जाता एक भाव । बहू प्रकार लाघव ॥१॥ शुद्धभाव दृढभाव । एक निष्ठावंत भाव ॥२॥ आत्मभाव सोहंभाव । एक जाणा प्रेमभाव ॥३॥ ऐसा भाव अधिक । भोळा भाव सर्वाधिक ॥४॥ भाव तेथे वसे देव । दास नामी अनुभव ॥५॥

१८२६) सर्व बळामाजी देख । भावबळ हे अधिक ॥१॥ अन्य बळयोग पाही । देव हाता येत नाही ॥२॥ अंगबळ द्रव्यबळ । मनुष्यबळ

ज्ञानबळ ॥३॥ भावामाजी नाम घेई । भावबळे युक्त होई ॥४॥ भावबळे आकळिता । दासा देव येई हाता ॥५॥

१८२७) अधिक भावबळ पाही । दुजे अधिक नलगे काही ॥१॥ द्रव्यबळाने देहबळाने । देव हातासी नच येई ॥२॥ तपोबळाने बुद्धीबळाने । देव हाताप्रती नच येई ॥३॥ भावबळाने दास म्हणतसे । देव हातासी आपणचि येई ॥४॥

१८२८) तीर्थे असती अनेक । जगामाजी पाहता देख ॥१॥ आत्मतीर्थ सर्वाधिक । बुडी देता मुक्त लोक ॥२॥ गोविंद म्हणे साधी भले । सर्व संतांनी साधिले ॥३॥

१८२९) सर्व तीर्थामाजी एक । आत्मतीर्थ हे अधिक ॥१॥ आत्मतीर्थ मनकर्णिके । ओळखोनि घ्यावे निके ॥२॥ तीर्थ न दिसे बाहेरी । जे का असे अभ्यंतरी ॥३॥ जयामाजी बुडी देता । नुरे संकल्पाची वार्ता ॥४॥ आत प्रयत्न तोकडे । दासा सर्व नामी घडे ॥५॥

१८३०) सर्व देही नवद्वार । नरदेही दशमद्वार ॥१॥ हे तो जाणे सर्वाधिक । घ्यावे ओळखोनी एक ॥२॥ दशमद्वाराहोनि वाट । दासा आत्मतीर्थ नीट॥३॥

१८३१) काय करणे अधिक । मज सांगणे विवेक ॥१॥ चुकलीया राम सेवा। मग दुःख होय जीवा ॥२॥ गोविंद म्हणे सर्वाधिक । राम सेवेने सार्थक ॥३॥

१८३२) काय करणे विशेख । मज सांगणे विवेक ॥१॥ राम जाणुनी रामसेवा । करिता सुख होय जीवा ॥२॥ हे तो करणे विशेख । नाही तयाहोनी देख ॥३॥ रामसेवा रामनाम । दासा करी पूर्णकाम ॥४॥

१८३३) अबोल बोलणे बोलावे । सर्वाधिक हे स्वभावे ।।१।। येर बोलणे बोलुनी काय । आयुष्याचा नाश होय ।।२।। गोविंद म्हणे अबोल बोल । जयापुढे सर्वही फोल ।।३।।

१८३४) बोल सरे बोल सरे । नामकृती अवतरे ।।१।। मौन धरी मौन धरी । अधिक जे सर्वापरी ।।२।। नाममौन जो धरीत । त्याची करणी अघटित ।।३।। धरी मौन सत्य । देव तयाचा अंकित ।।४।।

१८३५) बोलणे टाकोनिया दुरी । मुखी जपावा श्रीहरि ।।१।। काढी अंतरीचा काम । होई साधका विश्राम ।।२।। ऐशी रामनाम थोरी । कोणा न करवे बरोबरी ।।३।। दास म्हणे हरि होती । त्यांची पहावी प्रचीती।।४।।

१८३६) बोल वाईट बोलीले । अधिक त्याहोनी चांगले ।।१।। बोलवेना ते बोलावे । सर्वाधिक हे स्वभावे ।।२।। व्यर्थ वाऊगे बोलता । काही नयेचि हो हाता ।।३।। बोलवेना नाम देही । जे का स्वतःसिद्ध पाही ।।४।। दास म्हणे नाम घेत । थोर तपाचे सामर्थ्य ।।५।।

१८३७) भाग्य मिळणे अधिक । ऐसे बोलती जन लोक ।।१।। परी भाग्य वैराग्याचे । सर्वाधिक मोलाचे ।।२।। गोविंद म्हणे जे अविनाशी । येर सर्वही विनाशी ।।३।।

१८३८) भाग्य मिळणे विशेष । ऐसे बोलती जन लोक ।।१।। परी भाग्य वैराग्याचे । सर्वाधिक ते मोलाचे ।।२।। भाग्य भेटवील हरि । ऐसे वैराग्य निर्धारी ।।३।। दास संतनाम घेता । वैराग्याचे भाग्य हाता ।।४।।

१८३९) पाषाणात हिरा देख । लोक बोलती अधिक ।।१।। परी जाण हिऱ्याहोनी । परीस अधिक तो जाणी ।।२।। नाम परीस परीस । करी पाषाणा परीस ।।३।। गोविंद म्हणे नाम परीस । सर्वाधिक नि विशेष ।।३।।

१८४०) कशामाजी असे हित । खरे अधिक सर्वात ॥१॥ एकामाजी असे पाही । एक काय शोधुनी घेई ॥२॥ गोविंद म्हणे नामतत्त्व । जगी त्याचेच महत्त्व ॥३॥

१८४१) कशामाजी असे हित । खरे अधिक सर्वात ॥१॥ एकामाजी असे पाही । जे का अनेकात नाही ॥२॥ एक रामनाम नाणे । सदा ते ठायी जागणे॥३॥ जागलीया तया ठायी । दासा खरे हित पाही ॥४॥

१८४२) सर्व ज्ञानात अधिक । अध्यात्मज्ञान सर्वाधिक ॥१॥ अध्यात्मज्ञान आत्मज्ञान । संतकृपे कळे जाण ॥२॥ गोविंद म्हणे सांगो किती । न कळे तयाची महती ॥३॥

१८४३) सर्व ज्ञानामाजी देख । अनुभव ज्ञान हे विशेख ॥१॥ अनुभव हा अधिक । काय बोलोनी अनेक ॥२॥ अनुभव सत्य ज्ञान । जया बोलीजे विज्ञान ॥३॥ अनुभव खूण बाणे । देवभेटी होय जेणे ॥४॥ अनुभव ज्ञान रामनाम । दास भीती वाहे यम ॥५॥

१८४४) रामनामाचे वाचोनी । सर्व ज्ञान व्यर्थ जाणी ॥१॥ अनुभव हा अधिक । ज्ञानाचेही ज्ञान देख ॥२॥ सहज वा प्रयत्नाने । अनुभव खूण जाणे ॥३॥ आपण तरोनी दुजीया तारी । दास म्हणे काम न करी ॥३॥

१८४५) दोष घडती अनेक । प्रायश्चित्ते ही अनेक ॥१॥ सर्व दोषा प्रायश्चित। एक नामचि उचित ॥२॥ गोविंद म्हणे नामाविण । तरणोपाय नाही आन ॥३॥

१८४६) अनुभव म्हणजे कृती । आचरणी आणणे स्थिती ॥१॥ गुरूचा जो अनुभव । तोचि आपुला करोनि दाव ॥२॥ गोविंद म्हणे अबोलणे । हीच अनुभवाची खूण ॥३॥

१८४७) नरे करावी करणी । जेणे भेटे चक्रपाणी ॥१॥ नाम घेता अंतःकरणी । सर्वाधिक हेचि जाणी ॥२॥ गोविंद म्हणे विचार करी । कळो येईल अंतरी ॥३॥

१८४८) कोण अधिक करणी । जेणे भेटे चक्रपाणी ॥१॥ विशेषात विशेष जाणी । रामनाम सदा वाणी ॥२॥ करणी नाम अंतः करणी । साधिलीया चक्रपाणी ॥३॥ गुरुकृपे कळो येई । दास म्हणे अनुभव घेई ॥४॥

१८४९) अधिक नामाची करणी । तरवी पाषाण जीवनी ॥१॥ केले केले काय केले । सर्व करुनी वाया गेले ॥२॥ अधिकात अधिक पाही । गुरुकृपे कळो येई ॥३॥ शुष्क काष्ठा पल्लव येई । दास म्हणे नाम घेई ॥४॥

१८५०) काही न बोलणे मौन । मानताती अधिक जाण ॥१॥ अखंड नाम मुखी देख । मौन थोर सर्वाधिक ॥२॥ गोविंद म्हणे ते अखंड । जयामाजी नाही खंड ॥३॥

१८५१) आसन ते सर्वाधिक । वृत्ति होतसे स्थीरक ॥१॥ वृत्ती उठता बैसता । चाले नाम अखंडता ॥२॥ गोविंद म्हणे जे चंचळ । होत असे अचंचल ॥३॥

१८५२) सर्वात अधिक कल्याण । रामनाम मुखी जाण ॥१॥ रामनाम मुखी गाता । न लगे मुक्तीची ती चिंता ॥२॥ गोविंद म्हणे अकल्याण । अवघे होईल कल्याण ॥३॥

१८५३) सर्व जीवा अन्न अधिक । नाम अन्न सर्वाधिक ॥१॥ अन्न ब्रह्ममय कसे । याची खूण नामी असे ॥२॥ गोविंद म्हणे तोचि प्राण । तयाविण नाही आन ॥३॥

१८५४) द्रव्य दान वस्त्र दान । भूमि दान सर्व दान ॥१॥ सर्वाधिक अन्नदान । जेणे तुष्टे नारायण ॥३॥ दान देणे हे कठीण । दान जीवासी भूषण ॥३॥ अतिथी तो द्वारी येई । देवचि तो अन्न घेई ॥४॥ देवे दिले देवा देई । नाम अन्न दासा पाही ॥५॥

१८५५) पदव्या असती अनेक । दाता पदवी सर्वाधिक ॥१॥ दाता एक कर्ण पाही । ऐशी कृष्ण देई ग्वाही ॥२॥ गोविंद म्हणे निजकर्ण । दाता अधिक सर्वाहून ॥३॥

१८५६) दान करी तोची दाता । हे तो बोलणेची वृथा ॥१॥ प्रेमभावे करी दान । हे तो दात्याचे लक्षण ॥२॥ दाता पदवी कठीण । करवी नामाचे स्मरण ॥३॥ साधुसंत नारायण । तिजा दाता जगी कर्ण ॥४॥ कर्ण ओळखील कोण । दास म्हणे तोची धन्य ॥५॥

१८५७) भावबळे देव पाही । आपुला करुनी घेता येई ॥१॥ भावबळ सर्वाधिक । नाही त्याहुनी अधिक ॥२॥ गोविंद म्हणे त्याची सरी । कोणा नव्हे बरोबरी ॥३॥

१८५८) देव जगासी अधिक । त्याहुनी कोण आहे देख ॥१॥ परी नाम देवाहोनी । सर्वाधिक असे जाणी ॥२॥ गोविंद म्हणे पाही । गुरू दाविती नवलाई ॥३॥

१८५९) भूतांचे पालन । कंटकांचे निर्दळण ॥१॥ दया सर्वाधिक पाही । देही नामे प्रगट होई ॥२॥ गोविंद म्हणे पहासी जरी । कळो येईल अभ्यंतरी ॥३॥

१८६०) भूतमात्री दया जाण । हे तो अधिकाची खूण ॥१॥ अधिक पर परमात्मा । नाम भक्तिभाव प्रेमा ॥२॥ महद्भूत सर्वाठायी । कळो

येता दया पाही ॥३॥ अंत नाही तो अनंत । महद्भूत प्रगट गुप्त ॥४॥ संत दयावंत जाण । दास म्हणे नामगुण ॥५॥

१८६१) काय करणे अधिक । दया करणे अधिक ॥१॥ तीर्थ करोनिया गेला । दयेवीण वाया गेला ॥२॥ दया चराचरी करी । देव त्याचा सहाकारी ॥३॥ नामी प्रगटेल दया । दास म्हणे येर वाया ॥४॥

१८६२) क्षमा सर्वांचे स्वहित । अधिक श्रेष्ठ अखंडित ॥१॥ क्षमारूप होता पाही । दुष्ट नुरे अंतर्बाही ॥२॥ गोविंद म्हणे स्वयमेव । याचा घ्यावा अनुभव ॥३॥

१८६३) सामर्थ्य असोनि क्षमा जे करिती । अधिक ते क्षिती सर्वाहोनी ॥१॥ क्षमाशस्त्रे संत दुर्जना दंडिती । नाम वाढविती देवाजीचे ॥२॥ अपकारियासी करिती उपकार । क्षमेचा प्रकार ऐसा असे ॥३॥ दास म्हणे ऐशी क्षमा जे करिती । तयांचे अंकिती देव असे ॥४॥

१८६४) शांती हेचि खरे सुख । जीवालागी सर्वाधिक ॥१॥ ऐशी अखंड शांती मिळता । ब्रह्मरूप होय स्वतः ॥२॥ गोविंद म्हणे तेचि एक । ज्यात असेना अनेक ॥३॥

१८६५) शांती धरिलिया मने । जगी विशेष तो जाणे ॥१॥ शांती हेचि खरे सुख । अशांतता परम दुःख ॥२॥ शांती धरिलीया जीवी । थोर अधिक पदवी ॥३॥ नामयोगे शांती मिळे । दासा देव तो आकळे ॥४॥

१८६६) सत्य तेचि सदा असे । ज्यात अन्य काही नसे ॥१॥ ऐसे सर्वाधिक पाही । नामावीण नसे काही ॥२॥ गोविंद म्हणे समजुनी घेई । आणिकांचे काम नाही ॥३॥

१८६७) सर्व बोलती जनलोक । परी न सरे दुःख शोक ॥१॥ सत्य तेचि पुण्य वाणी । असत्य ते पाप वाणी ॥२॥ सत्यापाशी चक्रपाणी । असत्याने सर्व हानी ॥३॥ सत्यनाम अधिक जाणी । दास बोले सत्यवाणी ॥४॥

१८६८) सुलभ उपाय सर्वाधिक । ज्याहून नसेच आणिक ॥१॥ ऐसे एक नाम पाही । अंतरात दिसो येई ॥२॥ गोविंद म्हणे श्वासोच्छ्वासी । कळो येईल अभ्यासी ॥३॥

१८६९) सर्वाहोनी सुलभ नाम असे देवा । वदनी केशवा का बा न ये ॥१॥ जन्मापासोनिया अखंड जवळी नाम । तरी मेघश्याम का न कळे ॥२॥ सर्वाहोनी अधिक नाम असे हृदयी । गोविंदासी होई लाभ कृपे ॥३॥

१८७०) सर्वा तपामाजी अधिक । रामनाम तप देख ॥१॥ काढी बुद्धीतील अंधार । तप जाणावे साचार ॥२॥ गोविंद म्हणे रामनामे । साधा अभ्यासाने नेमे ॥३॥

१८७१) अधिक ते तप जाण । नाम कर्तव्य पालन ॥१॥ ऐसे कळेल जयाला । तरी देव भेटे त्याला ॥२॥ नको करू आटाआटी । नाम घेई उठाउठी ॥३॥ दास म्हणे जगजेठी । निज कर्तव्या शेवटी ॥४॥

१८७२) साधुसंग सर्वाधिक । देव भेटवी प्रत्यक्ष ॥१॥ सहा ध्रुवोनी राहिले । धन्य साधु तेचि भले ॥२॥ गोविंद म्हणे साधुसंत । गुण एकची प्रचीती ॥३॥

१८७३) सर्व संगामाजी देख । संतसंग हा अधिक ॥१॥ संतसंगाचे लक्षण । उमगता जगी धन्य ॥२॥ ज्यांचे संगे देव भेटी । भवबंधा होय तुटी ॥३॥ अल्पकाळ जरी घडे । दास म्हणे नामी जडे ॥४॥

१८७४) अमृत गोड सर्वाधिक । नाम तयाहून अधिक ॥१॥ नामामृत कसे अमर । पुनः नाही येरझार ॥२॥ गोर्विंद म्हणे नाम गोड । पुरवी सकळांचे कोड ॥३॥

१८७५) शेवट साधणे अधिक । नरदेह शेवट देख ॥१॥ नरदेही नाम घेणे । हाचि शेवट साधणे ॥२॥ गोविंद म्हणे अंतकाळी । मिळून राही नाममेळी॥३॥

१८७६) शेवट साधणे सर्वात अधिक । कळस हा देख अधिकाचा॥१॥ नाही तरी फेर न चुके साचार । पहावा विचार वेदशास्त्री ॥२॥ सर्व जन्म गेले शेवट साधिले । रामनाम भले उच्चारिता ॥३॥ शेवटास राम मुखी ज्या येईल । दास तो चढेल वैकुंठासी ॥४॥

१८७७) नरदेह शेवट वेचा हरिनामी । नका वेचू कामी विषयाच्या ॥१॥ शेवट साधणे सर्वांत अधिक । कळस हा देख अधिकाचा ॥२॥ कळेने सहित कळस तो देख । नरदेही विशेख हाचि असे ॥३॥ मुखी नाम वाणी धन्य तोचि प्राणी । शेवट साधनी दास म्हणे ॥४॥

१८७८) अन्न देतो उदरास । देह त्याचा हा निःशेष ॥१॥ दंडक तो ऐसा आहे । खरा धनी कोण पाहे ॥२॥ अन्न निर्मिले जयाने । सर्वाधिक तोचि जाणे ॥३॥ विश्वासता त्याचे पायी । दासा नामी उणे नाही॥४॥

१८७९) यज्ञकर्म मोठे साधणे दुस्तर । जपता नाम मधुर सहजी घडे ॥१॥ सर्व यज्ञामाजी अधिक परम । यज्ञ एक नाम देवाजीचे ॥२॥ देवाजीचे नामी होय ब्रह्मप्राप्ती । येर यज्ञाअंती भोगादिक ॥३॥ दास म्हणे ऐसे सुलभ साधन । जपता नारायण स्वये होय ॥४॥

१८८०) आत तात्त्विक विचार । बाहेर लौकिक आचार ॥१॥ दोन्ही असती जयाठायी । अधिक तो जगी पाही ॥२॥ रामनामी जे रंगले । त्याचे आचार चांगले ॥३॥ सर्वाधिक तोचि पाही । दास म्हणे नाम गाई ॥४॥

१८८१) गुरुसेवा ही कठीण । देवाहोनी अधिक जाण ॥१॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । तिघाहोनी गुरू थोर ॥२॥ गुरुनाम सेवेवीण । गुरूसेवा व्यर्थ जाण ॥३॥ कठीण ते सुलभ होई । दासा सत्संगतीने पाही ॥४॥

१८८२) अधिक नवल ते प्रभुपदी पाही । ज्ञानदृष्टीने पाहुनी घेई ॥१॥ अव्यक्तातून व्यक्त प्रगटवी । नामरुपातीत सूत्र लाघवी ॥२॥ पान खाऊनी सद्अन्नराशी । दिधल्या अगणित द्रुपदसुतेसी ॥३॥ अंतरडोळा उघडोनी पाही । दास देवरूप नवलचि होई ॥४॥

१८८३) चारी वर्णात अधिक । ब्राह्मण हे थोर भक्त ॥१॥ अधिक तो ब्राह्मणात । कर्म आचरणी रत ॥२॥ तयाहून थोर जाणी । देवादिक पुण्यखाणी ॥३॥ देव भक्ताते पूजीत । इतरांची काय मात ॥४॥ नामे सर्वाधिक जाणा । दास म्हणे भक्तराणा ॥५॥

१८८४) भ्रमता संसार बाजारी । लक्ष चौऱ्याऐंशीची फेरी ॥१॥ काही एक न ये हाता । देता घेता जन्म वृथा ॥२॥ अधिक पंढरीचा हाट । रामनामे भरली पेठ ॥३॥ देता घेता नाम पाही । अधिक ज्यावीण दुजे नाही ॥४॥ ऐशा बाजारी जे गेले । दास म्हणे धन्य झाले ॥५॥

१८८५) सर्व रूपामाजी अधिक आगळे । ते रूप सावळे पाहता बरे ॥१॥ देही जे वाईट ते दहा त्यागावे । उत्तम ते घ्यावे त्रयोदश ॥२॥ त्रयोदश घेता देवा पडे गाठी । करील ते गोष्टी दासा होय ॥३॥

१८८६) सर्व सेवेमाजी देख । गुरूसेवा ही अधिक ॥१॥ गुरूसेवा अखंडित । अखंडात साधी नित्य ॥२॥ गुरुसेवा गुरूकृपे । कळो येईल अपापे ॥३॥ गुरूसेवा रामनाम । दासा निर्भय परम ॥४॥

१८८७) बाईल रे बाईल रे बाईल रे तुज खाईल रे । अटक मटक चटक ग्रास करुनी तुजला जाईल रे ॥१॥ राहिल रे राहिल रे राहिल अंतरी राहिल रे । नेईल रे नेईल रे दूर तुजला नेईल रे ॥२॥ पाहिल रे पाहिल रे पाहिल अंतचि पाहिल रे । स्वरूपी जडता दास म्हणे जाईल रे जाईल रे ॥३॥

नित्यपाठ

वैशाख

१८८८) अक्षय तृतिया खरे नाणे कैसे । स्वहीत मार्ग सोसे सदा देव ॥१॥ संतांचे बोलणे अंतरखूण बाणणे । संसार सुफल होणे जाणत्यासी ॥२॥ दास म्हणे वेगी संतशाळे जाई । कळ कळुनी येई सहजेची ॥३॥

१८८९) नौबद श्रवणे बिंदू उमगणे । सूत्रधार जाणणे बत्तीरूप ॥१॥ संजीवनी मती जरी होय सती । विश्रांतीची स्थिती आन नसे ॥२॥ निर्गुण भोजन देही बाग खूण । निजत्व लक्षण ओळखावे ॥३॥ दास म्हणे तेथे दिसे देवपण । आणिक कारण कोण कायी ॥४॥

ज्येष्ठ

१८९०) नाम महिमा वाढविता करणे संत निंदा । हरीहर भेदा गुरु अवज्ञा ॥१॥ वेदशास्त्र निंदणे नाम प्रशंसा म्हणे । नामे पाप जाणे मग करा ॥२॥ व्रतदान नामासमान अभाविका उपदेशन । नाम महिमा आयकोन प्रीती नाही ॥३॥ सत्संग न करणे चुका करीत जाणे । अचुक साधन साधणे अखंडित ॥४॥ आशीर्वाद सदाचार काय तप पाही । दास म्हणे देइ थोरपण ॥५॥

१८९१) प्रेममंदिरात सत्याचा संकल्प । अखंड नेम जप प्रायश्चित्त ॥१॥ चित्त शुद्ध होता पक्षी कामधेनू । उलटे देऊळ थोर भक्ती ॥२॥ दास म्हणे नमने गुरूपदी कसा । अनुभव ऐसा आन नसे ॥३॥

आषाढ

१८९२) कृतकृत्य होता देह सार्थकता । आश्रमी राहता चतुर्विध ॥१॥ स्वप्नीचे उचित नेमनिष्ठा कळे । वारी त्या आकळे पंढरीची ॥२॥ लज्जाविरहित नामाचा प्रयत्न । शील परीपूर्ण दास म्हणे ॥३॥

१८९३) दुराशा टाकीता शकून कावड । हंस सुखी चाड दिनरात ॥१॥ वीट होता लटिके चूक थट्टा कळे । नामधारका आकळे महद्भूत ॥२॥ दास म्हणे जडता नामाची सवयी । दीप कळो येई सहजेची ॥३॥

भाद्रपद

१८९४) स्मरणाचा देव जाणे कोण गाव । टाळी स्वयमेव मुखी नाम ॥१॥ गणेश चतुर्थी ऋषीची पंचमी । नवविधभक्ती नामी अनंताची॥२॥ दास म्हणे पूर्ण कळा ते जाणावी । मने उमगावी अंतर्यामी ॥३॥

१८९५) विकल्प दुर्बुद्धी पैल निर्गुणीचे सुख । साधनाचा हरिख साधकासी ॥१॥ नाम खरे ज्ञान हरीकथा कीर्तन । निरुपण भजन अहर्निश॥२॥ नामाचे व्यापारी साक्षीचा उपदेश । प्रसाद मोहनाश दास म्हणे ॥३॥

आश्विन

१८९६) हरिनामी निर्गुणी प्रगटे भवानी । नवैकविधपणी उपासावी ॥१॥ ते चित्प्रकाशे द्वैतभाव नासे । सत्तारूप कैसे कळो येई ॥२॥ पंचविषयात निघोनिया मन । पूर्ण समाधान पंचमी ते ॥३॥ नामाचा उदय तोचि उदो शब्द । गोंधळ निःशब्द महास्वरूपी ॥४॥ खंडेनवमी ते नवखंड होता । अखंडात जाता दशमी ते ॥५॥ दशमाचे

पैल एकादशस्थान । जेथे वैष्णवजन विष्णुध्यानी ॥६॥ निजत्वी राहोनी खेळात जागता । जागृती ये हाता दास म्हणे ॥७॥

१८९७) भावे विश्वासाने सत्य स्थानी जाई । पाप पुण्य नाही जये गावी ॥१॥ तप तीर्थ दान सर्व संतापायी । समाधान देही साधनाचे ॥२॥ दहा आणि दोन गुरुपदी जडे । धन त्या सापडे त्रयोदश ॥३॥ चतुर्दशस्थानी दीपत्वे दिवाळी । अलक्ष पूजनी लक्ष्मीपूजा ॥४॥ दास म्हणे तेथे अनुपम सुख । होता अंतर्मुख मिळे नामी ॥५॥

कार्तिक

१८९८) ज्योती ज्योत मिळता दिवाळी पाडवा । मौज अभाव भावा भावबीज ॥१॥ तीन चार जाता पांडवी पंचमी । विवेक वैराग्य जन्मी सफलता ॥२॥ पंथे पंढरीच्या जाता तो बा हरी । तुळस पूजन वरी वैकुंठ तो ॥३॥ सत् चिद् प्रकाश मनी ते पुरी पौर्णिमा । सोहळा निरूपमा दास म्हणे ॥४॥

१८९९) भला बुरा संग टाकोनी असंग । धरावा श्रीरंग अंतरंगी ॥१॥ विकल्प निंदा त्यागे आशीर्वाद थोर । गुर्वाज्ञा साचार देव तेथे ॥२॥ मोक्षरेखा भाग्ये ज्ञानेश शोभले । समाधीसी आले स्वये देव ॥३॥ दास म्हणे तेथे सुखा काय उणे । सुखरूप होणे स्वयमेव ॥४॥

मार्गशीर्ष

१९००) शीर्षमार्गे जाता देवाची दिवाळी । दशेंद्रिय ऐक्यमेळी अखंडीत ॥१॥ ब्रह्मगिरीस्थानी सहज समाधी । खंडेराय वेधी निजयोगी ॥२॥

आत्मस्वरूपाची गीता उमगता । भेटी कूळ हनुमंता अनायासे ॥३॥ तपाचेनि तपे गुरुदत्त भेटी । रामनाम लुटी दास म्हणे ॥४॥

१९०१) रामनाम एकांती एकविध साधी । प्रपंच उपाधी भक्ता नाही ॥१॥ स्थिर भाग्ये भला निर्भयत्त्व माला । आधार त्यासी जाहला बरवा देव ॥२॥ अनुभव खुणे देवाचे दर्शन । चित्त समाधान पवित्राचे ॥३॥ दास म्हणे नाम विचार तू करी । आणिकाची परी नाही तेथे ॥४॥

पौष

१९०२) देवाचे मंदिरी जीवा खरे सुख । कर्म धर्म देख हरिनाम ॥१॥ सासर माहेर नुरे त्या लौकीक । मोक्ष त्याचा एक स्वयमेव ॥२॥ खटपटी जाते भोळ्या भावे शोधी । सत्य बोला वेधी मनोभृंग ॥३॥ दास म्हणे तेणे मूळ मेळविले । नाही त्या उरले मिळणेचे ॥४॥

१९०३) गुरुपदी मन गुरूकृपांजन । गुरुच्या सेवेने गुरुसुख ॥१॥ गुर्वानंद भाग्य काया जै गलित । अबोलाची मात गुरुछंदी ॥२॥ निंदक त्या कामा सत्संगे रिकामा । साठवोनि नामा अलिप्त तो ॥३॥ दास म्हणे त्यांनी साधिले मरण । जन्मोनिया जाण धन्य केले ॥४॥

माघ

१९०४) एक भावे मुख्य कामी सावधान । दया क्षमा पूर्ण शांती जेथे ॥१॥ टाकी घाये देव मूळ स्वभाव नाम । त्याचा योगक्षेम देवकृपे ॥२॥ मनाचे सामर्थ्ये होई मायातीत । जाणती पंडित वर्म खूण ॥३॥ दास म्हणे तया नाही काळ भय । अंतरी अभय नामयोगे ॥४॥

१९०५) मीपणाचे त्यागे गुरुपदी जीवा । जडविता पाडवा सद्गुरूंचा ॥१॥ सदाचार तैसे मौन एकचित्त । होऊनी निष्ठावंत धैर्य

धरी ॥२॥ काशी उमगता कळे नामगत । शिवरात्री मात कळता नाते ॥३॥ काय ते शाश्वत काय अशाश्वत । ज्ञानीयांचे चित्त सार शोधी ॥४॥ दास म्हणे ऐसा हिशोब जाणता । शिवपद प्राप्ती अखंड त्या ॥५॥

फाल्गुन

१९०६) संसार नगरी व्यवहार कळा । गुरुनामी आगळा आपण देव ॥१॥ सुखस्थानी जाणे हेचि बरी गोष्टी । खुणेवीण कष्टी विठोबाच्या ॥२॥ आत तरी बाह्य मनोजय विजय । देव देव पाय तरीच सोय ॥३॥ शेवट नरदेह साधी सीमगान । तमासा पाहून दास म्हणे ॥४॥

१९०७) स्वरूप पाहणे बीज उमगणे । अबोल बोलणे सदा वाचे ॥१॥ रंग उन्मनीचा एका भावे त्याचा । कलीत नामाचा घोष श्रेष्ठ ॥२॥ डोळियाचा डोळा उघडोनी जागा । पूजनात वागा चतुर्विध ॥३॥ दास सर्वकाळ साधनी राहता । शेवट तो स्वतः देव होय ॥४॥

रामपाठ

१९०८) देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य । झालीया दर्शन मुक्ती लाहे ॥१॥ रामपाठ करी रामपाठ करी । पुण्याची हे थोरी वर्णवेना ॥२॥ रामनाम गती देहात प्रचीति । धरोनिया चित्ती राम बोले ॥३॥ गोविंद म्हणे याचा घ्यावा अनुभव । वसे देव देव भक्तापाशी ॥४॥

१९०९) कोण पुण्ये हरि येईल हाताशी । विचारी मानसी हिताहित ॥१॥ सर्व पुण्यामाजी थोर नामपुण्य । ज्यात उणेपण काही नाही ॥२॥ एकवेळ मुखी उच्चारिता राम । तरती अधम हेळामात्रे ॥३॥ गोविंद म्हणे एकवेळ नरदेह । दुजी वेळ पाहे व्यर्थ असे ॥४॥

१९१०) अभक्ताचे जिणे होय लाजिरवाणे । रामनामाविणे सर्व व्यर्थ ॥१॥रामनाम ज्ञान रामनाम धन । रामनामी जाण सर्व काही ॥२॥ म्हणोनिया नाम उच्चारावे वेगी । जव देह उगी चालतसे ॥३॥ गोविंद म्हणे वेग चाललासे पाही । साधनी या राही संसारात ॥४॥

१९११) रामनामाविण अमंगल वाणी । जाणा ती बोलणी अधमाची ॥१॥ मंगल ते काय शोधोनिया पाही । रामनाम देही मंगल असे ॥२॥ तेचि उच्चारावे सदा सर्वकाळ । जेणे कळिकाळ भीती पावे ॥३॥ गोविंद म्हणे मन गळता मंगल । मनाची खळबळ जेथे नुरे ॥४॥

१९१२) करिती खटपट शोधावया देव । परि देवदेव हाता नये ॥१॥

खटपट काय कळेचिना पाही । व्यर्थ दिशा दाही भ्रमताती ॥२॥ खट पटती तरी खरी खटपट । रामनाम नीट उच्चारावे ॥३॥ गोविंद म्हणे प्रेमे घेता देवभेटी । योगयाग गोष्टी उपाधी ते ॥४॥

१९१३) एक भावे राम उच्चारणी रत । तयाचा अंकित देव असे ॥१॥ भाव म्हणजे काय ज्यावीण सर्व वाव । जयाचा प्रभाव देही दिसे ॥२॥ भाव कळो येता देव कळो येई । अन्यत्र उपायी शिणतसे ॥३॥ गोविंद म्हणे भाव अंतरी धरावा । अभाव टाकावा नाम योगे ॥४॥

१९१४) अन्य आचरणी पातकांच्या राशी । जाती विलयासी नाममात्रे ॥१॥ म्हणोनि रामनाम सकळा वरिष्ठ । बोलियेले श्रेष्ठ संतमुनी ॥२॥ रामनाम मुखी थोर सदाचार । पापाचा विचार ज्यात नसे ॥३॥ गोविंद म्हणे यम वंदितसे पाय । इतर ते काय तया पुढे ॥४॥

१९१५) रामनाम मुखी नित्य नेमे गाता । त्या नसे मागुता जन्म घेणे ॥१॥ नित्याचे नेमाचे असे एक नाम । घेता सरे काम अंतरीचा ॥२॥ कमी जास्त काही अनित्यता नाही । स्फुरतसे देही अखंडित ॥३॥ गोविंद म्हणे घ्यावे तेचि वेळोवेळा । अंतरी कळवळा धरोनिया ॥४॥

१९१६) सर्व तीर्थातीर्थ पवित्रापवित्र । रामनामे वक्त्र धन्य होय ॥१॥ तया रामनामी नसे ज्या आदरू । पापाचा आगरू होत असे ॥२॥ रामनाम घेता हलाहल शमवि । इतर ते कायी तया पुढे ॥३॥ गोविंद म्हणे संसाराची हळहळ। तेचि हलाहल जीवा नुरे ॥४॥

१९१७) संतसंगतीने देव पडे ठायी । तयाचिये पायी लीन व्हावे ॥१॥ संगती म्हणजे समगती जाणे । दाविताती खुणे संतराय ॥२॥ समगती माजी हरीचा आठव । नुरे देहभाव देहामाजी ॥३॥ गोविंद म्हणे मन होतसे उन्मन । रामनाम खूण दर्शनाची ॥४॥

१९१८) रामनाम हे तो एकतत्वी कळा । सर्वतत्वे विकळा तयाविण ॥१॥ एकतत्वी कळा शोधोनी पाहता । तिन्हीची ऐक्यता दिसो येई ॥२॥ इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ॥३॥ गोविंद म्हणे सर्व नामामाजी वसे । सकळा श्रेष्ठ कसे नव्हे सांगा ॥४॥

१९१९) रामनाम योगे सावध जो झाला । कळिकाळ त्याला वंदितसे ॥१॥ सहा जिंकोनिया होणे निर्विकार । सावध प्रकार ऐसा असे ॥२॥ काळवेळ नामस्मरणासी नाही । सदा सर्वदाही उच्चारावे॥३॥ गोविंद म्हणे वृत्ती उठता बैसता । रामनाम चित्ता धरूनी राही ॥४॥

१९२०) तपाचे जे तप रामनाम देख । उच्चारिता हरिख ब्रह्मादिका ॥१॥ तप म्हणजे काय प्रकाशित होणे । अंधार दवडणे बुद्धीतील ॥२॥ प्रकाशित होता अंतरिची ज्योती । जडेल आसक्ती रामनामी ॥३॥ गोविंद म्हणे अज्ञान उरेल कशाला । पेटता मशाला देवाजीची ॥४॥

१९२१) योगादिक कर्म वाऊगाचि धर्म । करोनिया श्रम व्यर्थ होय ॥१॥ सांगातीचा धर्म नाही वोळखिला । रामनामी आला तरी कळे ॥२॥ जन्मापासुनिया मरणांतावरी । जीवाबरोबरी सदा असे ॥३॥ गोविंद म्हणे तोचि आपुला स्वधर्म । रामनाम वर्म ज्यात वसे ॥४॥

१९२२) भाग्याचे ते भाग्य रामनाम पाही । येर भाग्य होई श्रेष्ठ कसे ॥१॥ येर भाग्यवंता देव भेटी नाही । एरंड कदा पाही ऊस नव्हे ॥२॥ म्हणोनिया जनी साठवावे नाम । अंतरीचे काम निवारोनी ॥३॥ गोविंद म्हणे तोचि भाग्ये विनटला । जगी धन्य झाला हरिभक्त ॥४॥

१९२३) नाम भक्तीपंथ सकळा वरिष्ठ । जेथे जीवा कष्ट न पडती ॥१॥ दृढ धरी मनी रामनाम कथा । वाया आणिका पंथा जाऊ

नको ॥२॥ चालियेला पंथ असे निजदेही । मनोवेगे जाई आक्रमोनी ॥३॥ गोविंद म्हणे देव भेटेल सहज । रामनाम गूज उमगता ॥४॥

१९२४) अखंड सुख राम खंड सुख माया । माझी ऐसी काया जव नव्हे ॥१॥ तव खरे सुख येईल ना हाती । जीवाची विपत्ती दूर नव्हे ॥२॥ अखंड चरणगती चाले निजदेही । साधुबोध होई तरीच कळे ॥३॥ गोविंद म्हणे सर्व सुखाचेही सुख । रामनाम एक आन नसे ॥४॥

१९२५) समाधीचे सुख सांडी ओवाळोनी । रामनाम वाणी वदे जरी ॥१॥ समत्वाचे सुखी हरिची समाधी । इतर उपाधी नुरे जेथे ॥२॥ सदा सर्वकाळ अंतरी अढळे । कदापि न ढळे तेचि साधी ॥३॥ गोविंद म्हणे ऐसी समाधी साधिता । वैकुंठ ये हाता अनायासे ॥४॥

१९२६) माळ धरोनिया राम नाम घेता । द्वैताची तो वार्ता नुरे काही ॥१॥ सर्वत्र अद्वैत उरेल गोविंद । रामनाम छंद मनोमाळे ॥२॥ संकल्पात राम विकल्पात राम ।मनोमाळा उत्तम जाणावी ही ॥३॥ गोविंद म्हणे धरी रामकृष्ण माळा । नामी राहील उमाळा अखंडित॥४॥

१९२७) जपोनी जपणे जप बोलिलासे । वाया जात असे काय देही ॥१॥ कायेमाजी व्यर्थ जात असे नाम । तेचि घेणे काम नरदेही ॥२॥ जेणे योगे झाला हनुमान देव । जपे स्वयमेव रामनाम ॥३॥ गोविंद म्हणे जप अंतरी करणे । तुटेल धरणे संसारीचे ॥४॥

१९२८) नाम उच्चारणी धरावी आवडी । याविण तातडी करू नये ॥१॥ रामकृष्ण हरी उच्चारिता वाचा । वंश त्या नराचा पुण्यवंत ॥२॥ शिवाचे अंतरी रामनाम आहे । वाचे पैल जाये तरीच कळे ॥३॥ गोविंद म्हणे पुण्य होईल अगाध । हाचि धरी बोध आन नसे ॥४॥

१९२९) एकांत बाणता लोकांतात हरी । प्रगट बाहेरी आत दिसे ॥१॥ कोणा एकामाजी होत असे अंत । पहावे चित्तात विचारोनी ॥२॥ एक असे आत्मा ज्यात आदि अंत ।तो स्वये एकांत ओळखावा॥३॥ गोविंद म्हणे तया स्थानामाजी जाता । रामनाम वार्ता दूर नसे ॥४॥

१९३०) अनेक विधाने करोनी चांगला । परी नाही आला मोक्ष वाटे ॥१॥ मोक्षाची ती वाट जवळीच नीट । रामनाम धीट होऊन घेई ॥२॥ धीट होऊनीया पाठ करी त्याचा । तो नर दैवाचा खरोखरी ॥३॥ गोविंद म्हणे एक विधान नामाचे । तेथे आणिकाचे काम नाही ॥४॥

१९३१) रामनामी एकविध होऊनी राही । पतिव्रता पाही पतीलागी ॥१॥ मग देव तुझा करील सांभाळ । जैसी माता बाळकासी जपे ॥२॥ तरो अथवा बुडो नाम न सोडीन । प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी ॥३॥ गोविंद म्हणे तुझा सखा होय हरी । आणिका प्रकारी काय काज॥४॥

१९३२) सारासार विचार करोनिया पाही । तरीच होय काही आत्महीत ॥१॥ निगुर्ण हे सार सकळा पैलीकडे । तया ऐलीकडे तीन गुण ॥२॥ तया पैल जाता साधतसे काज । जेथे देवराज भेटी होय ॥३॥ गोविंद म्हणे हीत रामनाम कंठी । जेणे जगजेठी तुष्ट होय ॥४॥

१९३३) रामनामामाजी साधिलीया पवन । अनुभव खूण ऐशी असे ॥१॥ जव एक श्वास साधेल पवन । मना समाधान थोर वाटे ॥२॥ जव दोन श्वास साधेल पवन । समधातुक मन होत असे ॥३॥ जव चार श्वास साधेल पवन । विरहीत मन देह बुद्धी ॥४॥ गोविंद म्हणे झालीया श्वासाचे साधन । पळांचे साधन पुढे ऐका॥५॥

१९३४) जरी एक पळ साधेल पवन । होय एकाग्र मन तीही अवस्थे ॥१॥ जरी दोन पळ साधेल पवन । मनाचे उन्मन होत असे ॥२॥ जरी चार पळ साधेल पवन । होतील श्रवण दश नाद ॥३॥ जरी आठ पळ साधेल पवन । होत असे दहन कामाचे ते ॥४॥ जरी पंधरा पळ साधेल पवन । ऊर्ध्वपंथी गमन साधे बापा ॥५॥ जरी तीस पळ साधेल पवन । होय आगमन ब्रह्मस्थानी ॥६॥ गोविंद म्हणे झालीया पळांचे साधन । घटिकांचे साधन ऐका पुढे॥७॥

१९३५) जया एक घटिका साधेल पवन । सहज दृष्टी जाण लाधतसे ॥१॥ जया दोन घटिका साधेल पवन । करील उल्लंघन ब्रह्मरंध्र ॥२॥ जया चार घटिका साधेल पवन । तारक बिंदू जाण दिसतसे ॥३॥ गोविंद म्हणे झालिया घटिकांचे साधन । प्रहरांचे साधन ऐका पुढे॥४॥

१९३६) ज्यासी एक प्रहर साधेल पवन । आटतील जाण देहधर्म ॥१॥ ज्यासी दोन प्रहर साधेल पवन । विष्णुचे दर्शन होत असे ॥२॥ साधिलीया जीवा विष्णुचे दर्शन । अष्टौ प्रहर साधन चालतसे ॥३॥ गोविंद म्हणे गुरुकृपेचे विज्ञान । बोलिलो संपूर्ण हनुमंत कृपे ॥४॥

१९३७) एक म्हणजे काय जाणावे मीपण । दोन म्हणजे जाण दुजा भाव ॥१॥ तीन म्हणजे काय जाणावे त्रिगुण । चार म्हणजे जाण चार खाणी ॥२॥ पाच म्हणजे काय पंच हे विषय । सहा म्हणजे काय सहा रिपू ॥३॥ सात म्हणजे काय सप्तविध धातू ।आठ म्हणजे होतु अष्टधाही ॥४॥ नऊ म्हणजे काय जाणा नवद्वारे । दहा म्हणजे बारे दशेंद्रिये ॥५॥ अकरा म्हणजे काय जाणावे ते मन । बारा म्हणजे जाण चित्त कुडे ॥६॥ तेरा म्हणजे काय कुबुद्धि ते पाही । चौदा म्हणजे काय चौदा विद्या॥७॥ गोविंद म्हणे ऐका पुढील प्रकार। विसावा तोवर नाही जीवा ॥८॥

१९३८) पंधरा म्हणजे काय जाणावा हंकार । सोळा ते साचार दहा सहा ॥१॥ सतरा म्हणजे काय वासनेचा ठाय । अठरा म्हणजे काय जीवभाव॥२॥ एकोणीस काय शिवाचे विस्मरण । विसावा तो जाण स्मरता राम ॥३॥ गोविंद म्हणे विसावा विसाविया नामी । सद्गुरुंचे धामी कळो येई॥४॥

१९३९) अभंग रामपाठ असती बत्तीस । वाचिता विश्वास धरोनिया ॥१॥ तयावरी कृपा करील जगदीश । सांडोनी आळस पाठ करा ॥२॥ करूनी शुद्ध मन एक चित्ते पाही । धरी सर्वदाही स्मरणजीवी ॥३॥ तया रक्षी स्वये रामसीतापती । सर्वत्र आकांती अंतकाळी ॥४॥ ज्ञानेश्वरकृपा प्रसादे रचिले । तयांचिये बोले समाधान ॥५॥ गोविंद करी रेवणसिद्ध पदी नमन । रामपाठ पूर्ण सांग झाला ॥६॥

१९४०) श्रीमामांनी देह ठेवणेपूर्वी लिहिलेला शेवटचा अभंग

मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजयराम ॥१॥
अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ॥२॥
गोविंद म्हणे स्व-स्वभाव । जीवी सोडीरे अभाव ॥३॥

-: वर्णानुक्रमणिका :-

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
अ		अनन्य भजनाची खूण	८४५
अकर्मात साधी कर्म	१२१७	अनन्य भक्तीचे लक्षण	९६४
अकरावे समर्पण	३९९	अनन्य होवोनि मुखी नाम	११६७
अखंड कीर्तनी प्रीती	९५४	अनन्याची ओळखण	८२४
अखंड कीर्तनी बुद्धी जरी	१७०४	अनहित कशामाजी	७४८
अखंड खंडेराया	१३७	अनादि निर्गुण प्रकाश	१२४
अखंड जे अखंडित	८७२	अनुभव डोळसाचा	१५२७
अखंड सुख राम खंड सुख	१९२४	अनुभव म्हणजे कृती	१८४६
अखंडात जाता विजयादशमी	१४४	अनुभव हा संतांचा	१५२८
अखंडात सर्व काही	११७०	अनुभवे अनुभव	५७५
अखंडित नाम मनी	१०५०	अनेक दैवते अनेक ते मंत्र	१०४४
अखंडित समाधान.. कैशी	७२०	अनेक विधाने करोनी	१९३०
अखंडित समाधान.. तेथे	१३९८	अनंत जन्मीचे शेवट	३४८
अखंडित समाधान.. हेचि	७१९	अन्न देणार देव देख	११६८
अगा देवराया करितसे	३	अन्न देतो उदरास	१८७८
अचूक साधन	११६९	अन्य आचरणी पातकांच्या	१९१४
अढळ शांतीचे लक्षण	८३७	अन्य देही वाया जाय	३२०
अति वाईटाचे भले	३५०	अन्य प्रयत्न करोनी	४०६
अतिशय नको काही	६९८	अन्य वाटे जाता पाही	९४६
अति सुलभ साधन	११८३	अपावन होये ज्या संगे	१०१६
अर्थ कळल्याची खूण	१४	अपावना देव करितो	१४६९
अधिक ते तप जाण	१८७१	अपावना संगे होई	१४७०
अधिक नवल ते प्रभुपदी	१८८२	अफाट हे जग हिशेबाची	१०५७
अधिक नामाची करणी	१८४९	अबोलपणाचे बोलणे	७९०
अधिक भावबळ पाही	१८२७	अबोल बोलणे बोलावे	१८३३
अधिक मधुर ते काय रे	१७४७	अबोल बोलाची उत्तरे	७९२
अधोगती आणि गती	३४७	अबोलाचा बोल	७९१

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
अबोलाची मात	११६६	असती अक्षरे पन्नास	१४२
अभक्ताचे जिणे होय	१९१०	असती उपाय अनेक	११६३
अभय ऐसे काय जगी	१७४२	असा काही धरी छंद	९५३
अभावाने कार्य हानी	६१५	अहर्निश नामबीज	२५८
अभाविका उपदेश	६१६	अहो अभ्यास जो करी	१२२४
अभिरुची धरुनी राहे	११६५	अहो ओळखिता काटा	११७८
अभंग रामपाठ असती	१९३९	अहो कैवल्याचे धाम	१६३५
अमल देवोनी तेज दाखविले	१५०४	अहो गायीचे पूजनी	१५७
अमृत गोड सर्वाधिक	१८७४	अहो देवाहोनी देख	१८२२
अयोध्ये माझारी आनंद	३७	अहो मानवदेही	१८१४
अरूपाचे निर्गुणरूप	१७१	अहोरात्र कृती मन	१२२३
अरूपाचे रूप पहाणे	१४७८	अहो साधनीच्या सुखा	१२२१
अरे देव तू अरे देव तू	१६९८	अहो हनुमंतषष्टी	२२८
अरे मना मोह सोड हृद्‌वैरी	१७०६	अहंकार त्रिपुर शिवे	२०३
अरे शिव तू अरे शिव तू	१७७६	अहंपण टाकी बा रे	५०१
अर्थ मनी घेई.. बा रे	१६७७	अक्षय तृतीया खरे नाणे	१८८८
अर्धोदय पर्वकाळ	३४२	अक्षयी ते भले ..बुद्धी	४२
अर्धोदय पर्वकाळ आजि	१७२८	अक्षयी ते भले.. क्षय	४१
अलक्ष साधन हेचि	१७२	अक्षराचा अर्थ	१३
अलिप्त तो रामनामी	११६४	अज्ञान कुग्रामी जीवासी	४१२
अल्प निश्चयाचा प्राणी..एक	८१६	अज्ञान कुबुद्धी काय	७४२
अल्प निश्चयाचा प्राणी..ओळ	८१७	आकाश सकळा पदार्थी	१२२०
अवचिता पुण्ये जन्म प्राप्त	३३९	आकाशापैल जाता खूण	१२१८
अविवेकाच्या गावी अवघीच	१८	आज करू उद्या करू	६८४
अशक्य ते काय	१६०७	आठवी रे आठवी रे	९६
अशक्य ते शक्य साधुजना	१६०६	आठव्याने आठविता	१०१
अशुद्ध मायेचा प्रकार	२७२	आठामाजी पाहू जाता	३९७
अष्ट विसरावे नामी...आठाचिये	१०२	आडमार्गी जे गमन	५२५
अष्ट विसरावे नामी...नवल	९८	आणिकाचे नाही काम	१४५४

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
आत असे तरी ...काय ते	५८६	आपुले आपण आत्मसुख भोगी	११६१
आत असे तरी ...नाम ते	११६२	आपुले आपण करावे	७६६
आत तात्त्विक विचार	१८८०	आपुले आपण स्वात्मसुख	१४५३
आत प्रवेशता मन	१४९६	आपुले कल्याण कशाने	७६७
आधार तू देवा सकळा	१४६०	आपुले कल्याणाची गोष्टी	११५८
आधी कष्ट मग फळ	१२०२	आपुले ते धाम .. जाणा	५४१
आधी कळस मग पाया	८५९	आपुले ते बरे कशाने .. बरे	७६८
आधी मन घेई हाती	११०	आपुले ते बरे..भविष्याचा	७६९
आधी मन हाती घेई	३७१	आपुल्यावरोनी जग ओळखिती	८०२
आधी मन शुद्ध करी	१६४१	आलिया देवासी वाट	७७९
आनंदाचे धाम ओळखोनी	६५	आले भगवान आले	२११
आनंदाचे धाम.. जेथे	३९५	आल्या अतिथीसी द्यावे	३५७
आपण आपुला विश्वास	१७४०	आशात्याग तो हा सोज्वळ	३५४
आपणचि देव	१५३१	आशा दुःखासी कारण	९१०
आपणचि होय देव	१५३९	आशा व्याघ्री मारिता	३५३
आपणावरोनी जग ओळखावे	८०३	आशा सोडिता सुटेना	१२९९
आपणास कोण तारी	६११	आशीर्वाद भला..संतकृपेचा	७७२
आपला आपण शिव होई	१७७५	आशीर्वाद भला.. संतजनांचा	७७४
आपुला आपण करीता	५६७	आशीर्वाद संता जाती	७७१
आपुला देव व्हावा जरी	५९९	आशीर्वाद सज्जनांचा	७७३
आपुला विशेष अधिक	१८२१	आश्चर्याची गोष्ट जगात	८७८
आपुला विश्वास बैसेना	१४२८	आसन ते आस न ते	१७२५
आपुला ठेवा नाही	६५५	आसन ते आसन ते	१७२६
आपुलाचि भाव ....वचन	६०९	आसन ते सर्वाधिक	१८५१
आपुलाची भाव आपणासी	६१०	आहे आपणाचपाशी	१३९०
आपुला राम आपुल्यापाशी	८९०	आहे देववन देहाचे माझारी	५४५
आपुलिया संगे येईल	६४४	आहे स्थिती तीच बरी	७३४
आपुलिये घरी ... जीवा	५४२	आळस सोड आळस सोड	१६९१
आपुले आपण आत्मसुख	११६०	आळस सांडी तू	१७९५

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
आत्मतीर्थ सकळा श्रेष्ठ	१२१५	उलटा मार्ग उलटा	७७७
आत्मतीर्थी बुडी देता	३८३	उलटे देऊळ	८५६
आत्मदीप ज्योती..नवल	१५७०	उलट्या देऊळी ... बैसला	८५७
आत्मदीप ज्योती..दीप	१५७१	उलट्या देऊळी .. लपाला	८५८
आत्मदीप ज्योती पेटल्या	१३६७	उलट्या देऊळी देव असे	८५५
आत्मरूपी चित्त जडता	१०७४	उलटोनिया मार्गी येई	७७६
आत्मवस्तु शोधुनि पाही	११५९	उल्लंघिता लाज	७१३
आत्मसूर्य उपासन.. ब्रह्मकर्म	२३८	एक अभयाचे स्थान	८३०
आत्मसूर्य उपासना.. मनी	९४४	एक एक शिष्या सेवा	११५६
आमस्वरूप पडता दृष्टी	१४०४	एक एकासी सवाई	४३६
आत्मस्वरूपाची गोडी	१४०६	एक चित्त होता चित्तशुद्धी	३९८
आत्महितालागी पूर्ण	६९७	एक चुळका जीवन	१४२३
आत्महितासी जाणणे	६९६	एकटा जो झाला	१३९९
आत्माराम ध्यान कैसे	१५२६	एक तप आचरिता	१२९६
इच्छा असोनिया मनी	१४५१	एक तुळशीचे पान ..देवा	१९९
इतमाम ज्याचा त्याला	६५९	एक तुळसीचे पान..मोठे	१९८
इतर साधना समान पाहे	५८	एक तत्त्व मनी धरी	११५५
इहलोकी नरदेह	३२९	एक धरिता दृढ भाव	६०३
उद्योगाचे घरी ..करी उद्योग	६५६	एक धरिता निश्चय	८६६
उद्योगाचे घरी .. स्वर्ग	६५८	एक नाम धरी रे	१७४६
उन्मनी माझारी नागरूप	९०	एक भावे देव पाही	६०१
उन्मनीची ज्योत पेटल्यावाचून	१४९७	एक भावे मुख्य कामी	१९०४
उन्मनीची ज्योत पेटल्यावाचोनी	१४९८	एक भावे राम उच्चारणी	१९१३
उन्मनीचे स्थानी देही	९१	एक मी रे जरी जिरे	४७३
उपदेश म्हणजे कायी	१२८९	एक म्हणजे काय	१९३७
उफराट्या नामे वाल्मिकी	१६४३	एक रामनाम सार	४५७
उमगणे तेचि पाही	१२८६	एक लौकिक साधू	३०९
उमगता त्रिपुरारी	२०६	एकविध नामी राही	१०८८
उरली नाही वृत्ती	१५४१	एक विधी पाही एक	९२६

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
एक विश्वास ज्या नाही	६२१	ऐका सहज साधन	७८७
एक वेळ नाम घेई	११५४	ऐका साधकाची दशा	५५६
एक सत्य तो अनन्य	४२१	ऐका साधुजन गोष्टी	१६०८
एक साधन साधणे	१५८	ऐका सिद्धाची ती मात	५५७
एक हरिदिनी एक	१८९	ऐका संन्यास आश्रम	५४८
एका जगाचिया पोटी	७३९	ऐका स्वहित करणी	७४७
एकादशी व्रतसार	७३	ऐका द्वादशीची कथा	८१
एकापासोन एकोणीस	५७०	ऐका प्रारब्धाचा खेळ	१२०६
एका भावे एका	१५४९	ऐका ब्रह्मचारी धर्म	५३५
एकामाजी ज्यांचे चित्त	११८६	ऐक्य भावे जरी नाम सदा	११५३
एका विकल्पाने बारे	४९१	ऐसा कलीचा प्रभाव	१६७१
एके ठायी ठेवी भाव	६०५	ऐसा काही धरी छंद	८२१
एके ठायी धरी भाव	६०६	ऐसा कोणी घेईल चरखा	१५५८
एकांत बाणता लोकांतात	१९२९	ऐसा धरावा विचार	५६३
एकांत बाणे तरी हरी	६५४	ऐसा नाम अभिप्राव	११११
एकांतीचे स्थानी	६५३	ऐसा भावाचा प्रभाव	६०२
ऐका अर्चनाचि भक्ती	९७२	ऐसा मुक्तीचा उपाव	६९०
ऐका अविचार फळ	५६६	ऐसा सुलभ उपाय	११५२
ऐका अविश्वास .. जो	६२३	ऐसा संतांचा निरोप	७१७
ऐका ऐका हो सज्जन	५००	ऐसे करी तू भजन	११५१
ऐका जन गुजगोष्टी	१६०५	ऐसे कर्म आचरावे	११२९
ऐका परम कल्याण	९०९	ऐसे धरावे की ब्रीद	६७३
ऐका भावाचा प्रभाव	६०८	ऐसे संता संत जन	१५६०
ऐका भावाभाव फळ	६०७	ऐशा विचारी राहणे	५६५
ऐका मायेची करणी	४०५	ऐशी खटपट करी	५०६
ऐका मुमुक्षु लक्षण	५५४	ऐशी पोटाची तो कथा	८८०
ऐका वंदनाची भक्ती	९८१	ऐशी प्रयत्नाची दिशा	६५७
ऐका शुद्ध सत्वगुण	४९९	ऐशी बोली केली मात	७८८
ऐका श्रवणाची मात	९४७	ओळखावे संतघर	१५९६

अभंगाचे नांव	अभं.क्र.
ओळखिता मायबाप	४७९
ओळखिता हरिहर	२००
अंत नाही ज्याला	११६
अंतररंग रहातो जेथे	१४९५
अंतररंगी मन जडता	२०८
अंतरात अंतरखूण	९५६
अंतरात्म दर्शने आत्मरूप	३३२
अंतरीचे भजन देई	९६५
अंतरी राम तुझ्यापाशी	७९८
अंतर्शक्ति साधोनिया	८२६
अंतरीची तळमळ	५१४
अंतरी होसी धीट	१७४१
क	
'क' मधील जागरी	१५२
कथा आयकणे विधान	८६४
कधी साधनी रमसी	१७६८
करणे रामनाम गान	७०७
कर्तव्याचे आचरण	८६३
कर्ता करविता एक देव	६७१
कर्माची तो गती बहुत	१६५५
करी एषणांचा त्याग	९२८
करी तरी काय एक	८२०
करी नामाची घोटणी	१०५२
करी भक्तीचे शोधन	९९७
करी साधन अभ्यास	१२३०
करिता गायीचे पालन	१५६
करिता जनांवरी प्रीती	९३४
करिता मुक्तीवरील भक्ती	९९९
करिती खटपट शोधावया	१९१२
करू नको मगरूरी	११०९
कली म्हणजे द्वैत	३१२
कलीयुगी तरणोपाय	३१३
कल्पना करोनी	४८७
कशाचेनि योगे काय	१०१५
कशामध्ये काय रे	१७८०
कशामध्ये काही ..एक	७८६
कशामध्ये काही ..सावध	६७४
कशामाजी असे हित..गोविंद	१८४०
कशामाजी असे हित..एक	१८४१
कष्टत जाई स्वये	१६८३
कष्टी झाला प्राणी	८७६
कसलीयावीण... कैसे पावे	७०५
कस्तुरी म्हणता फाके	३०६
कसा ओळखोनी घेई	७८५
कसा सांगितला नेम	७०४
कसे, मग राम पाही	७०३
कसे कसे कसे ..कसोनिया	१६९३
कसे कसे कसे .. हळद	१६९२
कसे कसे कसे .. जसे जसे	१६९४
कळ कळे निर्गुणात	११७५
कळलियावीण जाणा	१४४९
कळे ऐसे नाम कोणी न	४६१
का बा करिसी गैरसोय	१०८२
कामक्रोध पैलपार	१०११
कामामध्ये मुख्य काम	१२१०
काय अनित्य नको चित्ती	११७४
काय इंद्रियासी आत्मसुख	२७७

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
काय अंतरी तमासा	२५६	काय साठवावे काय	१००८
काय करणे अधिक.. दया	१८६१	काय साधन साधावे	१२२२
काय करणे अधिक..मज	१८३१	काय सुलभ उपाव	८५४
काय करणे उचित	४६४	काया नगरीत देव	८५३
काय करणे विशेख	१८३२	काया शुद्ध कैसी	१६६७
काय करणे शोध काय	१२९२	काया ही पंढरी	१४२९
काय करूनी इच्छा	४६३	कायेमाजी आहे कोण	१२९१
काय केला बोध इंद्रिया	६७८	कायेमाजी मुख्य जाणा	२२४
काय केलीयाने जन्म हा	२९२	काशीमाजी वास होता	२४८
काय घ्यावे कायी घ्यावे	१०४६	काही तरी धरी नेम	६६३
काय चालतोसी पुढे	८५२	काही तरी बोध	१६७५
काय तप करी	१२९४	काही न बोलणे मौन	१८५०
काय तप कायेमाजी	८४८	काही नाही तेथे	४०८
काय देतील देणार	८७९	काही युक्ती साधू जाता	८८३
काय देव आहे वनात बैसला	१४३२	काहीही साधाया व्हावे	८१९
काय धनहीनासी देव	१७१६	काळ कैसा करितो ग्रास	६४२
काय धरिसी असूया	२२५	काळ कैसा घालवावा	१६६६
काय न करी सांगा देव	१४२५	काळ कैसा घाली घाला	५४३
काय पाहसी कसोटी तू	१७१३	काळ कोण्या वेळे कैसा	९०४
काय पाहसी कसोटी	७०६	काळ चांगला राहिना	८८१
काय पाहसी तमासा चित्त	२५४	काळ जाई काळ जाई	१७१४
काय पाहसी तमासा नाम	१७४८	काळ युक्ती युक्ती	३३६
काय बोल घ्यावा मनी	६१८	काळ सम नसे कदा	१७७९
काय भुसाचे कांडण	६६७	काळा हाती सोडवित	९४२
काय भ्रमाचे कारण	२७५	कीर्तन ते महातप	९५५
काय मना तुज वाटतसे	३५२	कीर्तनभक्तीचे लक्षण	९५९
काय म्हणते कल्पना	४८६	कीर्तनाची गोडी	९५२
काय लौकिकाची सेवा	३१०	कुसंगाने अधोगती	४४०
काय व्यवहार कळा	१३५७	कुळ भेटी हनुमंता	२१३

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
कैचा संकटाचा नाश	६४७	कोण पुण्ये हरी येईल	१९०९
कैचा होय भवभंग	२४९	कोण मना फिरवी	३९६
कैसा आळस निरास	१२३१	कोण मी कैचा कोठुनी	१७३७
कैसा देवाचा किंकर	२३७	कोणा भविष्य कळेना	६७२
कैसा पवन साधावा	१२१६	कोणाचेही घ्यावे बोधाचे	७२२
कैसा प्रपंच सांडावा	४५३	कोण्या अंगे ब्रह्म व्हावे	१२६२
कैसा पालटे दुर्गुण	१५६१	कोण्या गुणे होय पापाचे	५१६
कैसा यत्न करिता	१२९३	कोणी का असेना नाम	६१४
कैसा हा खेळ	१७१५	कोणी काय करू नये	६४०
कैसा होऊनी गाफील	१०२०	कोणी तो असो की	१६६३
कैसे असावे संसारी..ऐका	२९८	कोणी पाहे वा न पाहे	८६२
कैसे असावे संसारी.. भेटी	२९९	कोणी लोकमान्य कोणी	१५५७
कैसे असावे संसारी.. जेणे	२९७	कोरडेची ब्रह्मज्ञान	४६६
कैसे आयुष्याचे चीज	१००७	कोळसा घाशीता	४२८
कैसे करावे चिंतन	५४०	कृतकृत्य रामनाम	११७३
कैसे करावे साधन	१२१४	कृतकृत्य होता देह सार्थकता	१८९२
कैसे देहाचे सार्थक	९०२	कृतयुगामाजी कलीयुग जाणा	३१४
कैसे म्हणजे कसुनी राही	७८४	कृतादि युगात कलीयुग जाण	३११
कैसे वागावे जनात	६७५	कृपणपणाने धनसाठा होई	१५७८
कोठे गेले प्रेम कोठे गेला	१३७६	कृपणाचे चित्त .. गुरुकृपे	११७२
कोण अधिक करणी	१८४८	कृपणाचे चित्त .. परमार्थी	११७१
कोण आधार जीवासी	१४१८	कृष्ण आहे आत्मदेही	९७
कोण आपणा तारक	६१२	कृष्ण मुरलीचा ध्वनी	१०३
कोण करावा विचार	५६४		
कोण गाव ओळखावा	५६९	**ख**	
कोण जगी वाया गेला	७६०	खट इंद्रिये पटती	५०८
कोण जीवाचा सांगाती	९८७	खट पटलेचि नाही	५०७
कोणत्या गोष्टीसी कशाचे	७२३	खटाटोप काही करु नको	५०९
कोणत्या गोष्टीसी कोणते	७३५	खरा पंडित तो भला	१३५५

अभंगाचे नांव	अभं.क्र.
खरा राम रामनामामाजी	५९१
खरा त्यागाचा प्रकार	१५२२
खरी खोटी गोष्टी	४२२
खरी खोटी वस्तु	८३८
खरे अनन्याचे ज्ञान	५६२
खरे उपेगी भजन	८४३
खरे काय कळो येता	१०३५
खरे खोटे उमगता	८३९
खरे खोटे शोधुनी घेई	८४०
खरे तपाचे लक्षण	१२९५
खरे नाणे खरे नाणे	१०२१
खरे नाणे नरदेही	१०२२
खरे ब्रह्मज्ञान येईल	४६७
खरे सुख खरे दुःख	७९७
खरे सुख रामनामामाजी	१३९२
खरे सुख रामनामी	७९९
खरे सुख रामपायी	१३९३
खरे सुखस्थानी जाता	७९६
खरे स्वसुखाचे स्थान	११४१
खरे हित ते आपुले	७४९
खुणेवीण खटपट	५१०
खुणेवीण जो का	१५३२
खंड नव्हे ते अखंड	८७३
खंडेरायाची प्रचीती	१३९

ग

गडबड मुखी काय	११४५
गणेशाची ओळखण	१११
गती बोलिजे सद्‌गती	१०७३
गलित काया अभिमान	२२९
गलित काया होणे	२३१
गृह आपुले जाणावे	५३७
गृह पुत्र धन दारा	८०६
गारुडी रे गारुडी रे	१८०१
गीत अंतरी राहिले	२१७
गीता गीता गीता ऐसे	२१८
गुण पालटेना गुण	४४८
गुणातीत परमेश्वरू	१४०१
गुणातीत होता पाही	१४०२
गुणी अवगुणी या..सोहं	४४४
गुणी अवगुणी या संगती	४४२
गुंगवी रे गुंगवी रे	१८०२
गुरु आज्ञा करिती जैशी	१३१९
गुरू आज्ञा साचार	१३२१
गुरू आज्ञेचे आचरणी	१३२२
गुरुकृपा गुरुकिल्ली	१३२४
गुरुकृपा नित्य नामाचे	९५७
गुरुकृपा भाग्य थोर..भेटवील	१०
गुरुकृपा भाग्य थोर..वर्णवेना	१२
गुरुकृपे काय होते	१३३३
गुरुकृपेचा ध्वज बरवा	३३
गुरुकृपेचे अंजन	१३३२
गुरुकृपे रामसेवा	१३३६
गुरुकृपे रामा पाहोनिया दृष्टी	१३३१
गुरुकृपेवीण.. कैचा भेटे	११
गुरुकृपेवीण.. कैचा होई	१३२५
गुरुकृपे साक्षात्कार	१३२७
गुरुचरणी जडता चित्त	१२५५

अभंगाचे नांव	अभं.क्र.
गुरूची अवज्ञा	५०
गुरूंचे जे गुरूनाम	११९१
गुरुदेवकृपे माया निरसन	१३२८
गुरुदेवकृपे माया नुरे देही	१३३०
गुरुदेवयोगे हरि	१३२९
गुरूनामी खरी सोय	११९३
गुरुनी सांगितले करी	९८५
गुरुनी सांगितले ते करी	९८२
गुरुमूज नसावे ओठी	१७५८
गुरुमूही मौज भारी	२९
गुरुपदकमली मनोभृंग	१९
गुरुपद सेवा	६२७
गुरुपदी जडवी मन	१३१५
गुरुपदी जाण्या होई तू	६२५
गुरुपदी जडे छंद	१३१६
गुरुपदी भाव धरी	१७८३
गुरुपदी मन गुरुकृपांजन	१९०३
गुरुपदी मन जडता नुरे	१८८
गुरुपदी मन जडता	१३१४
गुरूपदी मनोभृंग	२०
गुरुपदी लीन होता	१३१८
गुरुपदी सर्व सुख	६२६
गुरुमार्गे जाता खटाटोप	६२८
गुरुवचनी विश्वास ..धरिता	६२४
गुरुवचनी विश्वास ..परमार्थ	६२२
गुरुवाक्य मनी धरी	६३०
गुरुवाक्याचे सेवन	६२९
गुर्वानंद पूर्णानंद	१३९७
गुरुसुख गुरूनामी	८०४
गुरुसेवा अखंडित	१३३७
गुरुसेवा अवघड	१३३५
गुरुसेवा ही कठीण	१८८१
गुरुसेवेचे सामर्थ्य.. कळे	१३३९
गुरुसेवेचे सामर्थ्य.. सर्व	१३३८
गुरुज्ञानाचा महिमा	४७२
गोकुळी आनंद नंद	१६४७
गौळणी म्हणती सूरदासासी	१७०२
घ	
घडे मीपणाचा त्याग	१३१३
घरामध्ये जो राहे	५३९
घरोघरी लोक करिती	१०३७
घाव सोशिलीया जीवी	८८५
घुम घुम घुम घुम	१०४
घुम घुम घुम घुम देह घटी	१३६
घेई जे हरिनाम	१७५०
घेई भजन लक्षण	८४७
घोटी घोटी घोटी घोटी	१७६६
घोष करी हरिनामाचा	१२३९
च	
चणे खावे लोखंडाचे	६६०
चतुर्दळस्थानी जाता	१०९
चतुर्विध पुरुषार्थ	१५५३
चारी पुरुषार्थ तरी	१५५४
चारी वर्णात अधिक	१८८३
चारी वाचे पैल जावे	७८९
चारी वाचे पैल नाम	१२७२

अभंगाचे नांव	अभं.क्र.
चारी वाचे पैल निके	१५०१
चालिला पाडवा चालिली	१६६
चालिलासे मरणाकडे	७७८
चांगलिया वेळे वाईट चांगले	६४५
चांगलिया वाटे	११७७
चांगले साधाया पडताती	६४६
चित्त चैतन्य एक होता	१२५९
चित्त चैतन्याचा अंश	४००
चित्प्रकाश प्रकाशता	१५०६
चित्त नामाचे चिंतने	१२५८
चित्त शुद्धी हाती येता	१२५७
चित्ती खरा भाव नसे	५९८
चित्रीची ती सेना	४१८
चूक समजोन घेई	६९९
चौथे भक्तीचे लक्षण	९७१
चौदा चक्रीचा अनंत	११७
चौऱ्याऐंशीचा फेरा कशाने	१५१
चौऱ्याऐंशीचा मांडिला	१५०

छ

छालिक्याचे गान	१४०९
छंदे छंदे साधू जाता	१८०३

ज

जग बुडविले सारे	४९२
जगा दावावया सोय	१५६७
जगाचे बोलणे नाही	१५६२
जगात मोठे काय रे	१७६१
जगा न दावावे ऐसे	८६२
जगामध्ये कैसे वागावे	४४९
जगामाजी देव हरि	१३३४
जगी असे कोण	२८७
जगी चढ वरचढे	४७८
जगी तारक ते काय	१७
जगी दुर्लभ ते काय	११४८
जगी वागावे ते ..असाधुसी	७५७
जगी वागावे ते ..असंतासी	७५८
जन चालले स्वच्छंदी	२८८
जन्म दुःखाचे कारण	३०३
जन्ममरण खंडावया	१४०
जन्ममरण चक्रव्यूह..जन्मा	२८६
जन्ममरण चक्रव्यूह..राही	२८४
जन्ममरण झोला	८८
जन्ममरण फेरी कैसेनी	५७३
जन्ममरणाचा फेर	२८५
जन्म सुविचार नाम	११४७
जन्मा आलीयाचे काम	७६४
जन्मा येवोनिया काय..साधावे	७६२
जन्मा येवोनिया काय.. शिक	७६३
जन्मा येवोनिया काय ..रुप	७६१
जन्मा येवोनिया काय ..रुपा	७६५
जन्मा येवोनिया करावे ते	७५९
जनाचिया मना पाडतसे	२७४
जप विश्वासात आहे	१०७८
जपोनी जपणे जप	१९२७
जपोनिया जपता नाम	६८१
जया एक घटिका साधेल	१९३५
जयाचिये सत्ते वेदासी	६७०

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
जया जैसी संगती तया	४४५	जाता संतांच्या कीर्तना	९५८
जया वाटे मुक्त व्हावे	३७५	जातीचे ते खरे जाण	१२१९
जरी असे दृढभाव	६०४	जात्यावरील जे गीत	८९२
जरी एक पळ साधेल	१९३४	जातील रे जातील रे	१७३१
जरी घडे खरा त्याग	१५२३	जाते फिरवोनी रामनाम	८९३
जरी चूक असे सान	७००	जानवे नित्य जे तेचि	१७६०
जरी जाहला पंडित	१३५६	जावोनिया दुःख शीण	३०४
जरी बोलो ये लटिके	१५२०	जाळोनिया काम सदा	२५५
जरी मीपण जाई तरी	१६९०	ज्यामाजी साठते अधिक	१८१६
जरी व्हावी देवप्राप्ती	१६०२	ज्याच्या प्रकाशे हा	१५०३
जव काळ आहे बरा	९११	ज्याची चांग असे दृष्टी	६३९
जव देह आहे आपुल्या	३३४	ज्यासी एक प्रहर साधेल	१९३६
जवापाडे सुखस्थान	११९२.	ज्योत उजळावी मग भेटी	१४९९
जाई राऊळासी देव	७२	ज्योती ज्योत मिळता	१८९८
जाई वेगेसी मंगलमूर्ती	११३	जीवनात एक क्षण	८९९
जागृती साधन	१४१४	जीवनात नामगती	११८८
जा जा जा मनुजा	१६७४	जीवपण म्हणजे काये	६८९
जा नित्य नवे जे	१७४४	जीव शिव पक्षी	१३०२
जाणता तो जाणता	४३३	जीव शीव मन पवन	१८१३
जाणता तो भला	४२३	जीव शिवा पलिकडे	४०
जाणत्याचा पंथ धरा	६७९	जीव हा प्रवासी	२८३
जाणत्याचा संग धरा	४३४	जीवा कल्याणाचा मार्ग	११५७
जाणत्यासी जो शरण	१६८५	जीवा थोर हे भूषण	९८४
जाणावे ते कैसे कोठे	७५५	जीवी शिवाची प्रचिती	२४५
जाणे आपणा आपण	९९१	जीवी होते आठवण	१५००
जाणे परमहंस कळा	१३०४	जे का असे अभ्यंतरी	९००
जाणे लाभ आणि हानी	४६८	जे सत्य अंतरी तेच	१७४५
जाणे सहज सोवळे	५०३	जेणे नुरे अन्यपण	८४४
जाणे संतांचा महिमा	१६१६	जेणे भेटेल गोविंद	१३१७

अभंगाचे नांव	अभं.क्र.
जेणे मन येई हाती	३७०
जेणे योगे पांडवानी वश	१८५
जेणे योगे पांडवांनी ऐसा	१८६
जेणे योगे सर्वज्ञान	१४१२
जेथ कृष्णार्जुन जोडी	१४८५
जेथ क्षणैक राहणे	३०८
जेथील तेथे ज्याचे त्यास	१६९७
जेथे घडे चमत्कार	२१
जेथे दिवस ना रात	१६७
जेथे पाहू तेथे देवाच्या	१४६१
जैशी धरावी भावना	१०५५
जैशी मनुष्याची दृष्टी	१०५६
जैशी लावावी आवडी	३५१
जैशी वेळ तैसा होई	१०४१
जैसा संग तैसे फळ	४४३
जैसे दधीमाजी लोणी	१०४०
जैसे देणे तैसे घेणे	३०७
जैसे द्यावे तैसे घ्यावे	१४२२
जैसे बीज तैसे फळ	१२९
जैसे शिखरातील घन	३३८
जो का अभाविक पाही	५९
जो का देवांचाही देव	१४८६
जो तो आपुल्या कर्माचा	९०३
जो तो आपुल्या.. करी	१६९५
जो तो आपुल्या.. सदा	१६९६
जो तो म्हणवी परमार्थी	१०३८
जो नर संसारा विकला	१७३३

झ

झाला झाला झाला झाला	१७८६
झाला संसार गोंधळी	१३०

ट

टाकी घाये देवपण	८८४
टाकोनिया अविश्वास	१६२९
टाकोनिया दुरुत्तर	२३५

त

तत्त्व जाणे रे सुजाणा	६६६
तनू टाकुनी कीर्ती उरवी	३४३
तप करिता नाना	१०७
तप तीर्थ व्रत धर्म	८५०
तपस्थानाचा महिमा	१२९७
तपाचे जे तप .. एक	२२७
तपाचे जे तप रामनाम	१९२०
तपे असती बहुविध देख	१०६५
तपेवीण मिळे काय	८४९
तमोगुण जै शरीरी	४९८
तरीच आपुले ते देहे	१००९
तरीच परमार्थाची गोष्टी	१३७४
तामसाची तपे	८५१
तारणे मारणे देवाचिया	८४१
तीन पुरामाजी देही	२०७
तीन साधने साधिता	५५५
तीनी अवस्थांचा साक्षी	१२४८
तीनी पैल जाणे	४९६
तीर्थे असती अनेक	१८२८

अभंगाचे नांव	अभं.क्र.
तीही साधिला संसार	३००
तीळ गूळ काय तो	२३४
तीळ घ्या गुळ घ्या गोड	२३३
तुझा देव तुझ्यापाशी	१३८९
तुझा राम तुजपाशी	१३८८
तुझे नाम गाये मी	१०१९
तू अर्पी शुभाशुभ दोन्ही	१७९०
तू धरी वासना इष्ट हरी	१७११
तू नाम समजुनी घेई	१७६७
तू पाही विसावा अंतरी	१७३६
तेचि एक वीर भले	३७८
तेचि जन्म सफलता	११७६
तेचि धन्य जाणा मार्ग	९९५
तेचि ब्रह्म तू आहेसी	४२९
तेज दाटले स्वरूपाचे	१७७३
तेज दृष्टी भरले	१७७२
तेरा अक्षरांचे थोर हो	११८०
तेरातील धनराशी	१६२
तेरा माजी धनराशी	१६१
ते रूप पाही बरे .. मनुजा	१७६९
ते रूप पाही ते	१५०७
ते रूप साजणी पहावे	१७७०
ते वन सुंदर रम्य	५४६
तोच जाणा ब्रह्मचारी	५३४
तोचि गजानन रे	१७७८
तोचि जाणावा बांधला	५५०
तोचि जाणावा विश्वासी.. जेणे	१६२७
तोचि जाणावा विश्वासी..संत	१६२८
तोचि जाहला मोकळा	१२६३
तोचि जाहला रिकामा	१२६६
तोचि भक्त श्रेष्ठ जो नव्हे	९४१
तोचि सांसारिक भला	२९४
तोचि ज्ञानी भला	४६५
तोची ज्ञानी जाण ..वैराग्याने	४६९
तोची ज्ञानी जाण ..शम	४७०
तोडावया बंध आशा	५५३
तो देव पहाया संतांचे	१४३३
तो मी वासुदेव देही	१६६८
तोल भक्तीचा चुकता	९४५
तो विश्वासी तो विश्वासी	१७४९
त्याग म्हणावा तो कोण	४८४
त्यागाचेनी योगे देहीच	९२४
त्यागे अहंतेच्या थोर	९२२
त्यागेवीण कैचा देव येईल	९२१
त्या देवाचे स्तवन करी	१६८१
त्या देवाचे स्मरण करी रे	१६८०
तृतीय भूमिका असंसर्ग	१२४०
थ	
थोडक्यात फार .. काय	१२०१
थोर गीतेचा महिमा	२१६
थोर गुरूचे महिमान	२४
थोर देवाची करणी	१४२६
थोर नरसी मेहता	१५४८
थोर नामाचे सामर्थ्य	११८४
थोरपणाचे लक्षण	१५९२
थोर पुण्य काय मजला	५२९
थोर भक्ती नाही भेद	१००३

अभंगाचे नांव	अभं.क्र.
थोर भक्तीचे महिमान	९९६
थोर भक्तीचे लक्षण	९९८
थोर मंगल भजन	१२५२
थोर सद्गुरू महिमा वाचे	२५
थोर सद्गुरू महिमा वर्णवेना	२६
थोर सर्वा गुरुआज्ञा	१३२०
थोर संतांचे उपकार	१५९३
द	
'द'कडे सरा	१४३
दश अपराध हरा	४५
दशमाचे पैल पाहे	१४९
दशहर दशहरा	४४
दर्शेंद्रिये आणि मन	१९४
दर्शेंद्रिये एक मेळी	१२७३
दहा आणि दोन पाही	१५३
दहा इंद्रिये आणि मन	६६
दहा जाणावी इंद्रिये	७७
दाता पदवी विशेख	३९१
दान करी तोची दाता	१८५६
दास्य भक्तीचे लक्षण	९८३
दिला नरदेह उत्तम कृतार्थ	३४५
दिसे त्याचा शोध कायी	७१४
दीप अंतरी प्रगटे	१५०२
दीपज्योती एकवटती	१७६
दीपज्योती सहस्रदळी	१६९
दीपावली दीपज्योती नयनी	१७००
दुःखाचे ते सुख कशाने	३०२
दुर्जन सज्जन संगती योगे	१७८९

अभंगाचे नांव	अभं.क्र.
दुधातील लोणी पाही	७५०
दुराशा टाकिता शकुन	१८९३
दुराशा म्हणजे दूर आशा	११२७
दुराशेचा मधुबिंदू	८७७
देऊळी जाऊनी देवासी	१४६२
देखल्याची गोष्टी आंधळ्यासी	९०५
देणे घेणे जव आहे	३२८
देती देती साधु देती	१७८५
देव असे प्रकाशित	१४३५
देव आपुला तो लाभ	११२५
देव आपुला सखा सखा	१७२०
देव आहे कोणे ठायी	१४३१
देव आहे देव आहे	५८२
देव करील कृपा ..तयावरी	१७५७
देव कळा ती आकळ	१४५८
देव कैसा प्रगट होई	१४४६
देव कैसेनि भेटेल	१४५२
देव कोठे आहे पाहतो	१४४१
देव कोठे आहे राहतो	१४३९
देव खरा खोटा म्हणवेना	१४५०
देव जगासी अधिक	१८५८
देव टाकितो पाऊले	९७०
देव दिसेल नयनी	१२०३
देव दिसेना नयनी	१५४३
देव देव आकळेना	१४४८
देव देव जो दिसेना	१४३८
देव नामाचा भुकेला	१३९५
देव निजेला निजेला	६७
देवपण जेथे असे	१५८२

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
देवपण येता	५८४	देव हाचि सूत्रधार	१४५९
देव पहाण्याची खूण	३५९	देव हृदयी साठविता	१४४२
देव पहाण्याची गोष्टी	१४४७	देवाचा किंकर देवचि	२३६
देव पहाण्याच्या खुणा	१२९८	देवाचिया द्वारी	१४७७
देव पूर्णत्वे जाणता	१४२०	देवाचियेकृपे लाधेल	१४७२
देव प्रगटचि आहे	५८५	देवाची करणी	१७५४
देव प्राप्तीसी कारण	१२६०	देवाची ते खूण पाही	१४४३
देव भक्तांचा कैवारी	१४६७	देवाचे दर्शन उभवोनी	२६६
देव भक्तीजन्य सख्य	९८९	देवाचे दर्शन व्हाया थोर	१९०८
देव भक्ती करी काही	१३९४	देवा नाम समर्पण	९७३
देव भक्तीने आकळिला	१००१	देवा पुष्प समर्पिता	१६५९
देव भावाचा भुकेला	१६५३	देवा मनी आले	१४११
देव भेटणे नाही सुलभ	१४४५	देवा हाक मारिती	१४३७
देव भेटीचे ठिकाण	१४४०	देवाचे मंदिरी जीवा खरे	१९०२
देव भेटीसी अधिकारी	१४४४	देवाचे मंदिरी नामघोष	५८७
देव भेटे ऐसा सांगतो	१४५५	देवाजीची कृपा मज निरोपावी	१४८०
देव भेटे कसा कसा	१७५६	देवाजीचे दरबारी	१६७२
देव भेटे जोपर्यंत	१४५६	देवाजीचे नाम	११२३
देव भेटे देव बोले	१७५५	देवाजीचे पाय पाहीन	१४३६
देव राहे जो अंतरी	१४८४	देवाजीचे मन धरी	७२१
देव विटेवरी उभा	१५१०	देवालयामाजी देव हा	१४७६
देव व्हावा तरी नाम हे	७१५	देवालागी ठकविता	१६४८
देव व्हावा तरी या गोष्टी	५६०	देवालागी निवेदन	९९२
देव शोधाया कारण	३९४	देवालागी शरण जावे	५७४
देव शोधायाचे स्थान	१४३४	देवे सांगितली गीता	२१९
देव सकळा विसावा	१४७९	देह असती अनेक	१८१०
देव सत्ता कोण जाणे	१४७१	देह गोकुळा भीतरी	८८८
देव सागर सागर	९३	देह घटी आत्मज्योती	१३२
देव संतोषती जीवा	१४२१	देह नामी साह्य होये	३३५

अभंगाचे नांव	अभं.क्र.
देहबुद्धी विरहित	४८३
देहभाव लया जाता	२३०
देह रोखा नाम सिका	२७८
देहाची ती शुद्धी	३४६
देहामाजी असे रंग	२६१
देहामाजी आहे नाम	११२२
देहामाजी जीवपक्षी	१३०३
देही अहंकार गुप्त	२६७
देही आचरणी पापात्मा	११९९
देही देखिले नवल	१५०५
देही देवालयी देव हा	१४८१
देही रजोगुण परवडी	४९७
देही संती दाविली	२४३
देही स्वरूप साक्षात्कार	१५०८
दैवी संपत्तीचा नरू	१५५९
दोन अक्षरांचे थोर हो	११२१
दोन ज्योती एक होता	१७४
दोनी डोळ्यांची मिळणी	१२४७
दोनीमाजी जीवा	१४७५
दोन्ही व्हावे अधिकारी	१३५२
दोष घडती अनेक	१८४५
द्रव्यदान वस्त्रदान	१८५४
दृढबुद्धी विश्वासाने	८१५
दृढभाव निकाभाव	१३००
दृढ विश्वास नामाचा	८१३
दृढ विश्वासाचे फळ	८१४
दृष्टीने पहाणे माया	८३३
द्वितीय भूमिका विचारणा	१२४२
द्वितीय भूमिका शुद्ध	१२४१
द्वैत बोलाची सांडणी	१२०५
द्वैतामाजी भीती	१७४३

ध

धर्म कर्म आचरण	१३४६
धरणे संतसमागम	१६१७
धरावे ग्रहण करावे.. जेणे	२६५
धरावे ग्रहण करावे.. जेथे	२६८
धरी एके ठायी भाव	५९२
धरी पावनाचा देव	१४६८
धरी रे धरी तू	१०१३
ध्वनी श्रवणाचे जाते	११४०
धारणा ते ध्यान	१४१६
धारणात् इति धर्म..त्याचे	१३४४
धारणात् इति धर्म..स्वधर्म	१३४५
'धी' माजी नाही आन	१३४२
धैर्य धरोनिया धरिता सुपंथ	१५९०

न

नको अतिशय काही	११२०
न घडती ऐशी पुण्याची	१२८२
नमो रामेश्वरा नमोजी	२
नरदेह असामान्य.. धरुनी	२१३
नरदेह असामान्य.. जाई	२१४
नरदेह दुर्लभ नाम	३३०
नरदेह शेवटीचा	३४९
नरदेह शेवट वेचा	१८७७
नरदेह हा सामान्य	२१५
नरदेही असे बाग	३२७

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
नरदेही करावे देवाचे दर्शन	३३३	नाम खरे ज्ञान	१११७
नरदेही खरे काम	१११९	नाम गाय नाम गाय	१५५
नरदेही गुरूगेही	३४४	नाम गाय भक्त वत्स	१५४
नरदेही घेऊनी जन्म	३२४	नाम गूज नाम गूज	१०४९
नरदेही नाम साधा	३२५	नाम घेणे तप होय	१११६
नरदेहीचे हे वय	१८११	नाम घेता अंतर्बुद्धी	१०६४
नरदेही मोठे काय	३२३	नाम घेता काय होते.. जन्मां	१११४
नरदेही येऊनी काय	३२६	नाम घेता काय होत.. पाप	१११३
नरदेही सीतारामाचे भजन	३६	नाम घेता पाप जाते	५६
नरदेही होई जागा	३४०	नाम घेता मुक्ती हे ब्रह्म	१११९
नर नारायण स्तुती	१११८	नाम घेता स्वये राम	१०८०
नरे करावी करणी	१८४७	नाम घेता होते कायी	१११५
नवखंड होता खंडेनवमी	१३८	नाम घेशील ज्यावेळी	१०४७
नवमी करिता नवही	९९०	नाम जपे त्यासी कोटी	११३८
नवल तुझे शेषशायी	१४७४	नाम ज्याच्या हाती	११०२
नवल प्रभा ही भरली	१२३	नामधन साठविता	११०८
नवविध उपासना	१२०	नामधन साठविले	१११०
नवे नवे नवे नवे	१७०३	नामधारक तो भला	१०५१
नळ निळा ऋषीश्वर	१६४६	नामधारक नाम जाणे	१०४८
नाना साधने साधिता	१२०४	नामनिष्ठे निष्ठावंत	११८७
नाम अभ्यास हा थोर	१२३२	नाम परिपूर्ण	८२
नाम अमृत संजीवनी	१०९५	नाम पुण्य नाम सुख	१०५९
नाम आदरे घोकावे	१०४५	नाम भक्तीपंथ सकळा	१९२३
नाम उच्चारणी धरावी	१९२८	नाम भेषज भेषज	१०९४
नाम उच्चारणी लाविता	३१९	नाममहिमा आयकिता.. प्रिती	६०
नाम अंतरात आहे	६४	नाममहिमा आयकिता.. गोडी	६१
नाम करावे श्रवण	९४८	नाम महिमा वाढविता	१८९०
नाम का न मुखा	८९४	नाम मुखी गाता स्वहित	७४०
नाम केव्हा तू घेणार	६८३	नामयोगे सुदाम्याने	१६५४

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
नाम राम या दोहोत	११०७	नामावीण खटपट	५११
नामरूप भगवान	१८०८	नामावीण ज्ञान कल्पनेची	१०१४
नाम वर्णन प्रशंसा	५३	नामी धरिता विश्वास	१०७७
नाम वर्म हाती घ्यावे	११००	नामी धरोनि विश्वास	३६८
नाम विन्मुखता थट्टा	११०६	नामी नेम धरा नामी	१४८९
नाम विश्वासाचे फळ	५७७	नामी राहोनी प्रपंच करणे	१३८३
नाम विस्मरण पाप	५२४	नामी रुपाची धारणा	११८५
नाम वेदांत बाणता	४२६	नामी विश्वास ज्या नाही	६६८
नाम शर्करा सेवन	१३८४	नामे पाप जाणे	५५
नाम शाश्वत शाश्वत	११८९	नामे ह्रन्मंदिरी प्रगटता	१२२
नाम सकळासी तारी	५४	नारद तुंबर	४३
नाम साठविणे अधिक	१८१७	नाश करी हा विकल्प	४९३
नाम साठविता पोटी	१५६८	नाशिवंत देह लावावा	३१७
नाम साक्षात्कार देही	१७३	नाही आणिक कारण	१०९८
नाम सिद्धी नाम सिद्धी	११७९	नाही आपुली भावना	६५०
नाम सोहळा परिपूर्ण	११०५	नाही कळला आधार	१०८
नाम सांग नाम सांग	५३१	नाही कृतीचे साधन	१२२८
नामस्मरणाचा घडा	१०८७	नाही नाही नाही नाही	१७१९
नामस्मरणाचे विस्मरण	१०८०	नाही श्रेष्ठपण मिळत ते	४७७
नामस्मरणरूपी राम	१०८३	निजगुज ओळखावे	७०९
नामाचा प्रयत्न पाही	११०४	निजत्वाची खूण	७१०
नामाचा महिमा	४७	निजत्वे रहाणे	७०८
नामाचा व्यापार	१०९१	निज मुळालागी जावे	७११
नामाची सवय	११०३	नित्य देवासी मागावे	१०७६
नामाची हातोटी	११०१	नित्य नाम घेता होय	१४९१
नामाचे ते बळ	१०९९	नित्य नियमाचे करी	८७०
नामाचे लेखन नामाचे वाचन	१०९०	नित्य नेम नाही ठावा	१४९०
नामामाजी प्रगटवी देव	१५४४	नित्य सुखाचे लक्षण	१०७५
नामामाजी रुप प्रगटे	११९६	नित्य हरिकथा नित्य	५१७

अभंगाचे नांव	अभं.क्र.
नित्य हरिकथे सर्व पाप	५१५
नित्यानित्य विवेकाने	९१५
नित्यामाजी जपे राम	६८२
नित्यामाजी जाता नेम	१४८८
नित्यामाजी नेम धरोनिया	१४९२
नियमखूण अभ्यासिता..आत्म	१६८९
नियमखूण अभ्यासिता..नुरे	८७१
निर्भय ते काय निर्भय	८२८
निर्मळभावे दे देवाला	१४२४
निरूपणी रूप प्रगटे	१५७२
निरंजनी ध्यान लावुनीया	१३४३
निर्गुण भोजन	१०९७
निर्गुणाचा संग रे	१७९८
निर्गुणाची भक्ति निर्गुणाच्या	१००२
निर्गुणाचे पैल जाण	१५१४
निर्गुणीचे खरे सुख	१३८०
निर्गुणीच्या सुखा	१३८२
निर्भयाचे स्थान	८२९
निःशब्दाचे स्थानी	१३१
निष्ठा हेचि फळ जाणावे	८११
निःसंदेह पवित्र स्थान	४७५
निंदक तो नको वाटे	७९३
नेम व्रत एकादशी	१०९६
नेमनिष्ठा तेचि खरी	८६५
नेमामाजी असे हित	१२२७
नौबद श्रवणे बिंदू उमगणे	१८८९

प

पढतमूर्ख संग मला देऊ	१७९७
पढल्याचा अर्थ घे ना	८२५
पढिक ते ज्ञान बहु	६३१
पण योगे नाम नयेचि	५१३
पतितांनी पावन व्हावे	६६२
पदव्या असती अनेक	१८५५
पन्नास अक्षरे ते वर्ण	१४१
परतंत्रामाजी दुःख	७९५
परमहंस करूणाकर	१५४०
परमहंसाचे लक्षण	१३०५
परमात्मा बिंदुरूप	१३१२
परमार्थ आहे गुप्त	३४१
परमार्थ अंतर्खूण	१२८७
परमार्था अधिकारी..देह	१३५३
परमार्था अधिकारी.. हिरा	१३५४
परमार्थाचे लक्षण..नाम	१०३९
परमार्थाचे लक्षण.. आठ	१००
परमार्थी एकचित्त	१२५६
परमेश्वर ओतप्रोत	८७४
परिमित निद्रा घेता	१३४७
परीक्षिती राजा योगी कैसा	१६५८
परंपरागत अर्थ	१३८५
पर्वकाळ साधावया जळी	१७२७
पर्वत शिखरी असे माझे	१५१६
पवित्र ते सहा बळी	४७४
पवित्रतेमाजी देव साक्षात्कार	४७६
पश्चात भागी आत्मतपन	१५३६
पहिली शुभेच्छा द्वितीय	१२४४
पहिली शुभेच्छा प्रथम	१२४३
पाच पाचा मेळविणे	२३२

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
पाचवे मंडल माया	८७	पंचप्राण पंचवृत्ती	१२७
पाठीराखा ज्याचा श्रीगुरू	२८	पंचभूता महद्भूत	१९२
पाडवा पाडवा मीपण	१७७	पंचमहाभूता जो का	१९१
पाप अभिमान पाप अहंकार	५२०	पंडित तो पंडित तो	१७३८
पाप म्हणजे काय ..पाप	१२४५	पंडित तो भला	१७३९
पाप म्हणजे काय... पुण्य	५१९	पंढरी निवृत्ती ॐकाराचे	६८
पाप म्हणजे काय.. ते मज	१६६५	पंढरीची वारी.. देही	१९०
पापपुण्य विरहीत	१६२५	पंढरीची वारी.. जन्ममरण	७०
पापाचे लक्षण	५२६	पंथ विठ्ठलाचा	१३०७
पारमार्थिक भाग्य खूण	११३२	पंधरा म्हणजे काय	१९३८
पावनाच्या संगे पावनचि	६६४	पृथ्वी धरी धराधर	१४१९
पाषाणात हिरा देख	१८३९	प्रतिपदी रूप पाहे	१७८
पाषाणासी मोठेपण	८८९	प्रथम मंडळ मायेचा	८६
पाहता दिवाळीची मौज	१६८	प्रपंच उपाधी	१४००
पाही पाही मनुजा पाही	१७६२	प्रपंच झापडी निवारिता	४५५
पाहू जाता एक भाव	१८२५	प्रपंच परमार्थ गाडी	४५४
पुण्य आचरणी होतसे	१४०३	प्रपंच लक्षणी पुरता	४५६
पुण्य नामाचे स्मरण	१०५८	प्रपंच हे खरे दुःख	४५२
पुण्य म्हणजे काय ते ..कळेना	५२१	प्रमाण हरिचे नामाला	१०६३
पुण्य म्हणजे काय ते..एकाग्र	५२७	प्रयत्न करिता काय एक	१६४२
पुण्य म्हणजे काय ते..पाप	५२८	प्रवृत्ती सासर सोडिता	६९
पुण्य म्हणजे काय पाहे	१२८१	प्रसन्न सर्वेश्वर झाला	६९२
पुण्य पावन ज्ञानमार्ग	४३०	प्रसाद व्हावा तरी	५७६
पुण्य देवा समर्पिता	३९३	प्राण स्पंदनात राम	१२८४
पूर्ण कळा नाम	११५०	प्राणाचे स्पंदन चाले	१२८३
पूर्ण केले पूर्ण केले	३०	प्राणीमात्रा अन्नदाता	१४६४
पूर्णता जे कुलधर्मा	२४२	प्राप्तस्थिती तीच बरी	५७८
पूत नोहे ऐसी बुद्धी	१६४९	प्रायश्चित्त घडे	५३३
पंचप्राण एकमेळा	१८७	प्रायश्चित्ते ती अनेक	५३२

अभंगाचे नांव	अभं.क्र.
प्रारब्ध चुकेना चुकावे	४६०
प्रारब्धाची रेषा वाईटाने	१६२४
प्रेम आत्म्याची ती गती	१३०६
प्रेम देवाचे निष्काम	१४६५
प्रेमभरे माथा घेती	१७३२
प्रेमभावे घेसी नाम	१४५७
प्रेम मंदिरात .. चित्त	१८९१
प्रेममंदिरात सत्याचा	५६८
प्रेमे हरिभक्ती करी	१४६६
फ	
फळकट तो संसार	२७९
फसवी माया वोडंबरी	२६९
फिरली गुरूकिल्ली	३६१
फेर चुकाया वळसे	५०२
ब	
बत्तीरूप प्रगटता	१०९२
बट्टाचे लक्षण	५५१
बरवा जाहला पाडवा	३५
बरवा देव हरीनामी	८६७
बरवा संसार तू करी	४५८
बरवा संसार म्हणताती	४५९
बरे वाईट कारण	१२९०
बहु जन्माची सवय	७५६
बहुता यत्ने गुरुकृपा	१२२६
बाईल रे बाईल रे	१८८७
बाप्पा ज्ञानिया रे	१७९९
बा फसवू नको तू या	१७९६
बा रे अर्थ मनी येई	१६७८
बा रे आळस सांडी तू	१७९४
बा रे मोह मुळी तोडी	१७०७
बा रे सुखधाम पाही	८१०
बाहेर देव नाही...जया	१३६५
बाहेर देव नाही...देहात	१३६६
बाहेरून आत जाता	१३६४
बाह्य करू जाता शोध	५८१
बाह्यभक्ती देव	१००५
बाह्यरंगा भुलू नको	५८०
बीज अक्षरे दोन देख	२५९
बीज अंतरी रुजले	६५१
बीज नाम बीज नाम	१२७७
बुडावीण भांडे काय	८१२
बुद्धी नामी जडूनी राहे	१०८१
बुद्धी रामनामी घोटी	१०५३
बुद्धी स्थिर करी नामी	५५८
बुरा संग नको धरू	४३७
बोध अंतरी न ठसे	१३६१
बोध का मनी ठसेना	१३६२
बोध मनी घेई बोध	१३६३
बोध मनी हा पठ्वा हो	१६७६
बोल वाईट बोलीले	१८३६
बोल सरे बोल सरे	१८३४
बोलणे टाकोनिया दुरी	१८३५
बोलासरिसी करणी	१३६०
बंधन विषयाचे	१३५९
ब्रह्मगिरी मार्ग गहन	१५१७
ब्रह्मगिरीस्थानी जाता	१३७०

अभंगाचे नांव	अभं.क्र.
ब्रह्मचारी जो विचारी	५३६
ब्रह्म शोधाया कारणे	३७२
ब्रह्मस्वरूप चैतन्य	१५५५
ब्रह्मस्वरूप जाणणे	१५८६
ब्रह्मज्ञान दिशा समजोन	१३५८
ब्रह्मज्ञानी तो ब्रह्मर्षी	१५८३
ब्रह्मज्ञानेवीण कैसे ब्रह्मज्ञान	१५८७
ब्रह्मज्ञान्याचे महिमान	१५८५
ब्रह्मज्ञान्याचे लक्षण	१५८४
ब्रह्मा इंद्रादिका झाले	१६५२
ब्रह्मानंद पीक कशाने	१२२५
भ	
भक्त अनन्य तो झाला	९३५
भक्त ऐसे धीरोदात्त	१००६
भक्त व्हावे ऐसे वाटे	९३६
भक्तांचा रक्षिता	१४६३
भक्तांचा स्वधर्म	९३७
भक्ती आत्मनिवेदन	९९३
भक्ती केली परी देवा	९६६
भक्तीची ओल असेल	१०००
भक्ती देवा कैची पावे	१६५६
भक्ती प्रेमसूत्र ओळखावे	१२०७
भक्ती बहुरंगी जाणा	९३८
भक्तीमंत होण्या नको शब्द	१६५१
भय बाधीना स्वभावे	८२७
भला बुरा संग टाकोनी	१८९९
भला संग भले करी	४४१
भले तेचि काय रे	४३९
भले बुरे कर्म ..परलोक	६७७
भले बुरे कर्म ..भले	६७६
भवरोगाचे लक्षण	७८३
भवापासोनी नेणारी	१२१
भवारण्यामाजी सर्वत्र विखार	८५
भाग्यपुरुष जे का	११३३
भाग्य मिळणे अधिक	१८३७
भाग्य मिळणे विशेष	१८३८
भाग्य मिळे वैराग्यात	११३०
भाग्याचे ते भाग्य रामनाम	१९२२
भार कैसा तो घालावा	९३९
भाव अभाव विचार	९१६
भाव धरणे अधिक	१८२४
भाव धरी तरी देव	५९३
भाव धरूनि नाम घेई	१५५०
भावबळे देव पाही	१८५७
भाव बीज साधी	१८१
भाव भक्ती बहिणी	१८३
भावामाजी नाम घेता	१६५०
भावामाजी नामबीज	१७९
भावे विश्वासाने सत्यस्थानी	१८९७
भीमे बकालागी जैसे	१८०४
भूतमात्री दया जाण	१८६०
भूतांचे पालन	१८५९
भोळा भाव सिद्धी जाय	५९४
भोळा भाव सिद्धी जाये	५९५
भोळ्या भक्ताचे लक्षण	५९७
भोळ्या भावे पावे देव	५९६
भ्रमता संसार बाजारी	१८८४

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
म		मनी राम आठविता	१५१३
मज सर्वांनी ठकविले	१६३४	मनी स्मरावे ऐसे काय	६
मन अनन्य होता पाही	३८६	मने केले मने केले	३६३
मन आधीन येईल	१२५०	मने जरी घडे विषयाचा	९२५
मन करोनी निर्मळ	३८९	मनोभावाने भजन	३६६
मन करुनी चांग जी जी	३८१	मनोमय पूजा .. आवडे	१४१५
मन जरी का प्रसन्न	३८५	मनोमय पूजा मनेचि	९७६
मन ठेवावे एकांती	३७९	ममता धरिता बांधला	५५२
मन देव मन देव	३६४	मरणाची भीती नसे	१५७३
मन देवा समर्पणे	३९२	मर्दपणाचे लक्षण	८३१
मन नामी जडता पाहे	३५८	मस्करीत जन्म गेला	६६५
मन नामी न देणे	३५५	महद्भूत आकलन	१९३
मन नामी वळे तेचि	९७५	महद्भूत आत्मा ओळखून	८०
मन मोही सर्व काही	३६२	महद्भूत ओळखिता	७९
मनशुद्धी मुनी पाही	११५	मागत्याची कळा	६९१
मन साधिलीया साधेल	३७४	मागे वळोन पाहणे	८६०
मन ही तो गुरुकिल्ली	३६०	माता हाचि देव माता	२३९
मन हे मोठे आहे धूर्त	१७२४	मानसाची शुद्धी होता	३८७
मन होय चांग साधिता	३८०	मानसाचे उपचार	९७७
मना आकळिता मुनी..मन	३८८	मानापमान निरसन	८३४
मना आकळिता मुनी..हेचि	११४	मानी संतांचे वचन	६२०
मना तू सुख हे	१७२३	माया अंधेर नगर	१०४२
मना नुरे मनपण	४०२	माया अंधेर नगरी	१०४३
मना सेवी तू सुखकंद	१७२२	माया गुंतवी संसारी	४०९
मनाचिये शुद्धी होईजे	३८४	मायाजाळ अनिवार	४०७
मनाचे हे भांडे करोनी	३६५	माया निर्विकार नुरे	१५२४
मनाते जिंकिता तोचि	३७३	मायबापा जीवे मारी	४८०
मनी चांगला विचार	६४१	मायबाप सकळांचा	१६३६
मनी धरी जे राम	१७२१	माया ब्रह्म यांचे नाते	४१३

अभंगाचे नांव	अभं.क्र.
माया हेरणे माहेर	४०३
मायेचा बाजार व्यर्थ	८९१
मायेचा हा गुप्त मारा	४०४
मायेची दैवते आराधिती	४११
मायेतून सोडवीत	१६२१
मायेपासून फिरवीत	१६२०
मार्ग असती अनंत	७८१
मार्ग आक्रमण्या थोर	१३०९
मार्ग आहेत अनंत	७८२
माहेरीची मौज जीवासी	१६३
माहेरीचे सुख जीवासी	१६४
माळ घरोनिया रामनाम	१९२६
मित तं बोलणे हेची	१३४८
मी कोण हे उमगता	४७१
मीपण माया निरसन	५०५
मीपणाचे त्यागे गुरुपदी	१९०५
मीपणाचे लक्ष.. महास्वरूप	१३३
मीपणाचे लक्ष लावी	१३५
मीपणाचे लक्ष लावी महास्थानी	१३४
मीपण सरता मोहनाश	५०४
मुक्यासी वाचा देतो कोण	१४७३
मुख्य काम सदा चाले	१२०९
मुख्य चुकताती सेवा	८७५
मुख्य समाधान आत्मनिवेदन	९९४
मुखी म्हणसी राम राम	१२७४
मुखी हरिनाम हेचि..कृपादान	८९५
मुखी हरिनाम हेचि..तप	८९६
मूळ स्वभाव गुरुनाम	१९४०
मुळी गर्व कामा नये	१२८८
मोकळा होवोनी जाई	१२६५
मोकळा होवोनी घेता	१२६४
मोह न धरी धनाचा	१२८५
मोहनाचा मोहन तो	१४३०
मोहिले अंतर मायेने	१५
मोक्षधामाची ती वाट	७८०
मोक्षधामातील मंदिर	१६३७
मोक्ष व्हावा तरी मोक्ष	१२०८
मंगलधामी नेऊनी शिष्या	१७५९
मंत्र तंत्र विधी बहु	११३९
म्हणती प्रायश्चित्त घ्यावे	५३०
म्हणविती दास.. मनी	३६७
मृत्यूलोकीची वसती	६८०
य	
यत्न कैसा तो करावा	१२००
यमाची द्वितीया साधिता	१८४
यज्ञकर्म मोठे साधणे	१८७९
यज्ञादिक कर्मे साधणे	११३७
या देवाचे स्मरण	१७५३
येणे जाणे गतीमाजी	८३२
येता भक्तीचा जिव्हाळा	१००४
येर बोलणे बोलोनी	११३४
येर बोलण्याचे सुख	११३५
योगादिक कर्म वाऊगाचि	१९२१
योगामाजी असे क्षेम	१३४१
योगीजनांचे लक्षण	१५८९
योगी जाणा तोचि पाही	१५८८
योगी वियोगाचे काम	१३४०

अभंगाचे नांव	अभं.क्र.
युक्तीविना काही नाही	८८२
र	
रहस्याची गीता	२२०
राम म्हणाणिला राम	१६४४
रामकथामृत करिती सेवन	९६१
रामकथामृत जे नर सेविती	९६२
रामकृपा व्हावी जरी	३९
रामकृष्ण माळ धरी का	१२८०
राम जगी प्रगट आहे	१०२५
राम जीवीचा विसावा	१०२३
रामनाम एकांती एकविध	१९०१
रामनाम कामधेनु.. निववित	१५९
रामनाम कामधेनु.. महिमा	१६०
रामनाम की तार सुनो भाई	१७६५
रामनाम कोठे साठविले	१०३२
रामनाम खरे नाणे	१०२७
रामनाम गमाविता	१२१२
रामनाम गाता गान	१०१८
रामनाम गुणे नरदेहा मोल	३३१
रामनाम गोडी घेता	१७६४
रामनाम घेता वृथा	७७०
रामनाम जुना ठेवा	४८२
रामनाम थोर भाग्य	१५४७
रामनाम मुखी नित्य नेमे	१९१५
रामनाम योगे सावध जो	१९१९
रामनाम शुभशकुन	१०१७
रामनाम सकळा सार	५१८
रामनाम सान	१०३०
रामनाम सुधारस	१०३१
रामनाम हे तो एकतत्त्वी	१९१८
रामनामाचा आलट..खरी	२५१
रामनामाचा आलट..नाम	२५०
रामनामाचा विचार	७३७
रामनामाची कावडी	७१२
रामनामाचे महिमान	१०२६
रामनामाचे वाचोनी	१८४४
रामनामापुढे बंड	१०३३
रामनामामाजी साधिलिया	१९३३
रामनामावीण अमंगलवाणी	१९११
रामनामी एकविध होऊनी	१९३१
रामनामी जडुनी निंदास्तुती	७९४
रामनामी मन फिरवी	१७६३
रामनामी योग तो	१०२८
रामनामी शांती हे थोर	१२३६
रामनामी होता गुंग	१३७७
राम नाही ओळखिला	१०२९
रामपदी धरी प्रीत	१७३५
रामरस घेई घुटका..काना	७१६
रामरस घेई घुटका..रामरस	७१८
राम राम म्हणता रामभेटी	१२३३
राम राम राम सीताराम	५
रामरूप पाहूनी दृष्टी	१०२४
रामरूपी मनोवृत्ती	३८२
राम हृदयी प्रगटे	१२३५
रामाची नवमी	३८
रामी विसरता प्राणी	१०३४
राही चित्त समाधाने	१०५४

अभंगाचे नांव	अभं.क्र.
रिकामा होवोनी नाम	५८३
रूप देखिल्या नयनी	१
रंग ओळखोनी रंगात	२६०
रंगपंचमीचा दिन । काय	२६४
रंग तो श्रीरंग	२६२
ल	
लज्जाविरहीत पाही	८१८
लटक लावी ते लटिके	४१७
लटकिया नामी लटकोनी	१५१९
लटिके बोलिता अधिक	१५२१
लहान थोर सर्वजण	१३८१
लक्ष लावोनिया पाही	८०७
लक्ष्मी आहे रे चंचळ	११३१
लागे जरी तोबा..तरीच	१९६
लागे जरी तोबा..म्हणती	१९५
लाभ आणि हानी	११२६
लावावा कारणी मनुष्याचा	३२१
लाविता हातास	१५४५
लोक कर्म आचरिती	११२८
लोकाघरी जाऊनी	५३८
लोभ सोडी लोभ सोडी	१५७९
व	
वनी जावोनी बैसला..तप	५४४
वनी जाऊनी बैसला..वन	५४३
वय मानव देहाचे	१८१२
वर्म ओळखावे कर्म	५२२
वर्म ओळखिता पाही	१६६१
वर्म जाणे तो विरळा	५२३
वर्म जाणोनिया आश्रम	१६६०
वर्म बोलो जाता	६६९
वाईटात बरे घेई	२४१
वाचे गुण उच्चारण	९५१
वाचे नाम थोर पुण्य	१०६१
वाणीची ती शुद्धी	६८८
वानप्रस्थाचे लक्षण	५४७
वायू मन एक होता	१२७८
वारी करिताची चुके	७१
वासनेचा उपशम	४५१
वासनेसी करू नको तू	४५०
विकल्प टाकी विकल्प	४९५
विकल्प दुर्बुद्धी पैल	१८२५
विकल्पी तो सदा दुःखी	४९४
वि चा ठोबा	१५३३
विचार धरिता होईल..ऐसे	९१९
विचार धरिता होईल..काशी	९२०
विचारेची काशी विचारेची	९१७
विचारेची होय हित	९१८
वीज झमकली	१७७१
विदेहीच्या सुखा	९३३
विवेक जाणणे चतुर्थ	९१४
विवेक धरावा अंतरी	९१३
विवेक धरिता होईल	९०८
विषय त्यागेवीण कैसा	९२३
विषयाचा मधुबिंदू	२७६
विषयातूनी निघे मन	१२६
विश्रांतीची स्थिती	११४९

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
विश्वासता गुरुनामी	१०७९	व्हावा सर्वत्र विजय	१२५१
विश्वासाचा देव आपुला	१४२७		
विसरत जा संसार	१७३०	श	
विस्मरणे चुकी भली	९०७	शक्तिदाता शिवध्यायी	२४६
वेगी व्हावे सावधान	९०६	शत अश्वमेध यज्ञ	१६६२
वेगी होऊनी सावधान	१०१०	शब्द जाणावा अनन्य	८२३
वेदविहीत हित भले	७४४	शब्द परमार्थी बोलती	५८९
वेदशास्त्र निंदणे	५२	शब्द रूपातीत शिव	१५३०
वेदशास्त्र पुराणानी	४२५	शब्दाने सांगता देव न	५८८
वेदशास्त्रार्थीचा करिता	४२४	शब्दज्ञान होता ज्ञान	५९०
वेध नामाचे स्मरण	१०८४	शांती धरिलिया मने	१८६५
वेध लागला अंतरी	१०८५	शांती हेचि खरे सुख	१८६४
वैकुंठी अधीश	१५११	शाश्वताची भक्ती	४१६
वैकुंठीची चतुर्दशी	२०१	शाश्वतात नाम घेता	६३४
वैकुंठीचे स्थानी	१६२३	शिकवण देती संत	७२८
वैराग्याची कास	९२७	शिखरातील धन	३३७
वैराग्याचे खरे भाग्य	९३१	शिमगा शिमगा सण	२५७
वैराग्याचे भाग्य थोर	९२९	शिवनाम घेता	१०९३
वैरी कोण तुझा	४३८	शिव भोळा चिंतित जाई	१७७७
वैष्णवांचे अंतरात	१६२२	शिवशक्ति या दोघाते	२४७
वंदन म्हणजे नमन	९८०	शिष्या करिती उपदेश	६३३
वांझेची संतती...काय	६९४	शिवसागरा माझारी	९४
वांझेची संतती...मृगजळाचे	६९३	शील परिपूर्ण	८६८
व्रतदान नामासमान	५७	शीर्षमार्गे जाता देवाची	१९००
वृत्ती संथ करी	४३२	शुद्ध ऐसे चांग मन	३९०
वृंदावनीची शोभा तू	१७०१	शुद्ध झालिया अंतर	४६
व्यर्थ मायेची मोहिनी	१६	शुद्ध मानसाची पूजा	९७८
व्यासालागी बोध नारदांनी	१६६४	शुद्ध राखिता आचार	१३६९
व्हाया खरे समाधान	१२५४	शुद्ध सत्वगुणी निश्चयाचे	१३९१

अभंगाचे नांव	अभं.क्र.
शुद्धान्न सेविता शुद्धचि	१३६८
शुभ तेचि काय रे	१७९१
शुभनाम शुभनाम	१७९२
शुभामाजी मने राही	१७९३
शेवट गोड तरी..अंती	१८०५
शेवट गोड तरी.. वदनी	१८०६
शेवट साधणे अधिक	१८७५
शेवट साधणे सर्वात	१८७६
शेवट साधणे हे गोष्ट	१४१३
शेवटच्या क्षणी	८९७
श्रद्धा ते काय श्रद्धा	७०१
श्रद्धा धरोनिया अल्प	७०२
श्रवण करी श्रवण करी	१७५२
श्रवण हरिनामी श्रवणदोष	९४९
श्रावण श्रावण	८३
श्रावणाचा मास योग्य	८४
श्रीब्रह्मचैतन्य	१५५६
श्रीराम जयराम	२२
श्यामधवल कृष्णनीळ	१६९९
श्वासामाजी आहे नाम	९६९

ष

षड्रिपूंची पळता फौज	१७५

स

सकळ तपाचेही तप	२२१
सकळ तपामाजी तप	२२२
सकळ साधनाचे वर्म	१२३४
सकळा तारक ते	६१३
सकळांचा अन्नदाता	५७१
सकळामाजी गोड	११८२
सकळामाजी मोठे	११८१
सकळामाजी सोपे	१०६०
सकळामाजी सुलभ पंथ	१३०८
सख्य देवाशी करावे	९८६
सख्य भक्तीचे लक्षण	९८८
सज्जना दुर्जना कैशी	१५७७
सणाचा शेवट रंगाची पंचमी	२६३
सत्‌चिद् प्रकाश मनी	२०५
सद्‌गुरूकृपे धन्य	११९८
सद्‌गुरुराजे काय केले	१५१२
सद्गुरूनामाचा महिमा	२७
सद्‌गुरु महिमा वाचे	२३
सद्‌गुरूंची कृपा	१३२६
सद्गुरूंची हो अवज्ञा	५१
सद्‌गुरूंचे मोक्षधामी	१६३८
सद्गुरूंचे ज्ञान.. जीवा	३१
सद्गुरूवाचोनी गुप्त गुरूमार्ग	२
सद्‌गुरुवाचोनी नाही देवा भेटी	७
सद्‌गुरुवाचोनी भेटेना	८
सद्‌गुरूसारिखा असताना	३२
सद्‌भक्तीची वाट समजोनी	७७५
सद्‌भाव पाऊली स्मरण	६००
सतीलागे शाप दिला	१६७३
सत्संगती एक क्षण	१६१८
सत्संगतीचे महिमान	१६१५
सत्तारूप सर्वाठायी	१२५
सत्तावीसा नऊ जाता	१४७

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
सत्य अनुभव पाही	५७२	समदर्शी जो झाला..तोचि	१३८७
सत्य ओळखोनी घ्यावे	४२०	सम विषमा पैल आधी	१५२५
सत्य कळो येता पाही	४१९	सम सकार तुळण	१९७
सत्य तेचि सदा असे	१८६६	समाधीचे सुख सांडी	१९२५
सत्य बोल अंतरात	७३०	समाधीच्या सुखा	१२१३
सत्य बोलणे अद्वैत	१५६६	सर्व करोनिया संपले	१४८७
सत्यचि रे सत्यचि रे	१७५१	सर्व कल्पना टाकोनी	१३७३
सत्य वाचे नारायण..तया	१६३९	सर्व कार्यकर्ता देव	१४८२
सत्य वाचे नारायण..त्यासी	१६४०	सर्व चाले गलबला	८८७
सत्य वैराग्य बाणता	९३२	सर्व देही नवद्वार	१८३०
सत्य सुख सत्य नामामाजी	१०७१	सर्व जग मायाधीन	१८२३
सत्य ज्ञान येता हाती	४१४	सर्व जीवा अन्न अधिक	१८५३
सत्य ज्ञानाचे लक्षण	४१५	सर्व जीवा तरणोपाय	७४५
सत्याचा संकल्प	४८५	सर्व जीवासी आधार	११४४
सत्वगुण प्रगटता	१२६७	सर्व तपाचे जे तप	१०६६
सत्व राखाया कारण	१६७०	सर्व तीर्थामाजी एक	१८२९
सत्संगतीचे महिमान	१६१३	सर्व तीर्थातीर्थ पवित्रा	१९१६
सदाचार वाट भली	१२५३	सर्व थोराहुन थोर	११४३
सदाचार सकळा श्रेष्ठ	८६९	सर्व दुर्लभात दुर्लभ ते	५६१
सदा चाले करकर	८८६	सर्व देवाहोनी थोर कोण	१४८३
सदा चाले देही	११९५	सर्व देहामाजी अधिक	१८०९
सदा देव रामनामी	१६११	सर्व दोषा प्रायश्चित्त	१०६२
सदा राहे सावधान	६८५	सर्व प्रेमामाजी थोर	१६३३
सदा सर्वकाळ धरिता	१२७९	सर्व बळामाजी देख	१८२६
समजत जा रे	१७१८	सर्व बोलणे बोलोनी	११३६
समजता नेम व्रत	७४	सर्व बोलती जनलोक	१८६७
समजे तरी उमगेना	११९४	सर्व रूपामाजी अधिक	१८८५
समर्थ हे संत जगती	१५५१	सर्व शक्तीची जे शक्ती	९२
समदर्शी जो जाहला..पंडित	१३८६	सर्व साधनाचे मूळ	३१८

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
सर्व साधू जाता काहीच	७२५	सहा नम्र होती जेथे	८३६
सर्व सुखा सुख ठेवा	१७८२	साठवावे ऐसे काय	१८२०
सर्व सेवेमाजी देख	१८८६	साठवणे हे अधिक..त्यात	१८१५
सर्वस्वाचे दान	१६६९	साठविणे हे अधिक..नाम	१८१८
सर्वस्वेसी वीट	७८	साठविणे हे विशेख	१८१९
सर्व संकल्पाचा न्यास	१३७२	साठवी रे साठवी रे	९९
सर्व संगामाजी देख	१८७३	साठ वीरे साठवी रे	१७८१
सर्व ज्ञानात अधिक	१८४२	सातत्याने नाम घेती	११२४
सर्व ज्ञानामाजी देख	१८४३	सात्विकाचे काम मुखी	१२६८
सर्वा अतिशय दोष	६६१	सात्विकाचे तप मुखी	१२६९
सर्वाठायी भरला ऐसा	१७७४	साताचिये वरी आठव्याचे	९५
सर्वा तपामाजी अधिक	१८७०	साता समुद्रामाझारी	१५१५
सर्वामाजी असे काल	१५३७	साधक तो साधक तो	१७८८
सर्वामाजी थोर कोण	१६१०	साधक योगी	१७८७
सर्वामाजी थोर तप	१०६७	साधक लक्षण	१५४२
सर्वामूळ कायी आहे	१३१०	साधक होवोनी राहे	११८
सर्वात अधिक कल्याण	१८५२	साधकाचे हित सद्गुरु	१३९६
सर्वाहून थोर खूण	१५६९	साधकासी साह्यकारी	१६४५
सर्वाहोनी सुलभ नाम	१८६९	साधणे ते साधी पाही	७२४
सवय ही भजनाची	८४६	साधनाचा हर्ष	१२३८
सहज नाम उदो शब्द	१२८	साधनी मन घटवी	१७१७
सहज पूजनी नुरे दुजेपण	९७९	साधनीच्या सुखा	१२१३
सहज बोधे फिरवी	१७१०	साधिलिया गुरुसेवा	२२६
सहज मन नेई बोधी	१७१२	साधिलिया मनोजय	३७६
सहज समाधी	१४१०	साधिलिया मनोजय.. नव्हे	३७७
सहजात सर्व काही	१२३७	साधी तू निजकाज	१६८८
सहजेची सहज पूजा	१४१७	साधी यमाची द्वितीया	१८२
सहस्रदळी पहाणे ज्योत	२१२	साधी साधनाचे बळ	१२४६
सहाकडे सरणे	३०१	साधी साधी साधी..गुरुनाम	१६८६

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
साधी साधी साधी..दृढ	१६८७	सुखी कोण सुखी कोण	८००
साधी स्वहित करणी	७४३	सूत्र ज्याने ओळखिले	१३७९
साधु गृही येता देती	८२२	सुलभ उपाय सर्वाधिक	१८६८
साधुजन गोष्टी जगाचे	१६०४	सुसंगती बरी साधावी	४४६
साधु शब्द मनी घेता	१६०१	सूक्ष्मदृष्टी पाही सूक्ष्मदृष्टी	१३११
साधुसंग सर्वाधिक	१८७२	सोड अंतरीचे कुढे	६३६
साधुसंत नाही गेले	२४०	सोडी मना अभिमान	१७०९
साध्य ते साधन	१२४९	सोडी संसाराचा सोस	६३७
सामर्थ्य असोनी क्षमा जे	१८६३	सोडू नये ऐसे काय..धरावे	६३५
सार ओळखिता असार	१०३६	सोडू नये ऐसे काय..बोलू	६३८
सारासार विचार करोनिया	१९३२	सोने पारखावे सोनाराचे	९०१
सारासार विचाराने	११९०	सोमवार एकादशी	२४४
सावता तो माळी	१५४६	सोस जडला नामाचा.. ओस	१४९३
सावध तो एक भला	१४०५	सोस जडला नामाचा.. तोचि	१२७५
सावधान सावधान	१४०७	सोस सोडी मना सोडी	१७०८
सावधान होऊनी वेगी	१४०८	सोवळा तो भला	५१२
साक्षात्कार साधण्या जय	१५२९	संकटाचा परिहार	५७९
साक्षात्काराहोनी चमत्कार	१३७१	संकटाचे वेळी.. कोण	४२७
साक्षीचा उपदेश	१२६१	संकटाचेवेळी.. देव भक्ताते	१६५७
सीमा उल्लंघन साधावा	१४५	संग धरी जाणत्याचा	४३५
सीमेवरील गान.. प्रपंच	२५२	संग धरी रे धरी	१५७६
सीमेवरील गान.. व्यवहार	२५३	संजीवनी मती	१०७२
सुख काय होता पाही	१४९४	संत उपदेश कोटी	४८१
सुख दुःखी समाधान	१३७५	संतकृपेचा महिमा	१६१४
सुखधामामाजी जाता	८०९	संत चित्रकार भले	१६३१
सुखस्थान राम देही	८०५	संत चितारी चांगले	१६३०
सुखस्थानामाजी जाता	८०८	संतजनांचा आचार	८९८
सुखामाजी सुखी	९१२	संत झाले वाणी	१५९९
सुखी कोण दुःखी	८०१	संत नामे भाग्यवंत	१६१२

अभंगाचे नांव	अभं.क्र.	अभंगाचे नांव	अभं.क्र.
संत पहाती तमासा	१५३४	संसरणी जो निराळा	२९६
संत बोलणे यथार्थ	६१९	संसार कावडी काढील	२८२
संत बोलणे विपरीत	१५६५	संसार कावडी घेवोनिया	२८१
संत मनी घेती तेचि मनी	४४७	संसार नगर संसरणी	२९५
संत मागती मागणी	११४६	संसार नगरी व्यवहार	१९०६
संत मुखातील बोल तू	१७८४	संसार बंधन कशाने	३१५
संत वचनाचा लाक्षणिक	१३५०	संसार मोहाची निवृत्ती	३१६
संतशब्द कानी घेता	१६०३	संसार सुफळ होणे	२९३
संत शब्द मनी घेता	१५९७	संसाराचा झोला काय	८९
संत शाळेमाजी जाई	७२७	संसाराचा भक्त झाला	२८९
संतसंग तो उपयोगी	१५७४	संसाराचा मोह अति	२७०
संत संगती न करी..आचरण	६३	संसाराचे गावी	२८०
संत संगती न करी..ऐसा	६२	संसारात मन संसार	२९०
संतसंगतीने देव पडे ठायी	१९१७	संसारी येऊनी तोचि	२९१
संतसंगतीने पालटती गुण	१६१९	संसाराचे वोडंबर	२७१
संतांचिया घरी	१५९५	सांगा म्हणती जन	५५९
संतांचिया पंथे जाता	१५९१	सांगा माया केवी तरे	४१०
संतांचिये भेटी	१६३२	सांगा रहावे ते कैसे	८३५
संतांचे बोलणे नाम	१५९८	सांगा स्वामी गुरुकिल्ली	१३२३
संतांचे भोजन... त्याची	१५१८	सांगितले करी रे ..साधन	१६८४
संतांचे भोजन.. परिमित	१३४९	सांडावे ते ऐसे काय	४८८
संतांचे मुखीचे काहीही	१५६४	सांडोनी कल्पना.. विकल्प	४८९
संतांचे वचन काही..म्हणोनि	७३८	सांडोनी कल्पना..समजोनी	४९०
संतांचे वचन काही..संत	१३५१	स्थिर वैराग्याचे भाग्य	९३०
संतांचे वचन सकळासी	१५६३	स्नान करोनी निर्मळ	६४८
संतांचे वचनी थोर	१६०९	स्नान करोनिया भला	६५२
संतापायी सर्व सुख	१५९४	स्नानाचा हा हेतु करावे	६४९
संतापाशी बसू जाता	१५७५	स्मरण घडवी या नाव	१८०७
संन्याशाचे गुणे भगव्यासी	५४९	स्मरण देव भेटे स्मरणी	९६७

अभंगाचे नांव	अभं.क्र.
स्मरण भक्तीचे लक्षण	९६८
स्मरणाचा देव जाणे कोण	१८९४
स्वपण नाम कळे जरी	१०७०
स्वपण म्हणजे जीवपण	७२६
स्वप्न तेचि मिथ्याभूत	१०६९
स्वयमेव टाळी देही	१०५
स्वयंभू स्वरूप	४०१
स्वरूप पहाणे बीज उमगणे	१९०७
स्वरूपाचा लोटे पूर	७२९
स्वरूपापासोन दूर बुद्धी	६९५
स्वरूपाचे सुख जीवासी	१६५
स्वरुपाचे सुख पाही	१५०९
स्वल्प नाम काय करी	६८६
स्वस्थ होऊनी पाहणे	१५३५
स्वस्वरूपी आपण येता	१५३८
स्वस्वरूपी स्थिर होणे	१२२९
स्वहिताचे लक्षण	७४१

ह

हरिकथा गंगाजळ	९६०
हरिकथा सर्वश्रेष्ठ	९५०
हरिचिया दासा हरिनाम	१७०
हरिनाम ध्वज श्रवणी	३४
हरिनाम मंजुळ गान	१२७६
हरिनाम युक्ति साधिली	१६२६
हरिनाम वाणी हेचि	७६
हरिनाम सकळा तारी	११९७
हरिनाम सदाचार	१२७०
हरिनाम साधनी देहाची	१२११
हरिनामाचा आचार.. तोचि	९४३
हरिनामाचा व्यवहार	३५६
हरिनामाची कावडी..खांदी	७३२
हरिनामाची कावडी..प्रेमे	७३१
हरिनामाची नौबद	७३३
हरिनामाचे साधनी	११९
हरिनामी धरी धीर	१२७१
हरिनामी धरी प्रेमा	११४२
हरिनामी निर्गुणी प्रगटे	१८९६
हरिनामी हरिदिनी.. थोर	७५
हरिभक्तीचे साधन.. नोहे	९४०
हरिभजनाची कळा	८४२
हरिमायेचा नवलाव	२७३
हरिहर अभेदासी	२०२
हरिहर ते अभेद	४८
हरिहरा भेद दुजा	४९
हस्तक्रिया देणे घेणे	१४८
हस्त नक्षत्र शोधावे	१४६
हळू हळू अभ्यासाने	१५५२
हा लोभ सोडी मना	१५८०
हाचि जीवा खरा लाभ	७३६
हाचि दिवाळी पाडवा	१८०
हाती येता आत्मज्योती	१३७८
हाती टाळी मुखी नाम	१०६
हा लोभ सोडी तू	१७०५
हित आपुले कवण	७५१
हित ओळखिता येणे	७५३
हित कशामध्ये आहे	७४६
हित जाणे जो आपुले	७५२

अभंगाचे नांव	अभं.क्र.
हितालागी भरी कसा	७५४
हिंडता दुकानी... न मिळे	१६००
ही साधील त्याला संध्या	१७२९
हे जाणावी तेचि गणेशचतुर्थी	११२
हेचि जाणावी त्रिपुरी	२०४
हेचि जाणावे नमन	३६९
हेचि थोर तप जाणावेचि	१०६८
हेचि देवाचे पूजन	९७४
हेचि देहाची सार्थकता	३२२
हेचि भजन लक्षण	९६३
हेचि मला हरि दे	१६८२
होई एकविध भक्त	१०८९
होऊनी लेक	१७३४
होऊनी सद्गुरूची लेक	६१७
होणार ते होयेना का	४६२
होता वाणीची ती शुद्धी	६८७
हंससुख सकळा थोर	१३०१
हृदयी वसे रघुवीर	१६७९

क्ष

क्षमा सर्वांचे स्वहित	१८६२
क्षमावंत हा तो संतांचा	१५८१
क्षेत्र हे आळंदी	२०९

ज्ञ

ज्ञान अज्ञान न ये कामी	६३२
ज्ञानमार्गे जाता जाण	४३१
ज्ञानिया रे बाप्पा ज्ञानिया	१८००
ज्ञानी म्हणोनिया नाम नेघे	३०५
ज्ञाने नामयुक्ती साधिली	१०१२
ज्ञानेश्वर माऊली	४
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर	२१०

टीपा व निवडक शब्दांचे अर्थ

१२ व्यसन - संकट

१३ हनुमंते - श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस

१८ ओत - आकर्षण, ओलावा

१९ इ.स. १९२३ मध्ये माघ वद्य तृतीयेस रविवारी श्रीतात्यासाहेबमहाराज हे भोजनास श्रीमामांचे इच्छेप्रमाणे आले होते. त्या प्रसंगास अनुलक्षून लिहिलेला अभंग. इ.स. १९२४ मध्ये माघ वद्य तृतीयेसच शुक्रवारी रात्री १२ वाजता श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी श्रीमामांना दासबोध वाचीत असताना प्रत्यक्ष प्रगट होऊन मस्तकावर हात ठेवून कीर्तन करण्याची आज्ञा केली.

२३ काकभृशुंडी - एक ऋषीचे नाव

३१ आत घेता, जाता - श्वासोच्छ्वास

४७ वारियात - शरीरात खेळणारे वारे

५० आधार - आधारचक्र

६१ सहागर - षड्रिपुरूपी विष

६२ अष्टविध वेध - पंचमहाभूते आणि त्रिगुण यांचा वेध

६६ सखी आणि पार्वती - देहबुद्धी आणि आत्मबुद्धी

७० आधीमन - अंतर्मन किंवा मनाची पूर्व अवस्था

७१ दोन मातृका - इकार आणि एकार

७३ हषीक - इंद्रिये

७७ ज्ञानेश्वरी जयंती - भाद्रपद वद्य ६

९७ प्रजापतीने 'द' या एका अक्षराने देव, दानव आणि मानव यांना बोध केला. याचा अर्थ अनुक्रमे - दमन करा, दया करा, दान करा असा आहे.

१०४ क- चार देह - स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण,

वलित - १. कोजागिरीच्या पौराणिक कथेतील ब्राह्मणाचे नांव. २ अंतर्मुख झालेला.

१२३ पंचमातृका - अ, उ, म, इ, एं, कार या पंचमातृका हे सर्व मिळून ॐकार होतो.

अ उ म - ओम् आणि इ व एं = ॐ

१२४ लळीत - कैवल्य धामात का. शु.॥८ ला जयंतीच्या उत्सवात लळीताकरिता घेतलेला अभंग

१३१ तोबा - तो बा

१३४ ब्रह्मगिरी - सहस्रदलस्थान

१५२ हनुमानव्रत - मार्गशीर्ष शु. १३ चे दिवशीचे व्रत

१५६ ती.प.पू.श्रीमामांचे कीर्तन प्रतिवर्षी भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे पुण्यतिथी महोत्सवात श्रीहनुमान समाधी मंदिरात नदीकाठी पौष वद्य १ ते पौष वद्य ६ अखेरी नंतर समाप्तीचे लळीताचे कीर्तन होत असे. १९६२ मध्ये श्रीमामांना बरीच दुखणी झाली होती. कार्तिकी पाडव्यानंतर त्यांना उठणे बसणे देखील अशक्य झाले होते. डॉ. उदगांवकर व फडणीस यांनी 'उठून बसू नका' असे सांगितले होते. तथापि श्रीमामांचे नित्याचे नामसाधन व कीर्तन हे अगदी उत्साहपूर्ण चालूच होते. आयुष्यात त्यांचा चेहरा वाकडा कुणी पाहिलाच नाही. सदैव प्रसन्न चेहरा. कुणी विचारले तर मोजक्या शब्दात उत्तर आणि लगेच त्याचे हातावर चिमटभर साखर मिळत

असे. श्रीमामांचे या प्रकृतिमुळे यंदा (१९६२मध्ये) उत्सवात ते घरीच सकाळी कीर्तन करीत होते व त्यांचे चिरंजीव रामभाऊ सायंकाळी समाधी मंदिरात कीर्तन करीत. श्रीहनुमानषष्ठीचे दिवशी गु.भ.प. गंगाधरराव सिंग व श्रीसोनोपंत लागू हे श्रीमामांचेकडे आले व म्हणाले, "आम्ही तुम्हास अलगद उचलून नेले तर समाधीत याल काय?" श्रीमामांनी लगेच येतो, असे उत्तर दिले. डॉक्टरांनी तर आपले कानावर हात ठेवले. तरीही खुर्चीवरून भाविक मंडळींनी श्रीमामांना समाधीत नेले. तेथे त्यांनी दोन अडीच तास कीर्तन केले. त्यावेळी तेथेच कीर्तनासाठी हा घेतलेला अभंग आहे. या अभंगावरच त्यांचे कीर्तन झाले. त्यावेळी त्यांनी "हनुमान समाधीमंदिरातील ही माझी अखेरची सेवा आहे" असे उद्‌गार काढले.

१६३ सात- पिंडातील सप्तचक्रे १. मूलाधार, २. स्वाधिष्ठान, ३. मणिपूर, ४. अनहत ५. विशुद्ध ६. बलवान किंवा आज्ञाचक्र व ७. सहस्रदल

१६४ माघ वद्य प्रतिपदा - श्रीमामांचे आईची पुण्यतिथी

१६५ माघ वद्य ३ - श्रीगुरुतृतीयेला घेतलेला अभंग

१६७ आतौते - आत

१६९ धूर्जटी - शंकर

१८९ कापडी - यात्रेकरू, प्रवासी

२३२ गरूडध्वज - विष्णु

२८० 'भ' - तेज (तेजाची ओळ)

५५५ तपन - सूर्य

५७६ गोकुळ - देहभाव

६५३ अव - वाईट

७४६ एकोणीस - विस्मरण

७५० आम - प्राण

८०४ तीन - इडा, पिंगला, सुषुम्ना.

८५५ छ न देणे - षड्विकाराकडे वृत्ती न देणे

९१७ छालिक्याचे गान - तालबद्ध गायन

९९२ श्रीनिंबरगीकरमहाराज शेतातून घरी नेण्यासाठी वाकाचे दोन भारे मस्तकावरून आणत होते. तेवढ्यात प्रत्यक्ष भगवंतच एका काळसर वर्णाचे मनुष्याचे रुपाने तेथे आले आणि मीच हे भारे पोचवतो असे म्हणून त्यांनी दोन्ही भारे आपल्या मस्तकावर घेऊन महाराजांचे घरी पोचते केले व चार पावले चालून अदृश्य झाले. या प्रसंगावर आधारित हा अभंग आहे.

९९३ श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीमामांची, श्रीमामांचे लहानपणीच गाठ पडली होती व त्यावेळी श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी हा मुलगा मोठा साधु होईल असे श्री.पाठकमास्तर यांना सांगितले होते. त्या भेटीवरील हा अभंग.

१०३८ श्रीक्षेत्रनिंबरगी येथील स्वयंभू चतुर्भुज श्री भीमरायाची पितळेची मूर्ती सांगली येथील कैवल्यधामात - समाधि मंदिरावर कार्तिक व.१२ शके १८७४ शुक्रवार रोजी श्रीमामांचे हस्ते प्रतिष्ठित झाली. त्याप्रसंगी कीर्तनास घेतलेला अभंग.

१०३९ माधवनगर कॉटन मिलचे धनी श्री. नातूशेठ यांचेकडे सत्यनारायण प्रसंगी श्रीमामांचे कीर्तन झाले. त्यावेळी कीर्तनास घेतलेला अभंग.

१०७० श्रीमामांची पहिली काव्यरचना

११४९ कईचे - अनादि

११५० पासवण - फसवणूक

अधिक - अधिक महिन्यात, आपल्या मानवी जीवनात आपणास अधिक महत्वाचे काय आहे, हे पाहण्याचे दृष्टीने लिहिलेले अभंग.

नित्यपाठ : चैत्र आणि श्रावण या दोन महिन्यात अनुक्रमे श्रीरामपाठ आणि श्रीहरिपाठ यावर श्रीमामांची कीर्तने होत. उरलेल्या दहा महिन्यात दर पंधरवड्याला एक याप्रमाणे एकूण वीस अभंग नित्यकीर्तनासाठी घेत असत. प्रत्येक महिन्यातील धार्मिक वैशिष्ठ्ये त्यात कथन केली आहेत. अर्थात् हे अभंग श्रीमामांनी शेवटी शेवटी लिहिले आहेत. काही जणांच्या नित्यपठणात हे अभंग आहेत.

श्रीरामपाठ : श्रीरामपाठ म्हणजे श्रीमामांच्या अभंगरचनेचा कळसच होय.

श्रीमामांनी भगवान् सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज, यांचे ओवीबद्ध चरित्र 'श्रीहनुमद्गुरुचरित्र - बोध - सार' लिहून पूर्ण केले. आणि लगेच दुसऱ्या दिवशी एकाच बैठकीत 'श्रीरामपाठ' पूर्ण केला (पौष शु. ५, शके, १८६०) मुद्दाम नमूद करण्यासारखी विशेष घटना म्हणजे ३२ व्या अभंगाचे पहिले पाच चरण पूर्ण केले आणि आता अभंग पूर्ण कसा करावा अशा विचारात श्रीमामा असताना त्यांची समाधीच लागली अन् तीन तास पर्यंत श्रीमामा त्याच अवस्थेत होते. प्रत्यक्ष श्रीरेवणसिद्धच श्रीमामांपुढे प्रगट झाले तेव्हा त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून श्रीमामांनी शेवटचा चरण लिहिला "**गोविंद करी रेवणसिद्धपदी नमन । रामपाठ पूर्ण सांग झाला ॥**".

श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि श्रीरेवणसिद्ध यांच्या कृपेनेच श्रीमामांनी लिहिलेला हा श्रीरामपाठ आज असंख्य भाविकांच्या - साधकांच्या नित्यपाठात आहे. आजवर तीन आवृत्त्या निघाल्या असून चौथी आवृत्ती गाथेत समाविष्ट होत आहे.

श्रीमामांच्या जीवनाचे सार थोडक्यात सांगावयाचे झाले तर

श्रीरामपाठच पहावा लागेल. रोजच्या कीर्तनानंतर श्रीरामपाठ म्हटला जातो. श्रीमामांचे अखंड संकीर्तन त्यांच्या देहत्यागानंतर देखील चालूच आहे, या श्रद्धेने भावनेने.

शेवटचा अभंग (१३००वा) - अखंड ३७ वर्षे नित्याचे कीर्तन झाल्यावर श्रीमामांचे मनांत आले की वर्षाच्या प्रत्येक दिवशी आपण ज्या अभंगावर कीर्तने करतो व त्याचे निरूपणात आधाराचे अभंग, पदे गोष्टी इ. सांगतो त्यांची टाचणे लिहून ठेवावी आणि त्याप्रमाणे कीर्तनानंतर ते टाचणे लिहू लागले. कार्तिक महिन्यापासून ते माघ शुद्धापर्यंत निजूनच होते. नित्यसाधन व बसून कीर्तन चालूच होते. १९६२ मध्ये देह ठेवण्यापूर्वी शनिवारी त्यांनी एकदम शनिवार, रविवार, सोमवार, या तीन दिवसांची टाचणे सांगितली. "मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजयराम ॥१॥ अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ॥२॥ गोविंद म्हणे स्वस्वभाव । जीवा सोडी रे अभाव ॥३॥" या अभंगावर काही टाचण सांगून झाले व श्रीमामा स्वस्थ राहिले. पुढे काय लिहावयाचे? म्हणून विचारले असता, यापुढचे टाचण आमचा **रामजी** सांगेल असे श्रीमामा म्हणाले. आणि आश्चर्य सोमवारी सकाळी ६ वाजज्यापासून नाडथा सुटलेल्या तरी सायंकाळी ५ वाजता नित्याचे कीर्तनाची वेळ होताच श्रीमामांनी आपली मान वर करून "**श्रीराम जयराम जयजयराम**" या मंत्राचा घरापुढील विहिरीपाशी असलेल्यांनाही ऐकू जाईल असा मोठ्याने घोष केला असे हे त्यांचे मंत्ररूप कीर्तनच झाले.

शनिवार अखेर त्यांचे कीर्तनास एकंदर अडतीस वर्षात शपथेला एकही दिवस खंड झाला नाही. सोमवारी उच्चारलेला महामंत्र हेच त्यांचे शेवटचे कीर्तन होय. हे ध्यानी येईलच. परमप्रिय न. दा.

दिवेकर (श्री. अण्णा) यांनी श्रीमामांचे 'श्रीगोविंदचरित मानस' या नावाचे ओवीबद्ध उत्तम चरित्र लिहिले आहे. त्यात ते लिहितात,

सोमवारचे कीर्तन । मामानी ठेविले टाचून ॥
ते मंत्ररूपे सांगून । मामानी देह ठेविला रे ॥
श्रीराम जयराम जयजयराम ॥

यावरून या अभंगाचे महत्त्व स्पष्ट होते.

अमृतवाणी श्रीमामांची नामामृत बोले ।
अमृत घेता नाम राहिले तारक जगी आले ॥ध्रु॥
नामयोग या स्थायी भावी रंगून जो गेला ।
मुखी ग्रास हा ब्रह्मरसाचा सुगंध दरवळला ॥१॥
अभंग सागर श्रीमामांचा चैतन्यी नटला ।
त्रयोदशाक्षरी नामामध्ये कैवल्यी रमला ॥२॥
नाम साधनी नाम चिंतनी नाम हाच भाव ।
नामाविण नच दुजा विचार नाम हाच देव ॥३॥
नामस्मरणी रमली वाणी कंठी नाममाळा ।
संसारी राहून शोभला वैराग्याचा पुतळा ॥४॥
अखंड कीर्तन श्रीमामांचे पूजन श्रीदेवाचे ।
भान विसरूनी कीर्तनरंगी देव पुढे नाचे ॥५॥
भक्त वत्सला हरि गोविंदा नमितो मी माथा ।
तव पायाशी जागा द्यावी आशीष द्या नाथा ॥६॥

--श्री. प्रकाश भावे

एकनाथ गोविंद जाहला

एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ॥ध्रु॥
पंचक्रोशी ही दत्तप्रभूची । कृष्णा वाहे अमृतजलाची ।
पावनभूमी तपोवनाची । स्थान पाहुनी धाला ॥१॥
कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनुची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ॥२॥
एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नामरसाचा पिऊनि प्याला । रंगी रंगुनि गेला ॥३॥
दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन-कीर्तन-रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ॥४॥
पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।
हरिभक्तीचा कळस डोलतु । पांडुरंग मनी भरला ॥५॥

-श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर, सांगली

ती.प.पू. श्रीमामांच्या निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके अठराशे त्र्यांशीत । प्लव संवत्सरात उत्तरायण ॥१॥
माघ शुद्ध नवमी आणि सोमवार । रात्री द्वितीय प्रहर तिसरे तासी ॥२॥
गोविंदरायांनी केले हो निर्याण । अखंड कीर्तन सत्य केले ॥३॥
एकांती लोकांती देहांतीही नाम । प्रचीती उत्तम स्वये दिली ॥४॥
श्रीराम जयराम जयजयराम । संदेश परम निर्वाणीचा ॥५॥
हनुमंतरूपी मिळोनीया गेले । कीर्तीरूपे उरले दासरामी ॥६॥

श्रीदासराममहाराज केळकर

आरती

अमृतवाणी - गाथेची

जयदेवी जयदेवी जय "अमृतवाणी"।
वाणी चिन्मयखाणी जय जय भवतरणी ।। जयदेवी ।।ध्रु।।
भक्तीप्रताप महिमा नामामृत कीर्ती ।
कीर्ती संत सुधामृत तेजोनिधि मूर्ती ।।
मूर्ती अभंग अक्षर सिद्ध तपोधारा ।
धारा सुरसरिता वाणी दिव्या परपारा ।। जयदेवी ।।१।।
नारायण हनुमंतगुरु संकीर्तन प्रीती ।
प्रीती अखंड कीर्तन सेवा गुरुभक्ती ।।
भक्ती सहज समाधी गोविंदाऽमृतवाणी ।
वाणी वन्दे धन्या दासा निजस्मरणी ।। जयदेवी ।।२।।

-प्रा.दामोदर विष्णु कुलकर्णी, सांगली

ती.प.पू. श्रीमामांची

आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधुबोधा ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरुआज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२
श्रीराम जयराम जयजयराम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे दासराम ।।३।।

श्रीदासराममहाराज केळकर

प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ॥धृ॥
सद्गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ॥१॥
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे **केशवाने** । चरणी मस्तक ठेविले ॥२॥

प्रा.डॉ.के.वा.आपटे

प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर यांची आरती

आरती रामसूता । जय कैवल्यपीठा ॥
सद्गुरू दासराम । काय वानू महाबोधा ॥१॥
सहज बोलणे ते । जगा केला उपदेश ॥
नवनीत काढुनिया । जना केलेसे तृप्त ॥२॥
अनाथांचे नाथ तुम्ही । जगी प्रेमे कुरवाळिले ॥
चंद्रदास शरण येता । निजपदी रत केले ॥३॥

श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुर्लिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

क्रमांक	ग्रंथाचे नांव
१	नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका
२	श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
३	श्रीरामदासबोध (ओवीबद्ध)
४	संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
५	श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला (ओवीबद्ध टीका)
६	श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
७	ग्रंथत्रयी (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी)
८	श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग
९	श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन
१०	श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (३६५ वचने)
११	श्रीगुरुमहिमा
१२	श्रीदासरामगाथा पुरवणी
१३	श्रीदासराममहाराज आत्मचरित्र
१४	श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना
१५	श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह)
१६	रामदासस्वामीकृत आत्माराम (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)
१७	श्रीगुरुलिंगगीता (२२८ पदे)
१८	श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)
१९	श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे
२०	श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित)
२१	श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी
२२	श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन
२३	श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८)
२४	समर्थ रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)

क्रमांक	ग्रंथाचे नांव
२५	श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ)
२६	श्रीदासराममहाराजकृत **रामदासबोध** (विवरणासह)
२७	**ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह)
२८	**श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)
२९	**श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह)
३०	**परमार्थ प्रश्नोत्तरी**
३१	**श्रीदासराम चिंतनिका** (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह)
३२	**श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण)
३३	**अक्षरे चैतन्याची भाग-१** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)
३४	**अक्षरे चैतन्याची भाग-२** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)
३५	**ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने)
३६	**अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन)
३७	**श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने)
३८	**श्रीनित्यपाठांमृत** (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
३९	**श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र** (श्रीदासराम लिखित)

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
१	चिमड संप्रदाय	२००५
२	श्रीरामदासस्वामी चरित्र	२००६
३	श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग	२००६
४	श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन	२००७
५	श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र	२००७
६	दासबोधातील तत्त्वज्ञान	२००७
७	श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह	२००८
८	श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र	२००९
९	साधन संध्या	२००९
१०	अनंत अमृत स्मरण	२००९
११	श्रीगुरुमहिमा	२००९
१२	श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह)	२००९
१३	श्रीदासरामगाथा पुरवणी	२००९
१४	श्रीदासराममहाराज आत्मचरित्र	२०१०
१५	श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र	२०१०
१६	श्रीदासराममहाराज श्लोकरचना	२०१०
१७	श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह)	२०१०
१८	श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र	२०१०
१९	रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह)	२०१०
२०	श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत)	२०१०
२१	श्रीगुरुलिंगगीता (मराठी)	२०१०
२२	श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका)	२०११
२३	श्रीरामनिकेतनमधील आराधना	२०११

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
२४	**ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी)	२०११
२५	**श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह)	२०११
२६	**अभंगदरबार (आवृत्ती १)**	२०११
२७	**सद्बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण)	२०११
२८	**श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र**	२०११
२९	श्रीगुरुराजकथित **ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०११
३०	**प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
३१	**पाठांतर सुलभ भगवत्गीता**	२०११
३२	**श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे**	२०११
३३	श्रीतात्यासाहेबमहाराजकृत **मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह)	२०११
३४	**प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
३५	महायोगिनी **श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र**	२०११
३६	**तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह)	२०११
३७	**श्रीदासराममहाराज चरितामृत**	२०११
३८	**श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र**	२०११
३९	**श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र**	२०११
४०	श्रीतात्यासाहेबमहाराज **कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित)	२०११
४१	**श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी**	२०११
४२	**श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन**	२०१२
४३	**श्रीदासरामम**हाराज **यांची प्रवचने** (१०८)	२०१२
४४	**प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र**	२०१२
४५	श्रीदासरामगीतम् (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना)	२०१२
४६	**श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने)	२०१२
४७	**चैतन्यब्रह्म**	२०१३

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
४८	श्रीदासराममहाराजकृत **वायुलहरी** (विवरणासह)	२०१३
४९	**स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)	२०१३
५०	श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ)	२०१३
५१	**चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह)	२०१३
५२	गुरुलिंगगीतेचे **अंतरंग भाग -१**	२०१४
५३	श्रीदासराममहाराजकृत **रामदासबोध** (विवरणासह)	२०१४
५४	श्रीदासरामायण (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र)	२०१४
५५	श्रीदासराममहाराज **केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत**	२०१४
५६	श्रीदासराममहाराजकृत **रेवणसिद्धपाठ** (विवरणासह)	२०१४
५७	गुरुलिंगगीतेचे **अंतरंग भाग-२**	२०१५
५८	**अभंग दरबार** (आवृत्ती २ री)	२०१५
५९	श्रीदासरामचरित्र (ओवीबद्ध)	२०१५
६०	**आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण)	२०१५
६१	**ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह)	२०१५
६२	श्रीमद्दासबोधातील **प्रपंचयोग**	२०१५
६३	**अभंग दरबार भाग - २**	२०१५
६४	श्रीज्ञानदेवांचे **निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)	२०१६
६५	श्रीएकनाथकृत **आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह)	२०१६
६६	**नासदीयसूक्त विवरण**	२०१६
६७	श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी **भावार्थ विवरण**	२०१७
६८	**पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी**	२०१९
६९	**दासबोधातील परमार्थ योग**	२०१९
७०	**चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह)	२०१९
७१	**परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण)	२०१९

पुष्प क्रमांक	ग्रंथाचे नांव	सन
७२	**चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह)	२०१९
७३	**श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह)	२०१९
७४	**श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण)	२०१९
७५	**अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)	२०२०
७६	**अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन)	२०२०
७७	**ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने)	२०२०
७८	**अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन)	२०२०
७९	**श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका)	२०२०
८०	**श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने)	२०२०
८१	**नित्यकीर्तनानंदा**	२०२०
८२	**चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ)	२०२०
८३	**सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०२०
८४	**अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण)	२०२०
८५	**श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) (द्वितीय आवृत्ती)	२०२०
८६	**आरती संग्रह** (द्वितीय आवृत्ती)	२०२०
८७	संजीवनपाठ (द्वितीय आवृत्ती)	२०२०

अमृतवाणी निष्कर्ष

या असार संसारात दुर्लभ नरदेह प्राप्त झाल्यावर, येथे कशात काय अधिक आहे हे जाणून घेऊन सण-पर्वकाळांचा आंतरिक अर्थ लक्षात घेऊन संत-सद्गुरुंनी साधकांसाठी केलेला उपदेश ध्यानात ठेऊन, मनामध्ये विवेक, वैराग्य व भक्ति बाणवून देवादिकांना नमन करुन, त्यांचे भजन गाऊन, माणसाने नाम-साधन केले तर त्याला देवाचा अनुभव येईल आणि त्याचे अंतिम ध्येय जे मोक्षसुख ते त्याला प्रासंगिकपणाने नव्हे तर निश्चितपणाने प्राप्त होईल, असा श्रीमामांच्या अमृतवाणीचा निष्कर्ष आहे.

– प्रा.डॉ. के.वा. आपटे